म. ग्रं. सं. ठाणे.
विषय
क्र. 3839

# प्रतिबिंब ९०

सदा डुम्बरे

REFBK-0026387

संदर्भ निबंध / राजकीय
3439
६३८७
य ६४९७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

20 JUL 1991
20 JUL 1991
24 AUG 1991
2 OCT 1991
13 NOV 1991
15 MAR 1992
20 JUN 1992
5 AUG 1992

( क्रु. मा. पहा )
१००००–११–८९

# प्र ति बिं ब १०

प्र ति बिं ब १०

प्र ति बिं ब १०

प्र ति बिं ब १०

# प्रतिबिंब १०

# प्रतिबिंब ९०

## सदा डुम्बरे

REFBK-0026387

उत्कर्ष प्रकाशन
डेक्कन जिमखाना, पुणे : ४११ ००४.

© सदा डुम्बरे
इंद्रायणी, पत्रकारनगर, पुणे ४११ ०१६.
प्रथमावृत्ती : जानेवारी १९९१.

मुद्रक :
**आनंद लाटकर**
कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि.
टिळक रोड, पुणे ४११ ०३०.

प्रकाशक :
**सौ. सविता जोशी**
उत्कर्ष प्रकाशन
रेणुका अपार्टमेंटस्
पुणे ४११ ००४.

मुखपृष्ठ :
**शाम देशपांडे**, पुणे.

**मूल्य ६० रुपये.**

प्रतिबिंब ९०

माझ्या वैचारिक प्रवासाचे
मार्गदर्शक
प्रभाकर पाध्ये
आणि
श्री. ग. मुणगेकर
यांच्या
प्रेरक स्मृतीस

ऋणनिर्देश :
सकाळ पेपर्स लिमिटेड
आणि
साप्ताहिक सकाळ
पुणे २.

# प्र ति बिं ब ९०

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | शिवरायांचे ओळखावे रूप | १ |
| २ | शिवसेना आणि परिवर्तनवादी | ६ |
| ३ | अंतुले साहेबांची बॅरिस्टरकी ! | ११ |
| ४ | ब्राह्मण्य : जातीय आणि वर्गीय | १५ |
| ५ | माने, आता मौन सोडा | २१ |
| ६ | मान्यांचे धर्मांतर | २५ |
| ७ | 'सत्यशोधक' मुस्लिम | ३० |
| ८ | साखर सम्राटांची ऐशी तेशी | ३४ |
| ९ | वॉटर लॉबी | ३९ |
| १० | आर्थिक अरिष्टात महाराष्ट्र | ४५ |
| ११ | पानशेत पर्यटन | ५० |
| १२ | वैधानिक विकास की राजकीय विभाजन ? | ५४ |
| १३ | नरुभाऊंची काँग्रेस | ५८ |
| १४ | सीमाप्रश्नांचा गुंता | ६३ |
| १५ | मराठी हैदराबाद | ६७ |
| १६ | म्हैसूरचा वाघ वादाच्या पिंजऱ्यात | ७१ |
| १७ | काश्मीर : हिंदू राष्ट्रवाद विरुद्ध सेक्युलर डेमॉक्रसी | ७८ |
| १८ | सरकारच्या डोक्यावर हेल्मेट | ८४ |
| १९ | बंद करा हे 'बंद' | ८९ |
| २० | दहावीची मुलं नापास का होतात ? | ९४ |
| २१ | देश विकायला कोण निघाले आहे ? | ९८ |
| २२ | अपरिहार्य राजकीय आघाड्या | १०२ |
| २३ | लाट नसलेली निवडणूक | १०६ |
| २४ | दिल्लीच्या तख्तावर कोण बसणार ? | १११ |
| २५ | सत्तांतर : एक मध्यांतर | ११७ |

| | | |
|---|---|---|
| २६ | व्ही.(आय) पी. मंत्रिमंडळ | १२२ |
| २७ | महाराष्ट्रात काय होणार ? | १२७ |
| २८ | तोतयांची बंडखोरी | १३५ |
| २९ | महाराष्ट्रातील यशाचा अर्थ | १३९ |
| ३० | देवीलाल बोले, हरियाना हाले | १४५ |
| ३१ | राजीवला पर्याय का नाही ? | १५० |
| ३२ | मंडल आयोग आणि शौरींचे तर्कट | १५५ |
| ३३ | स्थितिवादी राजकारणाला धक्का | १६१ |
| ३४ | रामजन्मभूमी राजाचा बळी घेणार काय ? | १६७ |
| ३५ | अरे भाई, मस्जिद है कहाँ ? | १७२ |
| ३६ | सर्वांच्या मनात देशाचाच विचार ! | १७७ |
| ३७ | राजीव, व्ही.पी. आणि वृत्तपत्रे | १८२ |
| ३८ | बोफोर्स, सरकार व वृत्तपत्रे | १८७ |
| ३९ | 'सकाळ'चे उत्तरायण | १९१ |
| ४० | परिषद झाली; पुढे काय ? | १९५ |
| ४१ | याला काय लेखकांचे स्वातंत्र्य म्हणायचे ? | २०० |
| ४२ | मधुकाका आणि प्रकाशक संमेलन | २०५ |
| ४३ | सरकार, प्रकाशक आणि वाचक | २१० |
| ४४ | रायगडचे सारस्वत | २१५ |
| ४५ | एस. एम. : यशस्वी पराभूत | २२० |
| ४६ | लोकनेता वसंतदादा | २२३ |
| ४७ | 'नाहीरें'चा बाबा | २२७ |
| ४८ | मिशनरी मोडक | २३२ |
| ४९ | विकासाची व्यक्तिकेंद्रित बेटे | २३७ |
| ५० | 'शंवाकिं'चे शताब्दी स्मरण | २४३ |

प्रतिबिंब १०

3837
26386
नोंदणी 22494

## प्रस्तावना

भूतकाल, वर्तमानकाल आणि भविष्यकाल एकमेकांत गुंतलेले आणि गुंफलेले असतात. वर्तमानकालीन घटनांना भूतकालाचा संदर्भ असतो आणि याच घटनांतून भविष्यकालीन घडामोडीची पार्श्वभूमी तयार होत असते. काही लेखकांचे मन भूतकालातच गुरफटून पडते. काही स्वप्नाळू लेखकांना भविष्यकालाची चित्रे रेखाटावी असे वाटते. वृत्तपत्रीय लेखन हे मात्र मुख्यत: वर्तमानकालाशीच निगडीत असते. बातम्यांतून वर्तमानकालाचेच स्वरूप व्यक्त होते. स्फुटे लिहिताना वाचकाचे लक्ष एखद्या घटनेकडे वेधून घ्यावे आणि त्यावरील मत थोडक्यात मांडावे एवढाच लेखकाचा उल्लेख असतो. परंतु स्तंभलेखक आणि अग्रलेख लिहिणारे संपादक यांच्याकडून मात्र वाचकांची वेगळी अपेक्षा असते. वर्तमानकालातील महत्त्वाच्या घडामोडींवर भाष्य करणे, त्या घडामोडींच्या मागे जे सामाजिक, राजकीय , आर्थिक प्रवाह असतात त्याचे स्वरूप उकलून दाखविणे हे स्तंभ लेखकांनी आणि संपादकांनी करावयाचे असते. त्याचप्रमाणे या घडामोडींचे समाजजीवनावर काय परिणाम होतील हे सांगून देशहिताच्या दृष्टीने, जे घडते ते कितपत योग्य आहे यासंबंधींचा दृष्टिकोण मांडणे हे संपादकांचे कर्तव्य असते. म्हणजेच वृत्तपत्रांतील सर्वच लेखन तात्कालिक स्वरूपाचे नसते. स्तम्भ-लेखन, लेखमाला आणि संपादकीय अग्रलेख यांमधून ज्याप्रमाणे वस्तुस्थितीवर प्रकाश टाकला जातो, त्याचप्रमाणे समाजाचे प्रबोधनही केले जाते, आणि समाजाच्या विचारांना दिशा दिली जाते.

माझे तरुण मित्र पुण्याच्या साप्ताहिक सकाळचे संपादक श्री. सदा डुंबरे यांना संपादकीय जबाबदारीची उत्तम जाण आहे. आणि वर्तमान-कालीन घटनांचा वेध घेताना आपले लेखन केवळ तात्कालिक स्वरूपाचे

होऊ नये याची ते सतत खबरदारी घेत असतात. यामुळेच त्यांचा वृत्तपत्रीय लेखांचा संग्रह प्रसिद्ध व्हावा असे त्यांच्या मित्रांना वाटत होते. जानेवारी १९८९ ते नोव्हेंबर १९९० या जवळजवळ दोन वर्षांच्या काळात लिहिलेल्या विविध लेखांचा हा संग्रह आहे. या लेख संग्रहात महाराष्ट्रातील एक थोर संपादक आणि समाजसुधारक कै. शं.वा. किर्लोस्कर यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने लिहिलेला जो लेख आहे त्यामधून केवळ शं.वा.कींचे स्मरण वा स्तुती नसून, श्री. डुंबरे यांना संपादकाच्या जीवनमूल्यांबद्दल काय वाटते हे व्यक्त झाले आहे.

आपल्या समाजजीवनात राजकरणाला फार महत्त्व आहे. त्यामुळे या लेखसंग्रहातील निम्म्याहून अधिक लेख राजकीय विषयांवरील आहेत. हे लेख कालानुक्रमाने वाचताना गेल्या दोन वर्षांतील राजकीय जीवनातील वादळे, संघर्ष आणि उलथापालथी यांचा चलच्चित्रपट आपल्या मनासमोर उभा राहतो. 'अपरिहार्य राजकीय आघाड्या' या लेखातून श्री. डुंबरे यांनी सध्याच्या भारतीय राजकारणातील वास्तवाचे विवेचन केले आहे. कोणताच एक पक्ष जनमानसाची पकड घेऊ शकत नाही. विविध भागांतील सामाजिक परिस्थिती भिन्न असल्यामुळे वेगवेगळ्या राजकीय पक्षांची प्रभावक्षेत्रे देशाच्या वेगवेगळ्या भागांत आहेत. या संदर्भात महाराष्ट्रात शिवसेना ताकदवान असल्यामुळे वेगवेगळे राजकीय पक्ष कोणत्या ना कोणत्या स्वरूपात शिवससेनेचे सामर्थ्य मान्य करून आपले पवित्रे कसे टाकतात, हे श्री. डुंबरे यांनी बरोबर सांगितले आहे. 'सत्तांतर एक मध्यंतर' या लेखात विश्वनाथ प्रताप सिंग यांनी ज्यांच्या पाठिंब्यावर सरकार बनविले त्यांचे वर्णन करून श्री. डुंबरे लिहितात, डावे, उजवे हे घटक आज तातडीने निर्णायक ठरणार असले तरी या तऱ्हेचे तात्कालिक तडजोडीचे राजकारण फार काल परिणामकारकपणे रेटता येणार नाही. अनेक राजकीय विचारवंतांनी व्ही.पी. सिंग यांना हा इशारा दिला होता आणि त्यांचा राजकीय अंदाज खरा ठरला आहे.

निवडणुकीच्या कालखंडातील लेखांमध्ये तात्कालिक विषयांची चर्चा होणे अपरिहार्य असले तरी लोकांसमोर विचार मांडला गेला पाहिजे हे भान ठेवून डुंबरे यांनी 'देश विकायला कोण निघाले आहे?' हा लेख लिहिला आहे. या लेखात त्यांनी राजीव गांधींच्या सवंग विधानांचा समाचार घेतला असून विकासाच्या हव्यासापायी आपण आंतरराष्ट्रीय

नाणेनिधी, जागतिक बँक यांच्याकडून कर्ज घेताना आपल्या स्वातंत्र्यावर बंधने स्वीकारतो हे सडेतोडपणे मांडले आहे. या लेखातील पर्यावरणाच्या संरक्षणाकडे देशाचे लक्ष वेधण्यासाठी निवडणूक लढविणारे थोर साहित्यिक शिवराम कारंथ यांचा आदरयुक्त उल्लेख उचित आहे.

महाराष्ट्रातील निवडणुकीवर लिहिताना श्री. डुंबरे यांनी 'शिवससेना-भाजप युतीने महाराष्ट्राच्या राजकारणात निर्माण केलेल्या प्रश्नांना केवळ निवडणुकीचाच विचार करून उत्तर देता येणार नाही. त्यासाठी राजकारणाची फेरआखणी झाली 'पाहिजे' असे लिहिले असून 'त्यासाठी कोण पुढाकार घेणार ?' असा सवाल पक्षनेत्यांना विचारला आहे. 'महाराष्ट्रातील यशाचा अर्थ' आणि अन्य काही लेखांतून महाराष्ट्रातील राजकीय प्रवाहांचे विश्लेषण आहे. साखर कारखान्यांनी केलेल्या कामगिरीमुळे महाराष्ट्राच्या काही भागात तरी ग्रामीण जीवनात परिवर्तन झाले आहे हे मान्य करताना श्री. डुंबरे यांनी साखर कारखान्याची राजकारणावर पकड किती भक्कम आहे हे स्पष्टपणे मांडले आहे.

या लेख संग्रहातील "मंडल आयोग आणि शौरींचे तर्कट", "स्थितिवादी राजकारणाला धक्का" आणि "रामजन्मभूमी 'राजाचा' बळी घेणार काय ?", हे तीन लेख मला फार महत्त्वाचे वाटतात. श्री. डुंबरे यांनी तर्कशुद्ध रीतीने मंडल आयोग शिफारसींचे समर्थन केले आहे. शौरी यांनी माजी पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंग यांच्यावर जातीयवाद पेटविण्याचा जो आरोप केला तो संपूर्णतया खोडून काढला आहे. दुसरा लेख यालाच पूरक असून विश्वनाथ प्रताप सिंग यांच्या सामाजिक परिवर्तनवादी भूमिकेस, डुंबरे यांनी पाठिंबा दिलेला आहे. 'रामजन्मभूमी'चा प्रश्न उपस्थित करताना भाजपच्या मनात रामाबद्दल प्रेम नसून सत्तेच्या राजकारणात लोकमताची दिशाभूल करण्यासाठी भाजपने हा वाद पेटविला आहे, हे डुंबरे यांनी सांगितले आहे. संपादकाने समाजप्रबोधन करण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे आणि त्यासाठी त्याला स्वतःची सुस्पष्ट वैचारिक भूमिका असली पाहिजे. सदा डुंबरे यांनी आपली भूमिका या तीन लेखांतून ज्या रीतीने मांडली आहे, तिच्यामुळे हे लेख तात्कालिक न राहता त्यांना वैचारिक चर्चेचे परिमाण लाभले आहे.

या लेखसंग्रहातील वृत्तपत्र-नीतीची चर्चा करणारे लेखही उद्‌बोधक आहेत. डुंबरे हे ठोकळेबाज भूमिका घेत नाहीत. वृत्तपत्रांनी सत्यावर प्रकाशाचा झोत टाकावा, सत्ताधीशांच्यावर अंकुश ठेवावा हे त्यांना मान्य आहे, परंतु अरुण शौरी यांनी वस्तुस्थितीचा केलेला विपर्यास त्यांना सर्वथैव अमान्य आहे. अशा लेखसंग्रहात काही लेख प्रासंगिक असणे अटळ आहे; असे असले तरी लेखकांचे स्वातंत्र्य मराठीचे भवितव्य आदी प्रश्नांवर लिहिताना डुंबरे यांनी तत्कालिकाच्या मर्यादा ओलांडण्याचा सतत प्रयत्न केला आहे. 'शिवरायाचे आठवावे रूप' हा लेख वाचताना हे प्रकर्षाने जाणवते.

हा लेखसंग्रह वाचल्यानंतर सदा डुंबरे यांनी सामाजिक व आर्थिक समता, लोकशाही आणि धर्मनिरपेक्ष' राजकारण यांचा आग्रहाने पुरस्कार केला आहे असे स्पष्टपणे जाणवते. कोठल्याही राजकीय पक्षाच्या आहारी न जाता विचारांशी बांधिलकी ठेवून लेखन केले आहे हे उत्कटतेने जाणवते.

श्री. सदा डुंबरे यांच्याकडून अधिकाधिक उद्‌बोधक, आणि विचार-प्रवर्तक लेखन होवो हीच सदिच्छा.

**ग. प्र. प्रधान**

प्रकरण १

# शिवरायांचे ओळखावे रूप

'आम्हाला लोकशाही नको, शिवशाही हवी.' शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची निवडणूक प्रचारमोहिमेतील ही आक्रमक घोषणा. शिवशाहीची त्यांची संकल्पना त्यांनी कधीच पुरेशी स्पष्ट केली नाही. ती करायचा वस्तुनिष्ठ प्रयत्न त्यांनी केला असता तर शिवशाही आणि लोकशाही यांत तात्त्विकदृष्ट्या काहीच फरक नाही याच निष्कर्षाप्रत त्यांना यावे लागले असते. १६७४ मध्ये छत्रपतींनी स्वत:चा राज्याभिषेक करवून घेतला आणि मराठी राज्याला घटनात्मक व कायदेशीर प्रमाण मिळवून दिले. मात्र हे नवनिर्मित राज्य शिवाजी या एका व्यक्तीचे नव्हते. १६७४ मध्ये महाराष्ट्रात राजेशाहीची अधिकृत स्थापना झाली हे खरे नसून राजेशाहीचा शेवट आणि लोकशाहीचा आरंभ असेच त्याचे वर्णन करावे लागेल. हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा आहे, असे छत्रपती म्हणत. राज्यस्थापनेमागे छत्रपतींच्या प्रेरणा आध्यात्मिक होत्या. 'श्रीमान योगी' असा छत्रपतींचा समर्थांनी रास्त गौरव केला. राज्याचा उपभोगशून्य स्वामी ही छत्रपतींची धारणा होती. शिवाजी या व्यक्तीचे नव्हे, लोकांचे राज्य त्यांनी निर्माण केले. आणि लोकांचे म्हणजे केवळ जनसमूहाचे नव्हे. स्वातंत्र्य, समता, न्याय आणि व्यवस्था ही या नव्या राज्याची चतु:सूत्री होती. आधुनिक लोकशाहीचे अधिष्ठान म्हणजे हीच चार मूल्ये नव्हेत काय ? शिवाजी समजून घेण्यात, त्याचे मूल्यमापन करण्यात आपण कमी तरी पडतो किंवा शिवाजीच्या चरित्रातील अंत:सूत्रांची जाणीवपूर्वक मोडतोड करतो. म्हणूनच शिवाजी कोण होता, किंवा शिवाजीच्या चरित्राचा अर्थ काय याचा शोध घेतला पाहिजे. ज्ञानेश्वरीचे पारायण आणि शिवचरित्राचे अध्ययन हे मराठी संस्कृतीचे अंगभूत लक्षण असायला हवे. मनाच्या उन्नयनाची ती शक्तिस्थाने आहेत.

शिवचरित्रांची उणीव नाही. विविध भाषांत आतापर्यंत शिवाजीवर चारशे ते पाचशे ग्रंथ लिहिले गेले आहेत. सर जदुनाथ सरकार यांच्यापासून वा.सी. बेंद्रे

यांच्यापर्यंत अनेक अभ्यासकांना शिवाजीच्या चरित्राचे आवाहन वाटले. सर जदुनाथ सरकार लिहीत होते औरंगजेबावर. परंतु औरंगजेबाच्या चरित्रात ते अडले शिवाजीवर. त्याच्यावाचून त्यांना पुढे जाताच येईना. त्यातूनच त्यांचे शिवाजीवरील पुस्तक तयार झाले. महाराष्ट्राबाहेर शिवाजी गेला तो सरकार यांच्या चरित्रामुळे ! कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजचे त्या वेळचे प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांचे शिवाजीवरील दोन खंड १९३२ मध्ये प्रकाशित झाले. इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांनी मराठ्यांच्या इतिहासाची साधने गोळा करायला सुरुवात केली. त्याचे २६ खंड प्रकाशित झाले. त्र्यं.शं. शेजवलकर यांच्या संकल्पित शिवचरित्राची अपूर्ण प्रस्तावना, आराखडा व साधने यांची झलक दाखविणारा ग्रंथराज मुंबईच्या मराठा मंदिर ट्रस्टने १९६४ मध्ये प्रकाशित केला. शेजवलकरांच्या स्वतंत्र प्रज्ञेची जाणीव त्यातून होते. परंतु एवढे असूनही मराठीतील शिवचरित्राची गरज पूर्ण होऊ शकली नाही. अलीकडच्या काळात त्याबाबत सर्व मदार होती ती म. म. दत्तो वामन पोतदार यांच्यावर. महाराष्ट्र सरकारने हा प्रकल्प पुरस्कृत केला होता.परंतु पोतदारांच्या हातून तो पूर्ण झाला नाही. त्यांनी गोळा केलेल्या साधनसामग्रीचे प्रकाशनही झाले नाही. पुण्यातील शिक्षण प्रसारक मंडळीच्या ताब्यात ही सर्व कागदपत्रे आहेत. या वर्षी पोतदारांची जन्मशताब्दी आहे. राजवाडे, शेजवलकर यांच्याप्रमाणेच पोतदारांनी जमा केलेली ऐतिहासिक कागदपत्रे या वर्षी प्रकाशित होणे ही त्यांना योग्य आदरांजली ठरेल. बॅ. अंतुले १९८० मध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्यांनी शिवचरित्राचे काम नागपूरचे संस्कृत पंडित मधुकर आष्टीकर यांच्यावर सोपविले. त्यासाठी त्यांनी इंग्लंड, पोर्तुगाल, नेदरलँड्स या देशांचा (सरकारी खर्चाने) महिनाभर दौराही केला. परंतु आष्टीकर आणि शिवचरित्र यांचा नावालाही संबंधच नव्हता. मधल्या काळात बाबासाहेब पुरंदरे यांचे शिवचरित्र प्रकाशित झाले. त्यात विश्लेषणापेक्षा रंजन अधिक आहे. बाबासाहेबांच्या शाहिरी स्वभावाला ते धरूनच आहे. रणजित देसाई यांनी श्रीमान योगी या कादंबरीत शिवाजी कलात्मक अंगाने उभा करण्याचा प्रयत्न केला. चरित कादंबरी असे त्याचे वर्णन करण्यात येते. मात्र अस्सल चरित्राची उणीव त्याने भरून निघू शकली नाही. या कादंबरीला नरहर कुरुंदकर यांची प्रस्तावना लाभली. कुरुंदकरांचं शिवाजीचं आकलन विलक्षण प्रत्ययकारी आहे. महाराष्ट्रातील ज्या थोड्याफार लोकांना शिवाजीचं मर्म खऱ्या अर्थाने समजलं असेल त्यांत कुरुंदकरांचा क्रमांक फार वरचा आहे. रणजित देसाईंचा अधिक्षेप न करताही असे म्हणता येईल की, श्रीमान योगीच्या सात-आठशे पानांतून उभा राहणारा शिवाजी आणि कुरुंदकरांनी अवघ्या पन्नास पानांत ठासून मांडलेला शिवाजी यांची जातकुळी वेगळी आहे. श्रीमान योगीचं दुर्दैव असं, की

काही मतभेदांमुळे ही प्रस्तावना पुढच्या आवृत्त्यांतून वगळावी लागली. परंतु कुरुंदकरांचा शिवाजीबाबतचा दृष्टिकोणच इतका अपूर्वाईचा होता, की कुरुंदकरांनी रणजित देसाई यांना लिहिलेल्या शिवाजीवरील प्रदीर्घ पत्राचा समावेश प्रस्तावनेच्या जागी करून उणीव दूर करण्यात आली. गेल्या वर्षी पुण्यातील उन्मेष प्रकाशनाने गाजलेल्या प्रस्तावनांचा एक खंड प्रकाशित केला. त्यातही ही प्रस्तावना जाऊ शकली नाही. मात्र या प्रस्तावनेलाही मागे टाकील असे कुरुंदकरांचेच पन्नास-साठ पानांचे 'छत्रपती शिवाजीमहाराज - जीवनरहस्य' हे पुस्तक जनबोध प्रकाशनाने प्रकाशित केले. पुस्तकावर प्रकाशनाचे वर्ष नाही. आणीबाणीच्या काळात ते केव्हातरी प्रकाशित झाले असावे. सध्या हेही पुस्तक उपलब्ध नाही. अर्थात शिवचरित्रात सातत्याने भर पडतच आहे. त्यातील सर्वांत ताजे पुस्तक आहे सेतुमाधवराव पगडी यांनी लिहिलेले व नॅशनल बुक ट्रस्ट आणि ग्रंथाली यांनी संयुक्तपणे प्रकाशित केलेले 'शिवचरित्र'.

शिवाजीचे राज्य लोकांचे राज्य होते. त्या वेळची शोषण करणारी सरंजामशाही शिवाजीने मोडून काढली. वतनदारांच्या कचाट्यातून लोकांना त्याने मुक्त केले. जमिनीचे मोजमाप केले. तिची वहिती निश्चित केली. त्यावरील कर निर्धारित केला. त्यात पूर्वीसारखी मनमानी ठेवली नाही. पक्षपात राहिला नाही. वंशपरंपरा चालत आलेले अधिकार काढून घेतले. लोकांना स्वतःच्या हक्काची जाणीव करून दिली. त्यांच्या हक्कांच्या संरक्षणाची व्यवस्था निर्माण केली. तिची काटेकोर अंमलबजावणी केली. रयत आणि राजा यांच्या संबंधातील नव्या पर्वाची सुरुवात शिवाजीने केली. त्याचे युगप्रवर्तकत्व दिसते ते येथे. एका अर्थाने परंपरागत हिंदू आणि मुस्लिम दोन्ही प्रस्थापित राज्यव्यवस्थेत ही क्रांती होती. शिवाजीचे सैन्य केंद्रानुवर्ती होते. सैन्याची बांधिलकी सुभेदार आणि शिलेदार यांच्याऐवजी स्वराज्याशी जोडली गेली. सैनिकांचे शस्त्र, घोडा आणि पगार सरकारी होता. सैन्य पोटावर चालते. त्याची व्यवस्था मध्यवर्ती तिजोरीतून चाले. त्यासाठी रयतेची लूट करण्याची चाल त्याने मोडीत काढली. सैन्य आणि जनता यांचे संबंध बदलले. प्रसंगी जनताच सैन्य झाली. सत्तेवर कोणीही येवो जावो, आमचे हितसंबंध सुरक्षित राहिले तर आम्हाला त्याचे सोयरसुतक नाही ही पूर्वीच्या वतनदार व प्रजेची भूमिका होती. शिवाजीने प्रथमच जनतेच्या हितसंबंधाचे रूपांतर राज्याच्या हितसंबंधात व अस्मितेत केले. त्यामुळेच शिवाजीनंतर ही प्रजा औरंगजेबाशी टक्कर देऊ शकली.

छत्रपतींचे यश केवळ लष्करी नाही. त्यांचे मोठेपण फक्त काही रोमांचकारक घटनांमध्ये दडलेले नाही. लढायांचा हिशेबच करायचा झाला तर शिवाजीला अनेक वेळा पराभव सहन करावा लागला. पुरंदरच्या तहाने तर शिवाजीला सर्वस्व गमवावे

लागले. अत्यंत अपमानास्पद अटी सहन कराव्या लागल्या. पन्हाळ्यावर अडकून पडावे लागले. अनेक चमकदार विजयही महाराजांना मिळाले. अफझलखानाचा वध आणि त्यानंतरच्या लढाया या घटना रोमांचकारीच होत्या. सुरत त्यांनी लुटून आणली. त्या त्या वेळचे तात्कालिक पराजय आणि विजय यांच्या आहारी न जाता त्यांनी अंतिम उद्दिष्टावर आपले लक्ष केंद्रित केले, ते म्हणजे राज्यव्यवस्था बळकट करणे, नव्या प्रदेशात व्यवस्था लावणे, संरक्षणसिद्धता भक्कम करणे. आपला सर्वांत मोठा शत्रू औरंगजेब आहे याचा विसर त्यांना कधी पडला नाही. त्याच्याविरुद्धच्या अंतिम लढाईची तयारी त्यांनी प्रेषिताप्रमाणे आधीच करून ठेवली होती.

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राच्या इतिहासातील एक अद्भुत चमत्कार आहेत. शिवाजीच्या आधी आणि नंतरही अनेक राजे झाले. अनेकांनी स्वत:ची राज्ये स्थापन केली. परंतु केवळ शिवाजीलाच ईश्वरी अवतार मानले गेले आहे. त्याचे कारण शिवाजीच्या राज्यनिर्मितीच्या प्रेरणा आध्यात्मिक होत्या. हे राज्य स्थापन व्हावे, हा परमेश्वराचा संकेत आहे, यावर स्वत: शिवाजीची श्रद्धा होती. त्याने राज्य केले तेही श्रीमान योग्यासारखे. शिवनेरीवरील शिवाई देवीचा प्रसाद म्हणून शिवाजीचा जन्म झाला आणि भवानीमातेने स्वत: दर्शन देऊन त्यांना तलवार दिली, या गोष्टींना श्रद्धाळू मनात स्थान आहे. परंतु हे संकेत लक्षात न घेता, शिवाजीच्या जीवनातील वास्तव घटना, त्याचे हेतू व कृती यांचाच विचार करून शिवाजीचे अलौकिकत्व सिद्ध होऊ शकते. शिवाजीने मराठी राज्याची आकांक्षा धरली तेव्हा भारत जवळजवळ मोगलांच्या एकछत्री अमलाखाली होता. आदिलशाही, कुतुबशाही ही दक्षिणेतील राज्ये फारशी स्वतंत्र नव्हती. पृथ्वीराज चौहान आणि राणा प्रताप ही रजपुतांची परंपरा असली तरी सतराव्या शतकाच्या प्रारंभी सर्व रजपूत राज्ये दिल्लीच्या आहारी गेलेली होती. वंशपरंपरेने सत्तांतर होत असले तरी नव्या राजाला मोगलांची मान्यता घ्यावी लागे. मोगलांच्या सत्ताधारी वर्गातील बहुसंख्य लोक मध्य आशिया आणि इराणमधील होते. आपण 'तुर्की' वंशाचे आहोत याचा त्यांना अहंगंड होता. त्यांचा कारभार तुर्की आणि नंतर फार्सीतून चालत असे. येथील सामान्य हिंदू प्रजेला आणि दक्षिणी मुसलमानांना ते दुय्यम लेखीत. आपण जेते आहोत आणि भारत हा विजित देश आहे, ही त्यांची समजूत होती. संपूर्ण राज्यकारभारात त्याचे प्रतिबिंब पडत असे. मोगलांचे हे वर्चस्व त्या वेळी सर्वांनीच मान्य केले होते. राजकीय स्वातंत्र्याची आकांक्षा कोणाच्या ध्यानीमनी नसतानाही शिवाजीने ती धरली हे त्याचे द्रष्टेपण. शिवाजीचा झगडा प्रदेशासाठी नव्हता, मूल्यांसाठी होता. स्वातंत्र्य हे सर्वांत मूलभूत व महान

मूल्य आहे. शिवाजीने त्याचा उद्घोष केला. शिवाजीचे राज्य होते केवळ एका जिल्ह्यापुरते. परंतु औरंगजेबाला शिवाजीपेक्षा खूप मोठ्या असलेल्या आदिलशाही, कुतुबशाही किंवा इतर सत्तांपेक्षा शिवाजीचे आव्हान वाटले. याचे कारणच या मूलभूत संकल्पनेत होते. हे मूल्य शिवाजीने आपल्या लोकांत संक्रांत केले, म्हणूनच प्रचंड धोका पत्करून आणि सोपे पर्याय नाकारून ते शिवाजीच्या बाजूने उभे राहिले. शिवाजीच्या व संभाजीच्या मृत्यूनंतरही मराठी माणूस औरंगजेबाशी चिवटपणे झुंजला तो याच प्रेरणेमुळे. केवळ सैन्याचा , सत्तेचा व संपत्तीचा विचार केला तर मोगल आणि मराठे यांची तुलनाही होऊ शकत नव्हती. मराठ्यांचा लष्करी पराभव अटळ होता. औरंगजेबाने अनेक लढाया जिंकल्या. परंतु मराठ्यांच्या विरुद्ध त्याला सर्वंकष विजय प्राप्त करता आला नाही, याचे कारण तो स्वातंत्र्यलढा होता. राज्याचा, प्रदेशाचा, सत्तेचा लढा नव्हता. शिवाजीने लोकांना स्वातंत्र्य या संकल्पनेचे परिमाण दिले आणि लोकांनी त्यासाठी बलिदानाची तयारी केली हे शिवाजीचे खरे मोठेपण. अनेकांना शिवाजीचा लढा हा हिंदूविरुद्ध मुसलमान असा दिसतो. 'हिंदू' राज्याची स्थापना हे उद्दिष्ट त्याच्या प्रयत्नांना चिटकविण्यात येते. परंतु स्वजनांशी असो की परकीयांशी, प्रत्येक लढाईत त्याला मुख्यत्वे हिंदूंविरुद्धच लढावे लागले आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. शिवाजीच्या राज्यातील सर्व प्रजाजनांपेक्षा औरंगजेबाच्या बाजूने शिवाजीविरुद्ध लढणाऱ्या हिंदू सेनापती, सरदार आणि सैनिकांची संख्या कायम जास्त होती. त्याच वेळी शिवाजीच्या पदरीही मुस्लिम होते. शिवाजीने मोगलांविरुद्ध धर्मयुद्ध केले नाही. आज कोणाला सोयीस्कर आणि फायद्याचे वाटते म्हणून शिवाजीवर किंवा त्या वेळच्या परिस्थितीवर 'हिंदू विरुद्ध मुस्लिम' या समीकरणाचे आरोपण करणे न्याय्य होणार नाही. आज राजकीय कारणासाठी कोणाला मुस्लिमविरोधाला धार द्यायची असेल तर एकवेळ तेही समजून घेता येईल, परंतु त्यासाठी शिवकालीन इतिहासाचे विकृत चित्रण करणे हा त्या महान पुरुषावर आणि त्याने दिलेल्या जीवनसंदेशावर अन्याय आहे. शिवाजीची धारणा 'हिंदवी स्वराज्या'ची होती, 'हिंदू राज्याची' नव्हती हे स्पष्ट करणारे अनेक पुरावे त्याच्या चरित्रात आहेत. शिवाजीचे वर्तन धर्माचरणात मोडणारे होते, त्याच्या राजकारणात मात्र धर्मवाद नव्हता. म्हणूनच छत्रपती 'ईश्वरी अवतार' झाले.

•

प्रकरण १०

# शिवसेना आणि परिवर्तनवादी

शिवसेनेच्या वाढत्या प्रभावाचे महाराष्ट्रावरील सावट आणि बेहेरे-गांगल प्रभृती संकुचित जातीयवाद्यांनी महात्मा फुले यांच्याविरुद्ध ओकलेले गरळ या विषयांनी निपाणीचे विषमता निर्मूलन शिबिर तीन दिवस सारखे धुमसत होते. एकही महत्त्वाचा वक्ता नव्हता, ज्याने या विषयाला स्पर्श केला नाही.

महाराष्ट्राला मागे खेचणाऱ्या या पुनरुज्जीवनवादी शक्तींचा मुकाबला करण्यासाठी परिवर्तनवादी संघटनांनी एकत्र आले पाहिजे यावर सर्वांचे तात्त्विक एकमत झाले. 'आम्हाला कार्यक्रम द्या' असे कार्यकर्त्यांनी खासगीत आणि प्रसंगी व्यासपीठावरूनही सांगितले. परंतु अंतिम उद्दिष्ट एकच असणाऱ्या या परिवर्तनवादी गटात पुरेसे ऐक्य आणि सामंजस्य नाही, हेही लपून राहिले नाही. चाळीस एक संघटनांचे प्रतिनिधी येथे एकत्र आले असले तरी त्याबाहेर वेगळ्या रंगछटा असलेल्या आणि वेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या बऱ्याच संघटना उरतात ही वस्तुस्थितीही शिल्लक राहतेच. आत्मपरीक्षण आणि आत्मटीकेचे दालन समृद्ध झाले तर परिवर्तनाच्या चळवळीतील सहभाग व्यापक होऊ शकतो. शिवसेनेच्या सभेला तीन लाख लोक आणि निपाणीच्या शिबिराला तीनशे या विषमतेचेही निर्मूलन झाले पाहिजे !

शिबिराचे उद्‌घाटन रिपब्लिकन पक्षाचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केले. शिबिरात दुसऱ्या दिवशी अरुण कांबळे आणि तिसऱ्या दिवशी रामदास आठवले या दलित नेत्यांचा सहभाग होता. मात्र रिपब्लिकन पक्ष आणि दलित पँथर यांचे कार्यकर्ते अभावानेच दिसत होते. अलीकडच्या काही वर्षांत, त्यातही विशेष करून नामांतर चळवळीनंतर, आंबेडकरी चळवळ आपले स्वतंत्र अस्तित्व आणि वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्व कायम ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न करताना दिसते. वास्तविक राजकीय प्रक्रियेत त्यांना मिळालेल्या अनुभवाचा फायदा त्यांनी नव्याने उभ्या राहू इच्छिणाऱ्या कमकुवत घटकांना देण्याची जबाबदारी घेतली पाहिजे.

परंतु तेथेही प्रत्येकाचा सवता सुभा असल्याने शिखर नेतृत्व तयार होत नाही. समाजापुढील प्रश्नांना सामंजस्याने सामोरे जाण्याची ताकद त्यामुळे निर्माण होऊ शकत नाही.

प्रकाश आंबेडकर यांनी सुरुवातीलाच शिवसेनेच्या प्रश्नाला हात घातला. शिवसेनेची सध्याची घोषणा यापूर्वी अनेकांनी वापरली, त्यांना यश मिळाले नाही. शिवसेनेला मात्र मिळाले त्याचे कारण काय ? असा सवाल उपस्थित करून त्यांनीच त्याचे उत्तर दिले, 'सुरक्षितता !' शिवसेना सुरक्षितता देते. जातीच्या नावाखाली सुरक्षितता देते. समाजविघातक कृत्यांना आवरण मिळते, बेकायदा धंद्यांना संरक्षण मिळते, तसेच महापालिकेची किंवा सरकारची संक्रांत येऊ शकेल अशा प्रामाणिक व्यवसायांनाही. हातगाडीवाले, फेरीवाले, पथारीवाले, खोकेवाले असोत, झोपडपट्टीत राहणारे नागरिक असोत की मध्यमवर्गीय, सुरक्षितता मिळते म्हणून ते शिवसेनेच्या आश्रयाला जातात. या लोकांना प्रस्थापित व्यवस्थेत सहभाग मिळत नाही आणि त्यातून जगण्याची हमी मिळत नाही तोपर्यंत असेच होणार. म्हणून पर्यायी व्यवस्था उभी केली पाहिजे आणि सध्याच्या भ्रष्टाचारी व्यवस्थेवर चहूबाजूंनी हल्ला चढविला पाहिजे. त्यासाठी राजकारण करण्याशिवाय पर्याय नाही हे त्यांचे सांगणे होते.

कार्यक्रमानंतर शिवसेनेच्या स्वरूपाविषयी आंबेडकरांशी बोलणे झाले. आतापर्यंत राजकारणात महत्त्वाचे स्थान न मिळालेल्या, 'इतर मागासवर्गीय' म्हणून ज्यांचा उल्लेख होतो त्या साळी, माळी, कोष्टी, कोळी, आग्री यांसारख्या जाती हा शिवसेनेचा कणा आहे हे त्यांचे विश्लेषण आहे. परंपरागत व्यवसाय लयाला गेले, त्याच्या बदल्यात नोकऱ्या नाहीत आणि छोट्या जातीमुळे राजकारणात आणि म्हणून सत्तेत स्थान नाही असा हा मोठा वर्ग आहे. शिवसेनेचे नेतृत्व वरिष्ठ जातीचे, परंतु अनुयायी कनिष्ठ जातींचे अशी ही नवी जातीय व्यवस्था आहे. यापूर्वीही हिंदुत्वाची घोषणा रा. स्व. संघ व जनसंघ, भाजपसारख्या अनेक संघटना आणि पक्षांनी दिली होती, परंतु त्यांना एवढा पाठिंबा मिळाला नाही आणि शिवसेनेला मात्र मिळाला याचे कारण स्पष्ट आहे. त्या पक्षांचा हिंदुत्ववाद 'ब्राह्मणी' होता. शिवसेना बहुजन ज़ातींच्या राजकारणासाठी हिंदुत्वाचा वापर करीत आहे. त्यांना वर्ण, जातीधिष्ठित 'सोवळे' हिंदुत्व अभिप्रेत नाही.

इतर मागासवर्गीय शिवसेनेबरोबर असले तरी दलित समाज आणि त्यातही नवबौद्ध मात्र शिवसेनेपासून चार हात दूर आहेत. त्याचे कारण त्यांना असलेली परंपरा आणि मिळालेले नेतृत्व. मात्र यातही एका विशिष्ट जातीचेच प्राबल्य असल्यामुळे मागासवर्गीयांतील काही जातीही, ज्या आंबेडकरी दलित

चळवळीपासून काहीशा अलग राहिल्या, शिवसेनेकडे आकृष्ट होत आहेत. त्यामुळे शिवसेनेने हिंदुत्वाचा मुखवटा धारण केला असला आणि मुस्लिमांच्या विरोधी उघड भूमिका त्यांनी घेतली असली तरीही आतापर्यंत सत्तेत स्थान न मिळालेल्या निम्नस्तरीय जातीचे राजकारण करण्याचा त्यांचा मनसुबा स्पष्ट आहे. परंतु केवळ तेवढेच सूत्र घेतले तर निवडणुकांत यश येणार नाही म्हणून हिंदुत्व किंवा खरे तर मुस्लिमविरोध ही व्यापक घोषणा त्यांनी दिली आहे. एकीकडे शिवसेनेचा उघड मुस्लिमविरोध आणि दुसरीकडे जनता दलासारख्या पक्षाने झेंड्यासाठी निवडलेला हिरवा रंग यातून येत्या निवडणुकीत काँग्रेस विरुद्ध शिवसेना विरुद्ध जनता दल व इतर विरोधी पक्ष आणि दलित यांचे 'परम्युटेशन, काँबिनेशन' कशा प्रकारे होईल हा तर्काचा भाग आहे.

शिवसेनेला संपविण्यासाठी शरद पवार यांना मुख्यमंत्री केले असे सांगणाऱ्या केंद्रीय नेतृत्वाने अंतुले, तिरपुडे आदी मंडळींना ज्या प्रकारे पवारांविरुद्ध मोकळे रान दिले आहे, त्यावरून शिवसेनेचा प्रभाव हा केंद्रीय नेतृत्वालाही तेवढा महत्त्वाचा प्रश्न वाटत नसावा असे अनुमान निघते. आवश्यकता वाटली तर लोकसभा निवडणुकीसाठी इतर विरोधी पक्षांच्या विरोधात राजीव गांधी शिवसेनेशीही सहकार्य करू शकतात. शिवसेना राजकारणात आणि तीही मोठ्या प्रमाणावर उतरल्यामुळे, तिच्या जातीयवादी स्वरूपाला राजकारणाची डूब मिळाली आहे. राजकारणाच्या बाहेर राहून शिवसेनेचा पराभव यापुढे करता येणार नाही ही खूणगाठ क्रांतीच्या अग्रदूतांनी बांधली पाहिजे. विचाराधिष्ठित राजकारण हाच शिवसेनेला पर्याय आहे असे बाळासाहेब आंबेडकर म्हणतात त्यामागे हाच आशय असण्याची शक्यता आहे.

हिंदुत्वाचे शिवसेनेचे आवाहन सेक्युलॅरिस्ट व्यवस्थेला धोकादायक असले तरी ज्या प्रश्नांवर ते लोक गोळा करताहेत ते प्रश्न खरे व लोकांच्या जिव्हाळ्याचे असल्याची स्पष्ट कबुली शिबिरात काही वक्त्यांनी दिली. बेकारी हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. खेडोपाडी एवढे बेकार नसते तर शिवसेना खरोखरीच वाढली असती काय ? हे बेकार, शिक्षित बेकार आज कुठे आहेत ? आपल्याबरोबर आहेत काय ? असा पक्ष कम्युनिस्ट पक्षाचे जुने व जाणते कार्यकर्ते गोविंदराव पानसरे यांनी ज्या पद्धतीने विचारला त्यातच त्याचे उत्तर होते. आपल्या गावात एस.टी. यावी, पिण्याच्या पाण्याची अडचण दूर व्हावी यासाठी शिवसेना आग्रह धरते आहे असे ते म्हणाले. धर्म म्हणून, तत्त्वज्ञान म्हणून शिवसेना वाढत नाही, तर 'काही मिळायचं असेल तर शिवसेनेत गेले पाहिजे.' या विचाराने आजच्या मधल्या जातीतील तरुण शिवसेनेकडे वळतो आहे. त्याला देण्यासाठी आमच्याकडे

पर्याय नाही अशी खंत लक्ष्मण माने यांनी व्यक्त केली. 'परिवर्तनवादी आज एक नाहीत' हे शिबिराचे प्रमुख पाहुणे चंद्रकांत घोरपडे यांच्यापासून गोविंदराव पानसरे आणि लक्ष्मण माने यांच्यापर्यंत सर्वांनी सांगितले. त्याचा प्रत्यय शिबिरातही वारंवार येत राहिला. 'परिवर्तनाचा समग्र आशय पेलील असा एकही पक्ष आज समोर दिसत नाही' असे बाबा आढाव म्हणाले. शिवसेनेचा प्रभाव का वाढतो आहे त्याचे विश्लेषण यातून आपोआप होत होते.

गांगल आणि बेहेरे यांचा निषेध मुंबई मराठी पत्रकार संघातही होतो, तर 'विनिशि'मध्ये होणे अपरिहार्यच होते. तसा तो शेवटच्या दिवशी झालाही. महात्मा फुले यांचे एकूण विचार आणि कार्य यांनी 'स्वहिताला' फटका बसलेल्या प्रस्थापित व्यवस्थेच्या पाईकांचा तो निंद्य प्रकार होता. माफी मागून हा प्रश्न सुटणार नाही. बेहेरे यांनी ज्या संभावितपणे ती मागितली त्यामुळे तर अजिबातच नाही. पण मुळात ते हे धाडस करूच कसे शकले याचा ऊहापोह शिबिरात झाला. 'बहुजन समाजातल्या मातब्बर जातींची फुल्यांच्या विचारांशी पक्की निष्ठा नाही हे कळले म्हणूनच गांगल फुले यांच्याविरुद्ध लिहू धजावले', असे चंद्रकांत घोरपडे यांनी स्पष्टपणे बजावले. 'बेहेरे-गांगल यांच्याकडून हे अपघाताने घडले नाही, एका व्यापक व्यूहरचनेचा तो भाग आहे', असे विश्लेषण मार्क्सवादी विचारवंत शरद पाटील यांनी केले. 'रिडल्स इन हिंदुइझम'च्या निमित्ताने प्रथम आंबेडकरांवर हल्ला झाला. दुसरा हल्ला बुद्धावर झाला. तो महात्मा नाहीच असे गांगलांचे म्हणणे आहे. आणि तिसरा हल्ला म. फुल्यांवर आहे. शिवाजी हे महाराष्ट्राचे महान दैवत, त्याच्याआडून फुल्यांवर हल्ला केला तर आपण निसटून जाऊ अशी गांगल वगैरे मंडळींची अटकळ असणार. पण शिवाजीवर तरी त्यांचे कुठे प्रेम आहे ? शिवाजी आणि संभाजी यांच्यात वितुष्ट आणण्याचा कट याच लोकांनी केला. त्यासाठी संभाजीची विकृत प्रतिमा त्यांनी तयार केली. त्यांना राजाराम गादीवर हवा होता, कारण तो कमकुवत होता. संभाजी आग्रही होता, शूर होता. त्याला मोगलांकडे जाण्यास ज्यांनी भाग पाडले तेच आज शिवाजीचे नाव घेऊन म. फुल्यांवर हल्ला करताहेत. प्रागतिक विचाराच्या लोकांच्या अस्मितेची प्रतीके विकृत करायची हा डाव त्यामागे आहे, तो ओळखला पाहिजे. अशा आशयाचे विस्तृत व मुद्देसूद विवेचन शरद पाटील यांनी केले.

नेहमीच्या प्रथेप्रमाणे इतर विषयही शिबिरात चर्चेला होतेच. 'अंगमेहनती कामगार' हा त्यातला प्राधान्य मिळालेला प्रश्न. 'स्थलांतरित मजूर' हा विषय पुढील शिबिरासाठी निवडला आहे. वर्षातून दोन-तीन विभागीय शिबिरे घेण्याचा आणि समन्वयासाठी मुंबईत एक छोटेसे कायम स्वरूपी कार्यालय स्थापन करण्याचा

निर्णय ही या वेळची पुढची पावले. परंतु सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे परिवर्तनवादी संघटना आपापले व्यक्तिनिष्ठ अहंकार आणि महत्त्वाकांक्षा सोडून, स्वतंत्रपणे, तरीही एकवाक्यतेने व समान उद्दिष्टांसाठी , व्यापक पायावर काम करीत नाहीत तोपर्यंत शिबिरातून काही भरीव निघण्याची शक्यता कमीच.

●

# ३ अंतुले साहेबांची बॅरिस्टरकी

प्रतिबिंब १०

औरंगाबादला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे राज्यव्यापी अधिवेशन झाले. एकाच काँग्रेसमध्ये अनेक काँग्रेस असल्याचा सिद्धान्त तेथे पुन्हा आधोरेखित झाला. उदाहरणार्थ दादांची काँग्रेस, शंकररावांची काँग्रेस, तिरपुड्यांची काँग्रेस, अंतुल्यांची काँग्रेस, वगैरे वगैरे. काहींनी 'उपस्थित' राहून आपले अस्तित्व जाहीर केले, तर काहींनी आपले 'अस्तित्व' दिसावे यासाठी अनुपस्थित राहण्याचा मार्ग पसंत केला. जवाहरलाल नेहरूंना भारताच्या अनेकतेत एकता दिसत असे. त्याउलट नवे काँग्रेस नेते काँग्रेसच्या एकतेत अनेकता पाहतात. ही 'अनेकता' नसेल तर आपला चेहरा काँग्रेसमध्ये दिसणार कसा ? पण रूप वेगळं दिसावं म्हणून का कोणी स्वतःचा चेहरा विद्रूप करून घेतं ? होय, आजकाल तेही शक्य आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर ए.आर. अंतुले यांनी आपल्या वक्तव्याने नेमके तेच केले आहे. ते स्वतःचे मुखत्यार आहेत. काहीही करू शकतात. परंतु आपल्या वैयक्तिक राजकीय हितसंबंधांसाठी स्वातंत्र्य, लोकशाही आणि पक्ष ही मूल्ये आणि संकल्पनाच ते विद्रूप करायला निघाले आहेत. हा धोकेबाज खेळ काँग्रेसजनांनी चालवून घ्यावा का ? तो त्यांचा पक्षांतर्गत प्रश्न आहे. त्यासाठी कोणाला सल्ला द्यायचे कारण नाही. परंतु ते ज्या कल्पनांचा•पुरस्कार करताहेत त्या देशाच्या राजकीय स्वातंत्र्याशी विसंगत आहेत, लोकांच्या अस्मितेला मारक आहेत हे स्पष्टच सांगितले पाहिजे.

औरंगाबादच्या पक्ष मेळाव्यात मुख्यमंत्री शरद पवार यांना 'सशर्त' पाठिंबा दिल्यानंतर पत्रकारांशी अनौपचारिकपणे बोलताना आणि नंतर छोट्या मोठ्या सभांतून त्यांनी ही विधाने केली. अंतुलेसाहेब काय म्हणताहेत ? (१) काँग्रेसचा पक्षांतर्गत लोकशाहीवर विश्वास नाही. (२) व्यक्तिमाहात्म्यावर (पर्सनॅलिटी कल्ट) पक्षाची श्रद्धा आहे. (३) 'एकच नेता' ही काँग्रेस संस्कृती आहे. (४) इतरांना काँग्रेसमध्ये वाव नाही. बाकीचे सारे सुभेदार आहेत.

ही सर्व विधाने अगदी स्पष्ट आहेत. त्यांचा अर्थ स्पष्ट आहे आणि त्यातून जे ध्वनित करायचे आहे, तेही स्पष्ट आहे. ते म्हणजे काँग्रेस हा शुद्ध 'फॅसिस्ट' पक्ष आहे. एकाधिकारशाही मानणारा पक्ष आहे. अंतुले यांचे हे मूल्यमापन पंतप्रधान राजीव गांधी यांना मान्य आहे का ? काँग्रेसजनांना मान्य आहे का ?

त्यांना मान्य असो नसो, लोकांना अंतुले यांचे हे विचार आणि ते चिरस्थायी करण्याचे त्यांचे प्रयत्न मान्य होणार नाहीत.

ज्या पक्षाचा पक्षांतर्गत लोकशाहीवर विश्वास नाही, तो लोकशाही पद्धतीची राजवट राबविण्याची कल्पनाच कशी करू शकतो ? ज्या पक्षात पक्षसदस्यांनाच स्वातंत्र्य नाही, वेगळे मत असण्याचा अधिकार नाही, तो पक्ष सत्तेवर आल्यास लोकांच्या स्वातंत्र्याची, त्यांच्या हक्कांची कशी बूज राखणार ? जिथे नेतृत्व तयार होण्याची प्रक्रियाच मान्य नाही तो या देशाची लोकशाही अखंडित राहण्याची कोणती हमी देणार ? नेहरूंच्या नंतर इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या. पण लगेच नाही. मध्ये शास्त्रीजींचा काळ गेला. शिवाय इंदिरा गांधी काही उपटसुंभ राजकारणी नव्हत्या. राजकीय प्रक्रियेतून त्या वर आल्या होत्या. लोकांनी त्यांचे नेतृत्व स्वीकारले ते केवळ नेहरूकन्या म्हणून नव्हे. त्यांनी आपल्या नेतृत्वगुणांची चमक स्वतंत्रपणे दाखविली. आपली लोकप्रियता स्वायत्तपणे सिद्ध केली. लोकांच्या मनातून त्या उतरल्या तेव्हा त्यांना सत्ता सोडावी लागली आणि लोकांमध्ये जाऊन त्यांनी ती पुन्हा मिळविली. विशिष्ट राजकीय व्यूहरचना आणि षड्यंत्र मोडण्यासाठी त्यांनी पक्षाचा अडसर न मानता लोकांशी थेट संवाद साधला. पक्षामध्ये निर्माण झालेले केवळ काही हितसंबंधी लोकांचे वर्चस्व मोडायला त्या निघाल्या आहेत म्हणून लोकांनीही त्यांना डोक्यावर घेतले. तात्कालिक उद्दिष्ट साधण्यासाठी असे करणे कोणाला आवश्यक वाटले तरी त्याकडे 'अपवाद' म्हणूनच पाहिले पाहिजे. तुम्ही लोकशाही मानणार असाल तर पक्ष ही त्याची अपरिहार्य अट आहे. पक्ष आला म्हणजे लोक आले आणि पक्षांतर्गत लोकशाहीही आली. हे आम्ही मानणारच नाही, असे कोणी म्हटले तर ते योग्य नव्हे. शिवाय इंदिरा गांधींना जमले ते प्रत्येकालाच जमेल असेही नाही. इंदिरा गांधींच्या काही चुका लोकांनी पोटात घातल्या. प्रत्येकाच्याच बाबतीत असे घडेल असे नाही. त्यामुळे अंतुले जे सांगताहेत, ते पक्षाच्या, पर्यायाने देशाच्याही हिताचे नाही.

समाजाची धारणा पक्की होण्यासाठी मूल्याधिष्ठित व तत्त्वांशी बांधिलकी पत्करणाऱ्या पक्षाची उभारणी करणे हे अंतिम उद्दिष्ट हवे. आज ज्या जवाहरलाल नेहरूंची जन्मशताब्दी देशव्यापी पातळीवर साजरी होत आहे आणि ज्यात काँग्रेस पक्ष व केंद्र सरकार दोघांचाही पुढाकार आहे, त्यांनी देशाला वरील विचारानेच

पुढे नेण्याचा प्रामाणिकपणाने व नेटाने प्रयत्न केला. आजची काँग्रेस नेहरूंना मानते की नाही ? राजीव गांधी तरी नेहरूंना मानतात की नाही ? मग त्या वेळी काय नेहरू एकटे नेते होते आणि सरदार पटेल, राजेंद्रबाबू, मौलाना आझाद, गोविंद वल्लभ पंत, आचार्य कृपलानी, रफी अहमद किडवई, राजाजी, शास्त्रीजी हे त्यांचे सुभेदार होते ?

परंतु अंतुले यांना १९७७ पूर्वीची काँग्रेस आठवत नाही. १९७७ साल त्यांना सोयीस्करपणे आठवते. कारण त्याच वर्षी निष्ठावंत म्हणून त्यांना अनुग्रह मिळाला. निष्ठावान आणि बिगर निष्ठावान हे रंग उडालेले कार्ड त्यांना आजच्याही राजकारणात वापरायचे आहे. म्हणूनच त्यांनी शताब्दी साजरी केलेल्या काँग्रेसच्या इतिहासाचे असे कृत्रिम कालखंड तयार केले आहेत आणि त्यांची निष्ठा फक्त १९७७ नंतरच्या काँग्रेसला त्यांनी वाहिली आहे. ही निष्ठा तत्त्वांशी नाहीच. व्यक्तींशी आहे, असे ते भासवितात. परंतु तेही खरे नाही. सिमेंट प्रकरणातील भ्रष्टाचाराशी ते संबंधित आहेत, हे लक्षात येताच इंदिरा गांधींनी त्यांना झटकून टाकले. राजीव गांधींनीही त्यांची निर्भर्त्सना केली. सहा वर्षांसाठी त्यांची काँग्रेसमधून हकालपट्टी झाली.

नेत्यांशी आणि पक्षाशी अव्यभिचारी निष्ठा असती, तर त्यांनी भारतीय काँग्रेस नामक स्वत:चा वेगळा पक्षही काढला नसता आणि काँग्रेसविरुद्ध गेली निवडणूकही लढविली नसती. इंदिरा गांधींवर एवढे अलोट प्रेम असते, तर काँग्रेसमधील काही गोष्टींचा गौप्यस्फोट करू, अशी गर्भित धमकी त्यांनी दिली नसती आणि त्यासाठी त्या न झालेल्या पत्रकार परिषदेची घोषणाही केली नसती. त्यामुळे निष्ठावंतांचे जे तुणतुणे अंतुले वाजवीत आहेत, ते केवळ राजकीय स्वार्थापोटी. सत्ता मिळविण्यासाठी त्यांनी प्रयत्न करावेत, विद्यमान मुख्यमंत्री शरद पवार यांनाही जरूर विरोध करावा, पण त्याचा आधार काय असावा ? सध्याच्या मुख्यमंत्र्यांची, त्यांच्या मंत्रिमंडळाची धोरणे घेऊन अंतुलेंनी बोलावे. त्यातील कोणते धोरण बरोबर, हे लोक ठरवतील. आपले मत व्यक्त करतील. संजय गांधी निराधार योजना सरकारने बंद केली, त्याबद्दल अंतुले यांनी नापसंती व्यक्त केली तर समजू शकते. ज्या योजनेत प्रचंड भ्रष्टाचार आहे आणि खऱ्या निराधार लोकांऐवजी आपल्या ओळखीच्या, जवळच्या लोकांची धन करण्यासाठी तिचा कसा उपयोग होतो आहे, हे जगजाहीर झाले आहे. शरद पवार मुख्यमंत्री नव्हते, तेव्हाच्या काळातील ही गोष्ट आहे. शंकरराव चव्हाण यांनीच ती योजना बंद केली.

सरकारी तिजोरीला गळती लावणाऱ्या अशा भंपक योजना बंद करणाऱ्या कुठल्याही मुख्यमंत्र्यांचे अभिनंदनच केले पाहिजे. दिल्लीत हजारो गरीब लोकांचे

संसार बुलडोझरने उद्ध्वस्त करणाऱ्या संजय गांधी यांच्या स्मरणार्थ अशी निराधार योजना सुरू करणाऱ्यांच्या सदसद्विवेक बुद्धीचे दिवाळेच वाजले असले पाहिजे. लोकांना असे भिकेचे डोहाळे लावण्याऐवजी त्यांच्या हातांना काम देण्याच्या योजना कल्पकतेने राबवून सन्मानाने जगण्याचा मार्ग त्यांना दाखविला पाहिजे. त्यांना रोख पैसे देऊन आयुष्यभर कोणाचे तरी मिंधे करण्याचा मार्ग सरंजामी झाला. परंतु लोकशाहीची राजकीय चौकट केवळ स्वार्थासाठी वापरणाऱ्या या मंडळींचे मन अजून सरंजामीच राहिले आहे. म्हणूनच एकच नेता, सुभेदार, दरबार व डोल असल्या कल्पना त्यांना सुचू शकतात!

•

प्रकरण ४

# ब्राह्मण्य : जातीय आणि वर्गीय

महाराष्ट्रातील राजकारण व समाजकारण याचा 'जातिनिष्ठ' विचार करणाऱ्यांची संख्या अलीकडे बरीच वाढलेली आहे. गांगल यांच्यासारख्या उघड जातीय द्वेषाने पछाडलेल्या व्यक्तींपासून तो त्याला वैचारिक संदर्भ देणाऱ्या 'टाइम्स'च्या पाडगावकरांपर्यंत त्याची व्याप्ती आहे. यांपैकी अनेक विद्वानांनी आपले वैचारिक प्रवासाचे प्रस्थान कुठूनही ठेवलेले असो, शेवटी सर्वजण मुक्कामाला आश्चर्यकारकपणे एकाच ठिकाणी येतात. महाराष्ट्राच्या कढईत आज ते राजकारण व समाजकारण शिजते आहे, त्याच्या बऱ्या-वाईटाची सर्व जबाबदारी येथील मराठा समाजाच्या डोक्यावर टाकून आपण नामानिराळे राहतात. महाराष्ट्र समाजाचे, येथील राजकीय व सामाजिक प्रवाहांचे, चळवळींचे, ऐतिहासिक संदर्भाचे ते यथार्थ मूल्यमापन नाही हे तर खरेच. पण ही केवळ 'ॲकॅडेमिक मांडणीतील कमतरताच नाही, तर आधीच कमकुवत झालेल्या समाजाच्या आणखी विघटनाची धोकादायक बीजेही त्यात आहेत.

या सर्व प्रकाराला अलीकडच्या काळात निमित्त मिळाले ते बाळ गांगल यांच्या महात्मा फुले यांच्यासंबंधी 'सोबत'मध्ये छापून आलेल्या दोन अत्यंत बेजबाबदार, द्वेषमूलक व भडक लेखांचे. त्याविरुद्ध महाराष्ट्रात अनेक ठिकाणी तीव्र प्रतिक्रिया उमटली. सोबतचा निषेध, अंकांची होळी, बेहेरे यांची मानभावी माफी, विधानसभेत मांडण्यात आलेली हक्कभंगाची सूचना, त्याच्याच जोडीला काही ठिकाणी छापून आलेले लेख व हरी नरके, रमेश ढावरे, वगैरेंच्या पुस्तिका यांतून या वादविवादाचे स्वरूप उलगडत गेले. त्याच निमित्ताने 'टाइम्स ऑफ इंडिया'चे संपादक दिलीप पाडगावकर यांनी 'Marginalised Brahmins' हा लेख टाइम्समध्ये लिहिला. महाराष्ट्रातील आजच्या राजकीय व सामाजिक स्थितीचे विश्लेषण त्यात आले आहे. याच काळात नरूभाऊ लिमये यांनी यशवंतराव चव्हाण विचारमंच काढण्याचा विचार प्रकट केला. 'लोकसत्ता'चे संपादक माधवराव गडकरी यांनी

या निमित्ताने लोकसत्ता दैनिकात दोन अग्रलेख लिहिले. महाराष्ट्रातील राजकारण आणि त्यातील जात हा घटक त्यात प्राधान्याने आला आहे. गांगल यांच्या लिखाणात अभ्यासकाचा व संशोधकाचा तटस्थपणा नाही हे हरी नरके यांनी त्यांच्या सुगावा प्रकाशनने प्रकाशित केलेल्या पुस्तकात समर्पक उदाहरणे देऊन स्पष्ट केले आहे. गांगल यांच्या हेतूंबद्दल शंका निर्माण झाल्याने त्यांच्या लेखनाचे वैचारिक मूल्य शून्य आहे. पण मधल्या काळात यावरून गदारोळ माजला, तो सर्वथा अनाठायी नव्हता. काही गोष्टी स्पष्ट होण्यास त्यामुळे मदतच झाली. उदाहरणार्थ, पाडगावकर यांच्या लेखनातून सूचित होते, त्याप्रमाणे गांगल यांना येथील ब्राह्मण समाज आपला प्रतिनिधी मानत नाही. गांगल यांचे समर्थन करण्यास ठरावीक पठडीतील अपवादात्मक व्यक्ती पुढे सरसावल्या. म. फुल्यांविषयी गांगल यांचे मत स्वीकारण्याऐवजी प्रभाकर पाध्ये, आचार्य अत्रे, सरदार, तर्कतीर्थ, मालशे, कीर, प्रा. फडके यांनी केलेले फुल्यांचे 'क्रांतिकारक समाजसुधारक' हे मूल्यमापन प्रमाण मानणाऱ्यांची संख्या येथील ब्राह्मणांमध्ये जास्त आहे. प्रतिगामी विचारसरणीचा एक मोठा प्रवाह येथील ब्राह्मण समाजामध्ये गेली दीड-दोनशे वर्षे असला तरी त्यांच्या विरुद्धचे नेतृत्व करणाऱ्या ब्राह्मणांची संख्याही येथे कमी नव्हती. पेशवाईनंतर लोकहितवादी व रानडे यांच्यापासून अलीकडच्या काळात प्रा.गं.बा. सरदारांपर्यंत त्यांतील अनेक छटा दिसतात. खुद्द पेशवाईतही देशस्थ-कोकणस्थ असे भेद होतेच आणि पेशवे सातारच्या छत्रपतींचा पुरेसा मान ठेवीत नाहीत याबद्दल नाराज असणारे आणि पेशव्यांपेक्षा छत्रपतींच्या गादीला अधिक मान देणारेही ब्राह्मण होतेच.चित्तपावन सोडून इतर ब्राह्मण नव्हेतच असा दुरभिमान बाळगणारेही काही आहेत. त्यामुळे पाडगावकर यांना वाटते त्याप्रमाणे सर्व ब्राह्मणांची 'आयडेंटिटी' वा त्यांच्या 'इगो'ची मर्मस्थाने एक नव्हेत. त्यांनी त्यांच्या लेखात उदाहरणे म्हणून घेतलेली बाळ गांगल किंवा श्री.ज. जोशी ही उदाहरणे प्रातिनिधिक नव्हेत. शिवाय गांगल आणि जोशीही एक नव्हेत.

परमेश्वरानेच जाती निर्माण केल्या आणि ब्राह्मण ही वर्णाश्रमातील सर्वोच्च जात आहे असा भ्रम बाळगणाऱ्यांचा एक वर्ग आणि तत्कालीन समाजरचनेचा, हितसंबंधांचा आणि म्हणूनच अपरिहार्यपणे परिवर्तनीय असा जात हा एक कालविशिष्ट समाजसमूह आहे असे मानणाऱ्यांचा दुसरा वर्ग आहे. या दुसऱ्या वर्गाने जात्यभिमानाचा अतिरेक कधी केला नाही. त्यामुळेच त्यांना येथील सामाजिक वास्तवाचे भान लवकर आले. देशकार्य असो की समाजकार्य, मूलभूत मानवी प्रेरणांचा व मूल्यांचा विवेक त्यांनी बाळगल्याने त्यांच्या बाबतीत 'ब्राह्मण' म्हणून वेगळी व लंगडी अस्मिता जोपासण्याचे अंतिम उद्दिष्ट कधी आले नाही.

येथील संपूर्ण समाजाची व त्यांची अस्मिता, आकांक्षा व स्वप्ने एक झाली. स्वातंत्र्य चळवळीत भाग घेणाऱ्यांमध्येही या दोन सूक्ष्म छटा दिसतात. एका वर्गाला 'आपली' गेलेली सत्ता, राज्य, वैभव पुन्हा मिळविण्यात स्वारस्य होते. दुसऱ्या वर्गाला स्वातंत्र्य हवे होते ते मूलभूत मानवी प्रेरणेचा स्वाभाविक आविष्कार म्हणून. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांच्याशी त्यांची बांधिलकी होती. त्यासाठी जात आडवी आली नाही.

'स्वातंत्र्यानंतर आणि विशेषतः संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर ब्राह्मणांचे सर्वच महत्त्वाच्या क्षेत्रातील वर्चस्व फार वेगाने संपुष्टात आले' हे पाडगावकरांचे विश्लेषण वस्तुस्थितीला धरून नाही. साहित्य व संस्कृतीपासून अर्थकारण, उद्योग,बँका, शिक्षणसंस्था अशा जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत स्वतःला ब्राह्मण म्हणविणाऱ्यांचा लोकसंख्येतील त्यांच्या वाट्यापेक्षा कितीतरी अधिक प्रभाव आहे. गेल्या काही वर्षांत शिक्षणाचा प्रसार वाढल्याने व बुद्धिमत्ता ही एकाच जातीची मक्तेदारी नसल्याने इतर अनेक जातींतील व्यक्तीही पुढे आल्या. औद्योगीकरणाने, अर्थकारणाने एक वेगळी संस्कृती निर्माण झाली, होत आहे. त्यात सत्तास्थानावर असणाऱ्यांची पुन्हा एक वेगळी जात, किंवा आधुनिक भाषेत वर्ग तयार होत आहे. तेथे तो आपल्या जन्माधिष्ठित जातीतील लोकांपेक्षा आपले हितसंबंध सांभाळणाऱ्या लोकांशी जवळीक दाखवितो. पूर्वाश्रमीच्या वरिष्ठ जातीतीलच लोक या नव्या वर्गात बहुसंख्येने आहेत. जात, प्रांत, भाषा यापेक्षा हितसंबंध, तेही मुख्यत्वे आर्थिक हितसंबंध महत्त्वाचे झाले आहेत. त्यामुळे पाडगावकरांना वाटते त्याप्रमाणे ब्राह्मण 'जात' म्हणून मार्जिनलाईज्ड झाले असले तरी 'वर्ग' म्हणून तेवढ्याच वेगाने नव्या परिभाषेत समाविष्ट झाले आहेत. त्यांना वेगळी आयडेंटिटी मिळाली आहे. नामस्मरण, होमहवन, पूजापाठ, मंत्रपठण, संस्कृत भाषा, पंचा-जानवे यांऐवजी पंचतारांकित इंग्रजी संस्कृतीचा ग्राहक व भोक्ता, हा त्याचा परवलीचा शब्द झाला आहे. ही त्याची नवी 'आयडेंटिटी' आहे. सापाने कात टाकावी तशी ती या समाजाने टाकली आहे. संस्कृतऐवजी ट्रान्स 'अटलांटिक लँग्वेजस्'मध्ये तो बोलतो, लिहितो व आंतरखंडात वस्ती करतो ही त्याची नवी ओळख आहे."The end of Brahminical, ideological and political hegemony has deprived the Brahmins a sense of identity" हे पाडगावकरांचे विधान त्यांनी ज्यांच्यासंबंधी केले आहे, त्यांनाही मान्य होणारे नाही. कारण त्यांनाही ती 'जुनाट' अस्मिता नको आहे. 'टाइम्स'चे संपादक म्हणून दिल्लीत काम करण्यापेक्षा टाइम्सचे पॅरिसमधील प्रतिनिधी म्हणून काम करण्याचा ओढा असलेल्यांची संख्याच त्यांच्यात जास्त आहे.

ब्राह्मण बुद्धिवंतांचा कल काँग्रेसकडे नाही, त्यांच्या काँग्रेसबद्दलच्या भावनांचे वर्णन 'घृणा' असे करता येईल, असे पाडगावकर म्हणतात. तेही अर्धसत्यच आहे. राज्यातील धोतरछाप काँग्रेसबद्दल त्यांना तसे वाटत असेलही. परंतु देशाच्या पातळीवर त्यांना इतर कोणाहीपेक्षा राजीव गांधी व त्यांची काँग्रेस यांचीच जवळीक वाटते. राजीव गांधींच्या 'ब्लू बॉईज'मध्ये आपला समावेश व्हावा अशी सुप्त इच्छा अनेकजण बाळगून असतात. डिसेंबर १९८४ च्या निवडणुकीतील पुण्यातील मतदान याचे उदाहरण आहे. भाजपच्या जगन्नाथराव जोशीपेक्षा राजीव गांधींचे विठ्ठलराव गाडगीळ बरे असाच कौल अनेकांनी दिला. ज्यांना अमेरिकेत जाता येत नाही त्यांच्यासाठी भारतातच अमेरिका निर्माण करण्याच्या राजीवजींच्या आश्वासनाचा आणि काही अंशी कृतीचाही तो परिणाम होता. शिवाय महाराष्ट्रात मराठ्यांचं राज्य आहे असं वादासाठी मानलं तरी दिल्लीत ब्राह्मणांचंच राज्य आहे ही वस्तुस्थिती कोण.नाकारू शकणार ? चरणसिंग, व्ही.पी. सिंग, चंद्रशेखर, देवीलाल, रामाराव यांच्यापेक्षा राजीव गांधी अधिक जवळचे असे 'जातीयवादी'विचार करणारे म्हणू शकतात. परंतु ते जवळचे आहेत ते आर्थिक, औद्योगिक, सांस्कृतिक धोरणांसाठी, जातीसाठी नव्हे. थोडक्यात "Marginalised Brahmins-the sea change in Maharashtra"या पाडगावकरांच्या लेखातील उत्तरार्धच तेवढा खरा दिसतो आहे व या 'सी चेंज'मुळेच ब्राह्मण्य' उरलेले नाही.

लोकसत्ताचे संपादक माधवराव गडकरी यांनी नरूभाऊ लिमये यांच्या मंचाविषयी लिहिताना महाराष्ट्राचे असेच जातीय निकष लावून विश्लेषण केलेले आहे. हे महाराष्ट्र राज्य होणार की मराठा राज्य होणार या माडखोलकरांच्या अतीप्रसिद्धी दिलेल्या वाक्याचा हवाला देऊन शेवटी हे मराठ्यांचे राज्य झाले, महाराष्ट्र राज्य नाही या निष्कर्षाप्रत ते आले आहेत. यशवंतराव चव्हाणांनी माडखोलकरांना हे महाराष्ट्रातील सर्व जातींचे राज्य होईल, असे आश्वासन दिले होते ते प्रत्यक्षात आले नाही, यशवंतरावांनी सर्वांनाच आभासात ठेवले असे गडकरींचे प्रतिपादन आहे. महाराष्ट्रात राहणारे ते सर्व मराठे असे बाहेरचे जग म्हणते. येथील सर्व बहुजन समाजही एकेकाळी स्वतःला मराठा समजत होता. जातीय उतरंडीत उन्नयनाच्या प्रक्रियेत हे घडून आले. चालीरीती, संस्कृती, भाषा, व्यवहार अशा अनेक बाबतीत येथील बहुजन समाज एकसंध होता. येथील समाजसुधारकांचे प्रयत्न त्याला कारणीभूत होते. जातीय तत्त्वावर राखीव जागांचे लोण आल्यानंतर प्रत्येकाला आपली वेगळी जात सांगावीशी वाटली आणि उलट्या दिशेचा प्रवास सुरू झाला. महाराष्ट्रात मराठे १२ टक्के की ३२ टक्के हा अनिर्णायक वाद कोणी उकरून काढतो त्याला व्यवहारात काही अर्थ नाही. अनेकदा राजकीय

भांडवल म्हणून जातीचे नाव पुढे केले जाते. पण या जातीतल्या लोकांचीही ती फसवणूक असते. त्यामुळे यशवंतरावांच्या महाराष्ट्रात तरी दोनच वर्ग होते. एक बहुजनसमाज व दुसरा उच्चवर्णीय.

येथे काय किंवा कोणत्याही लोकशाही देशात काय , बहुजन समाजाच्या हातातच सत्ता राहणे नैसर्गिक न्यायाला धरून होणार. यशवंतराव अलीकडच्या काळातील महाराष्ट्रातील सर्वांत थोर नेते होते हे खरे असले तरी त्यांच्या अंतर्मनात एक धास्ती होती. राज्याच्या राजकारणात आपल्याला कोणी जातीयवादी म्हणू नये आणि राष्ट्रीय पातळीवर प्रादेशिकतेचा शिक्का आपल्यावर बसू नये ही. द्विभाषकाला म्हणूनच त्यांनी मान्यता दिली आणि दिल्लीत महाराष्ट्राचा आवाज खंबीरपणे उठविला नाही. अन्यथा केंद्रात सीमाप्रश्नावर महाराष्ट्राच्या बाजूने न्याय देईल अशा तऱ्हेचा आयोग त्यांना सहज नेमता आला असता. त्यांनी तसे केले नाही. त्याच कारणासाठी महाराष्ट्रातही मराठा जातीयवादाला कधी प्रोत्साहन दिले नाही. किंबहुना येथील सत्यशोधकी आणि प्रागतिक विचाराच्या बहुजन समाजाच्या चळवळीशी असणारी नाळ तोडून ब्राह्मणी विचारवंतांना तेवढे डोक्यावर घेतले असा आक्षेपही त्यांच्यावर घेतला जातो. यशवंतराव ६२ मध्ये दिल्लीला गेल्यानंतर प्रथम मारोतराव कन्नमवार आणि नंतर वसंतराव नाईक मुख्यमंत्री झाले. ते दोघेही मराठा 'जातीचे' नव्हते. नाईक तर सलग अकरा वर्षे मुख्यमंत्री होते. बाळासाहेब देसाई, वसंतदादा, बाळासाहेब सावंत अशी अनेक मातब्बर मंडळी त्या वेळी मुख्यमंत्री होऊ शकली असती. ती झाली नाहीत. यशवंतरावरांची यामागे कोणतीही दृष्टी असो, त्यांनी मराठा जातीचे राजकारण केले नाही. बहुजन समाजाचे केले. त्यात जातीय नसणाऱ्या ब्राह्मणांना मानाचे स्थान होते. त्या काळी मंत्रिपदे मिळत त्यासाठी अनेक निकष असत. पक्षातील ज्येष्ठतेपासून प्रादेशिक वा जिल्हा समतोलापर्यंत. कोणीही उठला आणि मंत्री झाला असे होत नसे. बाबासाहेब भोसल्यांसारखी लॉटरी लागल्याची उदाहरणे नव्हती. पक्षात, समाजात, सरकारात उमेदवारी करावी लागे. जातीचा एकमेव निकष लावून मंत्री होता येत नसे. पुढे अंतुले मुख्यमंत्री झाले. ते 'मराठा' नाहीत म्हणून स्वीकारले गेले नाहीत, असे झाले नाही. किंबहुना भोसले, निलंगेकर यांच्यापेक्षा ते कणभर अधिकच स्वीकारले गेले. महाराष्ट्रातील बहुजन समाजाने जातीयवादी विचार करून राजकारणातील प्रत्येक गोष्ट केली हे म्हणणे बरोबर नाही. महात्मा फुले यांचा पुतळा उभारणाऱ्या समाजाने ते माळी होते याचा विचार करून त्या जातीतील एकापेक्षा अधिक लोकांना मंत्रिपदे द्यावीत, असे गडकरींनी म्हणणे हा आणखी कोणावर नसला तरी महात्मा फुले यांच्यावर नक्कीच अन्याय आहे. मंत्रिमंडळातील सर्व महत्त्वाची

खाती मराठ्यांकडे आहेत असा गडकरींचा दुसरा आक्षेप आहे. हल्ली तुम्ही मराठा आहात की मारवाडी यापेक्षा दिल्लीच्या जवळ आहात की दूर हा सत्ता मिळविण्यासाठी निर्णायक घटक झाला आहे. कोणाला कोणते खाते द्यायचे हेही दिल्लीतच ठरते आणि कोणाकडे कोणते खाते आहे हे पूर्वीच्या मानाने फारसे महत्त्वाचे राहिलेले नाही. आपण या जातीचे म्हणून हे खाते आपल्याला एवढ्या बाळबोधपणे आजचे राजकारण चालले आहे, असे कोणी समजत असल्यास जरूर समजू देत. प्रत्यक्षात ते तसे नाही. अनेक गुंतागुंतीचे घटक त्यात येतात. एका विशिष्ट जातीच्या हाती 'जात' म्हणून सर्व सूत्रे एकवटली आहेत, असे गृहीत धरून सिद्धान्त मांडायचा प्रयत्न केला की अनेक घोटाळे होत राहणारच !

शरद जोशींचे उदाहरण या संदर्भात बोलके आहे.त्यांचे 'जोशीपण' शालिनीताईंनी काढलं, म्हणून मराठा शेतकरी त्यांच्या मागे यायचा राहिला नाही. आणि तोही ऊस, कांदा,कापूस, तंबाखू अशी नगदी पिके घेणारा. जातीपेक्षा वेगळा विचार येथे कार्यरत झालेला दिसतो. तो म्हणजे समान हितसंबंधांचा. सर्व राजकारणच या विचाराभोवती फिरत आहे. त्यात कधीतरी जात हा घटक येतोही. परंतु तो हितसंबंधाएवढा, आर्थिक हिताएवढा प्रभावी राहिलेला नाही. शरद जोशींनी सांगितलं म्हणून प्रकाश आंबेडकरांना हजारो मराठ्यांनी मते दिली हा इतिहास ताजा आहे. येथे सर्व मराठेही सारखे नसतात. शेतमजुरापासून, भूमिहीनापासून बागायतदारांपर्यंत त्यांचे अनेक स्तर आहेत. शेतमजुरांच्या शोषणात मराठा-माळी मांडीला मांडी लावून बसतात. तेथे जात आड येत नाही.

आपला समाज संक्रमणावस्थेत आहे. एकाच वेळी अनेक वास्तवं आपल्या समोर येतात. त्यांचे रंग बदलतात परंतु बदलाची दिशा स्पष्ट व अपरिहार्य आहे. जातीपेक्षा वर्गीय हितसंबंधाच्या क्रिया-प्रतिक्रियांतूनच राजकारण जाणार आहे. साप साप म्हणून भुई धोपटण्याने कोणाला क्षणिक आनंद होत असला तरी त्याचा आधार काल्पनिकच असणार !

•

५ प्रकरण १०

# माने, आता मौन सोडा

भटक्या व विमुक्त जमातीचे बिनीचे कार्यकर्ते व त्या संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मणराव माने अपप्रचाराच्या फेऱ्यात सापडले आहेत. गंमत म्हणजे ज्यांचे ऋण शतकानुशतके मान्य करावे लागेल अशा महात्मा फुले यांची अगदी खालच्या स्तरावर जाऊन निंदानालस्ती करण्यात आघाडीवर असलेल्या सोबतसारख्या साप्ताहिकाचाच त्यासाठी वापर करण्यात आला; आणि त्यांनीही आसेपातील तथ्यांशाची खातरजमा करण्याऐवजी या तऱ्हेच्या लेखनाला प्रोत्साहन दिले. तळागाळातील समाजाला आपल्या अस्मितेची प्रतीके वाटतात अशा व्यक्तींची प्रतिमा डागळण्याच्या या व्यूहरचनेत त्या समाजातीलच काही जणांनी व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा आणि अहंभाव यासाठी सामील व्हावे यात त्यांचा काही लाभ झाला असला तरी त्या समाजाचे मात्र नुकसान झाले आहे.

प्रत्येकाचीच काही मागणी आहे अशा अविकसित व अप्रगत समाजात अगदी न्याय्य प्रश्नही रस्त्यावर येऊन सुटत नाहीत. त्यासाठी सहानुभूतिपूर्ण समाजमन तयार व्हावे लागते. भटक्या विमुक्त जमातीच्या चळवळीला अलीकडच्या काळात अशी व्यापक सहानुभूती लाभत असतानाच त्याला सुरुंग लावण्यात येत आहेत. सर्व समाजालाच नवी प्रेरणा आणि राजकारणाला वेगळी दिशा देण्याची ताकद असलेली दलितांची भरघोस चळवळ केवळ एका दशकापूर्वी वैयक्तिक भांडणाच्या भोवऱ्यात अडकून फुटली याचे भान त्याच्याही खाली असलेल्या समाजाने बाळगले नाही तर त्यांना वर येण्यासाठी दशके नव्हेत, शतकेच वाट पाहावी लागेल. सात-आठशे वर्षांपूर्वी ज्ञानेश्वरांच्या वाट्याला बहिष्कार आला तो, ते आणि त्यांची भावंडे संन्याशाची मुले होती म्हणून नव्हे तर त्यांनी विद्रोही भूमिका घेतली म्हणून. अभिजन लोकांच्या प्रभावातून मुक्त होण्यासाठी त्यांनी मायबोली मराठीचा आग्रह धरला. भाषेमुळे वरिष्ठ जातींची मक्तेदारी असलेले व सामान्यांना अप्राप्य असलेले तत्त्वज्ञान त्यांनी लोकांपर्यंत पोहोचवले. त्यासाठी त्यांना किंमत द्यावी लागली.

ज्ञानेश्वरांनी हा विद्रोह केला म्हणून तुकाराम होऊ शकला. फुले, आगरकर, आंबेडकर, शाहू सर्वांच्या वाट्याला हेच आले. त्यातून आजचा तळागाळातील समाज काहीच शिकणार नसेल तर परमेश्वरही त्यांचे कल्याण करू शकणार नाही.

भटक्या व विमुक्त समाजापुरतेच बोलायचे तर लक्ष्मण माने हे आज त्यांच्यापैकी सर्वांत वजनदार नेते आहेत. परिवर्तनाच्या व्यापक चळवळीशी त्यांचे संबंध आहेत. सातारच्या समाजवादी युवक दलासारख्या एका चांगल्या संघटनेत, डॉ. दाभोळकरांच्या मार्गदर्शनाखाली ते तयार झाले आहेत. महात्मा फुले समता प्रतिष्ठानशी ते निगडित आहेत. ते चांगले लेखक आहेत. त्यांच्या 'उपरा' या पहिल्याच पुस्तकाला साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले. त्याचे फ्रेंचमध्ये भाषांतर झाले. भटक्यांसंबंधींच्या संशोधनासाठी त्यांना फोर्ड फौंडेशनचे अनुदान आणि त्यानंतर डॉ. भाभा यांच्या नावाने मिळणारे विद्यावेतन मिळाले. ते प्रभावी वक्ते आहेत. त्यांच्या भाषणाच्या शैलीने काही लोक दुखावत असले तरी ते जे प्रतिपादन करतात ते मान्य करण्याशिवाय पर्यायही नसतो. म्हणूनच सर्व हल्ला आज त्यांच्यावर केंद्रित झाला आहे.

मूळचे सातारचे म्हणून स्वाभाविकपणे यशवंतराव चव्हाणांच्या ते जवळ गेले. त्यांनी सातारला स्थापन केलेल्या संशोधन संस्थेचे अध्यक्षपद यशवंतरावांनी आपणहून स्वीकारले. ज्यांना कोणी दारात उभे करीत नव्हते, त्यांना यशवंतरावांनी आपली प्रतिष्ठा दिली. संघटनेच्या मागण्यांसाठी दिल्ली दरबारी शब्द टाकला. यशवंतरावांच्या नंतर अध्यक्ष कोण हा प्रश्न आला. यशवंतरावांना दीन-दुबळ्यांबद्दल खरोखरीच कढ होता. त्यांची जागा घेईल अशा अध्यक्षांच्या शोधात असताना शरद पवारांचे नाव अग्रक्रमाने पुढे आले. विशेष म्हणजे तेव्हा ते सत्तेवर नव्हते. काँग्रेस पक्षातही नव्हते. लगेचच सत्तेवर येण्याची शक्यताही नव्हती. परंतु त्यांना भटक्या-विमुक्तांच्या चळवळीत रस होता. त्यातील सर्व गटांनी एकत्र यावे, यासाठी त्यांनी मनापासून प्रयत्न केले, मध्यस्थी केली.

भटक्या-विमुक्तांचा प्रश्न केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नाही.त्यांची एक जात महाराष्ट्रात मागास असते, तर कर्नाटकात पुढारलेली. प्रत्येक राज्यातील कायदे वेगळे. केंद्राशी संबंधित असे हे प्रश्न. त्यासाठी पंतप्रधानांनी या संघटनेच्या कार्यकर्त्यांना भेटावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. पंतप्रधानांना विस्तृत व अभ्यासपूर्ण निवेदन देता यावे यासाठी तर्कतीर्थांच्या मार्गदर्शनाने व मे.पुं. रेगे, व्ही.डी. देशपांडे, य.दि. फडके, भास्कर भोळे यांच्या सहकार्याने सातारला कार्यशाळा झाली. वर्षवर्ष विनवण्या करून जेथे मुख्यमंत्री भेटत नव्हते, तेथे पंतप्रधानांनी भेट दिली. पुढे पवार स्वतःच मुख्यमंत्री झाले. राज्याच्या अखत्यारीतील प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी

संबंधित मंत्री, अधिकारी व संघटनेचे कार्यकर्ते यांची विस्तृत बैठक बोलावली. त्यातून काही महत्त्वाचे निर्णय झाले. या मागास समाजाला न्याय देण्याचे, त्यांच्या रास्त मागण्या मान्य करण्याचे धुरीणांनी ठरविले तर काही होऊ शकते, याचा प्रत्यय आला. मुख्यमंत्री, संबंधित मंत्री व अधिकाऱ्यांनी एकवीस मागण्या मान्य केल्याचे माने यांनी पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले.

त्यातील काही तात्कालिक स्वरूपाच्या, तर काही मूलभूत स्वरूपाच्या आहेत. त्या सर्वांची यादी देण्याचे येथे कारण नाही. परंतु वानगीदाखल एक उदाहरण देता येईल. भटक्यांना प्रथम स्थिर केले पाहिजे. त्यासाठी त्यांना येथील व्यवस्थेत स्थान दिले पाहिजे. त्यासाठी तांड्यांना ग्रामपंचायतीचे स्वरूप दिले पाहिजे. किमान सहाशे लोक आणि किमान उत्पन्नाची अट त्यासाठी होती. याअटी तांडे कसे पूर्ण करणार ? म्हणून उत्पन्नाची अट काढून टाकावी व संख्या ३०० पर्यंत कमी करावी, असे ठरले. त्यामुळे काय होईल ? ग्रामपंचायतीचे मिळणारे फायदे व तिचे स्वरूप यामुळे स्थिर होण्याची प्रवृत्ती वाढेल. सध्याच्या भयानक जातपंचायतीचे स्वरूप जाऊन कायद्याच्या चौकटीत पंचायत येईल. निवडणुकीमुळे लोकशाहीकरण होईल. सरपंच आला म्हणजे तो पंचायत समितीच्या निवडणुकीत मतदार होतो. त्यामुळे प्रस्थापित चौकटीला त्याची दखल घेणे भाग पडेल. भटक्यांची राजकीय व सामाजिक पत वाढेल.

विनवण्या करून वर्षभरात आधीच्या मुख्यमंत्र्यांनी साधी भेट दिली नाही आणि नवे मुख्यमंत्री स्वत: पुढाकार घेऊन मागण्या मान्य करतात आणि लक्ष्मण माने यांना त्याचे श्रेय मिळते याची अनेकांना असूया वाटणे मानवी स्वभावाला धरून आहे. सार्वजनिक (किंवा खासगी) कामासाठी मुख्यमंत्र्यांची भेट व्हावी यासाठी विंगेत वाट पाहणारे म्हणू लागले, ' हे काय चालले आहे ? संघर्ष आणि चळवळ करायची सोडून माने मुख्यमंत्र्यांच्या जवळ जाताहेत, हे काय क्रांतीचे लक्षण आहे ?' दुसरे काही म्हणू लागले, 'माने आता आमदार होणार !' छे ! छे ! माने यांचा पतंग काटलाच पाहिजे. त्यासाठी केवळ सहा हजार रुपयांचा हिशोब दिला नाही याचा डिंक लावून मांजा तयार करण्यात आला. हे हिशेबही चार वर्षांचे जुने. आणि हे सर्व प्रकरण कुठे येते ? तर सोबतमध्ये !

चळवळ आणि संघर्ष करावेच लागतात. आज भटक्यांना- विमुक्तांना जे मिळते आहे, ते त्याचेच फळ आहे. परंतु माझ्या हातून मिळणार असेल तरच ते फळ, नाहीतर नाही मिळाले तरी चालेल ही वृत्ती इथेही दिसते. संयुक्त महाराष्ट्राचा कलश यशवंतरावांनी आणला म्हणून अनेकांचा राग असतोच ना ! आपल्यातील एक सहकारी वर चढायला लागला तर काय होते याविषयी पुणेरी खेकड्यांची कथा

सर्वत्र प्रसिद्ध आहे. यात इतर सर्वांचेच नुकसान आहे हे खेकड्यांच्या एक वेळ लक्षात नाही येणार, माणसांच्या तरी यावे.

या आरोप-प्रत्यारोपाच्या गदारोळात, कुजबुजीमुळे बिघडलेल्या वातावरणात लक्ष्मणराव माने गप्प आहेत हे बरे नाही. त्यांनी बोलले पाहिजे. लोकांचे संशय दूर केले पाहिजेत. वस्तुस्थिती काय आहे ते स्पष्ट झाले पाहिजे. पुढारलेल्या जातींतील माणसाला मिळायचे त्याहून अधिक मानसन्मान माने यांना मिळाले आहेत. त्यांचे आता आणखी वाईट काय होणार आहे ? परंतु चळवळ आणि त्यातील माणसे महत्त्वाची आहेत. त्यांना एकत्र आणायला हवे. कार्यशैलीचे मतभेद मिटवायला हवेत. एखादी पायरी त्यासाठी खाली उतरायला हवी. अपमानही विसरायला हवा. म्हणून लक्ष्मणराव माने, आपण आपले मौन सोडून लोकांना विश्वासात घ्यावे !

●

प्रकरण १०

६

# मान्यांचे धर्मांतर

“माने, आता मौन सोडा,” अशा शीर्षकाचा एक लेख याच स्तंभात मी पूर्वी लिहिला होता. ‘उपरा’कार या विशेषणाने अधिक परिचित असलेले, भटक्या व विमुक्त जमातींचे नेते लक्ष्मण माने आता मौनच नव्हे, तर धर्म सोडण्याच्या विचारात आहेत. लोकसत्तेला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी आपला हा मनोदय व्यक्त केला आहे. हिंदू धर्म सोडून दुसऱ्या धर्मांत जाण्याचा आपला निर्णय हा आज व्यक्तिगत पातळीवरचा आहे, असे ते म्हणतात. परंतु इतर समाजबांधवांची मानसिकता बदलण्यासाठी, म्हणजेच पर्यायाने या व्यक्तिगत पातळीवरच्या विचाराचे सामूहिक निर्णयात रूपांतर करण्यासाठी ते प्रयत्नशील राहणार आहेत. असेही त्यांनी म्हटले आहे. याचा अर्थ सखोल चिंतनानंतरच या धर्मबदलाच्या निर्णयाप्रत तेआले असावेत. ‘मी हिंदू धर्मांत जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही’ हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे १९३५ चे उद्‌गार प्रत्यक्षात यायला २० वर्षांचा कालावधी लोयला. १९५६ मध्ये नागपूरमध्ये दीक्षा भूमीवर त्यांनी आपल्या लक्षावधी अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. चालू वर्ष बाबासाहेबांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. माने आपला निर्णय याच वर्षात अमलात आणणार आहेत आणि आंबेडकरांप्रमाणे तेही बौद्ध धर्मातच जाणार आहेत. वेळेची, धर्माची, ही निवड केवळ योगायोग नाही. जाणीवपूर्वक टाकलेले पाऊल असे त्याचे वर्णन करावे लागेल. श्री. माने यांच्या धर्मांतराच्या निर्णयाची चिकित्सा करण्यापूर्वी, या निर्णयाप्रत ते का आले हे समजून घ्यायला हवे. त्यांच्या मुलाखतीचाच आधार त्यासाठी घेता येईल.

माने यांचे प्रतिपादन काय आहे ? धर्मांतरासाठी ते का प्रवृत्त झाले ? मुलाखतीत त्यांनी सांगितलेली कारणे व केलेली विधाने संक्षिप्तपणे अशी आहेत : (१) भटक्या समाजावरील पराकोटीचा अन्याय, (२) राजकीय दबावाखाली , मूठभरांच्या दडपशाहीखाली आम्हाला आमचे हक्क मिळत नाहीत. हा अन्याय आहे. (३)

या अन्यायाविरुद्ध ‘हिंदू म्हणविणारा’ कोणताही गट आवाज उठवीत नसेल, तर हिंदू धर्मात राहायचेच कशाला? (४) तळागाळातल्या लोकांना न्याय देणारा बुद्धाचाच धर्म आहे. समतेवर आधारित समाजाच्या निर्मितीसाठी धर्मनिरपेक्ष लोकांनी या धर्माचा स्वीकार करायला हवा. (५) फुले-आंबेडकरवादी समजले जाणारे अनेक कार्यकर्ते आज बौद्ध धर्मातील आहेत. (६) आदिवासी, दलित आणि भटके या समाजगटांना या धर्माद्वारे एकत्र आणता येईल. (७) भटक्या-विमुक्त समाजाला सर्व स्तरावर चार टक्के राखीव जागा ठेवण्याची मागणी मान्य केली जात नाही, मात्र राजकीय दबावाखाली धनगर समाजाला भटक्यांच्या सर्व सवलती, भटकंतीची अट सैल करूनही, दिल्या जातात. (८) बौद्ध धर्म स्वीकारला तर केंद्र सरकारच्या सर्व सवलती भटक्या समाजाला मिळू शकतील.

धर्मांतर अनेक कारणांसाठी केले जाते. भारताला तर धर्मांतराचा मोठाच इतिहास आहे. व्यक्तिगत व सामूहिक पातळीवर असंख्य धर्मांतरे झाली आहेत. भारतातील बहुसंख्य मुस्लिम आणि ख्रिश्चन हे धर्मांतरितच आहेत. शेख अब्दुल्लांपासून बॅ. ए.आर. अंतुले यांच्यापर्यंत अनेकांच्या मूळच्या हिंदू धर्मातील आडनावांचा शोधही लागला आहे. एखाद्या विशिष्ट धर्माच्या तत्त्वज्ञानाने प्रभावित होऊन वैयक्तिक पातळीवर धर्मांतरे झाल्याची उदाहरणे महाराष्ट्रातही विपुल आहेत. रेव्हरंड ना.वा.टिळक आणि लक्ष्मीबाई टिळक यांचे धर्मांतर प्रसिद्ध आहे. सर्वधर्मसमभावाचे उद्गाते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या हरिलाल या थोरल्या मुलानेही प्रथम मुस्लिम धर्म स्वीकारला आणि नंतर तो पुन्हा हिंदू धर्मात आला. परंतु या जुन्या गोष्टी झाल्या. त्यानंतर जग इतके बदलले आहे, की वैयक्तिक कारणासाठी धर्म बदलण्याचा विचार अलीकडे कोणी केल्याचे -किमान नावाजलेल्या व्यक्तीने केल्याचे -ऐकिवात नाही. सर्वधर्मांची मूलतत्त्वे सारखीच आहेत, फरक असलाच तर कर्ममांडात, रीतीभातीत. त्यामुळे सत्याच्या शोधासाठी, परमेश्वराच्या प्राप्तीसाठी,मोक्षासाठी तुमचा विशिष्ट धर्म आड येत नाही. उरले कर्मकांड. ते आता महत्त्वाचे राहिलेले नाही आणि म्हणून कोणी पाळीतही नाही. परमेश्वर प्रसन्नच व्हायचा असेल तर मशिदीत प्रार्थना केली काय, मंदिरात केली काय आणि चर्चमध्ये केली काय, अंतिमत: काहीच फरक पडत नाही; आणि माने यांना काही परमेश्वरप्राप्तीची आस लागलेली नाही. धार्मिक नसल्या तरी वैयक्तिक ऐहिक अडचणीतून बाहेर पडण्यासाठीही त्यांनी हा मार्ग पत्करला असण्याची शक्यता नाही. आखाती पैशाचे प्रलोभन दाखवून दक्षिणेत काही वर्षांपूर्वी अनेकांनी धर्मांतरे केली. माने यांची कृती त्या सदरात मोडणारी नाही. याचा अर्थ माने यांचा धर्मांतराचा विचार आध्यात्मिक नसून राजकीय आहे. त्यांचा निर्णय

ते म्हणतात त्याप्रमाणे वैयक्तिक पातळीवरचा असला तरी त्याची प्रेरणा, राजकीय उद्दिष्ट ही आहे व त्याचे परिणाम सामाजिक आहेत. 'राजकीय' हा शब्दप्रयोग इथे अर्थातच व्यापक अर्थाने केलेला आहे. माने यांचा 'वैयक्तिक' राजकीय लाभ त्यात अभिप्रेत नाही आणि धर्मांतराचा असा वैयक्तिक फायदा त्यांना मिळेल, अशीबाहेरची परिस्थितीही नाही.

भटक्या समाजावरील पराकोटीचा अन्याय या शब्दांत माने ज्याचे वर्णन करतात त्या सामाजिक कारणासाठी, राजकीय उद्दिष्ट म्हणून माने धर्मांतराचे हत्यार उपशीत आहेत. धर्म आणि राजकारण एकत्र करण्याचा हा अत्यंत जाणीवपूर्वक निर्णय आहे. भटक्या समाजाला वर आणण्यासाठी, त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी हा सर्वांत परिणामकारक मार्ग आहे, अशी त्यांची कदाचित खात्री झाल्यामुळे त्यांनी तो घेतला असेल. यातून एक गोष्ट स्पष्टपणे अधोरेखित होते. ती म्हणजे धर्माची राजकारणाशी सांगड घालणे, माने यांनाही मान्य आहे. माने आधुनिक, प्रागतिक विचारधारेचे प्रतिनिधी आहेत, असे अनेक लोक मानीत आले. धर्म व राजकारण या दोन पूर्ण वेगळ्या गोष्टी आहेत, धर्माचे स्थान वैयक्तिक पातळीवरच राहिले पाहिजे, हे या विचारधारेचे प्रमुख अंग आहे. माने राजकारणासाठी धर्माचा उपयोग करू पाहात असतील तर साहजिकच त्यांची या प्रागतिक व सेक्युलर विचारप्रवाहांशी बांधिलकी इत:पर उरलेली नाही, असे म्हणावे लागले. राजकारणात बौद्ध धर्म किंवा धर्मांतर आणायचे तर हिंदू व मुस्लिम धर्माचाही त्याला अपवाद करता येणार नाही. मग राजकीय विचार म्हणून हिंदूंचे संघटन कोणी करीत असेल तर त्यालाही विरोध करता येणार नाही. रा. स्व. संघाला नाही, भाजपला नाही, शिवसेनेला नाही आणि मुस्लिम लीगलाही नाही. माने यांचे त्यांच्या विचाराबद्दल स्वागत करायचे तर मग बाळासाहेब ठाकरे किंवा सय्यद शहाबुद्दीन यांनी काय घोडे मारले आहे ? रा.स्व. संघाला विरोध कशासाठी ? अमृतसरच्या सुवर्णमंदिरात लष्कर तरी कशाला पाठवायचे ? अल्पसंख्याकांना राजकारणात धर्म चालतो, तर त्याच कारणासाठी बहुसंख्याकांचा धर्मही चालवून घेतला पाहिजे किंवा मग कुठेच धर्म नको, असे म्हटले पाहिजे. दलित ऐक्याचे स्वागत करण्याऐवजी त्यांनी मुख्य राजकीय प्रवाहात सामील झाले पाहिजे, असे मी मागे लिहिले होते, त्याचे कारणही तेच होते. भूमिका स्वच्छ होती. दलितांना जर स्वत:चे वेगळे राजकीय अस्तित्व प्रिय असेल तर मग इतर मागासवर्गीयांना शिवसेनेच्या रूपाने नवी ताकद मिळत असेल तर ती त्यांनी का नाकारावी ?

आम्ही दलित म्हणून एकत्र येऊ, परंतु शिवसेनेचा मात्र त्याच वेळी नि:पात झाला पाहिजे, यातील तार्किक विसंगती, राजकीय स्वार्थापायी त्यांच्या पुढाऱ्यांच्या

लक्षात आली नाही तरी इतरांनी काही डोके बंद केलेले नाही. धार्मिक मूलतत्त्ववादाला, भूमिका म्हणून विरोध करायचा असेल तर खोमेनीपासून मान्यांपर्यंत कोणाचाच अपवाद करता येणार नाही. तात्त्विक भूमिकेत 'राखीव' हा प्रकार बसत नाही. गेल्या १५-२० वर्षांत घेतलेल्या भूमिकेच्या नेमक्या उलट्या दिशेने माने निघाले आहेत. ध्येय कितीही उदात्त असो, भटक्या समाजावरील पराकोटीच्या अन्यायाचे असो की नामांतराचे; साध्य आणि साधन यांच्यातील सुसंगती संपली की तेल गेले आणि धुपाटणेही गेले त्याप्रमाणे साध्यही जाईल आणि साधनही हातात राहणार नाही.

माने यांच्या पूर्वीच्या व नव्या विचारांतील तार्किक विसंगती समज बाजूला ठेवली आणि धर्म व राजकारण यांचा संबंध त्याज्य मानला नाही तर काय होईल ते पाहू. धार्मिक आधारावर संघटित होणारा सर्वांत प्रबळ गट केवळ संख्यात्मकदृष्ट्या पाहिला तर हिंदूंचाच असेल. आजच्या सेक्युलॅरिझममुळे, उदारमतवादामुळे धर्मवादी गटांवर जी वैचारिक बंधने येतात, ती राहणार नाहीत. सर्वांना सांभाळून, सामावून घेऊन पुढे जाण्याऐवजी एकमेकांशी स्पर्धाकरीत 'बळी तो कान पिळी' या न्यायाने येथील सर्व गटांनी आपल्याला हवे ते मिळवायचे, असे ठरवले तर हिंदू गटांना केवळ त्यांच्या ताकदीवर सर्वच गोष्टी पदरात पाडून घेता येतील. उदाहरणादाखल केवळ नोकऱ्यांतील राखीव जागांचा प्रश्न घेऊ. 'रिझर्व्हेशन्स' उद्याच जातील. याचा अर्थ या देशातील कमकुवत, अल्पसंख्य या सर्वांचे हित कशात दडले असेल तर या देशाचे 'सेक्युलर' स्वरूप टिकविण्यावर. म्हणूनच धर्मवादी, मूलतत्त्ववादी, जातीयवादी अशा प्रवृत्तींचा बीमोड करण्यासाठी दलित, भटके, विमुक्त,अल्पसंख्य या समाजघटकांच्या मानेप्रभृती पुढाऱ्यांनी पुढाकार घेतला पाहिजे. अगदी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतराचेही उदाहरण घेता येईल. बाबासाहेबांसारख्या हिमालयाएवढ्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वामागेही सर्व दलित समाज त्या वेळी आला नाही आणि जो आला त्यांच्यातही बाबासाहेबांच्या निधनानंतर असंख्य गट पडले. धर्मांतराने दलित समाजाचे कोणते प्रश्न सुटले ? उलट नवबौद्धांनाही सवलती मागाव्या लागल्या आणि आपण धर्मांतर केले तर भटक्या समाजाला किमान या सवलती तरी मिळतील, असे शेवटी मानेही म्हणतात. डॉ. आंबेडकरांनी वापरले त्या वेळी धर्मांतराचे अस्त्र धारदार असूनही ही स्थिती, मग २१व्या शतकात जाताना हे बोथट व निरुपयोगी हत्यार माने यांना कोणता जय मिळवून देणार आहे ? आणि माने यांच्यामागे त्या कारणासाठी त्यांचा तरी सर्व समाज येणार आहे काय ? आपल्या सवलतीत नवे वाटेकरी आले तर आधीच्या नवबौद्धांची प्रतिक्रिया काय

असेल ?

माने यांनी त्यांच्या मुलाखतीत केलेली काही इतर विधाने पाहू. 'राजकीय दबावामुळे' आम्हाला आमचे हक्क मिळत नाहीत, 'राजकीय दबावाखाली' धनगर समाजाला भटक्यांच्या सर्व सवलती मिळाल्या. याचा अर्थ 'राजकीय दबाव' सध्या तरी कार्यरत आहे, असे मानता येते. धनगरांना तो धर्मांतर न करता आणता येतो. इतरांनाही तो येतो. मग भटक्या समाजाला का नाही ? त्यांनाही तो येतोच आणि प्रत्यक्षात त्यांचा दबाव आहेच, हे खुद्द माने यांच्या आमदारकीवरूनही दिसून येते. माने विधानपरिषदेचे सदस्य झाले ते काही केवळ मुख्यमंत्री शरद पवार यांची लहर म्हणून नव्हे, तर भटक्या विमुक्त समाजाच्या राजकीय वजनाच्या नव्या जागरुकतेची ती पावती आहे. केवळ साहित्यिकाचीच निवड करायची असती तर पवारांपुढे अनेक पर्याय होते. माने यांच्यापेक्षा ज्येष्ठ, श्रेष्ठ साहित्यिकांची निवड त्यासाठी त्यांना करता आली असती. माने यांना ती जागा मिळाली, याचे कारण राजकीय दबावाला सत्ताधीशांनी दिलेली मान्यताच आहे. हा दबाव रास्त मार्गांनी वाढविता येऊ शकतो आणि न्याय्य मागण्या मान्य करून घेता येतात. त्यासाठी उराशी बाळगलेल्या मूल्यांना सोडचिठ्ठी देण्याचे कारण नाही. सर्वच धर्मांचे तत्त्वज्ञान महान आहे आणि प्रत्येक धर्माच्या कर्मकांडात विकृती आल्या आहेत. भगवान बुद्ध महान होता हे खरेच; पण आजचा बुद्ध धर्म आजच्या हिंदू धर्मापेक्षा 'महान' आहे, असे म्हणणे म्हणजे स्वत:चीच फसवणूक करणे. धर्मांतराला धार्मिकदृष्ट्या आता अर्थ राहिला नसून त्याचा राजकीय हत्यार म्हणून वापर करणे अधार्मिक आहे. धर्मवादाच्या भोवऱ्यात अडकून गरगर फिरण्याऐवजी सेक्युलॅरिझमच्या महामार्गावरून सरळ मार्गक्रमण करणेच अंतिमत: मानवाच्या हिताचे आहे.

•

प्रतिबिंब १०

# ७ सत्यशोधक मुस्लिम

मार्च बावीस १९७०. महाराष्ट्रात त्या दिवशी एक क्रांतिकारक घटना घडली. मुस्लिम समाजातील एक विचारवंत व लढाऊ कार्यकर्ते हमीद दलवाई यांच्या प्रेरणेने पुण्यात साधना कार्यालयातील आंतरभारती सभागृहात मुस्लिम सत्यशोधक मंडळाची अधिकृतपणे मुहूर्तमेढ रोवण्यात आली. या क्रांतदर्शी घटनेची दोन वैशिष्ट्ये पहिल्या दिवसापासूनच डोळ्यांत भरतात. एक म्हणजे घट्ट पोलादी चौकटीत अडकलेल्या साचेबंद मुस्लिम समाजात, सनातन्यांचा प्रचंड विरोध असूनही काही कार्यकर्ते समाजसुधारणेसाठी जिवाची बाजी लावायला तयार झाले होते. दुसरी गोष्ट म्हणजे या चळवळीचा बाज अस्सल मराठी वळणाचा होता. महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा कृतिशील व परवलीचा शब्द म्हणजे सत्यशोधक. महात्मा जोतिबा फुले यांनी १९ व्या शतकात सत्यशोधक समाजाची स्थापना केली.समाजसुधारणेचा खऱ्या अर्थाने मूलगामी व सर्वंकष विचार त्यांनीच प्रथम मांडला. त्या विचाराशी व त्या चळवळीतील नंतरच्या नेत्यांशी या मंडळाची नाळ स्वाभाविकपणे जोडलेली दिसत होती. भारतातील आणि विशेषत: महाराष्ट्रातील मुस्लिम समाज, धर्माचे आवरण दूर केले तर, येथील बहुजन समाजाचाच अविभाज्य घटक आहे ही ऐतिहासिक वस्तुस्थिती ज्याला माहीत आहे, आणि ती मान्य करण्याची ज्याची तयारी आहे, अशा माणसाच्या मनातच मुस्लिम सत्यशोधक मंडळ हे नाव घर करू शकते. या देशातील हिंदू बाहेर पाहू शकत नाहीत असे प्रभाकर पाध्ये म्हणत त्या वेळी पाकधार्जिण्या मुस्लिमांकडे त्यांना अंगुलिनिर्देश करायचा असे. ज्या मुस्लिमांना या देशाबाहेर पाहण्याची इच्छा नाही, गरज नाही अशा देशी मुस्लिमांनी चळवळीची ही पताका त्या वेळी खांद्यावर घेतली होती. त्यांचा विसावा वर्धापनदिन पुण्यात साजरा होत आहे. गेल्या वीस वर्षांत मंडळाच्या विचारांचा तोच गाभा कायम आहे. तावून सुलाखून तो अधिक झळझळीत झाला आहे.

जगातील सर्व मुसलमान एकच आहेत, असा 'पॅन इस्लामिक' उद्घोष कोणी कितीही केला तरी देश आणि समाज बदलेल त्याप्रमाणे मुस्लिमही वेगळा असल्याचे सत्य कोणी नाकारू शकत नाही. मुस्लिम देशातील मुस्लिम आणि भारतीय मुस्लिम यांत गेल्या तीन-चार दशकांत मोठी दरी निर्माण झाली आहे. सगळं जगच बदलत आहे. 'आधुनिक' होत जाणाऱ्या या जगाकडे मुस्लिम राष्ट्रांनी पाठ फिरविली तर त्यांचे अस्तित्वच धोक्यात येऊ शकते. पाकिस्तान, इराण, इराक, इजिप्त कुठलेही मुस्लिम राष्ट्र घेतले, तर त्या त्या देशांचे सर्व महत्त्वाचे निर्णय 'राष्ट्रवादी' भूमिकेतूनच घेतले जातात. धर्म त्याच्या आड ते येऊ देत नाहीत. मग तो प्रश्न कायद्याचा असो, शिक्षणाचा असो की समाजसुधारणेचा असो. जसा अमेरिकेतील कुठल्याही मुस्लिमाला पत्नीस तोंडी तलाक देता येत नाही, तसा इजिप्तमध्येही नाही. बहुसंख्य भारतीय मुस्लिमांपेक्षा मुस्लिम राष्ट्रांतील बहुसंख्य समाज अधिक प्रागतिक, सुधारणावादी, शिक्षित आणि धर्माच्या चौकटीतही तुलनेने उदारमतवादी आहे. मग भारतातच त्यांची स्थिती अशी का ? त्याला कारण येथील राजकीय नेतृत्व, सत्तारूढ पक्षाचे, आणि विरोधी पक्षाचेही. त्याचबरोबर मुस्लिम समाजातील राजकीय पुढारीही त्याला तेवढेच जबाबदार आहेत. मुस्लिमांकडे पाहण्याचा 'एक गठ्ठा मते' किंवा व्होट बँक हा एकच समान दृष्टिकोण सर्वत्र दिसतो. त्यामुळे राजकीय पक्षांना तात्कालिक फायदा होतही असतो. परंतु देशाचे मात्र कायमचे नुकसान होत असते. राजकीय पक्षांना मुस्लिमांकडे 'माणूस' म्हणून पाहण्याची गरज एक वेळ वाटत नसेल परंतु मुस्लिम नेतृत्वालाही ती का वाटत नाही ? पोलिटिकल कमॉडिटी म्हणून ते आपल्याच समाजाकडे का पाहतात ? त्या दृष्टीनेच सर्व मोर्चेबांधणी का करतात ? ही प्रक्रिया अशीच चालू राहिली तर मुस्लिम पुढारी स्वत:च्या स्वार्थासाठी आपल्या बांधवांना राष्ट्रविहीनतेच्या कड्यापर्यंत घेऊन जातील यात शंका नाही. हा आत्मघात आपण ओढवून घ्यायचा का याचा मुस्लिम समाजाने गंभीरपणे विचार केला पाहिजे. हमीद दलवाई आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आपल्या समाजाला असलेला हा धोका नेमका ओळखला होता, आणि त्या दृष्टीनेच त्यांनी आतापर्यंत काम केले.

अल्पसंख्याकांचे राजकारण हे वर्षानुवर्षे वाजेल असे नाणे नाही. ते करण्यासाठी 'मुस्लिम आयडेंटिटी' ही आजची गरज आहे. परंतु ती आयडेंटिटी प्रस्थापित करताना आपण स्वत:च आपले माणूसपण नाकारतो आहोत, बदलाची स्वाभाविक प्रक्रिया रोखून धरीत आहोत हेही ओळखले पाहिजे. त्यामुळे मुस्लिमत्व टिकेल, परंतु त्याचा चेहरा जंगलात राहणाऱ्या 'केव्हमॅन'सारखा असणार आहे. स्वायत्तताही टिकेल, परंतु तीही जंगलात राहणाऱ्या टोळीसारखी असेल. पाकिस्तान

असो की इराण, कुठलाच मुसलमान भारतीय मुसलमानासारखा दिसणार नाही, आणि त्याला जवळही करणार नाही. दारिद्र्य, बेकारी, मागासलेपणा, निरक्षरता, कर्मठपणा, विषमता, धर्मांधता ही भारतीय मुस्लिमांच्या परिचयाची परिमाणे म्हणून ओळखली जातील. ती स्वीकारार्ह आहेत काय ?

येथे एक भाषेचे उदाहरण घेता येईल. मॉरिशसमध्ये शे-दीडशे वर्षांपूर्वी अनेक मराठी माणसे रोजगारासाठी गेली. आज ते मॉरिशसचे नागरिक आहेत आणि अधिकारावरही आहेत. त्यांनी त्यावेळची मराठी भाषा आणि संस्कृती जतन केली आहे. काही मराठी मंडळींना अलीकडेच भेटण्याचा योग आला. आपली मराठी त्यांना समजू शकत नाही आणि त्यांची मराठी ऐकताना आपण बखर वाङ्मय तर वाचत नाही ना असे सारखे वाटतअसते. कुठल्याही कारणाने का होईना एखादा समूह मुख्य प्रवाहापासून अलग पडला की त्याची ही अवस्था होते. आता नवी मराठी शिकण्यासाठी तेथील मंडळींचे प्रयत्न सुरू आहेत. भारतीय राष्ट्रजीवनाच्या मुख्य प्रवाहापासून अलग पडल्यास मुस्लिम समाजाचेही हेच चित्र राहील.

मुस्लिम जातीयवाद ही हिंदू जातीयवादाची प्रतिक्रिया आहे असे विश्लेषण अनेकदा केले जाते. दोन्ही बाजूंनी ते बरोबरही आहे. परंतु हिंदू जातीयवादी मुख्य प्रवाहापासून स्वत:ला अलग पडू देत नाहीत आणि मुस्लिम नेमके त्याच्या उलटे करतात हा त्यातील फरक आहे. जातीयवादी राजकारण केल्याने हिंदूंचे आणि मुस्लिमांचे सारखेच नुकसान होते हे गणितही बरोबर नाही. मुस्लिमांचीच त्यात जास्त हानी होत राहणार आहे. म्हणून हिंदू जातीयवादाचे उत्तर मुस्लिमांनी वेगळ्या पद्धतीने दिले पाहिजे. प्रागतिक, सुधारणावादी, आधुनिक आणि राष्ट्रवादी भूमिका घेऊनच ते करू शकतील. असे केले तरच त्यांना आपले अस्तित्व आणि मुस्लिमत्वही टिकविता येईल.

धर्माची मूलतत्त्वे चिरंतन असली तरी आचार मात्र परिवर्तनीयच राहिला आहे. हिंदू, ख्रिश्चन, मुस्लिम, बौद्ध वगैरे सर्वच धर्मांचा इतिहास तेच सांगतो. धर्माचे मूलतत्त्व काय आणि अवडंबर काय हे तपासण्याचे, त्यातील भेद स्पष्ट करण्याचे काम तत्त्वचिंतक सातत्याने करीत आले आहेत. इस्लामपेक्षा इतर धर्मांत ते अधिक जोमदारपणे , सर्वंकषपणे झाले. इस्लाममध्येही या प्रक्रियेचा वेग वाढला पाहिजे असे हमीद दलवाई वगैरे मंडळींचे प्रयत्न होते. परंतु मंडळाने ती भूमिका कधीच घेतली नाही. काळाशी सुसंगत असे अगदी मोजके आणि प्राथमिक स्वरूपाचे सामाजिक प्रश्न त्यांनी गेल्या वीस वर्षांत नेटाने मांडले.मुस्लिम समाजातील महिलांवरील अन्याय दूर करण्याला अग्रक्रम मिळत गेला. तोंडी तलाक, बहुपत्नीकत्व, पोटगी यावर आता संपूर्ण जगात कायद्याच्या बाबतीत एकवाक्यता

असताना भारतातच ती नसावी हे तर्कदुष्टपणाचे आहे ही मंडळाच्या कार्यकर्त्यांची स्पष्ट भूमिका आहे. राजकीय फायद्यासाठी सराकरही अन्याय्य गोष्टींच्या पाठीशी उभे राहते याचे त्यांना वैषम्य वाटते. परक्या इंग्रज सरकारलादेखील इथल्या स्त्रियांची दया आली आणि त्यांनी सतीबंदीसारखे कायदे केले. परंतु राजकीय स्वार्थाने अंध झालेल्या सध्याच्या सरकारला येथील मुस्लिम स्त्रीची कणव येत नाही याबद्दल सय्यदभाईसारखे मंडळाचे कार्यकर्ते व्यथित होतात. येथील हिंदूंनी राजकीय मुसलमान व सामान्य मुसलमान असा स्पष्ट भेद करून राजकीय मुसलमानांवरचा राग सामान्य मुस्लिमांवर काढू नये असे ते म्हणतात. 'सेक्युलर' सरकारने राजकारणातीत काम करणाऱ्यांची किंमत वाढविली पाहिजे असा ते आग्रह धरतात. या सर्व गोष्टी रास्त नव्हेत काय ? भूतकाळाच्या जोखडात कायमचे बद्ध करणाऱ्या किंवा भविष्याकडे स्वप्नरंजन म्हणून पाहणाऱ्या वृत्तीचा त्याग करून येथील मुस्लिम समाजाने वास्तववादी भूमिका घेतली पाहिजे. मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे त्यासाठी चालू असलेले प्रयत्न यशस्वी व्हावेत, यासाठी अनेकांच्या शुभेच्छा आहेतच.

•

प्रकरण ८

# साखर सम्राटांची ऐशीतैशी

महाराष्ट्रातील जवळजवळ निम्म्या सहकारी साखर कारखान्यांच्या संचालक मंडळाच्या निवडणुकांचा हंगाम संपला आहे. अनेक कारखान्यांतील साखर सम्राटांची आणि सहकार महर्षींची सद्दी या वेळी संपणार असा अंदाज व्यक्त करण्यात येत होता. पण कऱ्हाडला प्रीती संगमावरच ते काय कृष्णेचे वेगळे रूप दिसले. इतरत्र सहकाराच्या स्वाहाकाराला पंचगंगा, वारणेप्रमाणे पोटात सामावून घेत तिचा प्रवाह समजूतदारपणे पुढे गेला. यशवंतराव आणि वसंतदादा यांच्या रक्षा वाहून नेता नेता कृष्णेतून खूपच पाणी वाहून गेले आहे. हिंदकेसरी पैलवान मारुती माने यांनाही कृष्णाकाठच्या पावट्यातील कुस्ती जमेनासी झाली आहे. 'कृष्णाकाठी कुंडल आता पहिले उरले नाही' हे खरेच. पण तोही आता कवितेतील इतिहास झाला. कृष्णाकाठही आता पहिला उरला नाही. या वास्तवाचे नवे भान या निमित्ताने आले हे या निवडणुकांचे एक वैशिष्ट्य. महाराष्ट्रातील सध्याच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक प्रकृतीचे तापमान सांगण्याचे काम त्यांनी काही प्रमाणात केले. जिल्हा परिषदांच्या निवडणुका झाल्या असत्या तर अधिक व्यापक प्रदेशाचे मोजमाप करता आले असते.

या निवडणुकांच्या निमित्ताने अनेक कारखान्यांतील भ्रष्टाचाराची चर्चा झाली. 'साखर कारखाने म्हणजेच भ्रष्टाचार' हे समीकरण वेगवेगळ्या पद्धतीने मांडून दाखविण्यात आले. भल्या भल्या व्यक्तीही त्यातून सुटल्या नाहीत. ज्यांनी आपली हयात सहकारात घालविली त्या देशभक्त, पद्मश्री, डॉक्टर वगैरे वगैरे पदव्यांनी भूषित रत्नाप्पा कुंभार यांच्यापासून कृष्णेचे शिल्पकार जयंतराव भोसले यांच्यापर्यंत अनेक जणांवर तोफा डागण्यात आल्या. कृष्णेत सत्तांतर झाले. सांगली आणि पंचगंगेत ते झाले नाही. याचा एक अर्थ स्पष्ट आहे. ज्या ठिकाणी ऊसकरी शेतकरी सभासदांना प्रबळ पर्याय मिळाला तेथे त्यांनी तो स्वीकारला. येथे केवळ व्यक्तीचा किंवा तत्त्वांचाच प्रश्न नव्हता. कारखाना चांगला कोण चालवू शकेल हा निकष

महत्त्वाचा. कारण त्यावरच उद्या उसाची किंमत ठरणार. म्हणून शक्यतो बसलेली घडी विस्कटणार नाही आणि शुद्धीकरणाच्या मोहिमेत आपले हितसंबंध धोक्यात येणार नाहीत याला सभासदांनी प्राधान्य दिलेले दिसते. कृष्णेत त्यांना एकाच कुटुंबाची तहहयात सत्ता दिसते, तेथील भ्रष्टाचार दिसतो आणि पंचगंगेत किंवा सांगलीत तो दिसत नाही असे थोडेच आहे ? शेतकऱ्यांना सर्व दिसते, पण आपला फायदाही कळतो. त्यामुळे अनेक कारखान्यांत सत्तारूढ पॅनेलला पुन्हा बहुमत मिळाले असले तरी त्याचा अर्थ लोकांनी त्यांचा भ्रष्टाचार शिष्टाचार मानला असा नाही. म्हणूनच रत्नाप्पाण्णा असोत की प्रकाशबापू, त्यांनी आपापल्या विजयाचा अर्थ नीट समजून घेतला पाहिजे. पंचगंगेत रत्नाप्पाण्णांचे पॅनेल निवडून आल्याने प्रशासकाऐवजी त्यांच्याकडे कारभार सुपूर्त करण्यात यावा असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयानेच दिला आहे. लोकशाही प्रक्रियेशी ते सुसंगतच आहे. पण याचा अर्थ कारखाना संचालकांवरील आरोपपत्र सरकारने मागे घ्यावे ही रत्नाप्पांची मागणी मान्य करण्याचे कारण नाही. कायद्याच्या दृष्टीने जो गुन्हा आहे त्याची चौकशी होऊन गुन्हेगारांना त्याचे योग्य शासन मिळालेच पाहिजे. 'लोक आमच्या बाजूने आहेत म्हणून आमच्या बेकायदा कृत्यांना संरक्षण द्या' या मागणीमागे कोणताही नैतिक विचार नाही. आपल्या बेकायदा कृत्यांची एका प्रकारे ती कबुलीच आहे, तसे नसेल तर 'चौकशीला आमची तयारी आहे, गुन्हेगारांना शिक्षा मिळालीच पाहिजे' अशी 'कर नाही त्याला डर कशाला' भूमिका त्यांनी घ्यायला हवी होती. रत्नाप्पाण्णांच्या विजयातही त्यांचा पराभव दिसतो, तो असा.

गोष्टी इतक्या थराला जाईपर्यंत सरकार गप्प बसते हेच मुळी आश्चर्य आहे. सरकारचे या उद्योगात मोठे भांडवल अडकले आहे हा भाग आहेच. परंतु त्याहीपेक्षा विकासाचा एक पर्यायी नमुना, एक विचारच त्यामुळे बदनाम होतो हे नुकसान मोठे आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ व त्या निमित्ताने होणारे आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण याला सरकारची बांधिलकी असेल तर त्यांनी अशा अपप्रवृत्तींना पाठीशी घालता कामा नये. मुलाची चोरी वेळीच रोखली नाही म्हणून मोठ्या चोरीत शिक्षा झालेल्या मुलाने शेवटी आईचाच कान चावल्याची कथा अगदीच काल्पनिक आहे असे समजण्याचे कारण नाही. सध्याच्या सहकार कायद्यातील अनेक तरतुदींचा सरकार आग्रह धरीत नाही असा आक्षेप आहे. त्यावर सरकारकडे पटेल असे कोणतेही उत्तर नाही. सभासदांच्या लेखी परवानगीने आणि कायद्याची संमती असेल तरच शेतकऱ्याच्या बिलातून कपात करता येईल, असा आदेश अखेर गेल्या वर्षी उच्च न्यायालयाला द्यावा लागला. शासनाचे काम न्यायालयाला करावे लागावे ही नामुष्कीची गोष्ट आहे. या गोष्टी वर्षानुवर्षे सुरू राहिल्या म्हणूनच

जयंतराव भोसले यांचे खासगी ट्रस्ट उभे राहिले. अंतुल्यांच्या खासगी ट्रस्टलाही सरकार दोन दोन कोटी रुपयांची देणगी डोळे झाकून देते, तेथे मुके बिचारे कुणी हाका शेतकऱ्यांचा साखर सम्राटांपुढे काय टिकाव लागणार ? आमची विद्यापीठे अशा लोकांना डॉक्टरेट देण्यासाठी आघाडीवर असतात. भ्रष्टाचाराचे एवढे आरोप असणाऱ्या रत्नाप्पांना पुणे विद्यापीठाने १९८७ मध्ये डी. लिट् दिली. परंतु ऋषितुल्य जीवन जगणाऱ्या एसेम जोशींना देण्याचा ठराव प्रथम मंजूर होत नाही आणि झालाच तर ‘ कुलपती ’ राज्यपाल त्याला परवानगी देत नाहीत अशी विपरीत तऱ्हा आहे.

साखर कारखान्यांच्या या निवडणुकांना राजकीय महत्त्व होतेच. व्यक्तींपुरते पाहायचे तर त्या त्या भागातील राजकीय नेत्यांनी आपले आसन बळकट करण्याचा प्रयत्न केला. माने विरुद्ध गायकवाड किंवा खंजिरे विरुद्ध आवाडे किंवा कोल्हे विरुद्ध काळे किंवा गडाख विरुद्ध विखे अशा तऱ्हेची मोर्चेबंदी जागोजाग होती. परंतु तुरळक अपवाद वगळता गट काँग्रेस अंतर्गत होते. नव्या सभासदांना प्रवेश देताना राजकीय निकषही लावले जातात हे त्याचे कारण. अनेक कारखान्यांना त्यामुळे इंग्लंडमधील युनियनसारखे ‘ क्लोज्ड शॉप ’ चे स्वरूप आले आहे. अनेक ऊस उत्पादकांना त्यामुळे कारखान्याचे सभासद होता येत नाही, तर काही ठिकाणी उत्पादक नसलेलेही (मतदानासाठी) सभासद आहेत. या बिगर सभासदांना कमी भाव द्यायचा आणि त्यांचा ऊस वेळेवर घ्यायचा नाही या नेहमीच्याच युक्त्या. सहकाराचे हे विकृतीकरण आहे. उत्पादक शेतकऱ्यांचे हितसंबंध सुरक्षित राहावेत म्हणून खासगी भांडवलाला शेअर्सच्या रूपातही परवानगी न देण्याचे धोरण सरकारने ज्या उदात्त धोरणाने आखले त्याचा प्रामाणिक ऊस उत्पादक शेतकऱ्यांनाही सदस्यत्व न देऊन कारखान्यांनी दुसऱ्या बाजूने पराभव केला आहे. म्हणायचे सहकारी, पण प्रत्यक्षात ‘ क्लोजली हेल्ड कंपनी ’सारखे स्वरूप त्याला येत असेल तर खासगी कंपन्यांना जे करविषयक धोरण लागू आहे तेच या कारखान्यांनाही लावावे लागेल. ‘ सोशल ऑडिट ’ची तयारी आहे असे किती सहकारी साखर कारखाने महाराष्ट्रात आहेत ? जमशेदपूरच्या ‘ टाटा स्टील ’सारख्या खासगी कारखान्याला जमते ते महाराष्ट्रातील सहकारी क्षेत्राला का जमू नये ? हे कारखाने चालविताना व्यावसायिक कौशल्य असणे आवश्यक आहेच. क्षमतेचा पूर्ण वापर, काटकसर, कार्यक्षमता, या गोष्टी सर्वत्र सारख्याच महत्त्वाच्या आहेत. पण आपण केवळ ‘ नफ्यासाठी ’ एक व्यवसाय करीत नसून ‘ सहकारी चळवळ ’ चालवीत आहोत याचे भान या क्षेत्रातील धुरिणांनी दाखविले पाहिजे. सोशल ऑडिट त्यासाठीच आवश्यक आहे. साखर कारखान्याचे खरे लाभधारक कोण या प्रश्नाचे उत्तर त्यांनी स्वतःच दिले पाहिजे.

वर म्हटल्याप्रमाणे वैयक्तिक राजकीय स्पर्धा या निवडणुकीचे वैशिष्ट्य होतेच. पण मोठ्या राजकीय स्पर्धेचाही भाग त्यात होताच. काँग्रेस त्यात आघाडीवर होती. जोपर्यंत साखर कारखाने व सहकारी सोसायट्या आमच्या बाजूने आहेत तोपर्यंत काँग्रेसला राज्यात पराभवाचे भय नाही, ' हे काँग्रेसचे एक महत्त्वाचे सरचिटणीस व प्रवक्ते विठ्ठलराव गाडगीळ यांचे विधान कोणाला दर्पोक्तीचे वाटले तरी लोकांनी मान्य केलेले सत्यच त्यांनी बटबटीतपणे पुन्हा एकदा सांगितले आहे. संभाजीराव काकडे सांगलीत तळ ठोकून होते. संभाजी पवार त्यांच्या दिमतीस होते. पण 'बंदिस्त मतदार संघात ' प्रवेश मिळणे त्यांच्यासारख्या उलाढाल्या माणसालाही कठीण आहे. मोजके अपवाद वगळता महाराष्ट्रातील ९४ सहकारी साखर कारखान्यांपैकीं जवळजवळ सर्व कारखाने आज काँग्रेसच्या दिमतीला आहेत. या सर्व कारखान्यांची मिळून वार्षिक उलाढाल हजार कोटी रुपयांच्या आसपास आहे. शुगर लॉबीचा प्रभाव महाराष्ट्राच्या राजकारणावर आहेतो उगीच नव्हे. आधी ऊस हेच मुळात राजकीय पीक आहे. ऊसकरी शेतकरी असाल तर राजकीय प्रक्रियेत तुम्ही एका महत्त्वाच्या साखळीचा आपोआप दुवा होता. त्या शिडीवरून वर कसे चढायचे हे ज्याचे त्याचे कौशल्य. यशवंतराव चव्हाणांना राजकारणातून ज्या सहजतेने केंद्रीय नेतृत्वाला बाजूला सारता आले तसे वसंतदादांच्या बाबतीत जमले नाही, याचे कारण दादांच्यामागे ही प्रभावशाली लॉबी एकमुखाने होती. साखर उद्योगातील भल्याबुऱ्या सर्वच गोष्टींचे दादा समर्थन करीत ते उगीच नव्हे. कृष्णेची चौकशी थांबवा हा दादांचा आग्रह वृथा नव्हता आणि पुढे ती खरोखर थांबलीही. दादांच्या निधनानंतर शुगर लॉबीचे नेतृत्व एकमुखाने अद्याप कोणाकडे गेलेले नाही. शरदराव पवार ही त्यांची पहिली नैसर्गिक निवड असेल. पण याबाबत दादांची केवळ कॉपी करून ते यशस्वी होणार नाहीत. मुख्यमंत्रिपदाची धुरा अंगावर घेतल्यानंतर लगेचच सहकारी साखर संघाच्या वार्षिक सभेत त्यांना भाषण करावे लागले होते. त्या वेळी या चळवळीतील सामर्थ्याचा यथार्थ गौरव करीत असतानाच त्यातील अनेक वैगुण्यांचा ठाशीवपणे उल्लेख करायलाही ते विसरले नाहीत. या चळवळीतील दोष दुरुस्त करून ती नेटाने पुढे नेऊनच महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाच्या विकासाचे आव्हान पेलता येईल. चळवळीतील दोष दाखविताना विकासाचा एक पर्यायी मार्ग बंद करण्याची अतिरेकी भूमिका नको. सहकारात निदान निवडणुका आहेत आणि लोकांना हवे असेल तर जयंतराव भोसले काय किंवा रत्नाप्पा काय, त्यांना बदलता येते. वृत्तपत्रांना त्यावर लिहिता येते. पण शेवटी साखर कारखान्यांची मर्यादाही लक्षात ठेवायला हवी. महाराष्ट्रातील सर्व सहकारी साखर कारखान्यांच्या एकत्रित उलाढालीपेक्षा एकट्या अंबानींचे साम्राज्यच कितीतरी प्रचंड आहे. त्यांना

त्यांच्या पदावरून कोणी हटवू शकत नाही आणि त्यांच्याविरुद्ध लिहायचे तर संपादकाला खिशात राजीनामा ठेवूनच हातात लेखणी घ्यावी लागेल. सहकारी चळवळीवर आणि त्यातही साखर कारखान्यांवर टीका करताना म्हणूनच समतोल ठेवणे आवश्यक आहे.

●

प्रकरण १०

# वॉटर लॉबी

आगामी दशकातील महाराष्ट्राचे राजकारण पाण्याच्या प्रश्नावरच पेटणार हे काही एखाद्या ज्योतिषाने वर्तविलेले भविष्य नाही. १९६०मध्ये स.गो. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रासाठी नेमलेला पहिला जलआयोग, १९७२ मधील दुसरा केंद्रीय पाटबंधारे आयोग (अजितप्रसाद जैन आयोग) किंवा १९७९ मध्ये नेमलेली दांडेकर, देशमुख, देऊस्कर समिती या सर्वांच्या अहवालात महाराष्ट्रातील पाण्याच्या दुर्भिक्ष्याचे स्वच्छ प्रतिबिंब उमटले आहे. त्यामुळे ही दुर्मिळ गोष्ट आपल्याच शेतात जिरावी यासाठी संघर्ष अटळ आहे. किंबहुना तो यापूर्वीच सुरू झाला आहे. 'शुगर लॉबी' हे पाणी लॉबीचेच दुसरे नाव आहे. महाराष्ट्रातील निम्म्यापेक्षा जास्त पाणी उसासाठीच वापरले जाते. बारमाही उपलब्ध पाटपाण्यापैकी किमान साठ टक्के पाणी उसासाठी वापरले जाते, उसाखाली जेमतेम चार टक्के क्षेत्र आहे आणि ही चार टक्के जमीन केवळ दोन टक्के लोकांच्या मालकीची आहे हा माजी केंद्रीय शेती राज्यमंत्री अण्णासाहेब शिंदे यांचा अंदाज ( अंदाजच बांधायचा, कारण ऊस आणि पाण्याची उपलब्ध आकडेवारी फसवी आहे.) रास्त मानला तर या संघर्षाला भूमी किती अनुकूल आहे हे स्पष्ट होते. साडेतीन टक्क्यांच्या संस्कृतीविरुद्ध लक्ष्मण माने यांनी केलेल्या विधानावर पूर्वी खळबळ माजली होती. इथे तर ही टक्केवारी दोनपर्यंत खाली आहे. २ टक्के विरुद्ध ९८ टक्के हा संघर्ष अधिक तीव्र होऊ शकतो. संस्कतिसंघर्षासारखा तो केवळ प्रतीकात्मक नाही. तो आहे थेट हितसंबंधांचा. लढाईची सुरुवात झालीही आहे. आठमाही विरुद्ध बारमाही हे त्यातीलच एका पर्वाचे नाव आहे. बारमाहीवाल्यांचा आतापर्यंत तरी विजय झाल्याचे दिसते आहे. महाराष्ट्राचे राजकारण यशस्वीपणे करायचे तर शुगर लॉबीवर घट्ट पकड हवी. ज्यांना ते जमले नाही ते महाराष्ट्राच्या मुख्य राजकीय प्रवाहातून नेहमीच बाजूला फेकले गेले. दिल्लीच्या राजकारणात यशाच्या एकापेक्षा अनेक पायऱ्या चढलेल्या भल्या-भल्यांनाही उसाच्या चिपाडावरून चालण्याची कसरत

जमली नाही. 'देल्ही तो नजदिक है, लेकिन मुंबई फार लांब आहे' हे त्यांच्या वाट्याला आलेले राजकीय सत्य आहे. मग ते शंकरराव चव्हाण असोत, वसंतराव साठे असोत की आणखी कोणी. अगदी यशवंतराव चव्हाण आज राजकारणात असते तरीही शुगर लॉबीच्या सहकार्याशिवाय त्यांना पूर्वीसारखे यश मिळाले नसते. ते मुख्यमंत्री होते तेव्हा महाराष्ट्रात पंधरा-सोळाच सहकारी साखर कारखाने होते. आज त्यांची संख्या शंभराच्या घरात आहे.

पाण्यावरून होऊ घातलेला हा संघर्ष जवळ येत चालला आहे याची जाणीव विद्यमान मुख्यमंत्री शरद पवार यांना प्रकर्षाने झाली असावी असे त्यांच्या अलीकडच्या एका भाषणावरून वाटते. ना.धों. महानोर यांच्या 'शेतीसाठी पाणी' या पुस्तकाचे प्रकाशन आठ-पंधरा दिवसांपूर्वी पुण्यात त्यांनी केले. महाराष्ट्रात सिंचनाखाली जास्तीत जास्त किती क्षेत्र येऊ शकेल, याविषयी बर्वे आयोगाचा निष्कर्ष आतापर्यंत प्रमाण मानला जातो. पाटबंधाऱ्याच्या सर्व योजना पूर्ण केल्या व भूगर्भातील पाणी कमाल विहिरी खणून हस्तगत केले तरी महाराष्ट्रात जास्तीत जास्त ३० टक्के लागवडयोग्य क्षेत्राला पाणी मिळू शकेल हा तो अंदाज. पाणी मिळविण्यासाठी नव-नव्या पद्धतींचा अवलंब केला तर ही टक्केवारी वाढू शकेल हा त्यांचा विश्वास. एकीकडे उसाचे पाणी कमी न करता, म्हणजे विद्यमान लाभधारकांना न दुखावता, परंपरागत पद्धतीने पाणी न मिळणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा त्यांचा तो प्रयत्न असेल. कारण महानोर यांनी नालाबांध घालून, पावसाचे पाणी जमिनीत जिरवून व विहिरींद्वारा त्याचा उपसा करून, सिंचनाच्या आधुनिक पद्धती वापरून, अपारंपरिक पिके घेऊन शेती फायदेशीर करण्याची आशा टवटवीत केली आहे. 'शेतीसाठी पाणी' हे 'प्रेस्टीज'ने प्रकाशित केलेले पुस्तक म्हणजे महानोर यांच्या शेतीतील यशस्वी प्रयोगांची एक डायरीच आहे. नव्या पाटबंधारे योजना सुरू करायला हातात पैसा नाही. चालू पाटबंधारे प्रकल्पांचे कामही उपळब्ध पैसा या सर्व कामांवर विभागला गेल्याने वेगाने पूर्ण होऊ शकत नाही, उपलब्ध पाण्यावरील हक्क सोडायला सध्याच्या लाभधारकांचा तीव्र विरोध आहे. पावसाचे वेळापत्रक बिघडले आहे. यामुळे महाराष्ट्रतील जादा जमिनीला खात्रीशीर पाणीपुरवठा करायचा असेलच तर वैयक्तिक जबाबदारीवर किंवा गावपाततळीवर 'पाणी आडवा, पाणी जिरवा' यांसारख्या योजनांचा पुरस्कार करण्याशिवाय पर्याय दिसत नाही. पाण्याअभावी झालेली कोंडी फोडण्यासाठी पाणीपुरवठ्याचे शास्त्रशुद्ध व्यवस्थापन आणि अपारंपरिक पीकपद्धत हा एक मार्ग आहे. महानोर त्या वाटेने गेले आणि मुख्यमंत्री त्याचा पुरस्कार करताहेत. तथापि महानोरांची वाट चांगली असली तरी ती पाऊलवाट आहे. महाराष्ट्राचे पाण्याचे

प्रश्न अधिक गंभीर आणि जटिल आहेत. ते सोडवायचे तर महामार्गानेच गेले पाहिजे. प्रसंगी शासकीय धोरणांचा रोड रोलरही वापरला पाहिजे. त्याशिवाय मुक्कामाचे ठिकाण येणार नाही. तिथे जायचे तर केवळ शेतकऱ्यांबद्दल सहानुभूती असून चालणार नाही. राजकीय निर्धाराचीही आवश्यकता आहे. पुन्हा हा निर्धार एकट्या दुकट्याचा असून चालणार नाही. तो सत्तारूढ पक्षाचा, सरकारचा लागेल. सध्याच्या सत्तारूढ पक्षाचा कणा म्हणजे पुन्हा शुगर लॉबी. त्यामुळे आपल्या हितसंबंधावर पाणी सोडून पाण्याच्या धोरणात मूलभूत बदल करण्यास संमती मिळेल अशी आशा करणे भोळसटपणाचे ठरेल. त्यात बाजारातील साखरेची टंचाई आणि पाच लाख टन साखर आयात करण्याचा केंद्र सरकारचा ताजा निर्णय लक्षात घेतला तर कोणाचे पारडे जड आहे हे लक्षात येईल. त्यामुळे नजीकच्या काळात तरी महाराष्ट्रातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी पाणी वाटपाबाबत व पीक पद्धतीबाबत मूलभूत व क्रांतिकारक राजकीय निर्णय घेण्याऐवजी तंत्रवैज्ञानिक उपायांचाच पुरस्कार केला जाईल असे दिसते. महानोर यांचे प्रयोग त्या अंगाने जाणारे आहेत. सद्यःस्थितीत त्यांचे पुस्तक उपयुक्त आहे ते याच कारणासाठी.

तथापि महाराष्ट्रातील शेतीचे प्रश्न सोडविण्यासाठी तंत्रविज्ञान आवश्यक असले तरी केवळ तेवढ्यानेच सर्व प्रश्नांची उकल होत नाही. त्यासाठी आर्थिक, राजकीय, सामाजिक अभियांत्रिकी, व्यवस्थापकीय, पर्यावरणीय अशा सर्व बाजूंचा सामग्र्याने व एकत्रित विचार करून दीर्घ पल्ल्याचे धोरण ठरवावे लागेल आणि त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी लागेल. महाराष्ट्रातील शेतीच्या प्रश्नांचे स्वरूप सरकारच्या किंवा तज्ज्ञांच्या लक्षात आलेले नाही असे नाही. त्यांच्या अंमलबजावणीत येणारे राजकीय आणि वित्तीय अडथळे व अडचणी पार करण्यात आलेले अपयश हेच खरे आपले अपयश आहे. या विषयांसंबंधी अलीकडे जी पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत त्यात हे विविध दृष्टिकोण व्यक्त झाले आहेत. महानोर यांच्या आधी प्रकाशित झालेली अण्णासाहेब शिंदे, डॉ. सुलभा ब्रह्मे, दत्ता देसाई यांची पुस्तके घ्या किंवा अगदी १९६१ मध्ये प्रसिद्ध झालेले दाभोळकरांचे 'महाराष्ट्रातील दुष्काळ व त्यावरील उपाययोजना' हे पुस्तक घ्या. महाराष्ट्रातील शेतीच्या प्रश्नांचे विश्लेषण अनेकवार झालेले आहे. शेतीमालाला रास्त भाव मिळाला पाहिजे, असे अग्रही प्रतिपादन व त्यासाठी संघर्ष शरद जोशींनी व त्यांच्या शेतकरी संघटनेने केला. त्याची सैद्धान्तिक मांडणीही ते उत्तम करतात. चा.अ. दाभोळकर यांनी याच स्वरूपाचे प्रतिपादन १९६०-६१ मध्ये सारांशरूपाने केले आहे. महाराष्ट्रातील दुष्काळाचे खरे कारण अवर्षण नसून महाराष्ट्रीय शेतकऱ्यांचे दारिद्र्य आहे. शेतीत गुंतविण्यास त्यांच्याकडे भांडवल नाही आणि आज कर्ज

काढून ते घातले तर त्याची परतफेड होत नाही. कारण शेतीमालाला रास्त किंमत नाही. शेतीत श्रम करूनही त्याचे फळ मिळत नाही. 'कमीत-कमी श्रम व कमीत कमी भांडवल याचा वापर करण्याची सक्ती त्याच्यावर केली जात आहे. त्याच्यावर सक्तीची बेकारी लादली जात आहे.' असे त्यांचे प्रतिपादन आहे. ९० टक्के शेतकऱ्यांची आजही तीच स्थिती आहे. महाराष्ट्राचा भौगोलिक विस्तार प्रचंड असला तरी लागवडीखालील जमिनीचे क्षेत्र मर्यादितच आहे. (सुमारे २ कोटी म्हणजे ६० टक्के) त्याची प्रतही चांगली नाही. त्यातील ८५ ते ९०टक्के क्षेत्र आज स्वातंत्र्याच्या ४० वर्षांनंतरही केवळ कोरडवाहू आहे. कुटुंबाकडे जमीन मर्यादित, तिचा मगदूर सामान्य (निम्म्या शेतकऱ्यांकडे तर एक हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे.) त्यावर अवलंबून असणाऱ्यांची संख्या जास्त, पाणी नाही, भांडवल घालण्याची ताकद नाही, घातलेल्या भांडवलाची परतफेड अशक्य, त्यामुळे वाढलेला कर्जबाजारीपणा, जमिनीचे हस्तांतर या साखळीत येथील शेतकरी शतकानुशतके अडकला आहे. महात्मा फुले यांनी ज्या शब्दांत या शेतकऱ्यांची कैफियत शंभर वर्षांपूर्वी मांडली होती त्यात निर्णायक बदल आजही झालेला नाही. शहरीकरणाची प्रक्रिया महाराष्ट्रात फार वेगाने घडत आहे. देशात याबाबत महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आहे. महाराष्ट्रात नागरी भागात राहणाऱ्यांचे प्रमाण ३५ टक्के आहे. 'आम्ही किती सुधारलो आहोत.' हे सांगण्यासाठी या आकडेवारीचा कधी-कधी उपयोग केला जातो. वस्तुस्थिती अशी आहे की, ग्रामीण भागातून शहराकडे नोकऱ्यांच्या शोधात जाणाऱ्या लोकांचे लोंढे वाढले हा याचा अर्थ आहे. शेतीवर उदरनिर्वाह होत नाही म्हणून शहरात येऊन कागद व भंगार गोळा करणाऱ्यांची आणि झोपडपट्टीत राहणाऱ्यांची ही संख्या आहे. मुंबईतील निम्मे तर पुण्यातले ४० टक्के लोक आज झोपडपट्टीत राहतात. त्यांतील बहुतांश शेतीवरून परिस्थितीमुळे हाकलले गेलेले छोटे शेतकरी आणि शेतमजूर आहेत हे लक्षात घेतले पाहिजे.

ओलिताच्या क्षेत्रात वाढ झाल्याशिवाय आणि शेतीचे आधुनिकीकरण केल्याशिवाय महाराष्ट्रातील शेतीचे प्रश्न सुटणार नाहीत असे अण्णासाहेब शिंदे यांचे ठाम प्रतिपादन आहे. धरणयोजना होऊन पाण्याची उपलब्धता वाढली तरी उद्योगीकरण व शहरीकरणालाच हे पाणी लागेल, त्यामुळे शेतीसाठी मर्यादितच पाणी आहे. ते कार्यक्षमतेने वापरले पाहिजे, त्यासाठी ठिबकसारख्या आधुनिक पद्धती वापरल्या पाहिजेत असे ते म्हणतात. अण्णासाहेबांनी एक झगझगीत सूचना केली आहे. ती म्हणजे उसाला केवळ ठिबक पद्धतीनेच पाणी देण्याची सक्ती करणे. त्यामुळे पाण्यात बचत तर होईलच, पण उसाचे एकरी उत्पादन वाढेल

आणि जमिनीही खराब होणार नाहीत. ठिबकसाठी लागणारी साधनसामग्री शेतकऱ्यांना रास्त किंमतीत कशी मिळेल ते मात्र पाहावे लागेल. उसाखालील क्षेत्र मर्यादित करण्याऐवजी आहे त्याच पाण्याचा कार्यक्षमतेने वापर केला तर अधिक जमीन ओलिताखाली येऊ शकते व उसाचेही उत्पन्न वाढू शकते. उसाकडे शेतीमाल म्हणून पाहण्याऐवजी कच्चा औद्योगिक माल म्हणून पाहिल्याशिवाय या सुधारणा होणार नाहीत.

'महाराष्ट्रातील दुष्काळ' या पुस्तकात दत्ता देसाई यांनी दुष्काळ केंद्रीभूत धरून महाराष्ट्रातील शेती व पाण्याच्या प्रश्नाची विस्ताराने व साधार चर्चा केली आहे. आजच्या आर्थिक,सामाजिक चौकटीत दुष्काळ निर्मूलनासाठी परिणामकारक उपाययोजना शक्य नाही असे त्यांचे प्रतिपादन आहे. गेल्या तीस-चाळीस वर्षांत हा प्रश्न सुकर होण्याऐवजी जास्त गुंतागुंतीचा झाला, हे लक्षात घेता त्यांचे म्हणणे अमान्य करता येणे कठीण आहे. पाटबंधाऱ्यातील आजवरच्या एकूण गुंतवणुकीपैकी आज फक्त २० टक्के गुंतवणुकीइतक्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळत आहे. अनेक योजना अर्धवट अवस्थेत आहेत आणि त्यावरील गुंतवणुकीचे फळ पदरात पडायला आणखी किती तरी वर्षे लागणार आहेत. लोकांच्या दबावामुळे किंवा खरे तर राजकारणातील दबावाचा किंवा प्रलोभनाचा एक भाग म्हणून सरकारला अनेक योजनांना मान्यता द्यावी लागते. त्यांच्यासाठी अल्पस्वल्प तरतूद करावी लागते व हा पैसा अडकून पडतो हे मुख्यमंत्र्यांनीही परवा सरळ सांगितले. लोकशाहीत हे असेच घडणार, असेही ते म्हणाले. समतोल विकासाचे तत्त्व ताणले की कोणाचाच विकास नाही अशी विकृती निर्माण होते हे पाटबंधारे योजनांवरून स्पष्ट होते. १९६० मध्ये महाराष्ट्र सरकारने बर्वे आयोग नेमला. १९६२ मध्ये त्याचा अहवाल प्रसिद्ध झाला. १९६४ मध्ये सरकारने त्यातील शिफारसी स्वीकारल्याचे जाहीर केले. १९८० पर्यंत महाराष्ट्रातल्या पाटबंधाऱ्यांच्या सर्व महत्त्वाच्या योजना पूर्ण कराव्यात अशी त्यांची शिफारस होती. १९८० संपून आता दहा वर्षे होत आली तरी जेमतेम ३५ टक्के योजना पूर्ण झाल्या आहेत. या योजनांचा खर्च आता एवढा वाढला आहे की त्या पूर्ण करण्यासाठी सध्याच्या वेगाने आणखी पन्नास वर्षेदेखील लागतील. तोपर्यंत आंतरराज्य लवादानुसार महाराष्ट्राने हे पाणी वापरण्याचा हक्कसुद्धा गमावलेला असेल. यापुढे मोठ्या योजना हाती घ्यायला अग्रक्रम द्यायचा नाही, अशी केंद्रसरकारची भूमिका आहे.

अनेक योजना मंजुरीसाठी दिल्लीत पडून आहेत. त्यांना परवानगी मिळाली तरी त्यासाठी पैसा उपलब्ध होण्याची शक्यता नाही. म्हणून खोरेनिहाय छोटे, मोठे बंधारे बांधून पाणी अडविण्याचा प्रयत्न लोकांनी केला पाहिजे. लोकविज्ञान संघटनेने

काढून ते घातले तर त्याची परतफेड होत नाही. कारण शेतीमालाला रास्त किंमत नाही. शेतीत श्रम करूनही त्याचे फळ मिळत नाही. 'कमीत-कमी श्रम व कमीत कमी भांडवल याचा वापर करण्याची सक्ती त्याच्यावर केली जात आहे. त्याच्यावर सक्तीची बेकारी लादली जात आहे.' असे त्यांचे प्रतिपादन आहे. ९० टक्के शेतकऱ्यांची आजही तीच स्थिती आहे. महाराष्ट्राचा भौगोलिक विस्तार प्रचंड असला तरी लागवडीखालील जमिनीचे क्षेत्र मर्यादितच आहे. (सुमारे २ कोटी म्हणजे ६० टक्के) त्याची प्रतही चांगली नाही. त्यातील ८५ ते ९०टक्के क्षेत्र आज स्वातंत्र्याच्या ४० वर्षांनंतरही केवळ कोरडवाहू आहे. कुटुंबाकडे जमीन मर्यादित, तिचा मगदूर सामान्य (निम्म्या शेतकऱ्यांकडे तर एक हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे.) त्यावर अवलंबून असणाऱ्यांची संख्या जास्त, पाणी नाही, भांडवल घालण्याची ताकद नाही, घातलेल्या भांडवलाची परतफेड अशक्य, त्यामुळे वाढलेला कर्जबाजारीपणा, जमिनीचे हस्तांतर या साखळीत येथील शेतकरी शतकानुशतके अडकला आहे. महात्मा फुले यांनी ज्या शब्दांत या शेतकऱ्यांची कैफियत शंभर वर्षांपूर्वी मांडली होती त्यात निर्णायक बदल आजही झालेला नाही. शहरीकरणाची प्रक्रिया महाराष्ट्रात फार वेगाने घडत आहे. देशात याबाबत महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आहे. महाराष्ट्रात नागरी भागात राहणाऱ्यांचे प्रमाण ३५ टक्के आहे. 'आम्ही किती सुधारलो आहोत.' हे सांगण्यासाठी या आकडेवारीचा कधी-कधी उपयोग केला जातो. वस्तुस्थिती अशी आहे की, ग्रामीण भागातून शहराकडे नोकऱ्यांच्या शोधात जाणाऱ्या लोकांचे लोंढे वाढले हा याचा अर्थ आहे. शेतीवर उदरनिर्वाह होत नाही म्हणून शहरात येऊन कागद व भंगार गोळा करणाऱ्यांची आणि झोपडपट्टीत राहणाऱ्यांची ही संख्या आहे. मुंबईतील निम्मे तर पुण्यातले ४० टक्के लोक आज झोपडपट्टीत राहतात. त्यांतील बहुतांश शेतीवरून परिस्थितीमुळे हाकलले गेलेले छोटे शेतकरी आणि शेतमजूर आहेत हे लक्षात घेतले पाहिजे.

ओलिताच्या क्षेत्रात वाढ झाल्याशिवाय आणि शेतीचे आधुनिकीकरण केल्याशिवाय महाराष्ट्रातील शेतीचे प्रश्न सुटणार नाहीत असे अण्णासाहेब शिंदे यांचे ठाम प्रतिपादन आहे. धरणयोजना होऊन पाण्याची उपलब्धता वाढली तरी उद्योगीकरण व शहरीकरणालाच हे पाणी लागेल, त्यामुळे शेतीसाठी मर्यादितच पाणी आहे. ते कार्यक्षमतेने वापरले पाहिजे, त्यासाठी ठिबकसारख्या आधुनिक पद्धती वापरल्या पाहिजेत असे ते म्हणतात. अण्णासाहेबांनी एक झगझगीत सूचना केली आहे. ती म्हणजे उसाला केवळ ठिबक पद्धतीनेच पाणी देण्याची सक्ती करणे. त्यामुळे पाण्यात बचत तर होईलच, पण उसाचे एकरी उत्पादन वाढेल

आणि जमिनीही खराब होणार नाहीत. ठिबकसाठी लागणारी साधनसामग्री शेतकऱ्यांना रास्त किंमतीत कशी मिळेल ते मात्र पाहावे लागेल. उसाखालील क्षेत्र मर्यादित करण्याऐवजी आहे त्याच पाण्याचा कार्यक्षमतेने वापर केला तर अधिक जमीन ओलिताखाली येऊ शकते व उसाचेही उत्पन्न वाढू शकते. उसाकडे शेतीमाल म्हणून पाहण्याऐवजी कच्चा औद्योगिक माल म्हणून पाहिल्याशिवाय या सुधारणा होणार नाहीत.

'महाराष्ट्रातील दुष्काळ' या पुस्तकात दत्ता देसाई यांनी दुष्काळ केंद्रीभूत धरून महाराष्ट्रातील शेती व पाण्याच्या प्रश्नाची विस्ताराने व साधार चर्चा केली आहे. आजच्या आर्थिक,सामाजिक चौकटीत दुष्काळ निर्मूलनासाठी परिणामकारक उपाययोजना शक्य नाही असे त्यांचे प्रतिपादन आहे. गेल्या तीस-चाळीस वर्षांत हा प्रश्न सुकर होण्याऐवजी जास्त गुंतागुंतीचा झाला, हे लक्षात घेता त्यांचे म्हणणे अमान्य करता येणे कठीण आहे. पाटबंधाऱ्यातील आजवरच्या एकूण गुंतवणुकीपैकी आज फक्त २० टक्के गुंतवणुकीइतक्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळत आहे. अनेक योजना अर्धवट अवस्थेत आहेत आणि त्यावरील गुंतवणुकीचे फळ पदरात पडायला आणखी किती तरी वर्षे लागणार आहेत. लोकांच्या दबावामुळे किंवा खरे तर राजकारणातील दबावाचा किंवा प्रलोभनाचा एक भाग म्हणून सरकारला अनेक योजनांना मान्यता द्यावी लागते. त्यांच्यासाठी अल्पस्वल्प तरतूद करावी लागते व हा पैसा अडकून पडतो हे मुख्यमंत्र्यांनीही परवा सरळ सांगितले. लोकशाहीत हे असेच घडणार, असेही ते म्हणाले. समतोल विकासाचे तत्त्व ताणले की कोणाचाच विकास नाही अशी विकृती निर्माण होते हे पाटबंधारे योजनांवरून स्पष्ट होते. १९६० मध्ये महाराष्ट्र सरकारने बर्वे आयोग नेमला. १९६२ मध्ये त्याचा अहवाल प्रसिद्ध झाला. १९६४ मध्ये सरकारने त्यातील शिफारसी स्वीकारल्याचे जाहीर केले. १९८० पर्यंत महाराष्ट्रातल्या पाटबंधाऱ्यांच्या सर्व महत्त्वाच्या योजना पूर्ण कराव्यात अशी त्यांची शिफारस होती. १९८० संपून आता दहा वर्षे होत आली तरी जेमतेम ३५ टक्के योजना पूर्ण झाल्या आहेत. या योजनांचा खर्च आता एवढा वाढला आहे की त्या पूर्ण करण्यासाठी सध्याच्या वेगाने आणखी पन्नास वर्षेदेखील लागतील. तोपर्यंत आंतरराज्य लवादानुसार महाराष्ट्राने हे पाणी वापरण्याचा हक्कसुद्धा गमावलेला असेल. यापुढे मोठ्या योजना हाती घ्यायला अग्रक्रम द्यायचा नाही, अशी केंद्रसरकारची भूमिका आहे.

अनेक योजना मंजुरीसाठी दिल्लीत पडून आहेत. त्यांना परवानगी मिळाली तरी त्यासाठी पैसा उपलब्ध होण्याची शक्यता नाही. म्हणून खोरेनिहाय छोटे, मोठे बंधारे बांधून पाणी अडविण्याचा प्रयत्न लोकांनी केला पाहिजे. लोकविज्ञान संघटनेने

प्रकाशित केलेल्या डॉ. सुलभा ब्रह्मे यांच्या पुस्तकात त्याची शिफारस करण्यात आली आहे. महानोर यांनीं त्यांच्या परिसरात या पद्धतीने, 'पाणी आडवा, पाणी जिरवा' घोषणेला साजेल असे नालाबांध घालून कमी पाणी लागणारी पिके घेऊन किंवा तंत्रवैज्ञानिक पद्धतीने पाण्याचे नियोजन करून यश मिळविले आहे. सध्याची चौकट बदलणे, त्यासाठी लढा उभारणे, पाणी ही सामाजिक संपत्ती आहे आणि तिचा वापर समन्यायी पद्धतीने व्हावा या सर्व गोष्टी तत्त्वतः मान्य केल्या तरी आज आपण स्वतःच्या हिमतीवर काय करू शकतो हेही महत्त्वाचे आहे. महानोर यांचे हे पुस्तक त्यासाठी 'गाईड'प्रमाणे उपयोगी पडणारे आंहे.

या पुस्तकात महानोरांची एक कविता आहे.

पक्ष्यांचे लक्ष थवे
गगनाला पंख नवे
वाऱ्यावर गंधभार
भरलेले ओचे

त्यात बदल करून म्हणता येईल.

बांधांचे लक्ष थवे
भूमीला झरे नवे
जमिनीवर जलभार
भरले हे ओचे.

•

प्रकरण १०

# आर्थिक अरिष्टात महाराष्ट्र

दरवर्षी फुगत जाणाऱ्या महाराष्ट्राच्या वार्षिक योजनेत या वर्षी एकदम दोनशे कोटी रुपयांची घट झाली आहे. अर्थशास्त्र न कळणाऱ्या ग्यानबाला अर्थमंत्र्यांच्या तथाकथित 'वस्तुनिष्ठ' दृष्टिकोणातील मेख कशी समजणार हा प्रश्नच आहे. महाराष्ट्र आर्थिक संकटातून जात आहे असे सरळ म्हणण्याऐवजी १९९०-९१ची वार्षिक योजना वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून तयार केली आहे.' अशी सहकार सम्राटी शंकरावगुंठित मखलाशी आचार्य सुशीलकुमारजींनी केली आहे. वास्तविक या आर्थिक अरिष्टाची व त्यामागच्या कारणांची स्पष्ट कल्पना लोकांना विश्वासात घेऊन द्यायला हवी. परंतु निवडणूक जाहीर झाली असताना अशा मूलभूत प्रश्नांना हात घालणाऱ्यांवर राजकीय सुज्ञपणा नसल्याचा आरोप होण्याची शक्यता आहे. सुशीलकुमार शिंदे यांनी ती लक्षात घेतली असावी. परंतु राज्यातील आर्थिक प्रश्नांची चर्चा निवडणुकीत करायची नाही तर केव्हा ? सर्वच पक्षांचे जाहीरनामे आता तयार होतील. त्यांत वारेमाप आश्वासने असतील. ती पूर्ण कशी करणार, असा प्रश्न मतदारांनी विचारला तर त्यात चूक काय ?

महाराष्ट्राच्या योजनेत या वर्षी दोनशे कोटी रुपयांची कपात झाली याचा एक अर्थ स्पष्ट आहे. तो म्हणजे योजनाबाह्य खर्च सतत वाढत आहे. परंतु सरकारचे उत्पन्न आणि उत्पन्न मिळविण्याचे मार्ग मर्यादित झाले असल्याने योजनाबद्ध विकास कामांसाठी पुरेशी तरतूद करण्याइतका पैसा सरकारपाशी नाही. दरडोई कराचा विचार केला तर महाराष्ट्राचा देशात पहिला क्रमांक आहे. यापेक्षा जास्त कर देण्याची क्षमता आता लोकांमध्ये नाही. यापुढे कराचे प्रमाण वाढविले तर त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ होण्याऐवजी ( करचुकवेपणाला प्रोत्साहन मिळून ) घटच होण्याची शक्यता आहे. वैयक्तिक करांबाबत हे जसे खरे आहे तसे उद्योग-व्यवसायांच्या बाबतीतही. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात करांचे प्रमाण बरेच जास्त असल्याने राष्ट्रीय बाजारपेठेत, किमतीत स्पर्धा करता येत नाही म्हणून

अनेक नवे उद्योग इतर राज्यांत गेले ही ( उद्योगमंत्र्यांनी नाकारली तरी ) वस्तुस्थिती आहे. गुजराथ आणि कर्नाटक ही त्याची उदाहरणे आहेत. नव्या वाहनांची नोंदणी करताना भरावयाच्या कराबाबत ही विषमता फार वाढली तर काय होते याचा अनुभव ताजा आहे. पुण्यात तयार होणारी जड व हलकी मालवाहू वाहने नोंदणीसाठी गोव्यात जाणार आणि नोंदल्यावर पुन्हा पुण्यात येणार अशी स्थिती निर्माण झाली. त्यावर पुन्हा प्रवेशकर बसवून ही पळवाट शेवटी बंद करावी लागली.याचा अर्थ करांच्या बाबतीत इतर राज्यांशी, विशेषतः शेजारच्या राज्यांशी तुलना करूनच, अंतिमतः आतबट्ट्यांचे ठरणार नाही, असे धोरण स्वीकारावे लागेल. करवाढीऐवजी करदात्यांचा विचार करणे हे त्यावरचे एक उत्तर आहे. शेतीउत्पन्नावर कर बसवून ते साध्य करता येईल असे काही अर्थतज्ज्ञांचे मत आहे. परंतु हे वाटते तेवढे सोपे नाही. अशा तऱ्हेचे उत्पन्न ठरविण्यात अनेक अडचणी आहेत आणि ते गोळा करणे प्रशासकीय दृष्टीने खर्चिक आहे असा दुसरा एक मतप्रवाह आहे.अपवाद वगळता बहुतेक शेती तोट्यात आहे, याविषयी अर्थतज्ज्ञांत मतभेद असले तरी शेतीतज्ज्ञांत एकमत आहे. शिवाय शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी व्हायला हवी ती उलट वाढतच आहे. ग्रामीण भागातून शहरी भागाकडे जाणारे लोंढे आज शेतीमुळे काही प्रमाणात तरी थोपविले जातात,त्यांत प्रचंड वाढ होईल, शहरीकरणाचा वेग आजच महाराष्ट्रात सर्वाधिक आहे. ३५ टक्के नागरिक शहरी भागात राहतात. याचा अर्थ महाराष्ट्राचा विकास फार वेगाने होत आहे असा नसून; शेतीवर भागेनासे झाल्याने लोक नोकरी-धंद्यासाठी शहराकडे धाव घेताहेत असा आहे. आणखी दहा वर्षांनी महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्येपैकी निम्मे लोक झोपडपट्ट्यांत राहणारे असतील असा एक खूप हातचे राखून केलेला अंदाज आहे. या झोपडपट्ट्यांचे 'निर्मूलन' करण्याचा मूळ प्रस्ताव होता. त्यात बदल करून 'झोपडपट्ट्या सुधारण्याचे' नवे धोरण आले. पुढे झोपडपट्ट्या सुधारणेही अशक्य होणार आहे. छोटे शेतकरी व लहान कारागिरांचे दहा हजार रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. माजी अर्थमंत्री शंकरराव चव्हाण यांच्यापासून अनेक अर्थतज्ज्ञांचा केवळ 'आर्थिक' कारणासाठी त्याला विरोध आहे. (महाराष्ट्र सरकारचामात्र नाही.) संपूर्ण अर्थव्यवस्थाच यामुळे कोलमडेल, अशी कारणमीमांसा त्यासाठी पुढे करण्यात येते. परंतु सरकारपुढे दोनच पर्याय आहेत : अर्थव्यवस्था मोडलेली पहायची की समाजव्यवस्था ?

ही कर्जे माफ केली नाहीत तर वसूल कशी करणार याचे उत्तर कोणापाशी नाही. बहुसंख्य कर्जबाजारी लोकांकडे स्वतःच्या कष्टाशिवाय देण्यासाठी दुसरे काही

नाही. त्यांना रोजगार मिळण्याचा हक्कही द्यायचा नाही आणि कर्जही वसूल करायचे असा दुहेरी दट्ट्या त्यांच्यामागे लावणाऱ्यांनी हे लोक कर्जबाजारी कसे झाले याचाही अभ्यास करावा. काम न करताही पगार घेणाऱ्यांनी किंवा कामा पेक्षाजादा पगार घेणाऱ्यांनी एक प्रकारे सरकारचे कर्जच घेतले आहे, त्याची परतफेड होणार नाही हे लक्षात घेऊन हिशोब केला तर तो आकडा चौदा हजार कोटी रुपयांपेक्षा कितीतरी जास्त असेल. याचा अर्थ आधीच अन्याय झालेल्या असंघटित व ग्रामीण भागावर थेट करांचा नवा बोजा टाकणे शक्य नाही. (अप्रत्यक्ष करांचा बोजा कमी व्हावा म्हणून त्यांची क्रयशक्ती दयाळूपणे आपण कमी करीत आहोतच. जेणेकरून उपभोग्य वस्तू त्यांना घेता येऊ नयेत आणि त्यामुळे त्यांवरील करही द्यावे लागू नयेत.) मुंबई-ठाणे-पुणे यांसारखे मोजके औद्योगिक पट्टे सोडले तर महाराष्ट्रातील बहुसंख्य जनता इतर राज्यांतील जनतेप्रमाणेच गरीब आहे.त्यामुळे सरकारी मदतीच्या हाताशिवाय ते जगूच शकणार नाहीत. त्यांना मदत करायची तर रोजगार दिला पाहिजे आणि सबसिडीही दिली पाहिजे. आंध्र, कर्नाटक, तामिळनाडू या राज्यांमध्ये १९७७ नंतर सत्ताबदल झाल्यानंतर अशा 'सबसिडी'चे प्रमाण बरेच वाढले. त्यामुळे (राजकीय कारणासाठी का होईना ) महाराष्ट्रातही ते वाढणे अपरिहार्य होते. (गेल्या वर्षी २२ लाख कुटुंबियांना स्वस्तात साडीचोळी देण्यात आली. त्यासाठी सहा कोटी रुपये खर्च आला.) योजनाबाह्य खर्चात वाढ होते आहे. त्यामागे शेतीसाठी वीजदरातील सवलतींपासून रेशनवरील धान्यांपर्यंत अनेक कारणे आहेत. पंजाब व हरियाना खालोखाल दरडोई उत्पन्न असणाऱ्या (१९८६-८७ मध्ये ३७९३ रुपये ) महाराष्ट्रात (दरडोई सोडाच) लक्षावधी कुटुंबाचे उत्पन्नही तीन हजार नाही ही वस्तुस्थिती आहे. एकीकडे उद्योगांची भरभराट दिसत असली तरी दुसरीकडे विषमतेची दरीही प्रचंड वाढत आहे.त्यामुळे सबसिडी किंवा योजनाबाह्य खर्च (अपरिहार्यपणे) वाढतो आहे. योजनेत दोनशे कोटी रुपये कपात करताना अर्थमंत्र्यांनी हे सांगायला हवे.

अनेक प्रकल्पांतील गुंतवणुकीवर पुरेशी परतफेड होत नाही हे महाराष्ट्राच्या (इतर अनेक राज्यांप्रमाणेच) आर्थिक दुरवस्थेचे एक कारण आहे. पाटबंधारे प्रकल्प हे त्याचे एक उदाहरण आहे. अनेक प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण झाले नाहीत, त्यामुळे त्यांच्या खर्चात प्रचंड वाढ, त्यामुळे आस्थापनावरील खर्चात वाढ आणि प्रत्यक्ष लाभ मिळण्यास विलंब झाल्यामुळे भांडवल केवळ गुंतून पडले, याचा राज्याच्या तिजोरीवर केवढा बोजा पडला असेल याची कल्पनाच केलेली बरी. महाराष्ट्रातील अनेक पाटबंधारे प्रकल्प केंद्राकडे मंजुरीसाठी अद्याप पडून आहेत हे खरे असले तरी परवानगी मिळालेले प्रकल्प वर्षानुवर्षे पूर्ण झालेले नाहीत या

वस्तुस्थितीकडेही डोळेझाक करता येणार नाही. महाराष्ट्रातील सर्व धरणप्रकल्प पूर्ण केले तर जास्तीत जास्त ५० लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल असा अंदाज आहे. सात पंचवार्षिक योजना संपल्या तरी अद्याप निम्मे उद्दिष्टही पूर्ण झालेले नाही. कृष्णा खोऱ्यातील सर्व प्रकल्प इ.स. २००० पर्यंत पूर्ण केले पाहिजेत असा आंतरराज्य लवादाचा निर्णय होता. याच गतीने काम चालू राहिले तर ते केवळ अशक्य आहे. वार्षिक योजनेत पाटबंधारे प्रकल्पांसाठी ४४१ कोटी रुपये ठेवण्यात आलेआहेत. तो आकडा जास्त वाटत असला तरी सहा हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त वार्षिक अर्थसंकल्प असणाऱ्या राज्यात ४४१ म्हणजे दहा टक्के सुद्धा नाही. ४४१ कोटी रुपयांत एखादाच मध्यम धरणप्रकल्प पूर्ण होऊ शकतो. याच वेगाने सर्व धरणे पूर्ण होण्यासाठी किती वर्षे लागतील याचा अंदाज करता येईल. महाराष्ट्राला यापुढे पाणी लागणार आहे ते केवळ शेतीसाठी नाही. औद्योगिक विकासासाठी आणि त्यामुळे वाढणाऱ्या शहरांसाठीही. महाराष्ट्रात आज जेमतेम दहाबारा टक्के जमीन ओलिताखाली आहे. त्यापैकी निम्मी विहिरींच्या पाण्यावर भिजते. म्हणजे पाच ते सहा टक्के जमीनच पाटबंधाऱ्यांखाली आहे आणि त्यासाठी गेल्या तीस वर्षांत अंदाजे तीन हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. जी स्थिती पाण्याची तीच विजेची. म्हणूनच ऊर्जाविकासास सर्वाधिक प्राधान्य या वेळी दिले आहे.

महाराष्ट्राचे उत्पन्नाचे मार्ग मर्यादित होत आहेत आणि जास्त खर्च योजनाबाह्य कामांवर होत आहे. अशा वेळी केंद्राकडून मिळणारी साधनसामग्री महत्त्वाची ठरते. परंतु राज्यांना मिळणाऱ्या केंद्राच्या वाट्यात दिवसेंदिवस घटच होत चालली आहे. अलीकडे केंद्राच्या १०० रुपयांतील फक्त ३० रुपये राज्यांना मिळतात. नियोजन मंडळाने अलीकडे जे सूत्र स्वीकारले त्यानुसार तर स्वतःच्या बळावर साधनसामग्री गोळा करणाऱ्या राज्यांना उत्तेजन मिळण्याऐवजी त्यांच्या केंद्रीय मदतीचा हात आणखीनच आखडून घेतला जातो. महाराष्ट्राने आपली योजना या वेळी दोनशे कोटी रुपये कमी केली, त्यामागे हेही एक कारण नसेल ना ? नववा अर्थआयोग, सरकारिया आयोगाचा अहवाल आणि राज्यांना अधिक वाटा मिळाला पाहिजे, या केंद्रातील राष्ट्रीय आघाडीच्या धोरणाचा संकलित परिणाम कसा दिसतो ते लवकरच कळणार आहे. परंतु ही विषमता किती तीव्र आहे याचे मुंबई हे उत्तम उदाहरण आहे. मुंबईसाठी केंद्र सरकारने आगामी आर्थिक वर्षात ७५ कोटी रुपयांची तरतूद करावी अशी याचना महाराष्ट्र सरकारने वार्षिक योजना मांडताना केली. १९८५ मध्ये राजीव गांधींनी शंभर कोटी रुपये देण्याची घोषणा केली. १९९० पर्यंत ते सर्वच मिळाल्याचे दिसत नाही. प्रत्यक्षात मुंबई हे दिल्लीसारखेच (किंबहुना

त्यापेक्षाही जास्त) अखिल भारतीय शहर आहे. या शहराची भरमसाट वाढ झालेली आहे. ती रोखण्याचे अधिकार राज्य सरकारला नाहीत. मुंबईचे नागरी जीवन असह्य झालं आहे. पाणी, ड्रेनेज, रस्ते, वाहतूक, झोपडपट्ट्या असे असंख्य प्रश्न आहेत. या शहरातून केंद्र सरकारला वर्षाला सात हजार कोटी रुपये कराचे उत्पन्न मिळते. परंतु त्या शहराच्या स्वास्थ्यासाठी मागितले किती तर जेमतेम ७५ कोटी, अंडी देणाऱ्या कोंबडीला, ती मरू नये म्हणून निदान रोगप्रतिबंधक लस तरी टोचली जाते. मुंबईच्या बाबतीत केंद्राने एवढीही काळजी घेऊ नये ? मुंबईच्या किमान गरजा भागवायच्या तर दोन हजार कोटी रुपये तरी हवेत. त्यातील शंभर कोटी रुपये राजीव गांधींनी मेहरबानी म्हणून पाच वर्षांत दिले !

महाराष्ट्र आर्थिक संकटात तर आहेच, परंतु मधल्या काळातदिल्लीत राजकीय वजन घटल्याने (किंवा न वाढल्याने) राजकीय संकटातही आहे. एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यातून बाहेर पडण्यासाठी राजकीय कौशल्य हवे, तसाच आर्थिक सूज्ञपणाही हवा. मूलभूत उद्योगांत खासगी भांडवलाची गुंतवणूक हा त्यांपैकी एक भाग, पश्चिम बंगालमधील गाजलेल्या, तीन हजार कोटींच्या हलदिया पेट्रो-केमिकल्स प्रकल्पात टाटांना २५ टक्के भागीदारी देण्याचा निर्णय डावे कम्युनिस्ट सरकार घेते; (त्यांनी अजून युरोपमधील घटनांचे स्वागत केलेले नाही. किंवा स्टालीनलाही मोडीत काढले नाही !) तर मग महाराष्ट्र का घेऊ शकत नाही ? वीजनिर्मिती, रस्ते बांधणी, वाहतूक, मूलभूत उद्योग यांसारख्या क्षेत्रात खासगी क्षेत्रात भांडवल अंशत: आले. (जसे ते इतर अनेक क्षेत्रात आहेच.) तर सरकारच्या तिजोरीवरील भार थोडासा कमी होईल. आज सरकार स्वत:ही अनेक गोष्टी करू शकत नाही व इतरांनाही प्रवेश नाही, ही कोंडी संयुक्त प्रकल्पांमुळे काही अंशी फुटू शकेल.

•

३०३९ २६३८६ १५/५/१९९१

प्रतिबिंब १०

# पंचतारांकित पर्यटन

वरसगाव पर्यटन केंद्राचे उद्घाटन आता खुद्द मुख्यमंत्री शरद पवारच करणार आहेत. सहा मेस क्रीडामंत्री श्यामराव अष्टेकर यांच्या हस्ते हा समारंभ होणार होता. परंतु धरणग्रस्तांनी स्पष्टपणे व्यक्त केलेल्या तीव्र भावना लक्षात घेऊन समारंभ रद्द करावा लागला होता. यानिमित्ताने जे लोकमत प्रातिनिधिकपणे व्यक्त झाले ते विचारात घेतल्याशिवाय मुख्यमंत्र्यांनाही पुढे जाता येणार नाही. महाराष्ट्रात पर्यटनाचा एक उद्योग म्हणून विकास करण्याचे सर्वंकष धोरण प्रथमच आखले गेले आहे. याआधीही पर्यटन होते, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळही आहे, पण दोन्हींचे स्वरूप बरेचसे हौसी होते. उत्पन्न आणि रोजगार उपलब्ध करून देण्याच्या सरकारी धोरणाचा एक भाग म्हणून त्याचा निरंतर पाठपुरावा कधी केला नाही. लोकसंख्या आणि बेकारी या देशापुढील आजच्या सर्वांत उग्र समस्या आहेत. राजकीय आणि सामाजिक स्थैर्य राखायचे असेल तर आर्थिक घडामोडींचा वेग वाढविला पाहिजे. त्यासाठी आतापर्यंत दुर्लक्षित राहिलेल्या काही क्षेत्रांचा सध्याचे राज्य सरकार प्राधान्याने विचार करीत आहे. नव्या मुख्यमंत्र्यांनी याबाबत विशेष आग्रह धरलेला दिसतो. शाम्पू आणि ब्लेडस्, सोडा आणि लेमन किंवा टी.व्ही. आणि फ्रीजमध्ये अडकून पडणारे खासगी भांडवल जर मूलभूत उद्योगात आले तर पायाभूत सोयी निर्माण होतील आणि मधल्या काही वर्षांत तुंबलेल्या किंवा एककल्ली झालेल्या आर्थिक विकासाचा वेग वाढू शकेल. जाहिरातीच्या जोरावर लोकांमध्ये कृत्रिम गरजा निर्माण करून त्या भागविण्यासाठी ठराविक वस्तूंच्या उत्पादनात आपले औद्योगिक आणि व्यावसायिक कौशल्य वाया घालविण्यापेक्षा रस्ते, पूल, वीजनिर्मिती, दळणवळण, संदेशवहन अशा क्षेत्रात खासगी भांडवल आणता आले तर ते योग्यच होईल. सार्वजनिक क्षेत्रासाठी 'कोअर सेक्टर' राखून ठेवण्याचा निर्णय त्यावेळी योग्य होता. कारण अशा कामांचे पुरेसे नियोजन सुरुवातीच्या काळात आवश्यक होते. शिवाय या क्षेत्रात नफ्याचे प्रमाण कमी

असल्याने खासगी क्षेत्रालाही त्याचे आकर्षण नसावे, आता स्वातंत्र्यानंतर गेल्या ४० वर्षांत खासगी भांडवल आपल्याला हवे तसे नियंत्रित करण्याचा अनुभव सरकारला आला नसेल तर अजबच म्हणायचे ! त्यामुळे महाराष्ट्रासारख्या एखाद्या राज्याने जरा वेगळा प्रयत्न जरूर करून पहावा. दहा वर्षांपूर्वी टाटांना औष्णिक वीजनिर्मितीचा परवाना देऊन सरकारने या मार्गावर पहिले पाऊल टाकले. मधल्या काळात शिक्षणाच्या क्षेत्रात, विशेषत: व्यावसायिक शिक्षणाच्या क्षेत्रातही खासगी संस्थांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर वाढला. इंजिनिअरिंग आणि मेडिकल कॉलेजांची सरकारी मक्तेदारी संपुष्टात आली. शिक्षणासारख्या नाजूक समजल्या जाणाऱ्या क्षेत्रात अपरिहार्यपणे हे घडते आहे तर मग रस्ते वगैरेंना विरोध कशासाठी ? मिश्र अर्थव्यवस्था आपण पहिल्यापासूनच स्वीकारली आहे. त्याचा अर्थ खासगी भांडवलाने 'कंझ्युमेरिझम' वाढवायचा आणि सरकारने तोट्यात चालणारे उद्योग करून त्यांना 'इन्फ्रास्ट्रक्चर' उभारून द्यायचे असा नव्हे !

शिवाय या सगळ्यांचा संबंध येतो तो रोजगाराशी, नोकऱ्यांशी. गेल्या पाच-सहा वर्षांत पुण्या-मुंबईतील एकाही मोठ्या कारखान्यात रोजगाराची संधी वाढली नाही. कारखान्यांचे आधुनिकीकरण होत जाईल तशी ही संधी कमी-कमी होत जाणार. त्यामुळे सगळा भार पडतो सरकारावर. शून्याधारित अर्थसंकल्प तयार करणार म्हटल्यावर सरकारी सेवेतील नोकऱ्यांवर गदा आली. खासगी ठिकाणी नोकऱ्यांच्या प्रमाणात वाढ नाही आणि सरकारनेही नोकरभरतीला कात्री लावली तर लोकांनी जायचे कुठे ? की सरकारने केवळ कारकुनांच्या जागा वाढवीत जायचे ? रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कल्पकतेने धोरण आखण्यास म्हणून प्राधान्य द्यायला हवे. पर्यटन हा त्याचा एक मार्ग होऊ शकतो. काही पाश्चात्य देशात उत्पन्नाचे ते प्रमुख साधन आहे. इटलीतील ५० टक्के उत्पन्न पर्यटनातून येते. हवाई बेट तर केवळ पर्यटनावर जगते. भारतात काश्मीरचे उदाहरण सर्वांना माहीत आहेच. कर्नाटक, केरळ, तामिळनाडू या राज्यांनीही पर्यटनाला चांगला वाव दिला आहे. बंगलोर-म्हैसूर ही शहरे तर पर्यटकांची पंढरीच समजली जातात. गोवा त्याच्या समुद्रकिनाऱ्यासाठी प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रात यापैकी कशाचीच उणीव नाही. मग आपण याचा योग्य उपयोग का करून घेऊ नये ? कोवालमसारखा 'बीच' कोकणात नाही का ? वृंदावन गार्डनसारखी बाग महाराष्ट्रात एखाद्या धरणाच्या शेजारी होऊ शकत नाही काय ? उटीसारखं, क्विन ऑफ द हिल स्टेशन म्हणता येईल असं ठिकाण सह्याद्रीवर नाही का ? पेरियार, बंडीपूर किंवा मधुमलाईसारखं अभयारण्य महाराष्ट्रात नाही का ? हे सर्व आहे. फक्त प्रवाशांना आकर्षित करून घेण्याचं, त्यासाठी ती ती ठिकाणं योग्य प्रकारे

विकसित करण्याचं धोरण हवं. दिल्लीत गेलं की देशातील सर्व राज्यांची पर्यटन कार्यालये दिसतात. महाराष्ट्राचा अपवाद सोडून. त्यामुळे धोरण म्हणून महाराष्ट्राच्या या निर्णयाचं स्वागतच करायला हवं. परंतु तरीही एक धोक्याची सूचना द्यायला हवीच. सिगरेटच्या पाकिटावर जशी कायद्याने द्यावी लागते तशी ! 'सिगरेट ओढणे आरोग्याला अपायकारक आहे.' त्याप्रमाणे 'पंचतारांकित पर्यटन या व्यवसायाला मारक आहे.' केवळ पैसा उधळणाऱ्या, चंगीभंगी व दारूकाम करणाऱ्या लोकांच्या मागे लागलात तर व्यवसायाची विश्वासार्हता आणि प्रतिष्ठाच लोप पावेल. 'पर्यटक कोण ?' या प्रश्नाचे उत्तर स्पष्टपणे मिळाले पाहिजे आणि ज्या सोयी-सुविधा निर्माण होतील त्यात त्याचे प्रतिबिंबही पडले पाहिजे. परदेशी पर्यटकांबाबत आपले प्रचंड गैरसमज असतात. 'फाईव्ह स्टार' फॅसिलिटीजच्या तोही मागे नसतो आणि बहुसंख्य परदेशी पर्यटकांना त्या परवडतही नाहीत. वाय.एम.सी.ए. सारख्या ठिकाणी राहून ही मंडळी मग आनंद लुटतात. युरोप-अमेरिकेत प्रवास करणेही (पंचतारांकित) भारताच्या मानाने स्वस्त पडते. देशी लॉर्डसूचं अर्थाच सगळंच वेगळं असतं.

खडकवासला, पानशेत व वरसगाव या धरणांच्या परिसरात पर्यटनाला वाव देण्यास कोणाचा तात्त्विक विरोध नाही. ज्यांचा विरोध आहे तो वेगळ्याच कारणासाठी. परंतु ती कारणे महत्त्वाची आहेत आणि शासनाने त्याकडे लक्ष दिलेच पाहिजे. या भागातील मंडळी मुख्यत्वे धरणग्रस्त आहेत. सर्वांचेच समाधानकारक पुनर्वसन झालेले नाही. आंबे आणि मोसे खोऱ्यातील अनेक गावांना मी स्वत: भेटी दिल्या आहेत. त्यांच्या जीवनाची कळाच गेलेली आहे. चांगली जमीन गेली. त्याच्या बदल्यात वर्षानुवर्षे चालू राहील असे उत्पन्नाचे साधन हाताशी नाही. रस्ते नाहीत, आरोग्याच्या सोयी नाहीत, बाजारहाट नाही, नोकऱ्या नाहीत, दळण-वळणाची साधने नाहीत. शाळेत जाण्यासाठी मैलोन-मैल जावे लागते. जंगल तुटले आहे. वीज नाही. जळणाची सोय नाही. अशा असंख्य अडचणी सहन करीत हे लोक कशीबशी गुजराण करताहेत. पुण्याचा विकास झाला, पण ज्यांचे पाणी पुणेकर पितात त्यांची हालत आहे तशीच आहे. पानशेत आणि वरसगावचा अपवाद नव्हे. महाराष्ट्रातील सर्वच प्रकल्पग्रस्तांची ही स्थिती आहे. त्यांचे पुनर्वसन हा त्या योजनेचाच एकसंध भाग कधी नव्हता. विस्थापित होणारे लोक म्हणजे विकासातील धोंड, देशासाठी त्यांनी त्याग केलाच पाहिजे ही उर्वरित समाजाची, नोकरशाहीची धारणा होती. राजकीय नेतृत्वाने तो समज आपल्या कामाने दूर करण्याचा प्रयत्न केला नाही. नर्मदेवरील सरदार सरोवर धरणामुळे विस्थापित होणाऱ्या लोकांच्या पुनर्वसनासाठी गुजरात सरकारने किमान कागदोपत्री

आकर्षक योजना आखली, पण ती केवळ जागतिक बँकेच्या अटींमुळे. या अटींचे पालन होईलच याची खात्री नाही. भीमाशंकरच्या अभयारण्यामुळे उठणाऱ्या गावातील आदिवासींचे असो की डिंभे धरणामुळे उठणाऱ्या शेतकऱ्यांचे, समाज त्यांचा सहानुभूतीने, त्यांचा हक्क म्हणून विचार करीत नसेल तर त्यांनाही तुमच्या योजनांशी सोयरसुतक असणार नाही. परवाच्या वरसगाव प्रकरणात विरोध करणाऱ्यांपैकी जि. प. सभासद लक्ष्मणराव पासलकर गेली दहा वर्षे हेच सांगताहेत. ते लक्ष्मणराव नव्हते, लक्ष्मणच होते तेव्हा त्यांच्याशी झालेल्या चर्चेतील हा मुद्दा माझ्या एका लेखात दहा वर्षांपूर्वीच आला आहे. विषयही तोच आहे, पानशेत परिसरात पर्यटनाचा विकास करता येईल का, हा!

पुणे म्हणजे 'लेक डिस्ट्रिक्ट ऑफ महाराष्ट्र' आहे. त्याचा जरूर त्या दृष्टीने विचार व्हावा. पण हा विचार 'लोकानुवर्ती' असावा. त्या भागाचे पावित्र्य, लोकसंस्कृती आणि लोक यांवर आक्रमण होणार नाही याची हमी त्यांना कोणीतरी दिली पाहिजे. या भागात जमिनीच्या विक्रीचे प्रचंड व्यवहार झाले आहेत. रविवारी तर जमिनी शोधण्यासाठी पुणे-मुंबईकडील गाड्यांची रीघ लागलेली असते. दोन नंबरचा पैसा जमिनीत मोठ्या प्रमाणावर मुरतो आहे. वर्षा-दोन वर्षांत जमिनीचे भाव दुप्पट होताहेत. खरेदीदार कोण आहेत आणि हे कशासाठी यात एवढे पैसे गुंतवताहेत? व्यवहार तांत्रिकदृष्ट्या कायदेशीर असले तरी ते रास्त आहेत का? पैशाच्या प्रलोभनापासून या शेतकऱ्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी पालक म्हणून शासनावर आहे की नाही? आधी धरणग्रस्त होतेच, त्यांना आता धनिकग्रस्त होण्यापासून वाचवले पाहिजे. मुख्यमंत्री येणार म्हणून लोक त्यांच्या स्वागतासाठी तयारी करताहेत. परंतु त्यांच्या मनातील प्रश्न ओठावर येतीलच असे नव्हे. ते मनकवड्याप्रमाणे ओळखून मुख्यमंत्र्यांनी त्यांची उत्तरे, जी लोकांच्या बाजूची असतील दिली पाहिजेत.

•

प्रकरण १२

# वैधानिक विकास की राजकीय विभाजन ?

महाराष्ट्रासाठी वैधानिक विकास मंडळे स्थापन करण्याची कल्पना अखेर केंद्र सरकारने स्वीकारली आहे. पंतप्रधान विश्वनाथप्रताप सिंग यांनीच, अगदी ४४ व्या स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर, ही घोषणा केल्याने त्याबाबत आता संदेह राहिला नाही. विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी विकास मंडळे स्थापन करण्याची तरतूद घटनेच्या ३७१ (२) या कलमान्वये करण्यात आली आहे. त्या तरतुदीची अंमलबजावणी करावी असा एकमुखी ठराव महाराष्ट्र विधिमंडळाने २६ जुलै १९८४ रोजी केला होता. वसंतदादा पाटील त्या वेळी मुख्यमंत्री होते आणि शंकरराव चव्हाण केंद्रात मंत्री होते. या मंडळाच्या स्थापनेमुळे लोकनियुक्त विधिमंडळाचे व त्याला जबाबदार असणाऱ्या मंत्रिमंडळाचे अधिकार कमी होतील, राज्यपालांना विशेषाधिकार दिल्यामुळे समांतर सत्ताकेंद्र निर्माण होईल, त्यातून घटनात्मक पेचप्रसंगही निर्माण होईल असे प्रतिपादन अनेक राजकीय विचारवंतांनी केले होते. काही काळ केंद्रात गृहमंत्री असलेले शंकरराव चव्हाण यांचाही, ते मराठवाड्याचे असूनही, अशा मंडळांच्या स्थापनेला विरोध होता. त्यांच्या प्रभावामुळेच केंद्रीय काँग्रेस सरकारने आपल्या कारकीर्दीत अशा तऱ्हेच्या मंडळांच्या स्थापनेला पाठिंबा दिलेला नव्हता. आता मात्र, विधिमंडळाने ठराव केल्यानंतर तब्बल सहा वर्षांनी आणि केंद्रात काँग्रेसची सत्ता जाऊन राष्ट्रीय आघाडीचे सरकार अधिकारावर आल्यानंतर वैधानिक विकास मंडळांची कल्पना स्वीकारण्यात आली आहे. या मंडळांचे स्वरूप कसे असेल हे स्पष्ट झालेले नाही. राष्ट्रपतींचा अध्यादेश निघेपर्यंत त्याला अंतिम स्वरूप आले आहे असेही समजता येणार नाही. एक मात्र खरे आहे. ते म्हणजे मंडळांचे स्वरूप कसेही असले तरी महाराष्ट्राच्या राजकारणाला कलाटणी देणारा हा निर्णय आहे. विदर्भ व मराठवाड्याचा विकासातील अनुशेष या 'आर्थिक' कारणामुळे मंडळांची स्थापना होणार असली तरी त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकीय ऐक्याला आव्हान मिळाल्याशिवाय राहणार नाही. विदर्भ

व मराठवाड्यासाठी वैधानिक विकास मंडळांद्वारे जादा आर्थिक तरतूद उपलब्ध झाल्यानंतर महाराष्ट्राचे ऐक्य वाढणार की त्याच्या विभाजनाची प्रक्रिया सुरू होणार हा कळीचा प्रश्न आहे.

महाराष्ट्राच्या राजकीय ऐक्याबद्दल साशंकता निर्माण करायला लावणाऱ्या या वैधानिक विकास मंडळांची घटनात्मक तरतूद झाली तरी कशी ? मराठी भाषकांचे एक राज्य व्हावे यासाठी देण्यात आलेली ती किंमत आहे. १९५६ मध्ये राज्य पुनर्रचना होऊन विदर्भाचा मुंबई राज्यात समावेश करण्यातआला तेव्हाच यासंबंधी घटनेत तरतूद करण्यात आली. त्याला पार्श्वभूमी आहे ती १९५६ च्या आधीच्या प्रांतरचनेची. राज्यांची त्या वेळी अ, ब अशी वर्गवारी होती आणि ब दर्जाच्या राज्यांच्या प्रशासनाबाबत राष्ट्रपतींना विशेष अधिकार देणारे ३७१ वे कलम होते. १९५६ मध्ये भाषिक राज्ये अस्तित्वात आली आणि ब दर्जाची राज्ये नाहिशी झाली. परंतु या राज्यांवर नव्या व्यवस्थेत अन्याय होऊ नये म्हणून त्यांच्यासाठी वेगळ्या विकास मंडळांची तरतूद करणारे ३७१ (१) व ३७१(२) हे कलम घालण्यात आले. मुळात पंजाब व तेलंगणासाठी ही विशेष तरतूद करण्यात आली होती. द्वैभाषिक मुंबई राज्यात विदर्भाचा समावेश करण्यात आला त्या वेळी विदर्भासाठीही अशा प्रकारचे स्वतंत्र विकास मंडळ असण्याची तरतूद घटनेत करण्यात यावी असा आग्रह संसदेत विदर्भातील प्रतिनिधींनी धरला. महाराष्ट्रातील इतर खासदारांनी त्याला पाठिंबा दिल्यानंतर तशी घटनादुरुस्ती करण्यात आली. प्रत्यक्षात विदर्भ 'ब' दर्जाचे राज्य नव्हते. किंबहुना प. महाराष्ट्रापेक्षा विदर्भ आर्थिकदृष्ट्या संपन्नच होता. महाराष्ट्रात गेल्याने उलट आपली आर्थिक हानीच होईल अशी सर्वसाधारण भावना होती. राज्य पुनर्रचना मंडळाने स्वतंत्र विदर्भ राज्याची शिफारस केलेली असूनही, नागपूर ही मध्यप्रांताची राजधानी असताना व स्वतंत्र विदर्भाची मागणी १९०५ इतकी जुनी असतानाही, संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेसाठी, मराठी भाषकांच्या ऐक्यासाठी विदर्भाने जो राजकीय त्याग केला त्याबद्दल कृतज्ञतेच्या भावनेने आश्वासन म्हणून घटनेतील ही विकास मंडळाची तरतूद करण्यात आली. त्यासाठीच उर्वरित महाराष्ट्राने त्याला पाठिंबा दिला. पुढे १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाल्यानंतर निझामी राजवटीतील मराठवाडा महाराष्ट्रात आला. महाराष्ट्राबरोबर भावनिक ऐक्य साधण्याची मराठवाड्यातील नागरिकांची स्वाभाविक ऊर्मी होती. तिला प्रतिसाद म्हणून, घटनेतील या तरतुदीत मराठवाड्याचाही समावेश करण्यात आला. त्याउप्पर, राज्याच्या सर्व भागांच्या समन्यायी विकासाचे आश्वासन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी १९६० मध्ये दिले. इतकेच नाही तर मराठवाडा व विदर्भाला झुकते माप मिळेल असा विश्वासही

प्रकट केला. त्या वेळची ती राजकीय अपरिहार्यता होती. प्रत्यक्षात झाले काय ? विकास योजनांवर महाराष्ट्र सरकारने जो खर्च केला त्यात विदर्भ व मराठवाड्याला झुकते माप सोडाच, पैशाचे समन्यायी वाटपही झाले नाही. 'अनुशेष' निश्चित करण्यासाठी नेमलेल्या प्रा. वि.म. दांडेकर यांच्या समितीच्या निष्कर्षाबाबत, विशेषत: अनुशेषाच्या आकड्यांबाबत, काहींचे मतभेद असले तरी त्यांनीही विदर्भ व मराठवाड्यात विकास कामांवर 'समन्यायी' खर्च झाला नाही, अर्थसंकल्पात आणि पंचवार्षिक योजनांत त्यासाठी पुरेशी तरतूद करण्यात आलेली नाही हे नि:संदिग्धपणे मांडले आहे. विकास मंडळे स्थापून विदर्भ व मराठवाड्याचा विकास होईल काय अशी शंका अनेकांनी व्यक्त केली असली तरी, मंडळांविना तो झालेला नाही याविषयी मात्र सर्वांचे एकमत आहे. नियोजन व राजकीय प्रक्रियेचे हे अपयश आहे. नेमके त्यावर बोट ठेवून वैधानिक मंडळांची मागणी पुढे आली आहे. वैधानिक विकास मंडळांचा प्रयोग देशात कुठेही यशस्वी झालेला नसताना विदर्भ व मराठवाड्यासाठी हीच कल्पना राबविण्याची मागणी केली जाते याचे कारण दुसरा कोणताही 'विश्वासार्ह' पर्याय पुढे दिसत नाही.

वैधानिक विकास मंडळांची कल्पना प्रत्यक्षात आणण्यात अनेक राजकीय व घटनात्मक अडचणी आहेत. राज्यपालांचे अधिकार नेमके कोणते, ते कसे वापरणार, मंत्रिमंडळ व राज्यपाल यांच्यातील संबंधांचे स्वरूप कसे राहणार वगैरे अनेक प्रश्न आहेत. त्यांची आज केवळ कल्पनाच करता येते. प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या वेळीच त्यांचे खरे स्वरूप उघड होईल. मात्र लोकशाही प्रक्रियेला शह देणारी आणि विधिमंडळाचे अधिकार कमी करणारी ही गोष्ट आहे. 'संसद सार्वभौम आहे' या तत्त्वाला हरताळ फासणारी ही तरतूद आहे. केंद्राकडून राज्यांना मिळणाऱ्या उत्पन्नाच्या बाबतीतही हे समन्यायाचे तत्त्व वापरले जात नाही. ती तशी व्हावी यासाठी राष्ट्रपतींना विशेष अधिकार देणारी तरतूद घटनेत समाविष्ट करावी असा प्रस्ताव कोणी मांडला तर त्याचे स्वागत कसे होईल ? तशी तरतूद घटनेत करण्याऐवजी केंद्र व राज्य यांचे संबंध ठरविणारी राजकीय प्रक्रिया अखंडपणे सुरू आहे. गाडगीळ सूत्र किंवा सरकारिया आयोग ही त्याची रूपे आहेत. त्यामुळेच मागासलेल्या राज्यांना केंद्रांकडून विशेष अनुदान मिळते. राज्यांतर्गत विभागांच्या विकासासाठीही अशाच तऱ्हेचे सूत्र राज्य पातळीवर विकसित होणे हा यातला सर्वोत्तम पर्याय झाला असता. राज्याची स्वायत्तता टिकून राहिली असती. केंद्राचा हस्तक्षेप टळला असता. आजचे चित्र खव्याच्या पोळीसाठी भांडणाऱ्या दोन मांजरींनी न्याय निवाडा करण्यासाठी वानराकडे जाण्यासारखे आहे. त्यामुळे विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील सौहार्द संपून संशयाचे वातावरण निर्माण होईल.

प्रादेशिक अस्मिता कमी होण्याऐवजी वाढत जाईल. वैधानिक विकास मंडळे प. महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा यांच्यातील सीमारेषा ठळक करीत जाईल. पैशाचे या तऱ्हेने समन्यायी वाटप भावनिक अंतर वाढवीत जाईल. प्रादेशिक अलगता ही देशाच्या ऐक्यालाही पूरक ठरणारी नाही. एकसंध महाराष्ट्र हीच एकसंध देशाची ग्वाही आहे.

विकास ही फार व्यापक प्रक्रिया आहे. भांडवल गुंतवणूक आणि तीही केवळ सरकारी गुंतवणूक ही मात्र मर्यादित गोष्ट आहे. केंद्र सरकारचे आर्थिक व औद्योगिक धोरण उदार होत असताना केवळ शासकीय पैशावर विकास होण्याची कल्पना आता स्वप्नरंजनासारखीच ठरणार आहे. राज्यपाल हे केवळ उपलब्ध निधीचे वाटप करणार. तो निधी कसा उभा करायचा हा विधिमंडळाचा व मंत्रिमंडळाचा अधिकार. जास्त साधनसामग्री गोळा करण्याच्या राजकीय इच्छाशक्तीलाच वैधानिक विकास मंडळामुळे लगाम बसणार नाही हे कशावरून ? विदर्भाच्या विकासासाठी प. महाराष्ट्रातील उद्योगांवर अधिक कर लादण्याचे कारणच काय असा संकुचित विचार करण्याला आणि लोकांमधील अंतर वाढवायला नवे धोरण कारणीभूत ठरणार नाही ? आणि समजा वैधानिक विकास मंडळांचा प्रयोगही अयशस्वी झाला तर त्याची परिणती स्वतंत्र विदर्भ, स्वतंत्र कोकण या स्वरूपाच्या भडक मागण्यांत होणार नाही कशावरून ? शेलारमामाने सिंहगडावरचे परत फिरण्याचे सर्व दोर कापून टाकले होते तसे समन्यायी विकासाचे सर्व 'सॉफ्ट ऑप्शन' आपण नाकारले आहेत काय ? केंद्र सरकारने वैधानिक विकास मंडळांची मागणी स्वीकारण्याऐवजी असे राज्यांतर्गत स्वरूपाचे सॉफ्ट परंतु परिणामकारक पर्याय सुचविण्यातच राजकीय सुज्ञपणा होता.

•

प्रकरण १३

# नरूभाऊंची काँग्रेस

गेल्या अर्धशतकातील महाराष्ट्राच्या 'काँग्रेसी राजकारणाचा एक विदुर वृत्तान्त' असे नरूभाऊ लिमये यांच्या 'वीस चोक ऐशी' या आत्मचरित्राचे वर्णन करता येईल. नरूभाऊ अलीकडेच ऐशी वर्षांचे झाले. ते निमित्त साधून हे पुस्तक 'कॉन्टिनेंटल'ने प्रकाशित केले. त्या समारंभास अच्युतराव पटवर्धन, बाळासाहेब भारदे, आबासाहेब कुलकर्णी, गुजरातचे माजी मुख्यमंत्री बाबूभाई पटेल, ग.प्र. प्रधान यांसारखे स्वातंत्र्यलढ्यातील अनेक अग्रणी उपस्थित होते. १९४२ च्या लढ्यात अटक झाल्यानंतर तुरुंगात एका बराकीत राहताना गुंफलेले हे प्रेमाचे धागे आजतागायत तुटलेले नाहीत. राजकीय मतभेद असले तरी वैयक्तिक संबंधांत कटुता निर्माण होऊ न देणाऱ्या स्वातंत्र्यपूर्व काळातील एका वेगळ्या पिढीचे हे दर्शन आजच्या वैरभावनेवर जोपासल्या जाणाऱ्या राजकीय वातावरणात लक्ष्यवेधी होते. नरूभाऊंच्या आत्मचरित्रात अशा अनेक व्यक्ती भेटतात. बदलत गेलेल्या राजकीय मूल्यांचा एक सलग आलेखच त्यांनी रेखाटला आहे. राजकारणाच्या या नव्या पटावर त्यांच्यासारख्या मूल्यांना चिकटून बसलेल्या व्यक्तींचे स्थान आता नगण्य ठरल्याची विषादाची तीव्र भावना शेवटी उमटते. गेली पन्नास वर्षे अडीअडचणीत, घुसमट होत असतानाही ज्या व्यक्तीने काँग्रेसची साथ सोडली नाही, त्याच्या पत्राची साधी पोचही काँग्रेस अध्यक्ष राजीव गांधी देत नाहीत, त्यातील प्रतिपादनाची दखल घेणे तर दूरच! मात्र एवढ्याने निराश होतील तर ते नरूभाऊ कसले? त्यांच्या अंत:करणात रुजलेली 'काँग्रेस संस्कृती' जतन करण्यासाठी ऐशीव्या वर्षीही 'यशवंतराव चव्हाण विचारमंच' स्थापण्यात ते पुढाकार घेतातच. पक्ष संपला तरी पक्षनिष्ठा संपली नाही अशा या कणखर बाण्याच्या सातारी तरुण म्हाताऱ्याचे हे आत्मचरित्र म्हणजे 'मूल्य की तडजोड' या कधीही न संपणाऱ्या, चिरंतन राजकीय संघर्षाचे आणि त्यातून येणाऱ्या अनामिक अस्वस्थतेचे प्रातिनिधिक चित्रण आहे. भाऊसाहेब हिरे, काकासाहेब गाडगीळ, यशवंतराव

चव्हाण, वसंतराव दादा पाटील, वसंतराव नाईक, किसन वीर, बाळासाहेब देसाई, भाऊसाहेब सोमण, र.के. खाडिलकर, स.का. पाटील, मोरारजी देसाई, इंदिरा गांधी, राजीव गांधी, शरद पवार यांसारख्या महाराष्ट्रातील व देशातील अनेक काँग्रेस नेत्यांचे कधी जवळून घडलेले, कधी दुरून झालेले दर्शन नरूभाऊ आपल्याला घडवितात. ते 'काँग्रेस'चे आहेत, तसेच पत्रकारही आहेत. एकाच वेळी दोन्हीही आहेत. 'काँग्रेसी पत्रकार' या विशेषणाने कदाचित त्यांचे अधिक नेमकेपणाने वर्णन करता येईल. पक्षांतर्गत वर्तुळातील विशेष माहिती आणि पत्रकाराची विचक्षण दृष्टी यांचा समतोल साधल्याने महाराष्ट्राच्या गेल्या अर्धशतकातील काँग्रेसी राजकारणाचे, त्यातील सत्तासंघर्षाचे, व्यक्तिमत्त्वांचे त्यांनी केलेले विवेचन राजकारणाच्या अलिप्त अभ्यासकाला नक्कीच उपयुक्त वाटेल.

नरूभाऊ साताऱ्याचे. गरीब नोकरदाराच्या कुटुंबातील. जन्माआधी तीनच दिवस, क्षयाने आजारी असलेल्या वडिलांचे निधन झाले. एकत्र कुटुंबाचा आधार होता. त्यावर निभावून गेले. परंतु त्यामुळे घरापेक्षा शाळेचे आकर्षण वाढले. साताऱ्च्या 'न्यू इंग्लिश स्कूलचा' आपल्या जडणघडणीत मोठा वाटा आहे असे ते म्हणतात. त्या काळातील आणि पुढेही पुष्कळ वर्षे अनेक शाळांच्या बाबतीत हीच वस्तुस्थिती होती. शिक्षणाचा बाजार झालेला नव्हता आणि शिक्षक ध्येयवादी, चारित्र्यसंपन्न होते. बालवीर पथके चालविणारे दत्तोपंत परांजपे यांनी न्यू इंग्लिश स्कलमधून मुलांना स्वातंत्र्यप्रेमाचे, देशसेवेचे बाळकडू पाजले. त्यातील नरुभाऊ एक. अभ्यासापेक्षा इतर क्षेत्रांत गोडी निर्माण झाली. नरूभाऊ आणि त्यांचे मित्र 'चळवळे' बनले. बाहेर स्वातंत्र्याचे वारे वाहात होते. त्यात पडण्याइतकी मानसिक तयारी शाळेतील शिक्षण आणि संस्काराने झालेली होती. कॉलेज शिक्षणासाठी त्या काळी पुण्याला यावे लागायचे. पैशाचे बळ नव्हते. मॅट्रिकनंतर शिक्षणाची आबाळच झाली. नोकरीशिवाय पर्याय नव्हता. साताऱ्च्या मॅट्रिक तरुणांना हमखास नोकरी देणारी संस्था म्हणजे अण्णासाहेब चिरमुले यांची वेस्टर्न इंडिया ही विमा कंपनी. नरूभाऊंनी त्यात उमेदवारी सुरू केली. तेथेच त्यांना 'समर्थ' साप्ताहिकाचे मालक बाबूराव वैद्य भेटले आणि कालांतराने 'समर्थ'ची सर्व संपादकीय जबाबदारी नरूभाऊंवर येऊन पडली. नोकरी सोडून पत्रकारिता आणि त्यातून राजकारण याची सुरुवात झाली ती अशी पंचविशी-तिशीत. साताऱ्च्या बंडखोर मातीत. यानंतर म्हणजे १९४० पासून १९९० पर्यंत नरूभाऊ सलगपणे काँग्रेसच्या राजकारणात वावरले. १९३७ मध्ये बाळासाहेब खेर मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री झाले, त्या वेळी भाऊसाहेब सोमण यांच्यासोबत ते शपथविधी समारंभाला उपस्थित होते. त्यानंतरच्या जवळजवळ प्रत्येक मुख्यमंत्र्याच्या शपथविधीला हजर असणारे

नरूभाऊ लिमये हे एकमेव पत्रकार असावेत. नरूभाऊंच्या खासगी जीवनात सांगण्यासारखे काही असलेच तर ते बालपण आणि थोडेसे तारुण्य या कालखंडासाठीच. बाकीचे त्यांचे सर्व आयुष्य हे मुख्यत: राजकीय घटनांनी भरलेले. 'ज्याच्या जीवनाचा मोठा भाग कौटुंबिक नसून सार्वजनिक आहे त्याने तो सांगण्यासाठी आत्मचरित्र लिहावे' या यशवंतरावांच्या सांगाव्याला अनुसरून नरूभाऊंनी मुख्यत्वे आपल्या सार्वजनिक जीवनाचा वार्तापटच या पुस्तकात मांडला आहे. त्यांच्या पत्नीचा अत्यंत हृदयस्पर्शी परंतु फार मोजका उल्लेख नंतर आला आहे. तेवढाच काय तो अपवाद. दत्तोपंत परांजपे हे शिक्षक, 'समर्थ'चे मालक बाबूराव वैद्य आणि बाबूरावांचे गुरू व साताऱ्यातील प्रमुख काँग्रेस कार्यकर्ते भाऊसाहेब सोमण यांच्या वयाच्या पंचविशीपर्यंतच्या जडणघडणीतील वाटा ते दिलखुलासपणे सांगतात. १९३४ मध्ये ते 'समर्थ'चे काम पाहू लागले त्या वेळी या साप्ताहिकाची कचेरी काँग्रेस कचेरीच झाली होती.

१९३४ च्या जेधे-गाडगीळ निवडणुकीचे काम येथूनच होत असे. 'केलेल्या कामामुळे मी काकांचा मानसपुत्र झालो' असे ते म्हणतात. काकांबरोबरचे त्यांचे संबंध शेवटपर्यंत असेच प्रेमाचे राहिले. त्यांच्या निधनानंतर पोरकेपण आले असे नरूभाऊ लिहून जातात. तीस सालच्या चळवळीने नरूभाऊंच्या जीवनात सत्याग्रहाची ऊर्मी आली नाही तरी १९४१ व नंतर १९४२ मध्ये त्यांनी सत्याग्रह केला आणि दोन्ही वेळा त्यांना तुरुंगवास झाला. स्वातंत्र्यपूर्व काळातील पिढीचे राजकीय शिक्षण आणि अभ्यास तुरुंगातच झाला. त्याचे प्रत्ययकारी चित्रण ग.प्र. प्रधानांनी 'साता उत्तराची कहाणी' या त्यांच्या कादंबरीसदृश पुस्तकात केले आहे. नरूभाऊंच्या या पुस्तकातही त्याचा थोडा प्रत्यय येतो.

मात्र नरूभाऊंची त्या काळातील प्रकृती क्रांतिकारकत्वापेक्षा सनदशीर मार्गाकडे झुकणारी होती. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत (त्यांचे मित्र किसन वीर आघाडीवर असूनही) किंवा प्रतिसरकारमध्ये त्यांचा भाग नव्हता. याच काळात यशवंतराव चव्हाणांचे नेतृत्व सातारा जिल्ह्यात उदयास येत होते. नरूभाऊ तेव्हापासून यशवंतरावांचे मित्र बनले, ते शेवटपर्यंत. किंबहुना 'यशवंतराव' हाच केंद्रबिंदू धरून नरूभाऊंनी स्वत:च्या राजकारणाचे रिंगण आखले. या पुस्तकात यशवंतरावांच्या राजकारणाला, त्यांच्या व्यक्तिवैशिष्ट्यांना त्यामुळे साहजिकच महत्त्व आले आहे. यशवंतराव सत्ता, अधिकार यामुळे फार मोठे असले तरी जरूर तेव्हा स्पष्टपणे मतभेद व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य नरूभाऊंनी केव्हाही गमावले नाही. त्यांच्या स्पष्टवक्तेपणाची आणि तरीही यशवंतरावांनी त्याचा राग मानला नसल्याची विपुल उदाहरणे येथे सापडतात. अनेक वर्षे यशवंतरावांना उच्चभ्रू

लोकांनी ओळखले नव्हते, जाणले नव्हते असे ते म्हणतात. त्या वेळीही 'बाळूचा बाळासाहेब आणि यशवंत्याचा यशवंतराव झालेला या वर्गाला खपत नाही' असे त्यांनी लिहिले आहे. "यशवंतरावांचे प्रत्येक पाऊल सत्तेच्या संदर्भात आणि निवडणूक जिंकून सत्ता संपादण्याच्या दिशेने पडत गेले. साहजिकच त्यांची प्रतिमा 'सत्ता-लोलुप' अशी निर्माण झाली. मला ती कधी खरी, कधी खोटी वाटे. परंतु पूर्ण विचारांती माझ्या मताने ती वैयक्तिक सत्तेसाठी केलेली वाटचाल नव्हती तर बहुजन समाजाचे कल्याण, देशाचे हित आणि काँग्रेस या त्यांच्या त्रिविध निष्ठेमुळे ते तसे वागत गेले... मी त्याचे वर्णन मर्यादित अर्थाने महाभारतातल्या भीष्मासारखे आहे असे करतो. ज्या महाराष्ट्रासाठी त्यांनी एवढ्या खस्ता, शिव्याशाप सोसले, सर्वांगीण विकासाची पायाभरणी केली, त्या महाराष्ट्रात विकासाच्या जोडीने विनाशाची बीजे पेरली गेलेली त्यांना पाहावयास मिळाली." यशवंतरावांसंबंधी असे अनेक उल्लेख पुस्तकात येतात. त्यात वायफळ स्तुतीपेक्षा वस्तुनिष्ठ पण सहृदय वर्णन आहे ही या पुस्तकाच्या विश्वासार्हतेची मोठी पावती आहे.

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ व त्यातील काँग्रेसची भूमिका आणि कार्य, महाराष्ट्र राज्याची स्थापना, १९६९ मधील काँग्रेस फूट, १९७१-७२ चा दुष्काळ, महाराष्ट्रातील राजकारणातून यशवंतरावांना संपविण्यासाठी इंदिरा गांधींनी आखलेले डावपेच, त्यासाठी हाताशी धरलेल्या व्यक्ती, त्यांच्या महत्त्वाकांक्षांना घातलेले खतपाणी, 'दोन वसंतराव, एक यशवंतराव यावर मॅडम कधीही विश्वास ठेवणार नाहीत' हे अंतुल्यांचे खासगीतील उद्गार, या सर्वांचा काँग्रेसच्या पक्षांतर्गत राजकारणावर , कार्यशैलीवर होणारा परिणाम यांच्या डायरीतील नोंदी, त्या वेळी केलेले लिखाण व इतर संदर्भातून नरूभाऊंनी नेमके विश्लेषण केले आहे. नरूभाऊ काही काँग्रेसमधील प्रत्यक्ष सत्तास्थानावर असलेले, त्यामुळे महत्पदाला पोहोचलेले गृहस्थ नव्हते. त्यामुळे त्यांना मिळणाऱ्या माहितीत, तिच्या उगमात त्रुटी असणार. या राजकीय खेळात हिरे, दादा नाईक यशवंतरावादी लोकांना झळ बसली. तशी नरूभाऊंना बसलेली नाही. मुख्यत्वे यशवंतरावांचे मित्र, त्यांचे समर्थक या नात्याने आपल्या वाट्याला आलेली भूमिका पार पाडताना आलेल्या बऱ्यावाईट अनुभवांचे हे प्रामाणिक कथन आहे. महाराष्ट्राच्या राजकारणावर त्यामुळे खळबळजनक प्रकाशझोत पडलेला आहे असेही नाही. परंतु मूल्यभान असणाऱ्या, सामाजिक आणि वैचारिक बांधिलकी मानणाऱ्या, पक्षनिष्ठा जपणाऱ्या एका संवेदनशील कार्यकर्त्याच्या वाट्याला स्वाभाविकपणेच येणाऱ्या अनुभवांची अस्सल प्रत नरूभाऊंच्या या पुस्तकात दिसते. राजकीय इतिहास म्हणजे केवळ घटना नव्हेत,

तर त्यातून जात असताना कार्यकर्त्यांच्या मनात चाललेली चलबिचल,मानसिक आंदोलने,क्रिया-प्रतिक्रिया, त्यांची जडणघडण, संस्कार, त्यांचे व नेत्यांचे परस्परसंबंध, आपापसातील वर्तणूक आदी अनेक घटकांचे मिळून झालेले समग्र दर्शन, नरूभाऊंच्या पुस्तकात ते फार प्रामाणिकपणे, हातचे काहीही राखून न ठेवता घडते हेच त्याचे मोल आहे.

●

१४ प्रकरण

# सीमाप्रश्नाचा गुंता

महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावर चर्चा करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री बुटासिंग यांनी महाराष्ट्रातील नेत्यांना पुन्हा एकदा आमंत्रित केले होते. १३ एप्रिलला ही भेट ठरली होती. तेरा हा अंक अमेरिकेत अशुभ मानतात. भारतात तशी समजूत नाही. परंतु काही 'घरगुती' कामासाठी बुटासिंग पंजाबला गेल्यामुळे ते सीमा समितीच्या नेत्यांना उपलब्ध होऊ शकले नाहीत. ज्येष्ठ नेते नानासाहेब गोरे,मुख्यमंत्री शरद पवार,महाराष्ट्र एकीकरण समितीचे नेते व कर्नाटकातील आमदार राजाभाऊ माने आदी मंडळी गृहमंत्र्यांना भेटण्यासाठी उत्सुक होती. कर्नाटकाच्या नेत्यांबरोबर या प्रश्नावर कोणताही संवाद होणे अशक्य झाल्याने केंद्रीय नेत्यांच्या हस्तक्षेपाशिवाय या प्रश्नावर आता एकही पाऊल पुढे पडू शकत नाही. गृहमंत्र्यांच्या भेटीचे महत्त्व त्यामुळेच वाढते. ती १३ तारखेला झाली नाही. मात्र १९ तारखेला मुख्यमंत्री शरद पवार यांना त्यांनी भेटीसाठी बोलावले आहे असा निरोप होता. थोडी दिलासा देणारी गोष्ट होती. परंतु ही भेटही रद्द झाल्याचे गृहमंत्रालयातून सांगण्यात आले. त्या दिवशी पंतप्रधान राजीव गांधींनी महाराष्ट्रातील तथाकथित निष्ठावंतांच्या तीन नेत्यांना भेटीसाठी वेळ दिली होती. एकीकडे मुख्यमंत्र्यांविरुद्ध राजकीय कारवाया करणाऱ्यांना पंतप्रधान भेटीसाठी वेळ देत आहेत आणि दुसरीकडे त्याच मुख्यमंत्र्यांशी गृहमंत्री सीमाप्रश्नासारख्या महत्त्वाच्या आंतरप्रांतीय प्रश्नावर चर्चा करीत आहेत असे चित्र त्यामुळे तयार झाले असते. केंद्रीय नेतृत्वाला ते सोईचे वाटले नसावे किंवा त्यामुळे त्यांची सोयही झाली असावी.

सीमाप्रश्नावर महाराष्ट्राची कोंडी झाली आहे. आमच्या दृष्टीने सीमाप्रश्न संपला आहे किंवा महाजन अहवाल हाच या प्रश्नावरील अंतिम शब्द आहे अशी ताठर भूमिका कर्नाटकाने घेतली आहे. हेगडे असोत की बोम्मई किंवा काँग्रेसचे सरकार असो की जनताचे, या प्रश्नावर कर्नाटकाची भूमिका सातत्याने तीच राहिली आहे. आहे ती परिस्थिती कायम राहणे यात कर्नाटकाचाच सर्वांत जास्त फायदा असल्याने

त्यांना या प्रश्नी जरासुद्धा आस्था नाही. विविध राजकीय अडचणींमुळे केंद्र सरकारही कर्नाटकाच्या इच्छेविरुद्ध फार ताणून धरू शकत नाही. अशा वेळी महाराष्ट्रात राजकीय अस्थिरता असेल तर हा प्रश्न पुढे ढकलण्यासाठी केंद्राला तेवढे कारण पुरते. गृहमंत्र्यांनी नेमके हेच हेरून सीमाप्रश्नावर लोकमताचा कौल आजमावण्याच्या विशिष्ट सूचनेवर विचार करण्यासाठी ठरलेली ही भेट पुढे ढकलली असावी. महाराष्ट्रात राजकीय अस्थिरता निर्माण होण्याचे जे काही परिणाम आहेत, त्यांतील सीमाप्रश्न बाजूला पडणे हा मोठा तोटा आहे. ज्याला राजकीय स्थैर्य आणि दिल्लीचा पाठिंबा आहे असाच मुख्यमंत्री सीमा प्रश्नासंबंधी महाराष्ट्राच्या अंगलट आलेला महाजन आयोगाचा डाव उलटवू शकतो. किमान महाराष्ट्रात तरी सर्वांनी हे लक्षात ठेवायला हवे. गेल्या पाच-सहा वर्षांत महाराष्ट्रात राजकीय स्थैर्य नव्हते. स्वतःची खुर्ची सांभाळण्यातच सर्व शक्ती पणाला लागत असेल तर सीमा प्रश्नाचा खिलारी बैल कोण अंगावर घेणार ? हे स्थैर्य आणि थोडी उसंत शरद पवार यांना मिळेल असा सुरुवातीचा कयास होता. सीमाप्रश्नी विरोधी पक्षात असल्यापासून त्यांची बांधिलकी होती. या दोन्ही कारणांनी या प्रश्नावर त्यांनी विशेष पुढाकार घेतला. या प्रश्नाचा गुंता सोडवायचा तर, एकतर राजकीय हाराकिरीची तयारी हवी किंवा विलक्षण राजकीय कौशल्य असलेला आणि लोकांचा पाठिंबा असलेला नेता हवा. सध्याच्या काळात पहिली शक्यता नाही. सी.डी. देशमुखांनी तीस वर्षांपूर्वी केंद्रीय मंत्रिपदाचा राजीनामा देऊन पहिला पर्याय निवडला. बी.ए.देसाई यांच्यासारख्या सामान्य मंत्र्याने त्यांची विधानसभेत जी संभावना केली ती पाहता अशा किंमत मोजण्याच्या राजकारणाच्या वाट्याला आज कोणी जाईल असे वाटत नाही. त्यामुळे फक्त दुसरा पर्याय शिल्लक राहतो. आपण आपल्या हाताने आणि ऐन मोक्याच्या वेळी तो कमकुवत तर करीत नाही ना ?

सीमाप्रश्नावर कर्नाटकातील मराठी बांधवांनी गेली तीस वर्षे सातत्याने चालविलेले लोकशाही आंदोलन देशातील एकमेव आंदोलन आहे. महाराष्ट्राच्या सीमा केवळ कर्नाटकाशी भिडल्या आहेत असे नव्हे. कर्नाटकाबरोबरच गोवा, गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश ही राज्येही महाराष्ट्राची शेजारी राज्ये आहेत. परंतु १९५७ च्या राज्य पुनर्रचनेनंतर एकमेव वादग्रस्त सरहद्द आहे ती कर्नाटकाला लागून असलेली आणि तीही मुख्यत्वे बेळगाव जिल्ह्यातील. महाराष्ट्राने काही प्रत्येक राज्याशी भांडण उकरून काढलेले नाही. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे हा वाद जादा प्रदेशासाठी, जमिनीसाठी नाही. तो लोकांचा आहे. लोकांच्या भाषेचा आहे. महाराष्ट्राला कर्नाटकाचा तसूभरही प्रदेश नको आहे. म्हणणे आहे ते कर्नाटकातील मराठी भाषकांचे. भाषावार प्रांतरचना हे जर राज्य पुनर्रचना मंडळाचे सूत्र होते

आणि त्यामागे नागरिकांना आपापल्या मातृभाषेतून नव्या लोकशाही राज्यव्यवस्थेत अर्थपूर्ण रीतीने सहभागी होता यावे हा विचाराचा गाभा होता. तर एवढ्या मोठ्या मराठी जनसमुदायाचा हा मूलभूत लोकशाही हक्क का डावलला जात आहे ? बेळगाव, खानापूर, निपाणी हा भाग कर्नाटकात गेला त्याचे कारण ब्रिटिशांनी आपल्या सोईसाठी केलेली प्रशासकीय विभागणी. लोक व देशी भाषा हे भान त्यामागे कधीच नसल्याने त्यासंबंधी हरकत घेण्याची वेळही कधी आली नाही. एकजण कन्नड बोलतोय आणि दुसरा मराठी बोलतोय म्हणून ब्रिटिश राजवटीत कोणी कधी सापत्नभावाची वागणूक दिली नाही. हे प्रश्न निर्माण झाले भाषावार प्रांतरचनेनंतर. आपण आपल्या मातृभाषेतून शिक्षण घेऊ शकत नाही, व्यवहार करू शकत नाही, नोकऱ्यांत वर जाऊ शकत नाही, ही भावना लोकांना अस्वस्थ करते. मराठी लोकांच्याबाबत हे घडू शकते,तसे कन्नड, तमीळ, तेलगू, मल्याळम् या सर्वांच्याच बाबतीतही. जेथे अशक्यच असेल तेथे इलाज नाही. मराठी लोक जास्त आहेत म्हणून धारवाड महाराष्ट्रात घाला, असं कोणाचं म्हणणं नाही. बेळगाव महाराष्ट्रात आलं पाहिजे असं लोकांचं म्हणणं आहे. त्याचं कारण तो भाग महाराष्ट्राला लागून आहे आणि बहुसंख्य मराठी भाषकांचा प्रदेश आहे म्हणून. केवळ वहिवाटीचा हक्क म्हणून कर्नाटकाने बेळगाववर व सीमाभागावर दावा सांगणे अनैतिक आणि अन्यायकारकही आहे. या प्रदेशातील लोकांनी इतक्या विविध तऱ्हांनी अनेक वेळा आपले मानस व्यक्त केल्यानंतरही कर्नाटकने ते लक्षात घेऊ नये हे लोकशाही तत्त्वाविरुद्ध आहे. सीमाभागातील लोकांवर राज्य करण्याचा नैतिक हक्क कर्नाटकने केव्हाच गमावला आहे ! लोकमताचा आदर करून परस्परांत वाटाघाटी करण्याचा आणि त्यातून दोन्ही राज्यांचे आणि दोन्ही भाषेतील लोकांचे जास्तीत जास्त समाधान करणारा तोडगा शोधून काढण्याऐवजी कर्नाटक केवळ महाजन आयोगाला चिकटून बसले आहे. जणू महाजन अहवाल म्हणजे सत्याचा मूर्तिमंत पुतळाच !

महाजन आयोगाने केलेल्या शिफारशींच्या तपशिलात जाण्याचे आता कारण नाही. त्याची भरपूर चिरफाड झाली आहे. मार्गदर्शक तत्त्वांचा आधार नसलेला, पक्षपाती, अंतर्गत विसंगतींनी परिपूर्ण व महाराष्ट्रावर ठरवून अन्याय करणारा तो अहवाल आहे. महाजन अहवाल आम्ही मान्य करू असे आश्वासन यशवंतराव चव्हाण व वसंतराव नाईक यांनी दिले होते याची आठवण कर्नाटकचे नेते वारंवार करून देतात. परंतु एवढा ढळढळीत अन्याय करणारा अहवाल कोणीही स्वीकारणार नाही. महाराष्ट्राने तो स्वीकारलेला नाही आणि तो स्वीकारावा असे केंद्रानेही म्हटलेले नाही. सोईचा, म्हणून कर्नाटकाने महाजन अहवालाचा कितीही अग्रह

धरला तरी त्याला मान्यता मिळणे शक्य नाही. सीमाभागातील मराठी लोकांची संमती तर त्याला कधीच मिळणार नाही. कन्नडची सक्ती करून कर्नाटक सरकारने अलीकडे मराठी भाषकांचा जो छळ चालविला आहे तो लक्षात घेतला तर मराठी भाषकांचा उद्रेक एवढा धारदार का ते स्पष्ट होईल. सीमाभाग कधीतरी महाराष्ट्रात जाणार आहे, त्यामुळे त्याच्या विकासाकडे सरकारने आस्थेने पाहिले नाही. त्यात भर पडली ती भाषेच्या नव्या धोरणाची. या सीमाभागातील मराठी जनतेची मने जिंकण्याचे, त्यांच्या दुःखावर फुंकर घालण्याचे प्रामाणिक प्रयत्न कर्नाटकच्या नेतृत्वाने केल्याचे ऐकिवात नाही. केली असेल, तर हडेलहप्पीच. सीमाआंदोलन बाहेरचे लोक करतात असे कर्नाटक सरकारचे नेहमी म्हणणे असते. आंदोलन कोणीही करो. तेथील लोकांच्या खऱ्या भावना काय आहेत ? त्यांना कर्नाटकातच राहायचे आहे ? जनमत कौलात तसे स्पष्ट झाले तर महाराष्ट्राचे काही म्हणणे नाही. परंतु लोकेच्छा प्रमाण मानली पाहिजे, अन्यथा परकी इंग्रज सरकार आणि देशी सरकार यांत फरक तो काय राहिला ?

या प्रश्नाच्या सोडवणुकीत काही राजकीय अडचणी जरूर आहेत. बेळगाव महाराष्ट्राला देण्याच्या प्रस्तावाला मान्यता देईल त्या सरकारची कर्नाटकातील लोकप्रियता शून्यावर येईल.कारण तेथील लोकांना सत्य कधीच सांगितले गेलेले नाही. म्हणून दोन्ही राज्यांची प्रतिष्ठा व आत्मसन्मान कायम राहील आणि लोकांच्या इच्छेचाही आदर राहील असा उभय मान्य तोडगा निघाला पाहिजे. जनमत कौल हा सर्वांत उत्तम मार्ग आहे. भौगोलिक सलगता, भाषिक बहुमत व खेडे हा घटक या तीन तत्त्वांवर आधारित सीमेची फेरआखणी करणे शक्य आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीने आणखी काही प्रस्ताव दिले आहेत. नवे बेळगाव, बेळगावची फाळणी यावरही चर्चा झाली आहे. या सगळ्यांसाठी नन्नाचा पाढा वाचणे थांबवून कर्नाटकने चर्चेची तयारी दाखविली पाहिजे. स्वतःही काही कल्पना मांडल्या पाहिजेत. वास्तविक कर्नाटक, आंध्र आणि महाराष्ट्रात सांस्कृतिकदृष्ट्या कितीतरी साम्य आहे. भाषेचे आदानप्रदान आहे. नातेसंबंध आहेत. सीमाप्रश्न रखडल्यामुळे त्याला गालबोट लागले आहे. कर्नाटक सरकारने मराठी भाषकांची गळचेपी केल्यामुळे आणखी कटुता निर्माण झाली आहे. दोन्ही बाजूंनी न्यायाची भूमिका स्वीकारली तरच हा प्रश्न सुटू शकेल. केंद्र सरकार आपले प्रस्ताव कोणत्याही एका राज्यावर लादू शकणार नाही. त्याला केवळ चांगल्या मध्यस्थाची भूमिका करता येईल.

•

१५ प्रतिबिंब १०

# मराठी हैदराबाद

गेल्या आठवड्यात हैदराबादला होतो.

काँग्रेसचे आमदार मोहन रंगाराव यांच्या खुनानंतर पेटलेल्या दंगलीने स्वतःला रामावतार समजणाऱ्या, मुख्यमंत्री रामाराव यांच्या पायाखालची वाळू घसरायला लागली आहे. तेथील राजकीय आकाशात वाहणाऱ्या वाऱ्यांनी आपला मोहरा बदलला आहे. त्याची दिशा नीट समजली, तर या नव्या रामाला पुन्हा एकदा विजनवासात, किमान तेलगू देशममधून 'सिनेमा देशम'मध्ये पाठविणे अशक्य नाही.

राजकीय मंडळींच्या गाठीभेटी संपवून वेळ मिळाला तर काही मराठी मंडळींना आवर्जून भेटायचं होतं. न्या. गोपाळराव एकबोटे त्यात होते. आनंद साधले, नलिनी साधले यांचीही नावं डायरीत होती. काही वर्षांपूर्वी याच हैदराबादेत चिंतामणराव देशमुख राहायचे. सर चिंतामणराव असं त्यांचं नाव लिहिलं असतं तर ते तेलुगू नव्हेत असं कोणी म्हटलं नव्हतं. शेवटी-शेवटी दुर्गाबाईंच्या बरोबर ते आंध्रमयच झाले होते. उस्मानिया विद्यापीठाकडे जाताना आंध्र महिला सभेचे साम्राज्य आधी लागते. दुर्गाबाई असताना तर ते विस्तीर्ण विद्यापीठही महिला सभेपुढे दबकून असे. 'उस्मानिया युनिव्हर्सिटी-ॲफिलिएटेड टू आंध्र महिला सभा' असं गमतीनं म्हटलं जायचं.

हैदराबादमधील त्या जुन्या आठवणींना उजाळा देणारी फार थोडी माणसं आता उरली आहेत. न्या. गोपाळराव एकबोटे त्यांपैकी एक. १९७४ मध्ये आंध्रप्रदेशाचे मुख्या न्यायाधिश म्हणून ते निवृत्त झाले. १९६२ ते ७२ न्यायाधीश व ७२ ते ७४ मुख्यन्यायाधीश अशी त्यांची मोठी कारकीर्द तिथे झाली. त्याआधी त्यांनी वकिलीत मोठे नाव कमावले होते आणि विशेष म्हणजे एकेकाळी ते राजकारणात सक्रिय होते. हैदराबादच्या, मुख्यमंत्री बी. रामकृष्ण राव यांच्या पहिल्याच मंत्रिमंडळात १९५२ मध्ये ते मंत्री होते. १९३२ पासून ते हैदराबादमध्ये आहेत. आज पंचाहत्तरी ओलांडली असली तरी प्रकृती उत्तम आहे, बाहेर घडणाऱ्या

घटनांचा बारकाईने अभ्यास आहे, अनेक सामाजिक संस्थांच्या कामात अजूनही ते लक्ष घालताहेत. गोपाळराव एकबोटे मूळचे नागपूरचे. १९१२ चा त्यांचा जन्म. वडिलांच्या पश्चात शिक्षणासाठी म्हणून १९१४-१५ मध्ये मामाकडे औरंगाबादला आले. निजामीत. तेथून पुढे हैदराबादला. वकील आणि न्यायमूर्ती म्हणून त्यांनी चांगला नावलौकिक मिळवला. एक छोटा अनुभव मला स्वतःलाच आला. मी उतरलो होतो त्या हॉटेलच्या स्वागत कक्षातून न्या. एकबोटे यांना फोन केला. फोन संपल्यावर जवळच उभे असलेले हॉटेलचे मालक उत्स्फूर्तपणे म्हणाले, 'जस्टिस एकबोटे ना, फार चांगला माणूस'. त्यांच्यापुढे सुनावणी झालेल्या त्यांच्या एका नातेवाइकाच्या केसची हकीकत त्यांनी थोडक्यात सांगितली, आणि त्यांच्या न्यायबुद्धीची प्रशंसा केली. पंधरा-वीस वर्षांपूर्वीचे ते प्रकरण होते.

हैदराबादच्या अनेक मराठी संस्थांचे न्यायमूर्ती आधारस्थान आहेत. मराठी साहित्य परिषद ही त्यातील एक. आंध्रमध्ये आजमितीला सहा ते सात लाख मराठी भाषक आहेत. त्यांपैकी हैदराबाद-सिकंदराबाद या जुळ्या शहरातच दीड लाख आहेत.आंध्रमधील मराठी भाषकांचे संमेलन हैदराबादला भरते आहे. त्या निमित्ताने आणि मुख्यमंत्री रामा राव यांच्या संदर्भात बोलणे निघाले. तेलगू देशम अधिकारावर आल्यानंतर मराठी भाषा, संस्कृती व मराठी भाषकांच्या संस्थांची गेल्या चार-पाच वर्षांत जी ससेहोलपट चालली आहे, त्याची अतिशय विदारक हकीकत न्यायमूर्तींकडून ऐकायला मिळाली.

हैदराबादमध्ये अनेक मराठी संस्था आहेत. काही ७०/८० वर्षांच्या जुन्या आहेत. मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश ही त्यातील एक. ही संस्था 'मराठी ओरिएंटल कॉलेज' चालवते. शंभर दीडशे विद्यार्थी तेथे आहेत. उस्मानिया विद्यापीठाशी हे महाविद्यालय संलग्न आहे. मराठी भाषा आणि साहित्य येथे शिकविले जाते. विद्यार्थ्यांमध्ये मुख्यतः स्त्रिया आहेत. आंध्रप्रदेश सरकारचे अनुदान अनेक वर्षं कॉलेजला मिळते आहे. परंतु आंध्र सरकारची संक्रांत या कॉलेजवर अनपेक्षितपणे आली आहे. 'पहिल्या वर्षीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नये.' असा फतवा सरकारने काढला. याचा अर्थ तीन वर्षांत कॉलेज बंद करा. यासाठी कोणतेही कारण देण्यात आलेले नाही. मराठी भाषेचे शिक्षण घेण्याच्या मूलभूत हक्कावरच त्यामुळे गदा आली. कॉलेजने उच्च न्यायालयात 'रिट पिटिशन' दाखल केला. त्या वेळी झालेल्या सुनावणीत हे कॉलेज 'भाषिक अल्पसंख्याक संस्था' असे प्रतिज्ञापत्र शिक्षण खात्याने सादर केले. घटनेच्या ३० व्या कलमांतर्गत सर्व बाबींची पूर्तता होत असूनही शिक्षण सहसंचालकाने असे प्रतिज्ञापत्र सादर करणे हे केवळ दिशाभूल करणारे आहे. राज्य अल्पसंख्याक आयोग तेथे स्थापन झाला आहे.

परंतु भाषक अल्पसंख्याकांच्या गाऱ्हाण्यांची तो दखल घेत नाही. त्यांच्यासाठी वेगळ्या आयोगाची स्थापना करण्याची मागणी करूनही त्याला सरकारचा प्रतिसाद मिळत नाही. सरकार सापत्न भावाने वागविणार आणि दखल घेणारी दुसरी यंत्रणा नाही अशा पेचात अनेक संस्था अडकल्या आहेत.

घटनेतील हे ३० (१) कलम असे. धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या सर्व समाजांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा अधिकार असेल. याच कलमाचा दुसरा भाग असा आहे. 'शैक्षणिक संस्थांना साहाय्य देताना राज्य, एखादी शैक्षणिक संस्था ही धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या एखाद्या समाजाच्या व्यवस्थापनाखाली आहे, या कारणावरून तिला प्रतिकूल होईल अशा प्रकारे भेदभाव करणार नाही ?

प्रत्यक्षात अनेक मराठी संस्थांच्या बाबतीत रामाराव यांचे सरकार असा दुजाभाव दाखविते आहे. आंध्र प्रदेश मराठी साहित्य परिषद व तिच्या वतीने प्रकाशित होणारे 'पंचधारा' हे वाङ्मयीन नियतकालिक प्रतिष्ठा पावले आहे. तेलुगू, तमीळ, कन्नड, मल्याळम् व उर्दू भाषेतील प्राचीन व समाकालीन साहित्य प्रवाहांची उत्तम ओळख मराठी वाचकांना करून देण्याचे महत्त्वपूर्ण कायर्य गेली तीस वर्षे सातत्याने त्याने केले आहे. या परिषदेला पूर्वी आंध्र प्रदेश सरकार सालिना दहा हजार रूपयांचे अनुदान देत असे. रामाराव सरकारने ते बंद केले.

विवेकवर्धिनी नावाचे मुलींचे कनिष्ठ महाविद्यालय हैदराबादेत आहे. त्याला अनुदान नाही. या संस्थेची मोकळी जागा २४ तासाच्या आत आमच्या ताब्यात द्या,तेथे आम्हाला व्यापारी संकुल उभारायचे आहे असा अतिरेकी फतवा रामारावांच्या कारकीर्दीत निघाला. 'भारत गुणवर्धक संस्था' हे हैदराबादेतील उत्तम संदर्भ ग्रंथालय आहे. अनेक दुर्मिळ ग्रंथ तेथे आहेत. जगातील सर्व भाषांतील शब्दकोश तेथे आहेत. त्याचे अनुदान बंद झाले आहे. अनेक महाविद्यालयातील मराठी माध्यमांचे विभाग बंद झाले आहेत.मराठी भाषेची पाठ्यपुस्तके सरकार उपलब्ध करून देत नाही. ती प्रकाशित करण्याची तयारी इतर संस्थांनी दाखविली तर त्याला अनुदान नाही. महाराष्ट्रातून मराठी पुस्तके आणायची, आणि त्यांच्या मदतीने प्रत्यक्षात वेगळा अभ्यासक्रम पार पाडायचा अशी स्थिती आहे. अनेक ठिकाणी मंजुरी असूनही मराठी शिक्षकांची नेमणूक नाही. स्टेट सेंट्रल लायब्ररीसाठी एकाही मराठी पुस्तकाची खरेदी होत नाही. अनेक खेड्यांत ४० ते ५० टक्के लोकसंख्या मराठी असली तरी तेथे मराठी माध्यमाच्या शाळा नाहीत. यासंबंधी विचारायला कोणी गेलेच, तर 'महाराष्ट्रात तेलगू भाषकांना काय सवलती मिळतात

त्याचा पुरावा तुम्ही आणून द्या, म्हणजे आम्ही तुम्हाला काय द्यायचे ते ठरवू' असे उफराटे उत्तर येथील शिक्षणसंचालक देतात.

रामाराव मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांच्या तेलुगू प्रेमाला उधाण आले आहे. प्रत्येक गोष्टीच्या मागे तेलुगू लावल्याशिवाय पूर्णताच येत नाही. पण त्याचा अर्थ इतर भाषकांचा दुस्वास करणे नव्हे. तमीळ व कन्नड भाषकांच्या वाट्यालाही हीच परिस्थिती आली आहे. 'अनेक भाषिक अल्पसंख्यांक समाज तेलगू देशमच्या विरुद्ध गेले आहेत' असे काँग्रेसचे आमदार व विरोधी पक्षनेते बागा रेड्डी यांनी सांगितले. त्यात पुष्कळ तथ्य असावे.

या सर्व गोष्टींनी न्या. एकबोटे व्यथित होतात. ते स्वतः एकेकाळी मंत्री होते. १९५६ मध्ये आंध्रात ८ मंत्र्यांपैकी ३ मराठी मंत्री होते. सभापती मराठी होता. सचिवालयात अनेक अधिकारी मराठी होते. त्या लोकांचीच आज ही स्थिती, तर इतर भाषकांची काय असेल ? तेलगू देशमचे भवितव्य आशादायक नाही असे आज तेथे अनेकांना, अनेक कारणांसाठी वाटते. त्यापैकी एक कारण हे आहे.

या आधी यशवंतराव चव्हाण व वसंतराव नाईक यांचा आंध्रमधील मराठी भाषकांना आधार वाटत असे. सध्याच्या मुख्यमंत्र्यांकडूनही तेथील लोकांच्या याच अपेक्षा आहेत. अलीकडेच आंध्रप्रदेश साहित्य परिषदेला चार लाख रुपयांची देणगी देऊन मुख्यमंत्री शरद पवार यांनी चांगली सुरुवात केली आहे. म्हणूनच फेब्रुवारीतील संमेलनाचे निमंत्रण त्यांनी स्वीकारावे, आणि आमची गाऱ्हाणी ऐकावीत अशी तेथील लोकांची इच्छा आहे.

●

प्रकरण १६

# म्हैसूरचा वाघ वादाच्या पिंजऱ्यात

म्हैसूरचा वाघ, टिपू सुलतान, वादाच्या पिंजऱ्यात सापडला आहे. वादाचे निमित्त आहे टिपूवरील चाळीस भागांची संकल्पित दूरदर्शन मालिका. सध्या कॅनडात वास्तव्य असलेल्या भगवान गिडवानी या सिंधी लेखकाच्या 'द स्वोर्ड ऑफ टिपू सुलतान' या 'ऐतिहासिक' कादंबरीवरून संजयखान हे हिंदीतील अभिनेते ही मालिका तयार करीत आहेत. गेल्या वर्षी, नेमका दिवस सांगायचा तर ८ फेब्रुवारी १९८९ रोजी या मालिकेचे म्हैसूरच्या प्रीमियर स्टुडिओत चित्रीकरण चालू असताना लागलेल्या आगीत ५२ जण भाजून मृत्यू पावले. मालिकेचा निर्माता, दिग्दर्शक व टिपूची भूमिका करणारा स्वतः संजय खान त्यात जबर जखमी झाला. त्याच्यावर देशात आणि परदेशात बरेच उपचार करण्यात आले. आगीत मृत्यू पावलेल्यांना मात्र अद्याप कोणतीही नुकसानभरपाई मिळालेली नाही. 'मृत्यू पावलेले अनेकजण रोजंदारीवर काम करीत होते. त्यांना नुकसानभरपाई देण्याची जबाबदारी आपल्यावर नाहीच' अशी अवाजवी भूमिका प्रथम निर्मात्यांनी घेतली. कामगार न्यायालयात हा लढा गेला. अनेकांनी मध्यस्थी केली. आपद्ग्रस्त निधी गोळा करण्यात सुनील दत्त वगैरेंनी पुढाकार घेतला, परंतु अद्याप मृतांच्या नातेवाइकांना व जखमींना संजय खानकडून छदामही मिळालेला नाही. नुकसानभरपाई मिळत नाही तोपर्यंत मालिकेच्या प्रसारणास परवानगी देऊ नये, अशी वर्कर्स फेडरेशनची मागणी आहे. तर मालिकेचे प्रसारण व्हावे यासाठी संजय खानने मृतात्म्यांना ओलीस ठेवले आहे. प्रसारण झाले तरच त्यातून मिळणाऱ्या पैशातून आपण नुकसानभरपाई देऊ शकू, अशा पेचात त्याने सरकारला पकडले आहे. नुकसानभरपाई म्हणून किमान २५ लाख रुपये त्याला द्यावे लागतील. सरकारने मालिका प्रसारित केली तर प्रत्येक भागामध्ये नुकसानभरपाईसाठी म्हणून २५ हजार रुपये जमा करू, असे आश्वासन संजय खानने माहिती व प्रसारण खात्याचे मंत्री पी.उपेंद्र यांना दिले आहे.

तथापि नुकसानभरपाई हा काही टिपू सुलतान मालिकेच्या वादाचा केंद्रबिंदू नाही. ही मालिका ज्या कादंबरीवर आधारित आहे त्यात टिपूचे आधुनिक भारतीय राष्ट्रावादाचा जनक असे उदात्तीकरण करण्यात आले आहे. ''टिपू साक्षात्कारी राज्यकर्ता होता, परमेश्वर ही केवळ एका धर्माची मक्तेदारी नाही, सर्व धर्म समान आहेत यावर त्याची श्रद्धा होती. वसाहतवादाला त्याचा विरोध होता, मानवी स्वातंत्र्य हे त्याच्या लेखी महान मूल्य होते. फ्रेंच राज्यक्रांतीने उद्घोषित झालेल्या स्वातंत्र्य, समता, न्याय या मूल्यांना त्याने उचलून धरले. तो महान योद्धा होता. पराभव होत असताना पळून जाणे शक्य असतानाही त्याने रणांगणावर वीरमरण पत्करले. आपल्या त्यागाने भावी भारतीय पिढ्यांना प्रेरणा मिळेल अशी त्याची धारणा होती. बाह्य शक्तींचे आक्रमण हे आपल्या देशावरील खरे संकट नसून अंतर्गत कलह, सत्तासंघर्ष, मूल्यविहीन समाजामुळे देश कमकुवत झाला आहे याची प्रगल्भ जाणीव त्याला होती.'' 'द स्वोर्ड ऑफ टिपू सुलतान'मध्ये भगवान गिडवाणी यांनी टिपू असा गौरवाच्या भावनेने रंगवला आहे. टिपूचे हे चित्रणच या मालिकेच्या वादाचे मुख्य कारण आहे. ''टिपू धर्मपिसाट होता. त्याने हिंदूंवर अनन्वित अत्याचार केले. जुलूम-जबरदस्तीने त्यांचे धर्मांतर केले. हिंदू स्त्रियांवर अत्याचार केले. त्यांना स्वत:च्या जनानखान्यात डांबून ठेवले. मंदिरे उद्ध्वस्त केली. टिपूचे राज्य जुलमी होते. धर्मातीत तर ते नव्हतेच. त्याचे असे एकांगी, अवास्तव व गौरवपूर्ण चित्रण असलेली मालिका प्रदर्शित करू नये'' असा दुसरा मतप्रवाह आहे. केरळमध्ये या विरोधाला प्रथम सुरुवात झाली. टिपूने ज्यांच्यावर अन्याय केला त्या झामोरीन राजाचे वंशजही या मालिकेला विरोध करण्यासाठी पुढे आले. भाजपने मालिकेच्या प्रसारणाला उघड विरोध केला. संसदेतही हा प्रश्न उपस्थित करण्यात आला. 'हिंदू एकजूट' या नावाच्या संघटनेने हे प्रकरण न्यायालयात नेल्यानंतर जानेवारीच्या पहिल्या आठवड्यापासून प्रसारित होणारी ही मालिका पुढे ढकलण्यात आली. सरकारने मालिकेस परवानगी दिली तर देशभर सर्वत्र दूरदर्शन केंद्रांपुढे निदर्शने करण्यात येतील, असे भाजपने जाहीर केले आहे. या पेचातून मार्ग काढण्यासाठी तज्ज्ञ इतिहासकारांची समिती नेमण्यात येईल, असे सरकारने जाहीर केले. त्यानुसार 'ऑर्गनायझर' या रा.स्व.संघाचे मुखपत्र असलेल्या साप्ताहिकाचे माजी संपादक व इतिहासतज्ज्ञ के.आर. मलकानी यांची समिती नेमली. या समितीचा अहवाल अधिकृतपणे अद्याप प्रकाशित झालेला नाही. मात्र त्यांनी मालिकेला हिरवा कंदील दाखविला असल्याचे बोलले जाते. परंतु सरकारने अद्याप त्यांचा अहवाल जाहीर केला नाही,किंवा मालिका प्रदर्शित करण्यासंबंधी निर्णयही घेतलेला नाही. 'इतिहास की कादंबरी' या पेचात मंत्रालय सापडले

आहे. सहज सुटावा एवढा हा पेच सोपा नाही.

वाद विषय झालेल्या कादंबरीत खरोखरीच टिपूचे एकांगी, गौरवशाली आणि ऐतिहासिक पुराव्यावर टिकणार नाही असे चित्रण आले आहे काय ? तिचे लेखक भगवान गिडवानी कोण आहेत ? टिपूचे असे चित्रण करण्यामागे त्यांचा काही विशेष हेतू होता या त्यांच्यावरील आरोपात काही तथ्य आहे काय ? या सर्व वादाबाबत त्यांचे म्हणणे काय आहे ? गिडवानी हे काही प्रसिद्ध लेखक नव्हेत. 'द स्वोर्ड ऑफ टिपू सुलतान' ही त्यांची पहिलीच कादंबरी. तीही त्यांनी योगायोगाने लिहिली. गिडवानी मूळचे सिंधमधील. कराचीला १९२३ मध्ये एका सिंधी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील सिंध प्रांताच्या हिंदू महासभेचे अध्यक्ष, तर चुलते सिंध प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष. फाळणीनंतर हे कुटुंब भारतात आले. मुंबई विद्यापीठातून ते बी. ए. आणि एलएल.बी. झाले. दोन्ही परीक्षांत ते सर्वप्रथम आले. नागरी हवाई वाहतूक हा त्यांच्या विशेष अभ्यासाचा विषय. हेगमधील आंतरराष्ट्रीय न्यायालयात ते भारताचे प्रतिनिधी होते. पुढे १९७६ ते ७८ मध्ये भारत सरकारच्या नागरी हवाई वाहतूक खात्याचे सरसंचालक झाले. संयुक्त राष्ट्र संघटनेत त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले. सध्या ते कॅनडात मॉन्ट्रियल येथे स्थायिक झाले आहेत. 'द स्वोर्ड ऑफ टिपू सुलतान' ही त्यांची कादंबरी अलाईड पब्लिशर्स या दिल्लीच्या प्रकाशन संस्थेने ऑक्टोबर १९७६ मध्ये प्रसिद्ध केली. तिच्या आतापर्यंत ३२ आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. या कादंबरीचे बीज त्यांच्या मनात रुजले तेही अपघाताने. १९६३ मध्ये ब्रिटिश म्युझियम पाहात असताना एक फ्रेंच विद्यार्थी त्यांना भेटला. रणमैदानावर धारातीर्थी पडलेल्या राजांवर तो एक प्रबंध लिहीत होता. अशी उदाहरणे फार विरळ आहेत. पराभव समोर दिसत असेल तर बहुतेक राजे माघार घेत, तडजोड करीत किंवा पलायन करून लढाईची पुन्हा तयारी करीत, असे त्यांचे निरीक्षण होते. 'तुमच्या टिपू सुलतानाला मात्र लढताना वीरमरण आले' या फ्रेंच विद्यार्थ्याने जाता जाता काढलेल्या उद्गाराने गिडवाणींच्या मनात घर केले. भारतात परतल्यावर टिपूवर मिळतील तेवढी पुस्तके त्यांनी वाचून काढली.

केवळ दोनशे वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या या लढवय्याच्या चरित्रात अनेक गोष्टी परस्परविरोधी आहेत, काही संदिग्ध आहेत. इंग्रज इतिहासकारांनी त्याचे चित्र केवळ खलनायक म्हणून रंगवले आहे. या चित्रणातील विकृती नंतरच्या चित्रकारांनी जशाच्या तशा स्वीकारल्या आहेत. अनेक घटनांवर प्रकाश पडत नाही. टिपूच्या चरित्रातील गूढ कायमच राहते. ते दूर करायला हवे म्हणून स्वतः गिडवानीच कामास लागले आणि भारतातील त्याचप्रमाणे इंग्लंड, फ्रान्स, पोर्तुगाल, हॉलंड

येथील टिपूच्या चरित्राची साधनसामग्री मिळावयाला त्यांनी सुरुवात केली. टिपूवरील त्यांचे हे संशोधन सतत तेरा वर्षे सुरू होते. त्यानंतर त्यांनी टिपूचे चरित्र लिहायला घेतले. काही भाग लिहून झाल्यावर अशा चरित्राने आपण टिपूला न्याय देऊ शकणार नाही याची जाणीव त्यांना झाली आणि मग चरित्राऐवजी कादंबरीने आकार घेतला. टिपूचे या कादंबरीतील चित्रण पूर्णपणे ऐतिहासिक सत्याला धरून नाही या टीकाकारांच्या आक्षेपात तथ्य असावे असे म्हणण्यास लेखकानेच वाव ठेवला आहे तो असा ! कारण केवळ ऐतिहासिक साधने आणि पुरावे देऊन टिपूचे चरित्र लिहायचे तर त्याचा असा कलात्मक गौरव करता येणे शक्य झाले नसते. टिपूची जी गुणवैशिष्ट्ये या कादंबरीत प्रकट झाली आहेत किंवा टिपूच्या व्यक्तिमत्त्वाचा जो गाभा लेखकाला आकलन झालेला आहे तो इतिहासाला छेद देणारा आहे. टिपूची जी सर्वमान्य वैशिष्ट्ये आहेत त्यांपैकी सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तो शूर होता. उत्तम लढवय्या होता. पराक्रमी होता. पराभवाने खचून न जाता पुनः पुन्हा उभा राहणारा होता. त्याने आपल्या राज्याचा विस्तार केला. इंग्रजांचा एकदा पराभव केला. इंग्रजांना शह देण्यासाठी, आधुनिक शस्त्रास्त्रे मिळविण्यासाठी त्याने फ्रेंचांशी संधान बांधले. परंतु तो केवळ इंग्रजांविरुद्ध लढला म्हणून आधुनिक भारतीय राष्ट्रवादाचा जनक म्हणून त्याचा गौरव करणे ही अतिशयोक्ती होईल. भारतीय राष्ट्रवादाचा इतका सुस्पष्ट आविष्कार टिपूला झाला असता तर मराठे आणि निजाम यांच्याविरुद्ध त्याने लढाया केल्या नसत्या, मलबार आणि त्रावणकोरमधील हिंदू राजांच्या विरुद्ध तो उभा राहिला नसता, त्या वेळच्या म्हैसूर राज्याच्या आसपास असलेल्या हिंदू राजांविरुद्ध मोहिमा काढल्या नसत्या. समजा भारतीय राष्ट्रवादाचा जनक हा किताब टिपूला द्यायचा झाला तर टिपू राज्यावर येण्याआधी मराठ्यांनी १७६१ मध्ये पानिपतला अब्दालीविरुद्ध संघर्ष केला त्याला काय नाव द्यायचे ? अब्दाली काही मराठी राज्यावर चालून आला नव्हता. दिल्लीच्या बादशहाची लढाई करण्याची जबाबदारी मराठ्यांनी घेण्याचे कारण नव्हते. टिपूचा बाप हैदर मात्र त्या वेळी अब्दालीविरुद्ध लढायला उत्तरेकडे आला नाही. इंग्रजांचा वसाहतवाद मान्य नाही. मग अफगाण आणि मोगलांच्या राज्याला काय म्हणायचे ? टिपू इंग्रजांविरुद्ध लढला. त्याला तात्त्विक मुलामा देऊन त्याचे उदात्तीकरण कादंबरीत करता येणे शक्य असले तरी इतिहासात त्याला प्रमाण नाही. इंग्रजांविरुद्ध लढण्याची टिपूची प्रेरणा साधी आणि नैसर्गिक होती, ती आपले राज्य वाचविण्याची. इंग्रजांचा त्याला एवढा धोका वाटत होता तर त्याला शेजारच्या मराठे व निझाम यांच्याशी एकी करता आली असती. ती त्याने केली नाही. कारण स्वतःच्या राज्यापलीकडे पाहण्याची त्याची दृष्टी नव्हती. त्या वेळच्या अनेक

राजांची नव्हती. टिपूला त्यासाठी दोष देण्याचेही कारण नाही. पण वृथा फुगविण्यातही अर्थ नाही.

टिपू मानवतावादी होता, त्याच्या दृष्टीने सर्व धर्म समान होते, असे साक्षात्कारी वर्णन कादंबरीत आले आहे. तेही इतिहासाला धरून नाही. त्या वेळच्या सर्वच राजवटींना प्रामुख्याने धर्माचा आधार होता. मात्र त्याचा अर्थ इतर धर्मीयांचा सारखा छळच होत असे, असे नाही.

टिपूचे राज्य हे तर मूळचे हिंदू राजाचे राज्य. टिपूच्या बापाने, हैदरने ते बळकावले. त्यानंतर टिपूने स्वत:ला राजा किंवा सुलतान म्हणूनच घोषित केले. त्याची प्रजा बहुसंख्य हिंदू. त्या वेळच्या पद्धतीने राजा बदलला तरी गावपातळीवरील रचना मुळापासून बदलत नसे. टिपूच्या दरबारात अनेक हिंदू होते. ते हैदरपासूनच होते. परंतु हे सांगत असताना टिपूने हिंदूंचे अनेक वेळा, मोठ्या प्रमाणावर सक्तीने धर्मांतर केले, यावर पांघरूण घालण्याचे कारण नाही. धर्मांतर धर्माचा भाग म्हणून केले नाही, राजकारणाचा भाग म्हणून झाले असे समर्थन काही करतात. परंतु ही विभागणी कृत्रिम आहे. शिवाय राजकारणाचा भाग म्हणून जरी ही धर्मांतरे झाली असली तरी ती अपवाद कशी ठरतात ? सर्व धर्म सारखेच आदरणीय आहेत, ही टिपूची धारणा होती, असे जर लेखक उच्चरवाने सांगत असेल तर त्याच्या प्रतिपादनाला यामुळे बाध येत नाही का ? टिपूवर आक्षेप घेणाऱ्यांनी अशा सक्तीच्या धर्मांतराची अनेक उदाहरणे दिली आहेत. ती सबळ आहेत. अनेक इंग्रज इतिहासकारांनीही ती दिली आहेत. इंग्रज टिपूच्या विरुद्ध होते म्हणून त्यांनी टिपूचे असे विकृत चित्रण केले, असा लेखकाचा आक्षेप आहे. तो सरसकट मान्य करता येणार नाही. लेखकाने धुंडाळलेल्या इतर देशीय साहित्यात धर्मांतराचा उल्लेख कुठे आलाच नाही, असे विधान छातीठोकपणाने लेखकाने केलेले नाही.मलबारमध्ये टिपूने मोठ्या प्रमाणावर धर्मांतर घडवून आणले याविषयी सर्व भारतीय लेखकांत एकवाक्यता आहे. मलबारवर टिपूने १४ वर्षांत तीन वेळा मोठी आक्रमणे आणि अनेक छोटी आक्रमणे केली हे ऐतिहासिक सत्य असताना कादंबरीत या एवढ्या महत्त्वाच्या कालखंडाला किती स्थान मिळायला हवे होते ? हा भाग त्यात आला नाही, कारण मग कादंबरीतील नायकाच्या चरित्रातील सर्वधर्मसमभावाचा डोलारा कोसळून पडला असता. लेखकाच्या मनात जो टिपू साकारला होता त्याच्या एकसंध व्यक्तिमत्त्वाला त्यामुळे तडा गेला असता.

वास्तविक टिपूत जसे अनेक गुण होते, तसेच दोषही होते. इंग्रजांविरुद्ध त्याने चांगली लढाई दिली. फ्रेंचांचे साह्य मिळविले. पार नेपोलियनपर्यंत संधान बांधले. तो स्वत: शूर होता. शेवटच्या लढाईत स्वत:चा जीव वाचविण्यापेक्षा त्याने वीरमरण

पत्करले. इंग्रजांनी त्याची दोन मुले ओलीस ठेवून अपमानास्पद तह करायला भाग पाडल्याने तो चवताळून उठला. या सर्व गोष्टी त्याच्या चरित्राला उठाव देणाऱ्या आहेत. परंतु त्याचे क्रौर्य, धर्मवेड, इतरांची स्वातंत्र्यप्रेरणा दडपून टाकण्याची वृत्ती, त्यासाठी कुर्गी लोकांविरुद्ध त्याने केलेल्या लढाया, मलबारात आणि इतरत्र केलेले सक्तीचे धर्मांतर अशा अनेक गोष्टी त्याला तेवढ्याच उणेपणा देणाऱ्या आहेत. या सर्व गोष्टी ज्यात एकत्रित आहेत, असा टिपू रंगविणे हे महान कादंबरीकाराला केवढे आव्हान वाटले असते. परंतु गिडवाणी यांना हा विषय पेलवला नाही. त्यांनी टिपूचे एकाच एका श्वेत रंगात चित्रण करून एक सामान्य दर्जाची कादंबरी निर्माण केली. त्यामुळे टिपूला अखेर आपण न्याय दिला, असे फसवे समाधान त्यांना मिळाले असेल. त्याला कोणाची हरकत नसावी. परंतु ऐतिहासिक सत्यापासून बऱ्याच बाजूला गेलेल्या अशा कादंबरीवर कोट्यवधी लोकांपर्यंत एकाच वेळी पोहोचणारी व जवळजवळ वर्षभर चालेल, अशी मोठी मालिका तयार करणे, हा मात्र वादाचा रास्त विषय होऊ शकतो.

त्यामुळे कादंबरी वादविषय झाला नाही, तरी मालिका मात्र वादविषय झाली आहे. टिपूचे गौरवशाली चित्र रेखाटणारे गिडवाणी एका बाजूला आहेत आणि त्यावर प्रतिक्रिया म्हणून टिपू सुलतानचे केवळ खलनायकाला शोभेल असे वर्णन करणारी दुसरी पुस्तकेही येत आहेत. श्री. ब.ना. जोग यांचे तशा प्रकारचे एक पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले आहे. 'हिंदू विरुद्ध मुसलमान' या एकाच अंगाने त्यांनी टिपूचा विचार केला आहे. हिंदूंविरुद्ध जेहाद किंवा धर्मयुद्ध करणारा धर्मांध सुलतान एवढी एकच ओळख यात होते. सर्व दक्षिण इस्लाममय करणे एवढेच प्रेषितासारखे टिपूचे उद्दिष्ट होते हे त्यांचे मूल्यमापन आहे. त्याच्याशी सहमत होण्याचे कारण नाही. परंतु टिपूवरील दूरदर्शन मालिकेला त्यांचा विरोध आहे, एवढे लक्षात घेतले पाहिजे. ही मालिका आधीच्या सरकारने मान्य केली. कादंबरीवर आधारित मालिका यापेक्षा अधिक खोलात जाऊन कोणी पाहिले असल्याची शक्यता नाही. शिवाय इंग्रजांविरुद्ध लढताना मरण आल्याने टिपू हुतात्मा झाला होता. निदान जनमानसात ही प्रतिमा होती. त्यामुळे त्याला हरकत घेण्याचे वरवर कारण नव्हते. परंतु कादंबरी आणि ऐतिहासिक कादंबरी याचा किमान दूरदर्शन मालिकेचा विचार करताना तरी खोलात जाऊन विचार केला पाहिजे. कच्चे दुवे सर्जनशीलतेने भक्कम करण्याचे स्वातंत्र्य ऐतिहासिक कादंबरी लिहिताना लेखकाला आहे. चरित्रनायकाचे मनोवैज्ञानिक विश्लेषण करून त्याच्या कृतींना ध्येयाचा, धोरणांचा अर्थ तो लावू शकतो. त्यातील घटना, व्यक्ती यांना संदर्भ देऊ शकतो. परंतु होत्याचे नव्हते करण्याचे स्वातंत्र्य त्याला घेता येणार

नाही. असे स्वातंत्र्य त्याने घेतलेच तर दूरदर्शनसारख्या प्रभावशाली माध्यमातून आपले हे कलेचे स्वातंत्र्य व्यक्त झालेच पाहिजे, असा आग्रह धरता येणार नाही. ऐतिहासिक सत्य आणि कलाकृतीतील वाङ्मयीन सत्य जर उत्तर आणि दक्षिण ध्रुवाइतके दूर असतील तर त्याला नेहमीचे निकष लावता येणार नाहीत. म्हणून अशा तऱ्हेच्या मालिकेला मान्यता देण्यापूर्वी लेखक, निर्माते आणि संबंधित विषयातील तज्ज्ञ यांच्यात किमान एकवाक्यता होणे जरुरीचे आहे. माझ्या कादंबरीतील एक वाक्य, एक शब्द, एक स्वल्पविरामही बदलण्याचा अधिकार कोणाला नाही हा गिडवाणी यांचा आग्रह आहे. तो त्यांना कायम ठेवायचा असेल तर त्यावर दूरदर्शन मालिका करण्याचा आग्रहही त्यांनी सोडून द्यायला हवा. या माध्यमाची ताकद मोठी आहे म्हणूनच त्याच्यावर मर्यादाही आहेत.

•

प्रकरण १७

# काश्मीर : हिंदू राष्ट्रवाद विरुद्ध सेक्युलर डेमॉक्रसी

काश्मीरचे राज्यपाल जगमोहन यांना शेवटी राजीनामा देण्यास भाग पाडण्यात आले. काश्मीरबाबत देशात दोन भिन्न मतप्रवाह आहेत याचे स्पष्ट दर्शन जगमोहन यांच्या राजीनामा प्रकरणाने झाले. भाजप एका बाजूला आणि बाकीचे पक्ष दुसऱ्या बाजूला अशी या राजकीय मतप्रवाहांची स्वच्छ विभागणी आहे. हिंदू राष्ट्रवाद विरुद्ध सेक्युलर डेमॉक्रसी अशा दोन ढोबळ चौकटीत या मतभिन्नतेला बसविता येईल. काश्मीरमध्ये आज जे घडते आहे त्याला पाकिस्तानची सरकारी पातळीवर मोठ्या प्रमाणावर उघड चिथावणी असल्याने भारत-पाक संघर्षाचा संदर्भही अपरिहार्य आहे. पाकिस्तानच्या निर्मितीचा आधार द्विराष्ट्रवादाची धार्मिक संकल्पना असल्याने हिंदू विरुद्ध मुस्लिम या जातीय परिमाणाचा आधार घेऊनही कामीरच्या आजच्या स्थितीचे मूल्यमापन केले जाते.

काश्मीरचा प्रश्न व्ही.पी. सिंग यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय आघाडीचे सरकार अधिकारावर आल्यानंतर नव्याने निर्माण झालेला नाही. राजीव गांधी यांच्या सरकारने दिलेल्या वारशापैकीच काश्मीरचा प्रश्न एक आहे. डॉ. फारूक अब्दुल्ला यांच्या नेतृत्वाखाली नॅशनल कॉन्फरन्स व काँग्रेसचे संयुक्त सरकार काश्मीरमध्ये सत्तेवर होते व त्यांच्याच कारकीर्दीत काश्मीरमधील आजच्या फुटीरतावादी व अतिरेकी कारवायांना सुरुवात झाली.

या अतिरेक्यांच्या हिंसक कारवायांना प्रतिबंध करणे हे सरकारपुढील अग्रक्रमाचे काम आहे. जगमोहन यांची राज्यपालपदी नेमणूक करताना सरकारच्या मनात हाच विचार प्राधान्याने असणार. काश्मीर खोऱ्यातील अतिरेक्यांच्या कारवायांचा बंदोबस्त करून तेथे कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी काश्मीरमधील परिस्थितीची माहिती असणारा, तेथील लोकमताची जाण असणारा कार्यक्षम अधिकारी म्हणूनच जगमोहन यांची राज्यपालपदी नियुक्ती झाली होती. १९८४ मध्ये त्यांची काश्मीरच्या राज्यपालपदी प्रथम नेमणूक झाली. त्या वेळी ते इंदिरा

गांधी व राजीव गांधींच्या जवळचे होते. डॉ. फारूक अब्दुल्ला मात्र त्या वेळी काँग्रेसच्या जवळ नव्हते. राजीव गांधींच्या सांगण्यावरून त्या वेळी डॉ. अब्दुल्ला यांचे सरकार त्यांनी बरखास्त केले. पुढे सत्तेसाठी फारूक यांना राजीव गांधींशी जवळीक साधणे आवश्यक ठरले. १९८७ च्या निवडणुकीनंतर तर नॅशनल कॉन्फरन्स व काँग्रेस यांचे संयुक्त सरकार काश्मीरमध्ये सत्तेवर आले. काश्मिरी लोक व तेथील नेतृत्वात अंतराय पडून अतिरेकी व फुटीरतावादी चळवळीला जोर चढला तो या संयुक्त सरकारच्या कारकीर्दीत. हे सरकार 'आपले' नाही आणि सत्तेसाठी डॉ. फारूक अब्दुल्ला दिल्लीच्या दावणीला बांधले गेले आहेत ही भावना काश्मीरी जनतेत बळावली ती प्रामुख्याने याच काळात. शेख अब्दुल्लांच्या निधनानंतर ज्यांनी फारूकला डोक्यावर घेतले, काँग्रेस व भाजपच्या विरोधात प्रचंड बहुमताने निवडून दिले तोच फारूक काँग्रेसबरोबर सत्तेत सहभागी झाल्यानंतर लोकांच्या मनातून उतरला. डॉ. अब्दुला अप्रिय होण्याची आणखी काही कारणे असली तरी दिल्लीपासून योग्य अंतर त्यांना ठेवता आले नाही, आपले स्वतंत्र अस्तित्व राखता आले नाही हेही त्याचे महत्त्वाचे कारण होते. देशहिताचा विचार करून काँग्रेसने काश्मीरमध्ये स्वत:कडे मोठ्या मनाने विरोधी पक्षाची जबाबदारी घ्यायला हवी होती. त्यामुळे ते लोकांच्या अधिक जवळ जाऊ शकले असते. काश्मिरींना फुटीरतावाद्यांच्या आणि पाकिस्तानी हस्तकांच्या प्रभावापासून बाजूला ठेवू शकले असते. त्यांना राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी काम करू शकले असते; परंतु काँग्रेसला आपली भूमिका वठविता आली नाही आणि जगमोहन यांनी राज्यपाल म्हणून त्या वेळी त्यांना योग्य सल्लाही दिला नाही. आणीबाणीच्या काळात वादग्रस्त ठरलेले आणि इंदिरा गांधी, राजीव गांधी, काँग्रेस यांच्याशी घनिष्ठ नाते असलेल्या जगमोहन यांना काश्मीरमध्ये राज्यपाल म्हणून पाठविण्याचा निर्णय घेतानाच राष्ट्रीय आघाडी सरकारने शंभरदा विचार करायला हवा होता, तसा तो त्यांनी केला नाही.त्यांना परत बोलावण्याची मागणी सुरू होताच त्यांची जोरदार व उघड पाठराखण केली ती भाजपने. म्हणजे काश्मिरी लोकांना ज्यांच्याबद्दल विशेष आकस आहे अशा काँग्रेस व नंतर भाजप या दोन्ही पक्षांच्या जवळच्या माणसाला केवळ प्रतिमेचा विचार करताही राज्यपाल म्हणून नेमायलाच नको होते. 'अतिरेक्यांचा बंदोबस्त'या केवळ 'पोलिसी' कामासाठी कार्यक्षम परंतु वादग्रस्त नसलेली व्यक्ती सापडणे अवघड नव्हते. नवे राज्यपाल गिरीशचंद्र सक्सेना हे त्या वेळीही उपलब्ध होऊ शकले असते. इतरही काही नावे होती. त्यामुळे जगमोहन यांना परत बोलावून सरकारने आपली चूक सुधारली आहे. त्यांच्या काळात झालेल्या अनेक हिंसक घटनांनी अतिरेक्यांना अकारण लोकांची सहानुभूती

मिळाली. अतिरेकी 'हीरो' ठरायला लागले आणि प्रशासन व नागरिक यांच्यातील दुरावाही वाढला. मीरवाइज मौलवी फारूक यांच्या हत्येनंतर झालेला हिंसाचार लक्षात घेता त्यांनी तेथे राहणे सूज्ञपणाचे नव्हते. मीरवाइज यांच्या पाठीराख्यांची संख्या मोठी होती. त्यांच्या मनात अतिरेक्यांबद्दल, पाकिस्तानी हस्तक्षेपाबद्दल घृणा निर्माण करण्याची ही नामी संधी होती. ती हातची घालविली, एवढेच नाही तर त्याचा फायदा पुन्हा हत्या करणाऱ्यांनाच मिळाला. जगमोहन यांची राज्यपाल म्हणून उपयुक्तता त्यानंतर पूर्णपणे संपुष्टात आली. त्यांना परत बोलाविण्याशिवाय पर्यायच नव्हता.

जगमोहन गेले असले तरी काश्मीर प्रश्न त्यामुळे सुटणार नाही. काश्मीर प्रश्नाचे स्वरूप वस्तुनिष्ठपणे समजून घेतल्याशिवाय त्यावरील उपाययोजना यशस्वी होऊ शकणार नाही. काश्मीरमध्ये आज 'आझादी'साठी आंदोलन सुरू आहे आणि पाकिस्तानचा त्याला पाठिंबा आहे. काश्मीरवरून भारताशी युद्ध करण्याची पाकिस्तानची तयारी आहे. यापूर्वी १९४८ व १९६५ मध्ये झालेल्या दोन्ही युद्धांचे कारण काश्मीर आहे. १९७१ चे युद्ध बांगला देशाशी संबंधित असले तरी काश्मीरमध्ये ते लढले गेलेच. काश्मीर आज भारताचा कायदेशीर व अविभाज्य भाग आहे, परंतु पाकिस्तानला ही वस्तुस्थिती बदलायची आहे. भारत-पाक संघर्षाचा काश्मीर हा केंद्रबिंदू आहे; परंतु दुर्दैवाने पाकिस्तानची बाजू केवळ लष्करीच नव्हे, तर कायदा व नैतिकतेच्या पातळीवरही कमकुवत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील घटनांशी त्याचा संबंध आहे.भारत हे हिंदू व मुस्लिम असे द्विराष्ट्र आहे ही मुस्लिम लीग व त्याचे अध्वर्यू बॅ.जीना यांची भूमिका होती. भारताची फाळणी झाली ती याच तत्त्वावर. फाळणीचे हे तत्त्व त्या वेळच्या सर्व भारतीय पुढाऱ्यांनी व ब्रिटिशांनी मान्य केले होते. काश्मीरची लोकसंख्या त्या वेळीही ९० टक्के मुस्लिम होती व प्रादेशिक सलगता होती. वरील न्यायाने काश्मीर पाकिस्तानात यावा असे बॅ.जीना वगैरेंना वाटणे स्वाभाविक होते. काश्मीरचा राजा हरिसिंग हिंदू होता. भारतात राहायचे की पाकिस्तानात जायचे हा पर्याय त्याच्यापुढे होता. परंतु भारत स्वतंत्र होईपर्यंत म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत त्यांनी याबाबत भारताच्या बाजूने निर्णय घेतलेला नव्हता. भारत स्वतंत्र झाला त्या वेळी काश्मीर हा भारताचा भाग नव्हता ही वस्तुस्थिती आपण लक्षात ठेवायला हवी आणि हा राजा 'हिंदू'असूनही त्याने हिंदुस्थानात स्वतःचे राज्य आपखुशीने विलीन केलेले नव्हते ही गोष्ट येथील हिंदुत्ववाद्यांनी प्रकर्षाने लक्षात ठेवायला हवी. भारत स्वतंत्र झाला त्या वेळी शेख अब्दुल्ला हरिसिंग यांच्या कैदेत होते. काश्मीरच्या या डोग्रा राजाने भारतात विलीन व्हायचा करार केला तो नाइलाजाने. पाकिस्तानने आपले घुसखोर

आणि सैन्य काश्मीरमध्ये घुसविल्यानंतर. त्याउलट संपूर्ण स्वातंत्र्य चळवळीत शेख अब्दुल्ला राष्ट्रीय नेत्यांबरोबर होते. मुस्लिम लीगबरोबर गेले नाहीत. मुस्लिम कॉन्फरन्स या त्यांच्या संघटनेचे नॅशनल कॉन्फरन्स असे नामांतर त्यांनी १९३९ मध्ये केले. फाळणीनंतर त्यांनी पाकिस्तानात जावे यासाठी जीनांनी अनेक प्रलोभने त्यांना दाखविली; परंतु जातीयवादी पाकिस्तानपेक्षा सेक्युलर इंडिया त्यांना जवळचा वाटला. त्यांनी ठरविलेच असते तर १९४७ मध्येच काश्मीर पाकिस्तानाचा भाग झाला असता. तुम्ही पाकमध्ये विलीन व्हा असा सल्ला खुद्द माऊंटबॅटन यांनी राजा हरिसिंग यांनाही दिला होता. असे असूनही काश्मीर आज भारताचा भाग आहे. त्यासाठी शेख अब्दुल्लांचे ऋण मान्य केले पाहिजे. हा भारत सेक्युलर, लोकशाहीवादी, मानवी मूल्यांचे श्रेष्ठत्व मानणारा असा असेल यावर स्वातंत्र्य चळवळीतील पुढाऱ्यांकडे पाहून कोणाचाही विश्वास बसला असता. त्यामुळेच फाळणीच्या वेळी देशभर हिंदू-मुस्लिम दंगे झाले असले तरी काश्मीर त्यापासून पूर्णपणे अलग होता. त्या काळात अल्पसंख्य असूनही हिंदूंच्या केसालाही धक्का लागला नाही. यानंतर आपण होऊन हा वाद युनोत नेला. कारण नसताना पाकिस्तान या वादात एक पक्ष झाला आणि काश्मीरमध्ये 'सार्वमत' घेण्याचे आश्वासन आपण दिले. वेगळेपण लक्षात घेऊनच घटनेतील ३७० व्या कलमानुसार काश्मीरला विशेष दर्जा देण्यात आला. गेल्या चाळीस वर्षांतील सर्व घटनांचा तपशिलाने आढावा घेण्याची आवश्यकता नसली तरी सर्वसाधारणपणे काश्मिरी जनता पाकिस्तानपेक्षा भारताच्या बाजूनेच राहिली आहे. १९४८, ६५ व ७१ या तिन्ही युद्धांच्या वेळी त्यांनी काश्मीरचे भारताचा भाग म्हणून पाकविरुद्ध संरक्षण करण्यात भाग घेतला याच्या अनेक हकीकती सांगता येतील. काश्मीर हा पाकिस्तानचा कधीही भाग नव्हता, तेथील प्रजेने पाकिस्तानच्या निर्मितीमागे असलेला द्विराष्ट्रवाद सिद्धान्त कधीही मान्य केला नाही, तेथील राजाने कायदेशीरदृष्ट्या काश्मीरचे भारतात विलीनीकरण केले, हे विलीनीकरण तेथील जनतेने मान्य केले, त्याप्रमाणे आपले लोकप्रतिनिधी निवडून राज्यकारभार केला आणि काश्मिरी जनतेचा एकमेव महान नेता शेख अब्दुल्ला हे भारतीय घटनेअंतर्गत स्थापन झालेल्या राज्यव्यवस्थेचा भाग म्हणून मृत्यूपर्यंत मुख्यमंत्री राहिले. या सर्व गोष्टी एकत्रित केल्या की पाकिस्तानचा काश्मीरवर काडीइतकाही हक्क नाही हे स्पष्ट होते. म्हणूनच आंतरराष्ट्रीय पातळीवर काश्मीर प्रश्नावर पाकिस्तानला यापुढे पाठिंबा मिळणे अशक्य झाले आहे. अमेरिका या पाकच्या सर्वांत जवळच्या मित्रराष्ट्राचा आणि मुस्लिम राष्ट्रांचाही त्याला अपवाद नाही. पाकिस्तान आणि काश्मीर या गोष्टी एकत्र येऊच शकत नाहीत. काश्मीरचा प्रश्न भारताचा अंतर्गत

प्रश्न आहे असे आता सर्वजण मानतात त्याला हा आधार आहे.

पाकिस्तान मात्र काश्मीर प्रश्नाला आंतरराष्ट्रीय किंवा किमान दोन देशांतील वादाचे स्वरूप देत आहे. एका अर्थाने हा दोन देशांतील वादग्रस्त प्रश्न आहे त्याचे कारण पाकिस्तानने १९४८ मध्ये बळकावलेला काश्मीरचा १/३ भाग. तथाकथित आझाद काश्मीर. तो पाकिस्तानकडून परत मिळविण्याचा भारताला न्याय्य हक्क आहे आणि त्यासाठी युद्ध करण्याचा पर्यायही आपण स्वीकारू शकतो. परंतु पाकव्याप्त काश्मीर हा वादाचा मुद्दा आज कोणी केलेला नाही. आज वाद आहे तो पाकिस्तान काश्मीरमध्ये भारतविरोधी कारवायांना करीत असलेली मदत. अतिरेक्यांना पैसे, प्रशिक्षण देण्यापासून आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रचार आघाडी उघडण्यापर्यंत पाकिस्तानने उघड भूमिका घेतली आहे. काश्मीरमधील जनमत अनेक कारणांनी भारतविरोधी झाले असले तरी ते पाकिस्तानच्या बाजूने झाले आहे असा त्याचा अर्थ नाही. काश्मीरचा मुख्य प्रवाह भारताच्या बाजूने राहिला असला तरी स्वतंत्र काश्मीरची मागणी करणारे बरेच, आणि काही पाकधार्जिणे गटही काश्मीरमध्ये अनेक वर्षे कार्यरत आहेत. आजही सार्वमत घेतले तर पाकिस्तानच्या बाजूने त्याचा निर्णय होणार नाही. त्यामुळे या अतिरेक्यांच्या गटांचा बंदोबस्त करीत असताना संपूर्ण जनमत भारतविरोधी होणार नाही याची सर्वात जास्त काळजी घेतली पाहिजे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर काश्मीरबाबत भारताला पाठिंबा आहे त्याचे कारण केवळ कायदेशीर नसून सेक्युलर , लोकशाही या तत्त्वावरील भारतीय राष्ट्रवादाच्या रूपात सर्व जाती, जमातींचे मूलभूत मानवी हक्क व लोकशाही स्वातंत्र्य अबाधित राहील या विश्वासापोटी. ३७० वे कलम हा त्याचा पुरावा आहे. ते ज्या क्षणी रद्द होईल त्या दिवशी आपण आपला पराभव करू आणि काश्मीरच्या भारताबाहेरील अस्तित्वाला सबळ कारण मिळवून देऊ. या ३७० व्या कलमाचा गेल्या ४० वर्षांत खूपच संकोच झाला असून, व्यावहारिकदृष्ट्या काश्मीरचे स्वतंत्र अस्तित्व संपुष्टातच आले आहे. केवळ काश्मीरलाच नव्हे तर इतर सर्वच प्रांतांना, लोकसमूहांना अधिकाधिक स्वायत्तता देण्याची गरज निर्माण झाली आहे. पंजाबपासून आसामपर्यंत त्याची अनेक उदाहरणे आहेत. त्या वेळी विशेष परिस्थितीत , विशेष कारणासाठी दिलेले अधिकारही काढून घेण्याची भाषा आत्मघाताची आहे. स्वातंत्र्याच्या प्रेरणा कधीच दडपता येत नाहीत हे रशिया, चीन आणि पूर्व युरोपसह सर्वत्र प्रकर्षाने सिद्ध होत असताना भारत मात्र अतिकेंद्रित केंद्रीय व्यवस्थेचा आग्रह धरीत राहिला तर काहीच टिकणार नाही. धर्माच्या एकखांबी तंबूखाली हा देश एकत्र राहू शकत नाही. काश्मीरला आज आश्वासन

हवे आहे ते व्ही.पी. सिंग किंवा राजीव गांधी यांच्याकडून नव्हे, तर लालकृष्ण अडवाणी यांच्याकडून. ३७० वे कलम रद्द करण्याची मागणी भाजपने सोडून दिली तर काश्मीरबाबत केंद्र सरकार अधिक खंबीर भूमिका घेऊ शकेल, कारण भाजपच्या क्रिटिकल पाठिंब्यावरच ते उभे आहे. भाजपने ही मागणी सोडून दिली तर काश्मीर पेचप्रसंगात पुढाकार घेण्यास त्यांच्याएवढा पात्र पक्ष आज नाही. हिंदू विरुद्ध मुस्लिम असे स्वरूप काश्मीरमधील परिस्थितीचे कधीच नव्हते. तसे ते करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू असावा असा अनेकांचा आक्षेप आहे. माजी राज्यपाल जगमोहन यांनीही या आक्षेपाला खतपाणी घातले आहे. काश्मीरमध्ये हिंदूविरुद्ध मुस्लिम आणि पंजाबमध्ये हिंदूविरुद्ध शीख असा डाव खेळण्याचा प्रयत्न झालाच तर ते या देशाच्या अखंडतेला लावलेले मोठेच सुरुंग ठरतील. लष्करी सामर्थ्यापेक्षा लोकशाही, धर्मनिरपेक्षता, मानवतावाद ही मूलभूत तत्त्वेच या देशाचे संरक्षण अधिक समर्थपणे करू शकतील. काश्मीरचाही त्याला अपवाद नाही.

प्रकरण १८

# सरकारच्या डोक्यावर हेल्मेट

ट्रक, टेंपो आणि रिक्षा, टॅक्सी यांचा संप सरकारच्या आश्वासनानंतर अखेर मागे घेण्यात आला. संपामुळे जनजीवन विस्कळित झाले. या व्यवसायाचा दैनंदिन जीवनाशी किती अतूट संबंध आहे, याची प्रचिती आली. नवा कायदा करताना संबंधित व्यावसायिकांना विश्वासात घेण्यात आले नाही, असा एक आक्षेप प्रथमपासून घेण्यात आला. त्याचा प्रतिवादही करण्यात आला. परंतु इतक्या महत्त्वाच्या कायद्यात असे मूलभूत बदल करीत असताना ज्या तऱ्हेने त्याची सार्वजनिक चर्चा व्हायला हवी, ती झाली नाही. लोकजीवनाशी निगडित कायदे करताना विशेष काळजी घेतली पाहिजे. लोकमत समजावून घेतले पाहिजे यांविषयी सरकारला फारशी आस्था नसल्याचे अलीकडे वारंवार दिसू लागले आहे. पंचायत राज्याचे विधेयक असो की नगरपरिषदांचे, मुस्लिम स्त्रियांच्या घटस्फोटासंबंधी असो की, बदनामीबाबत, घाईघाईने ही विधेयके संसदेत मांडली जातात. त्यावर सरकारचे उत्तर असे की, त्यावर वर्ष-दीड वर्ष विचार सुरू होता. मग तो सामान्य लोकांपर्यंत का जात नाही? पंचायत राज्य विधेयक मांडण्यास परवानगी मागतानाच्या अवस्थेतच विरोधी पक्षांनी अनेक हरकती उपस्थित केल्याने त्यावर पुष्कळ चर्चा तरी झाली, परंतु नगरपालिकांसंबंधीच्या विधेयकाबाबत एका अवाक्षराने कोणी कुठे बोलले नाही. वास्तविक या विधेयकाचा संकल्पित मसुदा देशातील प्रत्येक नगरपालिकेत आणि महापालिकेत नगरसेवकांनी फाडून खायला हवा होता. आपल्यासंबंधी नवा कायदा येऊ घातला आहे, याविषयी किती नागरिकांना आणि नगरसेवकांना कल्पना असेल ? हाताच्या बोटांवर मोजता येईल एवढ्याच ! संसदेला कायदे करण्याचा अधिकार असला तरी लोकमत सातत्याने अजमाविणे हा लोकशाहीचा गाभा आहे. आमच्याकडे लोकशाही म्हणजे दर पाच वर्षांनी निवडणुका आणि मग सारे कसे शांत. वाहतूक व्यावसायिकांच्या संपाबाबत लोकमत प्रतिकूल होते. कारण त्यांच्या रोजच्या जगण्यात व्यत्यय येत होता.

पण ज्या कायद्याच्या विरोधात हा संप त्यांनी केला, तो कायदा करताना सरकारनेही लोकमत विचारात घेतले नव्हते, हे विसरता कामा नये.

दूरदर्शन व आकाशवाणी यांसारखी माध्यमें यासाठी खरे तर उपयोगात यायला हवीत. प्रस्तावित कायदा, त्यातील तरतुदी, त्याचे परिणाम, लोकांच्या त्यावर प्रतिक्रिया, तज्ज्ञांचे मत, येथील वास्तव यांसारख्या अनेक गोष्टींचा ऊहापोह होऊन त्याचे शेवटी कायद्यात रूपांतर व्हायला हवे. आपण आधी कायदा करतो, नंतर त्यावर चर्चा करतो व शेवटी नव्या कायद्यात बदल करण्याचे आश्वासन देऊन मोकळे होतो. कायद्याने बदल की बदल झाल्यांवर कायदा, हा प्रश्न आधी झाड की आधी बी एवढा नक्कीच गहन नाही!

मोटार वाहन अधिनियम १९८८ याचेच उदाहरण घेऊ. या कायद्यात बदल करण्याची गरज आहेच. कारण मूळचा कायदा १९३९ मध्ये झालेला आणि गरज वाटेल त्याप्रमाणे त्यात बदल होत गेलेले. तसे तर अनेक कायदेच आता पूर्णत: नव्याने लिहायला हवेत. परंतु सरकार नोकरशाही पद्धतीने याकडे पाहते. त्यामुळे अशी सूचना करण्याचे धाडस कोणी करीत नाही. नवा(लोकविरोधी) वन कायदा हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. बिघडलेल्या परिस्थितीवर उपाय म्हणून सरकार कायद्याकडे पाहते. परिस्थिती सुधारण्याऐवजी दंडुक्याने लोकांना गप्प करू पाहते. लोक आजारी पडू नयेत म्हणून काळजी घेण्याऐवजी लोकांना अनेक कारणांनी आजारी पाडायचं, मग दवाखान्यात त्यांना सुया टोचत बसायचं आणि वर त्याचंच आधुनिक उपचार म्हणून स्वत:च कौतुक करीत बसायचं, अशी ही तऱ्हा आहे. ट्रक्सचं बघा. मालवाहतूक करण्याचं ते आज महत्त्वाचं साधन झालं आहे आणि उद्या सर्वांत जास्त मालवाहततूक ट्रक्सनेच होणार आहे. याचं कारण स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या चाळीस वर्षांत रेल्वेच्या, ब्रिटिशांनी टाकलेल्या जाळ्यात लक्षणीय भर नाही. रेल्वेखालोखाल गुंतवणूक आहे ती बैलगाड्यांवर. देशात आज एक कोटीपेक्षा जास्त बैलगाड्या आहेत आणि पंचाहत्तर टक्के शेतीमालाची वाहतूक बैलगाड्यांतून होते. या बैलगाड्यांची जागा आता टेंपो, ट्रक्स आणि ट्रॅक्टर घेताहेत. ट्रकची संख्या वाढली म्हणजे अपघात वाढतात. एका पाहणीप्रमाणे रस्त्यांवरील ७५ टक्के अपघाताला ट्रक्स किंवा बसेस कारणीभूत असतात.

हे अपघात कमी करायचे तर अनेक गोष्टी कराव्या लागतील. वाहतुकीचे स्वरूप लक्षात ठेवून त्याप्रमाणे आखणी करावी लागेल. रेल्वे नाहीत आणि बैलगाड्या बाद म्हणजे ट्रकशिवाय पर्याय नाही. जळगावमधून उत्तर भारतात केळी पाठवायची तर रेल्वेच्या पुरेशा वाघिणी नाहीत. टोमॅटो आणि द्राक्षं यांसारखा नाशवंत माल घेऊन महाराष्ट्रातून दिल्लीकडे ट्रक्स बेफाम धावताहेत हे दृष्य विदारक आहे.त्यामुळे

अपघात होणारच. किती लांब अंतराची वाहतूक ट्रकने व्हावी याला मर्यादा आहेत. त्या मर्यादा ओलांडल्या आहेत. त्याला ब्रेक लावायचा तर किमान चांगले महामार्ग आणि सुविहित, नियंत्रित वाहतूक हवी, तीही नाही. महामार्गांचा दर्जा त्याला न शोभणारा. शिवाय एकाच रस्त्यावरून बैलगाडीही जाणार आणि ट्रकही! 'बैलगाडीला चुकविताना अपघात झाला' या बातम्या अपवादात्मक नसतात. पुण्याहून मुंबईला जाताना तीन ते चार तास लागायला हवेत. तो प्रवास आज किमान पाच तासांचा झाला आहे. विशेष अडचण असेल तर बारा ते सोळा तासही लागतात. ही स्थिती म्हणजे अपघाताला आमंत्रणच. या रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांची संख्या अफाट वाढली. , त्यांचा आकार आणि माल वाहून नेण्याची क्षमता वाढली तरी रस्त्याच्या मूळ स्वरूपात तुलनेने फारशी सुधारणा नाही.

१९५१ मध्ये वाहनांची संख्या तीन लाख होती. आज ती एक कोटी वीस लाख झाली आहे. म्हणजे चाळीस पटीने वाढ. याच काळात रस्त्यांची लांबी मात्र फक्त चार पटीने वाढली. रस्त्यांवर जास्त वाहने आणि त्याला नियंत्रण नाही म्हणजे अपघातांना हमखास निमंत्रण. गेल्या वीस वर्षांतच अपघातांची संख्या दुपटीने वाढली. त्यात ठार होणाऱ्यांची संख्या तर तिपटीने. १९७० मध्ये अपघातात ठार झालेल्यांची संख्या देशात चौदा हजार होती. ती आता चाळीस हजारांवर गेली आहे. हे प्रकरण याच गतीने वाढत गेले तर पुढच्या दहा वर्षांनी, म्हणजे आपण एकविसाव्या शतकात पदार्पण करू त्या वेळी अपघातात मरण पावणारांची संख्या वर्षाला सव्वा लाखापेक्षा जास्त असणार आहे. दर मिनिटाला एक अपघात ही त्या वेळची वस्तुस्थिती असेल. या संकटाचा सामना करण्याचे प्रयत्न सरकार करते आहे असे आजचे चित्र नाही. रस्त्यांची वाईट स्थिती, धोकादायक घाट, मदतीची अपुरी व्यवस्था, ड्रायव्हर वगैरे मंडळींना विश्रांतीच्या सोयी नसणे, ट्रक दुरूस्तीची योग्य सोय नसणे. हा लोकांचा रोजचा अनुभव आहे. बेदरकार गाडी चालविण्यामुळे अपघात होतातच. त्यासाठी ड्रायव्हरला योग्य प्रशिक्षण आणि त्यानंतर कायद्यात शिक्षेची तरतूद असायला हवीच. पण अपघाताची सगळी जबाबदारी त्यांच्यावर टाकून सरकारला मोकळे होता येणार नाही. सरकार अशा तऱ्हेने मोकळे होऊ इच्छिते असे लोकांना वाटते.

शहरी वाहतुकीचा महाराष्ट्रापुरता किंवा अगदी पुण्यापुरता विचार करू. महाराष्ट्रात आजमितीला २३ लाख वाहने आहेत. भारतात याबाबत महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आहे. अवघ्या दहा वर्षांत ही संख्या साडेतीन पटीने वाढली आणि सरकारच्या वाहनांपासूनच्या उत्पन्नात पाच पट वाढ झाली. पुण्यात तर आज

दिवसात अडीचशें वाहनांची नोंद होते. या वाहनांत दुचाकी वाहनांची संख्या जास्त आहे. गिअर नसलेली वाहने चालवायला आता सोळा वर्षांवरील सर्वांनाच परवाना मिळणार आहे. त्यामुळे हा वेग आणखी वाढेलच. एकेकाळी सायकल हे कॉलेज विद्यार्थ्यांचे वाहतुकीचे एकमेव साधन होते. पुण्याला सायकलसिटी (ऑफ इंडिया) म्हणण्याएवढ्या सायकली शहरात होत्या. आता सायकलस्वाराची कुचेष्टा व्हायला वेळ लागणार नाही अशा तऱ्हेने जाहिरातींचा मारा सुरू आहे. पण याचबरोबर पुण्यातील अपघातांची संख्याही वाढली आहे. देशातील एकूण अपघातांच्या ४० टक्के अपघात देशातील फक्त अकरा शहरात होतात. त्यात पुण्याचा समावेश आहे. बससारखी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था कार्यक्षम करून दुचाकी वाहनांची संख्या कमी केली तर अपघातांचे प्रमाण बरेच कमी होऊ शकते असा एका पाहणीचा निष्कर्ष आहे. पुण्याच्याच सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ रोड ट्रान्स्पोर्ट या संस्थेचे सहसंचालक डॉ. बागडे यांनी तो मांडला आहे. परंतु बस व्यवस्था अत्यंत अपुरी, वाढीव अंतरे, गर्दीमुळे सायकल निरुपयोगी आणि महागडी रिक्षा, टॅक्सी यांमुळे लोकांना केवळ गरज म्हणून, अनेकदा नाइलाजाने दुचाकीचा आधार घ्यावा लागतो. रस्त्यांवर किती वाहने सामावू शकतात याला मर्यादा असतात. दर कि.मी.लांबीच्या रस्त्यामागे वाहनांचे काही प्रमाण ठरलेले असते. पुण्यांत आणि पुण्यासारख्या अनेक शहरांत ही मर्यादा केव्हाच ओलांडली गेली आहे. केंद्र सरकार वाहनांच्या उत्पादनाचे भरमसाट परवाने देते. बँका कर्जे देतात, लोकांना गरज असते, म्हणून वाहनांची संख्या वाढते. कचरा उचलण्याची किंवा शुद्ध पाणी पुरेशा प्रमाणात पुरविण्याची ताकद ज्या महापालिकांमध्ये राहिली नाही, ती रस्ता रुंदीसाठी पैसे तरी कोठून आणणार ? वाहनांची संख्या प्रचंड वाढली तरी रस्त्यांची लांबी,रुंदी आहे तशीच. रस्ता रुंद केला तरी तेथे वाहने पार्क केली जातात, किंवा हातगाडीवाले तेथे थांबतात. पदपथ बांधले तर पथारीवाले येतात. याला कारण लोकसंख्याही बेसुमार वाढते आहे. बेकारांचे लोंढे ग्रामीण भागातून शहरात येताहेत. त्यांना नोकऱ्या नाहीत म्हणून ते असा स्वयंरोजगार शोधतात. लोकांच्या स्कूटर धुणे हाही पुण्यातील मोठा व्यवसाय झाला आहे. एक बादली पाणी व दहा मिनिटं वेळ दिला की तीन रुपये कमाई होते. अनेक वेळा रस्ता रुंदीचे प्रकरण कोर्टात जाते. त्यामुळे रस्तारुंदी नाही. बससारखी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था डबघाईला आलेली. यासाठी पुरेसे पैसे पुरविण्याचे केंद्र किंवा राज्याचे धोरण नाही. अशा कात्रीत शहरे सापडतात आणि त्यांच्या प्रश्नावर पुरेसा विचार न होता, त्यांना विश्वासात न घेता लोकसभेत त्यांच्याविषयीचे विधेयक सादर केले जाते ! सार्वजनिक वाहतूक यंत्रणा कार्यक्षम न करता खासगी वाहनांचे जाळे वाढविण्याचे सरकारचे

धोरण यात स्पष्ट दिसते. बरे, त्यामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांनाही कल्पकतेने व धाडसाने सामोरे जाण्याची जबाबदारी नाही. त्यातून सर्व बोजा त्या व्यक्तीवर येऊन पडतो. म्हणून सक्ती होते की प्रत्येकाने हेल्मेट घातली पाहिजे. स्वतःचा जीव वाचविला पाहिजे. पिण्याचे पाणी शुद्ध नाही म्हणून ते उकळून पिण्याची जबाबदारी जशी आपली, व्हाल्टेज वाढल्याने दूरदर्शन सेट्स् किंवा विजेची उपकरणे जळली तरी जबाबदारी जशी आपली, जे.जे.सारख्या सार्वजनिक हॉस्पिटलमध्ये सदोष औषधांमुळे मृत्यू आला तरी जबाबदारी जशी आपली, तशी जीव वाचविण्यासाठी हेल्मेट घालणे हीही आपलीच जबाबदारी. दुचाकी वाहनांच्या किती कारखान्यांना परवानगी द्यायची हे सरकार ठरविणार. पण हीच वाहने रस्त्यावर आली की ती चालवायची कशी, ठेवायची कुठे याचे उत्तर मात्र टाळणार. वाहने चालविताना लोकांनी ती जबाबदारीने आणि विशेषतः दुसऱ्याच्या जिवाची काळजी करूनच चालवायला हवीत. वाहने हवीत, पण त्याबरोबर येणारी शिस्त किंवा ट्रॅफिक कल्चर नको हे चालणार नाहीच. नियम मोडणारांना शिक्षा हवी, दंडही हवाच. पण नियमाने चालताच येणार नाही अशी स्थिती सरकारने स्वतःच निर्माण केली तर ? सरकारच्या डोक्यावर हेल्मेट घालणार ?

•

प्रकरण ११

# बंद करा हे 'बंद'

'बंद बंद करावेत' अशा आशयाच्या ठरावावरील चर्चेत लोकस्वतंत्रता संघटनेच्या वार्षिक सभेत दोन भिन्न व परस्पर विरोधी मतप्रवाह स्पष्टपणे दिसून आले. राजकीय कार्यकर्त्यांचा 'बंद' बंदला पाठिंबा होता. इतरांचा विरोध होता. 'बंद' हे राजकीय पक्षांच्या हातातील निषेध व्यक्त करण्याचे प्रभावी साधन झाले आहे. ते सोडण्याची त्यांची तयारी नाही असा निष्कर्ष यावरून निघतो. परवाची 'बंद'ची चर्चा मर्यादित लोकांपुरती, विशेषत: लोकस्वतंत्रता संघटनेच्या सभासदांपुरतीच होती. ती व्यापक केली तर यापेक्षा वेगळा निष्कर्ष निघू शकेल असे नाही. सर्वच राजकीय पक्ष या हत्यारांचा सर्रास वापर करीत असल्याने 'बंद'ला त्यांचा विरोध होण्याची शक्यता नाही. 'बंद'चा हा पक्षीय चौकटीतील विचार थांबवून समाज व राष्ट्र यांच्या व्यापक हिताच्या दृष्टीकोणातून त्याकडे पाहिले तर 'बंद' बंद करण्याची वेळ आली आहे यात शंका नाही. दूरदर्शन व आकाशवाणीला स्वायत्तता द्यावी, किंवा त्याचे अती सरकारीकरण थांबवावे अशा रास्त मागण्यांसाठी मोर्चे काढून निषेध नोंदविणारे 'बंद'लाही त्याच हिरीरीने पाठिंबा देतात याचे नवल वाटते. कोणत्याही प्रश्नाचा विचार सरकार सरकारी पद्धतीने, सत्तारूढ पक्ष सत्तेच्या दृष्टीने व विरोधी पक्ष विरोधकांच्याच दृष्टीने विचार करतात. अनेक प्रश्नांचे वास्तविक स्वरूप व त्यातील सत्य लोकांपुढे विशुद्ध स्वरूपात येत नाही. 'आपणही कधीतरी सत्तेवर येऊ.' असा विश्वास येथील विरोधी पक्षात नसल्याने आणि आपली सत्ता कधी जाणारच नाही.' असा फाजील आत्मविश्वास सत्तारूढ पक्षात प्रबळ झाल्याने वैफल्य आणि सत्तेची धुंदी या हिंदोळ्यावर येथील अनेक प्रश्न हेलकावे खात आहेत. ज्यावर सर्वसाधारणपणे एकमत आहे, अशा राष्ट्रीय प्रश्नांची संख्या त्यामुळे दिवसेंदिवस कमी होत आहे. पंजाबसारखा अंतर्गत प्रश्न असो, श्रीलंका अगर नेपाळसारख्या निकटच्या शेजारी देशांबरोबरचे प्रश्न असोत की चीन, अमेरिका, रशियासारख्या परदेशांबरोबरच्या संबंधांचा प्रश्न असो, पंचायत

राज्याचे विधेयक असो की 'अग्नी'चे उड्डाण असो, संरक्षण असो की शिक्षण, राष्ट्रीय दृष्टीकोणातून त्याकडे पाहण्यापेक्षा पक्षीय चष्मे घालूनच सर्व गोष्टींचा विचार करण्याची वृत्ती बळावते आहे. यात सत्तारूढ पक्ष आणि विरोधक, दोघांच्याही तेवढ्याच चुका आहेत. नजीकच्या फायद्यापेक्षा दीर्घकालीन राष्ट्रहित लक्षात घेऊन आपण आपली धोरणे ठरवली नाहीत तर हे राष्ट्र कधीच प्रबळ होणार नाही. ग्रोमिकोंनी पाव शतक रशियाचे परराष्ट्रमंत्रिपद भूषविले. मधल्या काळात अनेक नेते आले आणि गेले पण रशियाचे परराष्ट्र धोरण तेच राहिले. कारण ते राष्ट्रीय धोरण होते. राष्ट्रीय हित लक्षात घेऊन गोर्बाचोव्ह यांनी परराष्ट्र धोरण बदलल्यानंतर ग्रोमिको यांच्याजागी शेवर्दनात्झे आले. इथे वर्षाला एक याप्रमाणे परराष्ट्रमंत्री बदलला जातो आणि परराष्ट्रसचिवाची हकालपट्टी परदेशी पत्रकार उपस्थित असलेल्या बैठकीत जाहीर होते. 'बंद'बाबत विचार करताना विरोधी पक्षांनी असाच एकांगी दृष्टीकोण स्वीकारला आहे. म्हणून राजीव गांधींच्या दुसऱ्या एकांगी धोरणाला विरोध करण्याचा 'नैतिक' अधिकार त्यांना राहात नाही. दूरदर्शनचे सरकारीकरण आणि 'बंद' यांचा एकत्रित उल्लेख वर केला त्याचे हे कारण आहे.

तीन जुलैला झालेल्या 'महाराष्ट्र बंद'च्या प्रकाशात या प्रश्नाचे आणखी काही पैलू स्पष्ट होतील. पंजाबमध्ये मोगा येथे शीख अतिरेक्यांनी रा. स्व. संघाच्या शाखेवर केलेल्या हल्ल्यात २६ जण ठार झाले. या घटनेबद्दल दुःख वाटले नाही किंवा संताप आला नाही असा माणूस शोधून सापडणे अशक्य. सर्व देशभर या हत्याकांडाचा सार्वत्रिक निषेध झाला. पंतप्रधानांनीही तो स्पष्टपणे नोंदविला. परंतु अशा तऱ्हेच्या हत्याकांडाची किंवा मृताची संख्या २५ पेक्षा जास्त असण्याची ही पहिलीच वेळ नाही. अतिरेक्यांच्या हिंसक कृत्यांत आतापर्यंत पंजाबमध्ये अक्षरशः हजारो निरपराध लोक मरण पावले आहेत. त्यांत हिंदू आहेत तसेच शीख आहेत, काँग्रेसचे आहेत तसेच कम्युनिस्टांचे आहेत. अकालींचे आहेत. लोंगोवालांचा बळीही अतिरेक्यांनीच घेतला आणि पोलिस महासंचालक रिबेरो यांच्यावर हल्ला करणारेही तेच होते. या प्रत्येक हिंसक घटनेच्या वेळी प्रत्येक भारतीय व्यक्तीने व्यक्त केलेल्या प्रतिक्रियेची जातकुळी एकच होती. त्यात तरतम भाव नव्हता. त्यांच्या हत्येच्या निषेधासाठी भाजपने एवढ्या मोठ्या प्रमाणात 'बंद' आयोजित केला होता, असे दिसत नाही. मग याचवेळी हा 'बंद' का ? रा.स्व. संघाच्या शाखेवर हल्ला झाला म्हणून ? म्हणजे शाखेत जाणारे हिंदू, इतर निरपराध नागरिकांपेक्षा शिवसेना, भाजपला जास्त जवळचे वाटतात ? निवडणुका तोंडावर आल्याचे निमित्त साधून या घटनेचा राजकीय फायदा उठविण्यासाठी शिवसेना, भाजपने हा बंद पुरस्कृत केला ? तार्किकदृष्ट्या यातील दुसरे कारणच अधिक

खरे दिसते. मोगा हत्याकांडाचे शिवसेना, भाजपने राजकीय भांडवल केले. महाराष्ट्रात शिवसेनेचा पाठिंबा असेल तरच बंद यशस्वी होऊ शकतो हे सत्य परवाच्या बंदने अधोरेखित झाले. त्याच्या काही दिवस आधीच पूर्वाश्रमीचे बंदसम्राट जॉर्ज फर्नांडिस यांचा बंदचा प्रस्ताव बारगळला होता, हे लक्षात घेतले तर आता फर्नांडिस, सामंत यांचे दिवस संपून 'ठाकरे' यांचे 'राज्य' आल्याचा राजकीय संदेश पोहोचविण्याचे काम परवाच्या बंदने 'चोख' बजावले आहे. याचा अर्थ 'बंद' हा सामान्य लोकांच्या निषेधाचा मार्ग राहिला नसून राजकीय पक्षांच्या हातातील 'हत्यार' झाला आहे. ते कधी वापरायचं हे मूळ कारण किती सबळ आहे यावर ठरत नसून कोण, केव्हा, किती प्रबळ आहे त्यावरून ठरते. मोगा हत्याकांडाचाच निषेध म्हणून समजा फक्त भाजपनेच हे आव्हान केले असते तर त्याला परवासारखे शंभर टक्के यश मिळाले असते काय ? आणि समजा 'जनता दलाने' याच कारणास्तव बंदचे आवाहन केले असते तर त्याला कसा प्रतिसाद मिळाला असता ? बंद आणि बंदचे कारण यात उत्तर व दक्षिण धृवाइतके अंतर पडले आहे.

मग बंद ही जर राजकीय कृती असेल तर त्याचा वापर करताना कोणती पथ्ये पाळली पाहिजेत ? एक म्हणजे त्यातील राजकीय आशय मान्य नसणाऱ्यांना त्यात सहभागी होण्याची सक्ती होता कामा नये. उद्या समजा भाजपच्या मतदारांना पळवून कम्युनिस्टाच्या उमेदवाराला मत द्यायला भाग पाडले तर त्यांचा किती जळफळाट होईल ? मनात नसताना, भीती पोटी, दहशतीपोटी अनेक लोक 'स्वखुशीने' कामावर जात नाहीत त्यावेळी त्यांचे नेमके असेच होत असते. म्हणजे मूळ कारणाला सहानुभूती, परंतु त्याचा राजकीय फायदा उठविण्याला विरोध, किंवा त्यासाठी निषेधाचा जो मार्ग पत्करला आहे, त्याला विरोध असे त्याचे स्वरूप असते. परंतु वैयक्तिक किंवा सामूहिक पातळीवर हा विरोध संघटितपणे आविष्कृत होतोच असे नाही. होत असेलच तर त्याचे स्वरूप 'बंद'चे आवाहन करणाऱ्या संघटनेच्या रूपावर ठरत असते. रास्त 'विरोध' करण्याचा हक्क हा लोकशाहीचा गाभा असेल, आणि सर्व राजकीय पक्षांच्या अस्तित्वालाच हे तत्त्व आधार देत असेल तर मग अशा कोणत्याही पक्षाला लोकांवर बंदसाठी दडपशाही किंवा सक्ती करताच येणार नाही. त्याहीपुढे जाऊन असे म्हणता येईल की, अशा वेळी समजा एखाद्या व्यक्तीला कामावर जायचे असेल, एखाद्या दुकानदाराला दुकान उघडे ठेवायचे असेल, एखादे हॉटेल चालू ठेवायचे असेल किंवा एखाद्याला हातगाडीवर माल विकावयाचा असेल किंवा हमालाला सामान वाहून न्यायचे असेल तर त्यांना संरक्षण देण्याची जबाबदारी केवळ पोलिसांची

न मानता बंद पुरस्कृत करणाऱ्या संघटनेनेही ती घेतली पाहिजे. बंद पुकारण्याचे स्वातंत्र्य मागता, तर काम चालू ठेवण्याचेही (दुसऱ्यांचे) स्वातंत्र्य मान्य करावेच लागेल. 'बंद'ला सरकारने बंदी घालणे हा राजकीय पक्षांच्या स्वातंत्र्यावर घाला असेल तर लोकांना कामावर जाण्यापासून किंवा त्यांचे नित्याचे व्यवहार करण्यापासून परावृत्त करणे हाही लोकांच्या स्वातंत्र्यावर आणि म्हणूनच लोकशाहीवर हल्ला आहे. याचा अर्थ पाचपंचवीस वर्षांतील एखादा अपवाद वगळता,ज्यात स्वयंस्फूर्तीने लोक हरताळ पाळतात, बंदचे शंभर टक्के यश ही लोकशाही आणि स्वातंत्र्य या मूल्यांची पायमल्लीच असते.

बंद बाबत सराकारने कोणती भूमिका घ्यावी हा मुद्दा येथे उपस्थित होतो. उदाहरणार्थ कामावर जाण्याचा,व्यवसाय करण्याचा, प्रवासाला जाण्याचा लोकांचा मूलभूत हक्क असेल तर सरकार त्याचे रक्षण कसे करणार? आजचा अनुभव असा की लोकांच्या या वैयक्तिक हक्कापेक्षा एकूण कायदा व सुव्यवस्था याची जबाबदारी सरकार महत्त्वाची मानते. त्यामुळे रस्त्यावर येण्यापेक्षा लोकांनी शांतपणे घरी बसावे यालाच त्यांचा पाठिंबा असतो. सरकार इरेलाच पेटले तर किमान सार्वजनिक वाहतूक चालू ठेवण्याचा प्रयत्न होतो. त्यात बसेस जाळणे, रेल्वे मार्ग उखडणे अशासारखे प्रकार उद्‌भवतात. परंतु यापेक्षाही एक पाऊल पुढे म्हणजे खुद्द 'सरकारच' बंदमध्ये सामील होऊ शकते काय? गेल्यावर्षी १५ मार्च १९८८ ला सर्व विरोधी पक्षांनी राजीव गांधींनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी 'भारत बंद'चे आवाहन केले होते. प.बंगाल, आंध्र, कर्नाटक, केरळ, आसाम या राज्यांत 'बंद'चे आवाहन करणारे पक्ष सत्तारूढ पक्षच असल्याने सर्व शासकीय कार्यालये बंद राहिलीच. पण त्या वेळी 'बंद'ला कोणाला विरोध करायचा असता तर राज्य सरकारच्या अखत्यारीतील पोलिसांनी त्यांचे कसे स्वागत केले असते? पोलिस हे लोकांचे, 'स्टेट'चे नोकर की त्या वेळी अधिकारावर असलेल्या सत्तारूढ पक्षाचे? सर्वच शासकीय यंत्रणेची त्या 'बंद'च्या काळातील भूमिका काय असावी? तात्त्विकदृष्ट्या त्याचे उत्तर एकवेळ देता येईलही, पण व्यावहारिकदृष्ट्या ते शक्य आहे काय? त्या वेळचा भारत बंद हा राजीव गांधींविरुद्ध, त्यांच्या सरकारविरूद्ध होता. मग अशा वेळी कामाचा हक्क बजावू इच्छिणाऱ्या लोकांच्या रक्षणासाठी केंद्राने आपले पोलिस पाठवायचे का? सत्तारूढ पक्षाला बंदबाबत अतिशय काळजीपूर्वक निर्णय घ्यायला हवा, किंवा खरे तर निषेध करण्याचा हा मार्ग त्यांनी पत्करायलाच नको हे उघड आहे.

लोकशाही व्यवस्थेत विरोध करण्याचे सनदशीर मार्ग कोणते हा प्रश्न या निमित्ताने आपण चर्चेला घ्यायला हवा. जनमत व्यक्त करणाऱ्या या विविध पर्यायाबाबत

सरकारची संवेदनशीलता आणि आपणही उद्या 'सरकार' असू हा विरोधकांचा विश्वास याचा ताळमेळ घातला तरच या मार्गाबाबत एकवाक्यता होऊ शकते. चर्चा, संवाद, वाटाघाटी, निवेदन, सभा, उपोषण, मोर्चा अशी ही चढती भांजणी आहे. यातील खालच्या श्रेणीतील निषेधाच्या प्रकाराला सरकार किंवा ज्यांच्या विरोधी लोकमत व्यक्त होते तेथील अधिकारी यांनी दाद दिली नाही तर विरोधाची धार वाढत जाते. संप किंवा बंद हे अंतिम हत्यार असते. परंतु सत्तारूढांची कातडी गेंड्यांची झाली असेल तर वारंवार 'बंद', संप असली हत्यारे वापरली जातात.

क्रिया-प्रतिक्रिया दोन्हीही तीव्र स्वरूपाच्या असल्यामुळे एकूणच राजकीय शैली उच्चरवाची होते, आणि तेथे रास्त गाऱ्हाणी, मागण्या यांना न्याय मिळण्यापेक्षा गोंगाट करणाऱ्यांना सारे फायदे मिळतात. अशा 'हायपिच्ड' समाजात अंतर्गत शांतता नांदणे कठीण होऊन बसते. त्यातून अनेक विकृती निर्माण होतात, गुन्हेगारी वाढते, हिंसाचार वाढतो, व्यक्तीची, संस्थांची प्रतिष्ठा कमी होते. अलीकडेच पुण्यात एका कामगार वादात न्यायमूर्तींना आपल्या दालनात 'ऑर्डर' देणेही अशक्य झाले. बाहेर लोकात येऊन त्यांना ती वाचणे भाग पडले. सर्व समाजाचे स्वास्थ्य हरवते, ते सुधारण्यासाठी मग लोक 'आणीबाणी'चेही स्वागत करतात. आणीबाणीत निदान संप, बंद नव्हते असे लोक त्याचे समर्थन करतात. आणीबाणी किंवा एकाधिकारशाही खरेच नको असेल तर आपले सर्वांचेच व्यवहार लोकशाही भावाने झाले पाहिजेत. 'बंद' त्यात बसत नाही. आजचा बंद म्हणजे महात्मा गांधींचा हरताळ नव्हे. म्हणूनच 'बंद' बंद करायला हवेत.

●

प्रकरण १० 

# दहावीची मुलं नापास का होतात ?

माध्यमिक शालांत परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या, पहिला-दुसरा क्रमांक मिळविलेल्या, पुण्यात पहिली आलेल्या, मुलींमध्ये पहिली आलेल्या, मागासवर्गीयांत पहिला आलेल्या, विविध विषयांत पहिले आलेल्या, केंद्रात आणि शाळांमध्ये पहिले आलेल्या विद्यार्थ्यांच्या कौतुक समारंभात हरवून गेलेल्या मंडळींचे एका गोष्टीकडे आवर्जून लक्ष वेधायचे आहे. यंदाच्या माध्यमिक शालांत म्हणजेच दहावीच्या परीक्षेत केवळ ३५ टक्केच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत ! या वर्षी दहावीच्या परीक्षेला महाराष्ट्रातून जवळजवळ दहा लाख विद्यार्थी बसले होते. त्यापैकी साडेसहा लाख विद्यार्थी नापास झाले ही शिक्षणतज्ज्ञ, संस्थाचालक आणि सरकार या सर्वांनाच धक्का देणारी गोष्ट आहे. शिक्षण देणारी आणि परीक्षा घेणारी प्रचंड यंत्रणा आपण उभारली आहे. परंतु शिक्षण देण्याचे, गाभ्याचे कामच त्यात होत नाही. ३५ टक्के विद्यार्थीच आणि तेही अतिशय सैल गाळणीतून उत्तीर्ण होत असतील तर या व्यवस्थेत काहीतरी गंभीर दोष आहेत यात शंका नाही. पास झालेल्या सरसकट सर्व विद्यार्थ्यांनी एक किमान शैक्षणिक दर्जा मिळविलेला असतो असेही नाही. मोघमपणेच बोलायचे तर दहावी पास झालेल्यांपैकी निम्मे पुढे ११ वी, १२ वीला जातात आणि बारावी त्यापैकी जेमतेम निम्मेच पास होतात. बारावी पास झालेल्या विद्यार्थ्यांचेही जिथे अनेक सामान्य गोष्टींचे अज्ञान असते, एखाद्या नोकरीसाठी मराठीत त्याला साधा अर्जही त्याला करता येत नाही, तिथे दहावी उत्तीर्ण झालेल्या बहुसंख्य विद्यार्थ्यांची काय स्थिती असेल याची कल्पनाच केलेली बरी. शिवाय आपण हे बोलतो आहोत ते निदान शाळेत शेवटपर्यंत कसेबसे टिकलेल्या विद्यार्थ्यांबाबत. दहावी पास होणारा विद्यार्थी साधारणपणे पंधरा-सोळा वर्षांचा असतो. त्याच वयाच्या इतर मुलांची काय स्थिती आहे ?

प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक, सक्तीचे व मोफत असले तरी अनेक पालक

दारिद्र्यामुळे आपल्या मुलांना शाळेत पाठवू शकत नाहीत. जी मुले शाळेत दाखल होतात त्यांचे पुढे काय होते? पहिलीपासूनच त्यांची गळती सुरू होते. पहिलीत शंभर मुले असतील तर सातवी-आठवीपर्यंत जेमतेम २३ मुले येतात. पुढच्या एक-दोन वर्षांत आणखी वजाबाकी होते. दहावीला वीस विद्यार्थी राहतात आणि त्यांतील ३५ टक्के पास होतात, म्हणजे शाळेत जाणाऱ्या या वयोगटातील १०० पैकी फक्त सात विद्यार्थी दहावीची परीक्षा उत्तीर्ण होतात. महाराष्ट्राच्या पुढारलेपणाचे डांगोरे इतरांसमोर आपण कितीही पिटले तरी मनोमन आपल्याला या गोष्टीची खंत वाटायला हवी. महाविद्यालयीन आणि उच्च शिक्षण ही किती थोड्या लोकांची मक्तेदारी आहे, महाविद्यालये आणि विद्यापीठे यासंबंधी आपण बोलतो तेव्हा नेमक्या कोणत्या व किती (कमी) लोकांच्या प्रश्नांसंबंधी बोलत असतो, हे यासारख्या प्रसंगाने प्रकर्षाने ध्यानी येते. शिक्षणासंबंधी जी काही चर्चा आज कानावर येते ती उच्चशिक्षणासंबंधी. विद्यापीठातील राजकारण, कुलगुरूंच्या नेमणुका, महाविद्यालयीन शिक्षकांचा संप, परीक्षांवरील बहिष्कार, मेडिकल व इंजिनियरिंगचा प्रवेश, विनाअनुदान तत्त्वावरील व्यावसायिक शिक्षण देणारी कॉलेजे, देणग्या, कॅपिटेशन फी अशांसारख्या विषयांच्या वर्तुळात ही चर्चा गोलाकार फिरत राहते. कोणी डॉक्टर किंवा इंजिनिअर होत असतो, किंवा कोणी एम.ए., एम.एस्सी. करीत असतो, त्या वेळी दहा जण शाळेत जाण्याऐवजी शेळ्यामेंढ्या वळत असतात, शेतात राबत असतात, पाणी भरत असतात, सरपण गोळा करीत असतात, धुणं धुत असतात किंवा चूल फुंकत असतात याचं विस्मरण झालेलं असतं. 'डोकं' नसतं म्हणून ही मुलं शाळेत जात नाहीत असं नाही. शाळेत जायची 'इच्छा' नसते म्हणून जात नाहीत असंही नाही. त्यांच्या घरचं दारिद्र्य हेच त्याचं एकमेव कारण असतं. दहावीला ३५ टक्केच विद्यार्थी पास होतात, त्यालाही अशीच कारणं आहेत. विद्यार्थ्यांची हलाखीची आर्थिक स्थिती, भोवतालचं प्रतिकूल वातावरण, शाळा, शिक्षक आणि शिक्षणाचा सुमार दर्जा, शिक्षण पद्धतीमधील साचेबंदपणा ही त्याची काही कारणं. अभ्यासक्रम बदलून, महाग रंगीत पुस्तके छापून, नवोदय विद्यालयं काढून त्यात आमूलाग्र सुधारणा होण्याची शक्यता नाही. शिक्षणाकडे पाहण्याचा राजकीय दृष्टिकोण काय आहे, त्याच्यात गुंतलेल्या आर्थिक हितसंबंधांचे स्वरूप काय आहे या गोष्टींवरच शिक्षणाचे स्वरूप अवलंबून राहणार आहे.

एखादं उदाहरण घेऊन याविषयी अधिक नेमकेपणानं बोलता येईल. उदाहरणार्थ, ब्रिटिशकालीन शिक्षणव्यवस्था. मेकॉलेची शिक्षणपद्धत असं तिला म्हटलं जातं. ब्रिटिशांच्या येथील व्यवस्थेला उपयोगी पडेल अशा तऱ्हेचं कारकुनी शिक्षण हा

त्या व्यवस्थेचा गाभा होता. ब्रिटिश जाईपर्यंत त्यात बदल झाला नाही. स्वातंत्र्यानंतरही त्यात फार फरक पडला आहे असे नाही. असं समजू, की सध्याच्या शासनकर्त्यांवर उद्योग, व्यापार या क्षेत्राचा प्रभाव आहे तर त्याचे प्रतिबिंब शिक्षणव्यवस्थेतही पडेल. म्हणजे सर्व जणांना उत्तम शिक्षण देण्याकडे सर्व साधनांचा उपयोग करण्यापेक्षा अशा क्षेत्रांना लागणाऱ्या इंजीनिअर, व्यवस्थापक किंवा कॉम्प्युटर तज्ज्ञांच्या शिक्षणावरच सरकार व (पैसेवाल्या) समाजाचा जास्तीत जास्त पैसा खर्च होईल व प्रस्थापित व्यवस्था अधिक बळकट होईल. उद्या हे सरकार जाऊन समजा खोमेनींसारख्या कट्टर धर्मवादी नेत्याचे किंवा विचारसरणींचे सरकार तेथे आले तर साहजिकच शिक्षणाच्या स्वरूपात फरक पडेल. याचा अर्थ शिक्षण आणि राजकीय, आर्थिक, सामाजिक व्यवस्था यांचा परस्परसंबंध आहे. त्यामुळे पहिलीत जाणाऱ्या शंभर विद्यार्थ्यांवर वर्षाला पंचवीस हजार रुपये खर्च करण्यापेक्षा वैद्यकीय महाविद्यालयात जाणाऱ्या किंवा आय.आय.टी.त इंजीनिअरिंगचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाख-दोन लाख खर्च करणे सरकारमान्य होते. पहिलीत जाणाऱ्या मुलाला बालभारतीचे पुस्तक सात रुपयांऐवजी दोन रुपयाला देणे शासनाला महाग वाटते, परंतु सरकारी इंजीनिअरिंग कॉलेजमधील किंवा आय.आय.टी.मधील फी वाढविण्याचा निर्णय काही ते घेऊ शकत नाहीत. दहावीच्या खासगी क्लासला जाणारा विद्यार्थी जेवढी फी भरतो तेवढीही फी या कॉलेजात नसते.

शिक्षणावरची आर्थिक तरतूद टक्केवारीचा विचार केला तर फारशी वाढलेली नाही. 'युनिसेफ'च्या ताज्या अहवालात प्राथमिक शिक्षणावर होणाऱ्या खर्चात सर्वच देशात कपात होत आहे असे स्पष्टच म्हटले आहे. इ.स. १९६४ मध्ये नेमलेल्या कोठारी शिक्षण आयोगाच्या अहवालानंतर शिक्षणावरील खर्च राष्ट्रीय उत्पन्नाच्या सहा टक्के असावा, असा निर्णय सरकारने घेतला. प्रत्यक्षात आज सातव्या योजनेअखेर हे प्रमाण ३.६ टक्के एवढेच आहे. १९८६ मध्ये जाहीर झालेल्या नव्या शैक्षणिक धोरणानुसार आठव्या पंचवार्षिक योजनेत ६ टक्के प्रमाण गृहित धरले आहे. परंतु हे पैसे कसे खर्च करणार हाही कळीचा प्रश्न आहे. नवोदय विद्यालयासारख्या फॅशनेबल कल्पनांवर खर्च करून तथाकथित सकस शिक्षणाची बेटे तयार करण्यापेक्षा ऑपरेशन ब्लॅक बोर्डसारख्या, सर्वसामान्य मुलांच्या शिक्षणावर भर देणाऱ्या योजनांना उचलून धरले पाहिजे. शालेय पातळीवर एखाददुसऱ्या मुलाने ९० टक्क्यांच्या वर गुण मिळवावेत यासाठी हुशार मुलांच्या एखाद्याच तुकडीवर सर्व शक्ती खर्च करण्यापेक्षा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळण्यावर आणि शाळेचा एकूण निकाल ९० टक्क्यांवर लागावा यावर

अधिक भर देणे हीच पहिल्या निर्णयाची री ओढणे होईल. परदेशात मागणी आहे किंवा दिल्लीत मागणी आहे म्हणून त्याप्रमाणे 'माल' तयार करण्याच्या प्रवृत्तीला वेळीच आवर घातला पाहिजे. विद्यार्थी आणि मुलं 'माल'नाहीत तर या देशाची 'संपत्ती' आहे. या संपत्तीतून निर्माण झालेलं अतिरिक्त किंवा वरकड मूल्य निर्यात करणं वेगळं आणि संपत्तीमधील एक एक तुकडाच निर्यात करणं वेगळं.

किमान प्राथमिक शिक्षणाच्या सोई आणि त्यामुळे मिळणारे फायदेखील समाजातल्या अगदी छोट्या गटाला मिळत असताना, ज्यांना हे फायदे अजिबात मिळत नाहीत त्यांच्या न्याय्य हक्कांना बाजूस सारून उच्च शिक्षणावर पैशाची उधळमाधळ करणं सामाजिक वास्तवाला धरून नाही. एकाच देशात अनेक समाज तयार करून विषमतेची दरी आणखी वाढविण्याला प्रोत्साहन देणारी कोणतीही धोरणं तात्कालिक लाभाची असली तरी देश आणि समाज यांच्या ती अंतिम हिताची नाहीत. लोकशाहीच्या आधुनिक मूल्यांशी तर ते पूर्णपणे विसंगतच आहे. पूर्वीच्या काळी राजामहाराजांच्या मुलांसाठी वेगळ्या शाळा, कॉलेजे असत. आजही त्यांतील काही टिकून आहेत. शिवाय नव्या राजदरबारींची त्यात भर पडत आहे. प्राथमिक शाळेतील मुलांसाठी खरं तर सर्वात सुंदर इमारत हवी. आजूबाजूला बागबगीचा हवा. पण स्थिती उलटीच आहे. देशातील दहा टक्के शाळांना तर स्वत:ची इमारतही नाही. ज्यांना आहे त्यांतील अनेकांची रया गेलेली आहे. दुसरीकडे मात्र विद्यापीठं, मेडिकल व इंजीनिअरिंग कॉलेजे, मॅनेजमेंट इन्स्टिट्युशन्स यांच्या टोलेजंग, अतिभव्य व दिमाखदार इमारती उभ्या राहात आहेत. प्रत्यक्ष शिक्षणापेक्षा इन्फ्रास्ट्रक्चरच महत्त्वाचे झाले आहे. या संस्थाची संस्थानं होतात, सत्तेची केंद्रं होतात, पैसा तिकडे आकृष्ट होतो. एकशिक्षकी शाळेऐवजी दोनशिक्षकी शाळा करून आणि मारुतीच्या देवळाऐवजी दोन खोल्यांच्या स्वतंत्र इमारतीत शाळा भरवून कोणाचं काय भलं होणार आहे की, राजकीय वजन वाढणार आहे ? पुढच्या निवडणुकीसाठी तिकीट हवं असेल तर एकही शाळा इमारतीविना असता कामा नये, असा आदेश उद्या राजीव गांधींनी काढला तर मोठमोठ्या शिक्षणसंस्था उभारण्यात पुढाकार घेणारे आमदार, खासदार तिकडेही वळतील. राजकारण व अर्थकारण यातील प्रवाह बदलल्याशिवाय परिवर्तन शक्य नाही हेच खरं. दहावीचा निकाल ३५ टक्के का ? याचं थोडं व्यापक उत्तर हेच आहे. बाकी आमचा मुलगा ऐन परीक्षेत आजारी पडला किंवा पेपर फुटला होता त्यापेक्षा निराळेच प्रश्न परीक्षेत विचारले होते किंवा मराठीही नीट न येणाऱ्या बाईकडे इंग्रजी विषय दिला होता ही उत्तरे तोंडी लावण्यापुरती !

●

प्रतिबिंब १० २१

# देश विकायला कोण निघाले आहे ?

आगामी लोकसभा निवडणुकीतील प्रचाराच्या पातळीची पट्टी पंतप्रधान राजीव गांधी यांनी ठरविलेली दिसते. गेल्या पंधरवड्यात त्यांनी केलेल्या भाषणांकडे याचा पुरावा म्हणून पाहता येईल. 'विरोधक देश विकायला निघाले आहेत' हे पंतप्रधानांचे महाराष्ट्राच्या दौऱ्यातील विधान उदाहरण म्हणून घेता येईल. देशप्रेमाचा सारा मक्ता जणू राजीव गांधी आणि त्यांच्या काँग्रेस पक्षाकडेच आहे अशा थाटात पंतप्रधान बोलत आहेत. प्रचाराच्या गाण्याला पंतप्रधानांनी अशी चाल लावली तर त्यांचे सहकारी, नव्हे, अनुयायी, कोणत्या तालासुरांत बोलतील, याची कल्पनाच केलेली बरी. येथील विरोधी पक्षही फार समंजस आहेत, असे नव्हे. पंतप्रधानांच्या अशा तऱ्हेच्या टीकेकडे कानाडोळा करण्याचा उदारपणा ते कदापिही दाखविणार नाहीत. पंतप्रधानांवरही शेलक्या आरोपांची फैर ते झाडू लागतील. पंतप्रधान, त्यांचे सरकार, त्यांचा पक्ष, त्यांची धोरणे यापुरतीच ही टीका मर्यादित राहणार नाही. सभ्यतेचे सारे निकष वेशीला टांगून ठेवायचे म्हटले, की विषयांना तोटा नसतो. त्यात राजीव गांधी या व्यक्तीपर्यंत सारे येऊन भिडते. आधीही तसे झाले होते. नंतरही होऊ शकते. बोफोर्स प्रकरणात पंतप्रधान स्वत: अडकले आहेत, अनेक व्यवहारातील कमिशन इटलीमध्ये सुरक्षित आहे, सोनिया गांधी यांनी अजून भारतीय नागरिकत्व स्वीकारले नाही, धवन यांचा इंदिरा गांधींच्या हत्येच्या कटात हात असूनही राजीव गांधींनी त्यांना आपले सल्लागार नेमले आहे वगैरे वगैरे. अशा तऱ्हेच्या आरोपांत तथ्य असो-नसो, पंतप्रधानांसारख्या व्यक्तीवर ते होत राहिल्याने लोकांच्या मनात किल्मिष साठत जाते.

राजकारण, सरकार, लोकशाही या विषयांची प्रतिष्ठा, विश्वासार्हता, गांभीर्य कमी होत जाते. समाजाच्या विघटनाची बीजे त्यातून पेरली जातात. राजकारणाचेही खेळासारखेच नियम आहेत. त्यातील कोणत्या नियमानुसार खेळायचे हे ठरविण्याचा पुढाकार सत्तारूढ पक्षाने घ्यायचा. इथे राजीव गांधींवर तर दुहेरी जबाबदारी आहे.

ते पक्षाध्यक्ष आहेतच, शिवाय पंतप्रधानही. त्यामुळे त्यांनी याबाबत अधिक काटेकोरपणा दाखवायला हवा. आपल्या आचरणाने उदाहरण घालून द्यायला हवे. राजकारणाचे धडे त्यांनी इतरांना द्यायचे. आता वेळ अशी आली आहे की, लोकांनी त्यांना राजकारण शिकवावे. नेता आणि कार्यकर्ते, पुढारी आणि लोक यांच्यातील संबंधांचा आलेखच बदलतो आहे. देशाच्या दृष्टीने ही आशादायक गोष्ट नाही. डिसेंबर १९८४ चे राजीव गांधी बरे होते, असे म्हणायची वेळ आज आली असेल तर राजीव गांधी राजकारणातील फक्त वाईट धडेच शिकले असा याचा अर्थ. पाच वर्षात अधिक परिपक्व, समजूतदार, उमदे व धोरणी नेतृत्व देशाला मिळेल, अशी लोकांची आरंभीची अपेक्षा होती. राजकारणाचा जरासाही अनुभव नसलेल्या राजीव गांधींना लोकांनी चांगली संधी दिली. भारतीय राजकारणाला एक नवी कलाटणी मिळेल, मोकळे, स्वच्छ वारं तेथून वाहील,पूर्वग्रहदूषितांच्या जोखडातून त्याची मुक्तता होईल या अपेक्षेने तरुण वर्ग त्यांच्याकडे आकृष्ट झाला. परंतु 'जुने ते सोने'असे म्हणायची वेळ त्यांच्या या नव्या शैलीने आणून दिली आहे.

'अग्नी'च्या संदर्भात त्यांनी केलेले विधान पाहू. 'अग्नी'ला अमेरिकेचा विरोध होता आणि आहे, हे खरेच. भारत लष्करीदृष्ट्या सामर्थ्यशाली व्हावा, दक्षिण आशियातील 'सुपर पॉवर' व्हावा याला अमेरिकेचा, त्यांच्या हितसंबंधांसाठी, या उपखंडातील व्यूहरचनेच्या संदर्भात विरोध आहे. अमेरिकेशी वितुष्ट येऊ न देता त्यांचा विरोध निष्प्रभ कसा करायचा यात भारतीय नेतृत्वाचा कस आहे. अग्नीच्या प्रक्षेपणाचे आपण टेक्नॉलॉजी डेमॉन्स्ट्रेटर असे वर्णन केले किंवा पोखरणच्या १९७४ च्या अणुस्फोटाची 'शांततामय अणुचाचणी' अशी भलावण केली तरी त्यात दडलेल्या सर्व शक्यता शत्रूराष्ट्र विचारात घेणारच. पाकिस्तानच्या अणुकार्यक्रमाविषयी आपण तक्रार करीत असू, अमेरिकेने पाकचे मन वळवावे, त्याच्यावर दबाव आणावा असे म्हणत असू, तर त्याच न्यायाने आपल्यावरही उलटा दबाव येतच राहणार.

आता विरोधी पक्षांची भूमिका पाहू. आपला 'अग्नी'ला विरोध नव्हताच, असे विरोधी पक्ष म्हणत आहेत, ते खरे मानू. पण समजा त्यांनी विरोध केला तर त्यांचा विरोध आणि अमेरिकेचा विरोध सारख्याच दर्जाचा, एकाच गुणवत्तेचा समजायचा का ? या विरोधी पक्षांना अमेरिकेचे हस्तक मानायचे का ? भारताने अणुबॉम्ब बनवावा की बनवू नये याबाबत दोन पक्ष आहेत. ज्यांचा अणुबॉम्बला विरोध आहे ते त्यासाठी पटणारी कारणे देतात, इतकेच नव्हे, तर भारताच्या अंतिम हिताच्या दृष्टीने तेच योग्य आहे असे म्हणतात. मग त्या लोकांना काय अमेरिकेचे

हस्तक समजायचे ? जगात शांतता चळवळीने आता मूळ धरले आहे. अण्वस्त्र स्पर्धेमुळे सारा मानवसमाजच विनाशाच्या वाटेने चालला आहे, असे त्यांना मनापासून वाटते. अमेरिकेत आणि युरोपातही ही चळवळ जोरात आहे. अमेरिकेतील चळवळीत तर लक्षावधी लोक सहभागी आहेत. पण अमेरिकेने काही या लोकांना राष्ट्रद्रोही मानले नाही, की रशियाचे हस्तक म्हणून त्यांना हिणवले नाही. अणुऊर्जेला आणि म्हणूनच अणुभट्ट्यांना अनेक ठिकाणी विरोध होतो आहे. कर्नाटकात कारवार जिल्ह्यातील कैगा प्रकल्पाला विरोध करण्यात शिवराम कारंत यांच्यासारखे ज्ञानपीठ पारितोषिक विजेते लेखकही आघाडीवर आहेत. ते काय अमेरिकेचे हस्तक आहेत ? देशाच्या विकासाच्या धोरणात कशाला अग्रक्रम मिळावा, कोणत्या धोरणांमुळे आपल्या देशाचा फायदा होईल, कोणत्या धोरणांमुळे नुकसान होईल यासंबंधी राष्ट्रप्रेमी व्यक्तींत प्रामाणिक मतभेद असू शकतात, हे सर्वमान्य तत्त्व राजीव गांधींना मान्य आहे की नाही ? अण्वस्त्रांबाबत ब्रिटनमध्ये मजूर पक्षाचे धोरण थॅचरबाईंपेक्षा अगदी विरुद्ध होते. (लोकमतामुळे नंतर ते त्यांना बदलावे लागले.) पण मजूर पक्षाने देश विकायला काढला आहे, असा अर्थ त्यातून कोणी काढला नाही.

या मतभिन्नतेला राजीव गांधींची मान्यता नसेल तर त्यांनाही अशाच तऱ्हेनं आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करता येईल. उदाहरणार्थ, राजीव गांधींनी जे आर्थिक धोरण स्वीकारले आहे ते अमेरिकेच्या किंवा तिच्या प्रभावाखालील जागतिक वित्तसंस्थांच्या दबावामुळे, असे म्हणता येईल. परकी तंत्रज्ञानाच्या आयातीला त्यांनी ज्या खुलेपणाने प्रोत्साहन दिले, त्यामुळे नेहरू-इंदिराजींचे स्वयंपूर्णतेचे धोरण मोडीत निघाले असून मल्टी-नॅशनल कंपन्यांद्वारा भारत पाश्चात्त्य देशांच्या अंकित झाला आहे, आर्थिक व औद्योगिक निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य त्यांनी गमावले आहे, असेही म्हणता येईल.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून भारताने सहा हजार कोटी रुपयांचे कर्ज घेऊन आपल्या आर्थिक स्वातंत्र्यावर बंधने घालून घेतली, असा आरोप तेव्हाही केला जात होताच.

साधे 'बेस्ट'ला जागतिक बँकेचे कर्ज घ्यायचे झाले तर त्यांना बसभाडे वाढविण्याची पूर्वअट मान्य करावी लागते. पुण्याच्या पाणीपुरवठ्यासाठी जागतिक बँकेचे कर्ज मिळू शकते पण त्यासाठी पाणीपट्टीत वाढ होईल, ते सध्यासारखे 'स्वस्त' मिळणार नाही, ही अट असेल. प्रवास, पाणी, वीज या सार्वजनिक सुविधा रास्त दराने किंवा स्वस्त दराने पुरविण्याच्या धोरणाला त्यासाठी पायबंद घालावा लागतो, हे आपले स्वातंत्र्य 'विकणे' नव्हे काय ? मग या धोरणांना

विरोध करणारे 'देश विकायला निघाले आहेत' असे म्हणायचे की त्या धोरणांची अंमलबजावणी करणारे ?

आगामी निवडणुकीत काहीही होवो. विरोधी पक्ष बलवान नसले तरी राजीव गांधींचा पक्षही फार ताकदवान आहे असे नाही. खरे तर आज देशातील सत्तेचा सगळा संघर्ष हिंदी भाषिक प्रदेशात केंद्रित झाला आहे. राजीव गांधींना आव्हान द्यायचे झाले तरी उत्तर प्रदेशातील व्ही.पी. सिंगच लागतात. फार तर चंद्रशेखर चालतील. परंतु रामाराव, करुणानिधी, हेगडे, बसू, भंडारी, दंडवते, पटनाईक, फारूख वगैरे मंडळींचे ते काम नव्हे. त्यामुळे कोणताही पक्ष केंद्रात सत्तेवर आला तरी या देशाच्या राजकारणाचा तोंडावळा आमूलाग्र बदलेल, असे नाही. आखाड्याच्या काठी बसलेल्या लोकांचे माफक म्हणणे एवढेच की, जरा नियमाने खेळा, कुस्ती प्रेक्षकांत आणू नका !

●

प्रतिक्रिया २२ १९९०

# अपरिहार्य राजकीय आघाड्या

तीस ऑगस्टच्या भारत बंदला महाराष्ट्रात अगदीच थंड प्रतिसाद मिळाला होता. त्याआधी शिवसेना-भाजपच्या संयुक्त बंद प्रयोगाला मिळालेल्या घवघवीत यशाच्या तुलनेत राष्ट्रीय आघाडीचा हा बंद अगदीच केविलवाणा होता. मृणाल गोरे, जॉर्ज फर्नांडिस इत्यादींनी बंदच्या यशाबाबत कितीही आव आणण्याचा प्रयत्न केला तरी वस्तुस्थिती काही लपून राहिली नाही. विशेष म्हणजे शिवसेना-भाजप बंदला जनता दलाचा विरोध होता, तर जनता दलादी पक्ष असलेल्या राष्ट्रीय आघाडीने पुरस्कृत केलेल्या बंदबाबत शिवसेना 'तटस्थ' होती आणि भाजपनेही तो 'निषेध दिन' म्हणून पाळला होता. जनता दलाच्या या बंदचे अपयश हा सरकार पक्षाचा विजय असल्याचा दावा काँग्रेस जनांनी केला असला आणि वरवर पाहता वस्तुस्थितीही तशीच दिसत असली, तरी या यशापयशाचे समीकरण इतके सरळ नाही. किंबहुना त्रैराशिकाशिवाय त्याचे खरे उत्तर मिळणारच नाही. या त्रैराशिकातील तिसरा घटक आहे शिवसेना-भाजप युतीचा आणि महाराष्ट्रात तरी जनता दल, राष्ट्रीय आघाडी यांच्यापेक्षा शिवसेना-भाजप युतीचा जोर जास्त आहे यावर ३० ऑगस्टच्या बंदने शिक्कामोर्तब केले. बंदला तात्त्विक विरोध किंवा सरकार पक्षाला पाठिंबा या कारणांसाठी महाराष्ट्रातील बंदला अपयश आले हे खरे नसून शिवसेना-भाजपचा असहकार हेच त्याचे खरे कारण आहे. ३० तारखेलाही हीच कारणमीमांसा करता आली असती. परंतु जनता दलाने ती मान्य केली नसती. आज शिवसेना-भाजपबरोबर आघाडी असो-नसो, समझोता असो-नसो, त्यांच्यासाठी महाराष्ट्रातील लोकसभेच्या जास्तीत जास्त जागा सोडण्याचा निर्णय जनता दलाच्या श्रेष्ठींनी घेतला असल्याने हे वास्तव त्यांनी मान्य केल्याचे दिसते. 'काँग्रेस (आय)चा पराभव' हा एककलमी कार्यक्रम जर तात्कालिक उद्दिष्ट असेल तर मोघम सैद्धांतिक बोलण्याला काही अर्थ उरत नाही. त्यासाठी व्यावहारिक दृष्टिकोणच ठेवला पाहिजे ही विचारधारा प्रभावी ठरल्याचे दिसते.

विरोधी पक्षांना बऱ्यापैकी यश मिळवायचे असेल तर 'एकास एक' उमेदवार ही भारतीय निवडणुकीतील गुरुकिल्ली आहे. १९५२ पासूनच्या सर्व निवडणूक निकालांनी ते ठळकपणे अधोरेखित झाले आहे. ज्या पक्षाला ४० टक्क्यांपेक्षा जास्त मते मिळतात त्याला लोकसभेत केवळ साधेच नव्हे, तर अगदी निर्णायक म्हणजे दोन तृतियांश बहुमत मिळते ही वस्तुस्थिती आहे. १९५२ मध्ये काँग्रेसला ४५ टक्के मते मिळाली आणि ४८९ पैकी ३६४ जागा मिळाल्या. १९५७ मध्ये ४७.८ टक्के मते व ४९४ पैकी ३७१ जागा मिळाल्या. १९६२ मध्ये ४४.७ टक्के मते व ४९४ पैकी ३६१ जागा मिळाल्या. १९६७ मध्ये, ज्या वर्षी संविदचा (संयुक्त विधायक दलाचा) प्रयोग बऱ्याच ठिकाणी झाला, काँग्रेसची मते ४०.८ टक्क्यांपर्यंत घसरली, तरी जागा मात्र निम्म्यापेक्षा जास्त मिळाल्या. (५२० पैकी २८३) १९७१ मध्ये इंदिरा लाट जोरदार होती. गरिबी हटावचे नारे होते आणि बांगला देशंचे युद्ध जिंकले होते. तरी काँग्रेसला फक्त ४३.७ टक्केच मते मिळाली. (फुटीचा परिणाम) परंतु जागा मात्र ३५२म्हणजे दोन तृतियांश मिळाल्या. १९७७ मध्ये वरवर लाट असूनही जनता पक्षालाही फार मते मिळाली नव्हती.केवळ ४१.३ टक्के. परंतु जागा मिळाल्या २९५. पुढच्या निवडणुकीत काँग्रेसच्या मतात, जनतापेक्षा केवळ दीड टक्क्याने वाढ झाली. (४२.७ टक्के) परंतु जागामात्र एकदम ५८ ने वाढल्या. १९८४ हेच एक अपवादात्मक वर्ष आहे. जेव्हा काँग्रेसला जवळजवळ निम्मी ४९ टक्के मते मिळाली. (जागा ४०३) काँग्रेसविरोधी सरळ लढती होत नाहीत हे विरोधी पक्षांच्या पराभवाचे गणिती कारण आहे. विरोधी पक्षांच्या अपयशाच्या अनेक कारणांपैकी ते एकच असले तरी त्यात बदल करणे हे त्यामानाने सर्वात सोपे असल्याने निवडणुकांचे डावपेच आखताना त्याला सर्वांत जास्त प्राधान्य मिळते. सत्तारूढ पक्षाला समर्थ पर्याय उभा करायचा तर तात्विक अधिष्ठान असलेला, एकनिष्ठ कार्यकर्त्यांची साखळी असलेला, समर्थ नेतृत्व असलेला, विशिष्ट कार्यक्रम घेऊन उभा असणारा एकसंध पक्ष आणि तोही देशव्यापी हवा. यापैकी सर्व गुण असलेला एकही पक्ष आज अस्तित्वात नसल्याने आघाड्या आणि समझोत्याचे राजकारण हाच एक मार्ग उपलब्ध आहे. त्यामुळे स्वतःच्या पक्षाची पुरेशी ताकद न वाढवता वैयक्तिक अहंकारांवर फुंकरा मारून केलेले राजकारण यशस्वी होण्याची शक्यता नाही. त्यामुळे शिवसेनेला कितीही विरोध असला तरी विरोधी पक्षांचे पारडे जड व्हायचे असेल तर त्यांच्याशी कुठल्या ना कुठल्या प्रकारे समझोता केल्याशिवाय पर्याय नाही हे उघड आहे. म्हणूनच मृणाल गोरे वगैरेंचा विरोध समजून घेऊनही जनता दलाने महाराष्ट्रातील राजकीय प्रवाहांचा नव्याने विचार केला असावा.

भाजप व शिवसेनेशी कोणतीही युती, आघाडी किंवा समझोता करण्याऐवजी त्यांच्यासाठी निम्म्यापेक्षा जास्त जागा मोकळ्या सोडण्याचा किंवा स्वत: ४८ पैकी केवळ १५ ते १८ जागा लढविण्याचा निर्णय झाला असावा तो याच भूमिकेतून. जनता दलाच्या आघाडीतील सहकारी पक्षांपैकी दोन्ही कम्युनिस्ट पक्ष, शे.का.पक्ष, रिपब्लिकनमधील आंबेडकर गट आणि कामगार आघाडी वगैरे सर्व पक्षांचा विचार केला तर ते आणखी १५ जागा लढवू शकतील. म्हणजे महाराष्ट्रातील ४८ पैकी किमान एकतृतियांश जागांसाठी भाजप-शिवसेनेला हिरवा कंदिल मिळाला असे होईल. अर्थात हे गणित वाटते तितके सोपे नाही. कोणत्या जागा कोणी मोकळ्या सोडायच्या याबाबत 'मैत्रीपूर्ण' वाटाघाटीतही कधीच एकमत होत नाही तर एकमेकांशी पडद्याआड वाटाघाटी करून ते कसे होणार, हा प्रश्नच आहे. शिवसेना-भाजन युतीशी समझोता नाही, असे वरवर म्हणायचे आणि आतून तो करायचा हे 'वरुनी नाटक आतून कीर्तन' झाले. वरून कीर्तन आणि आत तमाशाची सवय झालेल्या आपल्या मंडळींना हा नवा फॉर्म्युला यशस्वी करून दाखविणे फार कठीण आहे.

मात्र महाराष्ट्रातीलच नव्हे, तर देशाच्या राजकारणातील ती अपरिहार्य गोष्ट आहे. शिवसेनेच्या विरोधात मुख्यमंत्री शरद पवार व केंद्रीयमंत्री वसंतराव साठे यांनी परवा नागपुरात कितीही तोफा डागल्या असल्या तरी शिवसेनेचा उपयोग तिसरी शक्ती म्हणून जनता दल व राष्ट्रीय आघाडीच्या विरोधात होत असेल तर सत्तारूढ पक्षाला ते हवेच आहे. शिवसेना-भाजप व जनता दलप्रणीत राष्ट्रीय आघाडी यांचे ऐक्य होणे हे काँग्रेसच्या हिताचे नसल्याने निवडणूक होईपर्यंत दोघांनाही झोडत राहून एकमेकांपासून बाजूला ठेवणे हा त्यांच्याही डावपेचाचा भाग असणार. पुन्हा राष्ट्रीय पातळीवर, विशेषत: हिंदी भाषिक राज्यांमधील भाजपचा प्रभाव लक्षात घेऊन तेथे त्यांच्याबरोबर जागावाटपाबाबत समझोता करण्याचे जनता दलाचे प्रयत्न सुरू आहेतच. तो यशस्वी झाला तर शिवसेनेला विरोधी आघाडी कशी वाळीत टाकीत आहे हे चित्र आपोआपच निर्माण होते आणि महाराष्ट्रात सर्व विरोधी पक्षांचे ऐक्य न होऊन काँग्रेसचा डाव साध्य होतोच. शिवाय शिवसेनेला लोकसभेच्या निवडणुकीत फारसे स्वारस्य नाही. आता भाजपला जास्त जागा देऊन त्याची भरपाई विधानसभा निवडणुकीत करण्याचा त्यांचा विचार असणे सहज शक्य आहे. म्हणजे महाराष्ट्रात भाजप-शिवसेना युतीच्या वाट्याला आलेल्या १५-१६ जागांपैकी बहुतेक भाजपलाच मिळणार. जॉर्ज फर्नांडिस, प्रमोद महाजन यांची स्तुती करतात किंवा ठाकरे यांची भेट घेतात. त्यामागे हा विचार नसेलच असे नाही.

जनता दलाला हिंदी पट्ट्यात भाजपचे सहकार्य हवे आहे याचे कारण या पाच-सहा राज्यांतील जागाच शेवटी निर्णायक ठरणार आहेत. भाजपशी समझोता होत असेल आणि समजा त्यासाठी डावे, उजवे कम्युनिस्ट काही काळ दुरावत असतील तरी ते जनता दलाला चालू शकते याची कारणे दोन. एकतर या पक्षांचा प्रभाव मर्यादित प्रदेशापुरता आणि काहीही झाले तरी ते स्वतःच्या बळावर निवडणुका लढवून यशस्वी होऊ शकतात. त्यामुळे जागा जाण्याची भीती नाही. उलट भाजपशी समझोता झाला नाही तर व्यापक प्रदेशांत किमान तिरंगी लढती होऊन त्याचा फायदा काँग्रेसलाच मिळणार. म्हणजे कम्युनिस्टांशी आघाडी नसली तरी जागांच्या बाबतीत फारसा तोटा नाही. परंतु भाजपशी समझोत्याने फायदा होण्याची शक्यता जास्त. त्याचे समर्थन करणे पुन्हा फारसे अवघड नाही. राजीव गांधींचा पराभव हे आमचे पहिले उद्दिष्ट असल्याने शत्रूचा शत्रू तो आमचा मित्र या न्यायाने आम्ही आज एकत्र आलो असे त्यांना म्हणता येईल. हा अर्थात केवळ गणिती विचार झाला. विरोधक एकत्र आल्याने किंवा सरळ लढती झाल्याने काँग्रेसचा पराभव होणारच असे नाही. एकूण वातावरण, लोकांपुढे येणारे राष्ट्रीय प्रश्न, ते कशाला अग्रक्रम देतात वगैरे अनेक बाबींचा साकल्याने विचार करूनच मतदार आपापला निर्णय घेतात. त्यांचा कौल कसा असेल हे आज सांगणे फार लौकरचे होईल.

•

प्रकरण २३

# लाट नसलेली निवडणूक

लोकसभेच्या निवडणुका अपेक्षेपेक्षा महिना-दीड महिना आधीच जाहीर करून राजीव गांधी यांनी कधी नव्हे एवढ्या सफाईने धक्कातंत्राचा वापर केला आहे. इंदिरा गांधींचे याबाबतचे कसब वाखाणण्यासारखे होते. सर्जनशील नाटककार किंवा कादंबरीकार यांच्याइतकीच इंदिराजींची राजकीय प्रतिभा बावनकशी होती. या तंत्राचा अवलंब करून विरोधकांवर सुरुवातीसच मिळविलेला वरचष्मा शेवटपर्यंत कायम ठेवण्यात, किंबहुना त्याचे विजयात रूपांतर करण्यात, १९७७ सारखा एखाद-दुसरा अपवाद वगळता, त्यांना कधी अपयश आले नाही. केवळ डावपेचांच्या दृष्टिकोणातूनच विचार करायचा, तर १९७७ मध्ये निवडणुका जाहीर करण्याऐवजी आधी आणीबाणी उठवून, सर्व विरोधी नेत्यांना तुरुंगवासातून मुक्त करून त्यांच्या भावनिक विरेचनाला सात-आठ महिन्यांचा अवधी त्यांनी मध्ये दिला असता, तर १९७७ मध्येही त्यांचे पानिपत झाले नसते. परंतु निवडणुका घेण्याचा त्यांचा तो निर्णय राजकीय विचारांचा परिपाक नसून आणीबाणीच्या पापक्षालनाचा, जनमानसाला शरण जाण्याचा पश्चात्तापदग्ध बुद्धीचा आविष्कार होता. दोन वर्षांची जनता राजवट वगळता, त्यांच्या जवळजवळ वीस वर्षांच्या सलग राजवटीत इंदिराजी निवडणुकांच्या गणितात कायम यशस्वी होत गेल्या. त्याचे महत्त्वाचे एक कारण म्हणजे निवडणुका कोणत्या प्रश्नावर होणार हा हुकमी एक्का त्यांनी कायम स्वतःच्या हातात ठेवला. संस्थानिकांचे तनखे असोत,सिंडिकेटची दादागिरी असो, बँकांचे राष्ट्रीयीकरण असो की 'गरिबी हटाव'ची घोषणा असो, इंदिरा गांधी म्हणतील त्याच प्रश्नावर विरोधी पक्षांना लोकांपुढे जावे लागले. विरोधी पक्षांनी प्रत्येक वेळी आपल्या क्षमतेप्रमाणे जोरदार सामना केला. मात्र, इंग्रजी म्हणीप्रमाणे, त्यांची पाठ कायम भिंतीकडे होती. राजीव गांधींनी, आपल्या आईने शिकविलेल्या धड्याचे नाव जरी त्याच पद्धतीने गिरविले असले तरी, त्यातील मजकूर लिहिण्याची कुवत त्यांची नाही. ही वस्तुस्थिती

लक्षात घेऊनच आगामी निवडणुकांचा विचार करावा लागेल.

तथापी एक गोष्ट सर्वांच्याच, विशेषत:राजीव गांधीविरुद्ध अपप्रचार करणाऱ्यांच्या आवर्जून निदर्शनास आणून द्यायला हवी, ती म्हणजे त्यांनी निवडणुकांची दाखविलेली तयारी. राजीव गांधी लोकांपुढे यायला घाबरतील, कोणते ना कोणते कारण काढून निवडणुका पुढे ढकलतील, आणीबाणी आणतील, पाकिस्तानविरुद्ध युद्ध सुरू करतील, किमान युद्धसदृश परिस्थिती निर्माण करतील, एवढेच काय, फिलिपिन्सच्या सर्वसत्ताधीश मार्कोसप्रमाणे देशत्यागही करतील, अशा वाऱ्यावरच्या वावड्यांना त्यांनी या निमित्ताने कायमची मूठमाती दिली आहे. यातील प्रत्येक गोष्ट ते करू शकले असते. तरीही ती त्यांनी केली नाही. उलट स्वत:चे संपूर्ण राजकीय भवितव्य येथील लोकांवर सोपविले ही भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने प्रचंड आश्वासक गोष्ट आहे.

कोणत्या प्रश्नावर निवडणूक लढवायची हे राजीव गांधींच्या हातात नाही हे तर खरेच. परंतु त्याच वेळी बोफोर्स या एकमेव प्रश्नावर बाजी मारता येईल अशी विरोधी पक्षांनी समजूत करून घेतली असेल, तर तेही खरे नव्हे. बोफोर्स प्रकरणात सरकार आणि खुद्द पंतप्रधान राजीव गांधी दोषी आहेत, हा विरोधी पक्षांचा आक्षेप लोकांनी मान्य केला तरी सार्वमतासारखा केवळ तोच एकमेव प्रश्न केंद्रिभूत धरून भावी सरकारबाबत मतदार कौल देतील, अशी शक्यता कमीच. किमान आज तरी, निखळ काँग्रेसविरोधी किंवा विरोधी पक्षांना प्रचंड अनुकूल अशी कोणतीही स्पष्ट लाट नाही. जातीयवाद डोके वर काढीत असला तरी भगव्या किंवा हिरव्या लाटेच्या आहारी जाऊन देशातील मूलभूत प्रश्नांचा विचार करील, एवढी लोकांची मानसिकता, गेल्या पाच वर्षांत बदललेली नाही. भारतीयांच्या विचारांचा गाभा एवढ्या झटपट बदलत असता तर गेल्या पाच हजार वर्षांत असंख्य क्रांत्या आणि तेवढ्याच प्रतिक्रांत्या झाल्या असत्या. शिवाय येथील हिंदूही कधीच एकसंध नव्हता. किंबहुना हिंदूंचे असले ऐक्य हे हिंदुत्वाच्या प्रचलित संकल्पनेशी विरोधीच आहे. सर्व हिंदू एक नव्हेत, या विचारावर तर हिंदू जातीयवाद्यांची शतकानुशतके अव्यभिचारी निष्ठाच होती. सत्तेवर येण्याची स्वप्ने पाहणाऱ्या राजकीय धुरंधरांचा तो एक डाव आहे. हिंदू जातीयवाद ही मुस्लिम जातीयवादाची प्रतिक्रिया आहे, असे विश्लेषण अनेक जण करतात. मुस्लिम जातीयवादाचे पोषण करण्यात राजकीय पक्षच आघाडीवर होते. आज त्यांनाच हिंदू जातीयवादाचा सामना करावा लागतो आहे. जातीयवादाचे हे भूत याच वेळी पुन्हा बाटलीत बंद करायचे की राजीव गांधींना हटविण्यासाठी त्याचा उपयोग करायचा याचा विचार, राजकीय पक्षांनी आणि लोकांनीही करायचा आहे. 'जातीयवाद' आणि गेल्या काही दिवसांतील

जातीय दंगली हा प्रश्न या निवडणुकीत पुढे येणारच. अनुकूल किंवा प्रतिकूल लाट असलीच तर ती एवढीच. आणि तिचे अस्तित्वही महाराष्ट्रात जाणवते तेवढ्या तीव्रपणे इतरत्र नाही. विरोधी पक्ष बोफोर्सच्या तोफा डागून प्रचारफेरी सुरू करणार. पण राजीव गांधीच्या पराभवासाठी एकास एक अशा लढती करण्यासाठी भाजपबरोबर राष्ट्रीय आघाडीने समझोता केलाच तर प्रचारात काँग्रेस त्याचा उपयोग केल्याशिवाय राहणार नाही. भाजपच्या नावाखाली सर्वच विरोधी पक्षांना एकदम झोडण्याची आयतीच संधी त्यामुळे त्यांना मिळू शकेल. सरळ लढती सांख्यिकीदृष्टीने कागदावर आशादायक वाटत असल्या तरीही रणनीतीच्या दृष्टीने ते सोयीचे आहे असे नाही, म्हणूनच अनेकांचा त्याला विरोध आहे. विरोधी पक्ष एकत्र आले तर त्यांच्यातील वैचारिक दरीचा उल्लेख करून, १९७७ च्या फसलेल्या जनता प्रयोगाची आठवण करून देऊन, त्यांच्यावर जातीयतेचा, संधिसाधूपणाचा आरोप करून काँग्रेस फायदा उठविणार. ते एकत्र आले नाहीत तरी काँग्रेसचा मतविभागणीमुळे फायदा होणार तो होणारच.

राजकीय स्थिती अशी असली आणि राजीव गांधी व त्यांचे सरकार यांच्या चुकांचा व त्यांच्या अपयशाचा पुरेपूर फायदा उठविण्याइतपत विरोधी पक्ष बळकट नसले तरीही चर्चेसाठी हे प्रश्न मतदारांपुढे येणारच. बोफोर्स किंवा त्यानिमित्ताने उच्चस्थानी होणारा भ्रष्टाचाराचा प्रश्न सर्वच विरोधी पक्ष पोटतिडकीने मांडत राहणार. हा भ्रष्टाचार उघडकीस आणण्यात काही वृत्तपत्रांनी महत्त्वाची भूमिका बजावली असली तरी त्यावर शासकीय शिक्कामोर्तब होण्याची शक्यता नजीकच्या काळात नाही. विरोधी पक्षाचे सरकार अधिकारावर आले तरच त्याचे खरे अधिकृत स्वरूप उघडकीस येऊ शकते. संरक्षणसामग्रीच्या खरेदीचे आतापर्यंत शेकडो व्यवहार झाले आणि अनेकांना त्यात नियमाप्रमाणे दलालीही मिळाली. त्याविरुद्ध कधी वादळ उठले नाही. 'दलाली' हा अशा व्यवहारांचा अपरिहार्य भाग आहे. या वेळचा प्रश्न वेगळा आहे. मध्यस्त असणार नाही, त्यांना दलाली मिळणार नाही, असे सरकार सांगत असतानाही मध्यस्त होते आणि त्यांना दलालीही मिळाली यातील विसंगती लोकांच्या लक्षात येत नाही. त्यामुळे संशयाचे वातावरण आहे. आतापर्यंत सरकार त्याचे निराकरण करू शकले नाही आणि आता तर हा प्रश्न सरळ लोकांच्या न्यायालयात आला आहे. भ्रष्टाचार असेल किंवा नसेलही. त्याला लोकमान्यता मिळणार की नाही, हा प्रश्न आहे. अडचण एवढीच आहे की बोफोर्समधील भ्रष्टाचाराल मान्यता न देताही बरेच लोक इतर अनेक कारणांसाठी काँग्रेसला मते देतील. राजीव गांधी किंवा काँग्रेसला बहुमत मिळालेच तर त्याचा अर्थ बोफोर्स प्रकरणात लोकांनी राजीव गांधींची पाठराखण केली असा मात्र होणार नाही.

काँग्रेसचा खरा कस लागणार आहे, तो देशापुढील मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी केलेली कामगिरी लोकांपुढे मांडताना. बेकारी, दारिद्र्य, महागाई, निवारा या अगदी प्राथमिक गरजांबाबत काही भरीव करण्यात सरकारला मुळीच यश आले नाही. त्यासाठी आखलेल्या अनेक योजना, अगदी शेवटी शेवटी निवडणुकांवर डोळा ठेऊन आखल्या हे स्पष्ट आहे. जिल्हा परिषदा, नगरपालिका यांना जादा अधिकार देण्याची विधेयके राज्यसभेने फेटाळल्यावर हाच प्रश्न घेऊन लोकांपुढे जावे आणि त्यासाठी तातडीने निवडणुका जाहीर कराव्यात असा प्रस्ताव आला होता.परंतु सध्या मंत्री आणि मुख्यमंत्र्यांना किंवा राज्य विधानसभांना किंवा राज्य सरकारांना जिथे त्यांचे रास्त लोकशाही हक्क मिळत नाहीत, पक्षांतर्गत लोकशाही आणि निवडणुका जेथे अशक्य झाल्या आहेत, तेथे लोकांना जादा अधिकार देण्याची (तीही पैशांशिवाय) भाषा दांभिकपणाची, फसवणुकीची वाटते. लोकांनाही ते कळते. आर्थिक धोरणामुळे काही उद्योगांचे आधुनिकीकरण होत असले तरी त्यामुळे रोजगारात फारशी वाढ नाही, राष्ट्रीय उत्पन्नातील उद्योगांचा वाटा आहे तेवढाच आहे आणि काही लोकांच्या हातातच सर्व साधनसामग्री आणि संपत्ती एकवटते आहे याही गोष्टी नजरेआड होऊ शकत नाहीत. सामान्य लोकांना त्याचा फटका अधिक बसतो आहे आणि त्यांची संख्या निम्म्यापेक्षा जास्त आहे. हयातभर नोकरी करूनही स्वतःचे दोन-तीन खोल्यांचे घर होऊ शकत नाही याचा अर्थ रोजगार मिळतो, पण त्यामुळे निर्माण होणाऱ्या संपत्तीत वाटा मात्र नाही. अनेकांना तर रोजगार नाही. दिवसेंदिवस विषमता वाढतेच आहे, ती कमी करण्याचे राजकीय धाडस राजीव गांधींनी दाखविले नाही.

देशांतर्गत प्रश्नाबरोबरच या वेळी वादविषय होऊ शकेल ते परराष्ट्र धोरण. या धोरणात मूलभूत बदल झाला नसला तरी (दादागिरीच्या ) राजनैतिक शैलीमुळे शेजारी असलेल्या देशांशी आपल्या पारंपरिक संबंधाला गेल्या तीन-चार वर्षात अतिशय अनिष्ट वळण मिळाले. चीन आणि पाकिस्तानबरोबर आपला थेट संघर्षच होता. त्यांत आता नेपाळ व श्रीलंका यांचीही भर पडली आहे. बांगला देशाबरोबर गंगेच्या पाणीवाटपावरून उद्‌भवलेला वाद मिटू शकत नाही. सार्क, अलिप्त देशांची चळवळ, राष्ट्रकुल यात बेनझीर भुट्टोंमुळे पाकिस्तानला नवी अनुकूलता लाभली आहे. श्रीलंकेबाबत तर आपले पाय निष्कारण गाळात गुंतत गेले. राजनैतिक लढाईला लष्करी सामर्थ्य हे उत्तर होऊ शकत नाही हे दोन वर्षांनी आपल्या लक्षात आले. त्यासाठी हजारावर सैनिकांचा बळी आणि कोट्यवधी रुपयांचा फटका सहन करावा लागला. देशापुरते बोलायचे तर पंजाबमधील अतिरेक्यांचा प्रश्न, बोडोंचे आसाममधील आंदोलन, बंगालमधील गुरख्यांची वेगळ्या राज्याची मागणी,

लडाखमधील बौद्धांचा केंद्रशासित प्रदेशासाठी हट्ट, स्वतंत्र झारखंड यांसारख्या प्रश्नांना सामोरे जाताना राजीव सरकारची मुत्सद्देगिरी डोळ्यात भरली नाही. त्यांच्या पाच वर्षांच्या कारकीर्दीत केंद्रीय मंत्रिमंडळात अगणित वेळेला झालेले बदल, अनेक राज्यांमध्ये बदलेले मुख्यमंत्री, केरळ, तामिळनाडू, हरियानासारख्या राज्यांतील विधानसभा निवडणुकीतील पराभव, जातीय दंगली या सर्वांचा एकत्र विचार केला तर 'यशस्वी कारकीर्द' अशा शब्दांत राजीव गांधींचा गौरव करणे केवळ अशक्य. जानेवारी १९८५ मध्ये प्रचंड बहुमताने लोकांनी त्यांना निवडून दिले. इंदिरा गांधी व जवाहरलाल नेहरू यांनाही एवढे मताधिक्य मिळाले नव्हते. परंतु राजीवना आपला ठसा भारतीय राजकारणावर उमटविता आला नाही. दुर्दैवाने त्यांच्या कमतरतेचा फायदा घेऊ शकेल असा मध्यममार्गी, राष्ट्रव्यापी, खंबीर व एकमुखी नेतृत्वाचा पक्ष येथे आज अस्तित्वात नाही. लोकांना पर्याय हवा आहे. वेगळा कार्यक्रम, वेगळी धोरणे, वेगळी माणसे हवी आहेत. राज्यपातळीवर हे पर्याय लोकांनी अनेकदा स्वीकारले आहेत. परंतु केंद्रीय सत्तेसाठी आहेत त्या पक्षांवर भरवसा टाकावा, असा विश्वास लोकांना वाटत नाही. या पक्षातील व्यक्तिकेंद्रित वाद, विविध पक्षांची वेगवेगळी धोरणे व कार्यक्रम, सत्तासंपादनाचा अंतर्गत झगडा यामुळे ते स्थिर सरकार देऊ शकणार नाहीत, असे लोकांना वाटते. त्यामुळे लोकांची काँग्रेसविरुद्धची, राजीव गांधींविरुद्धची प्रतिक्रिया या निवडणुकीत व्यक्त होईलच, परंतु संयमाने. उदाहरणार्थ, काँग्रेसची मते कमी होतील, जागा कमी होतील, त्यांचे बहुमत अगदीच मामुली राहील, कदाचित पुढे इतर पक्षांचा पाठिंबाही घ्यावा लागेल, पण इतपतच. त्यामुळे नवा राजकीय समतोल निर्माण होईल. हाच या निवडणुकांचा फायदा असेल.

•

# दिल्लीच्या तख्तावर कोण बसणार ?

२४

प्रतिबिंब ९०

निवडणूकमोहीम शेवटच्या टप्प्यांत आली आहे. 'दिल्लीच्या तख्तावर कोण बसणार' या प्रश्नाचे निर्णायक उत्तर देता येणार नाही, एवढी तीव्र स्पर्धा या वेळच्या निवडणुकीत आहे. अचानकपणे निवडणुका जाहीर करून पंतप्रधान राजीव गांधी यांनी 'टॉस' जिंकला होता. त्यांच्याकडे फार आक्रमक फलंदाज नव्हते. विरोधकांच्या गोलंदाजीबद्दलही फारसा दबादबा नव्हता आणि खुद्द विरोधकांना तरी आत्मविश्वास कोठे होता ? परंतु दोन्ही 'टीम'मधील खेळाडूंच्या कर्तृत्वापेक्षा खेळपट्टीच कधी कधी निर्णायक ठरते. या वेळच्या प्रचारमोहिमेचे तसेच झाले आहे. एक दिवसाचा क्रिकेट सामना जिंकण्यासाठी झगमगाटी खेळ करावा लागतो. सत्तारूढ पक्ष व विरोधकांचा प्रचार त्याच थाटात सुरू आहे. परंतु लोकमताचा कानोसा काय आहे ? या झगमगाटाने दीपून जाण्याऐवजी पाच दिवसांचा कसोटी सामना पाहणाऱ्या प्रेक्षकांची 'स्वस्थ' भूमिका त्याने घेतली आहे. पंचायत राज्य विधेयक राज्यसभेने नाकारले म्हणून सामान्य लोकांपर्यंत सत्ता नेण्याच्या सरकारी प्रयत्नांना खिळ बसली, या पंतप्रधानांच्या (खोट्या) प्रचाराने तो अस्वस्थ होत नाही, की बोफोर्समधील दलालीच्या प्रश्नावर तो पेटून उठत नाही. अयोध्येतील राममंदिराचा शिलान्यास असो, की भागलपूरमधील जातीय दंगली, त्यातील राजकीय डावपेच आता त्याच्या ध्यानात येऊ शकतात. म्हणूनच अद्यापही लाट नाही. काँग्रेस (आय)च्या विरोधात नाही. तशीच विरोधकांच्या बाजूनेही नाही. काँग्रेस सत्तारूढ पक्ष असल्याने त्यांना आधी जास्त वेगाने पळता येते. यावेळी फरक आहे तो एवढाच की, काँग्रसने सीमारेषेवर पोहोचण्याच्या बराच वेळ आधी विरोधी पक्षांनी त्याला गाठले आहे.. भावनेच्या भरात एखाद्या पक्षाची निवड करण्याऐवजी (आणि नंतर पश्चात्ताप करण्याऐवजी) सर्व प्रश्नांचा साकल्याने विचार करून प्रगल्भपणे मतदान करण्याची संधी या वेळी भारतीय जनता दवडणार नाही,

असे या शेवटच्या टप्प्यातले वातावरण आहे. निवडणुकीच्या निमित्ताने मला केवळ आंध्र प्रदेशातील वातावरणच पाहता आले. परंतु तेही खूप बोलके आहे. एन.टी. रामाराव यांच्या सुदर्शनधारी कृष्णाच्या रूपातील प्रचंड कटआऊट्सवरून सध्या वादळ सुरू आहे. अशा तऱ्हेने धार्मिक भावनांचा उपयोग प्रचारात करून घ्यावा की नाही, यावर वेगळी चर्चा करता येईल, परंतु कृष्णाचे रूप धारण केले म्हणून रामारावांना आणि त्यांच्या पक्षाला लोक मते देणार आहेत असा (रामारावांसह) कोणाचा समज असेल तर तो खरा नाही. तुम्ही आमच्यासाठी काय केले आणि काय करणार आहात, असा प्रश्न खणखणीतपणे वाजविण्याच्या स्थितीपर्यंत 'अडाणी'भारतीय मतदार पोहोचले आहेत. लाटेच्या राजकारणाचा हा शेवट असेल तर,कोणीही निवडून येवो, भारतीय लोकशाही व्यवस्थेचा तो विजय असेल.

प्रचारमोहीम लोकशाहीचे शिक्षण देणारी विशेष कार्यशाळा असते. त्यात कोणते प्रश्न समोर आले, कोणते विषय वादविषय झाले, नागरिकांचा प्रतिसाद कसा होता, विविध पक्षांनी त्यावर कोणत्या भूमिका घेतल्या, कोणत्या भागात कोणाचा जोर आहे, त्याची कारणे काय आहेत हे जाणून घेणे उपयुक्त ठरेल. अनेक तऱ्हांनी हा विचार करता येईल. भौगोलिकदृष्ट्या विचार करता येईल. पक्षनिहाय विचार करता येईल, राज्यनिहाय करता येईल. उत्तरेकडून सुरुवात करू या. जम्मू व काश्मीर आणि पंजाबध्ये शांतपणे निवडणुका होत आहेत हेच सर्वात महत्त्वाचे. जागांच्या दृष्टीने ही दोन्ही राज्ये लहान असली तरी सीमावर्ती, घटनेत वेगळे स्थान असलेली, (काश्मीर ३७० वे कलम), धार्मिक अल्पसंख्य बहुसंख्य असलेली आणि अलीकडे जमातवाद व अतिरेक्यांच्या तावडीत सापडलेली. म्हणूनच मतदानप्रक्रियेतील त्यांचा सहभाग महत्त्वाचा. श्रीनगरची जागा नॅशनल कॉन्फरन्सला बिनविरोध मिळाली. काश्मीरच्या खोऱ्यातील वातावरण त्यामुळे शांत आहे. डॉ. फारूख अब्दुल्ला यांना प्रचाराच्या गदारोळातून बाहेर राहता आले, त्याचप्रमाणे काँग्रेस व इतर विरोधी पक्षांपासूनही सारख्याच अंतरावर राहता आले तर ते या वेळी हवे होते. दिल्लीत आगामी सरकार कोणाचे असेल याची खात्री नसेल तर फारूख सारख्यांची नेहमीच अडचण होते. एकेकाळी विरोधी पक्षांबरोबर राष्ट्रीय प्रवाहात त्यांनी उडी घेतली, परंतु नंतर राजीव गांधींबरोबर जुळवून घेण्याशिवाय त्यांना पर्याय राहिला नाही.इतका की, काँग्रेसबरोबर आघाडीचे सरकार करावे लागले आणि मौलाना फारुकींसारख्या जातीयवाद्यांनी त्याचा प्रचंड गैरफायदा उठविला. पाकधार्जिण्या मुस्लिमांच्या कारवायांना तोंड देण्यास केवळ सत्ता उपयोगी ठरत नाही. त्यासाठी लोकमानस आपल्याकडे वळवून घेण्याचे कौशल्य लागते. मधल्या काळात डॉ.फारुख अब्दुल्ला यांचा प्रभाव ओसरला. या निमित्ताने त्यांना

वेगळी गणिते मांडून स्वतःची आणि पर्यायाने देशाचीही स्थिती मजबूत करण्यास वाव आहे.

पंजाबमध्ये लोकसभेच्या निवडणुका होताहेत, अतिरेक्यांच्या दबावाला बळी न पडता मुक्तपणे सर्वचपक्षांच्या प्रचारसभा होताहेत, निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन एखाद्या गटाने केलेले नाही, हीच सर्वात आशादायक गोष्ट आहे. १९८४ च्या निवडणुकीनंतर राजीव गांधींनी लोंगोवाल यांच्याशी केलेल्या कराराला पाच वर्षे झाली, तरीही पंजाब प्रश्नावरील तोडगा दृष्टिपथात नाही. आनंदपूरसाहिब ठरावाला विरोधी पक्षांचा, विशेषतः राष्ट्रीय आघाडीतील पक्षांचा पाठिंबा आहे, राज्यांना अधिक स्वायत्तता देऊन देशाची एकात्मता खंडित करण्याचे त्यांचे प्रयत्न आहेत, यावर पंतप्रधान आपल्या प्रचारामध्ये भर देत आहेत. परंतु पंजाबप्रश्न सोडविण्याचा कोणताही तोडगा आता त्यांच्याकडे नाही. याउलट काँग्रेसऐवजी विरोधी पक्षांची सत्ता दिल्लीत येणे हाच पंजाबवरील एकमेव तोडगा आहे, असे विरोधकांतील काहींचे म्हणणे आहे. 'पंजाबचा प्रश्न भावनिक आहे, काँग्रेस आणि राजीव गांधीवर त्यांचा राग आहे, त्यांची सत्ता गेली तर हा प्रश्न सुटण्यास मदत होईल,' या प्रतिपादनात पुष्कळ तथ्य आहे. केंद्रात सत्तापालट झाला तर पंजाब विधानसभेच्या निवडणुका जाहीर करता येतील. राजकीय प्रक्रिया पुन्हा सुरू होईल, त्यामुळे पंजाबमधील १३ जागांपैकी कोणाला किती मिळतात हा प्रश्न व्यापक संदर्भात गौण आहे.

जागांच्या दृष्टीने सर्वात निर्णायक ठरतात ती राजस्थान, हरियाना, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार व मध्यप्रदेश ही हिंदी भाषिक राज्ये. 'हिंदी हार्टलँड' असा त्यांचा उल्लेख वारंवार होतो. ५२९ पैकी २२५ जागा या सहा राज्यातील आहेत. सत्तेची सर्व गणिते मांडली जातात ती हा प्रदेश कोणाच्या बाजूला झुकणार आहे त्यावरून. या सर्व प्रदेशांच्या राजकीय वर्तनात पुष्कळ साम्य आढळते. १९६७ मधील संयुक्त विधायक दलांचा प्रयोग व १९७७ मधील जनता लाट सर्व प्रदेशात जवळजवळ सारखीच होती.उत्तर प्रदेश हे त्याचे केंद्र आहे. आतापर्यंत मध्यवर्ती सत्तेला आव्हान मिळाले ते याच प्रदेशातून. भारतीय राजकारणातील सर्व महारथी याच प्रदेशातून उभे आहेत. या सहाही राज्यातील वातावरण या वेळी विरोधी पक्षांना अनुकूल आहे. विश्वनाथ प्रताप सिंग यांच्या नेतृत्वाला या भागातील मतदारांनी मान्यता दिलेली दिसते. त्यांना राजघराण्याची पार्श्वभूमी आहे. सरंजामी मनोवृत्तीच्या समाजाला त्यांचे नेतृत्व त्यामुळे नैसर्गिक वाटत असेल. उत्तर प्रदेशातच ते घडते आहे असे नव्हे. पूर्वीच्या संस्थानिकांच्या वारसांपैकी ज्यांच्याकडे थोडेफार कर्तृत्व आहे आणि राजकारणात उतरण्याची तयारी आहे

त्या सर्वांना लोकांनी आपले प्रतिनिधी म्हणून स्वीकारले आहे.जयपूरच्या गायत्रीदेवी असोत की त्यांचा मुलगा भवानीसिंह, ग्वाल्हेरच्या विजयाराजे असोत की त्यांचे चिरंजीव माधवराव, बडोद्याचे नरेश असोत की पतियाळाचे, विजयवाड्याचे गजपती असोत की सावंतवाडीचे शिवरामराजे, त्यांचे नेतृत्व सहजपणे मान्य झाल्याचे दिसते. विश्वनाथ प्रताप सिंग यांची ही एक जमेची बाजू आहे. १९७७ मध्ये जे.पीं.नी सत्तारूढ पक्षाच्या विरुद्ध मोठी लढाई केली. तिचे पर्यवसान शेवटी विरोधकांना सत्ता मिळण्यात झाले असले तरी स्वतः जे.पीं.ना राजकीय महत्त्वाकांक्षा नव्हती. या वेळी तसे नाही. व्ही.पीं.ना मत म्हणजे संभाव्य पंतप्रधानाला मत असे सरळ राजकीय गणित आहे. लोकांना ते पटकन समजते. १९७७ मध्ये मोरारजीभाई पंतप्रधान झाले तरी त्यांचा स्वतःचा राजकीय मतदार संघ नव्हता. पाठिंब्यासाठी त्यांना इतरांवर अवलंबून राहावे लागत होते. थेट लोकांमध्ये जाऊन राजकारण करण्याचा त्यांचा पिंड नव्हता. व्ही.पी.सिंग यांचे तसे नाही. उत्तरेतील विरोधकांच्या विजयाचे प्रमुख शिल्पकार तेच असतील. १९७९ मध्ये जनता पक्ष फुटला, त्याची त्याच तऱ्हेने पुनरावृत्ती होईल, असे लोकांना वाटत नाही. १९७७ मध्ये लोकांनी आणीबाणीच्या विरुद्ध जे.पीं.च्या नैतिक आवाहनाला प्रतिसाद म्हणून निवडणुकीत आपली प्रतिक्रिया नोंदविली. या वेळी विरोधी पक्ष त्यांच्याकडे भांडे लपवून ताक मागत नाहीत. 'आम्हाला सत्ता द्या.' असे त्यांचे सरळ मागणे आहे. तेथील मतदार वेगळ्या भूमिकेतून या निवडणुकीकडे पाहात आहे. राजीव गांधींच्या लोकप्रियतेला सर्वांत मोठा धक्का बसला आहे तो या प्रदेशात. देश एकसंघ आहे असे आपण कितीही म्हणत असलो तरी प्रदेशानुसार त्याचे राजकीय ध्रुवीकरण झालेले आहेच. उत्तर भारतात, त्यातही उत्तर प्रदेशात आव्हान देणारे नेतृत्व उभे राहिले म्हणूनच आज राजीव गांधींना सत्ता टिकविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागत आहे. रामाराव, ज्योती बसू, रामकृष्ण हेगडे यांना केंद्रीय सत्तेला असे आव्हान कधीच देता आले नसते. एन.टी. रामारावांनी पंतप्रधानपदाच्या स्पर्धेतून माघार घेतली आणि पंतप्रधानपदासाठी व्ही.पी. सिंग यांच्या नावाची शिफारस केली. ज्योती बसूंचा सिंग यांनाच पाठिंबा आहे. हेगडे यांनी आपले लक्ष पुन्हा कर्नाटकात केंद्रित केले आहे. करुणानिधी किंवा अकालींचा राज्यांना स्वायत्तता देण्याचा आग्रह आहे. यामागील वास्तव हे असे आहे.

मद्रासमध्ये बोलताना राजीव गांधींनी राष्ट्रीय आघाडीच्या, राज्यांना अधिक स्वायत्तता देण्याच्या कल्पनेवर जोरदार हल्ला चढविला. त्याचा लोकांना कळलेला अर्थ स्पष्ट आहे. तो म्हणजे हिंदी भाषिक राज्यांचे वर्चस्व इतरांनी कायम मान्य करीत राहावे. पूर्व, पश्चिम वा दक्षिणेतील पंतप्रधान स्वाभाविकपणे मान्य होत

नाही तोपर्यंत स्वायत्ततेची मागणी पुढे येतच राहणार. आज या भागातील विरोधी पक्षांचे सर्व मुख्यमंत्री राष्ट्रीय आघाडीत आहेत ते उगाच नाहीत. अधिक सत्तेसाठी रास्त मार्गांनी चाललेला हा झगडा आहे.तो कसा मिटवायचा याबाबत काँग्रेस आणि इतरांच्या दृष्टिकोणात फरक आहे, काँग्रेस हा जवळजवळ उत्तर भारतीय प्रादेशिक पक्ष बनत चालला असताना इतरांच्या प्रादेशिकतेवर त्याला परिणामकारक हल्ला चढविता येणार नाही. त्यामुळे या निवडणुकीत केवळ राजीव गांधी यांच्याच सत्तेला धोका निर्माण झाला आहे असे नव्हे. काँग्रेसच्या एकेकाळच्या संस्कृतीलाच तो धक्का असणार आहे. पक्ष आणि पंतप्रधान एकाच वेळी धोक्यात आल्याचा हा अभूतपूर्व प्रसंग आहे. राजीव गांधी यांच्या हातून उत्तरप्रदेश, बिहार जाण्याच्या स्थितीत आहे. तसे झाले तर सत्तेचा खेळ शेवटपर्यंत खेळत राहण्यासाठी त्यांच्या हातात पुरेशी पानेच राहणार नाहीत, 'राजीव गांधी यांची लोकप्रियता उत्तरेत घसरत चालली आहे' या विधानावर दक्षिणेतील एका वृत्तपत्राच्या संपादकाची प्रतिक्रिया फार मार्मिक आणि बोलकी होती. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर—"When he had it ?" १९८४ चे यश इंदिरा गांधींचेच होते. आज त्या नाहीत, काँग्रेसला यश नाही. राजीव गांधींना त्यांच्या कारकीर्दीत एकही लक्षणीय निवडणूक-विजय मिळालेला नाही ही वस्तुस्थिती आहे. आजही दक्षिणेत काँग्रेसच्या पोस्टर्सवर एकट्या राजीव गांधींचे चित्र नाही. एका बाजूला इंदिराजी, दुसऱ्या बाजूला राजीव आणि मध्ये हाताचे चित्र अशी ही पोस्टर्स आहेत. आंध्रप्रदेश काँग्रेस (आय)चे अध्यक्ष डॉ.चेन्ना रेड्डी यांच्या गांधी भवनातील कार्यालयात भिंतीवर एकमेव छायाचित्र आहे, इंदिरा गांधींचे ! आज चाळीस वर्षांनंतर लोक महात्मा गांधींच्या नातवाला, राजमोहन गांधींना केवळ महात्माजींच्या नावावर मते द्यायला तयार नाहीत हे त्यांचे अमेठीतील प्रतिस्पर्धी राजीव गांधी यांच्या चांगलेच लक्षात आले असेल.

बंगालमध्ये डावी आघाडी भक्कम पायावर उभी आहे. १९८४ पेक्षा या वेळी त्यांच्या जागा वाढण्याची शक्यता आहे. (त्या वेळी काँग्रेसला ४२ पैकी १६ जागा मिळाल्या होत्या). आसामध्ये निवडणुका नाहीत. 'सेव्हन सिस्टर्स'पैकी अरुणाचल, नागालँड, मिझोराम, मणिपूर, त्रिपुरा, मेघालय या राज्यातील सर्व जागांची संख्या आहे अवघी दहा. त्या सर्व काँग्रेसला मिळणार नाहीत. ओरिसात जे.बी. पटनाईक अप्रिय झाले आहेत. बिजू पटनाईक तेथे विरोधकांचे नेतृत्व करीत आहेत. तेथे काँग्रेसला समसमान संधी आहे.तरीही पूर्वेकडील या सर्व राज्यांत मिळून काँग्रेसला ४० टक्क्यांपेक्षा जास्त जागा मिळणार नाहीत, असा एका पाहणीचा निष्कर्ष आहे. दक्षिणेतील चार राज्यातील १२९ जागापैकी काँग्रेसला

साठच्या आत-बाहेर समाधान मानावे लागेल. त्यातल्या त्यात काँग्रेसला हात मिळणार आहे तो महाराष्ट्र व गुजरातमधून. परंतु तोही पहिल्यासारखा नाही. महाराष्ट्रात काँग्रेसचा स्कोअर पूर्वी कधीही ४० च्या खाली गेला नव्हता. या वेळी तो प्रथमच जाईल असा सर्वच जाणकारांचा अंदाज आहे. याचा अर्थ असा की भारतातील महाराष्ट्रासारखा एखाददुसरा अपवाद वगळता काँग्रेस (आय) ला निम्म्यापेक्षा जास्त जागा हमखास मिळतील असा खात्रीचा व्यापक भूप्रदेश दिसत नाही. त्यामुळे बहुमत मिळेल की नाही अशा संभ्रमावस्थेत आज सत्तारूढ पक्ष आहे. बोफर्स, भागलपूरसारख्या जातीय दंगली, बाबरी मशीद-रामजन्मभूमीचा वाद, परराष्ट्र धोरण, विशेषतः श्रीलंका, नेपाळ, पाकिस्तान या शेजारी देशांशी संबंध, यासारख्या अनेक प्रश्नांची सरमिसळ होऊन एक वेगळेच रसायन झाले आहे. त्याखेरीज राजीव गांधींचे नेतृत्वगुण, काम करण्याची त्यांची शैली, त्यांची राजकीय उद्दिष्टे, त्यांनी निवडलेले सहकारी, सरकारची कार्यक्षमता याचाही विचार लोक करताहेत. कोणताही एकमेव प्रश्न नसलेली, मागील सर्व निवडणुकीपेक्षा वेगळी अशी ही निवडणूक आहे. राजकीय स्थैर्य लाभले नाही तरी चालेल, अस्थैर्याचा धोका पत्करूनही इतर प्रश्नांवर स्पष्टपणे मतप्रदर्शन करण्याच्या मनःस्थितीत या वेळी लोक आहेत!

•

२५ | १० डिसेंबर

# सत्तांतर एक मध्यांतर

अखेर राष्ट्रीय आघाडीचे सरकार केंद्रस्थानी सत्तेवर आले. देशात एका नव्या पर्वाची सुरुवात झाली. आपल्या लोकशाही व्यवस्थेत अनेक उणिवा आहेत. धार्मिक संघर्ष, वैचारिक मतभिन्नता, नेतृत्वाचे वाद, दारिद्य्र, बेकारी यासारख्या असंख्य प्रश्नांनी ८० कोटी लोकसंख्येचा हा महाकाय देश ग्रस्त आहे. तरीही ज्या शांततेने व परिपक्वतेने हे सत्तांतर होते आहे ती या देशाच्या उज्ज्वल लोकशाही भवितव्याची नांदी आहे. १९७७ मध्ये इंदिरा गांधी आणि १९८९ च्या अखेरीस राजीव गांधी व त्यांच्या काँग्रेस पक्षाने ज्या सहजतेने लोकमताचा हा प्रतिकूल कौल स्वीकारला त्यामुळे त्यांची व देशाचीही प्रतिष्ठा वाढली आहे. काँग्रेस आज सर्वात मोठा पक्ष आहे. ५२५ पैकी १९२ जागा त्यांना मिळाल्या आहेत. विराधकांचे सरकार लौकर स्थापन होऊ नये यासाठी राजकीय खेळी करण्याइतके कसब काँग्रेसच्या नेत्यांकडे आहे. परंतु त्या मोहाला ते बळी पडले नाहीत. काँग्रेसचा पराभव ही राजीव गांधींना मिळालेली शिक्षणाची संधी आहे. निरंकुश सत्तेमुळे काँग्रेसच्या शरीरात अनेक रोगांनी घर केले आहे. पुढच्या निवडणुकीपर्यंत त्या सर्वांचा नायनाट करता येईल. अंतर्गत लोकशाहीने तेजाळणारा, मतभिन्नतेला वाव असणारा, स्थानिक व प्रादेशिक नेतृत्वाच्या सकस वाढीला प्रोत्साहन देणारा, चांगल्या कार्यकर्त्यांचा संच असणारा, एकाच व्यक्तीच्या हाती सत्ता केंद्रीत होऊ न देणारा, देशापुढील प्रश्नांना पक्षीय पातळीवर सामोरा जाणारा, सेक्युलर, मध्यममार्गी व देशव्यापी पक्ष बांधण्याचे आव्हान राजीव गांधीं व त्यांचे सहकारी कसे पार पाडतात याकडे सर्वांचे लक्ष असेल. राजीव गांधींच्या गेल्या पाच वर्षांच्या कारकीर्दीतील इतर कमतरता बाजूला ठेवल्या तरी वरून लादलेल्या, लोकमान्यता नसलेल्या अराजकीय व्यक्तींच्या हाती मोठ्या प्रमाणावर सत्ता केंद्रीत झाली हेही त्यांच्या पराभवाचे एक महत्त्वाचे कारण आहे. या समीकरणात बदल करण्याचा विचार आता तरी ते करतील अशी अपेक्षा आहे. महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश,

राजस्थान, बिहार वगैरे नऊ राज्यातील निवडणुका पुढील दोन तीन महिन्यात होणार आहेत. त्या वेळी काँग्रेसच्या बदलेल्या धोरणाचा प्रत्यय येईल अशी अपेक्षा आहे.

राष्ट्रीय आघाडीच्या नेतेपदी विश्वनाथप्रताप सिंग यांचीच निवड होईल अशी अपेक्षा होती. जनता दलाचे किंवा राष्ट्रीय आघाडीचे ते सर्वेसर्वा नेते नसले तरी पंतप्रधानकीसाठी इच्छुक असलेल्या उमेदावारात ते सर्वात लोकप्रिय आहेत. लोकमताच्या एका पाहणीनुसार ८३ टक्के लोकांना व्ही. पी. सिंग हेच पंतप्रधान म्हणून पसंत होते. त्यांचा या पदावर इतरांपेक्षा काकणभर का होईना जास्त अधिकार होता. विराधी पक्षांच्या ऐक्याला आणि त्यांच्या राजीवविरोधी प्रचाराला खरा प्रारंभ झाला तो श्री. सिंग, राजीव गांधींची संगत सोडून विरोधी पक्षात आले तेव्हापासूनच. सिंग यांनी देशातील वातावरण ढवळून काढले. निवडणूक प्रचाराची धुराही त्यांनी सांभाळली. उत्तरेतील जनता दलाच्या यशात सिंग यांचा वाटा मोठा आहे. भाजपच्या यशाला हिंदुत्वाचे वारे कारणीभूत झाले तसे जनता दलाच्या यशाला व्ही. पी. सिंग. भाजपला पडलेली मते हिंदुत्वाला पडलेली सकारात्मक मते आहेत. मात्र जनता दलाचा विजय हा मुख्यतः राजीव गांधींच्या विरोधी मतदानाचा आविष्कार आहे. सिंग हे राजीव विरोधाचे प्रतीक होते. 'राजा या राजीव' अशी उत्तरेतील सरळ लढाई होती. जनता दलाच्या नेत्यांच्या मनात असो नसो, विरोधकांचा विजय झाला तर सिंग हेच पंतप्रधान होणार हे गृहीत धरूनच लोकांनी मतदान केले. त्याबद्दल मतदारांनाच मूर्ख ठरविण्याचा चंद्रशेखर वगैरेंचा इरादा असेल तर भाग वेगळा. व्ही.पी. सिंग यांचे विरोधीपण पूर्णपणे सिद्ध झाले नसताना, ज्यांनी खऱ्या अर्थाने विरोधी पक्षांचे आयुष्यभर राजकारण केले त्यांना हा मान मिळावा अशी अपेक्षा असेल तर ते समजू शकते. पण मग सुरुवातीपासूनच सिंग यांना जनता दलाचे अध्यक्ष किंवा राष्ट्रीय आघाडीचे निमंत्रक करायला नको होते. ते करणे आवश्यक ठरले याचे कारण चंद्रशेखर किंवा इतर कोणत्याही नेत्यापेक्षा सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची क्षमता सिंग यांच्याकडे सर्वाधिक होती. चौधरी देवीलाल, अजितसिंग, रामकृष्ण हेगडे, बिजू पटनाईक, जॉर्ज फर्नांडिस, मधु दंडवते आदी सर्वांनी आपले वजन सिंग यांच्या पारड्यात टाकल्याने ते जड झाले. याही परिस्थितीत चंद्रशेखर यांनी निवडणूक लढविण्याचा आग्रह धरला असता तर लोकशाही मूल्यांशी ते सुसंगत झाले असते. परंतु एकदा नेत्याची निवड झाल्यानंतर, निर्वाचित खासदारांचे मानस स्पष्ट झाल्यानंतर खुल्या मनाने या निवडीचे स्वागत करायला हवे. 'सिंग हे पक्षाचे नेते आहेत, माझे नव्हेत' असे प्रतिपादन चंद्रशेखर गेली दोन वर्षे करीत आले आहेत. त्यातील अंतर्विरोध

त्यांच्या लक्षात कसा येत नाही ? चंद्रशेखर यांना विरोध असणाऱ्यांनीही पथ्ये पाळली नाहीत. राम जेठमलानी यांनी चंद्रशेखर यांच्या निवासस्थानाबाहेर उपोषण करण्याचा मार्ग स्वीकारला. तो वरवर गांधीवादी वाटत असला तरी त्याला नैतिक अधिष्ठान नव्हते. नेतृत्वासाठी स्पर्धा करणे यात अनैतिक काय होते ? त्यासाठी चंद्रशेखर यांच्थावर दडपण आणून त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा जेठमलानी यांना काहीच अधिकार नाही. त्यांनी स्वत:च आपल्यावर मारहाण ओढवून घेतली. व्यापक राजकीय उद्दिष्टांसाठी वैयक्तिक हेवेदावे आणि अहंभाव बाजूला ठेवले नाहीत तर १९७७ ची पुनरावृत्ती अटळ आहे. व्ही.पी. सिंग यांना पंतप्रधान होऊ द्यायचे नाही हे गेल्या तीनचार दिवसांतील काही जणांच्या हालचालींचे लक्ष्य होते. राष्ट्रीय सरकारची कल्पनाही त्यासाठी कोणीतरी मांडली. दबाव तंत्राचा वापर करण्यात आला. त्याला प्रत्युत्तरही देण्यात आले. सिंग पंतप्रधान होणार नसतील तर आमचा पाठिंबा राहणार नाही असा सज्जड दम ज्योती बसूंनी डाव्यांच्या वतीने दिला. पण अखेरीस सिंग यांची निवड झाली, शपथविधीही झाला आणि देवीलाल यांना उपपंतप्रधानपद स्वीकारण्यास राजी करून सिंग यांनी स्वत:चे आसन बळकट करून घेतले आहे.

सिंग यांच्या आघाडी सरकारपुढे अनेक आव्हाने आहेत. खासदारांचा भरभक्कम ८० टक्के व एकमुखी पाठिंबा असतानाही राजीव गांधी यांच्या सरकारला अनेक प्रश्न सोडविता आले नाहीत. त्या तुलनेत स्वत:च्या पक्षाचे किंवा आघाडीचे स्पष्ट बहुमत नाही आणि पाठिंब्यासाठी एकाच वेळी उजव्या व डाव्या पक्षांवर अवलंबून राहावे लागणार अशा अल्पमतवाल्या सरकारकडून रामजन्मभूमी किंवा समान नागरी कायद्यासारख्या नाजूक प्रश्नांवर फार अपेक्षा ठेवता येणार नाहीत. परंतु या नव्या सत्तासमतोलामुळे संघर्षाऐवजी मतैक्याने प्रश्न सुटण्याची नवी दालनेही खुली होऊ शकतात. सरकारमध्ये बदल झाल्याने पंजाब प्रश्न सुटण्यास अधिक अनुकूल वातावरण मिळेल. नेपाळ व श्रीलंकेबरोबरच्या संबंधांची पुनर्मांडणी करता येईल. मात्र आपले वेगळेपण व कार्यक्षमता दाखविण्यासाठी मतभेद होणार नाहीत अशी अनेक कार्यक्षेत्रेही आघाडी सरकारला खुली आहेत. कार्यक्षम प्रशासन, भ्रष्टाचार निर्मूलन, आर्थिक, औद्योगिक व शेतीच्या क्षेत्रातील अनेक प्रश्न, बेकारी निर्मूलन या आघाड्यांवर नव्या सरकारने काही भरीव करून दाखविले तरीही त्यांना लोकप्रियता मिळेल. जनता राजवटीत साखर दोन रुपये किलो होती आणि रेल्वे गाड्या वेळेवर धावत होत्या याच्या आठवणी लोक आज दहा वर्षांनंतरही काढतात. सुरळीत व सुसह्य दैनंदिन जीवन ही लोकांची प्राथमिक गरज आहे. त्यासाठी कोणाचे डावे उजवेपण आड येण्याचे कारण नाही.

मात्र डावे, उजवे हे घटक आज तातडीने निर्णायक ठरणार नसले तरी या तऱ्हेचे तात्कालिक तडजोडीचे राजकारण फार काळ परिणामकारकपणे रेटता येणार नाही. जनता दलाचा किंवा काही प्रमाणात भाजपचा विजय हा राजीव गांधींच्या विरोधातून जन्मलेला आहे. समजा बोफोर्सचे प्रकरण उद्‌भवले नसते किंवा राजीव गांधींनी अधिक राजकीय समज दाखविली असती, व्ही.पी. सिंग वगैरे काँग्रेसमधून बाहेर पडले नसते तर विरोधी पक्षांकडे निवडणुकीत कोणते प्रश्न होते ? भाजपकडे 'हिंदुत्वा'चा होता आणि जोपर्यंत बाकीचे मुख्य पक्ष 'सेक्युलर' आहेत तोपर्यंत भाजपकडे तो राहणारच. पण जनता दल आणि राष्ट्रीय आघाडीने लोकांपुढे येऊन कशाच्या जोरावर मते मागितली असती ? या वेळी राजीव गांधींनी त्यांना खाद्य पुरविले, पण प्रत्येक वेळी ते कसे शक्य आहे ? याचा अर्थ दीर्घ पल्ल्याचे राजकारण करायचे तर राजकीय तत्वप्रणाली हाच त्याचा आधार असेल. त्यावर आधारित कार्यक्रमांच्या यशापयशावरच पक्षांचे भवितव्य ठरणार आहे. भाजपने राष्ट्रीय आघाडीला पाठिंबा देताना आपल्या जाहीरनाम्यातील आश्वासनांचा उदोउदो चालविला आहे तो उगीच नव्हे. 'देअर हार्ट बीटस् फॉर हिंदुत्व'! सत्ता मिळो किंवा न मिळो, राष्ट्रीय आघाडीचे सरकार टिको किंवा न टिको आपलं तत्वज्ञान पातळ करण्याचे त्यांच्या मनात येत नाही. एकदा त्यांनी तो प्रयोग करून पाहिला. त्याच्या अपयशाची कबुली मोकळेपणाने त्यांनी दिली आहे. या विचाराला काँग्रेसच आव्हान देऊ शकते. म्हणून त्यांना सत्तेवरून खाली खेचले पाहिजे अशी त्यांची स्पष्ट व्यूहरचना आहे. त्यासाठी जनता दलाला वर्ष दोन वर्ष सत्ता मिळाली तरी चालेल, त्यासाठी कम्युनिस्टांची संगत असली तरी चालेल, पण काँग्रेसचा बीमोड केला पाहिजे हे त्यांचे धोरण आहे. कारण भाजपला सत्तेत अडसर आहे तो जनता दलाचा किंवा डाव्या पक्षांचा नव्हे, तर मध्यममार्गी, सेक्युलर, राष्ट्रव्यापी पक्षाचा. सत्तेवर येण्याची उजव्या आणि डाव्या पक्षांना घाई नाही. कारण सत्ता हे त्यांचे अंतिम ध्येय नाही. ते त्यांना साधन म्हणून वापरायचे आहे. म्हणून केवळ सत्ता मिळविण्यात समाधान मानणाऱ्यांचे ते दोस्त होऊ शकतात. आज जनता दलाशी त्यांचे संगनमत त्याच कारणासाठी आहे. जनता दलाच्या व त्यांच्याबरोबर असलेल्या प्रादेशिक पक्षांच्या लक्षात ही गोष्ट यायला फार वेळ लागणार नाही. १९७७ ची पुनरावृत्ती अटळ आहे, कारण शय्यासोबतच विचित्र आहे. त्यात 'रोमान्स' कुठेच नाही.

याचा अर्थ उघड आहे. या देशात तीन मतप्रवाहाचेच पक्ष असणार. डावे, मध्यममार्गी आणि उजवे. मध्यममार्गी पक्षात थोडेसे डावे, थोडेसे उजवे, दोन्ही असणार. त्यामुळेच त्या पक्षाचा मध्यममार्ग सुरळीत होतो. राजकीय अडचणीच्या

वेळी पक्षाचा रंग थोडासा बदलायला या गटांचा उपयोग होतो. १९६९ नंतर काही काळ इंदिरा गांधींनी डाव्यांना याच पद्धतीने वापरले. आज त्या असत्या तर काँग्रेसमधील उजव्यांचा उपयोग करून हिंदू मते त्यांनी आपल्याकडे खेचली असती. कमलापती त्रिपाठीच या निवडणुकीत काँग्रेसचे अध्यक्ष असते. करणसिंग केंद्रात महत्त्वाच्या खात्याचे मंत्री असते. डाव्या किंवा उजव्या अतिरेक्यांत अनेक छटा असतात. मध्यममार्गाला तो पर्याय नसतो. त्यामुळे एकापेक्षा अनेक डावे उजवे पक्ष स्वतःच्या वेगळ्या प्रतिमेसह अस्तित्वात राहू शकतात. मध्यममार्गी पक्षाच्या बाबतीत हा पर्याय संभवत नाही. तात्विकदृष्ट्या एकच मध्यममार्गी पक्ष असू शकतो. वेगळे पक्ष असले तर ते व्यक्तीपरत्वे नेतृत्वाच्या संघर्षामुळे. आजचा जनता दल काँग्रेसपेक्षा वेगळा पक्ष नाही. त्यातील अनेक व्यक्तीसुद्धा काँग्रेसमधीलच. या पक्षातून त्या पक्षात असा प्रवास अनेकांचा अनेक वेळा झालेला. सिंग यांची २०-२२ वर्षांची राजकीय कारकीर्द काँग्रेसमधील. ते बाहेर पडले राजीव गांधींशी मतभेद झाल्याने. चंद्रशेखर काँग्रेसमधून बाहेर पडले ते इंदिरा गांधींशी मतभेद झाल्याने. आणि जनतामधील इतर, अगदी दंडवते, लिमये हे पूर्वाश्रमीचे समाजवादी धरूनसुद्धा, बाहेर पडले ते नेहरूंशी मतभेद झाल्याने. हे मतभेद मूलभूत नव्हते. मुख्यतः व्यक्तींचे होते. त्यामुळे राजकीय पुनर्मांडणी व्हायचीच असेल तर या मध्यममार्गी पक्षांना एकमेकांजवळ येण्याशिवाय पर्याय नाही. हे एकीकरण कोणत्याही स्वरूपाचे असो. प्रत्यक्ष यांनी त्या पक्षात किंवा त्यांनी या पक्षात जाण्यापासून, एकमेकांना प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष पाठिंबा देण्यापर्यंत त्याची व्याप्ती असू शकते. राजीव गांधी किंवा विश्वनाथप्रताप सिंग या व्यक्ती दुय्यम आहेत. या देशात कोणत्या शक्ती प्रबळ होऊ द्यायच्या हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्याचा विचार शांतपणे करण्यासाठी आजचे सत्तांतर हे मध्यांतर आहे.

•

३८३७ २६३८७ निबंध ३२५४९

प्रकरण
१०
२६

# व्ही. (आय.) पी. मंत्रिमंडळ

'हे सरकार किती दिवस टिकणार' असा छद्‌मी प्रश्न पहिल्या दिवसापासूनच विचारणाऱ्या निरंतर संशयात्म्यांना, राष्ट्रीय आघाडीचे मंत्रिमंडळ जाहीर व्हायला थोडा उशीर लागल्याबरोबर सुप्त आनंद झाला असणार, यात शंका नाही. नेतानिवडीवरून चंद्रशेखर आणि मंडळी आधीच नाराज होती. त्याची सावली मंत्रिमंडळाच्या रचनेवर पडणे अनिवार्य होते. नेतेपदाची निवड आणि मंत्रिमंडळाची रचना ही लोकशाही प्रक्रियेचा भाग असल्याने त्या त्या वेळचा सत्तासमतोल साधेपर्यंत काही वेळ लागणारच. प्रत्येक गट आणि व्यक्ती आपापली ताकद जोखण्याचा प्रयत्न करणार. परंतु एकाधिकारशाहीचे वळण लागलेल्या पक्षात ज्या तऱ्हेने मंत्री निवडले जात होते, तो आदर्श ठेवून या नव्या प्रक्रियेकडे पाहिले की चित्र उलटे दिसते. वास्तविक दुसरी प्रक्रिया लोकशाहीत अधिक स्वाभाविक आणि नैसर्गिक आणि पहिली प्रक्रिया कृत्रिम. राजीव गांधी यांनी आपल्या पाच वर्षांच्या कारकीर्दीत मंत्रिमंडळात लहान-मोठे धरून ६० वेळा बदल केले. अनेक मंत्र्यांची खाती अनेक वेळा बदलली. परंतु कोणी 'ब्र' काढला नाही. याचे कारण 'मंत्रिपद' मिळणे हे त्यांचे स्वतःचे कर्तृत्व नसून, नेत्याची मेहेरबानी असे. ज्यांना स्वतःचा राजकीय पाया नाही, अशाच व्यक्तींना शक्यतो मंत्री करायचे, आणि त्यातले जे केवळ केंद्रीय नेतृत्वावर विसंबून आहेत, त्यांनाच महत्त्वाची खाती द्यायची हा मंत्रिमंडळ बनविण्याचा 'प्राथमिक नियम' असलेल्या वातावरणात मंत्रिपदासाठी कोणी हटून बसले आहे, हे आपल्याला चुकीचेच वाटायला लागते. ज्यांना स्वतःच्या राज्यातून स्वबळावर निवडून येता येणे शक्य झाले नाही, (आणि इतर राज्यांतून निवडून येण्यासाठी पूर्णतः पक्षश्रेष्ठींवर अवलंबून राहावे लागे) त्या सरदार बुटासिंग यांच्यासारख्या व्यक्तीला केंद्रात गृहमंत्री होता येते तेथे देवीलालसारख्या व्यक्तीने गृहमंत्रिपदाची आकांक्षा धरणे चुकीचे कसे? पण अनेकांच्या दृष्टीने ते चुकीचे असते. कारण सत्ता म्हणजे नेत्याने टाकलेले तुकडे

अशीच विकृत प्रतिमा गेल्या काही वर्षांत तयार झाली आहे. सरदार वल्लभभाई पटेल किंवा गोविंद वल्लभ पंत यांनी गृहखाते भूषविले ते इतर कोणाच्या सोयीसाठी नव्हे, तर स्वतःच्या राजकीय बळावर. असे बळ असणे हे एकेकाळी भूषण मानले जाई. गृहमंत्री हा ज्येष्ठताक्रमानुसार दुसरा असे. पंतप्रधानांच्या अनुपस्थितीत कारभार कोणी पाहायचा, हे ऐनवेळी ठरत नसे. त्या पदाला आणि व्यक्तीलाही सर्वमान्यता असे. कोणाचा पदर धरून त्याने संसदेत प्रवेश केलेला नसे. पण मधल्या काळात अपवाद हाच नियम झाला आणि आता पुन्हा नियमाने कोणी खेळू पाहात असेल तर त्याला दृष्टी बदललेले प्रेक्षक बाद ठरवू पाहात आहेत. जनता दलात नेतेपदासाठी किंवा मंत्रिपदासाठी रस्सीखेच झालीच असेल तर ते पक्षाच्या उत्तम आरोग्याचे लक्षण समजायला हवे.

अर्थमंत्री प्रणवकुमार मुखर्जी यांनी आपण दुसऱ्या क्रमांकाचे नेते आहोत (म्हणून पंतप्रधानकीसाठी आपलेही नाव विचारात घ्यावे) असे केवळ सूचित केले तर त्यांची पक्षातून सहा वर्षांसाठी हकालपट्टी होते, आणि व्ही.पी. सिंग यांच्याशी स्पर्धा केल्याबद्दल (आणि त्यात अपयश आल्यानंतरही!) चंद्रशेखर यांच्याशी मनमिळवणी करण्याची गरज वाटणे यातील अंतर हाच या निवडणुकीने घडविलेला राजकीय बदल आहे. राष्ट्रीय आघाडीला संसदेत निर्विवाद बहुमत नाही, हे बंधन अनेकदा त्यांना अडचणीत आणणार आहे. परंतु राजकारणातील सर्वच बदल संख्याबलावर होतात असे नाही. काम करणाऱ्यांचे 'स्पिरिट' ही तेवढेच महत्त्वाचे असते.

अशी अनेक 'स्पिरिटेड' माणसे नव्या मंत्रिमंडळात आहेत. व्यक्तिगत गुणवत्तेच्या दृष्टीने पाहिले तर १९७७ प्रमाणेच हेही मंत्रिमंडळ सध्यातरी कसदार आहे. नथुराम मिर्धा यांचा शपथविधी झाल्याने आता कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्यांची संख्या १८ झाली आहे. शिवाय मेनका गांधी आणि मनूभाई कोठाडिया हे दोघे राज्यमंत्री आहेत. परंतु केंद्रीय मंत्रिमंडळातील एकूण सदस्यसंख्या विस्तारानंतर पन्नास ते साठच्या दरम्यान जाणार, हे गृहीत धरायला हवे. विस्तारानंतर आजचा चेहरामोहराच कायम राहील अशी शक्यता नाही. भाजप आणि डाव्या आघाडीने राष्ट्रीय आघाडीच्या सरकारला केवळ बाहेरून पाठिंबा देण्याऐवजी सरकारमध्ये सामील होण्याचा. निर्णय घेतला असता तर सध्याचे मंत्रिमंडळ कितीतरी वेगळे दिसले असते. वाजपेयी आणि अडवानी या दोन्ही व्यक्ती प्रभावशाली ठरल्या असत्या. १९७७ मधील त्यांचा अल्पकालीन कारभार, हा त्याचा पुरावा आहे. परंतु ती शक्यता आता जवळजवळ संपुष्टात आली आहे. भाजप मंत्रिमंडळात नाही तोपर्यंतच आमचा या सरकारला पाठिंबा राहील, अशी निःसंदिग्ध भूमिका

कम्युनिस्टांनी घेतली असल्याने राष्ट्रीय आघाडीचे मंत्रिमंडळ हे जवळजवळ जनता दलाचे मंत्रिमंडळ, असेच त्याला स्वरूप येणार. आघाडीतील द्रमुक, तेलगू देसम्, काँग्रस (एस) वगैरे पक्षांचे संसदेतील प्रतिनिधित्व अगदीच नगण्य असल्याने आणि जनता दलाचे बहुसंख्य सदस्य हिंदी भाषिक प्रदेशातील असल्याने प्रादेशिक आणि पक्षीय समतोल साधण्याची फार अवघड कसरत नव्या पंतप्रधानांना करावी लागणार आहे.

मात्र अशा तऱ्हेचा समतोल साधण्याचे कौशल्य व्ही.पी. सिंग यांच्याकडे आहे हे त्यांनी सध्याचे खातेवाटप ज्या तऱ्हेने केले आहे त्यावरून दिसून येते. नव्या मंत्रिमंडळातील सर्वांत वजनदार असामी म्हणजे देवीलाल. त्यांना उपपंतप्रधान करून सिंग यांनी स्वतःची ताकद वाढविली असली तरी गृहमंत्रिपद त्यांना देऊन समांतर सत्ताकेंद्र निर्माण होऊ देण्याचा धोकाही त्यांनी टाळला आहे. किसानांचे नेते म्हणवून घेण्यात देवीलाल यांना अभिमान वाटतो. त्यांच्या या 'अहं' वर फुंकर घालून त्यांना शेतीखाते स्वीकारण्यास त्यांनी राजी केले. परंतु हा केवळ राजकीय विचार झाला.

अलीकडच्या शेतकरी चळवळींनी या क्षेत्राचे राजकीय आणि आर्थिक अशा दोन्ही स्वरूपांत महत्त्व वाढले आहे आणि वास्तवात भारतीय संदर्भात त्याचे महत्त्वही खरोखरच तेवढे आहे. ज्वारी आणि ऊस यांतला फरकही न कळणाऱ्या व राजकीयदृष्ट्या वजनदार नसलेल्या व्यक्तींच्या हाती शेतीखाते देऊन नेहरूंनी त्याकडे दुर्लक्ष केले, असा अत्यंत रास्त आक्षेप चरणसिंग यांनी त्यांच्या एका लेखात घेतला होता. देवीलाल यांना हे खाते देऊन व्ही.पी. सिंग यांनी देवीलाल यांचे महत्त्व कमी केले असे म्हणण्याऐवजी शेतीखात्याचे महत्त्व वाढविले असा उलटाही विचार करता येईल. या क्षेत्रासंबंधी देवीलाल यांनी काही धडाडीचे निर्णय घेतलेच तर त्याला तथाकथित महत्त्वाच्या खात्याच्या मंत्र्यांचा विरोध होण्याची जराही शक्यता नाही. ग्रामीण भागासाठी अर्थसंकल्पातील अर्धा वाटा राखून ठेवण्याचा नव्या सरकारचा निर्धार आहे. शेतीचे महत्त्व त्यामुळे आपोआप वाढणार आहे. शेती, उद्योग, अर्थ व व्यापार ही खाती अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने व सरकारचे यशापयश पटकन मोजता येते म्हणून, दोन्ही अंगांनी महत्त्वाची ठरतात. बोफर्सपेक्षा भाववाढ ही राजकीयदृष्ट्या निर्णायक ठरते. पाच रुपये किलो कांदे आणि पंधरा रुपये किलो साखर यातील स्फोटकशक्तीचा प्रत्यय दहा वर्षांच्या फरकाने येथील राजकीय पक्षांना आला आहे. त्या दृष्टीने देवीलाल, मधू दंडवते, अजितसिंग व अरुण नेहरू यांसारख्या मातब्बर माणसांची फळी नव्या सरकारमध्ये दिसत आहे. एका व्यक्तीच्या आवडी-निवडी किंवा पूर्वग्रह धोरण ठरविण्यात निर्णायक

ठरू नयेत, अशी सामुदायिक जबाबदारीच्या तत्त्वावर चालणाऱ्या मंत्रिमंडळाकडून अपेक्षा असली तरी त्या खात्याला नेतृत्व देणाऱ्या व्यक्तीला आपला ठसा उमटविता येतोच. म्हणूनच काही मंत्री लोकप्रिय होतात, काही होत नाहीत. राजीव गांधींच्या मंत्रिमंडळात नरसिंहराव, कृष्णचंद्र पंत, शंकरराव चव्हाण यांसारख्या मोजक्या व्यक्तींच्या यशाचे रहस्य त्यांच्या वैयक्तिक कर्तबगारीतच सापडेल. १९७७ मध्ये वाजपेयी परराष्ट्रमंत्री झाले. त्यांची व त्यांच्या पूर्वीच्या पक्षाची मते आणि जनता सरकारची मते यात महदंतर असले तरी परराष्ट्रसंबंधात भारतीय धोरण राबविण्यात ते कमी पडले नाहीत हे त्यांचे निव्वळ वैयक्तिक मोठेपण. या वेळी इंद्रकुमार गुजराल यांना परराष्ट्रमंत्रिपद देऊन व्ही. पी. सिंग यांनी आणखी एक चांगली नेमणूक केली आहे. गुजराल रशियात भारताचे राजदूत होते. त्यांची नेमणूक इंदिरा गांधींनी केली होती तरी जनता सरकारने ती बदलली नाही. याचा अर्थ पक्षापेक्षा देशहिताला प्राधान्य देऊन काम करणाऱ्या व्यक्तींमध्ये त्यांची गणना करता येईल. जनता दलाच्या परराष्ट्रविषयक धोरण समितीचेही गुजराल प्रमुख होते. त्यांची जबाबदारी त्यामुळे आधीच ठरली होती. पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ, बांगलादेश या शेजारी देशांबरोबरचे संबंध सुधारण्यास नव्या सरकारला 'ओव्हरटाईम' काम करावे लागणार आहे. लष्करीदृष्ट्या दक्षिण आशियात भारताचे स्थान आता निर्विवादपणे सिद्ध झाल्याने शेजारी देशांबरोबरील संबंधांना एक नवे परिमाण लाभले आहे. 'बिग ब्रदर' ही आपली प्रतिमा शेजारच्या देशात आता रुजली आहे. विशेषत: नेपाळ आणि श्रीलंकेत. या शेजारी देशांशी चांगले संबंध असतील तरच अलिप्ततावादी देशांच्या चळवळीचे नेतृत्व करण्याचा नैतिक अधिकार भारताला राहील. श्रीलंकेच्या परराष्ट्रमंत्र्यांनी सत्तापालटानंतर लगेचच दिल्लीला भेट दिली. प्रश्न किती तातडीचे आहेत हे यावरून लक्षात येते.

मुफ्ती महंमद सैद या काश्मिरी मुस्लिमाची गृहमंत्री म्हणून निवड करण्यामागे अनेक कारणे असणार. आतापर्यंत राष्ट्रपती, सरन्यायाधीश अशी अनेक महत्त्वाची पदे मुस्लिम व्यक्तीला मिळाली असली तरी गृहमंत्रिपद प्रथमच मिळते आहे. काश्मीर, पंजाब, बाबरी मशीद-रामजन्मभूमी, जातीय दंगली या पार्श्वभूमीवर मुफ्ती महंमद सैद यांच्या नेमणुकीला विशेष महत्त्व आहे. काश्मीरमधे पाकधार्जिण्या अतिरेक्यांनी हिंसाचार चालविला आहे. डॉ. फारूक अब्दुल्ला यांचे सरकार त्याला पायबंद घालू शकत नाही, नॅशनल कॉन्फरन्सचा प्रभावही पूर्वीसारखा राहिलेला नाही. तेथे राष्ट्रपती राजवट आणावी अशी भाजपची मागणी आहे. या संदर्भात काश्मिरी राजकारणात प्रथमपासूनच असलेले सैद काही करू शकतात का, हा अनेकांच्या औत्सुक्याचा विषय आहे. पंजाब प्रश्नाला नवे सरकार किती प्राधान्य

देते हे पंतप्रधान सिंग यांच्या तातडीच्या पंजाब भेटीने स्पष्ट झालेच आहे. सत्तेवर येताच आठ दिवसांच्या आत पंतप्रधान स्वत: सुवर्णमंदिरात येऊन प्रार्थना करतात आणि सुरक्षायंत्रणेला बाजूस सारून सरळ लोकांमध्ये मिसळतात याचे भावनिक आवाहन प्रचंड आहे. लोकमानसावर त्याचा अनुकूल परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. मोकळ्या जीपमधून अमृतसरमध्ये पंतप्रधान फिरतात आणि लोक म्हणतात, "वो अपना आदमी है," ही पंजाबप्रश्नाचे नवे पर्व सुरू झाल्याची निशाणी आहे. एक मुस्लिम म्हणून दोन्ही बाजूंना जवळ आणण्याचे लोहचुंबकीय काम सैद करू शकतील. अल्पसंख्याकांना दिलासा मिळावा यासाठी व्यक्तीपेक्षा सरकारी धोरणे महत्त्वाची असली तरी व्यक्ती ही त्या धोरणाची एक निदर्शक असू शकते. व्ही. पी. सिंग यांचे सध्याचे छोटेखानी मंत्रिमंडळ हे असे, त्यांचा स्वत:चा ठसा असलेले आणि व्ही. आय. पी. लोकांचे आहे. त्यातला 'आय' हा इंदिरा काँग्रेसचा निदर्शक मानला तर स्वत: सिंग, अरुण नेहरू, मुफ्ती, अरिफ महंमद खान, गुजराल आणि मेनका गांधी असे जवळजवळ एकतृतीयांश मंत्री काँग्रेसशी संबंधित आहेत.

•

# महाराष्ट्रात काय होणार ?

२७ १९८४

विधानसभेच्या निवडणुकांची घोषणा कोणत्याही क्षणी होण्याची शक्यता आहे. देशातील नऊ राज्ये व दोन केंद्रशासित प्रदेशांतील विधानसभांची पाच वर्षांची मुदत फेब्रुवारी-मार्च महिन्यात संपते आहे. या सर्व राज्यांमध्ये एकाच वेळी निवडणुका होणार की वेगवेगळ्या वेळी हे अद्याप स्पष्ट झाले नाही. महाराष्ट्र विधानसभेची मुदत १७ मार्चला संपत असल्याने त्याआधी निवडणुका पूर्ण झाल्या पाहिजेत. त्या फेब्रुवारीअखेर होतील असा मुख्यमंत्र्यांचा अंदाज आहे. केंद्रात सत्ता बदल झाल्यानंतर लगेचच या सर्व राज्यांतील विधानसभा बरखास्त करून तेथे नव्याने निवडणुका घेतल्या जातील, अशी एक शंका व्यक्त करण्यात येत होती. १९७७ मध्ये जनता पक्ष सत्तेवर आल्यानंतर आणि त्यानंतर १९८० मध्ये इंदिरा गांधींनी पुन्हा सत्ता काबीज केल्यावर अनेक राज्यांत विधानसभांच्या मध्यावधी निवडणुका घेण्यात आल्या. 'जनतेचा कौल' असे कारण त्यासाठी देण्यात आले. या वेळीही लोकसभा निवडणुकीत गुजरात, राजस्थान, बिहार, मध्यप्रदेश, ओरिसा या राज्यांत काँग्रेस विरुद्ध निर्णायक कौल मिळाल्याने नव्या सरकारला तेच कारण पुढे करता आले असते. परंतु त्यांनी तसे केले नाही. एक चुकीचा पायंडा पडत होता, तो बंद होण्यास यामुळे मदत होईल. वास्तविक विधानसभा आणि लोकसभा यांच्या निवडणुका सर्व देशभर एकत्र घेणे व्यावहारिकदृष्ट्या फायदेशीर आहे. स्थानिक व प्रादेशिक प्रश्न आणि राष्ट्रीय प्रश्न यांची गल्लत न करता लोकमत वेगवेगळ्या प्रकारे व्यक्त झाल्याची उदाहरणे अनेक आहेत. राजकीयदृष्ट्या मतदार आता तेवढा सुजाण झाला आहे. परंतु निवडणुकांचे वेळापत्रक ठरविणे हे खऱ्या अर्थाने निवडणूक आयोगाच्या हातात नाही. तो राजकीय निर्णयच असतो. निवडणूक आयोगाची स्वायत्तता तकलादूच आहे. लोकशाही बळकट होण्यासाठी संस्थात्मक पाया मजबूत व्हायला हवा. गेल्या काही वर्षांत नेमका तोच खिळखिळा झाला आहे. राज्यपालांची नेमणूक असो, न्यायाधीशांची निवड असो की

निवडणुकांचे वेळापत्रक, प्रत्येक गोष्ट सत्तारूढ पक्षाची सोय-गैरसोय पाहूनच ठरविली जाते. त्यामुळे एखादी व्यक्ती किंवा पक्ष प्रबळ झाला, तरी देश मात्र कमकुवत होतो. देशाचे नेतृत्व आणि सरकारचे किंवा पक्षाचे नेतृत्व यांत गांधी, नेहरूंच्या काळात फार अंतर नव्हते. आता मात्र हा फरक निर्णायक झाला आहे.

महाराष्ट्रात उमेदवार निवडीचे काँग्रेस व शिवसेनेचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. काँग्रेसचे जिल्हा निरीक्षक दौऱ्यावर रवाना होताहेत. शिवसेनेच्या पश्चिम महाराष्ट्रातील उमेदवारांच्या मुलाखती २ आणि ३ जानेवारीला पुण्यात आहेत. जनता दलाने उमेदवारी अर्ज मागविले आहेत. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष बदलले आहेत. जनता दलाच्या नेतृत्वाखाली डाव्या आघाडीने सर्व म्हणजे २८८ जागा लढविण्याचा निर्णय घेतला आहे. रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्याची द्वाही फिरली आहे. शेतकरी संघटनेने जनता दलाला पाठिंबा देण्याचे धोरण पुरेसे आधीच जाहीर केले आहे. निवडणुका आता अगदीच तोंडावर आल्या आहेत याची ही सारी लक्षणे आहेत. सर्वांना उत्सुकता आहे, महाराष्ट्रात काय होणार ? देशातील सर्वांत अग्रेसर राज्याचा राजकीय कौल काय असणार ? सामाजिकदृष्ट्या प्रागतिक म्हटल्या जाणाऱ्या राज्यांत शिवसेना-भाजप युतीला किती सामर्थ्य मिळणार ? काँग्रेस पक्षातील अंतर्गत सत्तासंघर्षाची परिणती कशात होणार ? पंतप्रधानांच्या पक्षाला महाराष्ट्रात काय भवितव्य आहे ? महाराष्ट्राच्या राजकारणातील विविध घटकांचा विद्यमान परिस्थितीच्या संदर्भात विचार केला तर निवडणूकपूर्व चित्र काहीसे स्पष्ट होईल.

महाराष्ट्राच्या राजकारणातील काँग्रेस हा सर्वांत वजनदार घटक. १९७८ मधील पुलोद राजवटीचा अल्पकालीन अपवाद वगळता काँग्रेसला आव्हान देऊ शकेल असा एकही पक्ष येथे मूळ धरू शकला नाही. आणि पुलोदचाही अपवाद करण्याचे कारण नाही. कारण पुलोद सरकार हे शरद पवारांचे, म्हणजे पर्यायाने काँग्रेसचेच सरकार होते. समाजाच्या सर्व स्तरातील लोकांचा पाठिंबा असलेला, दलित, अल्पसंख्य, आदिवासी यांना नावाला का होईना सत्तेत सहभागी करून घेणारा, सामाजिकदृष्ट्या उदारमतवादी, राजकीय स्थैर्य देणारा अशी काँग्रेसची प्रतिमा होती. पक्षांतर्गत मतभेदांना वाव होता. कर्तृत्ववान नेत्यांना भवितव्य होते. राज्याचा मुख्यमंत्री हा केवळ पक्षाचा नेता नसून संपूर्ण राज्याचा नेता असे. लोकमान्यता असल्याखेरीज मुख्यमंत्री होण्याची स्वप्ने कोणाला पडत नसत. काँग्रेसच्या या प्रतिमेला तडा गेला तो दिल्लीतील राजकारणाची शैली बदलल्यानंतर. सर्व सत्ता आपल्या हातात केंद्रित करण्याच्या नव्या राजकीय डावपेचाचा भाग म्हणून तळागाळात पाळेमुळे नसलेल्या, व्यापक राजकीय पाया नसलेल्या व्यक्तींना

मुख्यमंत्री म्हणून लादण्याचे आणि त्यांच्याद्वारे राज्यातील प्रस्थापित नेतृत्वाला आव्हान देण्याचे प्रयत्न इंदिरा गांधींनी सुरू केल्यानंतर काँग्रेसची नैसर्गिक वाढ संपली. दिल्लीचा वशिला लावून हवे ते सत्तास्थान किंवा पक्षातील पद मिळविता येत असेल तर सतरंज्या उचलण्यापासून उमेदवारी करण्याची गरजच काय असा कार्यकर्त्यांचा समज झाला. 'मराठा लॉबीला' खच्ची करण्यासाठी म्हणून अंतुले यांना इंदिरा गांधींनी मुख्यमंत्री केले. अंतुले किमान कार्यक्षम राजकारणी तरी होते. परंतु स्वप्नातही नसताना बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री झाले आणि निलंगेकरही त्याच पठडीतील निघाले. व्यक्ती म्हणून त्यांच्याबद्दल आकस नाही, परंतु प्रदीर्घ राजकीय प्रक्रिया खंडित करून त्यांना राज्यांच्या नेतेपदी आणल्याने पक्षाच्या संघटनात्मक पायाला मोठा तडा गेला. हा तडा त्या वेळी लक्षात आला नाही, कारण इंदिरा गांधींच्या नावावर लोक पक्षाला मते देत होते. मते मिळणे आणि निवडून येणे म्हणजेच राजकारण अशी सोपी, सुटसुटीत व्याख्या झाली. १९८४ मध्येही इंदिरा गांधींचे हौतात्म्य स्मरून लोकांनी मते दिली. आज इंदिरा गांधी नाहीत, आणि पक्ष खिळखिळा झाला आहे. लोकांनी काँग्रेसला मते का द्यावीत ? या वेळच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला महाराष्ट्रात ४५ टक्के मते मिळाली. १९७७ मध्ये आणीबाणीविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया उमटूनही महाराष्ट्रात काँग्रेसला ४७ टक्के मते मिळाली होती. १९५२ पासून झालेल्या सर्व निवडणुकांचा विचार केला तर एवढी कमी मते मिळण्याची काँग्रेसची ही पहिलीच वेळ आहे. या पराभवासाठी प्रांतिक अध्यक्षा प्रतिभा पाटील काय किंवा मुख्यमंत्री शरद पवार काय, यांना प्रमाणाबाहेर दोष देऊन केंद्रीय नेतृत्व किंवा त्यांचे राज्यातील हस्तक सत्यापासून पळ काढताहेत. काँग्रेसच्या केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे, तर इतर राज्यांतील पराभवाची मीमांसा थोड्या व्यापक संदर्भात केली तर केंद्रीय नेतृत्वालाच अधिक जबाबदारी घ्यावी लागेल.

महाराष्ट्रातील विरोधी पक्षांचे यश हे केवळ हिंदुत्वाच्या लाटेचे फळ नाही. काँग्रेसच्या कमकुवतपणाचे ते लक्षण आहे. अशी स्थिती, अधिक निर्णायकपणे, इतर राज्यांत पूर्वीच निर्माण झाली होती. आंध्र, कर्नाटक ही त्याची जवळची उदाहरणे आहेत. उत्तर प्रदेशात जनता दलाला आज मिळालेले यश हे हिंदुत्वाच्या लाटेचे यश आहे की राजीव गांधींच्या पराभवाचे ते प्रतीक आहे ? महाराष्ट्रात मधल्या काळात निर्माण झालेली राजकीय अस्थिरता, आणि ढेपाळलेली काँग्रेस ही शिवसेनेच्या वाढीची प्रमुख कारणे आहेत. हिंदुत्वाच्या घोषणेकडे आकर्षित होऊन शिवसेनेत किती तरुण येतात आणि राजकीय गरज म्हणून किती लोक येतात हे तपासले तर महाराष्ट्रातील राजकीय स्थितीचे खरे आकलन होईल.

शिवसेनेला आज प्रचंड पाठिंबा आहे तो बहुजन समाजातील, त्यातही मधल्या जातीतील तरुणांचा. 'हिंदुत्वा'ने या स्तराला कोणते आश्वासन दिले आहे? धर्माचाच विचार करायचा तर समाजातील खालच्या पायरीवरचे त्यांचे स्थान शतकानुशतके अढळ करण्याचे काम धर्माच्या नावाखाली केले गेले. हे तरुण हिंदुत्वाच्या घोषणेला भुलतील कसे? माळी, साळी, कोष्टी, तेली, कोळी यांना स्वतःच्या डोक्यावर हिंदुत्वाच्या रक्षणाची जबाबदारी घेण्यावाचून काय नडले आहे? रा.स्व. संघ, भाजप, विश्व हिंदू परिषद त्यासाठी आहे की! 'हिंदुत्व' ही शिवसेनेची निखळ राजकीय घोषणा आहे. ज्या अर्थाने भाजप, रा.स्व.संघ, मुस्लिम लिग हे फंडामेंटॅलिस्ट आहेत त्या अर्थाने शिवसेना फंडामेंटॅलिस्ट नाही. काही विशिष्ट समाजघटकांच्या आणि व्यक्तींच्या राजकीय आकांक्षा विद्यमान चौकटीत पूर्ण होत नव्हत्या म्हणून शिवसेनेची गरज निर्माण झाली. जनता पक्ष किंवा कम्युनिस्ट पक्षांकडे धडाडीचे नेतृत्व, कल्पकता आणि कार्यक्रम असता तर हा लोंढा त्यांना आपल्याकडे वळविता आला असता. शरद पवार यांची काँग्रेस (एस) आज काँग्रेस (आय) च्या विरोधात उभी असती तरीही शिवसेनेची ताकद एवढी वाढली नसती. आणि काँग्रेसमध्ये पैसेवाल्यांचे, हितसंबंधीयांचे वर्चस्व निर्माण झाले, ते तोडण्याचे धाडस कोणी दाखविले असते, तर त्यालाही शिवसेनेच्या वाढीला पायबंद घालता आला असता. याचा अर्थ शिवसेनेची वाढ हा जमातवादाचा महाराष्ट्रातील वाढता प्रभाव नव्हे. त्याची कारणे राजकीय, सामाजिक स्थितीत शोधावी लागतात. शिवसेनेला शक्ती देणारी वास्तविक कारणे वेगळी असली तरी आज तिच्या नेतृत्वाने जो आक्रमक मुस्लिम विरोध, दलित विरोध स्वीकारला आहे तो भयानक धोकादायक आहे. वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील यांसारख्या काही माजी मुख्यमंत्र्यांची शिवसेनेशी जवळीक होती, त्यांनीच तिचे महत्त्व महाराष्ट्राच्या राजकारणात वाढविले असा आरोप केला जातो. त्यातील सत्यासत्य बाजूला ठेवले तरी त्या वेळी शिवसेनेचे स्वरूप निर्विवादपणे प्रादेशिक होते. भूमिपुत्रांची स्वाभाविक प्रतिक्रिया म्हणून त्याकडे काहीसे ममतेने पाहता येत असे. शिवसेनेबद्दल त्या वेळी ॲलर्जी होती ती मुस्लिमांना नव्हे. शिवसेनेचे नाव काढले की धडकी भरे ती दाक्षिणात्यांना. आज ही स्थिती पार बदलली आहे. भाजपपेक्षाही शिवसेनेचा मुस्लिम विरोध अधिक कंठाळी झाला आहे. दलितांमध्येही शिवसेनेबद्दल तीव्र प्रतिक्रिया उमटली आहे. रिपब्लिकन पक्षातील सर्व गट महाराष्ट्रात एकत्र येत आहेत आणि मुस्लिम संघटनांचा ऐक्य मेळावा १५ जानेवारीस बिहारमध्ये पाटणा येथे होत आहे. काँग्रेसच्या छायेतून बाहेर पडून जाती आणि धर्माच्या नावाखाली दलित व मुस्लिमांच्या एकत्र येण्याच्या

धोकादायक प्रक्रियेला शिवसेनेच्या आक्रमक हिंदुत्वाच्या घोषणेने व भाजप-शिवसेना युतीमुळे वेग आला आहे. या प्रक्रियेला आवर घालण्याचे आव्हान आज काँग्रेस व इतर विरोधी पक्षांपुढे आहे.

काँग्रेस हे आव्हान कसे स्वीकारणार आहे? महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस आज गटबाजीने पोखरली आहे. निवडणूक जिंकणारे मशीन हे तिचे गेल्या काही वर्षांतील स्वरूप. आज या यंत्रातली अनेक चाके परस्पर विरुद्ध फिरताहेत. संघटनात्मक निवडणुका कित्येक वर्षांत झालेल्या नाहीत. सोय गैरसोय पाहून पदाधिकाऱ्यांची नेमणूक होते. जिल्हा स्तरावरील नेमणुकांनाही दिल्लीचा हिरवा कंदील लागतो. लोकांचे प्रश्न घेऊन सातत्याने संघटना काही काम करीत आहे असे दिसत नाही. सरकारने 'सरकार' म्हणून केलेल्या कामांचे 'क्रेडिट' घेऊन संघटना मोठी होत नाही. पक्षाचा लोकसंपर्क संपला आहे. त्या तुलनेत शिवसेना लोकांच्या जवळ आहे. शिवसेनेचे बळ कार्यकर्त्यांत दिसते. काँग्रेसचे पुढाऱ्यांत. या पुढाऱ्यांत एकवाक्यता नाही. पक्षसंघटनेचे वाटोळे झाले तरी चालेल, शरद पवार वरचढ होता कामा नयेत हा गेल्या दोन वर्षांतील काँग्रेसच्या धोरणाचा गाभा आहे. इंदिरानिष्ठा आणि आता राजीवनिष्ठा हा स्वतःच्या गटाच्या संरक्षणासाठी पांघरलेला बुरखा आहे. तिरपुडे, अंतुले आणि चव्हाण या तथाकथित निष्ठावंतांनी कधी ना कधी काँग्रेस सोडली आहे. तिरपुडे आणि अंतुले यांना तर पक्षानेच निलंबित केले होते. ते कसे 'लॉयलिस्ट' ठरतात? 'लॉयलिस्ट' म्हणजे महाराष्ट्रात स्वाभाविकपणे वाढू शकणाऱ्या यशवंतराव, वसंतदादा, शरद पवार यांसारख्या नेत्यांचे खच्चीकरण करण्यासाठी तयार झालेला दिल्लीगट.

दिल्लीला स्वबळावर आव्हान देऊन शकेल अशा पुढाऱ्यांना वाढू द्यायचे नाही हे धोरण अखिल भारतीय आहे. अशा नेत्यांना 'सिंडिकेट', 'नवे सिंडिकेट' म्हणून बदनाम करीत राहायचे. त्याची प्रतिक्रिया आंध्र, कर्नाटकात उमटली. रामाराव व हेगडे यांच्यामागे काँग्रेसचेच बहुसंख्य लोक गेले त्याचे हे कारण आहे. कार्यकर्त्यांच्या मनावर हे सतत ठसविण्यात आले तर ते पवारांच्या मागे जाण्याला पर्याय शोधतात. अंतुले, तिरपुडे, साठे, चव्हाण हा त्यांना पर्याय वाटत नसेल तर शिवसेना, भाजपच्या मागे लोक जातात आणि या युतीची ताकद वाढली की ज्याचे पंख कापले त्यानेच त्यांच्याशी सामना केला पाहिजे अशी भाषा ऐकू येते. यातील अंतर्विरोध लक्षात घेतला पाहिजे. मिश्रा, सोळंकी, अर्जुनसिंग, हरिदेव जोशी यांचे पुनर्वसन झाले ते हातची सत्ता गेल्यानंतर. सत्ता पुन्हा मिळेपर्यंत कदाचित हे धोरण कायम राहील. मिश्रा, सोळंकी, अर्जुनसिंग ही नावे यात महत्त्वाची नाहीत. त्यांचे अनेक दोषही असतील. प्रश्न आहे तो पक्षाच्या वाढीच्या स्वाभाविक प्रक्रियेत

दिल्लीने कोणत्या कारणास्तव हस्तक्षेप करायचा हा. त्यामुळे जोपर्यंत पक्षांतर्गत लोकशाही हे मूल्य म्हणून स्वीकारले जात नाही तोपर्यंत राजकारणाचे विकृतीकरण होत जाणार. 'भाजप-शिवसेना' युती हे त्याचे महाराष्ट्रातील एक उदाहरण. आसामपासून पंजाबपर्यंत प्रत्येक प्रांतात त्याचा कधी ना कधी, कोणत्या ना कोणत्या स्वरूपात आविष्कार झालेला आहे. याचा अर्थ महाराष्ट्रात काँग्रेसने शिवसेनेचे आव्हान स्वीकारायचे, तर दिल्लीच्या दृष्टिकोणात बदल झाला पाहिजे, आणि लोकांना त्याची प्रचिती आली पाहिजे.

जनता दलाच्या नेतृत्वाखालील डावी आघाडी हा महाराष्ट्राच्या राजकारणातील दुसरा घटक. गेल्या लोकसभा निवडणुकांचा विचार केला तर ताकदीच्या दृष्टीने तिसऱ्या क्रमांकाचा. भाजपबरोबर युती आहेही आणि नाहीही अशा संभ्रमावस्थेत सापडलेल्या जनता दलाला डाव्या आघाडीचे समर्थ नेतृत्व करता आले नाही. 'शत्रू क्रमांक एक कोण' हे जोपर्यंत निर्णायकपणे ठरविता येत नाही तोपर्यंत त्यांना तात्त्विकदृष्ट्या सुसंगत भूमिका घेता येणार नाही. काँग्रेसही नको आणि भाजप-शिवसेना युतीही नको एवढी ठोस भूमिका घेण्याइतकी ताकद डाव्या आघाडीची नाही. अशी ताकद केवळ निवडणूक वर्षात येऊ शकत नाही. विधानसभेच्या सर्व २८८ जागा आपण लढविणार असे म्हणायचे आणि त्याच वेळी एकास एक लढत व्हावी या दृष्टीने डाव्या आघाडीचे प्रयत्न सुरूच राहतील असेही म्हणायचे. यामुळे कार्यकर्त्यांच्या आणि लोकांच्या मनातही संशय निर्माण होतो. महाराष्ट्राच्या राजकारणात निर्णायक भूमिका घेणे व्यावहारिकदृष्ट्या डाव्या आघाडीला आज शक्य नाही. शिवसेना-भाजप युतीचा पराभव करायचा तर काँग्रेसबरोबर संगनमत केले पाहिजे. लोकसभेत पंतप्रधान व्ही.पी. सिंग यांना पदोपदी अडविणाऱ्या राजीव गांधींच्या पक्षाला महाराष्ट्रात पाठिंबा देता येत नाही आणि भाजपच्या पाठिंब्यावर केंद्रात सरकारचे अस्तित्व अवलंबून असल्याने भाजपला कडाडून विरोध करता येत नाही, अशा द्विधा मन:स्थितीत जनता दल सापडले आहे. मृणाल गोरे यांनी शिवसेना-भाजपच्या विरुद्ध निवडणूक लढवायची आणि मधू दंडवते यांनी त्यांच्याशी तडजोड करायची, यामुळे पक्षाची विश्वासार्हता कितपत टिकू शकते ? ती पुन्हा मिळवायची तर निवडणुकीतील जयापराजयाची पर्वा न करता तत्त्व म्हणून विधानसभेच्या सर्व म्हणजे २८८ जागा प्रामाणिकपणे लढविणे एवढा एकच सन्मान्य मार्ग जनता दल पुरस्कृत डाव्या आघाडीला मोकळा आहे. जेथे आघाडीचे उमेदवार प्रबळ आहेत तेथे ते निवडून येतील. उरलेल्या ठिकाणी तिरंगी लढतीचा फायदा कधी काँग्रेसला, कधी भाजप-शिवसेनेला मिळू शकतो. या घटकेला डाव्या आघाडीचे यश त्यांना किती जागा मिळतात यावर

मोजले जाणार नसून त्यांनी सुसंगत, तत्त्वाधिष्ठित भूमिका पार पाडण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले की नाही यावरच अवलंबून राहणार आहे. या आघाडीत या वेळी शेतकरी संघटना ठामपणे सामील झाली आहे. रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य झाल्यानंतर तो कोणती भूमिका घेणार हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. पण समजा तेही डाव्या आघाडीत आले तर मतांच्या दृष्टीने आघाडीची ताकद बऱ्यापैकी वाढेल. खऱ्या अर्थाने तिरंगी लढत होईल.

भाजप-शिवसेना युतीने या वेळी महाराष्ट्रात सत्तारूढ पक्षाला खरोखरच आव्हान दिले आहे. 'हिंदुत्व' ही त्यांची अनेकांना आकर्षित करणारी घोषणा आहे. काँग्रेस हा तात्त्विकदष्ट्या जमातवादी किंवा जातीयवादी पक्ष नसला तरी निवडणुकीच्या राजकारणाचा भाग म्हणून अल्पसंख्यांकाच्या जमातवादाला संधिसाधूप्रमाणे त्यांनी प्रोत्साहन दिले ही गोष्टही नाकारता येणार नाही. त्याची प्रतिक्रिया बहुसंख्याकांच्या जमातवादात उमटली आहे. जमातवादाला जमातवाद हे उत्तर होऊ शकते, पण ते राष्ट्रीय हिताचे नाही. भारतीय संदर्भात सेक्युलॅरिझम हेच त्याचे उत्तर आहे. पण त्या उत्तराने भाजपला राजकीय यश मिळू शकत नाही. त्यामुळे अल्पसंख्याकांचा जमातवाद संपविण्यासाठी ते कधीच प्रयत्न करणार नाहीत. मुस्लिम आणि दलितांनीही ही गोष्ट स्वच्छपणे समजून घेतली पाहिजे. सर्व दलित पक्षांचे ऐक्य आणि सर्व मुस्लिम संघटनांचे ऐक्य हे शिवसेना-भाजपला उत्तर नाही. असलेच तर त्यांच्या वाढीला आमंत्रण आहे. हिंदू जातीयवाद्यांचा पराभव करायचा तर आधी स्वत: सेक्युलॅरिझमकडे वळले पाहिजे. आणि राजकीय गरज म्हणून स्वत:चें वेगळे पक्ष काढण्याऐवजी येथील मुख्य राजकीय प्रवाहात, धर्मनिरपेक्षतावादी पक्षात स्वत:ला विसर्जित केले पाहिजे. हिंदू जातीयवादी म्हणून शिवसेनेला विरोध करणाऱ्यांना केवळ दलितांच्या स्वतंत्र पक्षाला पाठिंबा देता येणार नाही. त्या वेळी त्यांच्यावर प्रतिगामित्वाचा शिक्का मारून कोणाला तात्पुरते समाधान मिळाले तरी त्यामुळे वस्तुस्थिती बदलत नाही.

भाजपची 'स्ट्रॅटेजी' या संदर्भात लक्षात घेतली पाहिजे. त्यांच्या नेतृत्वात किंवा धोरणात बदल झाला नाही तरी त्यांच्या उमेदवारात बदल झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. लोकसभेसाठी भाजपने ज्यांना तिकिटे दिली किंवा जे निवडून आले त्यांची नुसती नावे पाहिली तरी हे भाजपचे उमेदवार आहेत की काँग्रेसचे असा संभ्रम पडतो. या पक्षावरील शहरी व ब्राह्मणीपणाचा ठसा पुसण्याचे त्यांच्या नेतृत्वाचे जाणीवपूर्वक प्रयत्न दिसतात. शिवसेना-भाजप युतीचे भाजपला महत्त्व वाटते ते याच कारणासाठी. त्या निमित्ताने भाजपला बहुजन समाजात, मागासवर्गीयांत आणि ग्रामीण महाराष्ट्रात खुलेपणाने प्रवेश मिळतो. शिवसेना ही कायमस्वरूपी गोष्ट नाही.

बाळासाहेब ठाकरे यांचे नेतृत्व आहे तोपर्यंतच तिला भवितव्य आहे. त्यानंतर शिवसैनिकांना भाजप हा स्वाभाविकपणे 'आपला' पक्ष वाटला पाहिजे यासाठी युती टिकणे हे महत्त्वाचे आहे. तसे झाले तर उद्या भाजप ही व्यापक पायावर उभी असलेली प्रबळ संघटित राजकीय ताकद होईल. हिंदुत्वाच्या उघड घोषणेची त्यांना त्या वेळी गरज असणार नाही, आणि हिंदुत्ववादी असूनही त्यांच्याशी लढणे अवघड होईल. याचा अर्थ उद्याची लढाई केवळ घोषणांवर लढता येणार नाही. त्यासाठी स्पष्ट राजकीय धोरण, संघटित पक्ष, कार्यक्षम एकमुखी नेतृत्व व स्वच्छ कारभार यांची आवश्यकता आहे. वेळ जाण्याच्या आधी जो पक्ष या दृष्टीने प्रयत्न करील तोच उद्या यश मिळविणार आहे. येत्या विधानसभा निवडणुका ही त्या दृष्टीने सर्व पक्षांची 'लिटमस टेस्ट' आहे.'

•

२८ प्रकरण

# तोतयांची बंडखोरी

सर्वच पक्षांतील बंडखोरी हे महाराष्ट्रातील येत्या विधानसभा निवडणुकीचे ठळक वैशिष्ट्य ठरणार. कॉंग्रेसमध्ये बंडखोरी होणार हे अपेक्षितच होते. 'बंडखोरी' ही त्या पक्षाची परंपराच आहे. सत्तेसाठी एकत्र आलेल्यांचा पक्ष असे अनेकांनी कॉंग्रेसचे वर्णन केले आहे. सर्वच पक्षांना सत्ता मिळवायची असते. संसदीय लोकशाहीत ते अनिवार्य आहे. पण कॉंग्रेसमध्ये राहून सत्तेचा सोपान लौकर सर करता येतो अशी स्थिती गेली चाळीस वर्षे अखंडितपणे असल्याने केवळ सत्तेसाठी हापापलेल्यांनी कॉंग्रेसमध्ये गर्दी केली आहे. असलेले सत्तास्थान मिळणार नाही असे दिसले की पक्षाला सोडचिठ्ठी द्यायला ही मंडळी एका पायावर तयार असतात. विचारांशी, लोकांशी किंवा पक्षाशी बांधिलकी नसतेच. त्यामुळे उरतो तो केवळ व्यापार. तो फायदेशीरच झाला पाहिजे. आज महाराष्ट्र इंदिरा कॉंग्रेस, समांतर कॉंग्रेस वगैरेंचा जन्म झाला तो या उद्देशानेच. गंमत म्हणजे 'बंडखोरी' करणारे अनेकजण स्वत:ला 'निष्ठावंत' समजतात. त्यांची निष्ठा कोणाला आहे ? पक्षाध्यक्ष राजीव गांधींनी मान्य केलेली यादीही ज्यांना मान्य होत नाही त्यांची निष्ठा पक्षाशी आहे की स्वत:शी ? या बंडखोरीतही तरतम आहे. ज्यांचे स्वत:चे हित लोकसभा निवडणुकीत आधीच सांभाळले गेले आहे त्या वसंत साठे वगैरे मंडळींनी त्यांचे बंड सात्त्विक संतापापुरते मर्यादित ठेवले आहे. भावनांचे विरेचन झाले की त्यांचा आवेश संपेल. बॅ. अंतुले, शंकरराव चव्हाण यांनी उघड प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. त्यांचा पाठिंबा 'मूक' असला तरी तो कोणाला असणार याची कल्पना करता येते. तिरपुडे, डॉ. रफिक झकेरिया, प्रतिभा पाटील यांनी मात्र बंडखोरीचा पवित्रा घेताना हातचे काहीच राखून ठेवलेले नाही. तिरपुडे तर पक्षच सोडून चालले आहेत. (मात्र तरीही ते निष्ठावंतच आहेत) 'कॉंग्रेसला बहुमत मिळणार नाही' असा जवळजवळ शापच प्रतिभा पाटील यांनी दिला आहे. (त्या अध्यक्षा असत्या तर मात्र गेला बाजार, दोन तृतीयांश बहुमताला मरणच नव्हते !) या सर्व

प्रतिक्रियांचा, बंडखोरीचा एकच अर्थ आहे. तो म्हणजे किमान तिकिटवाटपात मुख्यमंत्री शरद पवार यांच्या गटाची सरशी झाली आहे. २८८ पैकी जवळजवळ २५० तिकिटांचे सर्वमताने वाटप झाले. दिल्लीत (राजीव गांधींच्या सल्ल्याने) पाच-पंचवीस तिकिटांत फेरबदल झाल्याने काँग्रेसवर असे कोणते संकट कोसळले की समांतर काँग्रेस, महाराष्ट्र इंदिरा काँग्रेस यांची स्थापना करण्याची गरज वाटावी ? महाराष्ट्रातील काँग्रेस (आय) मधील अंतर्गत सत्तासमतोल आज मुख्यमंत्री शरद पवार यांच्या बाजूला झुकला आहे यापेक्षा काँग्रेसमधील बंडखोरीला जास्त अर्थ नाही. कोणत्याही तात्त्विक मुद्यावर ही बंडखोरी झाली नसल्याने लोकांचा काँग्रेसकडे पाहण्याचा दृष्टिकोणही बदलण्याची शक्यता नाही. महाराष्ट्रात काँग्रेस, शिवसेना-भाजप युती आणि पुरोगामी लोकशाही आघाडी या तीन मुख्य राजकीय पक्षांतच खरी लढाई आहे. तिकीट वाटपापूर्वीच्या तिच्या स्वरूपात या नव्या बंडखोरीने गुणात्मक बदल झालेला नाही. बंडखोरांबद्दल सामान्य लोकांना सरसकट सहानुभूती वाटण्याचे कारण नाही. ज्या उमेदवारांवर खरोखरच अन्याय झाला आहे की ज्यांनी आपल्या कामाने, कर्तृत्वाने , चारित्र्याने चांगली प्रतिमा तयार केली आहे, त्यांच्याबाबतीत स्थानिक मतदार वेगळा दृष्टिकोण ठेवू शकतात. परंतु व्यापक राजकारणाच्या संदर्भात ज्यांनी काँग्रेसला मत देण्याचे ठरविले असेल त्यांची जबाबदारी मात्र आता वाढली आहे.

या बंडखोरीचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष फायदा विरोधी पक्ष उठविण्याचा प्रयत्न करणार. शिवसेना-भाजपला या फाटाफुटीचा अप्रत्यक्ष परंतु सर्वांत जास्त फायदा मिळेल असे आजचे चित्र आहे. बंडखोरीमुळे काँग्रेसची मते विभागली गेली तर दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या पक्षाला विजय मिळण्याची शक्यता जास्त. जनता दल पुरस्कृत आघाडीपेक्षा शिवसेना-भाजप याबाबत वरच्या क्रमांकावर आहे. प्रतिगामी शक्तींचा पराभव करण्याची भाषा वापरणारांचीच त्यांना (अप्रत्यक्ष का होईना) जास्त मदत होईल. राजकारणातील अग्रक्रम स्पष्ट नसतील तर काय होऊ शकते त्याचा हा उत्तम नमुना आहे. शिवसेनेचा भगवा विधानसभेवर फडकला तरी चालेल, शरद पवार वरचढ होता कामा नयेत इतक्या वैयक्तिक पातळीवर एखादा पक्ष येतो तेव्हा यापेक्षा दुसरे चित्र तयार होणे शक्य नाही.

काँग्रेसमधील फाटाफुटीचा जनता दलाला प्रत्यक्ष फायदा होतो आहे. निदान जनता दलातील पुढाऱ्यांची संख्या तरी वाढते आहे. यापूर्वी त्यांनी शालिनीताई पाटील आणि बाबासाहेब भोसले यांना वाजत-गाजत पक्षात घेतले. आता नाशिकराव तिरपुडे आपल्या कार्यकर्त्यांसह जनता दलात येताहेत. जनता दलाच्या पुढाऱ्यांना याचा आनंद वाटत असला तरी लोकांना, विशेषत: जनता दलाकडून

वेगळ्या अपेक्षा करणाऱ्यांना मात्र आश्चर्य वाटते. कालपर्यंत काँग्रेसमध्ये सत्तेसाठी रस्सीखेच करणारे नेते एका दिवसात, काँग्रेसच्या ठामपणे विरोधात असलेल्या पक्षात कसे काय सामावले जाऊ शकतात याबद्दल आश्चर्य वाटणार नाही तर काय आनंद वाटणार ? लोकशाहीत पक्षांतरे होणारच. परंतु त्या पक्षांतराला, निदान दाखविण्यापुरते, लाज राखण्यापुरते तरी तात्त्विक अधिष्ठान हवे. जनता पक्षाच्या तत्त्वज्ञानाने, त्यांच्या कार्यक्रमाने प्रभावित होऊन, त्यांच्या नेतृत्वाची भुरळ पडून काही जण त्या पक्षात आले तर समजू शकते. परंतु दुसऱ्या पक्षातील असंतुष्टांना, कोणतेही सबळ कारण नसताना पक्षात प्रवेश दिल्याने पक्षाची ताकद वाढण्याऐवजी प्रतिमा मलीन होते. प्रत्येक पक्षाच्या ताकदीची काही मर्मस्थळे असतात. 'तात्त्विक अधिष्ठान' हे जनता पक्षाचे मर्मस्थळ आहे, अशी (निदान) लोकांची समजून आहे. आपल्या पक्षात जास्त लोक आले, जास्त पुढारी झाले म्हणजे आपण मोठे झालो, समर्थ झालो असा जनता पक्षाचा भ्रम असेल तर तो खरा नाही. शिवसेना-भाजपच्या विरोधात तुम्हाला मत द्यायचे आहे, तर पुरोगामी आघाडीला द्या असे काही दिवसांपूर्वीपर्यंत म्हणण्याची सोय होती. जनता दल आपल्याच हाताने आपली शक्ती खच्ची करीत आहे. काँग्रेसमधील फाटाफुटीने एकीकडे शिवसेना-भाजपचा फायदा होईल, असे दिसत असताना, दुसरीकडे जनता दलाचा मात्र तोटाच होणार असे दिसते. काँग्रेसला पर्याय देणे हे विरोधी पक्षांपुढील आव्हान आहे,काँग्रेसची जागा भरून काढणे हे नव्हे असे त्यांच्याच पक्षाचे नेते चंद्रशेखर गेली दोन वर्षे सातत्याने मांडीत आले आहेत. परंतु 'आल्टरनेटीव' पेक्षा 'सबस्टिट्यूट' ची भूमिका घेणे सध्या जनतादलाला पसंत असावे. नंतर मात्र लोकांनी काँग्रेसला पर्याय म्हणून महाराष्ट्रात 'शिवसेना-भाजप' चा पर्याय स्वीकारला तर जातीयवाद्यांचा विजय झाला असा आक्रोश त्यांना करता येणार नाही.

शिवसेना आणि रिपब्लिकन या दोन पक्षांतही फाटाफूट, बंडखोरी आहेच. मराठवाड्यात मराठवाडा शिवसेना स्थापन झाली. ज्या पक्षात विरोधी आवाज निघणे अशक्य तेथे बंडखोरी होऊ शकते याचे केवळ त्यांच्या धैर्यासाठी स्वागत केले पाहिजे. या बंडखोरीमुळे शिवसेनेच्या यशावर किती प्रतिकूल परिणाम होईल हा मुद्दा दुय्यम आहे. संसदीय लोकशाहीत काम करायचे तर पक्षाची कार्यपद्धती लोकशाहीच असली पाहिजे, हे शिवसेनाप्रमुखांना शिवसेनेतीलच कोणीतरी सांगणे आवश्यक होते. मराठवाड्यातील शिवसैनिकांनी ते काम केले. ही गोळी बरोबर लागू पडल्याचे बाळासाहेब ठाकरे यांच्या मराठवाडा दौऱ्यातील संतप्त उद्‌गारांवरून दिसते. त्यांच्या या उद्‌गारांचा पत्रकारांसह सर्वांनीच अतिशय स्पष्टपणे निषेध केला.

शिवसेनेचे स्वरूप उघडे होण्यास बाळासाहेबांच्या भाषणाने जास्तच मदत होते. सत्तेवर येऊ इच्छिणाऱ्यांनी यापेक्षा कितीतरी अधिक जबाबदारीने विचार केला पाहिजे. बोलले पाहिजे. महाराष्ट्रात काँग्रेसला खऱ्या अर्थाने आव्हान मिळाले ते शिवसेनेच्या रूपाने. परंतु राजकीय परिपक्वतेच्या अभावी शिवसेनेला हा डाव अर्ध्यावरच सोडून द्यावा लागला तर अनेकांना त्याचे नवल वाटणार नाही.

रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्याचा त्रिफळा केव्हाच उडाला आहे. निवडणुकीच्या वर्षात घाईघाईने, सत्तेवर डोळा ठेवून घडवून आणलेले ऐक्य टिकाऊ असणार नाही हे उघड होते. ऐक्य टिकवायचे होते तर स्वतःच्या बळावर निवडणुका लढविणे किंवा निवडणुकीपासून पूर्णत: अलिप्त राहणे एवढे दोनच पर्याय त्यांच्यासमोर होते. परंतु केवळ ऐक्य करूनही रिपब्लिकन पक्षाचे अंतिम उद्दिष्ट सफल होणार नाही. जातीय तत्त्वावर पक्षाची बांधणी हे प्रागतिक विचारात बसत नाही. त्यामुळे शिवसेनेला विरोध करायचा, मुस्लिम लीगला विरोध करायचा, विश्व हिंदू परिषदेला विरोध करायचा आणि रिपब्लिकन पक्षाला मात्र पाठिंबा द्यायचा हा अंतर्विरोध झाला असता. येथील दलित समाजाने, समाजातील इतर कमकुवत घटकांच्या राजकारणाशी स्वतःला जोडून एखाद्या अखिल भारतीय पक्षात स्वतःचा आवाज उठवीत राहिले पाहिजे. रिपब्लिकन पक्षाने 'पुलोआ' बरोबर समझोता करण्यासाठी मुख्यमंत्रिपदाची मागणी केली. ती मान्य होणे कठीणच. परंतु रिपब्लिकन पक्ष आज जनता दलात असता तर प्रकाश आंबेडकरांसारखी व्यक्ती नैसर्गिकपणेच पर्यायी मुख्यमंत्री म्हणूनही पुढे येऊ शकली असती.

●

२९

प्रतिबिंब ९०

# महाराष्ट्रातील यशाचा अर्थ

महाराष्ट्रातील निवडणूक निकालांनी विशेषत: काँग्रेस पक्षाला आत्मपरीक्षणाची उत्तम संधी मिळवून दिली आहे. लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसचा मोठा पराभव झाला, आणि नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीतही अनेक राज्यांतील त्यांची सत्ता गेली असली तरी राष्ट्रव्यापी पक्ष हे विशेषण लावता येईल असा काँग्रेसशिवाय दुसरा कोणताही पक्ष या प्रक्रियेतून उदयाला आलेला नाही. एका पूर्ण शतकाची परंपरा, लोकोत्तर व्यक्तींचे नेतृत्व, आणि व्यापक पाया असलेल्या पक्षाचे विघटन होणे व त्याची जागा संकुचित विचाराच्या अनेक छोट्या पक्षांनी घेणे हे भारतासारख्या विकसनशील लोकशाहीस आणि धर्म, भाषा, संस्कृती, प्रदेश या सर्व अंगांनी भिन्नता असलेल्या खंडप्राय देशास अराजकाच्या उंबरठ्यावर नेऊन ठेवण्यासारखे आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीचा केवळ सुटा विचार होऊ शकत नाही. देशपातळीवर घडणाऱ्या घटनांचा संदर्भही अपरिहार्य आहे. काँग्रेसला असा एखादा 'शॉक' देण्याची आवश्यकता होती. तो मिळाला आहे. त्यातून या पक्षाच्या पुनर्बांधणीचा आणि देशातील राजकीय स्थितीचा नव्याने विचार सुरू व्हावा.

महाराष्ट्रात काँग्रेसला २८८ पैकी निम्म्या म्हणजे १४२ जागा मिळाल्या. अपक्ष, जे मुख्यत: काँग्रेसचे बंडखोर आहेत, त्यांच्या सहकार्याने काँग्रेसने सरकार बनविले आहे. काँग्रेसच्या या काठावरील यशाचे विविध अर्थ लावले जात आहेत. 'काँग्रेसचा हा विजयच नव्हे' या सिनिसिझमपासून 'वाघाचे कातडे पांघरलेल्या प्राण्याच्या घशातून काँग्रेसने विजयश्री खेचून आणली' या दर्पोक्तीपर्यंत टोकाचा अभिनिवेश त्यात आहे. या वेळी काँग्रेसला निर्विवाद यश मिळाले नाही हे खरे आहे. १९८५ मध्ये या पक्षाला १६२ जागा मिळाल्या होत्या आणि नोव्हेंबरमधील लोकसभा निवडणुकीतही तेवढ्याच विधानसभा मतदारसंघात काँग्रेसला मताधिक्य होते. विसर्जित. झालेल्या विधानसभेत तर काँग्रेसचे बळ दोनशेपेक्षा जास्त होते.

या तुलनेत आज मिळालेल्या १४२ जागा ही काँग्रेसचा पाया हादरल्याची स्पष्ट खूण आहे. केवळ दिल्लीच्या दृष्टिकोणातून पाहिले तर गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, ओरिसा यांसारखे काँग्रेसचे भरभक्कम किल्ले एकामागून एक पडत असताना महाराष्ट्र तेवढा शाबूत राहिला एवढेच समाधान. परंतु त्यात दिल्लीचा वाटा जवळजवळ नाही. दिल्लीला धनी व्हायचे असेल तर ते अपयशाचे!

काँग्रेसच्या महाराष्ट्रातील अपयशाची कारणे अगदी स्पष्ट आहेत. राजकीय अस्थिरता हे त्याचे प्रमुख कारण आहे. विधानसभेत सत्तारूढ पक्षाचे भरपूर बळ असतानाही १९८० पासून महाराष्ट्राला स्थिर नेतृत्व मिळाले नाही. त्या आधीच्या काळात सलग अकरा वर्षे वसंतराव नाईक यांच्यासारखी व्यक्ती मुख्यमंत्री राहू शकते आणि नंतरच्या दहा वर्षांत सहा मुख्यमंत्री होतात! ही राजकीय अस्थिरता जाणूनबुजून निर्माण करण्यात आली. काँग्रेसचे लोकशाही स्वरूप संपून इंदिरा गांधी या एका व्यक्तीचे वर्चस्व निर्माण झाले. त्यांच्या नेतृत्वाला शह मिळणार नाही या एकाच अंतिम उद्दिष्टाने राजकीय मांडामांड करण्यात आली. इंदिरा गांधींची शक्ती ही त्यांच्या प्रबळ सहकाऱ्यांची किंवा ताकदवान पक्षाची नव्हती. ती त्यांची स्वतःची होती. पक्ष आणि सहकारी यांच्या माध्यमाशिवाय लोकांशी थेट नाते जोडून त्यांनी आपले स्वयंभू नेतृत्व प्रस्थापित केले. त्यासाठी आवश्यक असणारे सर्व 'गुण' त्यांच्या अंगी होते. बहुतेक राज्यातील मुख्यमंत्रीही त्यांनी नेमलेली प्यादी होती. इंदिरा गांधी हे स्टार आकर्षण असल्याने लोकांच्या लक्षात हे पक्षांतर्गत बदल आले नाहीत. ज्यांच्या आले, आणि त्यातील धोकेही ज्यांना कळले त्यांना बाईंपुढे पड खावी लागली. पक्षांतर्गत निवडणुका असोत, काँग्रेस महासमितीच्या बैठकी असोत, प्रदेशाध्यक्ष किंवा मुख्यमंत्र्यांच्या नेमणुका असोत, काँग्रेसमधील लोकशाही संपली. त्यानंतर राजीव गांधी पंतप्रधान झाले. इंदिरा गांधींनी ज्या तऱ्हेची राजकीय व्यूहरचना केली होती त्यात यापेक्षा वेगळे काही घडण्याची शक्यताच नव्हती. परंतु राजीव गांधी म्हणजे इंदिरा गांधी नव्हेत. बदललेल्या राजकीय परिस्थितीचे मूल्यमापन करून त्यांनी आपल्या कारभाराची नवी शैली तयार करायला हवी होती. पण त्यांनी इंदिराजींचेच बूट घालून आपल्या राजकीय प्रवासाला सुरुवात केली. त्यांचा प्रवास सुरळीत होणे शक्य नाही हे तेव्हाच स्पष्ट झाले. त्यांचा राजकीय निरागसपणा आणि आकर्षक व्यक्तिमत्त्व यांमुळे लोकांना सुरुवातीच्या काळात त्यांचे आकर्षण वाटले. बदल घडतो आहे अशी आशा वाटली. परंतु नंतर लोकांचा भ्रमनिरास झाला तरी ते स्वतः स्वतःच निर्माण केलेल्या कोषातून बाहेर पडले नाहीत. लोकांपासून अलग पडले. पक्ष तर कमकुवत झालाच होता. पक्षही नाही आणि लोकही नाहीत. त्यांच्याविना व्हायचे तेच राजीव गांधींचे

झाले. बोफर्ससारखी प्रकरणे तोंडी लावण्यासाठी होतीच. लोकसभेतील आणि राज्यातल्या पराभवाची ही ढोबळ मीमांसा झाली. त्यात स्थानिक घटक मिळविले की त्या-त्या राज्यातील चित्र तयार होते. काँग्रेसच्या व त्यांच्या केंद्रीय नेतृत्वाच्या कमकुवतपणामुळे निर्माण झालेली पोकळी भरण्यासाठी इंदिरा गांधींच्याच आक्रमक शैलीत प्रादेशिकवाद, व्यक्तिवाद, जातीयवाद पुढे आणला गेला. भाजपचे प्रचंड यश मुख्यत्वे या आक्रमक जातीयवादाचे फळ आहे. जनता दलाच्या यशाला हिंदू जातियवादाविरुद्धची प्रतिक्रिया म्हणून उमटलेला इतरांचा जातीयवाद आणि देवीलाल, विश्वनाथप्रताप सिंग यांचे व्यक्तिमाहात्म्य कारणीभूत आहे. डाव्या पक्षांच्या यशात ज्योती बसूंचा व्यक्तिवाद, बंगाल्यांचा उपराष्ट्रवाद आणि मार्क्सचे कडवे तत्त्वज्ञान यांची सरमिसळ आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभांच्या निवडणुकीत कमीजास्त प्रमाणात त्याचेच प्रतिबिंब उमटले आहे.

बिहारमध्ये जनता दलाचे माफक यश ही उत्तर प्रदेशाची पुनरावृत्ती आहे. हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेशात पोकळी भरून काढण्यासाठी भाजप सर्वात समर्थ पक्ष होता. राजस्थानमध्येही भाजपचा पूर्वीपासूनच प्रभाव आहे. गुजरातसारख्या राज्यात भाजपपेक्षा जनता दल थोडेसेच आघाडीवर दिसते. याचे कारण चिमणभाई पटेल यांनी पणाला लावलेले सर्व राजकीय कौशल्य. पुन्हा सत्ता मिळविण्याची त्यांची जबर महत्त्वाकांक्षा गेली पंधरा वर्षे सातत्याने डोके वर काढीत आहे. ओरिसातील जनता दलाच्या यशाचे शिल्पकार आहेत केवळ बिजू पटनाईक. महाराष्ट्राचेच चित्र या सर्व राज्यांपेक्षा थोडे वेगळे दिसते.

महाराष्ट्रात शिवसेना-भाजप युतीने काँगेसपुढे खरे आव्हान निर्माण केले. भाजपचा हिंदुत्ववाद महाराष्ट्रात केवळ एका जातीपुरता मर्यादित होता. शिवसेनेच्या हिंदुत्वामुळे इतर मागास जाती त्यात आल्या. स्वातंत्र्योत्तर काळात नेतृत्व बहुजन समाजाकडे आल्यामुळे (फक्त) राजकारणात प्रभावहीन झालेले तथाकथित उच्चवर्णीय आणि कोणत्याच पक्षात जातीच्या पायावर आकांक्षा सफल न झालेले इतर मागासवर्गीय यांची एकजूट महाराष्ट्रात प्रथमच होत होती. अशा तऱ्हेची जातीय समीकरणे पूर्वी गुजरात, उत्तर प्रदेशात आणि बिहारमध्ये मांडण्यात आली होती. सोळंकी हे गुजरातमधील त्याचे शिल्पकार होते. सात जातींच्या पाठिंब्याने गुजरातमधील पटेलांना काही दिवस ते सत्तेपासून बाजूला ठेवू शकले. उत्तर प्रदेशात अहिर, जाट, गुजर, राजपूत यांचे 'अजगर' हे मध्यम जातींचे समीकरण यशस्वी झालेले आहे. महाराष्ट्रात ब्राह्मणांचा भाजप, मराठ्यांची काँग्रेस, दलितांचा रिपब्लिकन, प्रागतिकांचा जनता पक्ष आणि आता शिवसेनेच्या रूपाने इतर मागासवर्गी असे जातीय धृवीकरण होणे धोकादायक होते. महाराष्ट्रात काँग्रेसपुढे

आव्हान होते ते केवळ बहुमत मिळण्याइतक्या जागा जिंकणे नव्हे, तर सत्तेसाठी समाजाची जात आणि धर्मवार विभागणी टाळण्याचे होते. जनता दलाला महाराष्ट्रात सर्वांपेक्षा कमी जागा मिळाल्या असल्या, तरी शिवसेना-भाजपला तात्त्विक पातळीवर, उच्चरवाने विरोध करण्याची नि:संदिग्ध भूमिका त्या पक्षाने, विशेषत: मृणाल गोरे यांनी घेतली. केवळ महाराष्ट्रापुरता विचार करायचा, तर विधानसभा निवडणुकीत शिवसेना-भाजप युतीला रोखण्याचे श्रेय काँग्रेस आणि पुरोगामी लोकशाही आघाडीला संयुक्तपणे द्यायला हवे. पुरोगामी लोकशाही आघाडीला सत्तेत वाटा मिळाला नाही तरी सामाजिक व राजकीय श्रेयात त्यांना वाटा द्यायलाच हवा. निवडणुकीत जागांपेक्षा अधिक यश जनता पक्षाला मिळाले ते आता जागांच्या बळावर घालविण्याची चूक जनता पक्षातील काही मंडळी करीत आहेत. तत्त्वाधिष्ठित राजकारण की व्यक्तिसापेक्ष राजकारण अशा वैचारिक गुंत्यात जनता पक्ष फसत आहे आणि मृणाल गोरेंविरुद्ध काकडे-तिरपुडे असे जे नवे समीकरण तयार होत आहे, ते व्यापक राजकीय फेरमांडणीच्या दृष्टीने आतबट्ट्याचे ठरेल. शरद पवार या व्यक्तीविरुद्ध राजकारण करणाऱ्या लोकांचा अड्डा, अशी महाराष्ट्रातील जनता दलाची ओळख करून देण्याची वेळ येऊ नये. रायभान जाधव यांची महाराष्ट्र इंदिरा काँग्रेस आणि जनता दल यांतील फरक स्पष्टपणे जाणवला पाहिजे.

काँग्रेसला महाराष्ट्रात यश मिळण्यात राजीव गांधींचा हातभार लागला तो केवळ त्यांच्या सभांमुळे नव्हे तर नेतृत्वाबाबत कधी नव्हे एवढी नि:संदिग्ध भूमिका त्यांनी घेतल्यामुळे. निवडणुकीनंतरही शरद पवार हेच महाराष्ट्रात काँग्रेसचे नेते असतील आणि पक्षाला बहुमत मिळाल्यास तेच पुन्हा मुख्यमंत्री होतील, याबाबत त्यांनी लोकांच्या मनात संशय ठेवला नाही. तिकीट वाटपापासून प्रचारमोहिमेपर्यंत पवार यांना प्रत्येक गोष्ट आत्मविश्वासाने करता आली. याबाबत थोडेही बोटचेपे धोरण स्वीकारले गेले असते, तर बाळासाहेब ठाकरे यांच्यासारख्या, आक्रमकपणे लोकांचे लक्ष आपल्याकडे खेचून घेणाऱ्या व्यक्तीचा सामना करता येणे शक्य झाले नसते. पवार यांनी एकट्याच्या हिमतीवर सर्व प्रचारमोहीम सांभाळली. राजीव गांधी यांचे हात बळकट केले पाहिजेत, असे एरवी म्हणणाऱ्या शंकरराव चव्हाण, वसंतराव साठे, बॅ. अंतुले, निलंगेकर, प्रतिभा पाटील यांचे अस्तित्वही या प्रचारमोहिमेत कोठे जाणवले नाही. ज्या पक्षाच्या जिवावर पदे मिळवायची, वर्षानुवर्षे सत्तेचा उपभोग घ्यायचा, त्याच पक्षाच्या प्रचारमोहिमेतून स्वत:ला असे अलग ठेवणे पक्षशिस्तीत किंवा नीतीत बसते काय ? शंकरराव चव्हाण, वसंतराव साठे केंद्रात वर्षानुवर्षे मंत्री आहेत ते महाराष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून की त्यांच्या एका मतदारसंघाचे

प्रतिनिधी म्हणून ? विदर्भातील पराभवाची जबाबदारी साठे यांच्यावर आहे की नाही ? दूरदर्शनवर काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी बोलायचे आणि प्रचार मात्र करायचा नाही ! काँग्रेसचे पक्ष म्हणून अस्तित्व खिळखिळे झाल्याचे हे लक्षण आहे. महाराष्ट्रातील काँग्रेसचे यश हे राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षाचे यश आहे, असे आज पवार कितीही म्हणत असले, तरी समजा उद्या त्यांना वाटले की, हे यश केवळ माझ्या एकट्याचे आहे आणि त्यामुळे मला वाटेल त्याप्रमाणेच येथील सर्व कारभार चालेल, मला हवे तेच मंत्री होतील, वगैरे वगैरे... तर 'पवार हटाव' मोहीम काढायला हेच लोक पुढे येणार. दिल्लीत राजीव गांधी चालतात, महाराष्ट्रात मात्र पवार नकोत, अशा अंतर्विरोधांनी ओसंडून वाहणाऱ्या लोकांच्या हातून शिवसेनेचा पराभव काय किंवा काँग्रेसमधील अंतर्गत लोकशाहीची प्रस्थापना काय, कोणतेच उद्दिष्ट साध्य होणार नाही.

महाराष्ट्रातील जवळजवळ सर्व प्रचारमोहीम राजकीय झाली. राजीव गांधी यांच्या भाषणात जम्मू-काश्मीर, पंजाब, पाकिस्तान यांसारख्या प्रश्नांचे न पटणारे प्रचारकी विश्लेषण होते. पाच वर्षे पंतप्रधान असणाऱ्या व्यक्तीकडून यापेक्षा भरीव वाद-विवादाची अपेक्षा होती. पवार यांच्या अनेक भाषणांतही शिवसेना भाजप विरोध ओतप्रोत भरलेला असे. १९८५ मध्ये विरोधी पक्षात असतानाही त्यांची भाषणे अधिक भरीव, ठाशीव, वजनदार होती. राज्यापुढील आर्थिक प्रश्नांची, विकासाच्या धोरणांची, बेरोजगारीच्या समस्येची, सामाजिक असंतोषाच्या कारणांची पुरेशी चर्चा व्हायला हवी होती. शिवसेनेच्या नेत्यांनी आक्रमक हिंदुत्व यावर आपली सर्व बैठक बसविली असली, तरी शिवसेनेची वाढ आपण समजतो तशी केवळ धार्मिक किंवा राजकीय कारणांसाठी नाही. बेकारी, विषमता, मागासलेपण, निवारा यांसारखी मूलभूत कारणे तेवढीच महत्त्वाची आहेत. राजकीय स्थैर्याअभावी महाराष्ट्रातील या मूलभूत प्रश्नांचा विचार अलीकडच्या काही वर्षांत मागे पडला. मुंबईत भाजपपेक्षा शिवसेना प्रबळ आहे, याचे कारण मराठी माणसाला आपल्यावरील अन्यायाचे शल्य कुठे तरी बोचते आहे, हे उघड आहे. शहरी भागात काँग्रेसचा प्रभाव कमी झाला, याचे कारण तेथील नागरी समस्यांची हाताळणी स्थानिक किंवा राज्य पातळीवर सत्तारूढ पक्षाकडून नीट होत नाही, हेही खरे आहे. मुंबईतील चाळीस लाख झोपडपट्टीवासियांना मोफत घरे देण्याची किंवा पुणे-मुंबई मार्ग चौपदरी करण्याची ठाकरे यांची घोषणा कोणाला खिल्ली उडविण्यासारखी वाटली, तरी शहरातील निम्मे लोक आज झोपडपट्टीत राहत आहेत आणि दुसरीकडे घरांच्या, जमिनीच्या किमती आकाशाला भिडल्या आहेत ही वस्तुस्थितीही शांतता ढळविणारी आहे. शिवसेनेने पुढे आणलेले सर्व प्रश्न कल्पित

नाहीत. किंबहुना समाजातील सर्वांत खालच्या स्तरावर जाऊन पोहोचलेली शिवसेनेसारखी दुसरी संघटना आज महाराष्ट्रात नाही. छत्रपती शिवाजी महाराजांपासून म. फुले, लोकहितवादी, न्या.रानडे, प्रिं. आगरकर, महर्षी शिंदे, डॉ. आंबेडकर, शाहू महाराज अशी प्रागतिक विचारांची, सामाजिक सुधारकांची अखंड परंपरा लाभल्यामुळेच महाराष्ट्रात इतर प्रांतांच्या तुलनेत थोडेसे प्रागतिक राजकारण दिसते. कॉंग्रेसला १४२ जागा मिळाल्या, त्यामागे ही पार्श्वभूमी आहे. परंतु राज्याच्या प्रकृतीत बिघाड झाला आहे, हे खरेच. शिवसेना हे त्याचे लक्षण आहे, रोग नव्हे. त्यामुळे शिवसेनेवर हल्ला करण्याऐवजी रोगाच्या मुळावर घाव घातला पाहिजे. कॉंग्रेसला पुनर्विचाराची आणि महाराष्ट्रात सुदैवाने त्याप्रमाणे काम करण्याचीही संधी या निवडणुकीने मिळाली आहे.

•

३०

१९९०

# देवीलाल बोले, हरियाना हाले !

परवा दिल्लीत जो राजकीय पेचप्रसंग उभा राहिला त्याला 'चौताला प्रकरण' असे नाव देऊ या. त्या तीन-चार दिवसांत चौताला प्रकरणात जे अघटित घडलं त्याचा तपशिलवार वृत्तांत आता सर्वत्र उपलब्ध आहे. वरवर पाहता एक पेचप्रसंग निर्माण झाला, जनता दलातील कर्त्यासवरत्या व्यक्तींनी त्यातून यशस्वी मार्ग काढला आणि राजकीय घडी पुन्हा प्रस्थापित झाली असे दिसते. जनता दलातील अनेक ज्येष्ठ नेत्यांनी या पेचप्रसंगाचे मूल्यमापन असेच केले आहे. पंतप्रधान विश्वनाथप्रताप सिंग यांचेही मत तसेच आहे. या पेचप्रसंगाने जनता दलाचे ऐक्य कुठल्याही प्रकारे धोक्यात आलेले नाही किंवा पक्षाची प्रतिमाही डागळलेली नाही असे त्यांना निसंदिग्धपणे वाटते. त्यांचे ते वाटणे वस्तुस्थितीला धरून आहे ? चौताला प्रकरणाची काहीच किंमत द्यावी लागली नाही ? 'देवीलाल यांनी आपल्या मुलाच्या राजीनाम्याची घटना खिलाडूपणे स्वीकारली', 'पेचप्रसंग मिटल्याने चंद्रशेखर आनंदित' 'माझी मान मी आनंदाने पक्षाध्यक्ष बोम्मई यांच्या हाती सोपविली आहे.' या वृत्तपत्रातील बातम्यांची शीर्षके सत्याचे दर्शन घडवितात की मुखवट्यांचे वर्णन करतात ? चौताला यांनी राजीनामा दिल्यानंतर जनता दलाचे नेते बिजू पटनाईक यांनी प्रेमभराने चौताला यांच्या गळ्यात हात टाकले आहेत हे छायाचित्र सत्य की आभास ? आर.के.लक्ष्मण यांच्या व्यंगचित्रात दोरखंडाने चौतालांना खाली खेचणाऱ्या गर्दीत कोणकोणते चेहरे आहेत ?

पहिली गोष्ट म्हणजे हरियानाच्या मुख्यमंत्रिपदी देवीलाल यांचे पुत्र ओमप्रकाश चौताला यांची अवघ्या पन्नास दिवसांनंतर फेरनिवड होणे. या निवडीला आमदारांच्या किंवा विधिमंडळ पक्षाच्या लोकशाही हक्कांचा, खऱ्याखुऱ्या विकेंद्रीत लोकशाही पद्धतीचा मुलामा देण्यात आला. एखाद्या राज्यातील विधिमंडळ पक्षाचा नेता निवडण्याचा लोकशाही अधिकार विरुद्ध केंद्राने लादलेला मुख्यमंत्री असे सैद्धांतिक द्वंद्व निर्माण करण्यात या प्रकरणातील अध्वर्यूंना काही प्रमाणात यश

आले. हरियाना जनता दल विधिमंडळ पक्षाने चौताला यांची नेतेपदी निवड केल्यामुळे त्यांचा राजीनामा मागणे हा अन्याय होईल, असे देवीलाल यांचे प्रतिपादन होते. वास्तविक चौताला यांची फेरनिवड ही फक्त तांत्रिकदृष्ट्या कायदेशीर असलेली गोष्ट होती. त्यामुळेच त्यांचे सरकार बरखास्त करणे भारतीय घटनेनुसार उचित झाले नसते. मात्र लोकशाही संकेतांना धरून बोलायचे तर मेहम निवडणुकीतील मतदानाचे गैरप्रकार आणि हिंसा यांची मुख्यमंत्री म्हणून नैतिक जबाबदारी स्वीकारून चौताला यांनी त्याच वेळी स्वतः राजीनामा द्यायला हवा होता. तो त्यांनी दिला नाही. पक्षश्रेष्ठींनी दबाव आणल्यानंतर का होईना त्यांनी राजीनामा दिला. मात्र 'मेहम' प्रकरणात चौताला यांची वैयक्तिक जबाबदारी कायदेशीर दृष्ट्या स्पष्ट होण्याआधीच ते पुन्हा मुख्यमंत्री झाले. पुन्हा मुख्यमंत्री व्हायचे होते, तर प्रथमच राजीनामा द्यायला नको होता. 'मेहम'च्या ऐवजी ते दुसऱ्या मतदारसंघातून विधानसभेवर निवडून आले याचा अर्थ त्यांनी मुख्यमंत्री होण्याला लोकांनी अनुकूल कौल दिला असा होत नाही.

दुसरी गोष्ट चौताला यांच्या जागी बनारसीदास गुप्ता यांची विधिमंडळ नेतेपदी नियुक्ती झाल्यानंतर ते मुख्यमंत्री झाले. आता त्यांनी राजीनामा दिल्यानंतर विधिमंडळ पक्षाने राजीनाम्याची कारणे विचारायला हवी होती. तो त्यांचा लोकशाही हक्क होता. त्यांनी मुख्यमंत्रिपद स्वीकारले त्या वेळी आपण 'औटघटके'चे मुख्यमंत्री नव्हेत. असा निर्वाळा दिला होता. प्रत्यक्षात ते पद तसेच ठरले. त्याला त्यांचा कारभार किंवा विधिमंडळ पक्ष जबाबदार नसून देवीलालच जबाबदार आहेत. केवळ देवीलाल यांच्या सांगण्यावरून त्यांनी राजीनामा दिला. तसे त्यांनी करावे म्हणून देवीलाल यांनी पक्षश्रेष्ठींचा हवाला दिला आणि बनारसीदास गुप्ता यांची फसवणूक केली. लोकशाहीची त्यांना एवढी चाड होती तर किमान पक्षाध्यक्षांना त्यांनी या घटनेची पूर्वकल्पना द्यायला हवी होती. तीही दिली नाही. याचा अर्थ हरियानात लोकशाही केवळ नावाला असून, सर्व सत्ता देवीलाल या एका व्यक्तीच्या हाती केंद्रीत झाली आहे. त्या सत्तेचा ते मनमानी वापर करताहेत. त्या मनमानीपणातही आपली व आपल्या कुटुंबियांची सत्ता अबाधित ठेवण्याची सरंजामशाहीवृत्ती सुसंगतपणे दिसते आहे. 'देवीलाल बोले आणि हरियाना हाले' अशी तेथील स्थिती आहे. लोकशाहीचे नाव घेऊन झालेला कट असेच चौताला यांच्या पुनरागमनाचे वर्णन करता येईल. मुख्यमंत्री होण्यासाठी चौताला व देवीलाल असे कट करू शकतात, तर निवडून येण्यासाठी मेहममध्ये निवडणुकीत गैरप्रकार होणे सहज शक्य आहे. 'मूल्याधिष्ठित राजकारण' हा जर जनता दलाचा परवलीचा शब्द असेल आणि त्याचा ऱ्हास होत आहे

हे इतक्या स्पष्टपणे दिसत असेल तर त्याचे स्पष्टीकरण मागण्याचा लोकाना जरूर हक्क आहे. टेलिफोन टॅपिंग किंवा जमीन भ्रष्टाचार प्रकरणी हेगडे यांना दोषी ठरवून त्यांचा राजीनामा मागण्याचा जर देवीलाल यांना नैतिक अधिकार पोहोचत असेल तर त्याच न्यायाने चौतालांचे पुनरागमन हा राजकीय भ्रष्टाचार आहे. जमीन भ्रष्टाचाराहून त्याची गुणवत्ता वेगळी नाही.

देवीलाल यांनी निर्माण केलेल्या पेचप्रसंगाला पंतप्रधान विश्वनाथप्रताप सिंग कसे सामोरे गेले ते आता पाहू. पहिली गोष्ट म्हणजे ही पक्षांतर्गत बाब होती. तिचा मुकाबला पक्षीय पातळीवरून करण्याचे पथ्य व्ही.पी. सिंग यांना पाळता आले नाही. या पेचप्रसंगातून यशस्वीपणे बाहेर पडण्यासाठी त्यांनी आपले पंतप्रधानपदच पणाला लावले. ही टोकाची गोष्ट झाली. त्यांनी पंतप्रधानपदाचाच राजीनामा दिल्यामुळे केवळ जनता दलाचा अंतर्गत असलेला प्रश्न राष्ट्रीय बनला आणि मंत्रिमंडळात सहभागी असलेले राष्ट्रीय मोर्चातील द्रमुक आसाम गणपरिषद, कॉंग्रेस (एस) यांसारखे इतर पक्ष आणि सरकारला बाहेरून पाठिंबा दिलेले भाजप व कम्युनिस्ट पक्ष यांनाही रंगमंचावर येऊन किंवा मागे राहून आपल्या भूमिका पार पाडाव्या लागल्या. केवळ जनता दलात आपली बाजू अद्याप कमकुवत आहे असे सिंग यांना वाटत असल्याने आपल्याच बाजूला राहतील या अपेक्षेने त्यांनी भाजप व डाव्या आघाडीला चौताला प्रकरणात ओढले. देशाच्या राजकारणाच्या दृष्टीने सध्याचेच सरकार टिकले पाहिजे आणि त्यासाठी व्ही.पी. सिंग यांना सध्या पर्याय नाही अशी या पक्षांची धारणा असल्याने अपेक्षित तसेच घडले.

देवीलाल यांच्याशी सिंग यांना त्यामुळे अधिक समर्थपणे टक्कर देता आली आणि 'चौताला यांनी राजीनामा दिल्याशिवाय माघार नाही' या भूमिकेशी त्यांना ठाम राहता आले. देवीलाल यांना एकाकी पाडण्यात सिंग यांना यश आले त्यात भाजप व डाव्या आघाडीचा मोठा वाटा आहे. या तडजोडीचे सर्व श्रेय स्वतःकडे घेऊ पाहणारे गुजरातचे मुख्यमंत्री चिमणभाई पटेल हे देवीलाल-चंद्रशेखर यांना अधिक जवळचे; परंतु या प्रकरणात पंतप्रधानांच्या बाजूने तुम्ही उभे राहिला नाहीत तर गुजरातमधील तुमच्या सरकारचा पाठिंबा काढून घेऊ असा सज्जड दम भाजपने भरल्याबरोबर त्यांनी आपली टोपी फिरविली आणि ते चौतालांचे राजीनाम्यासाठी मन वळविते झाले. ज्योती बसू या काळात जर्मनीत म्युनिक येथे होते. दौरा अर्धवट सोडून ते भारतात परतले. भाजप व डाव्या आघाडीने व्ही.पी. सिंग यांना असा भक्कम पाठिंबा दिल्याने कॉंग्रेसलाही काही खेळी खेळता आली नाही. व्ही.पी. सिंग यांनी आपले स्थान या प्रक्रियेत अधिक भक्कम करून घेतले असले तरी प्रत्येक वेळी त्यांना अशीच समीकरणे मांडता येणार नाहीत. सरकार

चालविण्याबाबत जनता दल गंभीर नाही आणि वैयक्तिक सत्तास्पर्धेपुढे त्यांना राष्ट्रीय हित गौण वाटते असे चित्र निर्माण झाले तर हा बाहेरचा पाठिंबा कायम राहील याची खात्री नाही. लोकांनी काँग्रेसविरुद्ध कौल दिला याचा अर्थ फार संकुचित करता येणार नाही. निवडणुका नको असतील तर दुसरे पर्यायही पुढे येऊ शकतील. म्हणून व्ही.पी. सिंग यांनी पहिल्याच डावात असे हुकमाचे सर्व पत्ते उधळून टाकायाला नको होते.

त्याऐवजी त्यांनी तातडीने पक्षाच्या राजकीय समितीची बैठक बोलवून चौताला प्रकरण त्यांच्यावर सोपवायला हवे होते. देवीलाल यांचे जर या प्रकरणात निश्चित चुकले होते तर पक्षात त्यांना अलग पाडायला हवे होते. एवढ्या महत्वाच्या घटनेत आपल्याला पक्षाध्यक्ष म्हणून विश्वासात घेतले नाही म्हणून चौताला यांची पक्षातून हकालपट्टी करण्यास बोम्मई यांचा मार्ग मोकळा होता.सिंग व बोम्मई यांना खरोखरच विश्वासात न घेता एवढे मोठे सत्तांतर घडत होते तर देवीलाल यांच्यावरच बाजू उलटविता आली असती. हा प्रश्न लोकांकडे नेता आला असता. देवीलाल केवळ वैयक्तिक सत्ताकांक्षेसाठी कौटुंबिक राजकारण करीत आहेत असे चित्र निर्माण झाले असते. हे प्रकरण चार दिवसांत संपले,त्याला कदाचित चौदा दिवस लागले असते. परंतु त्यातून मिळालेला विजय अधिक टिकावू स्वरूपाचा झाला असता. देवीलाल उघडे पडले असते. आज प्रश्न सुटला आहे. परंतु तो दबाव तंत्राने. त्यातील मूळ मुद्द्यांचा उलगडा होऊन, तार्किक परिणती म्हणून चौताला यांनी राजीनामा दिला असता तर त्यामुळे राजकारण पुढे गेले असते. गळू फुटले असते. काही गोष्टींचा निचरा झाला असता. आज हे गळू फडके बांधल्याने फक्त नजरेआड झाले आहे.

या प्रकरणाने ना पक्षाचे ऐक्य भंग पावले, ना पक्षाच्या प्रतिमेला तडा गेला. या पंतप्रधानांच्या मताशी सहमत होणे अशक्यच आहे. आजचा पेचप्रसंग एखाद्या धोरणात्मक किंवा तात्विक विषयाशी संबंधित असता तर त्यांचे मत पटले असते. परराष्ट्र धोरण, आर्थिक धोरण, औद्योगिक धोरण किंवा अगदी रामजन्मभूमीसारखे प्रकरण पुढे येऊन चर्चा, वादविवाद, मतभेद, संघर्ष झाला असता तर ते लोकशाहीला, मुक्त समाजाला भूषणावह ठरले असते. हा खुलेपणा म्हणजे पक्षाची ताकद आहे असेही म्हणता आले असते. परंतु अशा तऱ्हेच्या विषयांची चर्चा करायला पक्षातील नेत्यांना सवड नाही. औद्योगिक धोरणावर पुरेशी चर्चा झाली नाही. पेट्रोल पंप रविवारी उघडे असावेत की बंद यासारख्या विषयावरही चर्चा झाली नाही. जेव्हा केव्हा अशी चर्चा कोणी करू पाहतो तेव्हा त्यांतील तत्त्वांपेक्षा ती एखाद्या व्यक्तीला लक्ष्य करण्यासारखी केली जाते. चंद्रशेखर यांनी औद्योगिक

धोरणावर टीका सुरू केली. ती रास्त असेलही; परंतु लक्ष्य होते पंतप्रधान. देवीलाल यांनी नियोजन मंडळ आणि आठव्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यावर चर्चा सुरू केली. लक्ष्य होते रामकृष्ण हेगडे. या वेळचा विषय होता चौताला यांचे मुख्यमंत्रिपद. त्यावरच खरोखरच चर्चा व्हायला हवी होती. अशी सरंजामशाही किती काळ सुरू ठेवायची ? हरियाना म्हणजे देवीलाल यांना मिळालेले आंदण नव्हे. चौताला यांनी स्वतःच्या नेतृत्वाखाली निवडणुका जिंकाव्यात आणि खुशाल मुख्यमंत्री व्हावे. परंतु इथे पद हवे आहे ते वारसाहक्काने. चौताला यांनी पक्षहिताचा विचार करून मुख्यमंत्रिपद पुन्हा स्विकारायलाच नको होते. पण इथे सर्व सत्ता स्वतःच्या कुटुंबात केंद्रित करणाऱ्या वृत्तीचे दर्शन घडले. त्याने पक्षाची प्रतिमा डागळली. ज्या शैलीत व्ही.पी.सिंग यांनी हा प्रश्न हाताळला त्यामुळे त्यांची प्रतिमाही डागाळली. आपण विश्वास गमावला आहे असे आपल्याला वाटले म्हणून आपण राजीनामा देण्याची तयारी दाखविली असे त्यांनी म्हटले. तसा विश्वास त्यांनी गमावलेला नव्हता. जनता दलातील उत्तर प्रदेशचे चाळीस खासदार या प्रकरणात व्ही.पी. सिंग यांच्या बाजूने ठामपणे उभे राहिले आणि अलीकडेच झालेल्या एका पाहणीत लोकमत सिंग यांना अनुकूल आहे असाच निर्वाळा आहे. परंतु त्यांनी राजीनामा देण्याची तयारी दाखविली ती पक्षांतर्गत कलहावर मात करण्यासाठी.त्यामुळेच त्यांची प्रतिमा डागाळली. पक्षात आज त्याची बाजू अधिक बळकट झालेली असेलही.परंतु लोकांपुढे त्यांचा कमकुवतपणा आला. 'यमुनेकाठी जनतादल आता, पहिले उरले नाही' हेच खरे!

●

| प्रकरण ३१ | # राजीवला पर्याय का नाही ? |
|---|---|

काँग्रेसमध्ये राजीव गांधींना पर्याय उभा का राहू शकत नाही हे दिल्लीत झालेल्या काँग्रेस महासमितीच्या बैठकीने स्पष्ट झाले. काँग्रेसला शंभरावर वर्षांची परंपरा असली तरी संघटनात्मक ताकदीसाठी व्यक्तीवर अवलंबून राहण्याशिवाय तिला गत्यंतर नाही हे या बैठकीत पुन्हा एकदा सिद्ध झाले. पक्षाध्यक्षपद आणि संसदीय पक्षाचे नेतेपद अशी दुहेरी जबाबदारी राजीव गांधींवर सोपविण्यात आली. याचा अर्थ पक्षात किंवा संसदेत राजीव गांधींशी नेतृत्वाबाबत स्पर्धा करू शकेल असा एकही नेता दृष्टिपथात दिसत नाही. राजीव गांधी यांच्याकडे फार उत्तम नेतृत्त्वगुण आहेत असे नव्हे. किंबहुना अशा गुणांचा अभाव असल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे. खासगी बोलण्यात काँग्रेसजनही ते मान्य करतात. लोकसभा व विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला आलेल्या अपयशाची सर्वात मोठी जबाबदारी राजीव गांधींचीच आहे. त्यांनी त्याआधी पाच वर्षांत देशाला व पक्षाला ज्या तऱ्हेचे नेतृत्व दिले त्याबाबत लोकांच्या मनात असलेल्या शंका निवडणुकीत निर्विवादपणे व्यक्त झालेल्या आहेत. उत्तरेत काँग्रेसला मिळालेले अपयश राजीव गांधींचे आहे, आणि दक्षिणेत मिळालेले यशही त्यांचे स्वतःचे नाही हे स्पष्ट दिसत असतानाही काँग्रेसमधील राजीव गांधींचे व्यक्तिमाहात्म्य टिकून आहे. किमान सत्ता गेल्यानंतर तरी पक्षातील मतभिन्नतेला वाव मिळेल, इतर पक्षनेत्यांना निर्भयपणे आपले वेगळे मत मांडण्याचे स्वातंत्र्य उपभोगता येईल ही अपेक्षाही सफल झालेली दिसत नाही. काँग्रेस महासमितीच्या अधिवेशनात यशपाल कपूर यांनी थोडा वेगळा सूर लावताच त्यांची रेवडी उडविण्यात आली हे उदाहरण देऊन वर व्यक्त केलेल्या मतप्रवाहाचे समर्थन करणे योग्य होणार नाही. कारण काँग्रेसबाहेरच्या लोकांच्या दृष्टीने यशपाल कपूर म्हणजे कोण ? नेहरू घराण्याच्या ताटाखालचे मांजर.

एकेकाळी या कपूर यांचे महत्त्व किती अफाट होते !इंदिरा गांधींचे ते निकटचे सहकारी आणि त्यांच्या वतीने सर्व आर्थिक व्यवहारही तेच करीत. त्यांना किंवा

माजी केंद्रीय गृहमंत्री बुटासिंग यांना त्यांचे योग्य स्थान कोणीतरी दाखवायलाच हवे होते. परंतु यशपाल कपूर काय किंवा त्यांचा फोरम काय, राजीव गांधींना आव्हान देऊन उभे राहिले तरी काँग्रेसजन किंवा सर्वसाधारण लोक त्यांच्या मागे जातील एवढी त्यांची पात्रता नाही. ज्यांचे नेतृत्व लोक गंभीरपणे घेतील अशा एकाही महत्त्वाच्या नेत्याने महासमितीच्या अधिवेशनात पक्षाच्या सद्यःस्थितीवर, देशातील विद्यमान राजकारणावर, सरकारच्या धोरणांवर वस्तुनिष्ठपणे मतप्रदर्शन केलेले नाही. राजीव गांधी यांच्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांची नावे आठवतात ? नरसिंहराव, के.के.तिवारी, वसंत साठे, शंकरराव चव्हाण, पी. शिवशंकर, दिनेशसिंग, माधवसिंह सोळंकी, माधवराव शिंदे, वेंगलराव, के.सी. पंत, नटवरसिंग, प्रियरंजन दास मुन्शी वगैरे वगैरे.पक्षाचे लोकसभा निवडणुकीतील अपयश किंवा पक्षांतर्गत निवडणुका याविषयांवर तर राहोच परंतु राजकीय, आर्थिक किंवा परराष्ट्र धोरणावरील ठरावावर यापैकी किती लोकांनी आपली मते व्यक्त केली ? महासमितीच्या अनेक ठरावांचा मसुदा व त्यावरील भाषणे प्रचारकी स्वरूपाची वाटतात. त्याला मावळंकर सभागृहात उपस्थित असलेल्या काँग्रेसजनांनी दाद दिली असली तरी त्या ठरावातील फोलपणा लोकांच्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. पंजाब आणि काश्मीरचा प्रश्न असो की आर्थिक धोरणाचा, या प्रश्नांनी जे विशिष्ट रूप धारण केले आहे त्यात विद्यमान सरकार एवढेच, किंबहुना काही प्रमाणात जास्तच, काँग्रेस सरकार आणि त्यातही राजीव गांधींच्या नेतृत्वाखालील सरकारही जबाबदार आहे. त्याची जाणीव त्यावरील ठरावात किंवा भाषणात दिसत नाही. गांधींच्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांनी पुढे येऊन यासंबंधी स्पष्ट मतप्रदर्शन करायला हवे होते. तसे झालेले नाही. पर्यायी पक्ष म्हणून सत्तेवर येण्याची अपेक्षा बाळगणाऱ्या पक्षाकडून यापेक्षा गंभीर चर्चा अपेक्षित होती. सध्याच्या सरकारच्या तुलनेत देशापुढील प्रश्नांकडे पाहण्याचे आपले धोरण कोणत्या बाबतीत वेगळे आहे त्याचे दिग्दर्शनही व्हायला हवे होते. यापैकी काहीच झाले नसल्याने देशापुढील समस्यांबाबत काँग्रेसला खरोखरच चिंता आहे की केवळ राष्ट्रीय मोर्चाच्या सरकारवर दोषारोप करून आपला भोंगळपणा झाकण्याचा हा प्रयत्न आहे असे लोकांना वाटल्याशिवाय राहणार नाही.

सत्तेवर असताना राजीव गांधींची जी कार्यशैली होती त्यात फरक पडलेला नाही आणि त्यात फरक पाडण्याचे सामर्थ्य त्यांच्या सहकाऱ्यांत नाही. त्यांच्याशी संघर्ष करण्याची तयारी या लोकांत नाही किंवा आपले स्थान सुरक्षित राहावे या वैयक्तिक कारणासाठी ते अलिप्त तरी राहू इच्छित असावेत. लोकांमध्ये उभे राहण्यासाठी पक्षाचे तत्त्वज्ञान, कार्यक्रम आणि कार्यकर्त्यांचे बळ हा पर्याय

स्वीकारण्याऐवजी, एका व्यक्तीला मोठे करून तिच्या आधारानेच सत्ता मिळविण्याचा मार्ग काँग्रेसजनांना सुखकारक वाटतो असे दिसते. आणि त्यासाठी तरी राजीव गांधीं यांच्याशिवाय दुसरा नेता पक्षात दिसत नाही. त्याच्या सर्व कमतरता लक्षात घेऊनही राजीव गांधी यांनाच पुढे करण्याचे पक्षाचे धोरण या अगतिकतेतून साकार झाले आहे. त्याची बीजे इंदिरा गांधींनी पेरली. आपल्यापेक्षा संघटनेत व सरकारमध्ये वरचढ कोणी असता कामा नये हा त्यांच्या सत्तासामर्थ्याचा गाभा होता. त्याचे फळ म्हणजेच सध्याची काँग्रेस. काय करायचे तो नेता करील. आपण फक्त त्याच्याभोवती पिंगा घालायचे काम करायचे. "तुमच्यापैकी एका तरी व्यक्तीने दौरा करून लोकांशी संपर्क साधला आहे काय ?" असे खुद्द राजीव गांधींनीच महासमितीच्या सभासदांना विचारले. त्यावर एकही हात वर झाला नाही. यावरून काँग्रेसची मदार परत एकदा आपल्या नेत्यावर आहे हे उघड आहे. "व्यक्तिमाहात्म्य" ही पक्ष चालविण्याची एकाधिकारशाहीवादी शैली आहे.त्याच शैलीने काँग्रेसचा कारभार सुरू आहे. पक्षांतर्गत निवडणुका घेण्याचा कार्यक्रम जाहीर झाला असला तरी प्रत्येक गोष्टीस राजीव गांधी अपवाद राहणार आहेत. काँग्रेसचे विकेंद्रित लोकशाहीकरण होत नाही, संघटना, तत्वज्ञान व कार्यक्रम महत्त्वाचे ठरत नाहीत तोपर्यंत एकाच व्यक्तीच्या लहरीने कारभार चालू राहणार. राजीव गांधी बदललेले नाहीत याचे कारण त्यांनी बदलावे अशी गरज पक्षाला वाटत नाही. सत्तेवर असो-नसो, काँग्रेसचे स्वरूप असेच राहणार असेल तर राजीव गांधींना काँग्रेसमध्ये पर्याय नाही हेच खरे.

काँग्रेस फुटीच्या किंवा राजकीय फेरमांडणीच्या ज्या वदंता अधूनमधून पसरतात त्यांचाही या संदर्भात विचार करायला हवा. सत्ता गेल्यानंतरही काँग्रेसची कार्यशैली गेल्या सात महिन्यांत बदललेली नाही. एका समर्थ नेत्याभोवती गोळा होणे ते पसंत करतात. सत्तांतरानंतर काँग्रेसमध्ये फूट पडली नाही त्याचे हे कारण. १९६९ मध्ये फूट पडली त्या वेळी दोन्ही बाजूस खंदे पुढारी होते. या वेळी ती स्थिती नाही. त्यामुळे काँग्रेसचा फुटून निघालेला एक घटक जनता दलाशी किंवा राष्ट्रीय मोर्चाशी सहकार्याला तयार होण्याची शक्यता नाही.जनता दलातील एका गटाने फुटून फुटू इच्छिणाऱ्या काँग्रेसवाल्यांचे नेतृत्व करायचे ही दुसरी शक्यता. चंद्रशेखर यांच्या नावाचा या संदर्भात अनेकदा उल्लेख झालेला आहे. परंतु अशा फुटाफुटीने सत्ता काबीज करता येणे शक्य असेल तरच काँग्रेसवाले असा धोका पत्करतील. देवीलाल, चंद्रशेखर किंवा इतर कोणीही जनता दलातून बाहर पडले तरी सरकार बनविण्याइतपत मोठा पाठिंबा त्याना मिळण्याची शक्यता नसल्याने काँग्रेसच्या फुटीची शक्यता नाही. जनता दलातील एका गटाने फुटून काँग्रेसला पाठिंबा द्यायचा

ठरविला तर राजीव गांधींचे नेतृत्व हा त्यातील अडसर असल्याने तीही शक्यता नाही. विश्वनाथप्रताप सिंग यांचे नेतृत्व यशस्वी होत आहे आणि ते आपल्याला सत्तेच्या जवळ नेऊ शकेल असे वाटले तर काँग्रेसजन मोठ्या प्रमाणावर जनता दलात येऊ शकतात. परंतु तसे झाले तर भाजप त्या सरकारला आपला पाठिंबा चालू ठेवील अशी शक्यता नाही. फुटणारा गट किमान शंभर खासदारांचा असेल तरच भाजपच्या पाठिंब्याची गरज लागणार नाही. परंतु एवढा मोठा गट काँग्रेसमधून बाहेर पडणे म्हणजे काँग्रेस व जनता दल यांचे विलीनीकरण झाल्यासारखे होईल. त्याला खुद्द जनता दलातही विरोध होईल. कारण त्यामुळे सध्याच्या अनेक पुढाऱ्यांचे महत्त्व कमी होईल. काँग्रेस, जनता दल, काँग्रेस (एस) अशा पक्षांचे ऐक्य झाले तर भाजप व डाव्या पक्षांना मिळणारे सध्याचे महत्त्व नष्ट होणार असल्याने काँग्रेसच्या मदतीशिवायच सध्याचे सरकार चालू ठेवण्यांत त्यांचे हितसंबंध अडकले आहेत. राजकीय ध्रुवीकरणास त्यामुळे त्यांचाही विरोध असणार. सध्याची व्यवस्था चालू राहिली तरच राष्ट्रीय आघाडीच्या दोन्ही समर्थक पक्षांचे सामर्थ्य आणि महत्त्व टिकून राहणार आहे. त्यामुळे 'जैसे थे' स्थितीतच त्यांना स्वारस्य आहे. चौताला प्रकरणाने जनता दलात निर्माण झालेल्या अस्थिरतेने या दोन्ही पक्षांना काळजी वाटली, आणि सरकार टिकावे यासाठी त्यांनी निर्णायकपणे पंतप्रधान विश्वनाथप्रताप सिंग यांना पाठिंबा दिला त्यामागे सध्याचा सत्तासमतोल बिघडू नये हे महत्त्वाचे कारण होते. स्वबळावर सत्तेवर येण्याचे स्वप्न डावे पक्ष नजीकच्या भविष्यकाळात पाहू शकत नाहीत. भाजपची मात्र ती आकांक्षा आहे. १९९५ हे त्याच्या दृष्टीने त्यासाठी निर्णायक वर्ष आहे. भौगोलिक आणि सामाजिक दृष्ट्या आपला पाया विस्तारित करण्याचे त्यांचे प्रयत्न पद्धतशीरपणे सुरू आहेत. शहरी भाग आणि व्यापारी समाज या त्यांच्या परंपरागत मतदारसंघातून ग्रामीण भाग आणि मागासवर्गीयांत पसरण्याचे त्यांचे धोरण आहे. पदवीधर मतदारसंघाच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत महाराष्ट्रातही भाजपला मिळालेले यश लक्षणीय आहे. त्या तुलनेत सत्तेवर असूनही सर्वात कमकुवत स्थिती आहे, ती जनता दलाची. त्यांना एकाच वेळी भाजप व डाव्या या मित्रपक्षांबरोबर मैत्रीपूर्ण लढत आणि मध्यममार्गी पक्ष म्हणून काँग्रेसबरोबर सामना करावा लागतो आहे. स्वतःच्या सामर्थ्याची खात्री नसल्याने स्वप्रतिमा म्हणून ते काँग्रेसकडे पाहतात आणि म्हणूनच काँग्रेस नष्ट होऊ नये असे त्यांना मनोमन वाटते. या देशाची सत्ता मध्यममार्गी, लोकशाहीवादी व सेक्युलर पक्षाकडे असावी ही त्यांची धारणा असेल, तर स्वतःच काँग्रेस बनणे किंवा काँग्रेसचे वेगळे अस्तित्व टिकविणे हे त्यांचे इप्सित असेल. म्हणून व्ही.पी. सिंग यांचा विरोध काँग्रेसला नसून राजीव गांधींना आहे.

काँग्रेस बदत नाही हा मात्र त्यांचा आक्षेप आहे. कारण काँग्रेस बदलत नाही म्हणूनच राजीव गांधींना पक्षात पर्याय उभा राहू शकत नाही. अनेक अर्थांनी बदललेली काँग्रेस हाच राजकीय फेरमांडणीचा सर्वांत सुसंगत पर्याय आहे.

•

प्रकरण ३२

# मंडल आयोग आणि शौरींचे तर्कट

पिटातील लोकांनी टाळ्या पिटून दाद द्यावी अशा शिताफीने अरुण शौरी यांनी मंडल आयोगाच्या अहवालाची खिल्ली उडविली आहे. थोड्या चढत्या श्रेणीतील परंतु लोकभाषेतील यथार्थ शब्दप्रयोग वापरायचा तर 'शौरींनी मंडलला उभा-आडवा फाडून खाल्ला आहे.' मंडल आयोगाचा अहवाल न वाचताच त्यावर चर्चा आणि दंगलीही सुरू आहेत. अभ्यासू केंद्रीय मंत्री आणि विज्ञानाचे नामवंत प्राध्यापक, खुद्द मधु दंडवते यांनीदेखील म्हणे (इति, शौरी) मंडल अहवाल अद्याप वाचलेला नाही. त्यामुळे मंडल आयोगाचा अहवाल अथपासून इतिपर्यंत वाचण्याचे परिश्रम घेऊन नंतर त्याची आपल्याला हवी तशी शल्यविशारदी चिरफाड केल्यावर 'पब्लिक' खूष होणारच. परंतु हे पब्लिक आहे 'रिझर्व्हड्' खुर्च्यांवर बसलेले इंग्रजी वाचक. मंडल आयोगाने ५२ टक्के लोकांसाठी २७ टक्के जागा राखून ठेवणे जरी शौरी यांना मान्य नसले तरी साडेतीन टक्के लोकांसाठी इंग्रजीचे रिझर्व्हेशन त्यांना मान्य आहे. अशा राखीव इंग्रजी मतदारसंघातच शौरींनी तुफान फटकेबाजी केली असल्यामुळे त्यांना अपेक्षित असलेल्या लोकांचा अनुकूल प्रतिसाद मिळणारच. शौरी असे कसे लिहितात आणि बोलतात असे आश्चर्य अलीकडे काही जण व्यक्त करतात. पण शौरींनी आपला 'हा' मतदारसंघ निश्चित केल्याने त्यात नवलाई नाही. भारतीय राजकारणाच्या अलीकडच्या गावरानपणाला देवीलाल यांना जबाबदार धरून त्यांनी त्यांचे अर्जुनीय 'लक्ष्य' केले आणि सैद्धांतिक पद्धतीने ते कसे छान पटवून दिले! उपपंतप्रधान असलेल्या आणि लोकांमध्ये वजन असलेल्या हरयानवी लालाची जिथे खैर नाही तिथे, आता हयातही नसलेल्या, बिंदेश्वरीप्रसाद मंडल यांची काय तमा! त्यांचा अहवाल म्हणजे निव्वळ 'मूर्खपणा' अशी शौरीकृत संभावना होणे त्यामुळे अपेक्षितच होते. केवळ मंडल आयोगाच्या अहवालाची टिंगल करूनच शौरी थांबले असे नव्हे. मंडल आयोग ज्यांच्यासाठी

आहे, त्या इतर मागासवर्गीयांच्या वाट्यालाही शौरींच्या लेखमालेत भरपूर हेटाळणी आली आहे.

अशा तऱ्हेच्या राखीव जागांमुळे संपूर्ण व्यवस्थाच कोलमडून पडेल असे अत्यंत टोकाचे तर्कट त्यांनी लढविले आहे. 'राखीव जागा म्हणजे गुणवत्तेचा अभाव' इतके सोपे समीकरण त्यांनी मांडले आहे. शौरी यांनी लढविलेल्या तर्काप्रमाणे जायचे तर राखीव जागा कशा भरल्या जातील ? उदा. विद्यापीठात प्राध्यापकाची जागा भरायची आहे. त्यासाठी किमान पात्रता निश्चित केलेली असते. ती समजा 'एम.ए., पीएच.डी.' अशी आहे. त्या पात्रतेचा मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध असेल तर त्याला ती जागा प्राधान्याने मिळणार. तशा पात्रतेचा उमेदवार नसेल तर जागा रिकामी राहील. योग्य मागासवर्गीय उमेदवार मिळेपर्यंत अल्पकाळासाठी जागा भरली जाईल, किंवा रिकामीही राहील. शौरींच्या तर्कशास्त्राप्रमाणे मात्र ती जागा निरक्षर मागासवर्गीयालाही, केवळ त्याने अर्ज केला आहे म्हणून मिळू शकते. अशा अतिरंजित निष्कर्षांची अनेक काल्पनिक उदाहरणे देऊन शौरी यांनी भीतीचा मोठा बागुलबुवा उभा केला आहे. मेडिकल किंवा इंजीनिअरिंग कॉलेजमध्ये सध्या अनुसूचित जातींसाठी असलेल्या राखीव जागा मिळण्यासाठी ५०, ६० किंवा ७० टक्के गुणही पुरेसे होत नाहीत हे यादीवरून सहज नजर टाकली तरीही दिसते. मात्र दोन लाख रुपये देणगी देण्याचे सामर्थ्य असलेल्या पालकाच्या मुलाला ५० टक्के गुणही पुरेसे होतात. बढतीच्या बाबतीतही तेच तत्त्व लागू आहे. शिपायाला, तो केवळ मागास जातीतील आहे म्हणून, संचालकाचे प्रमोशन मिळणार आहे असा गोड व सोयीस्कर गैरसमज शौरींनी करून घेतला आहे. जातीवर आधारित राखीव जागा असाव्यात की नाहीत हा वादाचा मुद्दा जरूर होऊ शकतो. राखीव जागांमुळे काही सामाजिक फायदे होणार आहेत, तसे अनेकांचे वैयक्तिक नुकसानही त्यात गृहित धरले आहे. गेली हजारो वर्षे उच्चवर्णीयांसाठी अनेक क्षेत्रांतील राखीव जागा जात म्हणून या समाजात चालू असल्याने त्याची सामाजिक किंमत चुकविल्याशिवाय वेगाने पुन्हा सामाजिक संतुलन साधणे केवळ अशक्य आहे, ते कसे साध्य करायचे आणि त्याचा वेग काय ठेवायचा हा धोरणात्मक प्रश्न आहे. त्यावरही मतभेद संभवतात. किंबहुना ते आहेतच. परंतु राखीव जागांमुळे या देशात अनागोंदी माजणार आहे असे भासविणारे शौरी यांचे प्रतिपादन तर्कसंगत मात्र नाही.

मंडल आयोगाच्या शिफारशींचा विचार करताना भारतीय परिस्थितीचे सम्यक भान ठेवले नाही तर शौरींनी केली तशी घणाघाती टीका त्यावर करता येईल. परंतु मंडल आयोग अहवाल म्हणजे एखादी ललित साहित्यकृती नव्हे, जी स्वयंभू

आणि स्वायत्त आहे. त्याची समीक्षा करताना सामाजिक वास्तवाचा विचार अपरिहार्य आहे. शौरींच्या पहिल्या लेखाचे शीर्षक आहे "Sub-standard, by definition" सर्व मागास जातींना हे विशेषण यथार्थपणे लागू पडते. परंतु त्यांना 'सब-स्टँडर्ड' केले कोणी ? त्याची व्याख्या कोणी केली ? की ते स्वत:च स्वत:ला 'सब-स्टँडर्ड' म्हणवून घेतात ? त्यांची आजची ही शौरीकृत व्याख्या खरी असली तरी ती येथील उच्चवर्णीय 'देशप्रेमी' लोकांनी आपल्या फायद्यासाठी केली होती, आणि तिचा अंमल स्वातंत्र्यानंतरच्या चाळीस वर्षांतील नसून त्या आधीच्या दोनचार हजार वर्षे चालू होता. या जाणूनबुजून केलेल्या विषम सामाजिक व्यवस्थेचे उत्तरदायित्व स्वीकारून त्यासाठी किंमत देण्याची तयारी समाज म्हणून आपण घ्यावी असे शौरींसारख्या लोकांना का वाटत नाही ?

त्यांच्या दुसऱ्या लेखाचे शीर्षक आहे."The stench of casteism" जातीयवादाच्या निर्मात्यांनीच खालच्या स्तरातील लोकांना जातीयवादी असे विशेषण लावणे सुसंस्कृतपणाचे नाही. सवलती देण्यासाठी आज 'जात' या निकषाचा आधार घ्यावा लागतो याचे कारण जातीयवाद्यांनी इथे शौरींना हवे असलेले वर्ग तयार होऊच दिले नाहीत हे सर्वांत महत्त्वाचे कारण आहे.येथील समाजाची आर्थिक निकषांवर वर्गवारी होऊ शकत नाही याला ऐतिहासिक कारणे आहेत. त्याचा दोष एकट्या मंडल आयोगावर टाकून शौरींसारख्या लोकांना दोषमुक्त होता येत नाही. काकासाहेब कालेलकर यांच्या अहवालाचा, विशेषत: त्यांनी अहवाल सादर करताना जोडलेल्या पत्राचा दाखला देऊन जातीय आधारावर राखीव जागा नकोत असे अनेकजण म्हणतात. परंतु कालेलकरांनाही येथील समाजाचे मागास जातीऐवजी मागासवर्गाप्रमाणे वर्गीकरण करता आलेले नाही हेही सत्य आहे.

घटनेत 'जातीचा' उल्लेख नाही, वर्गाचा आहे असे पालुपद वारंवार ऐकायला येते. घटनेत अनेक आदर्शवादी कल्पना आहेत. देशाचे स्वप्न रंगविणारा तो अभूतपूर्व ग्रंथ आहे. परंतु घटनेत जातीऐवजी वर्ग असा शब्द आल्याने येथील सामाजिक वास्तव एका रात्रीत बदलले असा होत नाही. न्यायालयांनी राखीव जागांच्या प्रकरणात दिलेले निर्णय हे घटनेशी सुसंगत आहेत. त्यांचा सोयीस्कर आधार घेऊन येथील सामाजिक व आर्थिक विषमतेचे हुशारीने समर्थन करण्याने भारतीय घटनेबद्दल आदर व्यक्त होत नाही. आपल्याला सोयीस्कर तेव्हा भारतीय घटनेचा आधार घ्यायचा, गैरसोयीचे असेल तेव्हा मात्र बदलत्या जागतिक संदर्भांची, एकविसाव्या शतकाची भाषा करायची!

राखीव जागांना विरोध करताना जातीला नको, वर्गांना सवलती द्या असे

म्हणायचे. आता वर्गाचा विचार करू. या देशातील ८० टक्के संपत्ती, साधनसामग्री, सत्ता १० टक्के लोकांच्या हातात आहे. उरलेल्या ९० टक्के लोकांचा विचार कसा होतो ? जवळजवळ सर्व मोठ्या शहरातील ५० टक्के लोक झोपडपट्टीत राहतात. झोपडपट्टीत राहणारा, आर्थिकदृष्ट्या दुर्बल असा हा वर्ग आहे. त्याचे वर्गीकरण सोपे आहे. त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी, त्यांना रोजगार उपलब्ध करण्यासाठी आपण काय केले ? पहिल्यांदा झोपडपट्टी 'निर्मूलन' अशी घोषणा तरी होती, नंतर 'निर्मूलना'ऐवजी 'सुधारणा' आली. किती झोपडपट्ट्या सुधारल्या ? झोपडपट्ट्या तयारच होऊ नयेत, लोकांना स्वत:चे घर, कुटुंबीय, गाव सोडावे लागू नये म्हणून कोणते आर्थिक कार्यक्रम यशस्वीपणे राबविले गेले ? झोपडपट्टीतील लोकांचे सोडा, किती मध्यमवर्गीयांना स्वत:चे दोन खोल्यांचे घर घेणे परवडते ?

शेतकरी हा एक 'वर्ग' म्हणून निश्चित करता येतो. या वर्गाचा आवाज थोडा बुलंद करताच चरणसिंग वा देवीलालसारख्या राजकारण्यांविरुद्ध शौरींसारख्या अभिजनवादी लोकांनी कशा प्रचारमोहिमा उघडल्या ?

कामगार हा एक वर्ग म्हणून निश्चित करता येतो. मुंबईतील गिरणी कामगारांचा रोजगार कसा हिसकावून घेतला गेला ? हातमाग चालवणाऱ्या विणकरांवर संकटे का आली ? भिवंडी, मालेगाव, इचलकरंजी देशोधडीला का लागली ?

'प्रवासी' हा एक वर्ग होतो. ज्यांना परवडेल त्यांनी स्वत:ची वाहने वापरावीत, ज्यांना ते शक्य नाही त्यांच्यासाठी असलेली सार्वजनिक वाहतूक व्यवस्था संपूर्ण कोलमडेल असे धोरण कोणी आखले ?

राखीव जागा ठरविताना आर्थिक निकष हवा असा घोष करणाऱ्यांनी आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्यांचे शोषण करणारीच अर्थव्यवस्था का बळकट होत आहे याचे स्पष्टीकरण करायला हवे. तेल ३५ रुपये, साखर १० रुपये, रॉकेल मिळत नाही, गॅस संपला आहे, शाळेत देणगीशिवाय प्रवेश नाही, (मंडल आयोगाने जागा गेलेल्या नसतानाही) नोकऱ्या नाहीत, वगैरे वगैरे. म्हणजे आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेला वर्ग निश्चित करता येत असूनही त्यांच्यासाठी काही होत नाही. दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. आर्थिक निकष लावायचा तर शंभर टक्के जागा राखून ठेवाव्या लागतील आणि एवढे करूनही अन्य मागासवर्गीयातील अत्तार, बदक, बाजीगर, बंडी, भडभुंजा,भोई, देपळाल ढोली, गढवी, गंगानी, घिसाडी, हरणी, झाडी,कचोरा, कांडेल, कोंगाडी, मैरल, मुंडा, नेकार,फुडगी, टाकणकर, टकारी, वैती, येनडीवड वगैरे अठरापगड जातीतील लोकांना नोकऱ्या मिळणार नाहीत ते नाहीतच. अर्थात

अशा तऱ्हेच्या तीन- साडेतीन हजार जातींचे लोक म्हणजे काही शौरींना अभिप्रेत असलेला देश नव्हे. त्यांचा देश वेगळा, तेथील लोक वेगळे. शौरींना काळजी लागली आहे ती 'त्या' देशाच्या भल्याची.

आर्थिक व सामाजिकदृष्ट्या प्रचंड विषमता असलेल्या देशातील मुखंडांचा केवळ एक विशिष्ट वर्ग डोळ्यासमोर ठेवून सर्व व्यवस्था भक्कम करण्याचे तत्त्वज्ञान सांगणे लोकशाहीशी आणि राष्ट्रवादाशीही विसंगत आहे. मंडल आयोगाने राखीव जागा ठेवल्याने अन्य मागासवर्गीयांचा प्रचंड फायदा होणार आहे असे नव्हे. एकतर शासकीय नोकऱ्यांची संख्या किती ? केंद्र सरकारच्या नोकऱ्या एकूण नोकऱ्यात केवळ एक टक्का आहेत. त्यात सर्व राज्य सरकारे आणि सार्वजनिक संस्थांच्या नोकऱ्या मिळविल्या तरी उपलब्ध नोकऱ्यांतील शासकीय व निमशासकीय नोकऱ्यांची टक्केवारी १०टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही. ती वाढवून २० टक्के केली आणि त्यातील ५० टक्के म्हणजे एकूण नोकऱ्यांपैकी फक्त १० टक्के नोकऱ्या राखीव होतील. अनुसूचित जाती, जमाती, अन्य मागासवर्गीय वगैरेंची एकूण संख्या ७५ टक्के आहे. देशातील ७५ टक्के लोकसंख्येसाठी १० टक्के राखीव नोकऱ्या ठेवल्याने आकाश कोसळणार नाही. शिवाय खुल्या अर्थ व उद्योगव्यवस्थेकडे झुकणारे सरकारचे धोरण यापुढेही असेच चालू राहीले तर यापुढे नोकऱ्या निर्माण होण्याचे क्षेत्र हे मुख्यत्वे खासगी क्षेत्रच असणार आहे. मग त्या बहुराष्ट्रीय कंपन्या असोत की पंचतारांकित हॉटेले. या अर्थव्यवस्थेमुळे एक नवश्रीमंत वर्ग तयार होतो आहे. इतर उत्पादक क्षेत्रातील नोकऱ्यांपेक्षा त्यांना सेवा उपलब्ध करून देणाऱ्या नोकऱ्यांचे प्रमाणच यापुढे वाढत जाणार आहे. तेही खासगी क्षेत्रात. तेथेही जातीवर आधारित राखीव जागा असणार नाहीत. त्यामुळे एवढ्या अल्प असलेल्या राखीव जागांसाठी मोठा आरडाओरडा कशासाठी ? आपले वर्चस्व टिकविण्यासाठी ! जात कोणालाच नको आहे. जातीव्यवस्था संपविण्यासाठी प्रामाणिकपणे लढाई करण्याची गरजच आहे. परंतु सामाजिक न्याय नाकारण्यासाठी खोट्या वर्गवादाची ढाल पुढे करणाऱ्यांच्या हातून जातीयवाद संपणार नाही.

पंतप्रधान व्ही.पी. सिंग यांनी मंडल आयोगाचे बाटलीतील भूत म्हणे बाहेर काढले आहे. आमच्या राजकीय पक्षांचा विरोध मंडल आयोगाच्या शिफारशींना नसून त्याचे श्रेय व्ही.पी. सिंग यांना मिळणार आहे याला आहे ! सिंग आपला मतदारसंघ तयार करीत आहेत. बँकांचे राष्ट्रीयीकरण करून, संस्थानिकांचे तनखे रद्द करून किंवा गरीबी हटावची घोषणा करून इंदिरा गांधीनी तेच केले आणि राजीव गांधींनी नाही का उदार आर्थिक व औद्योगिक धोरण स्वीकारून आपला मतदारसंघ तयार करण्याचा प्रयत्न केला ? बाजारात चैनीच्या वस्तूंची रेलचेल

असो की रंगीत दूरदर्शन, एका विशिष्ट वर्गाला आपलेसे करण्याचेच धोरण त्यामागे होते. तो वर्ग राजीव गांधींच्या दुर्दैवाने मतांच्या दृष्टीने निर्णायक ठरला नाही. मंडल आयोगाच्या शिफारशी स्वीकारून सिंग यांनी एकाच वेळी देवीलाल, चंद्रशेखर, अरुण नेहरू, भाजप व राजीव गांधींची काँग्रेस अशा सर्वांना शह दिला आहे. मंडल आयोगाला विरोध हा राजकीय विरोधही आहे हेही आपण समजून घेतले पाहिजे. महाराष्ट्रात वातावरण शांत आहे कारण येथे आधीच ३४ टक्के जागा राखीव आहेत. (इतर मागासवर्गीयांसाठी १० टक्के) आणि तरीही महाराष्ट्राचे प्रशासन अद्याप, शौरींनी कल्पना केल्याप्रमाणे, कोलमडले नाही. तमिळनाडू, कर्नाटक येथे तर राखीव जागांचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. तेथील प्रशासनही उत्तर प्रदेश, बिहारपेक्षा शंभर पटीने कार्यक्षम आहे. मंडल आयोगावरून चालू असलेल्या दंगली उत्तर भारतातच केंद्रित झालेल्या आहेत आणि केंद्रातील सत्ताबदलाची लढाईही याच प्रदेशात होणार आहे.

●

निबंध

प्रकरण ३३

# स्थितिवादी राजकरणाला धक्का

मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयावर झालेल्या टीकेची पंतप्रधान विश्वनाथप्रताप सिंग यांनी काही प्रमाणात दखल घेतलेली दिसते. यासंबंधीचा प्रशासकीय आदेश अद्याप निघायचा आहे. त्यात विविध पक्ष आणि व्यक्तींनी केलेल्या रास्त सूचनांची दखल घेता येणे शक्य आहे.

मंडल आयोगाच्या शिफारशी जशाच्या तशा स्वीकारण्यात येतील, त्या पातळ करण्यात येणार नाहीत, हा सरकारचा सुरुवातीचा अभिनिवेष कमी झालेला दिसतो. त्याची दोन कारणे. एकतर त्याविरुद्ध काही राज्यात सुरू झालेल्या आंदोलनाने घेतलेले हिंसक वळण. राखीव जागांविषयीचे धोरण सहजासहजी स्वीकारले जाईल, अशी अपेक्षा नव्हती. या निर्णयाने प्रस्थापितांच्या हितसंबंधांना आणि राजकीय वर्चस्वाला धक्का पोहोचणार असल्याने त्या गोटातून तीव्र प्रतिक्रिया उमटणारच. पूर्वीही अशीच हिंसक आंदोलने झाली. गुजरात हे त्याचे जवळचे उदाहरण. सामाजिक संरचनेत पायाभूत बदल घडवून आणायचे असतील तर त्याची किंमत चुकवावी लागणार. अलीकडच्या काळात अशा तऱ्हेचे क्रांतिकारक निर्णय घेण्याची राजकीय इच्छाशक्ती लुप्तच झालेली दिसते. सगळ्यांना खूष ठेवण्याच्या तडजोडवादी प्रवृत्तीमुळे अनेक क्षेत्रात स्थितिवादी धोरणांचा पाठपुरावा झालेला दिसतो. त्यात कधी मुस्लिम महिलांच्या मानवी वा नागरी स्वातंत्र्याचा बळी जातो. कधी सुधारणावादी बोहरांना बहिष्कृत जीवन जगावे लागते. कधी सतीच्या चालीचे पुनरुज्जीवन होते. तर कधी समान नागरी कायद्याच्या संकल्पनेची चर्चाही होऊ शकत नाही. मंडल आयोगाच्या शिफारशींबाबतही हेच झाले.

हा अहवाल १९८० मध्ये सरकारला सादर करण्यात आला. केंद्रातील काँग्रेस सरकारला तो मान्य नव्हता तर किमान तो स्पष्टपणे फेटाळून लावण्याचे धाडस त्यांनी दाखवायला हवे होते. राखीव जागांसाठी जात हा निकष मान्य नाही, आर्थिक

निकष हवेत असे आज राजीव गांधी म्हणतात. आर्थिक निकषांवर राखीव जागा ठेवण्याचा निर्णय घेण्यासाठी त्यांना तब्बल पाच वर्षांचा अवधी होता. त्यासाठी आणखी एक आयोग नेमून त्यांच्या शिफारशी स्वीकारण्याठी हा पुरेसा कालावधी नाही असे कोण म्हणेल ? राजीव गांधींना संसदेत प्रचंड बहुमत होते. त्यांना कोणताही निर्णय घेता आला असता. परंतु काही करायचेच नसले म्हणजे जाती आणि वर्गाचे द्वंद्व सोयीस्करपणे पुढे करून वेळकाढूपणा करता येतो.'सेक्युलर स्टेट 'मध्ये जाती हव्यात कशाला, हे म्हणणे सयुक्तिक आहे. पण मग धर्म तरी कशाला हवेत ? शहाबानू प्रकरणात पारंपारिक विचाराचा मुस्लिम समाज आपल्याविरुद्ध जाईल, अशी भीती वाटताच अरिफ मोहंमद खानसारख्या आपल्या जवळच्या सहकाऱ्याचा बळी देऊन त्यांनी धर्मवाद्यांपुढे आपली मान कशाला तुकविली ? या देशाची धर्माच्या पायावर फाळणी करण्याचे तत्त्वज्ञान ज्यांनी विकसित केले त्या मुस्लिम लीगसारख्या जात्यंध पक्षाबरोबर केरळमध्ये राजकीय आघाडी कशाला केली ? बाबरी मशीद-रामजन्मभूमी वादात बोटचेपे धोरण का स्वीकारले ? आर्थिक व औद्योगिक आधुनिकीकरणाचा पुरस्कार करायचा, मग सामाजिक आधुनिकीकरणाला का नकार द्यायचा ? ब्रिटिशांच्या भारतातील वसाहतवादी धोरणाचा विकास झाल्यानंतर त्यांनी येथील सुधारणावादी, सामाजिक आणि धार्मिक प्रश्नांपासून स्वत:ला अलिप्त ठेवले. त्यापेक्षा हे धोरण वेगळे कसे ? गोरेसाहेब जाऊन काळे साहेब आले, राज्य साहेबीच राहिले, हाच येथील स्वातंत्र्याचा अर्थ आहे काय ? इंग्रजी भाषेचा वाढता प्रभाव असो की चैनीच्या वस्तूंची रेलचेल, पंचतारांकित हॉटेले असोत की विना अनुदान महाविद्यालये, स्वातंत्र्याची फळे देशातील एक मर्यादित वर्गच लुटत आहे. त्याविरुद्ध उभे राहण्याचे राजकीय धाडस कोणी दाखवले नाही.

संस्थानिकांचे तनखे, बँकाचे राष्ट्रीयीकरण हे केवळ प्रतिकात्मक निर्णय होते. परंतु त्यांनीही इंदिरा गांधींना प्रचंड लोकप्रियता मिळवून दिली. येथील समाजाच्या आकाक्षांचे ते प्रतीक होते. व्ही. पी सिंग यांनी राखीव जागांचा घेतलेला निर्णयही प्रतिकात्मक राजकीय निर्णय आहे. त्यातून निर्माण होणाऱ्या नोकऱ्यांची संख्या बेरोजगारांच्या प्रचंड संख्येपुढे नगण्य आहे. राखीव जागा हा आर्थिक निर्णय नव्हे. तो मूलत: सामाजिक आहे. म्हणूनच त्यावरील प्रतिक्रिया अधिक तीव्र आहे. वास्तविक राखीव जागांपेक्षा महागाईचा भस्मासूर लोकांना अधिक जाणवायला हवा. नवे सरकार महागाईला किती जबाबदार हा प्रश्न बाजूला ठेवला तरी गेल्या सहा महिन्यांतील महागाईचे लक्ष्य ते होऊ शकतात. परंतु महागाई स्वीकारण्याची लोकांची मानसिक तयारी झाली आहे. राखीव जागा स्वीकारण्याची नाही. पोटाला

चिमटा घेतला तर चालतो, पाठीला नाही. म्हणून आंदोलकांच्या पाठीवरून हात फिरविण्यासाठी व्ही. पी. सिंग एक पायरी खाली उतरले आहेत.

आंदोलकांचा जोर कमी होईल असे सांगण्यासारखे पंतप्रधान सिंग यांच्याकडे काय आहे ? मंडल आयोगाच्या शिफारशी शैक्षणिक संस्थातील प्रवेशासाठी लागू होणार नाहीत. राखीव जागा फक्त प्रवेशापुरत्याच मर्यादित आहेत, बढतीला त्या लागू नाहीत. मंडल आयोगाच्या शिफारशी राज्य सरकारांवर बंधनकारक नाहीत, त्या फक्त केंद्र सरकार आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगव्यवसाय या पुरत्याच मर्यादित राहतील. मंडल आयोगाच्या अहवालात ज्या इतर मागासवर्गीयांचा समावेश आहे त्या जातींचा समावेश राज्यांच्या यादीतही असेल तरच त्यांना राखीव जागांचा फायदा मिळेल. संरक्षण दलांच्या भरतीसाठीही राखीव जागांचे तत्त्व लागू होणार नाही. अणुशक्ती मंडळासारख्या काही संस्थांचाही अपवाद केला जाण्याची शक्यता आहे. सरकारने स्वीकारलेल्या शिफारशींचे परिक्षेत्र असे मर्यादित आहे हे लक्षात घेतले तर त्याविरुद्ध उघडलेल्या प्रचार मोहिमेचा आक्रस्ताळेपणा लक्षात येईल.

मंडळ आयोगाच्या शिफारशी स्वीकारणार असे जनता पक्षाच्या १९८० पासून प्रत्येक निवडणूक जाहीरनाम्यात आश्वासन दिलेले असतानाही प्रत्यक्ष तो निर्णय अंमलात आणण्याची घोषणा करताना त्यात पुरेसा स्पष्टपणा नव्हता ही मात्र आश्चर्याची गोष्ट आहे. मंडल आयोगाची नेमणूक १९७७ मध्ये अधिकारावर आल्यानंतर जनता पक्षाने केली आणि त्याची अंमलबजावणी करावी यासाठी केंद सरकारकडे सातत्याने आग्रह धरला. आता नव्याने जनता दलाचे सरकार अधिकारावर आल्यानंतरही मंडल आयोगाची अंमलबजावणी विनाविलंब करण्यात येईल असे वारंवार सांगितले गेले. परंतु त्यासंबंधात लोकमत जागृत करण्याचे काम मात्र केले नाही. जनता दलाच्या किंबहुना सर्वच पक्षांच्या मर्यादा वारंवार स्पष्ट होताना दिसतात. नोकरशाही किंवा समाजातील प्रभावशाली गट या ढिसाळपणाचा आपल्या फायद्यासाठी वापर न करतील तरच नवल. बहुतेक सत्तारूढ पक्ष सरकारी छायेखाली वावरत असतात. पक्ष म्हणून त्यांचे स्वतंत्र अस्तित्व अभावानेच दिसते. मग तो शताब्दी साजरा केलेला काँग्रेस पक्ष असो की एखाददोन वर्षाचा जनता दल असो !

मंडल आयोगावरील निर्णयासंबंधी इतर पक्षांच्या मतांची, उशिरा का होईना, व्ही.पी. सिंग यांना दखल घ्यावी लागते आहे त्याचे कारण त्यांनी हा निर्णय ज्या पद्धतीने घेतला त्यावर झालेली टीका. पंजाब असो, काश्मीर असो की रामजन्मभूमी, सर्व पक्षांच्या भूमिकेत किमान एकवाक्यता निर्माण व्हावी ही

पंतप्रधानांची शैली होती. संघर्षाचे राजकारण संपून समन्वयाच्या राजकारणाचे नवे पर्व सुरू करण्याचे अभिवचन अधिकारग्रहणानंतर त्यांनी दिले होते. अल्पमतवाल्या पक्षांच्या आघाडीचे, विरुद्ध टोकाच्या राजकीय तत्वज्ञानाशी बांधिलकी असलेल्या पक्षांच्या पाठिंब्याने चाललेले सरकार ही वस्तुस्थिती लक्षात ठेवून व राष्ट्रीय प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सर्वांचे सहकार्य असावे म्हणून या 'कान्सेन्सस' राजकीय शैलीचा व्ही.पी.सिंग यांनी अवलंब केला. विशेषत: पंजाब, काश्मीर, रामजन्मभूमी अशासारख्या स्फोटक व नाजूक प्रश्नांवर त्यांना कोणताही धोका नको होता. परंतु मंडल आयोगाच्या शिफारशी स्वीकारण्याच्या वेळी मात्र त्यांना या मतैक्याचा विसर पडला. तो सोयीस्करही असावा. कारण व्ही.पी. सिंग यांचा हा निर्णय राजकीय होता आणि त्याचे सर्व श्रेयही त्यांना स्वत:लाच हवे होते.

पक्षाला बाजूस सारून सर्व लोकांशी थेट संवाद साधण्याचे व त्यांच्यात व्यक्तिगत निष्ठा रुजविण्याचे प्रयत्न इंदिरा गांधींनी केले. व्ही.पी. सिंग पंतप्रधान असले तरी जनता दलातील त्यांचे सत्तास्थान भक्कम नाही. पक्षातील गटोपगटांवर त्यांना विसंबून राहावे लागते आणि आपली बाजू बळकट करण्यासाठी एका गटाच्या विरुद्ध दुसऱ्याला उभे करण्यात बरीच शक्तीही खर्च करावी लागते. ही स्थिती टाळण्यासाठी स्वत:चा 'मास बेस' तयार करण्याची आकांक्षा त्यांनी बाळगणे स्वाभाविक आहे. अन्य मागासवर्ग हा त्यातील एक महत्त्वाचा घटक आहे. जाट मागे आहेत म्हणून देवीलाल प्रभावी आहेत. देवीलाल यांच्यापेक्षाही अधिक व्यापक पाया अन्य मागासवर्गीयांचे नेतृत्व करून मिळविता येऊ शकतो. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीची घोषणा करून सिंग यांना नेमके हेच साधायचे होते. त्यासाठी हा निर्णय इतर कोणाचा नसून केवळ आपल्या एकट्याचा आहे अशी प्रतिमा निर्माण करायची होती. परंतु त्याविरुद्ध हिंसक आंदोलदन सुरू झाल्यानंतर व पाठिंबा देणाऱ्या पक्षांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर सर्वपक्षीय बैठक घेण्याचे त्यांनी मान्य केले. देवीलाल यांच्या विरुद्धच्या पक्षांतर्गत झगड्यातही भाजप आणि कम्युनिस्टांची मदत आणि सल्लामसलत घ्यायची, आणि मंडल आयोगासारख्या राष्ट्रीय प्रश्नाबाबत मात्र नाही ही विसंगती फार तीव्रपणे पुढे आल्यानंतर सर्वपक्षीय बैठक घेणे आवश्यकच झाले.

'धोरण मान्य, शैली मात्र अमान्य' अशी अनेकांची प्रतिक्रिया होती. प्रसारभारतीसारख्या विधेयकावरही पाचसहा महिने चर्चा होते, मग मंडल आयोगावर का नाही असा प्रश्न स्वाभाविकपणे विचारला जातो. त्याची होय, नाही, अशी दोन्ही उत्तरे संभवतात. तडकाफडकी घेतले तरच काही निर्णय घेता येतात हे खरे आहे. मंडल आयोगाबाबत तर विशेषच खरे आहे. कारण त्याबाबत सर्वांचे मतैक्य

ही फारच दूरची शक्यता होती.

मंडल आयोगावर जी चर्चा सुरू आहे, त्यात तीन भूमिका स्पष्ट दिसतात. एका गटाचा कोणत्याही प्रकारच्या राखीव जागांनाच विरोध आहे. दुसरी भूमिका मंडल आयोगाला शंभर टक्के पाठिंबा देणारी आहे. अहवालाची अंशत: अंमलबजावणी करण्याऐवजी पूर्णपणे करावी असा त्यांचा आग्रह आहे. तिसरी भूमिका आहे राखीव जागा चालतील, पण निकष मात्र आर्थिक हवेत ही. जो सात कलमी राजीव फार्म्युला पुढे आला आहे त्यात 'आर्थिक दृष्ट्या संपन्न व सामाजिक दृष्ट्या प्रतिष्ठित' अशा मागासवर्गीयांना सवलतीतून वगळावे अशा सूचना आल्या आहेत. प्राप्तीकरदात्यांची मुले, अधिकाऱ्यांची मुले, न्यायमूर्तींची मुले, फी देउन पब्लिक स्कूलमध्ये शिकणारी मुले वगैरेंना या सवलती मिळू नयेत अशा सूचना आहेत. सर्व मागास जातीही सारख्याच मागासलेल्या नाहीत, त्यातील खऱ्या मागासांना फायदे मिळावेत अशा तऱ्हेने मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करावी अशी सदिच्छाही विविध तऱ्हेने व्यक्त हेते. या सूचना अमलात आल्या तर मागास जातींना केवळ जात म्हणून सरसकट नोकऱ्यांतील संधी उपलब्ध होण्याऐवजी मागासजातीमधील गरीब व्यक्तींपुरती ही सवलत मर्यादित होईल. अर्थात त्याचा प्रतिवादही करता येतो. तो म्हणजे या सवलतींकडे मागास जातींना दिलेल्या आर्थिक सवलती म्हणून पाहू नका. शासकीय कारभारात, धोरण ठरविणाऱ्या यंत्रणेत मागासांना जाणीवपूर्वक सामावून घेण्याचा प्रयत्न म्हणून त्याकडे पाहा. आर्थिक बाजूपेक्षा त्याचे सामाजिक अंग जास्त महत्त्वाचे आहे, असेही म्हणता येईल. पानपट्टीचा ठेला चालवून महिन्याला पाच हजार रुपये मिळविणारा मागासवर्गीय व्यावसायिक आणि महिन्याला फक्त दोन हजार रुपयेच मिळविणारा मागासवर्गीय मामलेदार यात जो फरक आहे तेच आर्थिक आणि सामाजिक फायद्यातील तर-तम आहे. एक व्यक्तिगत निरीक्षण येथे मुद्दाम नोंदवावे असे वाटते. दहा-बारा वर्षांपूर्वी केरळमध्ये सलग महिनाभर माझे वास्तव्य होते. 'वेस्ट एशिया बूम' असे वर्णन केले जाते तो हा काळ. आशियातील तेलवाल्या अरबी राष्ट्रांत रोजगारासाठी गेलेले मल्याळी केरळमध्ये अक्षरश: खोऱ्याने डॉलर्स पाठवीत होते. काही मल्याळी अमेरिकेतही होते. अर्थात उच्च पदावर. त्यांना काही एवढे डॉलर भारतात आणता येत नव्हते. डॉलर्सचा भाव सारखाच असला, तरी अमेरिकेतून येणाऱ्या डॉलरची सामाजिक किंमत मात्र जास्त होती. म्हणून आर्थिक फायदे हे सर्वस्व नव्हे हे सामाजिक सत्य लक्षात ठेवूनच राखीव जागांकडे पाहिले पाहिजे.

राखीव जागा असोत की सवलती, त्यांचा उपयोग विशिष्ट प्रमाणात आणि विशिष्ट कालमर्यादेसाठीच होऊ शकतो. हे प्रमाण आणि कालमर्यादा मात्र

व्यावहारिक आणि ज्याला फायदा घ्यायचा आहे त्याला न्याय्य वाटावी अशीच हवी. उद्योजकांपासून शेतकऱ्यांपर्यंत आणि रेल्वे भाड्यापासून पाणीदरापर्यंत सर्वत्र अशा विशेष सोयी, सवलती मिळतात. टाटा-बिर्लांपासून सर्व उद्योजकांनी त्या घेतल्या आहेत. परदेशी भांडवलदारांशी जीवघेणी स्पर्धा करावी लागू नये यासाठी देशी उद्योजकांना संरक्षण दिले म्हणूनच आज ते उभे दिसतात. खेड्यापाड्यात पाण्यासाठी, इंधनासाठी लोक वणवण फिरतात. शहरात नळाचे पाणी घरपोच मिळते ते कितीतरी सबसिडाईज्ड असते. शेतकऱ्यांच्या उसासाठी पाणी मिळते त्यालाही सबसिडी आहे आणि कापसाला किमान दर मिळतो तेही शासकीय संरक्षण आहे. एका क्षेत्रातील 'राखीव' गोष्टी चालतात, चेहरा बदलून त्याच इतरांना दिल्या की आपल्यावर अन्याय झाला असे वाटते.

•

३४ | प्रतिबिंब ९०

# राम ‘ राजा ’चा बळी घेणार काय ?

रथयात्रा , रामजन्मभूमी - बाबरी मशिद वाद किंवा मंडल आयोगाच्या अहवालाची अंमलबजावणी यांसारखे वादग्रस्त प्रश्न तात्पुरते बाजूला पडून राजधानी दिल्लीतील महत्त्वाकांक्षी राजकारण व्यक्तिकेंद्रित सत्तास्पर्धेच्या धोकादायक भोवऱ्यात फिरू लागले आहे. जनता दल टिकणार की फुटणार आणि त्यातून १९७९ ची पुनरावृत्ती होणार काय हा प्रश्न पोटात घेऊन व्ही.पी. सिंग यांच्याऐवजी जनता दलाने दुसरा नेता निवडला तर देशातील सर्वांत मोठा काँग्रेस (आय) हा पक्ष नव्या सरकारला पाठिंबा द्यायला तयार आहे. भाजपनेही तीच भूमिका घेतली आहे. डाव्या पक्षांनी सिंग यांच्या पारड्यात उघडपणे आपले सर्व वजन टाकले आहे आणि खुद्द जनता दलातही सिंग यांचे पाठिराखे आणि विरोधक अशी विभागणी झाली आहे. जनता दलही नको आणि सिंगही नकोत अशी दुपेडी भूमिका अद्याप कोणी घेतली नाही याचे कारण मध्यावधी निवडणुका इतक्या लवकर कोणालाच नको आहेत.

काँग्रेसला त्या नको आहेत याचे कारण निर्विवाद बहुमत मिळण्याची खात्री त्यांना नाही. निवडणुका ज्या सैद्धांतिक प्रश्नावर लढवायच्या त्याची सर्व पाने सिंग यांनी आधीच हस्तगत केली आहेत. सेक्युलॅरिझम विरुद्ध फंडामेंटॅलिझम, मागासलेले विरुद्ध पुढारलेले यांसारख्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांवर ठाम भूमिका घेतल्याशिवाय निवडणुकीच्या रिंगणात उतरता येणार नाही, अशी चोख व्यवस्था सिंग यांनी करून ठेवली आहे. याबाबत काँग्रेसने घेतलेल्या संदिग्ध भूमिकेमुळे त्यांची स्थिती अडचणीची होणार आहे. म्हणून अशा कळीच्या राजकीय प्रश्नांना सामोरे जाण्याऐवजी विरोधी पक्षातील अंतर्गत कलहामुळे ते देशाला राजकीय स्थैर्य देऊ शकत नाहीत, म्हणून काँग्रेस हाच एकमेव पर्याय आहे असे चित्र निर्माण होण्याची काँग्रेस नेते वाट पाहात आहेत. सिंग यांच्याऐवजी काही काळ जनता दलातील दुसऱ्या नेत्याला पाठिंबा देण्याची व कालांतराने त्याचाही पाठिंबा काढून

घेऊन निवडणुकांची स्वत:ला योग्य वेळ निवडण्याची संधी मिळावी यासाठीच काँग्रेसचे डावपेच सुरू आहेत. रामजन्मभूमी किंवा मंडल आयोगाबाबत घेतलेल्या भूमिकेमुळे राजीव गांधींविषयी त्यांच्याच पक्षात असंतोष आहे. या असंतोषाला वाट मिळावी यासाठीही आणखी काही काळ जाऊ द्यावा असे राजीव गांधींना वाटत असणार. म्हणून एकाच दगडात दोन पक्षी मारण्याचे त्यांचे उद्दिष्ट दिसते. सिंग सरकार पडले तर जनता दलातील अंतर्गत विसंवाद आपोआपच लोकांपुढे येतो आणि त्यांच्याच नव्या सरकारला बाहेरून पाठिंबा देऊन, कोणतीही जबाबदारी न घेता, निवडणुकांची नेमकी वेळ ठरविण्याचा हुकमाचा पत्ताही मिळविता येतो. शिवाय सत्तारूढ पक्षातील अंतर्गत संघर्षाचा परिणाम म्हणून राजीव गांधींचे काँग्रेस पक्षातील स्थानही आपोआपच बळकट होते.

खुद्द जनता दलातील असंतुष्टांनाही आत्ताच निवडणुका नको आहेत. आज निवडणुका घ्यायच्या झाल्या तर त्या व्ही.पी. सिंग यांच्या नेतृत्वाखाली लढविण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. त्यामुळे सिंग यांची ताकद आणखी वाढणार. ती वाढायला नको असेल तर पक्षनेतृत्वातील बदल निवडणुकीपूर्वीच व्हायला हवा. म्हणून नवे सरकार टिको अगर पडो, ते आपल्याच नेतृत्वाखाली हवे असे चंद्रशेखरादी मंडळींना वाटते.शिवाय ही त्यांची शेवटचीच संधी. निवडणुकीनंतर पुन्हा जनता दलाचेच सरकार अधिकारावर येईल अशी शक्यता नाही आणि समजा येणारच असेल, परंतु आत्ताच नेतृत्वबदल झाला नाही; तर नंतर व्ही.पी. सिंग यांच्याशिवाय पर्यायच राहणार नाही. पंतप्रधान होण्याची शेवटची संधी याच दृष्टीतून चंद्रशेखर यांच्या हालचाली सुरू आहेत. राजकीय अस्थिरता नको, मध्यावधी निवडणुका नकोत, ही कारणे पुढे करून, पर्यायी नेता निवडल्यास काँग्रेस किंवा भाजपचा पाठिंबा मिळत असल्यास तो घ्यायला हरकत काय आहे; सिंग यांच्या नेतृत्वाचाच आग्रह धरून त्यासाठी मध्यावधी निवडणुकांची किंमत चुकविण्याचे कारण नाही अशी भूमिका चंद्रशेखरादी समर्थकांकडून मांडली जाते त्यामागे हीही कारणे आहेत.

निवडणुका व्हाव्यात असे भाजपला वाटते. रामजन्मभूमी प्रश्नावर त्यांनी जी रणधुमाळी माजविली ती निवडणुकांच्या पूर्वतयारीचा आवश्यक भाग म्हणूनच. त्याचा फायदा त्यांना ताबडतोब घ्यायचा आहे. व्ही.पी. सिंग यांनाही निवडणुका हव्या आहेत. कारण मंडल आयोग, रामजन्मभूमी या प्रश्नावर त्यांनी घेतलेल्या निर्णयांमुळे त्यांच्या बाजूला झुकलेल्या लोकमताचा फायदा घेऊन आपली स्वत:ची व जनता दलाची ताकद वाढविण्यासाठी हीच वेळ योग्य आहे असे त्यांनाही वाटते. एका बाजूला डाव्या आणि दुसऱ्या बाजूला उजव्या पक्षांच्या सहकार्याने

सत्तेवर आलेले सरकार फार काळ टिकणार नाही हा कयास बांधून सत्तेवर येताच मध्यावधी निवडणुकांची तयारी त्यांनी सुरू केली असणार. काँग्रेसने गेल्या दहाअकरा महिन्यांत दाखविलेली निष्क्रियता आणि रामजन्मभूमी प्रश्नावर भाजपला अलग पाडण्यात मिळालेले यश लक्षात घेऊन मध्यावधी निवडणुकांचा डाव टाकला तर जनता दलाला निर्विवाद बहुमत मिळाले नाही तरी फक्त डाव्यांशी सहकार्य करून सरकार स्थापन करता येईल, असा त्यांचा आराखडा असणार. म्हणून एकतर आपल्या नेतृत्वाखालील सरकारच अधिकारावर राहावे,आणि ते शक्य नसेल तर मुदतपूर्व निवडणुकांना पक्षाने स्वतःच्या नेतृत्वाखाली सामोरे जावे, असे त्यांना वाटते.

गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये झालेल्या निवडणुकीत कोणत्याही पक्षाला निर्विवाद कौल न मिळाल्याने निर्माण झालेल्या राजकीय अस्थैर्याचा परिणाम म्हणून सत्तास्पर्धेच्या या खेळाला वाजवीपेक्षा अधिक गती मिळाली. सत्ता टिकविण्याचा किंवा नव्याने हस्तगत करण्याचा विचार सर्व घटनांचा केंद्र झाला. त्याचा प्रभाव व्यक्तींच्या वर्तनावर आणि पक्षांच्या धोरणांवरही पडलेला दिसतो. सत्तारूढ जनता दल हा पक्षच मुळी विसंगतींनी परिपूर्ण असलेला. पक्षात निःसंदिग्धपणे ज्याचे नेतृत्व प्रस्थापित झालेले नाही अशा विश्वनाथप्रताप सिंग यांची नेतेपदी निवड झाल्यामुळे सत्ता राबविण्यासाठी पक्षाकडून ताकद मिळण्याऐवजी, पंतप्रधानपदाची ताकद वापरून त्यांना स्वतःचे स्थान बळकट करण्याची पाळी आली. सत्तेवर राहण्यासाठी तसे करणे त्यांना आवश्यकच होते. पक्षाच्या प्रभावाचा फायदा नाही, उलट त्याचा कमकुवतपणा ही मर्यादा वारंवार जाणवू लागली. चौताला प्रकरणात पक्षांतर्गत पेचप्रसंगावर मात करण्यासाठी त्यांना पंतप्रधान म्हणून असलेल्या अधिकारांचा उपयोग करावा लागला आणि सरकारला सहकार्य देणाऱ्या मित्रपक्षांचा हस्तक्षेप घडवून आणावा लागला. राजीनाम्याची राजकीय नाटके करावी लागली. मंडल आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीचे धोरण, ज्यात किमान राष्ट्रीय आघाडीतील इतर पक्ष, सहकार्य देणारे मित्रपक्ष आणि मंत्रिमंडळातील सर्व सहकारी यांचे मतैक्य आवश्यक होते, तो निर्णय राजकीय कारणांसाठी स्वतःचा वैयक्तिक निर्णय म्हणून पुढे आणावा लागला.

रामजन्मभूमीप्रकरणी त्यांनी जे कणखर धोरण अवलंबिले ते वास्तविक घटनेशी आणि देशाच्या प्रकृतीशी शंभर टक्के जुळणारे. किमान या प्रश्नावर तरी संपूर्ण जनता दलाने त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहायला हवे. परंतु चित्र उलटेच दिसते आहे. व्ही.पी. सिंग त्यामुळे आणखी समर्थ होतात; म्हणून याच प्रश्नावर त्यांचा राजीनामा मागण्याची, नेतृत्वबदलाची मागणी पक्षात धारदार होते. भाजप आणि

त्यांचे हिंदुत्वनिष्ठ राजकारण सोकावले तरी चालेल, परंतु व्ही.पी. सिंग प्रबळ होता कामा नयेत, हाच जनता दलाच्या धुरिणांचा ध्यास असेल तर या सरकारला परमेश्वरही वाचवू शकणार नाही.

सत्ताकारणाने व्यक्ती प्रभावित होतात, तसे पक्षही. रामजन्मभूमीबाबत भाजपची भूमिका तशीच आहे. वास्तविक हा प्रश्न सामंजस्याने सुटणे अशक्य नाही. जगातील आठवे आश्चर्य ठरेल अशा तऱ्हेने मंदिर आणि मशीद यांचे साहचर्य राखून तेथे नवी वास्तू उभारता येते. इतिहासाची पुनरावृत्ती नाही तरी नवा इतिहास निर्माण करणारी ती घटना ठरेल. परंतु धार्मिक तेढ निर्माण करणे भाजपच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा भागच असेल तर रामजन्मभूमीचा प्रश्न सुटणार नाही आणि एक प्रश्न सुटला तरी दुसरा निर्माण होत राहील. कारण प्रश्न सोडविणे हे अंतिम उद्दिष्ट नसून त्यातून मिळणारा राजकीय लाभ हे लक्ष्य आहे. म्हणूनच मंडल आयोगामुळे देशाचे तथाकथित जातीय विभाजन भाजपला चालत नाही, धार्मिक तत्त्वावरील विभाजन मात्र हवे असते. हे अंतर्विरोध येतात राजकारणामुळे. कमकुवत परंतु सत्तेवर येण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या सर्वच पक्षांच्या बाबतीत हे कधी ना कधी अनिवार्य ठरते. भारतीय राजकारण अशा व्याधीग्रस्त पक्षांच्या हातात बराच काळ सापडले असल्याने देश कठीण पेचप्रसंगातून जात आहे. व्ही.पी. सिंग यांच्याऐवजी उद्या चंद्रशेखर यांच्या नेतृत्वाखालील सरकार अधिकारावर आले काय, किंवा सर्वांत मोठा पक्ष म्हणून काँग्रेसला पुन्हा सत्ता मिळाली काय, सध्याच्या राजकारणात गुणात्मक बदल होण्याची सुतराम शक्यता नाही. भाजपचा पाठिंबा पुन्हा जनता दलाला मिळणे काय, किंवा काँग्रेसने सहकार्य करणे काय, या केवळ तात्कालिक तडजोडी आहेत. पुन्हा निवडणुका झाल्या तरी कोणत्याही एका पक्षाला निर्विवाद बहुमत मिळण्याची शक्यता नाही. नावं बदलून तेच खेळ पुन्हा सुरू राहणार.

व्यक्तींभोवती फिरणाऱ्या या विकेंद्रित राजकारणाऐवजी राजकीय तत्वज्ञानाभोवती पक्ष संघटित होण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू झाल्याशिवाय राजकीय स्थैर्य लाभणार नाही. सेक्युलर, लोकशाहीवादी, प्रागतिक विचारांची, मध्यममार्गी राजकीय विचारधारा आणि त्यावर आधारित पक्ष बळकट होणे ही देशाच्या स्थैर्यासाठी आवश्यक गोष्ट आहे. एकापेक्षा अनेक मध्यममार्गी पक्षांना भारतीय राजकारणात दीर्घ पल्ल्याचे भवितव्य नाही. आज भाजपने केवळ व्ही.पी. सिंग या एका व्यक्तीला आव्हान दिले नाही. भारतीय समाज-पुरुषाच्या मूलभूत उदारमतवादी वैशिष्ट्यांनाच ते आव्हान आहे. केवळ ८० खासदारांच्या जोरावर संपूर्ण राष्ट्रावर ते आपले वैचारिक प्रभुत्व गाजविण्याची आकांक्षा धरतात याचे कारण देशाच्या भंगलेल्या राजकीय चित्रात आहे. ते कसे सांधायचे याचा विचार

जनता दलाने, कॉंग्रेसने, डाव्या पक्षांनी, सर्वांनीच करायचा आहे. व्ही.पी. सिंग किंवा राजीव गांधी यांची पदे या दुय्यम गोष्टी आहेत. अडवानींच्या रथयात्रेने एवढे शहाणपण येथील पक्षांना येईल काय?

●

३५   १० ऑक्टोबर

# अरे भाई, मस्जिद है ही कहाँ ?

इंडियन एक्सप्रेसचे संपादक अरूण शौरी यांना दुसऱ्यांदा एक्स्प्रेस सोडावा लागला. 'अरे भाई, मस्जिद है ही कहाँ ?' या त्यांच्या शेवटी अप्रकाशितच राहिलेल्या लेखाने त्यांचा घात केला. 'बेजबाबदार संपादकीय लिखाण' अशी या लेखाची संभावना करून एक्स्प्रेसच्या व्यवस्थापनाने त्यांची हकालपट्टी केली. अरुण शौरी पत्रकारिता करीत नसून, राजकारण करत आहेत, असा आक्षेप त्यांच्यावर पूर्वीही अनेकदा घेण्यात आला होता. गेल्या वर्षभरात ते भाजप, विश्व हिंदू परिषद आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या अतिनिकट गेल्याचे दिसत होते. केंद्र सरकार, व्ही. पी. सिंग, चंद्रशेखर आणि देवीलाल यांच्यावर सातत्याने या काळात त्यांनी विषारी हल्ले चढविले. राजीव गांधी अधिकारावर असतानाही त्यांच्या पत्रकारितेची हीच शैली होती. परंतु त्या वेळी विरोधी आघाडीचे पुरस्कर्ते, पर्यायी सरकार बनविण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून चाललेली मोहीम या आवरणाखाली त्यातील विखार नजरेआड झाला. निवडक आणि सोईचेच तेवढे मुद्दे विचारात घेऊन मंडल आयोगाच्या अहवालाची एकांगी चिरफाड त्यांनी केली. 'सत्य आणि संपूर्ण सत्याशिवाय दुसरे काही नाही' हे पत्रकारितेचे ब्रीद पाळणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे हे खरे असले, तरी शौरी मात्र निवडक सत्याचाच आक्रमक पुरस्कार करीत लिहीत राहिले. रामजन्मभूमी-बाबरी मशीद वादाबाबत त्यांचा हा अप्रकाशित लेख पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांच्यावर विश्वासघाताचा आरोप करणारा होता. त्यात खरेच सत्य असते, तर गाळात रुतलेल्या पंतप्रधानांना वाचविण्याचे एक्स्प्रेसच्या मालकांना काहीच कारण नव्हते. आधीच जखमी झालेल्याला शेवटचा टोला हाणण्याची आयती संधी म्हणून त्याकडे पाहता आले असते. तसे झाले नाही. हा लेख छापण्याचा आग्रह शौरींनी धरला नसता तर व्यवस्थापनाने तडजोडीची तयारीही दाखविली होती. परंतु शौरींची त्याला मान्यता नसावी. शौरींना काढले यासाठी व्यवस्थापनावर दडपण आणण्याइतके सध्याचे

सरकार स्थिर आणि प्रबळ नाही. अशा तऱ्हेच्या दबावांना जुमानण्याइतके गोएंकाही कमकुवत नाहीत. संपादकीय स्वातंत्र्याचा सरकार संकोच करीत आहे असा आक्षेप घेता येईल, असेही काही घडल्याचे ऐकिवात नाही. याचा अर्थ शौरींच्या जाण्याला त्यांचा शोध लेख एवढेच तात्कालिक कारण दिसते.

पंतप्रधानांना उघडे पाडणारा आणि भाजप व विश्व हिंदू परिषद यांच्याशी त्यांनी केलेल्या गुप्त कराराचे बिंग फोडणारा असे शौरींच्या लेखाचे वर्णन करण्यात येते. शौरींच्या लेखाचे शीर्षक आहे, 'अरे भाई, मस्जिद है ही कहाँ ?' मशिदीचे अस्तित्वच पंतप्रधानांना मान्य नाही, असा स्पष्ट अर्थ त्यातून सूचित होतो आणि वाचकांवर त्याचाच प्रभाव पडावा, असाच लेखाचा रोख आहे. ही मशिद पाडण्यास आणि त्या जागी राम मंदिर बांधण्यास पंतप्रधानांची संमती आहे, तसा गुप्त करारही त्यांनी भाजप, विश्व हिंदू परिषदेशी केला, समझोत्यात ठरल्याप्रमाणे राष्ट्रपतींनी सध्याच्या वादग्रस्त वास्तू आणि आसपासची जागा ताब्यात घेण्याचा वटहुकूमही काढला, तो तीन कलमी मसुदा तयार करण्यात स्वत: पंतप्रधानच सहभागी होते, त्यापासूनच ते पळ काढीत आहेत, असे शौरी यांच्या लेखातील ढोबळ प्रतिपादन आहे. शौरी यांच्या लेखातील प्रतिपादनाचा कालक्रमानुसार विचार करून पंतप्रधानांवर यात किती आणि कसा दोष येतो, ते आता पाहू.

अरे भाई, मस्जिद है कहाँ, वो तो राम लल्लाका मंदिर है' हे व अशा स्वरूपाचे जे उद्गार विश्वनाथप्रताप सिंग यांनी काढले ते गेल्या वर्षी निवडणुका जाहीर होण्यापूर्वी रा.स्व. संघाच्या नेत्यांशी झालेल्या चर्चेच्या वेळी. शौरी यांनी आपल्या लेखात त्याचा स्पष्ट हवाला दिला आहे. पंतप्रधान म्हणून अधिकारावर आल्यानंतर व्ही.पी. सिंग यांनी अशा प्रकारचे विचार जाहीरपणे सोडाच; खाजगीतही काढल्याचा एकही पुरावा शौरी यांनी आपल्या लेखात दिला नाही. याचा अर्थ स्वत: निवडून येण्यापूर्वी, पक्ष सरकार स्थापन करील आणि आपणच पंतप्रधान होऊ, याची सुतराम कल्पना नसताना सिंग यांनी एक व्यक्ती म्हणून काढलेले उद्गार म्हणजे विद्यमान सरकारचे धोरण आहे, असे गृहीत धरण्यात शौरी चूक करीत आहेत. त्या वेळी सिंग यांनी केलेल्या वैयक्तिक विधानांची जबाबदारी पंतप्रधान म्हणून त्यांच्यावर टाकता येणार नाही. समजा एक व्यक्ती म्हणून सिंग यांना बाबरी मशीद हे राम मंदिर आहे असे वाटत असेल आणि ती वास्तू पाडून तेथे नवे राम मंदिर उभारावे अशी मनोमन इच्छा असेल, त्याला येणाऱ्या खर्चासाठी आपली सर्व जायदाद विकायला ते तयार असतील तरी ती त्यांची वैयक्तिक बाब म्हणावी लागेल. पंतप्रधान म्हणून एखादा निर्णय घेताना त्यांना आपल्या वैयक्तिक इच्छा-आकांक्षांचा विचार करता येणार नाही. रामजन्मभूमीचा प्रश्न सरकारपुढे

येतो तेव्हा सरकारने त्यावर निर्णय द्यायचा आहे, तो सामूहिक असणार आहे, त्याला मंत्रिमंडळाची, सत्तारूढ पक्षाची आणि आवश्यकता असेल तर संसदेचीही मान्यता लागेल. एक 'व्यक्ती' म्हणून सिंग यांना काय वाटते, त्याला येथे काहीही महत्त्व नाही. शौरींनी मात्र सिंग यांचे निवडणुकीच्याही आधीचे उद्‌गार आणि आता पंतप्रधान म्हणून पुढे आणलेला तीन कलमी तोडगा यांचा सांधा असा बेमालूम जोडला आहे, की वाचणाऱ्याला वाटावे, सिंग कसे एका रात्रीत बदलले! अर्थात सिंग यांनी खरोखरच असे उद्‌गार त्या वेळी काढले होते, हे शौरी सांगतात म्हणूनच मान्य करायचे. मुंबईतील त्या तथाकथित बैठकीला स्वत: शौरी मात्र हजर नव्हते. ते इतरांचा हवाला देऊनच सिंग त्या वेळी काय म्हणाले, ते सांगतात. सिंग यांनी मात्र त्याचा स्पष्ट इन्कार केला आहे आणि खरे-खोटे पडताळून पाहायचेच असेल, तर शौरी यांनी ज्यांचा हवाला दिला आहे, त्यांनाच विचारा, असेही म्हटले आहे!

ज्या तीन कलमी समझोत्याचा उल्लेख शौरी करतात त्याचे स्वरूप काय होते? शौरींनीच त्यांच्या लेखात दिल्याप्रमाणे त्याचे स्वरूप असे: (१) या तोडग्यानुसार रामजन्मभूमीवरील वास्तू व त्याच्या आसपासची सर्व जमीन सरकारने ताब्यात घ्यायची. रामजन्मभूमीवरील वास्तूचा नामनिर्देश 'ए' असा करून त्याच्या आसपासच्या जमिनीचे 'बी' व 'सी' असे वर्गीकरण करण्यात यावे. (२) 'ए' या वास्तूचे स्वरूप ठरविण्याचे काम सर्वोच्च न्यायालयाकडे सोपविण्यात येणार होते. सर्वोच्च न्यायालयाने त्याबाबत निर्णय देईपर्यंत विश्व हिंदू परिषदेने राममंदिर उभारणीची चळवळ जरी चालू ठेवली तरी त्या वास्तूला हात लावायचा नाही, असे ठरले होते. (३) 'बी' व 'सी' अशा वर्गीकरण केलेल्या जमिनीवर एक मंदिर, एक धर्मशाळा, एक कार्यालय अशा काही वास्तू होत्या. सरकारने त्या तशाच सांभाळाव्यात आणि जमीन विश्व हिंदू परिषदेला देऊन शिलान्यासाच्या जागेपासून, ३० ऑक्टोबरपासून मंदिर उभारणीला सुरुवात करायची.

१५ ऑक्टोबर व १८ ऑक्टोबर या काळात झालेल्या वाटाघाटींमध्ये हे ठरले. त्यासाठी पंतप्रधानांनी भाजप, रा.स्व. संघ, विश्व हिंदू परिषद, मुस्लिम समाजाचे नेते, मंत्रिमंडळातील सहकारी, विविध पक्षांचे नेते, मुख्यमंत्री, राज्यपाल आदींशी सविस्तर चर्चाही केली होती. 'विश्व हिंदू परिषद तोडगा स्वीकारील; परंतु मशिदीच्या स्थलांतराची चळवळ जारी ठेवण्याच्या आपल्या अधिकारावर पाणी सोडणार नाही,' असे रा.स्व. संघाचे ज्येष्ठ नेते मोरोपंत पिंगळे यांनी या विविध चर्चांत स्पष्ट केले. मात्र आता लगेचच रामजन्मभूमीवरील वास्तूला धक्का न लावण्याचेही त्यांनी मान्य केले.

प्रत्यक्षात अध्यादेश निघाला, त्यात विश्व हिंदू परिषदेला द्यावयाच्या जमिनीचा उल्लेख मात्र नव्हता. तडजोडीचा हा मसुदा तयार केला तरी त्यात संबंधित पक्षांना एकत्र सहभागी करून घेतलेले नव्हते. रामजन्मभूमी-बाबरी मशीद यांच्या वास्तू सोडून असलेली जागा सोडण्यास मुस्लिम तयार नव्हते. त्यांच्या संमतीशिवाय अशा तऱ्हेचा तोडगा लादण्याने प्रश्न सुटण्याऐवजी आणखीनच गुंतागुंतीचा होणार होता. हे लक्षात आल्यानंतर सरकारने आपल्या अध्यादेशात बदल केला आणि सध्याच्या मंदिर, मशिदीच्या इमारती व भोवतीची जागाही वादग्रस्त ठरवून तिथे 'जैसे थे' स्थिती ठेवण्याचे ठरविले. विश्व हिंदू परिषदेला जी जागा हवी होती, ती यामुळे मिळत नव्हती. त्यामुळे दोन्ही बाजूंनी या अध्यादेशावर टीका झाली. तो चालू ठेवण्यात त्यामुळे काहीच स्वारस्य नव्हते.

ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर वाद मिटविण्यासाठी सरकारने प्रयत्न केले, परंतु समझोता घडवून आणण्यात त्यांना यश आले नाही, एवढेच म्हणता येईल. हिंदू आणि मुस्लिम, दोघांनीही हा भावनिक प्रश्न केला असून, केवळ सरकारी हस्तक्षेपाने तो सोडविणे अशक्य आहे. सरकार कोणत्याही एका बाजूला झुकले तरी दुसऱ्या पक्षाच्या भावना दुखावणार. त्यामुळे आधी मान्य करूनही प्रत्यक्षात विश्व हिंदू परिषदेला मान्य होईल, असा अध्यादेश काढण्यात सरकारला अपयश आले. सरकारच्या या मर्यादा स्पष्ट आहेत आणि विश्वनाथप्रताप सिंग यांचे सरकार काय किंवा उद्या नव्याने येणारे दुसरे सरकार काय किंवा पूर्वी अधिकारावर असलेले सरकार काय; सर्वच सरकारांना या मर्यादा स्वाभाविकपणेच पडणार आहेत. समजा उद्या अगदी भाजपचे सरकार अधिकारावर आले तरी त्यांनाही हा प्रश्न असा चुटकीसरसा सोडविता येणार नाही. अशा स्थितीत केवळ अल्पमतात आहे म्हणून सिंग सरकारला पाठिंब्याचे आमिष दाखवून आपला कार्यभाग साधण्याचे राजकारण नैतिक नाही. शौरी याला मुस्लिम अनुनय म्हणतात. मुस्लिमांचा अनुनय करणारी सरकारे आणि विविध पक्ष या देशाला नवे नाहीत. परंतु सध्याचा प्रश्न या प्रकारात बसविता येणार नाही. विश्व हिंदू परिषद आणि भाजपची मागणी न्याय्य आहे, असे म्हटले तरी न्याय देणे सोपे नाही. काळे-पांढरे रंग ओळखण्याइतके ते सोपे नाही. त्यात अनेक छटा आहेत आणि त्याही बदलत्या आहेत. विश्वनाथप्रताप सिंग यांनी स्वतःचा बळी देऊन बाबरी मशीद पाडायला परवानगी द्यावी अशीच शौरीसारख्यांची अपेक्षा दिसते. सिंग तसे करीत नाहीत म्हणून त्यांचा जळफळाट होतो आणि ते सिंग यांना आपल्या शोधक पत्रकारितेने उघडे पाडू इच्छितात. मात्र या सगळ्या गोष्टी बाजूला ठेवल्या तरी 'अरे भाई, मस्जिद है कहाँ,' असे सिंग यांचे वर्तन नव्हते, ही वस्तुस्थिती उरतेच. शौरी यांना दुःख आहे ते 'अरे

भाई मस्जिद है कहाँ, ' असे सिंग म्हणत नाहीत याचे !

ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर वाद मिटविण्यासाठी सरकारने प्रयत्न केले, परंतु समझोता घडवून आणण्यात त्यांना यश आले नाही, एवढेच म्हणता येईल. हिंदू आणि मुस्लिम, दोघांनीही हा भावनिक प्रश्न केला असून, केवळ सरकारी हस्तक्षेपाने तो सोडविणे अशक्य आहे. सरकार कोणत्याही एका बाजूला झुकले तरी दुसऱ्या पक्षाच्या भावना दुखावणार. त्यामुळे आधी मान्य करूनही प्रत्यक्षात विश्व हिंदू परिषदेला मान्य होईल, असा अध्यादेश काढण्यात सरकारला अपयश आले. सरकारच्या या मर्यादा स्पष्ट आहेत आणि विश्वनाथप्रताप सिंग यांचे सरकार काय किंवा उद्या नव्याने येणारे दुसरे सरकार काय किंवा पूर्वी अधिकारावर असलेले सरकार काय; सर्वच सरकारांना या मर्यादा स्वाभाविकपणेच पडणार आहेत. समजा उद्या अगदी भाजपचे सरकार अधिकारावर आले तरी त्यांनाही हा प्रश्न असा चुटकीसरसा सोडविता येणार नाही. अशा स्थितीत केवळ अल्पमतात आहे म्हणून सिंग सरकारला पाठिंब्याचे आमिष दाखवून आपला कार्यभाग साधण्याचे राजकारण नैतिक नाही. शौरी याला मुस्लिम अनुनय म्हणतात. मुस्लिमांचा अनुनय करणारी सरकारे आणि विविध पक्ष या देशाला नवे नाहीत. परंतु सध्याचा प्रश्न या प्रकारात बसविता येणार नाही. विश्व हिंदू परिषद आणि भाजपची मागणी न्याय्य आहे, असे म्हटले तरी न्याय देणे सोपे नाही. काळे-पांढरे रंग ओळखण्याइतके ते सोपे नाही. त्यात अनेक छटा आहेत आणि त्याही बदलत्या आहेत. विश्वनाथप्रताप सिंग यांनी स्वतःचा बळी देऊन बाबरी मशीद पाडायला परवानगी द्यावी अशीच शौरीसारख्यांची अपेक्षा दिसते. सिंग तसे करीत नाहीत म्हणून त्यांचा जळफळाट होतो आणि ते सिंग यांना आपल्या शोधक पत्रकारितेने उघडे पाडू इच्छितात. मात्र या सगळ्या गोष्टी बाजूला ठेवल्या तरी 'अरे भाई, मस्जिद है कहाँ,' असे सिंग यांचे वर्तन नव्हते, ही वस्तुस्थिती उरतेच. शौरी यांना दुःख आहे ते 'अरे भाई मस्जिद है कहाँ,' असे सिंग म्हणत नाहीत याचे !

•

३६

१९९०

# सर्वांच्या मनात देशाचाच विचार !

अपेक्षेप्रमाणे विश्वनाथप्रताप सिंग यांच्या सरकारचा संसदेत पराभव झाला. या पराभवाचा खरा शिल्पकार आहे कॉंग्रेस पक्ष. राजकीय सापळे रचण्याच्या कॉंग्रेस नेत्यांच्या कौशल्याला मनापासून दाद द्यायला हवी ! चंद्रशेखर वगैरे मंडळींचा त्यांनी फार सफाईने उपयोग करून घेतला. उद्या पंतप्रधान कोणीही होवो, राजकारणाची कळीची सूत्रे निर्विवादपणे पुन्हा कॉंग्रेसच्या हातात आली आहेत. विश्वनाथप्रताप सिंग सर्व आघाड्यांवर अयशस्वी ठरल्यामुळे देश वाचविण्यासाठी त्यांना त्यांच्या पदावरून हटविणे आवश्यकच होते असे राजीव गांधी म्हणताहेत. पण समजा सिंग सर्व आघाड्यांवर यशस्वी होत राहिले असते तर कॉंग्रेसचे राजकारण यापेक्षा वेगळे राहिले असते काय ? शक्यच नाही. कारण स्पष्ट आहे. भारतीय राजकारणात एकच मध्यममार्गी पक्ष यशस्वी होऊ शकतो. मग तो कॉंग्रेस असो की जनता दल. जनता दल यशस्वी होणे याचा अर्थच त्याने कॉंग्रेसची जागा घेणे. लोकशाहीवादी, धर्मनिरपेक्षतावादी, समाजवादी ही या पक्षाची व्यवच्छेदक लक्षणे आणि मागासलेले, आदिवासी, अल्पसंख्य हा त्यांचा हुकमी मतदार संघ. व्ही.पी. सिंग नेमका तोच मतदार संघ कॉंग्रेसच्याच पद्धतीने जिंकायला निघाल्याने, स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी त्यांना अटकाव करण्याशिवाय कॉंग्रेसपुढे पर्यायच नव्हता. चांगल्या अर्थाने व्ही.पी. सिंग यशस्वी होणे कॉंग्रेसच्या फायद्याचे नव्हते. कारण दोघेही एकाच प्रकृतीचे स्पर्धक पक्ष. ग्रीक शोकात्मिकेप्रमाणे व्ही.पी. सिंग किंवा राजीव गांधी यांपैकी एकाचा शेवट अपरिहार्य होता. सध्यातरी कॉंग्रेसची सरशी झाली आहे. व्यक्तींच्या महत्त्वाकांक्षांना खतपाणी घालून त्यांनी आपले इप्सित साध्य केले आहे.

भाजपने सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला तो केवळ अयोध्येच्या प्रश्नावरून नाही, तर सिंग सरकारची सर्वच आघाड्यांवरील कामगिरी असमाधानकारक आहे म्हणून असे लालकृष्ण अडवानी यांचे प्रतिपादन होते. त्यांचे म्हणणेही खरे नाही.

सिंग यांचे सरकार यशस्वी व्हायचे तर भाजपला अपेक्षेपेक्षा जास्त किंमत चुकवावी लागली असती. भाजपचा आधारच त्यामुळे कमकुवत होत होता. मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी किंवा अयोध्या प्रकरणात जैसे थे स्थिती या भाजपच्या परंपरागत मतदाराच्या आर्थिक, सामाजिक, हितसंबंधांना प्रतिकूल ठरणाऱ्या बाबी. स्वत:चे स्थान बळकट करण्यासाठी जनता दलाला त्याची घाई होती. उलट या गोष्टी ऐरणीवर आणू नयेत अशी भाजपची अपेक्षा. मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याच्या निर्णयाची योग्यायोग्यता बाजूला ठेवली, तरी तो निर्णय घेताना काही अनुकूल राजकीय परिणाम व्हावेत ही सिंग यांची अपेक्षा होती. त्यांनी तो निर्णय घेतल्यामुळे निर्माण झालेले जनमानस बदलण्यासाठी रामजन्मभूमीच्या प्रश्नावर एकेरीवर येणे भाजपला भाग पडले. जनता दलाला काय फायदा व्हायचा असेल तो होवो, त्यासाठी आपण तोटा सोसायचे कारण नाही हे भाजपचे धोरण त्यांच्या भूमिकेशी सुसंगतच होते. दोन राजकीय प्रतिस्पर्ध्यांनी एकमेकांना दिलेली ती आव्हाने, - प्रतिआव्हाने होती. जनता दलाला सरकार बनविण्यासाठी पाठिंबा देताना आपली खरी लढाई काँग्रेसशी आहे, याची भाजपला जाणीव होती. 'काँग्रेसला विरोध' या मध्यंतरी विकसित झालेल्या राजकारणाचा भाग म्हणूनच त्यांनी जनता दलाला पाठिंबा द्यायचा निर्णय घेतला. त्यात त्यांचाही स्वार्थ होता. जनता दलाला अपयशाचे धनी करून पुढील निवडणुकीपर्यंत काँग्रेसला स्वबळावर निर्णायक आव्हान द्यायचे, सत्ता मिळाली तर उत्तमच, नाहीतर किमान काँग्रेसला एकमेव पर्याय अशी स्वत:ची स्थिती मजबूत करायची हा भाजपचा ग्रँड प्लॅन. सत्तेच्या प्रलोभनाने जनता दल आणि व्ही.पी.सिंग आपल्या तालावर नाचतील, कोणतीही निर्णायक राजकीय कृती करणार नाहीत ही भाजपची अपेक्षा फोल ठरू लागल्याबरोबर ते सावध झाले आणि आपला डाव आवरता घेतला. याच तऱ्हेने राजकारण पुढेही चालू राहिले असते तर आगामी निवडणुकीत काँग्रेसला आव्हान द्यायला सिद्ध झाले असते जनता दल, भाजप नव्हे ! जनता दलाचे काहीही होवो, किमान दुसरा नंबर तरी सोडायचा नाही या भूमिकेतून भाजपने आपला पाठिंबा काढून घेतला. सिंग यांचे सरकार किती आघाड्यांवर अयशस्वी झाले हा मुद्दा त्यांच्या दृष्टीने खरोखरच गौण होता.

जनता दलाचे सरकार पाडण्यासाठी चंद्रशेखर यांना भरीस घालण्यात आले. स्वतंत्रपणे विचार करायचा, तर चंद्रशेखर हे कसलेले राजकारणी. प्रागतिक विचारांचे. जे.पीं. चे अनुयायी. आकर्षक व्यक्तिमत्त्वाचे. जनता पक्षाच्या स्थापनेपासून ते त्या पक्षाचे अध्यक्ष. भारतयात्रेने त्यांनी लोकांच्या मनात मोठ्या अपेक्षा निर्माण केल्या. परंतु जनता पक्षाला ते निर्णायक विजय कधीच मिळवून

देऊ शकले नाहीत. व्ही.पी. सिंग यांच्या नेतृत्वाखाली विरोधी पक्षांचे ऐक्य झाल्यापासूनच त्यांच्या मनात या अपयशाचा सल होता. सिंग आपले नेते नाहीत, या गंडाने त्यांना पहिल्यापासून ग्रासले होते. या व्ही.पी. द्वेषाला काँग्रेसने व्यवस्थित खतपाणी घातले. त्यातूनच जनता दलाची दोन छकले झाली. या फुटीमुळे निर्माण होणाऱ्या राजकीय परिणामांच्या जबाबदारीतून चंद्रशेखर यांची सुटका नाही. पक्ष फोडल्याची शिक्षा लोक किती कठोरपणे देतात, हे १९७९ मध्ये राजनारायण, मधू लिमये इत्यादींनी चांगले अनुभवले आहे.

चंद्रशेखर यांना व त्यांच्या समर्थकांना नेतेपदी व्ही.पी. सिंग नको होते तर पक्षांतर्गत लढाई देऊन, पक्षाच्या खासदारांचे मतपरिवर्तन करून सिंग यांना नेतेपद सोडायला लावणे शक्य होते. पाच तारखेला पक्षाच्या दोन-तृतियांश सभासदांनी व्ही.पी.सिंग नकोत, असे म्हटले असते, तर सिंग यांच्या जागी नवा नेता निवडावा लागलाच असता. परंतु चंद्रशेखर, देवीलाल यांच्यामागे तेवढे बहुमत नव्हते म्हणून संसदीय पक्षाच्या सभेपुढे येऊन स्वत:ची शोभा करून घेण्याऐवजी त्यांनी पर्यायी सभा घेऊन स्वत:ची फुटीर गटाच्या नेतेपदी निवड करून घेतली. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये झालेल्या निवडणुकीत जनता दलाला यश मिळाले, त्याचे प्रमुख कारण काँग्रेसविरोध. आणि जनता दलाच्या विजयाचे प्रमुख शिल्पकार व्ही.पी.सिंग. सिंग यांच्या लोकप्रियतेचा आणि काँग्रेसविरोधाचा फायदा घेऊन निवडून आलेल्या पक्षातील काही लोक फुटून, सिंग यांना अलग पाडून काँग्रेसशी सहकार्य करतात, याला कोणते नैतिक समर्थन आहे ? भाजपने पाठिंबा काढून घेतल्याबरोबर सिंग यांनी राजीनामा द्यायला हवा, असे तत्त्ववेत्याच्या अभिनिवेशात सांगणारे चंद्रशेखर स्वत:च्या कृतीचे तात्त्विक समर्थन तरी कसे करतात ? संसदीय जनता दल पक्षावर नि:संशयपणे सिंग यांचाच ठसा आहे असे असताना या पक्षाला काँग्रेसच्या दावणीला बांधण्याचा प्रयत्न लोकमताशी प्रतारणा करणारा नाही का ?

सिंग यांनी देशाला अराजकतेच्या उंबरठ्यावर नेले म्हणून आपल्याला हे करावे लागले, असे याचे उत्तर चंद्रशेखर देतात. लोकसभेत बोलताना त्यांनी सिंग यांच्या सरकारवर घणाघाती टीका केली. चंद्रशेखर किंवा सिंग यांच्या अन्य टीकाकारांच्या प्रतिपादनात अंशत: तथ्य आहे. प्रत्येक पंतप्रधानांच्या बाबतीतच अशी टीका संभवते. राजीव गांधींच्या बाबतीतही तेच झाले आणि त्यासाठी त्यांना सत्ताही गमवावी लागली. इंदिरा गांधींनाही सत्ता सोडावी लागली. परंतु ते निर्णय लोकांनी घेतले होते. इथे सिंग यांनी देशाला अराजकाच्या उंबरठ्यावर आणून सोडले, असे मानले तरी तेथून देशाला परत आणण्यासाठी चंद्रशेखर स्वत:लाच सर्वांत योग्य उमेदवार का समजतात ? देश वाचविण्यासाठी काँग्रेसचे सहकार्य घ्यायला

काय हरकत आहे, असे ते म्हणतात. हरकत काहीच नाही. पण मग मर्यादित सहकार्यच कशाला ? या समरप्रसंगी राजीव गांधी यांनीच पंतप्रधान व्हावे, आमचा गट त्या साठी बाहेरून (किंवा आतून) सहकार्य करायला तयार आहे, अशी अधिक योग्य भूमिका ते का घेत नाहीत ? लोकशाहीचाच आदर करायचा, तर राजीव गांधींच्या पक्षाला गेल्या निवडणुकीत सर्वाधिक मते मिळाली आणि त्यांचे १९५ खासदार निवडून आले. मतदान करताना अनेक जणांनी राजीव गांधी पुन्हा पंतप्रधान होतील ही अपेक्षा ठेवली असणार. किंबहुना राजीव गांधी हवेत की नकोत एवढी स्पष्ट मांडणी झाली असताना देशातील सुमारे चाळीस टक्के लोकांनी राजीव गांधींच्या बाजूने मतदान केले. त्यामुळे व्ही.पी. सिंग नकोत, तर राजीव गांधी हवेत, अशी तरी मांडणी हवी. चंद्रशेखर ती करीत नाहीत म्हणून देश वाचविण्याची त्यांची भाषा खोटी वाटते. वैयक्तिक महत्त्वाकांक्षेमुळेच ते पक्ष फोडायला तयार झाले. याशिवाय दुसरा निष्कर्ष त्यातून निघू शकत नाही. ते पंतप्रधान झाले तरी त्यावर लोकमान्यतेचा शिक्का असणार नाही.

काँग्रेस पक्ष मात्र चंद्रशेखर यांचाच पंतप्रधानपदासाठी पुरस्कार करणार. याचे कारण जनता दल फुटीची किंमत त्यांना चुकवावी लागणार. परंतु काँग्रेसला सत्ता स्वत:कडे नको असण्याची आणखीही कारणे आहेत. देश राजकीय पेचप्रसंगातून जात आहे. त्यातील काश्मीर, पंजाब, आसाम या प्रश्नांचा जनक काँग्रेसच आहे. कुवेतमधील घडामोडींमुळे तेलाच्या किंमती वाढल्याने अर्थव्यवस्थेवर प्रचंड ताण पडला आहे. या प्रश्नावर तातडीने कोणतीही उत्तरे नाहीत. राजीव गांधींच्या मनात तर प्रश्न जास्त आणि उत्तरे कमी, असा टोला जाता-जाता सिंग यांनी मारला होताच. हे सर्व प्रश्न डोक्यावर घेऊन, स्वत:चे बहुमत नसताना राज्यकारभार करायचा आणि स्वत:ची प्रतिमा खराब करून जनतेपुढे जायचे म्हणजे 'हात' दाखवून अवलक्षण करण्यासारखे होईल. म्हणून निवडणुकीसाठी आपल्याला अनुकूल वेळ येण्याची वाट पाहत थांबणे हे त्यांच्या दृष्टीने अधिक श्रेयस्कर. ज्या तऱ्हेच्या अडचणी लोकांना सहन कराव्या लागतात, त्या पाहता अधिकारावर येणाऱ्या कोणत्याही सरकारवर लोकांचा रोष होणारच. तो सहन करण्याची ताकद काँग्रेसजवळ आहे काय ?

सत्तांतर हे मध्यांतर आहे. असे समजून काँग्रेसने कामाला लागावे असे गेल्या वर्षी काँग्रेसच्या पराभवानंतर मी लिहिले होते. राजकीय फेरमांडणी होईपर्यंत अनिश्चितता संपणार नाही असेही म्हटले होते. गेल्या वर्षभरातील काँग्रेसची कामगिरी त्या दृष्टीने समाधानकारक नाही. काँग्रेसच्या पाठिंब्यावर चंद्रशेखर सत्तारूढ झाले तरी ते औट घटकेचेच राज्य असणार. निवडणुका जवळ आहेत. त्या

वेळी सर्व पर्याय संपले, आता नाईलाजाने पुन्हा काँग्रेसला मत द्या, या लोकांच्या नकारात्मक भावाने सत्तेवर येण्यापेक्षा सकारात्मक मतदानाने येण्याचा प्रयत्न काँग्रेस करणार काय ? जनता दल आणि व्ही.पी. सिंग यांच्या अपयशाने काँग्रेसचे अपयश झाकले जाणार नाही. काँग्रेस व राजीव गांधींबद्दल लोक काय म्हणत होते, ही अवघ्या एका वर्षात विस्मरणात जाणारी गोष्ट नाही! सर्वजण देशाचे नाव घेऊन बोलतात. प्रत्येकाच्या मनात मात्र स्वत:चाच विचार आहे.

•

३७

१० ऑगस्ट

# राजीव, व्ही.पी. आणि वृत्तपत्रे

विश्वनाथप्रताप सिंग यांचे (त्यांच्या मुलाच्या नावावर) एका परदेशी बँकेत खाते आहे आणि त्यात दोन कोटी डॉलर म्हणजे सुमारे तीस कोटी रुपये एवढ्या रकमेच्या ठेवी त्यांनी ठेवल्या आहेत, अशी सनसनाटी बातमी २२ जुलैला बहुतेक सर्व वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाली. मात्र सर्वच वृत्तपत्रांनी त्याला सारखेच स्थान दिले असे नाही. टाईम्स ऑफ इंडिया आणि हिंदू या प्रख्यात दैनिकांनी मूळ बातमीला दुय्यम स्थान देऊन सिंग यांनी केलेला इन्कार ठळक छापला आहे. स्टेटसूमन, हिंदुस्थान टाईम्स, डेक्कन हेरॉल्ड, न्यूज टाईम यांसारख्या पत्रांनी या बातमीला पान एक वर परंतु फार ठळक स्थान दिलेले नाही. आणि शिवाय सिंग यांनी जयपूर येथे पत्रकारांशी बोलताना केलेला इन्कारही प्रसिद्ध केला. परंतु सिंग यांची प्रतिक्रिया प्रसिद्ध केली नाही अशीही काही वृत्तपत्रे आहेत. इंडियन एक्सप्रेसने या बातमीचा आणखी मागोवा घेऊन या तथाकथित बँकेने आता गाशा मुंडाळला असल्याचे जाहीर केले. तर 'टेलिग्राफ' या कलकत्त्याच्या दैनिकाने या पावसाळी छत्र्यांसारख्या उगवणाऱ्या बँकेच्या तत्कालीन कार्यकारी संचालकांची मुलाखत मिळवून २९४७९ या क्रमांकाचे खाते बँकेत होते किंवा नाही याचे 'नरो वा कुंजरो वा' शैलीतील उत्तर मिळवले आहे. हे खाते अजय सिंग यांच्याच नावाचे होते का व असल्यास हे अजय सिंग विश्वनाथप्रताप सिंग यांचेच चिरंजीव आहेत का याविषयी कोणताही पुरावा या बातमीत नाही. मात्र पान एकवरील ७५ टक्के जागा या बातमीने व्यापली असून 'सिंग आता सापडले', असा बातमीचा चेहरा-मोहरा आहे.

सिंग यांच्यासंबंधीच्या या बातमीच्या निमित्ताने आपले राजकीय नेते व त्यांचे चारित्र्य, वृत्तपत्रे आणि त्यांचा धर्म याविषयी काही प्रश्न उपस्थित होतात. असे प्रश्न पहिल्यांदाच निर्माण होताहेत असे नव्हे. पूर्वीही अशा घटना घडल्या होत्या. परंतु आता त्यांचा वेग वाढला आहे. 'सत्य' सांगण्याचे व्रत सर्वच वृत्तपत्रांनी

स्वीकारले असताना एकाही वृत्तपत्रांत संपूर्ण सत्य नाही, काहीत निवडक सत्यच आहे आणि काहीत आभास सत्याचा आहे, ही परिस्थिती वाचकांना संभ्रमात टाकते. राजीव गांधी काय किंवा व्ही.पी. सिंग काय, व्यक्ती म्हणून देशाच्या इतिहासात त्यांचे स्थान आणि महत्त्व शेवटी तात्कालिक स्वरूपाचेच आहे. महत्त्वाचा आणि पायाभूत आहे तो या समाजाचा मूल्यात्मक व संस्थात्कम पाया त्यात नोकरशाही आहे, न्यायालये आहेत, वृत्तपत्रे आहेत, इतरही अनेक संस्था आहेत. या संस्थांची विश्वासार्हता व त्यांचा निष्पक्षपातीपणा. हाच राष्ट्राचा चिरंतन आधार आहे. वृत्तपत्रांना तर लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणतात. त्यांची स्वायत्तता वा स्वतंत्र अस्तित्व यांचा राजकारणाच्या चिखलफेकीत बळी तर जात नाही ना याची म्हणूनच वारंवार तपासणी करायला हवी. वाचकांशिवाय ती कोण करणार ?

विश्वनाथप्रताप सिंग यांच्याविषयी वर उल्लेख केलेल्या बातमीवरून वरवर पाहता काय दिसते ? ही बातमी कुवेत या देशातून प्रसिद्ध होणाऱ्या 'अरब टाईम्स' या दैनिकात प्रसिद्ध झाली आहे. हे वृत्तपत्र भारतीय घडामोडींसंबंधी सातत्याने व सखोल बातम्या देणारे नाही. भारतीय राजकारणात आव्हान म्हणून पुढे ठाकलेल्या व्ही.पी. सिंग यांच्यासारख्या व्यक्तीकडे भावी पंतप्रधान म्हणून पाहून त्यांच्या सर्व बातम्या देण्याचे एखाद्या परदेशी पत्राचे धोरण असू शकते. 'अरब टाईम्स' हे काही त्या पठडीतील पत्र नाही. न्यूयॉर्क टाईम्स किंवा वॉशिंग्टन पोस्टसारखे शोधक पत्रकारितेसाठी ते नावाजलेले आहे असेही नाही. तसे असते आणि त्यांनी भारतातील राजकीय नेत्यांचा भ्रष्टाचार उघडकीस आणला असता तर तेही समजू शकले असते. याचा अर्थ ज्या वाटेने 'अरब टाईम्स'कधी गेला नाही त्या वाटेवरील एखादी बातमी धूमकेतूसारखी त्यात उगवते कशी ? 'अरब टाईम्स'च्या संपादकांचे किंवा वार्ताहरांचे कर्तृत्व यात नसून त्यांना ही बातमी चक्क कोणीतरी पुरविली असावी असे स्पष्ट अनुमान त्यातून निघते. पत्रकारितेच्या परिभाषेत सांगायचे तर ही बातमी अरब टाईम्समध्ये कोणीतरी 'प्लांट' केली आहे हे उघड आहे. 'अरब टाईम्स'ला चक्क वापरण्यात आले आणि हा वापर भारतातीलच कोणीतरी केला आहे, हे बातमीच्या सूत्राचा जो हवाला दिला आहे, त्यावरून स्पष्ट दिसते. ज्या बातमीचा पुरावा आपल्याकडे नाही ती छापली तर भारतीय कायद्यानुसार बदनामीचा खटला होऊ शकतो. त्यातून पळवाट शोधण्याचा हा हुशार प्रयत्न आहे. अर्थात तो पूर्णपणे सुरक्षित नाही. कारण 'बातमीची बातमी देणे' याला पुन्हा कायद्यात संरक्षण नाही.

अरब टाईम्समध्ये बातमी द्यायची आणि ती आली की त्याची बातमी भारतीय वृत्तपत्रांत छापून येईल अशी अपेक्षा धरायची हे मूळचे गणित. बऱ्याच प्रमाणात

ते यशस्वी झाले. व्ही.पी. सिंग यांच्या विरोधातील पत्रांनी ही संधी पूर्णपणे साधली. अनेक भोळीभाबडी पत्रे या डावाला नाहक बळी पडली आणि हिंदू, टाईम्स यांसारख्या परिपक्व वृत्तपत्रांनी ही बातमी देण्यातील धोका किंवा त्यामागील डाव ओळखून तिला तिची योग्य जागा दाखविली.

या बातमीचा मागोवा घेण्याचा विशेष प्रयत्न इंडियन एक्स्प्रेस आणि टेलिग्राफ या दोन दैनिकांनी केला. एक्स्प्रेसमध्ये जे वृत्त आले आहे, त्यावरून त्यांच्या वॉशिंग्टन येथील वार्ताहराने तपास करून अशा तऱ्हेची बँक आता अस्तित्वात नसल्याची, सर्वांना उपलब्ध होईल,अशी बातमी दिली आहे. एक्स्प्रेसची राजीव गांधींविरोधी भूमिका स्पष्ट असल्याने व त्याचीच परिणती म्हणून सिंग यांना त्यांचा पाठिंबा असल्याने त्यांनी या बातमीचा छडा लावण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. किमान याबाबतीत तरी वृत्तपत्रीय मर्यादांचे उल्लंघन त्यांनी केलेले दिसत नाही.

टेलिग्राफने मात्र २४ तारखेला जवळजवळ सर्व पहिले पान याच एका वृत्ताला दिलेले दिसते. 'द फर्स्ट ट्रस्ट कॉर्पोरेशन लिमिटेड' या सध्या अस्तित्वात नसलेल्या पेढीचे त्या वेळचे कार्यकारी संचालक जॉर्ज मॅक्नीन यांची मुलाखत त्यांनी मिळविली आहे. '२९४७९' या क्रमांकाचे खाते अजेय सिंग यांचेच होते किंवा त्याचे नव्हते, असे कोणतेही स्पष्ट विधान करण्यास मॅक्नीन यांनी नकार दिला आहे. परंतु या मुलाखतीच्या आधारे काही निष्कर्ष काढून लोकांच्या मनात संशय निर्माण करण्यात मात्र ही बातमी यशस्वी होते. मात्र वरील गोष्टीला बातमी म्हणायचे की नाही याविषयी मतभेदांना भरपूर वाव आहे. मुख्य म्हणजे प्रत्येक बातमीला असायला हवी ती 'डेटलाईन' या बातमीला नाही. 'मॅक्नीन' याची मुलाखत कोणी व कोठे घेतली याचाही उल्लेख नाही. संभाषण दूरध्वनीवरून झाले की प्रत्यक्ष भेटून ते स्पष्ट झाले नाही. आणि या सर्वापेक्षा 'जॉर्ज मॅक्नीन' यांची ही मुलाखत एवढी तडकाफडकी टेलिग्राफला कशी मिळू शकली ? व्ही. पी. सिंग यांचे परदेशी बँकेत खाते होते व त्यात २० लाख डॉलर्स ठेवले होते असा आरोप करणारी बातमी २२ तारखेला प्रसिद्ध झाली. त्यात ज्या बँकेचा किंवा पेढीचा उल्लेख आहे ती आता अस्तित्वात नाही. शिवाय तिचे त्यावेळचे कार्यकारी संचालकही काही सार्वजनिक क्षेत्रात वावरणारी महत्त्वाची व्यक्ती नाहीत, जिचा ठाकठिकाणा अनेकांना माहीत असावा. सेंट कीटस् हे बेट अटलांटिकमध्ये कॅरिबियन समुद्रातील उत्तर व दक्षिण अमेरिकेमधील एक किरकोळ बेट असे असताना अवघ्या एका दिवसाच्या अवधीत या नॅक्नीन साहेबांची मुलाखत टेलिग्राफला मिळू शकते हे भारतीय पत्रकारितेच्या वेगाला न मानवणारे आहे. भारतातील अनेक घटनास्थळी आपण इतक्या तत्परतेने पोहोचू शकत नसताना हजारो मैलांवरील हा संपर्क

वाचकांना बुचकळ्यात टाकतो. भारतीय पत्रकारांच्या कौशल्याबद्दल त्यांच्या कर्तृत्वाबद्दल, त्यांच्या प्रचंड लोकसंप्रकाबद्दल आदर वाटायचा, त्याऐवजी संशय निर्माण होतो. पूर्वतयारीनिशी शिजलेल्या एका पद्धतशीर राजकीय कटाचा भाग म्हणून एखाद्या प्याद्यासारखे आपल्या वृत्तपत्रांना कोणी वापरीत तर नाही ना असे वाटते. बॉब वुडवर्ड व कार्ल स्टीन या वॉशिंग्टन बर्न पोस्टच्या दुकलीने वॉटरगेट उजेडात आणले. त्यांनाही प्रचंड साधनसामग्री हाताशी असताना जेवढ्या झटपट माहिती मिळाली नसेल तेवढ्या झटपट भारतीय पत्रकारांना ती मिळते हे पाहून आपला ऊर खरे तर अभिमानानेच भरून यायला हवा. इथे ऊर भरून येतो, पण तो वाटणाऱ्या धाकधुकीमुळे. बरे, पत्रकारांना जर एवढ्या सहजपणे माहिती उपलब्ध होऊ शकते तर सरकारला ती का मिळत नाही ? एका दिवसात टेलिग्राफला मुलाखत मिळते आणि अरब टाईम्सकडे तर सर्वच पुरावा आहे, मग व्ही.पी. सिंग यांच्यावर खटला भरण्यात अडचण कसली ? आपल्यावर आठवड्याच्या आत खटला भरावा असे आव्हान सिंग यांनी दिले आहे. सरकारने हवीतर मुदत वाढवून मागावी, झालेच तर माहिती मिळविण्यासाठी पत्रकारांची मदत घ्यावी, पण सिंग यांना मोकळे सोडू नये !

भारतातही शोधक पत्रकारितेचे युग सुरू झाले आहे, असे म्हणतात. पण अनेकदा येथे पत्रकारांनी स्वतः काही प्रकरणांचा शोध लावण्याऐवजी अनेक प्रकरणे स्वतःहूनच त्यांना शोधीत येतात. अंतुले प्रकरण खूप गाजले. त्यांना जावे लागले. काही पत्रकार त्याचे श्रेय घेतात. काहींना ते दिले जाते. इंडियन एक्स्प्रेसचे संपादक अरुण शौरी त्यांपैकी एक. अंतुले प्रकरणातील काही फायली त्यांना 'उपलब्ध' करून देण्यात आल्या, असे म्हटले जाते. मॅक्लीन यांची मुलाखत जशी कोणाला उपलब्ध करून दिली असेल त्याप्रमाणे पत्रकारांनी स्वतः पुढाकार घेऊन काही गोष्टींचा निर्भीडपणे मागोवा घेणे आणि लोकांना 'सत्य' सांगण्याचा धर्म पाळणे व कोणाच्या तरी षड्यंत्राचा भाग म्हणून त्याच्याकडे काही खास गोष्टींची माहिती 'एक्सक्युजिवली' येणे यात मोठा फरक आहे. त्याकडे भल्याभल्यांचेही दुर्लक्ष होते. राजीव गांधींना सतत विरोध किंवा त्यांना सतत पाठिंबा अशी वृत्तपत्रांचीही विभागणी होते आणि ते त्यांची स्वायत्तता गमावून बसतात, काही व्यक्ती किंवा पक्ष यांचे एक अंग, ॲपरेटस् होतात. यातून त्यांची स्वतःची विश्वासार्हता संपत जातेच, पण एकूणच वृत्तपत्रसृष्टीबद्दल वाचकांच्या मनांत संशय निर्माण होतो. अशा संशयास्पद माध्यमाच्या क्षमता कमकुवत होतात. दूरदर्शनचे आज हेच झाले आहे. पण ते निदान सरकारी माध्यम आहे. वृत्तपत्रे ही लोकांना आधार वाटत होती. सरकार पक्ष, राजकारण, नोकरशाही, हितसंबंध यापेक्षा त्यांचे स्थान वेगळे,

स्वायत्त आहे असे वाटत होते. ते वाटणे एकेकाळी खरेही होते. आज एकेका पत्राची लोकमानसातील ही प्रतिमा पुसट होत चालली आहे. संपादक किंवा मालकांचे स्वातंत्र्य अबाधित असले, ते टिकविण्यासाठी त्यांचा सरकारशी किंवा इतर हितसंबंधांशी संघर्ष सुरू असला, त्यात यश मिळत असले तरी त्यांची वाचकांच्या मनातील विश्वासार्हता धोक्यात आली आहे. 'फेअर व अनफेअर'मधील सीमारेषा पुसट होत चालल्या आहेत. यश किंवा विजय हे अंतिम सत्य नव्हे, राजीव गांधींचा पराभव किंवा विश्वनाथप्रताप सिंग यांचा जय हे या समाजाचे ध्येय नाही. सत्याच्या व नीतीच्या मार्गाने आमचा जीवनप्रवाह पुढे जात आहे की नाही हाच एकमेव खरा निकष आहे. या मार्गावरील प्रवाशांचे मार्गदर्शक ही वृत्तपत्रांची भूमिका असायला हवी. त्यातच त्याच्या अस्तित्वाचे साफल्य आहे.

•

प्रकरण ३८

# बोफोर्स, सरकार व वृत्तपत्रे

'हिंदू'मधील ताज्या माहितीने बोफोर्स प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. १७०० कोटी रुपयांच्या या तोफा खरेदी व्यवहारात कोणाला किती दलाली मिळाली हा मूळचा प्रश्न होता. त्याचे उत्तर देणे सरकारचे उत्तरदायित्व होते. या व्यवहारात दलाली दिली गेलीच नाही अशी सरकारची सुरुवातीची भूमिका होती. नंतर कंपनीचा कारभार गुंडाळण्यासाठी पैसे दिले गेले (वाइंडिंगअप चार्जेस) इथपर्यंत मजल आली. ही दलालीची रक्कम फक्त ६४ कोटींची आहे, असा भास काही काळ निर्माण करण्यात आला. ज्या देशात दरवर्षी हजारो कोटी रुपयांचा भ्रष्टाचार होतो तेथे ही रक्कम अगदीच मामुली आहे असे म्हणून त्याचे अप्रत्यक्ष समर्थन करण्यात आले. आज प्रत्यक्षात एका कंपनीलाच आठ टक्के रक्कम मिळाली, आणि यात गुंतलेल्या आणखी दोन कंपन्यांनाही काही रक्कम मिळाली असावी असा संशय आहे. म्हणजे दोनशे कोटी रुपयांपर्यंतचा हा मामला आहे. ज्यांना ही दलाली मिळाली त्या कंपन्या भारतीय नाहीत, किंबहुना भारतीय व्यक्तींचा आणि दलालीचा काही संबंधच नाही असे सुरुवातीस ठामपणे सांगण्यात येत होते. आता हिंदुजा, विन चड्ढा यांची नावे अलगदपणे वर येताहेत. ही नावे सत्तारूढ पक्ष आणि सरकार यांच्या जवळची आहेत हे नव्याने सांगण्याची गरज नाही. त्यामुळे या व्यवहारात दलाली दिली गेली, तीही भारतीय व्यक्तींना आणि मोठ्या प्रमाणावर हे सत्य आहे. हे सत्य असले तरी पुराव्यानिशी सिद्ध करायला हवे. सरकारचे ते कर्तव्य होते. त्याऐवजी 'हिंदू' सारख्या पत्राने ते पार पाडले. 'हिंदू' ला जमते ते सर्वशक्तिशाली सरकारला संपूर्ण दोन वर्षांत जमले का नाही हे लोकांना पडलेले कोडे आहे. या कोड्याचे उत्तर अवघड नाही. परंतु फार व्यथित करणारे आहे. उत्तराची किंमत दोनशे कोटी रुपये एवढी अल्प नाही. बोफोर्स प्रकरणातील सत्य बाहेर येऊच नये, असा सरकारचा सुरुवातीचा प्रयत्न होता, परंतु

तुकड्यातुकड्याने ते बाहेर येऊ लागले तसतसे सरकारने ते दडपण्याचा प्रयत्न केला असा स्पष्ट निष्कर्ष गेल्या दोन वर्षांतील घटनाक्रमावरून दिसतो. त्यात आपल्या सरकारने बोफोर्स कंपनी आणि स्वीडीश सरकारलाही सामील करून घेतले. दोनशेच काय, दोन हजार कोटी रुपयांनाही नागवले असते तरी आम्ही सहन केले असते. परंतु त्यासाठी राष्ट्रीय अस्मिता, संरक्षण सिद्धता, राज्यकर्त्यांची नैतिकता आणि लोकशाही मूल्यांची प्रतिष्ठा यांना जुगाऱ्यासारखे पैजेला लावायला नको होते, ही सर्वसाधारण देशप्रेमी नागरिकाची तीव्र भावना आहे. या व्यवहारात गुंतलेल्या कंपन्यांची नावे देखील जेथील ९० टक्के जनतेला धड उच्चारता येत नाहीत, त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सरकारकडून वेगळी वागणूक अनेक्षित आहे. म्हणूनच दलालीची रक्कम आणि व्यक्तींची नावे यापेक्षा दोन वर्षांच्या अवधीतील सरकारचे वर्तन कसे झाले, हाच आजचा महत्त्वाचा प्रश्न आहे.

सरकारने या प्रकरणी लोकांची, संसदेची आणि सांसदीय चौकशी समितीची जाणीवपूर्वक कशी दिशाभूल केली हे 'हिंदू' ने ९ ऑक्टोबरला दिलेल्या वृत्तांतात आणि त्यानंतर या प्रकरणाची चौकशी करणारे हिंदूचे सहसंपादक एन. राम यांच्या पत्रकारपरिषदेतून पुरेसे स्पष्ट झाले आहे. या नव्या माहितीचा दुसरा हप्ता हिंदूच्या पुढील अंकात प्रसिद्ध होऊ शकला नाही. तो प्रसिद्ध होऊ नये यासाठी संपादक जी. कस्तुरी यांच्यावर सरकारने दडपण आणले असा आरोप राम यांनी केला आहे. कस्तुरी यांनी त्याचा इन्कार केला असला तरी तो केवळ तांत्रिक दृष्टीनेच खरा असण्याची शक्यता आहे. एन.राम हे केवळ हिंदूचे सहसंपादकच आहेत असे नाही. ते जी कस्तुरी यांचे पुतणे आहेत. राम यांचे वडील, म्हणजेच कस्तुरी यांचे वडीलबंधू जी. नरसिंहन हे हिंदूचे १९५९ ते ७७ पर्यंत कार्यकारी संपादक होते. हिंदू हे कस्तुरी कुटुंबियांच्या व्यक्तिगत मालकीचे पत्र आहे. जी. कस्तुरी यांचे आजोबा कस्तुरीरंगा अय्यंगार यांच्याकडे १९०५ मध्ये त्याची मालकी आली. एन.राम यांचे एक धाकटे बंधू एन. रवी हे तेथेच सहाय्यक संपादक आहेत, तर एन. मुरली हे दुसरे बंधू व्यवस्थापक आहेत. त्यामुळे राम यांना अनेक अंतर्गत गोष्टी माहीत असणार. 'हिंदू' हे सरकारविरोधी पत्र नव्हे. वस्तुनिष्ठ बातम्या व संयमित भाषा व मांडणी यासाठी त्याची ख्याती आहे. त्यामुळेच वर्षापूर्वी बोफोर्स व्यवहारासंबंधी हिंदूने महत्त्वाची माहिती प्रसिद्ध केल्याने खळबळ माजली. 'हिंदू' ने ती दिली म्हणजे खरीच असणार असे लोकांना वाटावे एवढी त्याची विश्वासार्हता होती. इंडियन एक्स्प्रेसकडे सरकार दुर्लक्ष करू शकते. हिंदूकडे नाही. त्यानंतर राजीव गांधींसह त्यांच्या गोटातील गोपी अरोरा, के. सी. पंत, मोहन कात्रे आदी लोकांनी एन.राम यांच्या गाठीभेटी घेतल्या. श्रीलंका प्रश्नात पंतप्रधानांचे दूत म्हणून

महत्त्वाची कामगिरी राम यांच्यावर सोपविण्याची इच्छा प्रदर्शित करण्यात आली तीही उगाच नव्हे. सरकारला सत्यशोधनात खरोखरच स्वारस्य असते तर एन.राम किंवा 'हिंदू'ला त्यांनी प्रोत्साहन दिले असते. परंतु झाले उलटेच. नव्या माहितीचा पहिला हप्ता प्रसिद्ध झाला, आणि दुसरा नंतर येणार असे जाहीर झाले असताना ही प्रसिद्धी थांबविण्याचा निर्णय संपादकाला का घ्यावा लागला ? आपल्या पत्रात काय यावे हे ठरविण्याचा हक्क सर्वस्वी संपादकाचा असला तरी तो हक्क बजावण्यासाठी मोकळे वातावरणही लागते. 'ही बातमी छापू नका' असा सरळ दबाव कोणी आणला नसला तरी छापल्यास त्याचे परिणाम काय होतात हे जर इतर उदाहरणांनी आधीच सिद्ध झाले असेल तर संपादक तरी किती मोकळेपणाने निर्णय घेऊ शकतो ? त्यांना त्यांच्या स्वतःच्या संस्थांची काळजी घ्यायची असते. हाराकिरी करणे एकट्याला शक्य असते. संस्थांना नाही. त्यामुळे जी. कस्तुरी यांनी दुसरा भाग अंकात येऊ दिला नाही यामागे असलेला संदर्भही लक्षात ठेवावा लागेल. एन.राम यांच्या माहितीत नवे काही नव्हते असा खुलासा त्यांनी केला असला, तरी तो पटणारा नाही हे इतरत्र आलेल्या बातम्यांवरून दिसते. नवे काही नसते तर चौकशीत राम यांची मदत मागण्याचा आणि आणखी चौकशीसाठी उच्चस्तरीय चौकशी समिती स्वित्झर्लंडकडे पाठविण्याचा सरकारचा निर्णय तरी का झाला असता ?

निवडणुकीवर ज्या घटनेचा गंभीर परिणाम होऊ शकतो, अलीकडच्या काळात ज्या घटनेमुळे सरकारला प्रचंड हादरा बसलेला आहे त्याविषयी, एवढा प्रचंड खटाटोप करून मिळविलेली खास बातमी, ज्यामुळे आपल्या पत्राचा जगभर बोलबाला होऊ शकतो ती बातमी, स्वतःच्याच हाताने बाजूला ठेवण्याचा निर्णय एखादा संपादक घेतो त्याला तेवढीच महत्त्वाची कारणे असली पाहिजेत. एन.राम यांच्या पहिल्या वार्तापत्रानंतर संरक्षण मंत्रालयाने हिंदूकडे जो खुलासा पाठविला तो ११ ऑक्टोबरच्या अंकात प्रसिद्ध झाला आहे. त्याला संपादकाने जे मोजके प्रत्युत्तर दिले आहे त्यात 'बोफोर्स प्रकरणाची चौकशी सरकारने कधीच गंभीरपणे केली नाही. उलट सत्य दडविण्याचा प्रयत्न केला, असे ठाम विधान हिंदूने केले आहे. ज्या पत्राची या प्रश्नाबाबत ही भूमिका आहे त्याने एन.राम यांचा आणखी एक वृत्तांत छापला असता तर हिंदूची विश्वासार्हता संपली नसती. तरीही तो वृत्तांत छापला गेला नाही. हिंदू म्हणजे सरकारविरोधी भूमिका घेणारे, एखाद्या राजकीय पक्षाचे मुखपत्र नव्हे. पत्रकारिता आणि वृत्तपत्र स्वातंत्र्य याकडे गंभीरपणे पाहणाऱ्या सर्वांच्याच चिंतेची ही गोष्ट आहे. स्वतंत्र वृत्तपत्रांना अभय देणे हे लोकशाही सरकारचे आद्य कर्तव्य. आपले सरकार ते पार पाडीत आहे काय ?

वॉटरगेट झाले, तसे बोफोर्सही झाले. निक्सन गेले. तसे राजीवजी जातील. परंतु निक्सन गेले तरी वॉशिंग्टन पोस्ट झळाळून टिकले. व्यक्ती येतात, जातात. राष्ट्रीय जीवनात त्यांना महत्त्वाचे स्थान असले तरी ते काही काळापुरतेच. त्यापेक्षा पायाभूत गोष्टी असतात त्या संस्था आणि मूल्ये. अमेरिकेत किंवा जपानमध्ये एवढा भ्रष्टाचार झाला तरी राष्ट्र म्हणून ते खिळखिळे होत नाही याचे कारण त्यांचा संस्थात्मक पाया मजबूत आहे. राष्ट्रीय जीवनात कधीकाळी विकृती निर्माण झाली तरी त्याची झळ संस्थात्मक पायाला बसू नये याची ते सतत काळजी घेतात. आपल्याकडे त्याच्या नेमके उलट घडत आहे. म्हणूनच बोफोर्सच्या दोनशे कोटी रुपयांच्या दलालीपेक्षा येथील वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य अधिक महत्त्वाचे आहे.

•

| ‘सकाळ’चे उत्तरायण | ३१ प्रकरण १० |
| --- | --- |

उत्तरेकडे जाण्याची पुणेकरांची आकांक्षा फार जुनी आहे. शनिवारवाडा हे त्याचे प्रतीक आहे. छत्रपतींच्या पंतप्रधानपदाचा सन्मान करणारे थोरले बाजीराव पेशवे यांनी शनिवारवाड्याचे मुख्य प्रवेशद्वार ठेवले ते उत्तर दिशेला. ‘दिल्ली दरवाज़ा’ या नावाने ते अद्यापही ओळखले जाते. आपल्या पराक्रमाने जरीपटका त्यानी अटकेपार फडकाविला. दिल्लीच्या तख्तालाही काही काळ मराठ्यांचा आधार घेणे भाग पडले. याच ऐतिहासिक वास्तूच्या परिसरात गेल्या अर्धशतकाहून अधिक काळ ठामपणे उभ्या असलेल्या दैनिक ‘सकाळ’लाही उत्तरेकडील वाचकांचे आकर्षण वाटले नाही, तरच नवल. गेल्या आठवड्यात, १६ मार्चला नाशिक, धुळे व जळगाव या उत्तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांसाठी ‘सकाळ’ने स्वतंत्र आवृत्ती सुरू करून प्रगतीचे आणखी एक पाऊल टाकले आहे. दक्षिणेतील बेळगावपासून उत्तरेकडील धुळे, जळगावपर्यंत, मुंबईसह संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रात उपलब्ध होणारे, त्या त्या भागातील प्रश्नांना वस्तुनिष्ठपणे सामोरे जाणारे, निःपक्षपाती दैनिक, असे ‘सकाळ’चे वर्णन केले तर आता त्यात अतिशयोक्ती नाही. १९३२ मध्ये नानासाहेब परुळेकर यांनी ज्या मूळ हेतूने ‘सकाळ’ सुरू केला, तो टप्प्या-टप्प्याने सफल होतो आहे. नानासाहेब त्या वेळी कोलंबिया विद्यापीठातून तत्त्वज्ञानातील पी.एच.डी.पदवी प्राप्त करून स्वदेशी परतले होते. गेल्या वर्षी मी अमेरिकेत असताना न्यूयॉर्कमधील या नामवंत विद्यापीठातील दक्षिण अशियायी विद्याशाखेत एका चर्चासत्रात भाग घेण्यासाठी गेलो होतो. त्या वेळी नानासाहेब ज्या तत्त्वज्ञान विभागात विद्यार्थी होते, त्याला आवर्जून भेट दिली. अमेरिकेतील अतिशय वरच्या दर्जाची जी प्रतिष्ठित विद्यापीठे आहेत त्यात कोलंबियाचा समावेश होतो. तेथील हा विद्यार्थी भारतात परतला त्या वेळी अमेरिकन व फ्रेंच वृत्तपत्राची दिल्लीची बातमीदारीची ऑर्डर त्याच्या हातात होती. १९३० नंतर भारतात ज्या वेगाने प्रचंड

राजकीय उलथापालथी झाल्या, त्या पाहता दिल्लीतील एक यशस्वी पत्रकार, असा लौकिक त्यांना सहज मिळविता आला असता.

परंतु मान मरातब, कीर्ती आणि पैसेही मिळवून देणारा तो मोह टाळून स्वदेशी भाषेत पुण्यासारख्या छोट्या शहरात 'सकाळ' सुरू करण्याचा -त्या वेळी इतरांच्या दृष्टीने -वेडेपणा त्यांनी केला. त्यामागे एक स्वच्छ दृष्टी होती. सामान्य लोकांना समजणाऱ्या भाषेतच त्यांचे प्रबोधन करण्याची.हा भाषिक अट्टाहास डोळस होता. 'मराठी वृत्तपत्रे वाढली पाहिजेत' हा त्यांच्या विचाराचा गाभा लक्षात ठेवूनच 'सकाळ'ने स्वतः वाढण्याचे प्रयत्न केले. परंतु बंगालींना, मल्याळींना, तमिळींना त्यांच्या भाषेचा जेवढा अभिमान वाटतो तेवढा मराठी भाषकांना आपल्या भाषेचा वाटत नसावा. 'आनंद बझार पत्रिका' या बंगाली दैनिकाचा खप आज चार लाखाच्या वर आहे, तर मल्याळम 'मनोरमाने ' सात लाखांचा उच्चांक गाठला आहे. त्याच्या जवळ जाईल असे एकही मराठी पत्र आज नाही. आजही अनेक बातम्यांसाठी आपण इंग्रजी वृत्तपत्रेच ग्राह्य धरतो. इंग्रजीइतकीच मराठी भाषेतील पत्रकारिता अस्सल व गुणवान व्हावयाची असेल तर मराठी पत्रांचा खप आणि क्षेत्रीय विस्तार व्हायला हवा. त्यातूनच त्याची साधनसामग्री वाढू शकेल. त्यामुळे बातम्या, वार्तापत्रे आणि लेख यांच्यासाठी अधिक व दर्जेदार मनुष्यबळ मिळू शकेल.

कलकत्त्याच्या 'स्टेटस्मन'सारख्या पत्रात लिहिल्याने प्रतिष्ठा मिळते. 'आनंद बझार'मध्ये लिहिल्याने त्यापेक्षा अधिक प्रतिष्ठा, अधिक वाचक, अधिक प्रभाव आणि अधिक पैसाही मिळत असेल तर कोणीही दुसऱ्या पर्यायाचा स्वीकार करील. आज तेथे तसे झाले आहे. 'मनोरमा'चीही हीच स्थिती आहे. 'स्टेटस्मन'वरून असे म्हणण्यापेक्षा हा लेख प्रथम बंगाली भाषेत आनंद बझार मध्ये प्रकाशित झाला आणि त्याचे हे इंग्रजी भाषांतर आम्ही प्रकाशित करीत आहोत, हे वाचताना तेथील समाजाचा अभिमान फुलून येत असेल तर मराठी भाषेत हे का होऊ शकणार नाही ? 'टाइम्स ऑफ इंडिया न्यूज सर्व्हिस' किंवा 'एक्स्प्रेस न्यूज सर्व्हिस 'च्या बातम्या त्यांच्या मराठी भावंडात आवर्जून पाहायला मिळतात. हीच स्थिती उलटी का होऊ शकत नाही ? एकूणच मराठी पत्रांची स्थिती तुलनेने चांगली नाही हे त्याचे कारण.महाराष्ट्राचे प्रातिनिधिक वृत्तपत्र म्हणून 'लोकसत्ता', 'महाराष्ट्र टाइम्स', 'सकाळ' किंवा 'लोकमत' यांची नावे पुढे येण्याऐवजी टाइम्स आणि एक्स्प्रेसचीच नावे का पुढे येतात ? सहा ते सात कोटी लोकसंख्या असलेल्या या मराठी प्रदेशात सहा-सात लाख खपाचे एखादे तरी मराठी पत्र का असू नये ? चांद्यापासून बांद्यापर्यंत मोठा वाचक असलेले एकतरी मराठी वृत्तपत्र निघणे अवघड आहे

का ? अशी वृत्तपत्रे असतील तरच सरकार, नोकरशाही, प्रस्थापित त्यांना वचकून राहतील. आपल्या मार्गाने सरळ मार्गक्रमणा करतील. इंदिरा गांधींच्या हत्येसंबंधीचा ठक्कर आयोगाचा अहवाल शेवटी एका वृत्तपत्रामुळेच संसदेत सादर करणे सरकारला भाग पडले आहे. मराठी वृत्तपत्रांनी यातून काही शिकले पाहिजे.

याच विचाराने 'सकाळ'ने प्रथम मुंबईत आणि नंतर कोल्हापूरमध्ये आपली आवृत्ती प्रकाशित करायला सुरूवात केली. कोल्हापूर आवृत्तीला त्या वेळी 'पुढारी' आणि 'केसरी'ने जोरदार विरोध केला. बरोबर नऊ वर्षांपूर्वी म्हणजे २२ मार्च १९८० रोजी 'केसरी' आणि 'पुढारी' यांच्या चालकांनी पुढाकार घेऊन पुण्यात मराठा चेंबरच्या सभागृहात एक परिषद घेतली. केंद्रीय मंत्री वसंतराव साठे तिला उपस्थित होते. त्या वेळच्या वक्त्यांनी केलेल्या भाषणांची टिपणं मी जपून ठेवली आहेत. धांडवलदारी वृत्तपत्र, लहान वृत्तपत्रांविरूद्ध अघोषित युद्ध, स्वदेशी वसाहतवाद, फेअर कॉम्पिटिशन, छोटा मासा-मोठा मासा, आर्थिक लोकशाही, इन्फर्मेशन इंपिरिॲलीम ही त्या वेळची भाषा होती. ज्यांनी ही भाषा त्या वेळी केली त्यांचा आचारच त्याविरुद्ध झाला. 'सकाळ' कोल्हापुरात आला आणि 'पुढारी' सुधारला हा त्या वेळी इतरांचा शेरा होता. आज पुढारीकारही ती वस्तुस्थिती म्हणून मान्य करतील. दक्षिण महाराष्ट्रातील एक चांगले पत्र या वर्णनास आज ते सार्थपणे पात्र आहेत. 'सकाळ'ने ज्या निकोप व निर्विष स्पर्धेला प्रोत्साहन दिले त्यामुळे तोटा कोणाचाच झाला नाही. हजारो वाचकांचा मात्र फायदा झाला. त्यांना मिळणाऱ्या माहितीची गुणवत्ता आज निखालसपणे वाढली आहे. त्याचे श्रेय प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे 'सकाळ'कडेच जाते. वृत्तपत्रांच्या शाखा विस्ताराला व त्यांच्या प्रसाराला सरकार किती वाव देणार ? असा प्रश्न जयंतराव टिळक यांनी त्या वेळी उपस्थित केला होता. त्यानंतरच पुण्यातील केसरी कोल्हापूर, सांगली, सोलापूर आणि नगरमधून प्रकाशित होऊ लागला. लोकसत्ता आणि महाराष्ट्र टाइम्स पुण्यात आले तर त्यांच्या स्पर्धेला तोंड देणे अशक्य आहे, असे एका वक्त्याचे त्या वेळचे उद्‌गार होते. ते वस्तुस्थितीदर्शक नव्हते हे आज स्पष्ट दिसते आहे. 'महाराष्ट्र हेरॉल्ड'सारख्या छोट्या पत्रानेही इंडियन एक्स्प्रेसशी येथे चांगला सामना केल्याचे पाहायला मिळते. 'इन्फर्मेशन इंपिरिॲलिझम' असा सिद्धांत वसंतराव साठे वृत्तपत्रांना लावून दाखवत होते. वृत्तपत्रांपेक्षा दूरदर्शनसारख्या सरकारी अखत्यारीतील माध्यमाच्या बाबतीतच तो अधिक खरा आहे, हे कोणीही नाकारू शकणार नाही. तात्पर्य काय, तर स्पर्धेशिवाय माहितीचा, पत्रकारितेचा दर्जा वाढत नाही. स्पर्धेशिवाय पत्रकारिताच संभवत नाही. त्यामुळे स्पर्धा हवीच. वाचाकांचा तो मूलभूत हक्क आहे आणि 'सकाळ'ने तर निरोगी स्पर्धेचा वस्तुपाठच

घालून दिला आहे. तो लक्षात घेऊनच या वेळी नाशिकमध्ये, धुळ्यामध्ये किंवा जळगावमध्ये 'सकाळ'च्या विरोधी परिषद घेण्यापेक्षा 'सकाळ'चे स्वागत करणारे अग्रलेख लिहिले गेले आणि 'सकाळ'ला पहिल्या पानावर शुभेच्छा दिल्या गेल्या. अशा शुभेच्छा इतरांना देण्यासही 'सकाळ'ने कधी खळखळ केली नाही.

●

४०

# परिषद झाली; पुढे काय ?

मुंबईत भरलेल्या जागतिक मराठी परिषदेनं आपलं उद्दिष्ट साध्य केलं आहे. मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीच्या विद्यमान स्थितीवर पुन्हा एकदा सर्वंकष चर्चा घडवून आणण्याचं, आत्मपरीक्षणाचं निमित्त परिषदेनं पुरविलं. यापूर्वी असं निमित्त मिळालं होतं ते संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेच्या वेळी. 'स्वतःचं भाषिक राज्य हवं' यासाठी लोकांनी त्या वेळी मोठं आंदोलन केलं. चळवळ उभारली. लोकजीवन घुसळून निघालं. जागृत झालेल्या मराठी अस्मितेच्या रेट्याने अनेक चांगले निर्णय झाले. मग ते सत्तेचे विकेंद्रीकरण असो, की साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना. मराठी लोक आणि भाषा यांच्या वैभवाचा काळ सुरू झाला अशी भावना समाजमनात दृढ झाली. मराठी साहित्यामधील रसरशीत निर्मितीचा, नवनवे धुमारे फुटण्याचा हा काळ. दिल्ली दरबारी महाराष्ट्राचा राजकीय वचक असण्याचा काळही १९६० नंतरचाच. परंतु मराठी माणसाचं मनोमन जोपासलेलं हे वैभवाचं स्वप्न अल्पजीवी ठरलं. शिवसेनेच्या रूपाने महाराष्ट्राच्या राजधानीत त्याची तीव्र प्रतिक्रिया उमटली. शरद जोशींनी शेतीमालाच्या भावाचा प्रश्न जसा ऐरणीवर आणला, त्याच तऱ्हेने शिवसेनेने मराठी माणसाच्या अस्मितेचा आणि अस्तित्वाचा. शेतकरी संघटना आणि शिवसेना यांच्या आजच्या स्वरूपाबद्दल, त्यांच्या राजकीय उद्दिष्टांबद्दल किंवा कार्यशैलीबाबत मतभेद असले तरी त्यांचं त्या त्या वेळचं श्रेय त्यांना देताना संकोच वाटायचं कारण नाही.

महाराष्ट्राच्या 'मऱ्हाटी'पणाचा संकोच व्हायची कारणं अनेक. दिल्लीचं बदलतं राजकारण, औद्योगिक आणि व्यापारी संस्कृतीचा उदय, त्यामुळे प्रतिष्ठा पावलेल्या नव्या संकल्पना, इंग्रजी भाषेचं म्हणण्याऐवजी भ्रष्ट स्वरूपात येथे आयात झालेल्या पाश्चात्य विचार व कल्पनांचे अंधानुकरण, काही लोकांकडेच जमा होत असलेली संपत्ती, काहींकडे साठत असलेला काळा पैसा, लोकसंख्या वाढ, बेकारी, दुष्काळ वगैरे वगैरे. या साऱ्यांच्या एकत्रित परिणामांचे सार म्हणजे आजची कुंठित अवस्था.

ही कोंडी फोडण्यासाठी पुन्हा एकदा वैचारिक मंथन होण्याची, आपलं बदललेलं प्रतिबिंब आरशात पाहण्याची आवश्यकता होती. जागतिक मराठी परिषदेनं ती पुरविली. वृत्तपत्र समाजमनाचा आरसा असतात. गेल्या आठ-पंधरा दिवसांतील वृत्तपत्रं पाहिली की याचा प्रत्यय येतो. परिषदेचे कार्याध्यक्ष असलेले माधवराव गडकरी यांचा लोकसत्ता असो की परिषदेचे प्रयोजन काय असा सवाल करणारा महाराष्ट्र टाइम्स असो, केंद्रीय मंत्री वसंतराव साठे यांचे आक्रमक भाषण असो, शिरवाडकरांचे ठाम भूमिका घेणारे पण संयत अध्यक्षीय भाषण असो, की सरकारचा निर्धार व्यक्त करणारे मुख्यमंत्र्यांचे भाषण, मराठी लोकजीवनाच्या विविध पैलूंना सर्व बाजूंनी स्पर्श होतो आहे हे जाणवत राहतं. परिषदेने सुरूवात तर चांगली झाली आहे.

जागतिक मराठी परिषद म्हणूनच केवळ मराठी भाषा परिषद नव्हती. मराठी भाषक लोकांची होती. अर्थात भाषा म्हणजे केवळ शब्दांचं संकलन नव्हे. तात्यासाहेब शिरवाडकरांनी भाषा ही संकल्पना त्यांच्या भाषणात फार उत्तम तऱ्हेने विषद केली आहे. ते म्हणतात, 'समाजाचं वैचारिक आणि जाणिवात्मक संचित काळातून पुढे नेणारी आणि परिणामतः समाजाच्या बदलत्या जीवनाला अखंडता, आकार आणि आशय देणारी भाषा ही एक महाशक्ती असते. सूत्रात ओवलेल्या मण्यांप्रमाणे समाजजीवनाच्या साऱ्या धारणा आणि विकासाच्या प्रेरणा त्याच्यात ओवलेल्या असतात. म्हणून मराठीवरील संकट हे तिच्या शब्दकोशावरील वा साहित्यावरील संकट नाही. ते महाराष्ट्राच्या अस्मितेवरील, मराठीवरील आणि येथील लोकांच्या भवितव्यावरील संकट आहे.' भाषा हेच जीवन असे आणखी कोणी म्हटले आहे. भाषेच्या या सर्वांगीण स्वरूपाबद्दल म्हणजे एकूण समाजजीवनाबद्दलच चर्चा या निमित्ताने व्हायला हवी, होत राहील.

महाराष्ट्राचे व देशाचेही भाषाविषयक धोरण हा या चर्चेचा एक अविभाज्य भाग असणार आहे. देशाच्या भाषाविषयक धोरणाचा गाभा आपण स्वीकारलेल्या जीवनपद्धतीस अनुसरून हवा. आपण लोकशाही राज्यपद्धत स्वीकारली ती आपल्यापुढे पर्याय होते म्हणून नव्हे. आपल्या देशाचं स्वातंत्र्यच मुळी जनतेच्या संघर्षातून, प्रतिकारातून, लढ्यातून, बलिदानातून, तुरुंगवासातून सिद्ध झाले आहे. ज्या जनतेने हे स्वातंत्र्य मिळविले तिचे हे राज्य, हा आपल्या राजकीय व्यवस्थेचा पाया आहे. लोकशाहीची केवळ चौकट आम्ही स्वीकारलेली नाही, तिचं आत्मगत रूपही स्वीकारलेलं आहे. लोकशाहीत लोक केंद्रीभूत.सर्व व्यवहार, राजकीय प्रक्रिया,निर्णय लोकानुवर्तीच असणार. लोकांचा राज्य चालविण्यातील सहभाग ही लोकशाहीची पूर्वअट. म्हणूनच आपण सर्वांना मताधिकार दिला. जात, पंथ,

धर्म, शिक्षण, सामाजिक स्थान, आर्थिक ऐपत, कशाचीही आडकाठी ठेवलेली नाही. आज प्रगत असणाऱ्या पाश्चात्य लोकशाही देशात स्त्रियांना मताधिकार मिळविण्यासाठी किती संघर्ष करावा लागला! लोकशाहीची जननी असणाऱ्या ब्रिटनमध्येही 'हाऊस ऑफ लॉर्ड्स्' म्हणजे उमराव सभागृह आजही अस्तित्वात आहे. आता लोकांनी राज्य चालवायचे तर राज्यकारभार त्यांच्या भाषेत हवा. देशातील ६० ते ७० टक्के जनता आज निरक्षर आहे.त्यांना त्यांच्या मातृभाषेशिवाय इतर भाषेचे काडीइतकेही ज्ञान नाही. जे साक्षर आहेत त्यापैकी बहुसंख्य लोकांना त्यांच्या मातृभाषेशिवाय इतर भाषेत व्यवहार करता येत नाहीत. इंग्रजीत किंवा हिंदीत आत्मविश्वासाने व स्पष्टतेने आपले म्हणणे मांडू शकतील असे लोक महाराष्ट्रात आज पाच टक्क्यांपेक्षा जास्त नसतील. हिंदी भाषिक प्रांत सोडून इतर प्रांतात इंग्रजी व हिंदी, दोन्हींबाबत हीच स्थिती आहे. याचा विचार करून भाषावार प्रांतरचना झाली. कल्पना अशी होती की, त्या त्या राज्यांत त्यांच्या त्यांच्या भाषेत राज्यकारभार आणि लोकव्यवहार दोन्ही चालतील. महाराष्ट्र राज्याची स्थापना इतर राज्यांच्या नंतर झाली, तरी आता त्याला तीस वर्षे झाली. महाराष्ट्र शासनाचा सर्व कारभार आता मराठीत चालायला काय हरकत आहे? तो इंग्रजीत चालतो याचे कारण अनेकदा असे दिले जाते की, इतर राज्ये किंवा केंद्राबरोबर इंग्रजीत पत्रव्यवहार करावा लागतो. पण त्यासाठी मूळ निर्णय मराठीत घेऊन, मूळची कागदपत्रे मराठीत तयार करून आवश्यक असेल तेव्हा त्याचा इंगजी तर्जूमा इतरत्र पाठविता येईल. आज तसे होत नाही. निर्णय प्रक्रिया आणि त्यासाठीचे विचारमंथनही इंग्रजीत होते.कागदपत्र इंग्रजीत तयार होतात. आवश्यक असेल तर लोकांना त्याचे मराठी भाषांतर पुरविले जाते.

निर्णय घेणाऱ्या लोकांना अनेकदा मराठी भाषेचे व समाजाचे ज्ञान असण्याची आवश्यकता नसते. त्यांच्या आशा-आकांक्षांशी, सुखदु:खाशी त्यांचे नाते नसते. परक्या लोकांनी निर्णय घ्यावेत, इंग्रजांनी निर्णय घ्यावेत तसे हे देशी इंग्रज किंवा काळेसाहेब निर्णय घेतात. इंग्रजीच हवी तर मग काळ्या साहेबांची कशाला, गोरे साहेब काय वाईट होते असे म्हणण्याची वेळ येते. येथे इंग्रजी भाषेचा 'भाषा' म्हणून प्रश्न नाही. इंग्रजी वृत्तीचा, त्यातील परात्म, परस्थता भावाचा प्रश्न आहे. 'साहेबीपणा'ला जन्म देणाऱ्या पद्धतीला विरोध आहे. एक विषय म्हणून मराठी शाळांमध्ये इंग्रजी शिकणे आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून सर्व शिक्षण घेणे यात दृष्टिकोणाचाच मूलभूत फरक आहे. राज्य सरकारला ज्या अनेक गोष्टी करता येण्यासारख्या आहेत त्यात राज्यकारभार मराठीतून ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. मराठीबाबत आज जी उणेपणाची भावना लोकांमध्ये आहे ती या निमित्ताने जाईल.

इंग्रजीला मिळणारी खोटी प्रतिष्ठा त्यामुळे संपुष्टात येईल. इंग्रजी ही आज केवळ काही लोकांची मक्तेदारी झाली आहे. विषमतेची दरी आणखी रूंदावण्याचे ती हत्यार आहे. हा तिचा भाषिक दोष नव्हे, सामाजिक परिणाम आहे. त्याचे परिमार्जन राजकीय निर्णयांनीच होऊ शकते. टिळक, गांधी आणि नेहरूंनी इंग्रजी भाषेत शिकणे आणि व्यवहार करणे वेगळे होते. त्याची मुळं येथील जमिनीत खोल रुजलेली होती. ते अस्सल देशी बेणं होतं. इंग्रजी शिक्षणानं भ्रष्ट न होणारं. आज इंग्रजी भाषेतून शिकणाऱ्या बांडगुळांच्या हातात जर उद्या देशाची सूत्रे जाणार असतील, आणि तशी ती चालल्याचे स्पष्ट दिसते आहे तर या देशाचे भवितव्य खरोखरच कठीण आहे. प्रश्न खरोखर भाषेचा नाही. भाषेच्या परिणामाचा आहे. उत्कृष्ट 'ऑक्सब्रिज' इंग्रजीत इंग्रजी साहित्य शिकविणारा सन्मान्य प्राध्यापक वेगळा आणि अर्धवट इंग्रजी वळणाने संकरित झालेला वाण वेगळा.सरकार दरबारी मराठीला पर्याय नाही, असे आढळले तर त्याचे प्रतिबिंब समाजात उमटेल.

इंग्रजी माध्यमांच्या शाळांची वाढती लाट हा चिंतेचा विषय आहे. ती लाट केवळ इंग्रजी भाषेच्या प्रेमापोटी नाही तर त्यामुळे मिळणाऱ्या सुसंधीमुळे. १९६० मध्ये इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळा टक्केवारीत फक्त अर्धा टक्का होत्या. आज त्यात जवळजवळ चारपट वाढ झाली आहे. इंग्रजी माध्यमिक शाळात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आज साडेचार ते पाच लाख आहे. एकूण विद्यार्थ्यांच्या सुमारे दहा टक्के. ही वाढ थांबवायची असेल तर मराठी माध्यमांच्या शाळेत एक विषय म्हणून इंग्रजी शिकविण्याच्या चांगल्या सोयी निर्माण झाल्या पाहिजेत. उत्तम शिक्षक, पुस्तके त्यासाठी तयार केली पाहिजेत. मातृभाषेतून शिक्षणाला पर्याय नाही असे सर्व तज्ज्ञांचे मत असले तरी मराठी शाळा व इंग्रजी माध्यमाच्या शाळा यांच्यातील दर्जाबाबतची तफावतही वाढत चाललेली दिसते. या शाळांतील शिस्त, सोयी-सुविधा, वातावरण आकर्षून घेणारे असते. त्यामुळे 'मराठी'ला पर्याय नाही हे माहीत असूनही अनेक पालक आपल्या मुलांना तेथे पाठवतात. उदाहरणार्थ पुण्यातील 'लॉयला'सारखी एकही मराठी शाळा का असू नये ? मराठी शाळांच्या सुधारणेला खूप वाव आहे आणि सरकारलाही त्यात खूप करता येण्यासारखे आहे. आज जिल्हा परिषदांनी प्राथमिक शिक्षणाची एवढी हेळसांड चालविली आहे, बदल्यांचे राजकारण असे फोफावते आहे की या शाळा राज्य शासनाने पुन्हा आपल्या ताब्यात घ्याव्यात असे अनेक शिक्षकांचेच मत आहे. शाळा सुधारण्याचा मोठा कार्यक्रम सरकारने हाती घ्यायला हवा. पाठ्यपुस्तकांचा, शिक्षकांचा दर्जा उंचवायला हवा. शिक्षणातले गम्य नसणारे अनेक संस्थाचालक आणि मुख्याध्यापक आज भावी पिढीची वाट लावीत आहेत माध्यमापेक्षा 'शिक्षणाची गुणवत्ता'

हा निकष अनेकदा महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे प्रत्येक इंग्रजी शाळा, किंवा त्या शाळेत जाणारा प्रत्येक विद्यार्थी सर्वांनाच एका मापाने मोजता येणार नाही. मराठी शाळांनी विचार करावा अशी ही स्थिती आहे. लॉयला किंवा सेंट व्हिन्सेंटपेक्षाही उत्तम शाळा काढू आणि चालवू अशी आकांक्षा आपण का धरू नये ? चिपळूणकर, टिळक, आगरकर शाळा काढतात. मग डेक्कन एज्युकेशनला, किंवा शि. प्र. मंडळींना असे नवे उपक्रम का करता येणार नाहीत ? ज्ञानप्रबोधिनी हा अपवाद का राहावा ?

मराठी भाषेचा अजिबात अभ्यास न करता कोणालाही पदवीपर्यंत शिकता येते असे महाराष्ट्र हे भारतातील एकमेव राज्य आहे असे विधान परिषदेत कोणीतरी जबाबदारीने केले. सर्वच शिक्षण कन्नडमधून आणि भाषिक अल्पसंख्याकांचाही अपवाद नाही अशा कर्नाटकच्या कठोर धोरणाची पुनरावृत्ती करण्याचे आपण टाळले पाहिजे. परंतु १२ वीपर्यंत 'मराठी' हा एक विषय म्हणून सक्तीचा केला पाहिजे. आणि ही सक्ती केवळ 'पास' होण्यासाठी, ३५ मार्क मिळविण्यापुरती नव्हे. बारावीच्या मार्कांच्या टक्केवारीत तिचा समावेश करावा आणि इंजिनिअरिंग, मेडिकल किंवा तत्सम कुठल्याही अभ्यासक्रमासाठी प्रवेश देताना त्याचा अपवाद करू नये. ब्रिटन किंवा अमेरिकेत एखाद्या भारतीय किंवा परदेशी डॉक्टरला व्यवसाय करायचा असेल तर आधी त्याला इंग्रजीची परीक्षा द्यावी लागते. मग महाराष्ट्रातील मेडिकल, इंजिनिअरिंग कॉलेजात असो की फर्गसन आणि एस.पी. कॉलेजात, मराठीसह सर्व विषयांच्या एकत्रित गुणाप्रमाणे लागेल त्या क्रमानेच त्याला प्रवेश मिळेल ही अट असण्यात अनुचित काय ? अनेक शाळांत आज केवळ नावाला, तांत्रिक बाब पूर्ण करण्यासाठी मराठी शिकविले जाते. त्याला एका झटक्यात पायबंद बसेल. असं करण्यात कुठलीही कायदेशीर किंवा घटनात्मक अडचण येणार नाही. या देशात राहणाऱ्या प्रत्येकाला येथील एकतरी देशी भाषा आलीच पाहिजे ही माफक अपेक्षा. ती पूर्ण करण्याची ज्यांची इच्छा नसेल त्यांनी मग इंजिनिअर, डॉक्टर होण्याऐवजी स्वतःचे दुकान थाटावे.

●

3832

प्रतिबिंब ९०

४१

# याला काय लेखकांचे स्वातंत्र्य म्हणायचे ?

पुण्यात भरणारे ६३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुणेरी कढीभातासारखे अगदीच मिळमिळीत होणार असे वाटत असतानाच महाराष्ट्रातील झुंझार पत्रकार आणि लोकसत्ताचे संपादक माधवराव गडकरी यांनी त्याला चरचरीत फोडणी दिली आहे. यजमानसंस्था पुणे मराठी ग्रंथालयाने त्याबद्दल त्यांचे खरेतर आभारच मानायला हवेत. पुण्यात आत्तापर्यंत आठ संमेलने झाली. त्यातील सर्वांत शेवटचे, १९७७ चे संमेलन अनेक कारणांनी गाजले. गाडगीळ-भावे-पाध्ये यांच्यातील निवडणुकीने ते गाजले. ग.दि. माडगुळकरांच्या 'नागड्या पोरा'ने ते गाजले. अनिल अवचट यांनी घेतलेल्या भावे यांच्या मुलाखतीमुळे ते गाजले. दुर्गाबाईंच्या कडाडत्या विजेसारख्या भाषणामुळे ते गाजले. आणि प्रत्यक्ष संमेलनाच्या मांडवातही ते गाजले. संमेलन उधळले गेले नाही एवढेच. आता, पुणे नगर वाचन मंदिराने भरविलेले संमेलन एवढे गाजले, आणि पुणे मराठी ग्रंथालयाचे संमेलन मात्र गाजणार नाही हे काही न्याय्य नव्हे. नगर वाचन मंदिर आणि मराठी ग्रंथालय ही पुण्याचे भूषण असलेली दोन्ही ग्रंथालये संघ निष्ठावंतांच्याच हाती. त्यामुळे तर तरतम होणे अधिकच अन्यायाचे झाले असते. (तरीही नगर वाचन मंदिरातील लोकांचा पीळ अधिक घट्ट आहे असे काहींचे म्हणणे आहेच !)

अध्यक्षपदाच्या निवडणुकीत वाद होईल अशी काहींची अपेक्षा होती. निदान (ग्रंथालयाचा कल असणारे) गंगाधर पानतावणे पडले म्हणून तरी आदळआपट होईल असा अंदाज होता. तोही खरा ठरला नाही. किंबहुना (एकदा निवडून आल्यावर) डॉ. युसुफ पठाण हेच ज्ञानेश्वरीच्या सप्तशताब्दीवर्षात सर्वांत लायक उमेदवार कसे आहेत याचाच टाळ-मृदुंगाच्या गजरात जयजयकार सुरू झाला. बॅ. अब्दुल रहमान अंतुले यांच्यासारखेच डॉ.पठाण हेही पूर्वाश्रमीचे चित्तपावन होते एवढे संशोधन मात्र झाले नाही. (अलीकडे अनिल थत्तेंची लेखणी

वाकल्यामुळे, सॉरी, मोडल्यामुळे, असे अनेक संशोधन प्रकल्प थांबले आहेतच). अर्थात पठाण चित्तपावन असण्याची शक्यता नाही. तसे असते तर त्यांनी संतसाहित्याच्या अभ्यासात स्वत:ला कसे बरे गाडून घेतले असते ? कोकणस्थात एकही संत झाला नाही. मग पठाण पूर्वाश्रमीचे देशस्थ असावेत काय ? किंवा कुंभारही असतील. तेच असणे सोयीचे. शिवाय कुंभार आणि देशस्थ यांच्यात अनेक साम्यस्थळे असल्याचे वंशविज्ञानाने मान्य केल्याचे दस्तुरखुद्द इरावतीबाई कर्वे यांनीच लिहून ठेवले आहे. ते असो. मूळ मुद्दा बाजूलाच राहिला. तो म्हणजे पुण्याचे यंदाचे संमलेन गाजवायचे कसे ! नामांतर, राखीव जागा, बेळगाव-कारवार, डांग-भालकीसह संयुक्त महाराष्ट्र, दूरदर्शन की राजीवदर्शन, बोफोर्स, सगळ्या सगळ्या विषयांची पार रया गेलेली. यातून माधवराव गडकरीच काही तरी मार्ग काढतील अशी अंत:प्रेरणा ग्रंथालयाच्या जवळच असलेल्या बेडेकर मिसळीच्या दुकानात कुणाला तरी झाली. त्यांनी उपाध्यक्ष अण्णा जोशींच्या कानावर ही गोष्ट घातली. रिडल्स प्रकरणात माधवरावांनी घडवून आणलेल्या रामायणाच्या स्मृती अण्णांच्या मनात रामशिलेसारख्या घट्ट स्थापित झाल्या होत्याच. त्यांनी थेट माधवरावांना फोन करून गळच घातली. काही झाले तरी यंदाचे पुण्याचे संमेलन गाजलेच पाहिजे. माधवराव सुपारी घ्यायला काही तयार होईनात. अण्णांनी मग उचलला भात्यातला शेलका बाण- 'तुम्ही तयार नसाल तर मग त्यासाठी आम्हाला 'पत्र नव्हे मित्रा'कडे जायला लागेल.'' तो मात्र निघाला रामबाण. धनुर्धर तर खुद्द लक्ष्मणच. 'शत्रू चालेल, पण मित्र नको' या बाणेदारपणे गडकीरींनी मग शरसंधान सुरू केले शरदरावांवर. एकाच बाणात दोन 'मित्र' टिपण्याची धनुर्विद्या, अत्र्यांच्या भाषेत गेल्या दहा हजार वर्षांत, गडकरींशिवाय (अर्जुनाचा अपवाद करायचा का ?) कोणीही संपादन केली नव्हती. रिडल्सवरून निर्माण झालेले रामायण चाळीस दिवस तरी चालले, मात्र संमेलनाचे महाभारतीय युद्ध अवघ्या चार दिवसात संपले. आता मुख्यमंत्री येवोत किंवा न येवोत, संमेलन गाजणार नव्हते, ते आता गाजणार. आले तरी आणि आले नाही तरीही ! अर्थात माधवरावांची ही कामगिरी काही फुकट फौजदारी नव्हती. अण्णांच्या खिशाला त्यामुळे चांगलीच चाट बसणार. बोलीच मुळी तशी होती. संमेलनाच्या निमित्ताने पुणे मराठी ग्रंथालय वीस लाख रुपये जमा करणार आहे. त्यातील पाच लाख रुपये पुढील जागतिक मराठी परिषदेसाठी कार्याध्यक्ष माधवरावांना द्यायचे. हा पाच लाख रुपयांचा धनादेश मुख्यमंत्र्यांच्याच हस्ते देण्यात यावयाचा असून, त्यासाठी समजा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी विधिमंडळाच्या अधिवेशनाचे कारण दाखवून असमर्थता व्यक्त केली तर गोव्याच्या मुख्यमंत्र्यांना आमंत्रित करण्यात

यावे असेही दोघात (अलिखित स्वरूपाचे) ठरल्याचे लोक येथे बोलतात.

मात्र, अण्णा आणि माधवराव यांच्यातील अलिखित स्वरूपाच्या या मैत्री कराराची माहिती नसल्यामुळे भल्याभल्यांचाही कात्रजचा घाट झाला. साहित्याची स्वायत्तता या संकल्पनेची हवा डोक्यात भरल्याने ज्यांचे पतंग आकाशात उंच उंच उडत होते त्यांनी पतंगाच्या स्वभावाप्रमाणे लगेचच या वादावर झडप घातली. साहित्यिक आणि सरकार हे एकमेकांचे अखंड शत्रूच असतात; व्यक्ती, प्रश्न, वातावरण कशामुळेही त्यात परिवर्तन संभवतच नाही असा खोमेनीवादी म्हणजे मूलतत्त्ववादी दृष्टिकोण मांडणाऱ्या आदिमशक्तींना या वादामुळे आनंदच झाला. दुर्गाबाई त्यात अग्रगण्य.त्यांचा याबाबतचा वैयक्तिक आग्रह समजू शकतो. परंतु त्याची व्याप्ती सार्वजनिक करणे हा एकारलेपणा झाला. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातील स्वातंत्र्याचा व स्वायत्ततेचा प्रश्न प्रत्येक वेळी एवढा टोकदार केला तर समाजजीवनच नव्हे वैयक्तिक जीवनही अशक्य होईल. असा आग्रह धरणाऱ्या व्यक्ती अतिव्यक्तिकेंद्रित, समाजापासून तुटलेल्या होणार. त्यांच्या साहित्य निर्मितीच्या प्रेरणाही स्वकेंद्रित राहणार. लेखक इतरांपेक्षा वेगळा असला तरी तो स्वत:ला इतरांपासून मोठा समजायला लागला की घोटाळे सुरू होतात. राजकारण्यांनी सर्वत्र जावे, गल्लीतल्या गणेशोत्सवापासून न्यूयॉर्कमधल्या संयुक्त राष्ट्रसंघापर्यंत कुठेही जावे, भाषणे करावीत, उद्घाटने करावीत, परंतु साहित्य संमेलनाला तेवढे येऊ नये हे म्हणणे हा शुद्ध दांभिकपणा झाला. तार्किकदृष्ट्या ही गोष्ट पटणारी नाही. सिद्धांतात त्याचे रूपांतरच करता येत नाही. राजकारणातील एक विशिष्ट व्यक्ती आणि सर्व राजकीय व्यक्ती यात काही फरक आहे की नाही ? हाच नियम साहित्यिकांना लावायचा तर काय काय म्हणता येईल ? धार्मिक साहित्य लिहिणाऱ्यांनी फक्त बसमधूनच प्रवास करावा, (रेल्वेत त्यांना बंदी आहे) कथाकारांना पदपथावरून चालता येणार नाही (कारण त्यावरून कधी कधी लाल रंगाच्या साड्या नेसलेल्या स्त्रियाही जात असतात). एशियाटिक लायब्ररीत फक्त दुर्गाबाईंनीच बसावे, य.दि. फडके यांना तेथे प्रवेश नाही (कारण त्यांचे बंधू उठसूठ दलित साहित्याचा पुरस्कार करीत असतात) संघाशी निष्ठा बाळगणाऱ्या सर्व साहित्यिकांनी हैदराबाद येथे भरणाऱ्या साहित्य संमेलनाला कधीही जाऊ नये (कारण हैदराबादची स्थापना एका मुसलमानाने केली होती.) वगैरे वगैरे. साहित्य, संस्कृती, समाज, राजकारण, अर्थकारण, विज्ञान अशा असंख्य घटकांचे मिळून एक रसायन होते. त्यातूनच लेखकाच्या मनात निर्मितीचे बीज पडते. त्यातून लेखकाला जसे बाजूला काढणे शक्य नाही, तसे राजकारणी व्यक्तीला साहित्यातून बाद करणेही. यात कदाचित साहित्यिकांचा तोटा होणार नाही. परंतु समाजाचा होईल. कारण एक राजकारणी

सुसंस्कृत होण्याची प्रक्रिया त्यामुळे लांबणीवर पडते. राजकारणी व्यक्तीने साहित्याच्या मांडवात यायला, पहिल्या रांगेत बसायला, संमेलनाला देणगी देण्याला आणि पुस्तके खरेदी करण्याला प्रत्यवाय नाही, तर उद्घाटनालाच तो कसा असेल ? खरे तर आपण इच्छा धरली पाहिजे की आम्हाला केवळ उद्घाटन करू शकेल असा मुख्यमंत्री नको, तर जो स्वतःच्या (साहित्यिक) कर्तृत्वावर अध्यक्ष होईल असा मुख्यमंत्री मिळावा. तो दिवस सुदिन म्हणायचा. साहित्य हे स्वायत्त नाही, आणि साहित्यव्यवहार तर नाहीच नाही. संमेलन हे संमेलन असते. या मांडवात बसले की साहित्यनिर्मितीच्या कळाच सुरू होतात, आणि मुख्यमंत्री त्या दाबून धरतात अशी कोणाची समजूत असेल तर गोष्ट वेगळी. साहित्यात राजकारण आणणाऱ्यांनी राजकारण्यांपासून सावध राहण्याच्या सोवळेपणाच्या गोष्टी करायच्या, यातून होते फक्त स्वतःची फसवणूक !

त्यामुळे राजकारणातील व्यक्तींचा साहित्य संमेलनातील सहभाग याविषयी सार्वत्रिक व चिरंतन सत्याच्या गोष्टी बोलण्यापेक्षा त्या त्या संदर्भापुरता विचार करणे सयुक्तिक होईल. माधवराव गडकरी यांनी यासंबंधी दोनदा लिहिले. दोन्ही वेळा मुंबईचे पर्यायी साहित्य संमेलन आणि अलीकडेच झालेल्या जागतिक मराठी परिषदेचा उल्लेख केला आहे. मुंबईचे पर्यायी साहित्य संमेलन ही अपवादात्मक गोष्ट होती आणि त्याचा जन्म एका विशिष्ट परिस्थितीत झाला होता. त्या वेळचे मुख्यमंत्री बॅ. अंतुले त्याला कारणीभूत होते. स्वतःला प्रतिष्ठित करण्यासाठी त्यांनी काही साहित्यिकांच्या मार्फत प्रयत्न चालविले होते. आणि गडकरींनीच म्हटल्याप्रमाणे "त्यांनी स्वतःच्या अभिनंदनाचा ठराव करून घेतला." त्याविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया उमटली आणि मुंबईचे पर्यायी संमेलन भरवावे लागले. मा. अंतुले, त्या वेळी साहित्य संमेलन भरविण्यात पुढाकार असणारी मंडळी, त्या वेळचे संमलेनाध्यक्ष, या सर्वांचे परस्पर संबंध, यातून एका विशिष्ट वेळेला निर्माण झालेली ती परिस्थिती होती. तिचा निषेध होणे आवश्यक होते आणि तसा तो झालाही. परंतु त्यावरून पुढील सर्व संमेलनांना बंधनकारक ठरेल असा कायमस्वरूपी ठराव करणे योग्य नाही. सत्ताधाऱ्यांना धडा शिकविणे, राजकारण्यांच्या संमेलनातील सहभागाच्या मर्यादा आखून देणे हे काम मुंबईच्या संमेलनाने केले. तेच त्याचे तात्कालिक उद्दिष्ट होते. परिस्थिती असेल त्याप्रमाणे त्याची प्रतिक्रिया उमटते. सगळे साहित्यिक सरकारचे कायम मिंधे असतात, किंवा सरकार प्रत्येक साहित्यिकाच्या स्वातंत्र्याचा सतत संकोच करीत असते या दोन्ही गोष्टी सत्य नाहीत.

साहित्यिक स्वतः चारित्र्यवान, मूल्यभान असणारे, स्वतंत्र विचाराने वागणारे असतील तर राजकारणीही त्यांना दबून वागतात. सरकारवर नैतिक अंकुश

ठेवण्याची जबाबदारी आपल्यावर आहे असे साहित्यिकांना (शास्त्रज्ञ, न्यायाधीश, सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, प्राध्यापक वगैरेंना) वाटत असेल तर त्यासाठी स्वत:चा लौकिक आधी वाढवावा. पंचतारांकित व्यवस्था असेल, विमानाने प्रवास असेल, भरपूर मानधन असेल तरच आम्ही साहित्य संमेलनाला (किंवा इतरत्र कुठेही) येऊ अशी भूमिका घेणाऱ्या साहित्यिकांनी सरकारी किंवा खासगी देणग्या नकोत या म्हणण्याला काही अर्थ नाही. स्वत:च्या खर्चाने संमेलनाला येणारे किती मोठे साहित्यिक आहेत ? साहित्य संस्थांना देणग्या देणारे (श्रीमंती असूनही) किती साहित्यिक आहेत ? किंबहुना साहित्य संस्थांचे सर्वजण सभासद तरी आहेत काय ? आणि या संस्थांच्या कार्यक्रमात पुढाकार किती जणांचा असतो ? यातील काहीही न करता मंत्री नकोत म्हणणे सोपे आहे. जागतिक मराठी परिषदेत मुख्यमंत्री चालतात, साहित्य संमेलनात चालत नाहीत ही केवळ दुटप्पी भूमिका आहे. शब्दच्छल करून त्याचे समर्थन होणार नाही.

पुण्याच्या विद्यमान साहित्य संमेलनाचाच विचार केला तर 'मला उद्‌घाटक म्हणून बोलवा 'यासाठी मुख्यमंत्री कोणाच्या मागे लागलेले नाहीत. आग्रह आहे तो यजमानांचा, महामंडळातील (किमान) काही लोकांचा. विरोधच करायचा असेल तर तो या संस्थेला, महामंडळाला करावा लागेल. मुख्यमंत्र्यांनी स्वत:ला लादले नाही. ते आलेच तर संमेलनाची शोभा वाढेल, किंवा संस्थेला काही फायदा होईल असे संयोजकांना वाटत असेल तर तो त्यांचा विचार. तो स्वार्थीही असेल. दुर्गाबाई म्हणतात त्याप्रमाणे प्रेमाचा नसेलही. आपण देणगी देऊ म्हणून आपल्याला बोलावीत आहेत असा मुख्यमंत्र्यांचा ग्रह झाला असेल तर आमंत्रण स्वीकारायचे की नाकारायचे हा त्यांच्या अखत्यारीतला प्रश्न. साहित्यिक आणि निमंत्रक स्वत:च ओशाळे झाले आहेत की मुख्यमंत्री त्यांना तसे करू पाहात आहेत याचा हिशेब प्रत्येकानी आपल्याशी करावा. त्यामुळे दुर्गाबाई म्हणतात त्याप्रमाणे मुख्यमंत्र्यांनी देणगीचा धनादेश पाठवून द्यावा आणि उद्‌घाटनाला येऊ नये हा जसा एक पर्याय तसाच उद्‌घाटन करावे. परंतु देणगी मात्र देऊ नये हा दुसरा पर्याय उपलब्ध आहे. याचीही आठवण ठेवावी.

•

४२

प्रतिबिंब १९८०

# मधुकाका आणि प्रकाशक संमेलन

मराठी प्रकाशक परिषदेच्या मुंबईतील आगामी संमेलनाच्या अध्यक्षपदी पुण्यातील श्रीविद्या प्रकाशनाचे मालक मधुकाका कुलकर्णी यांची एकमताने निवड झाली आहे. मधुकाकांच्या नावाबाबत परिषदेच्या कार्यकारिणीत एकमत व्हावं, याचं काहींना नक्कीच आश्चर्य वाटलं असणार. मधुकाकांचं प्रकाशन व्यवसायातील कर्तृत्व कोणाला अमान्य आहे, हे काही त्याचं कारण नव्हे. किंबहुना मराठीतील या घडीचा सर्वांत यशस्वी प्रकाशक म्हणून निवड करायची वेळ आली तर मधुकाकांनाच बहुमत मिळणार. दर आठवड्याला किमान एक पुस्तक आणि त्याचं धुमधडाक्याने पुणे, मुंबई आणि कधीमधी मॉस्को, वॉशिंग्टनमध्ये प्रकाशन करणारा दुसरा प्रकाशक आज मराठीत नाही. मराठीतील सर्व नामवंत लेखकांचे मधुकाका प्रकाशक आहेत. श्रीविद्येच्या लेखकांची यादी बरीच मोठी होईल. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यापासून अगदी अलीकडे डॉ. जयंत नारळीकर यांच्यापर्यंत, त्या त्या क्षेत्रातील श्रेष्ठ माणसं हेरून त्यांची पुस्तकं प्रकाशित करण्यात मधुकाकांनी आपलं व्यावसायिक कौशल्य सिद्ध केलं आहे..एक वेगळं उदाहरण, डॉ. य.दि. फडके यांचं देता येईल. १९ व्या आणि २० व्या शतकातील महाराष्ट्रातील राजकीय आणि सामाजिक इतिहासाचे विद्वान भाष्यकार म्हणून य.दिं.चं नाव सर्वांना माहीत आहे. या विषयांवरची त्यांची डझनभर तरी पुस्तके मधुकाकांनी प्रकाशित केली आहेत. किंबहुना डॉ. फडके यांची सर्वच पुस्तकं श्रीविद्या प्रकाशनाचीच आहेत. महाराष्ट्रातील विचारवंत व अभ्यासकांच्या ग्रंथालयातील किमान एक कपाट तरी केवळ श्रीविद्या प्रकाशनाचेच असेल, ही गोष्ट मधुकाकांना निश्चितच भूषणावह आहे. वैचारिक साहित्याची प्रकाशनासाठी जाणीवपूर्वक निवड करणाऱ्या व्यक्तीची प्रकाशक संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड व्हावी, या आनंदाची जातकुळी त्यामुळे वेगळीच आहे. .

तरीही मधुकाकांची निवड एकमताने झाली याचं आश्चर्य कायमच राहातं.

त्याचं कारण बाहेरच्या नसलं तरी प्रकाशन व्यवसायातील लोकांना माहीत आहे. ते म्हणजे मधुकाकांचा फटकळ स्वभाव. या फटकळपणाचं वर्णन मधुकाकांचे मित्र अस्पष्टपणे स्पष्टवक्तेपणा असा करतात. या त्यांच्या धोपटपणाने मधुकाकांना अनेक मित्र मिळाले तसे काही दुरावलेही ! या क्षेत्रात एवढे यश मिळाल्यानंतर त्यांनी काही दिखाऊ उच्चभ्रूपणा कमावला असेल, अशी कोणाची कल्पना असेल तर त्याचा अपेक्षाभंग होईल. व्यवसायानिमित्त मधुकाका अमेरिका, रशिया व इंग्लंडला जाऊन आले. त्या गाजलेल्या 'मॉरिशस' दौऱ्यातही ते होते. बरीच वर्षे मुंबईची आठवडावारी अखंडित सुरू आहे. माधवराव गडकरी, द्वा.भ. कर्णिक, शास्त्रीजी यांच्याबरोबरचा सत्संग नित्यनेमाने सुरू आहे. परंतु हा सगळा ऊन, वारा, पाऊस अंगावर घेऊनही मधुकाकांचं 'मऱ्हाटी' पण अभेद्य आहे. स्पष्टवक्तेपणा हा या मातीचा गुण आहे आणि मधुकाका जन्मले ती माती तर शिवरायांच्या जन्मभूमीच्या कुशीतील. किल्ल्यांवर जाण्याचं वय मधुकाकांनी पार केलं आहे. परंतु प्रकाशन क्षेत्रातले अनेक किल्ले त्यांनी आधीच सर केले आहेत. त्यांच्या प्रकाशनांना मिळालेल्या विविध पारितोषिकांच्या खुणा मधुकाकांच्या कार्यालयात घोड्यांच्या टापांसारख्या, ठायीठायी विखुरलेल्या आहेत. या खुणांकडे कानाडोळा करून मधुकाका रोज सकाळी फर्गसन कॉलेजची टेकडी नियमाने सर करतात आणि उगवत्या सूर्याला साक्षी ठेवून इतर म्हाताऱ्यांच्या हिरवटपणात दिलखुलासपणे सामील होतात. व्रात्य पोराच्या चेहऱ्यावरच शोभणारा मधुकाकांचा खट्याळपणा ऑफिसमध्ये मात्र जवळपास फिरकत नाही. तेव्हा ते नवीन हस्तलिखिते वाचण्यात आणि हिशोबा-टिपणात व्यग्र असतात. दर महिन्याच्या चार तारखेला ठरलेले चेक गेलेच पाहिजेत यावर त्यांचा कटाक्ष असतो. पुस्तक प्रकाशनाच्या वेळीच लेखकाला मानधनाचा अंशिक धनादेश द्यायला ते विसरत नाहीत. हे भाग्य मधुकाकांच्या सर्वच लेखकांना लाभतं की निवडक हे मात्र 'ट्रेड सिक्रेट' आहे. ते त्यांनी जपले आहे. त्यांच्या लेखकांनीही त्याची जाहीर वाच्यता केलेली नाही.

मधुकाकांनी प्रकाशनाचे धडे घेतले ते कॉन्टिनेन्टलच्या अनंतराव कुलकर्णी यांच्यापासून. अनंतराव हे खानदानी प्रकाशक. अभिजात साहित्याची सूक्ष्म जाण असणारे. मानवी संबंधांना व्यवहाराइतकेच महत्त्व देणारे. लेखकांच्या प्रेमासाठी प्रसंगी व्यवहार बाजूला ठेवणारे. व्यवहार आतबट्याचा झालाच तर स्वत:च फटका सोसणारे. कॉन्टिनेन्टलचा सुवर्णमहोत्सव गेल्या वर्षी झाला त्या वेळी या माणसावर लेखक, प्रकाशक, वाचक आणि विक्रेत्यांनी किती भरभरून प्रेम केलं याचं सुखद महादर्शन झालं. लोक इतके आले की जेवण कमी पडलं. काही जणांना विन्मुख

जावं लागलं म्हणून अनंतराव मनातून कष्टी झाले. आज कॉन्टिनेन्टलची पुस्तकं दर्जेदार असतातच, पण त्यांची किंमत वाजवी असते, इतरांच्या तुलनेनं बरीच कमी असते. प्रकाशन व्यवसायाला प्रतिष्ठा व सन्मान प्राप्त करून देणाऱ्या मोजक्या व्यक्तींत अनंतरावांची गणना होते. त्याची मान्यता म्हणून प्रकाशकांच्या पहिल्या संमेलनाच्या अध्यक्षपदाची माळ अनंतरावांच्या गळ्यात पडली होती. तर अशा या अनंतरावांच्या सबनीसी विद्यामंदिरात मधुकाकांनी प्रकाशन व्यवसायाचे प्राथमिक धडे गिरवले. पुढे १९६८ पासून स्वतःचा व्यवसाय सुरू केला. पंचवीस वर्षांच्या आतच इतरांनी हेवा करावा असं आपलं स्वतःचं वेगळं स्थान या व्यवसायात निर्माण केलं.

मुंबई मराठी साहित्य संघाच्या सहकार्याने ३ जून रोजी मुंबईत हे संमेलन भरणार आहे. मराठी प्रकाशन व्यवसाय, अपवाद वगळता आज जवळजवळ मुंबई-पुण्यातच एकवटला आहे. त्यात निमंत्रक संस्था साहित्य संघ. व्यवसायाच्या दृष्टीने संमेलन महत्त्वाचे ठरावे असा हा योग आहे. आतापर्यंतच्या संमेलनांनी एक गोष्ट चांगली झाली, ती म्हणजे या व्यवसायाचे स्वरूप स्पष्ट झाले. प्रकाशन व्यवसायापुढे प्रश्न तरी कोणते आहेत याचे भान आले. अध्यक्षांनी त्यांचा ऊहापोह केला. वक्त्यांनी उपाययोजना सुचविल्या. परंतु त्यातून निर्णायक कृती झाली नाही. प्रकाशक परिषदेला व्यावसायिक संघटनेचे रूप आलेले नाही. दरवर्षी प्रकाशकांचा मेळावा घेण्याखेरीज पुढे पाऊल पडलेले नाही. वृत्तपत्रे, चित्रपट, दूरदर्शन या प्रभावी माध्यमांमुळे पुस्तकांना तीव्र स्पर्धक निर्माण झाले आहेत. त्याचा संघटितपणे प्रतिकार करण्यासाठी परिषद कार्यरत झालेली नाही. दरवर्षी अनेक सूचना पुढे येतात, त्यांतील अनेक चांगल्याही असतात, परंतु त्यांचा पाठपुरावा होत नाही. यंदा या सहाव्या संमेलनात तरी त्या दृष्टीने काही भरीव घडावे, अशी अनेकांची अपेक्षा असणार.

गेल्या पाच संमेलनांत प्रकाशन व्यवसायाचे म्हणून कोणते प्रश्न पुढे आले ? या क्षेत्रातील व्यावसायिकांचे या प्रश्नांचे आकलन किती वस्तुनिष्ठ आहे ? त्यांनी सुचविलेले उपाय कितपत व्यवहार्य आहेत ? गेल्या काही वर्षांत या व्यवसायाचे स्वरूप बदलले आहे. इतर अनेक व्यवसायाप्रमाणेच 'धर्म, व्यवसाय की धंदा' या स्वप्रतिमा पेचप्रचंगातून तो जातो आहे. यात्रेतील हौसे, नवशे व गवशे याप्रमाणे धर्म म्हणून त्याच्याशी एकनिष्ठ असणारे, सर्वोत्तम व्यावसायिक मूल्ये आणि धर्म यांची सांगड घालणारे आणि पैसा मिळविण्यासाठी म्हणून धंदा करणारे अशा तिन्ही प्रकारचे लोक यात आहेत. सर्व व्यावसायिकांची प्रेरणा समान नाही. त्यांचे स्वरूप एकसंध नाही. त्यामुळे या व्यवसायापुढील प्रश्नांचा प्रत्येकाचा अग्रक्रम

वेगळा आहे. उपाययोजनेत त्यामुळे मतभेद आहेत. पुस्तक प्रकाशन हा धंदा नाही, तो व्यवसाय आहे, धर्म आहे, म्हणून प्रसंगी तोटा सोसून, कधी नफ्याचे प्रमाण कमी ठेवून त्याकडे पाहिले पाहिजे असे श्री.पु. भागवत यांच्यासारख्या व्यक्तींना तीव्रतेने वाटते. पुस्तकाची निर्मिती दर्जेदार असावी, किंमत रास्त असावी, विक्री व्यवहार चोख असावा या त्यांच्या माफक अपेक्षा. त्या पूर्ण करू शकतील असे मोजकेच लोक या व्यवसायात आहेत. अनेक पुस्तकांचा दर्जा सुमार असतो, किंमत भरमसाट असते, परंतु कमिशन भरपूर असल्याने धंदा उत्तम होतो. कमिशनाचेही दोन प्रकार आहेत. एक कागदावरचे, एक हातावरचे. त्याशिवाय व्यवसाय होत नाही अशी अनेकांची खात्री झाली आहे. अनेक संस्थांत पुस्तके निवडताना दुहेरी व्यवहार करावे लागतात आणि त्याला शासन, जिल्हा परिषदा, महापालिका, मोठमोठ्या शैक्षणिक संस्था यांचाही अपवाद राहिलेला नाही. चांगल्या व्यावसायिकाच्या उत्तम दर्जाच्या पुस्तकाची जेमतेम हजाराची आवृत्ती निघते आणि लटपट्या प्रकाशक सामान्य पुस्तकही त्याच्या दुपटीने खपवितो. सर्वच समाजाच्या नैतिकतेचा हा प्रश्न असला तरी प्रकाशकांच्या नैतिकतेचाही तो तेवढाच प्रश्न आहे. किमती जास्त ठेवून त्यावर काळे, पांढरे कमिशन देण्याची वेळ येऊ देणार नाही, असा निर्णय प्रकाशक परिषदेने घेतला तर या गैरप्रकारांना आळा बसू शकतो. मग त्यासाठी प्रकाशकांची आचारसंहिता का तयार होऊ शकत नाही ? वाचक पुस्तके घेत नाहीत आणि सरकार अनुदान देत नाही अशा तक्रारी करताना इतरांचा त्यात संबंध येतो. पण आपण आपला व्यवसाय कसा करावा हे ठरविताना कोणी आड येण्याचे कारण नाही. मौज, कॉन्टिनेन्टल यांसारख्या उत्तम प्रकाशकांची दर्जेदार पुस्तके रास्त किमतीला उपलब्ध असताना दुय्यम दर्जाच्या पुस्तकांची किंमत जास्त असते यातील गौडबंगाल समजणे अवघड नाही. सर्व प्रकाशकांना त्यासाठी निर्धार करता येऊ शकतो. 'निदान अवास्तव कमिशन हा प्रकार यापुढे बंद' ही प्रकाशकांनीच करावयाची गोष्ट आहे.

मराठी पुस्तकांचा खप कमी आहे या विषयावर प्रकाशकांची एकवाक्यता आहे. हे मतही फार वस्तुनिष्ठपणे मांडलेले असते असे नाही. कोणी कोणतेही पुस्तक काढावे आणि वाचकांनी ते विकत घ्यावे अशी अपेक्षा करणे भोळसटपणाचे होईल. मराठीतील असे एकही उत्कृष्ट पुस्तक दाखविता येणार नाही की ज्याच्या एकापेक्षा अनेक आवृत्त्या निघालेल्या नाहीत. केवळ कादंबऱ्याच घेतल्या तर ययाति, स्वामीपासून ते अगदी अलीकडे पानिपतपर्यंत लोकांनी त्यांचे भरपूर स्वागत केले.

वाचकांना उलट खंत आहे ती अशा पुस्तकाची निर्मितिमूल्ये पूर्वीसारखी राहिली नाहीत याची. स्वामी, ययाति यांसारख्या कादंबऱ्याच्या स्वस्त आवृत्त्या रा.ज.

देशमुख यांनी काढल्या. स्वामी तर केवळ तीन रुपयांना विकली. परंतु तीस रुपयांची स्वामी आणि तीन रुपयांची स्वामी, दोन्ही प्रती सारख्याच दर्जाच्या होत्या. [illegible] म्हणजे भिकार नव्हे. आजकाल 'स्वस्त' आवृत्त्या म्हणजे लोकांची अनेकदा केवळ फसवणूक असते. साने गुरुजी यांचं श्यामची आई हे पुस्तक वारेमाप खपलं. आज त्याची आवृत्ती एकाच प्रकारच्या कागदातही मिळू शकत नाही. 'रणांगण' अनेक वर्षे उपलब्ध नव्हती. आज ती उपलब्ध झाली आहे, परंतु निर्मिती 'रणांगण'च्या वाङ्मयीन दर्जाला शोभणारी नाही. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे अभिमानाच्या वारशाने जावेत अशा मराठीतील ग्रंथांची आज दुर्दशा झाली आहे. त्याला काय केवळ वाचक जबाबदार आहेत? किंबहुना अनेक उत्तमोत्तम पुस्तके मिळत नाहीत आणि सामान्य पुस्तकांची मात्र गर्दी झाली आहे, अशी आजच्या मराठी प्रकाशन व्यवसायाची स्थिती आहे. असे आत्मपरीक्षण मुंबईच्या संमेलनात होणार आहे काय? चांगली पुस्तके, जास्त किंमत असूनही भरपूर खपू शकतात याचे विश्वास पाटील या नवोदित लेखकाची पानिपत ही कादंबरी उत्तम उदाहरण आहे.

मराठी प्रकाशन व्यवसायातील सर्वच प्रश्नांचा साकल्याने विचार करण्याचे हे स्थळ नव्हे. परंतु सर्वच आघाड्यांवर निराशाजनक स्थिती आहे, हा व्यवसाय डबघाईला आला आहे, पुस्तके खपत नाहीत, वाचक मिळत नाही, स्पर्धा वाढली आहे, भांडवल नाही, सरकारी अनुदान सदोष आहे, ग्रंथविक्रीत भ्रष्टाचार आहे असे केवळ एकांगी चित्र रेखाटण्याने हा व्यवसाय सुकर होईल, असेही नव्हे. पुस्तकांना प्रसिद्धी मिळत नाही, या प्रकाशकांच्या आक्षेपाचेच उदाहरण घेऊ. 'साप्ताहिक सकाळ'मध्ये ग्रंथवार्ता हे आगामी पुस्तकांची माहिती देणारे सदर सुरू आहे. त्यासाठी आपल्या आगामी प्रकाशनांची माहिती पाठवा, असे मराठीतील शंभरावर प्रकाशकांना आवाहन करण्यात आले. फार मोजक्या प्रकाशकांनीच त्याला प्रतिसाद दिला. प्रकाशकांना वाचकांपर्यंत जाण्याची आस आहे का, हाच खरा प्रश्न आहे!

प्रकरण ४३

# सरकार, प्रकाशक आणि वाचक

मराठी प्रकाशक परिषदेचे सहावे अधिवेशन मुंबईत नुकतेच संपन्न झाले. अधिवेशन कमी आणि संमेलन जास्त असाच त्याचा थाट होता. प्रकाशक परिषद वास्तविक व्यावसायिक संघटना; परंतु या अधिवेशनात व्यावसायिक प्रश्नांवर दीड तासाचे अवघे एकच (व एकमेव) चर्चासत्र झाले. त्यात स्वत: काय करता येईल यापेक्षा इतरांनी, विशेषत: सरकारने काय करावे याविषयी जास्त सूचना केल्या गेल्या. त्यात नावीन्य नव्हते. एका वक्त्याने म्हटल्याप्रमाणे, ‘आपण दरवर्षी तेच ते ठराव करतो. सरकार ते वाचीतही नाही. तेव्हा परिषदेतील ठराव सरकारने वाचावेत असाच एक नवा ठराव यावर्षी आपण संमत करावा.'' या विधानात वक्रोक्ती आहेच. परंतु सत्यदर्शनही आहे. अर्थात यावर्षी सरकारच्या बाजूने थोडे वेगळे घडले आहे. ते म्हणजे सरकारचे प्रतिनिधी अधिवेशनाला उपस्थित होते. हे प्रतिनिधित्वही सामान्य नोकरशाहीचे नव्हते. शिक्षणमंत्री विलासराव देशमुख दस्तूरखुद्द उपस्थित होते. त्यांच्या हस्तेच उद्घाटन व्हायचे होते; तथापि समारंभ सुरू झाल्यानंतर बऱ्याच वेळाने ते आले. (त्यांच्या उशिराचे कारण सबळ होते) आणि त्यांच्याच भाषणाने कार्यक्रमाची समाप्ती झाली. अधिवेशाचे अध्यक्ष मधुकाका कुलकर्णी यांनी त्यांच्या भाषणात सरकारला अनेक कारणांसाठी चांगलेच फैलावर घेतले होते. पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ व साहित्य संस्कृती मंडळ ही दोन्ही मंडळे बरखास्त करावीत अशी जोरदार मागणी त्यांनी केली होती. ही मंडळे बरखास्त करण्याची कल्पना शिक्षणमंत्र्यांनी मान्य केली नसली तरी त्यांचा कारभार समाधानकारक नाही हे त्यांनी मोकळेपणाने मान्य केले. शिक्षणमंत्री म्हणून त्यातल्या पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाचे तर ते पदसिद्ध अध्यक्षच आहेत.

प्रकाशकांच्या व साहित्यिकांच्या प्रतिनिधींशी बोलण्याचे व सरकारशी संबंधित प्रश्नांवर लौकरात लौकर निर्णय घेण्याचे स्पष्ट आश्वासन त्यांनी दिले आहे ही या वेळची स्वागतार्ह गोष्ट. सरकार काय करू शकते आणि काय करणार नाही

याविषयी स्पष्टता आली म्हणजे सरकार आणि प्रकाशन व्यवसाय यांच्यातील संबंधात मोकळेपणा तरी येईल. सरकारला उद्देशून दरवर्षी ठराव करण्यात शक्तीचा होणारा अपव्यय त्यामुळे टळू शकेल.

सरकार आणि प्रकाशन व्यवसाय यांच्यातील संबंध कशा प्रकारे असावेत याविषयी साहित्यिक आणि सरकार यांच्यातील परस्परसंबंधाच्या वादाप्रमाणेच दोन मतप्रवाह आहेत. सरकारशी अजिबात संबंधच असता कामा नयेत या स्वायत्ततावादी भूमिकेला प्रकाशन व्यावसायिकांचा मोठ्या प्रमाणावर पाठिंबा नाही. या प्रश्नांवर पूर्वी अनेकदा तात्त्विक चर्चा झालेली आहे. कल्याणकारी लोकशाही देशातील विकसनशील समाजव्यवस्थेत सरकारला व्यापक हितासाठी अनेकदा भूमिका घ्यावी लागते. हे प्रतिपादन मान्य केल्याने स्वातंत्र्याचा संकोच होतो अशी व्यक्तिकेंद्रित भूमिका काहीजण घेतात. असा संकोच खरोच झाला तर त्याविरुद्ध लढणारे हिरो होतात; आणीबाणीच्या काळात दुर्गा भागवतांसारख्यांना असा सन्मान मिळालाही. परंतु असाधारण परिस्थितीतील अपवादाचे सार्वत्रिकीकरण करून त्याचे सिद्धान्तात रूपांतर करणाऱ्यांना तत्त्ववेत्ते म्हणून समाज मान्यता देतोच असे नाही. म्हणून प्रकाशन व्यवसायाच्या काही रास्त मागण्या सरकारपुढे मांडणे आणि त्यांनी त्यासंबंधी निर्णय घेणे यात अस्वाभाविक काही नाही. विशेषत: मराठी प्रकाशन व्यवसायाला 'कमिशन' सारख्या कॅन्सरने ग्रस्त केले असताना त्यातून बाहेर पडण्यासाठी सरकार काही मदत करू शकत असेल तर त्याचे स्वागतच करायला हवे. संमेलनाचे अध्यक्ष मधुकाका कुलकर्णी यांनी या व्यवसायाचे जे प्रश्न आपल्या भाषणात मांडले त्यात पुस्तक विक्रीसाठी द्यावे लागणारे कमिशन हा एक महत्त्वाचा प्रश्न होता. शासकीय संस्थाही कमिशनच्या जाळ्यात अडकल्या आहेत हे त्यांनी नि:संदिग्धपणे पुढे मांडले आहे. सरकारने त्यावर विचार करणे क्रमप्राप्त आहे.

मराठी प्रकाशन व्यवसायात कमिशनची साथ बोकाळली आहे. त्याला जीवघेणी व्यावसायिक स्पर्धा, भ्रष्टाचार आणि व्यवसायाचे मर्यादित स्वरूप कारणीभूत आहेत. त्याचा प्रतिकूल परिणाम म्हणून वाचकांना रास्त किंमतीत उत्तम पुस्तके मिळू शकत नाहीत. विशेषत: ग्रंथालयीन खरेदीत पुस्तकाचा दर्जा व त्याची रास्त किंमत हे घटक निर्णायक न ठरता कमिशन महत्त्वाचे ठरते. वाचकांपर्यंत जायलाच हवीत अशा सर्वच पुस्तकांची खरेदी ग्रंथालयासाठी होते असे नाही. त्यामुळे सुमार दर्जाची पुस्तकेही जास्त खपू शकतात आणि उत्तम पुस्तके कारण नसताना महाग होतात. यावर मधुकाकांनी आणि इतरांनीही एक उपाय वारंवार सुचविला आहे. तो म्हणजे अशी उत्तम पुस्तके सरकारने स्वत:च खरेदी करून अनुदान मिळणाऱ्या ग्रंथालयांना अनुदानाचा भाग म्हणून द्यावीत. या योजनेची कार्यवाही कशी करता

येईल याविषयी तपशिलाने सांगता येईल. ही पुस्तके कशी निवडावीत, त्यांची किंमत किती असावी, निवडलेल्या पुस्तकांच्या दर्जासंबंधी मोकळेपणाने चर्चा करण्याचा मार्ग कसा उपलब्ध असावा, वर्षातून किती वेळा अशी पुस्तके खरेदी करावीत वगैरे वगैरे. परंतु ही कल्पना तत्त्वत: मान्य झाली तरच तपशिलाची चर्चा करण्यात अर्थ. समजा ही कल्पना मान्य झाली तर त्यातून चांगली पुस्तके ग्रंथालयातून वाचकांपर्यंत हमखास जाण्याचा मार्ग खुला होईल आणि त्याच्या किमान प्रती संपण्याची शक्यता असेल तर वैयक्तिक ग्राहकाला रास्त किंमतीत ते पुस्तक मिळू शकेल. कमिशनच्या व त्यामुळे रास्त किंमतीच्या दुष्ट चक्रातून किमान काही पुस्तकांची सुटका होऊ शकेल. पुस्तकाच्या किंमती कमी झाल्या तर त्याचा खप वाढेलच असे नाही असे अनेक प्रकाशक जास्त किंमतीचे लंगडे समर्थन करतात. गरज असली तर वाचक जास्त किंमतही द्यायला तयार होतो असेही एक म्हणणे असते. परंतु ही दोन्ही उत्तरे वकिली थाटाची आहेत. पुस्तक योग्य किंमतीत मिळण्याचा वाचकाचा हक्क प्रकाशकांना मान्य आहे की नाही हा मूळ मुद्दा आहे. तो मान्य होणार असेल तरच 'ग्रंथवाचनाची संस्कृती' या संबंधी बोलण्याचा अधिकार प्रकाशकाला प्राप्त होतो. अन्यथा 'पुस्तके खपत नाहीत' ही त्यांची तक्रार दांभिकपणाची म्हणावी लागेल. सरकारने हा ग्रंथ खरेदीबाबत निर्णय घेतला तर तो या व्यवसायातील चांगल्या प्रकाशकांना मोठाच आधार होईल.

पुस्तकांवर जकात कर असू नये, प्राप्तीकराबाबत या व्यवसायाला पूर्वी काही सवलत होती ती पुन्हा प्राप्त व्हावी, ग्रंथखरेदी करणाऱ्या व्यक्तीलाही प्राप्तीकरातून विशिष्ट मर्यादेपर्यंत सवलत मिळावी, भांडवल व कागद रास्त दरात उपलब्ध व्हावे अशा काही मागण्या या व्यावसायिकांच्या आहेत आणि त्या सरकारशी संबंधित आहेत. ग्रंथव्यवहार समाजाच्या संस्कृतीशी व आरोग्याशी संबंधित असल्याने सामाजिक स्वास्थ्यासाठी सरकारने अशा सवलती देणे त्यांच्या व समाजाच्याही फायद्याचे आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस नेमावे लागतात व अलीकडे तर ते जास्तच प्रमाणात नेमावे लागातात. त्यांच्यावर होणाऱ्या खार्चविषयी आत्तापर्यंत कोणी तक्रार केल्याचे ऐकिवात नाही. ग्रंथ समाजाच्या संस्कृतीचे रक्षणकर्ते असल्याने त्यांच्यावरील शासकीय खर्चालाही हरकत होण्याचे कारण नाही. मराठीत वर्षाकाठी जेमतेम १५०० पुस्तवे प्रकाशित होतात. त्यातील ग्रंथ या पदवीस पात्र ठरणारी जेमतेम शे-दोनशे पुस्तके असतील. अशा या मर्यादित व्यवसायाला शासनाने प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष साहाय्य करावे अशी मागणी केल्याने अभिव्यक्ती स्वातंत्र्याला बाध येतो हा कांगावा खरा नाही.

साहित्य संस्कृती मंडळ, पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, ग्रंथाली वाचक चळवळ याविषयी मधुकाकांचा राग फार जुना आहे. त्यामुळे ती बरखास्तच करून टाकावीत असे त्यांचे म्हणणे. (ग्रंथालीच्या बरखास्तीची मागणी का केली नाही असे विचारले तर मधुकाका म्हणतील ग्रंथालीचे अस्तित्व सध्या आहे कुठे ?) या मंडळाच्या स्थापनेमागे विशिष्ट भूमिका होती. त्यात बदल व्हावा अशी उलथापालथ महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात गेल्या २५/३० वर्षांत झालेली नाही. परंतु या दोन्ही मंडळांचे काम चांगले चाललेले नाही याविषयी सगळ्यांचे एकमत दिसते. मंत्रिमहोदयही त्याला अपवाद नाहीत. त्यामुळे त्यांच्या कामकाजात परिणामकारक चांगले बदल होतील अशा तऱ्हेने त्यांची पुनर्रचना अपरिहार्य आहे. सरकारची प्रत्येक गोष्ट वाईटच असते या समजाला धक्का देण्याचे काम शिक्षणमंत्र्यांना करता येईल. कार्यक्रमाला वेळेवर उपस्थित राहून मंत्री उशिरा येतात हा समज (की वस्तुस्थिती ?) आपल्याला खोटा ठरवायचा होता; परंतु अपरिहार्य कारणाने उशीर झाल्याने या वेळी ते शक्य झाले नाही असे शिक्षणमंत्री विलासराव देशमुख म्हणाले. अधिक महत्त्वाचे समज, गैरसमज दूर करण्याची संधी त्यांना उपलब्ध आहे.

सरकारला प्रकाशन व्यवसायासाठी काय करता येईल हा एक भाग झाला. परंतु स्वत: प्रकाशक काय करायला तयार आहेत हेही पाहिले पाहिजे. मराठी प्रकाशन व्यवसायाचा जीव आधी लहान. बंगाली, मल्याळी या इतर भाषेतील व्यवसायाची तुलना नेहमी होते. कलकत्त्याच्या ग्रंथ जत्रेत हजारो लोक मनसोक्तपणे सामील होतात आणि पुस्तकांची उदंड खरेदी होते. केरळमध्ये केरळ शास्त्र साहित्य परिषद ही एकटी प्रकाशन संस्था (ती लेखकांची सहकारी संस्था आहे!) दररोज दोन पुस्तके प्रकाशित करते आणि लेखकांना सर्वाधिक रॉयल्टी देते. त्यांच्या वितरण व्यवस्थेचे जाळे संपूर्ण राज्यात पसरले आहे. त्यापेक्षा मोठा संदर्भ हवा असेल तर अमेरिकेतील प्रकाशन व्यवसायासंबंधीचे चित्र पाहता येईल. 'पब्लिशर्स विकली' ने १९८९ ची ताजी आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. या वर्षी ४५ हजार पुस्तके प्रकाशित झाली. विक्री होती १३०० कोटीपेक्षा जास्त डॉलर्सची, म्हणजे जवळजवळ २५ हजार कोटी रुपयांची. आपल्या संरक्षण खात्यासाठी देखील यावर्षी (केवळ) १५ हजार कोटींची तरतूद होती. 'पेपरबॅक्स' मधील स्वस्त आवृत्त्या जगभर लाखावर खपतात; परंतु हार्ड कव्हर, कातडी वा कापडी पुठ्ठा बांधणीच्या, म्हणजे जास्त किंमत असलेल्या पुस्तकांचा खप तेथे किती आहे ? गेल्या वर्षी ललित वाङ्मय व इतर पुस्तकांपैकी १४० पुस्तकांचा खप एका वर्षात एक लाखापेक्षा जास्त होता. 'अनकॉमन थॉटस् ऑन कॉमन थिंग्ज' या पुस्तकाचा

खप सर्वाधिक म्हणजे ९ लाख २ हजार प्रती एवढा होता. अमेरिकेत एका घरात दोन दोन टी.व्ही. असले आणि जास्त लोक टी.व्ही. पाहात असले तरी तेवढेच लोक वाचनही करतात. १९६२ व १९८८ या दोन वर्षांची तुलना केली तर पुस्तके वाचणाऱ्या वाचकांची संख्या १६ टक्क्याने वाढली आहे. यापुढे मराठी पुस्तके खपत नाहीत याचे खापर दूरदर्शनवर आणि वाचकांवर फोडून मोकळे होता येणार नाही. ढवळे ग्रंथ यात्रेचे रघुवीर ढवळे यांनी त्यांच्या तीन वर्षांतील ७५ ग्रंथयात्रांचा अनुभव सांगितला. त्यात ३० लाख विक्रीपैकी २२ लाखांची पुस्तके वैयक्तिक ग्राहकांनी घेतली असा त्यांचा निष्कर्ष आहे. वाचकांपर्यंत पुस्तके जातच नाहीत हा सर्वांत मोठा अडथळा आहे. जायचे ठरविले तर पुस्तके खपतात हे पानिपतसारख्या उदाहरणांनी दिसू शकते. त्याच्या दहा हजार प्रती आत्तापर्यंत विकल्या गेल्या यावरच मराठीतील अनेक प्रकाशकांचा विश्वास नाही. त्यांना तो अजूनही प्रचाराचा भाग वाटतो. त्यामुळे मराठी प्रकाशन व्यवसायाची सद्य:स्थिती आधी वस्तुनिष्ठपणे समजून घेतली पाहिजे. त्याशिवाय त्यावर इलाज तरी कसा करणार ? आज मराठी प्रकाशनासंबंधी धड आकडेवारीही उपलब्ध नाही. वार्षिक अधिवेशनाच्या निमित्ताने स्वत:चा शोध घ्यायला हवा. त्यासाठी आधी अभ्यासगट नेमता येतील. त्यांच्याकडून निबंध लिहून घेता येतील, त्याचे आधीच वितरण करता येईल. परिषदेला स्वत:ची पत्रिका प्रकाशित करता येईल. संवाद साधता येईल. मराठी प्रकाशन व्यवसायाचे आधुनिकीकरण (केवळ यांत्रिकीकरण किंवा संगणकीकरण नव्हे) झाल्याशिवाय तो सद्य:स्थितीतून बाहेर पडणार नाही. त्यासाठी कोणीतरी पुढाकार घ्यायला हवा. प्रकाशक परिषदेचे नाव त्यासाठी चटकन डोळ्यासमोर येते.

•

प्रकरण ४४

# रायगडचे सारस्वत

रायगड जिल्हा शेतकरी कामगार पक्षाचा बालेकिल्ला. नोव्हेंबरमध्ये लोकसभा निवडणुकीत बॅ.ए.आर. अंतुले यांनी खासदार दि.बा. पाटील यांचा पराभव करून शेकापला एक धक्का दिला. काँग्रेसपेक्षा बॅ. अंतुले यांचा त्यातील वैयक्तिक वाटा महत्त्वाचा. काँग्रेसला शिवसेनेने या विधानसभा निवडणुकीत आव्हान दिले. रायगडमधील आग्रीसेनेचा उदय हा शेकापच्या विरोधात. शेकापच्या पाटील मंडळींनी रायगडवर गेली १५-२० वर्षे अधिराज्य गाजविले. त्यांचे तत्त्वज्ञान मार्क्सवादी असले तरी राजकीय शैली काँग्रेसचीच. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रभाकर पाटील आणि विधानसभेतील सध्याचे विरोधी पक्षनेते दत्ता पाटील हे सख्खे बंधू. दत्ता पाटील या वेळी पुन्हा विधानसभेच्या निवडणुकीत उतरले होते. काँग्रेस-आगरी सेना आणि भाजप-शिवसेना युती यांच्याशी एकाच वेळी राजकीय वर्चस्वासाठी त्यांची लढाई सुरू होती. पनवेल, पेण आणि अलिबाग तालुक्यांतील या राजकीय गदारोळापासून अलिप्त राहून शांतपणे समृद्ध जीवन व्यतीत करणारी काही मोठी माणसं, काही जणांच्या स्मृती आणि काही स्थळं समुद्रावरील सायंकाळच्या शीतल वाऱ्याप्रमाणे मनाला नीरव आनंद देऊन जातात.

अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण. पण वस्ती अवघी दहा-बारा हजार. एका तासात सगळा गाव फिरून होतो. चुंबकीय वेधशाळा येथे आहे. त्या कामात व्यत्यय येऊ नये म्हणून १९६० पर्यंत येथे वीजही आली नव्हती. आजही उच्च दाबाच्या विजेच्या वापरावर निर्बंध आहेत. गावात उद्योगधंदे जवळजवळ नाहीतच. व्यापारीकरणापासून मुक्त असलेले, माडा-पोफळींच्या बागात लपलेले, छोट्या वळणदार रस्त्यांचे, कमालीची स्वच्छता असलेले समुद्रकिनाऱ्यावरील हे छोटे टुमदार गाव शनिवार-रविवार मात्र मुंबईहून येणाऱ्या तरूण प्रवाशांनी गजबजलेले असते. अलिबागचा समुद्रकिनारा शांत आहे. ओहोटी असेल तर गुडघाभर पाण्यातून कुलाब्याच्या जलदुर्गापर्यंत जाता येते. खांदेरी, उंदेरी आणि कुलाबा

असे समुद्रातील हे तीन किल्ले म्हणजे मुंबईचे एकेकाळचे रखवालदार. समुद्रमार्गाने येणाऱ्या इंग्रज, पोर्तुगिजांना शह देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी द्रष्टेपणाने मराठी आरमाराची उभारणी केली. त्यात कोकण किनाऱ्यावरील सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, देवगड, सुवर्णदुर्ग, जंजिरा या सागरी किल्ल्यांचे महत्त्व वादातीत आहे. सागरी किल्ले आणि कान्होजी आंग्रे हे मराठी दौलतीचे त्या वेळचे भक्कम आधारस्तंभ. आंग्रे यांचा वाडा आज तीनशे वर्षांनंतरही अलिबागमध्ये उभा आहे. विशेष म्हणजे भारताचे माजी सरसेनापती जनरल अरुणकुमार वैद्य हेही अलिबागचे. यांचे वडिलोपार्जित घर आंग्रे वाड्याच्या जवळच आहे. आंग्रे यांचे अलिबागच्या किनाऱ्यावरील स्मृतिस्मारक आज मोडकळीस आले आहे. त्याचा कलात्मक जिर्णोद्धार करण्याचे प्रयत्न गेली दोन-तीन वर्षे सुरू आहेत. परंतु त्यात फारशी प्रगती नाही. जन. वैद्य यांची स्मृतीही जपली जायला हवी.उद्याच्या पिढीची तीच प्रेरणास्थाने आहेत. इतिहास जिवंत होतो तो अशा स्मारकातूनच. अलिबाग म्हणजे केवळ पर्यटकांचा किनारा नव्हे. स्वातंत्र्यासाठी आणि देश रक्षणासाठी प्राणार्पण करणाऱ्या वीरांचा तो सागरही आहे.

अलिबागपासून जवळच सासवणे नावाचं निसर्गात लपलेलं, समुद्रकिनाऱ्यावरचं छोटसं गाव. शिल्पकार करमरकर यांचं हे गाव. करमरकर हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शिल्पकार. युरोप व अमेरिकेत उच्च शिक्षण घेतलेलं, प्रवास केलेला. अनेक राष्ट्रीय सन्मानांचे मानकरी. पण करमरकर महाराष्ट्राच्या आजही लक्षात आहेत, ते पुण्यात शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूलमध्ये १९२८ मध्ये त्यांनी उभारलेल्या छत्रपतींच्या अश्वारूढ ब्राँझच्या पुतळ्यामुळे. त्यानंतर शिवाजीचे शेकडो पुतळे उभारले गेले. प्रत्येकाचं काही ना काही वैशिष्ट्य आहेच. पण करमरकरांच्या पुतळ्याचे कलात्मक सौंदर्य अद्यापही अपराजित आहे. कलकत्ता, बडोदे, मुंबई अशा ठिकाणीच व्यवसायाच्या निमित्ताने त्याचं मुख्य वास्तव्य राहिलं असलं तरी या सासवणे गावी त्यांनी स्वतःची सुंदर, देखणी, दुमजली वास्तू उभारली. पुढे मोठं अंगण, मागे नारळ, आंबा, फणसाची झाडं, छोटीशी विहीर. करमरकर याचं १९६७ मध्ये निधन झालं. त्यांचे चिरंजीव विश्वासराव करमरकर यांनी मात्र ही वास्तू आणि त्यातील शिल्पकृतींचा खजिना प्राणापलीकडे जपून ठेवला. श्री. करमरकर ऑर्डनन्स फॅक्टरीजचे डायरेक्टर जनरल म्हणून निवृत्त झाले आणि कलकत्त्याहून येऊन आता त्यांनी मुक्काम ठोकला आहे सासवण्याच्या या कलावंताच्या कलात्मक वास्तूत. करमरकरांच्या अनेक कलाकृतींचं प्रदर्शन पहिल्या मजल्यावर मांडलेलं आहे. रसिक प्रेक्षक भेटला तर त्याला ते दाखवण्यात करमरकरांना मनापासून आनंद होतो.आपल्याकडे वडिलांच्या कलेचा वारसा फारसा आलेला नाही, असं ते म्हणत

असले तरी त्यात विनयाचा भागच जास्त असावा. सौ. करमरकर मूळच्या पुण्याच्या. परंतु त्यांच्यातील आतिथ्यशीलतेला आणि मोकळेपणाला पुणेरीपणाची झालरदेखील नव्हती. या संग्रहाचे चित्रीकरण व्हायला हवे. 'प्रतिभा-प्रतिमा'साठी दूरदर्शनला तर हा एक उत्तम दृष्य विषय आहे. करमरकरांच्या शेजारीच दोन वाड्या टाकून अच्युत बर्वे यांचं घर आहे. 'सुखदा'मुळे बर्वे आणि 'अन्नपूर्णा'मुळे मंगला बर्वे मराठी सारस्वतांच्या गळ्यातील ताईत आहेत. बर्वे अकाली गेले. बर्व्यांची ही वाडी मात्र फळाफुलांनी भरलेली आहे. घर बंद आहे एवढंच.

सासवण्याहून येताना झिराड लागतं. या छोट्याशा गावात एक ८५ वर्षांची तरुण, तरतरीत वृद्धा राहते. तिचं नाव दुर्गा खोटे. मुंबईतील नामवंत बॅरिस्टर लाड यांची कन्या, शेअर बाजारात उत्तम नाव (आणि पैसाही) कमावलेले विश्वनाथ खोटे यांची सुविद्य पत्नी १९३२ मध्ये रुपेरी पडद्यावर येते ही कला क्षेत्रातील सांस्कृतिक क्रांतीच होती. १९३०च्या 'अयोध्येचा राजा'मधील राणी तारामतीपासून अगदी अलीकडच्या राजकपूरच्या 'बॉबी'मधील आजीच्या भूमिकेपर्यंत दुर्गा खोटे यांनी रुपेरी पडद्यावरील सुवर्णमहोत्सव साजरा केला आहे. झिराडला दहा एकरांच्या शेतावर किंवा कोकणी भाषेत वाडीवर त्या एकट्याच राहतात. कर्करोगाने त्या आजारी आहेत.परंतु मनावर त्याचं यत्किंतही सावट नाही. वाणी लखलखीत आहे. बोलणं प्रसन्न आहे. जुन्या गोठ्याचंच घर केलं आहे. बाहेर शेणानं सारवलेलं मोठं अंगण आहे. घरात मोजकं सामान, लिहायचं सुंदर टेबल आणि त्यावर भगवद्गीतेपासून आजच्या लोकप्रिय कादंबऱ्यापर्यंत पुस्तकं पडलेली. नातवंडं फिल्मी व्यवसायातच स्थिर झाली आहेत. 'दुर्गा खोटे प्रॉडक्शन्स' त्यांच्या हातात सोपवून आजीबाई आता नारळी पोफळींच्या प्रॉडक्शनमध्ये गुंतलेल्या आहेत.

झिराडच्या पुढे चोंढी लागतं. रमेश मंत्री आठ-पंधरा दिवसांनी तिथं वस्तीला असतात. मंत्रींचे वडील कोकणातून वर देशावर आले आणि कोल्हापुरात स्थायिक झाले, तेव्हा मंत्री एक महिन्याचे होते. मंत्री मुंबईकर झाले. आता त्यांची मुलं पुन्हा कोकणात उतरली आहेत. त्यांनी एक छोटीशी वाडी विकत घेतली आहे. पन्नास-पाऊणशे झाडं, विंहीर आणि एक टपरीवजा घर. झिराडला दुर्गा खोटे राहतात. त्याच्यापासून फर्लांगावर रवींद्र पिंगे यांचं आजोळघर असल्याची मंत्रींची माहिती आहे. अर्थात पिंगे यांचं कोकणातलं मूळचं गाव विजयदुर्ग खाडीवरील उपळे. मात्र त्यांची सर्व हयात मुबईत गेल्याने इतर 'सारस्वतात'आणि त्यातही त्यांच्या खाण्यात व साहित्यात जे कोकणप्रेम दिसतं ते पिंग्यांच्या निदान लेखनात फारसं नाही.

झिराडपासून उजवीकडच्या फाट्याने समुद्राकडे गेलं की आणखी एक गाव लागतं. किहीम. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने ते अलीकडे चांगलेच लोकप्रिय केले आहे. किहीमच्या किनाऱ्यावर केवळ तंबू ठोकून बनवलेलं पर्यटक-निवास हे तेथील आकर्षण आहे. सुंदर किनारा, स्वच्छ समुद्र, खाली जमीन, जमिनीवर माडाचं बन आणि वर मोकळं चांदणी आकाश हे मुंबईच्या पर्यटकांचं आकर्षण आहे.गेटवे ऑफ इंडियापासून लक्झरी लाँचने निघालं की दीड तासात मांडवा किंवा रेवसच्या जेटीवर उतरायचं की बसने अर्ध्या तासात किहीम. दोन रात्री आणि तीन दिवसांसाठी प्रत्येक जोडप्याला खर्च फक्त अकराशे रुपये ! पंचतारांकित खर्चात लक्षतारांकित आनंद. अर्थात ताऱ्यांचा आनंद खराच. कारण एवढं स्वच्छ, निरभ्र, निळे आकाश शहरात दुर्मिळच ! किहीमच्या किनाऱ्यावर लाखभर तारे नक्कीच मोजता येतात. पण किहीमचं महत्त्व तेवढंच नाही. ताऱ्यांऐवजी पक्षी मोजणारा एक माणूस इथे रमत असे आणि त्याचं वडिलोपार्जित घरही इथे आहे. हा माणूस म्हणजे सालिम अली ! भारतीय पक्षी निरीक्षणशास्त्राचा आणि निसर्ग संरक्षण चळवळीचा पितामह सालिम अली. अगदी समुद्राला लागून असलेलं, छोट्या दोन-तीन वास्तूंचं १९३९ मध्ये बांधलेलं हे विस्तीर्ण आवार आज सुनं-सुनं वाटत आहे. पुण्यातील पक्षितज्ज्ञ प्रकाश गोळे व त्यांच्या पत्नी स्वाती गोळे सालिम अली यांचे जवळचे मित्र. या घरात ते राहिले आहेत. पक्षीनिरीक्षणासाठी सालिम अली अधूनमधून इथे येत. शेवटी शेवटी तर त्यांचं वास्तव्य इथे अनेकदा होई. मुंबईत त्यांना घर बदलून बहिणीकडे राहावं लागलं त्यावेळी त्यांनी त्यांचं बरंचसं ग्रंथालय या छोट्या बंगलीत हलवलं होतं. किहीमला येणाऱ्या पर्यटकांना हे घर उघडं केलं तर सालिम अलींचं स्मृतिदर्शन होऊ शकेल. पण घरांच्या बाबतीत सालिम अली दुर्दैवीच म्हणायचे. मुंबईत ते शेवटी ज्या घरात राहिले ते घर त्यांचे स्मारक म्हणून जतन करण्यासंबंधी वाद झाला. लोकांना वाटलं ते स्वतः अलींचंच घर आहे. पण ते निघालं त्याच्या बहिणीचं. ते विकून तेथे मोठी इमारत बांधण्याच्या कल्पनेला कायदेशीर हरकत घेणे कोणालाच शक्य नव्हते. किहीमचं हे घर हसन फैजुल हुसेन अली यांनी बांधलं. त्याचंही स्मारकांत रूपांतर करणं कायदेशीर दृष्ट्या कितपत शक्य आहे हे तपासलं पाहिजे. परंतु पक्ष्यासारखंच जीवन जगलेल्या सालिम अलींना असं एखाद्या घरात स्मृती म्हणून राहणं कितपत पसंत पडलं असतं याची शंकाच आहे. खांद्यावर दुर्बिण, गळ्यात कॅमेरा, खिशात नोटबुक आणि हातात अलींचंच भारतीय पक्ष्यांचं पुस्तक घेऊन फिरणारी तरुण पिढीच त्यांची आठवण चिरंतन ठेवील.

सायंकाळी मांडव्याला गेलं की सूर्यास्ताचं डोळ्यांत साठवावं असं रूप असतं.

त्यानंतर समोरच लखलखणारी मुंबई दिसते गेटवे ऑफ इंडिया जणू हाकेच्या अंतरावर. मुंबईहून छोट्या छोट्या लाँचेसने शनिवार-रविवार रायगड जिल्ह्याच्या या किनारपट्टीकडे अनेक लोक आता येतात. राष्ट्रीय केमिकल्स आणि फर्टिलायझरच्या प्रकल्पामुळे एक छोटसं नगरच उभं राहिलं आहे. रासायनी, न्हावाशेवा हे प्रकल्पही बाहेरच्या लोकांना आमंत्रित करीत असतात. मुंबई ते उरण हा पूल झाला तर मुंबई व कोकण हे अंतर आणखीनच कमी होईल. आज रायगड जिल्ह्याला भाताचं कोठार म्हणतात. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांपेक्षा येथे जास्त भात पिकतो. पण या जिल्ह्याचं औद्योगीकरण आता फारसं दूर नाही. मुंबईतील गुंतवणूक येथे वाढू लागली आहे. टाटांपासून मलय्यांपर्यंत अनेक धनाढ्यांची हॉलिडे होम्स आत्ताच इथे झाली आहेत. जमीन विक्रीचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर होताहेत. पर्यटनही पंचतारांकित होत आहे.आत्तापर्यंत व्यापारी संस्कृतीपासून दूर असलेला रायगड बदलत जाणार आहे. पण स्थानिकांना न्याय देऊन, त्यांना सामावून घेऊन बदल झाला तरच तो टिकाऊ असेल. थळ-वायशेत प्रकल्पासाठी जमिनी ताब्यात घेण्यावरून झालेलं हिंसक आंदोलन अद्यापही विसरलं गेलेलं नाही. लोक आता जागरूक झाले आहेत. त्यात ही कोकणी माणसं ! त्यांना सगळ्या जगातील बितंबातमी असते. राजकारणात बुशपासून गोर्बाचेवपर्यंत सर्व गप्पा मारून झाल्या तरी आपलं मत ते कोणाला सांगत नाहीत. कोकणची हीच तर गंमत आहे !

•

प्रकरण ४५

# एस. एम. : यशस्वी पराभूत

एस. एम.जोशी यांना देशभरातील राजकीय व सामाजिक नेत्यांनी वाहिलेल्या आदरांजलीत एक गोष्ट वारंवार अधोरेखित झाली आहे. ती म्हणजे त्याचं 'माणूस' म्हणून असलेलं मोठेपण. सत्ता, संपत्ती, अधिकार नसतानाही 'माणूस' म्हणून उच्च प्रतीचं जीवन जगता येतं याचं एस.एम. हा एक साक्षात्कार आहे. लोक आपल्यावर एवढं प्रेम का करतात याचं कोडं एस.एम. यांना पडत असे. त्याचं उत्तर शोधण्याचा त्यांनी आपल्या परीने प्रयत्न केला असला तरी जाहीरपणे ते सांगण्याचं औधत्य ते कधीच करू शकले नसते. माणूस म्हणून मी श्रेष्ठ आहे, नैतिकता ही माझा प्राण आहे असं स्वतःबद्दल कोण म्हणणार ? निदान एस.एम.तरी नाही ! एस.एम. हा देशापुढील नैतिक दीपस्तंभ होता असे नानासाहेब गोरे म्हणतात तेव्हा सर्व समाजाच्या वतीने केलेलेच ते विधान असते. एस.एम. यांच्या आजारपणात आणि अंत्ययात्रेसाठी समाजाच्या विविध स्तरातील आणि राजकारणाच्या सर्व आखाड्यातील माणसं मोठ्या संख्येनं आली. एस.एम.एका पक्षाचे, संस्थेचे नव्हते, सर्व समाजाचे होते. हेच त्यांचं मोठेपण होतं. स्वतःबद्दल लिहिताना एस.एम. म्हणतात, 'प्रामाणिकपणे मला असे वाटते की, मी एक सामान्य माणूस आहे.' असं स्वतःबद्दल लिहू शकणारा माणूस खरोखर असामान्यच असायला हवा.अनेक सामान्य माणसांना आपण असामान्य आहोत असं ज्या समाजात वाटतं तिथं एस.एम.म्हणूनच एक अप्रुप होतं, नवल होतं.

राजकीय वादाच्या आणि पक्षभेदांच्या सीमारेषा पुसून एस.एम.नेहमी माणसांना भिडत राहिले, 'थोर समाजवादी नेते' असा त्यांचा वारंवार उल्लेख होतो. त्या पक्षात ते होते. त्यानंतर जनता पक्षातही होते. परंतु पक्षाच्या घट्ट चौकटी त्यांना कधी मुक्त विचारापासून बंदिस्त करू शकल्या नाहीत. कधी कधी त्यामुळे पक्ष अडचणीतही येत असे. शरद पवार हेच आमचे नेते अशी घोषणा १९७८ च्या निवडणुकीच्या वेळी त्यांनी केली. त्या वेळी जनता पक्षाचे अनेक लोक नाराज झाले. पण त्या वेळी त्यांच्या मनात व्यक्तीपेक्षा येथील सामाजिक वास्तवाचं स्वच्छ भान होतं आणि ते स्पष्टपणे बोलून दाखविण्याची हिंमतही होती. 'सकाळ'चे

त्या वेळचे संपादक श्री. ग. मुणगेकर आणि मी अण्णांच्या सदाशिव पेठेतील घरी अनेकदा अनौपचारिक गप्पांसाठी जात असू. त्यांच्या वरील विधानाचा संदर्भ निघाला त्या वेळी ते म्हणाले होते, 'महाराष्ट्रात आता एस.एम.चे नेतृत्व कोणी मान्य करणार नाही हे ओळखले पाहिजे. बहुजन समाजातील नेतृत्वाचेच आता संगोपन केले पाहिजे.'

एस.एम. यांचे विश्लेषण काहींना प्रच्छन्न जातीय वाटेल. समाजावादासारखी, वैज्ञानिक पायावर आधारित विचारधारा मानणाऱ्याने अशा तऱ्हेच्या जातीय परिभाषेत बोलावे याचे वैषम्य वाटेल. परंतु येथील समाजव्यवस्थेचे सूक्ष्मपणे अवलोकन करणाऱ्याला आणि त्यातून पुढे जाण्याची दुर्दम्य इच्छा बाळगणाऱ्यांना पददलितांना झुकते माप द्यावेच लागेल. एस.एम. यांनी आयुष्यभर तेच केले. त्यामुळे ते यशस्वी राजकारणी होऊ शकले नाहीत, पण त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर 'यशस्वी पराभूत' मात्र झाले. काही पराभवदेखील समाजाला चिरंतन प्रेरणा देतात. अण्णांचे पराभव त्या उच्च प्रतीचे होते. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर नाव देणे अवघड आहे हे माहीत असूनही, चपलांचा हार गळ्यांत पडत असतानाही, त्याचा पुरस्कार करीत राहणे याला प्रचंड धैर्य लागते, 'हरणाऱ्या लढाया' लढणारे सेनानी असा त्यांचा गौरव करता येईल. आपण लढाई हरणार आहोत हे माहीत असूनही जो रणांगणातून पळ काढत नाही तोच खरा योद्धा. सामाजिक प्रश्नांवरील आजच्या सर्व लढायांत हे गृहितच धरायला हवे. पण या लढायाच शेवटी महान ग्रीक ट्रॅजेडींना जन्म देतात. 'आँतिगॉन' काय आहे ? वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवर अण्णांचे वर्तन ग्रीक ट्रॅजेडीतील धीरोदात्त नायकासारखे होते. लौकिक यशामागे ते कधी धावले नाहीत. म्हणूनच त्यांना अलौकिक यश मिळाले. एस.एम. हे अनेकांचे हिरो झाले. संयुक्त महाराष्ट्र या शब्दातील दोन इंग्रजी अद्याक्षरे एस.एम. आणि एस.एम. म्हणजेच संयुक्त महाराष्ट्र हे समीकरण मराठी मनावर सदोदित कोरले गेले आहे. संयुक्त महाराष्ट्र समितीमधील अठरापगड पक्षांना एकत्र ठेवणे ही केवळ राजकीय कौशल्याने आणि डावपेचाने साधणारी गोष्ट नव्हती. एस.एम. यांना ते जमले त्याचे कारण पुन्हा त्यांच्या नैतिक आणि एकूणच मूल्याधिष्ठित आचरणाने. या मूल्यांचा टेंभा त्यानी कधी मिरवला नाही. त्याची साधी जाणीवदेखील कधी दाखविली नाही. त्यामुळे कोणीही एस.एम.यांच्याजवळ जाऊ शकत असे. त्यांना विश्वासात घेऊन सांगत असे. अशा अनेकांच्या विश्वासाचे एस.एम. 'निजधाम' होते.

कठीण प्रसंगी समाजाने पणाला लावावे असे मोठेपण एस.एम. यांनी मिळविले होते. १९७३ चा एक प्रसंग मला आठवतो त्याच वर्षी पत्रकारितेच्या क्षेत्रात मी

पदार्पण केले. पुण्यात मोठी दंगल उसळली. लोक पुढाऱ्यांचे ऐकेनात आणि पोलिसांनाही दाद देईनात. हिंसेची, गोळीबाराची भीती वाटेनाशी झाली, एवढा लोकक्षोभ वाढला. शेवटी एस.एम. बाहेर पडले आणि लोकांना त्यांचे ऐकावेच लागले. एस.एम. असे आधारवडासारखे होते. रूढ अर्थाने ते धार्मिक जीवन जगले नाहीत. पण समाजाची धारणा करतो तो धर्म हा त्याचा अर्थ घेतला तर एस.एम. यांचे सारे जीवन धर्माचरण होते आणि त्याला अलौकिकाचा स्पर्श होता.

हे अलौकिकत्त्व सर्वच जण ओळखत होते असे नाही. पुणे विद्यापीठाने त्यांना डी.लिट पदवी द्यायचा ठराव करताना काही जणांनी असाच आडमुठेपणा दाखविला. त्या प्रकरणाचा तपशिलाने उल्लेख करण्याची ही वेळ नाही. विद्यापीठातील काही नतद्रष्ट व्यक्तींवर खरमरीत टीका करणारा लेख त्या वेळी मी लिहिला होता. एस.एम. एका राजकीय पक्षाचे नेते आहेत, म्हणून त्यांना डि.लिट देऊ नये,या विद्यापीठीय भूमिकेवर सर्वांचीच प्रतिक्रिया संतप्त होती. त्यानंतर एकदोन दिवसांतच एका समारंभात अण्णांची गाठ पडली. त्यांचा शांतपणा मात्र जराही ढळला नव्हता. 'ऋषितुल्य जीवन' ते खरोखरच जगत होते.

संयुक्त महाराष्ट्राची यशस्वी लढाई एस.एम. लढले, पण 'बेळगाव-कारवार' हा मराठी भाषिक मुलूख आजही कर्नाटकात आहे, याबद्दल त्यांच्या मनातील विषाद शेवटपर्यंत कायम होता. एस.एम. गेले त्याच्या आदल्याच दिवशी कर्नाटकातील आमदार व सीमावासीयांचे नेते राजाभाऊ माने व 'तरुण भारत' बेळगावचे संपादक किरण ठाकूर भेटले. या प्रश्नाबाबत नवीन काही घडते आहे, वातावरण तापते आहे. प्रकृती साथ देत नसतानाही एस.एम. शेवटपर्यंत या प्रश्नात रस घेत राहिले. परंतु मधली काही वर्षे अशी गेली की सीमाप्रश्न पार बाजूला पडला. कर्नाटकात जनता पक्षाचे सरकार आले. आपल्याच पक्षाविरूद्ध भूमिका घ्यायची वेळ आली. परंतु एस.एम. यांनी पक्षापेक्षा सीमाभागातील लोकांना दिलेले अभिवचन महत्त्वाचे मानले. 'लोकशाहीच्या सर्व मार्गांनी लोकांनी आपले मत व्यक्त करूनही त्यांना न्याय मिळत नाही.' या विचाराने ते अस्वस्थ होत. कर्नाटक की महाराष्ट्र, आणि काँग्रेसचे सरकार की जनताचे यापेक्षा लोकांच्या न्याय्य मागण्यांचे मोल त्यांच्या दृष्टीने अधिक होते. प्रदेश मिळविण्याची किंवा महाराष्ट्राचा नकाशा मोठा करण्याची त्यांची आकांक्षा कधीच नव्हती. भाषावार प्रांतरचना हे तत्व मान्य केले असेल तर एवढ्या मोठ्या संख्येने सीमाभागाजवळ असलेल्या मराठी लोकांवर अन्याय का हा त्यांचा प्रश्न होता. संकुचित, प्रादेशिक किंवा भाषिक अभिमानी असा शिक्का त्यांच्यावर कृपया कोणी मारू नये. सीमाप्रश्न सुटला तर एस.एम. यांची अपूर्ण राहिलेली, एकमेव नव्हे, इच्छा पूर्ण होईल. ●

प्रकरण ४६

# लोकनेता वसंतदादा

दादांच्या मृत्यूने महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील एक लोकप्रवण नेतृत्व अस्तंगत पावले. दादांच्या अंत्ययात्रेस कृष्णाकाठी तीन लाख मराठी लोकांचा शोकाकुल समुदाय जमा झाला होता. दादांच्या लोकभिमुखतेची ती साक्ष होती. दादांना अनेकांनी आदरांजली वाहिली. लोकनेता असे त्यांचे सार्थ वर्णन त्यातील जवळजवळ प्रत्येकाने केले आहे. 'कधीही भरून न येणारे नुकसान होणे' 'पोकळी निर्माण होणे' या वापरून गुळगुळीत झालेल्या शब्दप्रयोगांना त्यांचा मूळचा अर्थ पुन्हा प्राप्त होण्यासाठी दादांसारख्या व्यक्तींना खरोखरच हा इहलोक सोडून जावे लागते. अलीकडच्या काळात दादांचे राजकीय वजन कमी होत चालले आहे, असा भास होत होता, पण त्यात फारसे तथ्य नसावे. दादांच्या अंत्यदर्शनासाठी दस्तुरखुद्द पंतप्रधान राजीव गांधींना कृष्णेकाठी उतरावे लागले. वैयक्तिक स्नेहभावनेपेक्षा दादांच्या राजकीय प्रभावाचे भान ठेवूनच त्यांनी हा निर्णय घेतला असला पाहिजे. दादांकडे संघटनात्मक पातळीवरील महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात येणार आहे, अशा वावड्या अनेक दिवस उठत होत्या. दादांनी ही जबाबदारी अत्यंत समर्थपणे पेलली असती यात शंकाच नाही. १९८० नंतर काही काळ अखिल भारतीय काँग्रेस महासमितीचे सरचिटणीसपद सांभाळून दादांनी आपले संघटन कौशल्य यथार्थपणे सिद्ध केले होते. परंतु शेवटपर्यंत त्यांना त्यांच्या योग्यतेचे काम मिळाले नाही. यातून कमकुवतपणा सिद्ध झाला तो दादांचा नाही, तर केंद्रीय नेतृत्वाचा. दादांसारखे 'पोलिटिकल हेवीवेट' सहजपणे सामावून घेऊ शकतील एवढी ताकद आता दिल्लीत राहिली नाही.

व्यापक, स्थिर राजकीय पाया व एकनिष्ठ अनुयायी असलेल्या 'मास लिडर'चे दिल्लीला आव्हान वाटते. भारतीय लोकशाहीची ही मोठी शोकांतिका आहे. यातूनच प्रादेशिक नेतृत्वाचा उदय होत राहिला. एन.टी. आर., एम.जी.आर., रामकृष्ण हेगडे, देवीलाल या व्यक्ती घ्या किंवा बंगालमधील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

अगर आसाममधील गणसंग्राम परिषद घ्या, त्यांची बीजे रोवली गेली ती बंगलोर, मद्रास, हैदराबाद किंवा कलकत्ता आणि चंडीगडमध्ये नव्हे, तर दिल्लीमध्ये. तामिळनाडूतील कॉँग्रेस (आय)चा ताजा निकाल हा करुणानिधींचा विजय नसून,दिल्लीश्वरांचा पराभव आहे. कॉँग्रेस अंतर्गत प्रबळ राजकीय नेतृत्व निर्माणच होऊ द्यायचे नाही आणि हाच वृक्ष दुसऱ्याच्या अंगणात विशाल होऊ लागला की, त्या राजकीय प्रक्रियेचे आपल्या सोयीसाठी प्रादेशिक, संकुचित किंवा विभाजनवादी असे वर्णन करायचे. तसे करून कोणी खुशाल आत्मसंतुष्ट होऊ देत. इतिहासात कधी तरी त्यांचे स्वतःचेच मूल्यमापन विभाजनवादी, असे झाल्याशिवाय राहणार नाही.

महाराष्ट्राला हा अनुभव नवा नाही. ज्या कारणासाठी जवाहरलाल नेहरूंनी यशवंतराव चव्हाणांना दिल्लीच्या राजकीय पटावर नेले, ती त्यांची ताकद हीच त्यांची मर्यादा ठरली. यशवंतराव फार सावध राजकारणी होते. धोका पत्करण्याची त्यांची सहसा तयारी नसे. आपल्यावर प्रादेशिकतेचा शिक्का बसू नये, यासाठीही ते सतर्क असत. त्यामुळे दिल्लीला त्यांनी कधी उघड आव्हान दिले नाही. दादांचे यशवंतरावांपेक्षा वेगळेपण दिसते ते इथे. दिल्लीची फार ताबेदारी पत्करण्याचे त्यांनी सदैव नाकारले. यशवंतरावांच्या ते फार जवळ नसले, तरी त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्रात राजकीय खेळी करण्याच्या दिल्लीच्या प्रयत्नांनाही त्यांनी कधी साथ दिली नाही. पुन्हा एकदा मुख्यमंत्री होऊनच दाखवीन, असे जाहीर वक्तव्य त्यांनी केले होते. त्यामागे सत्तालोलुपता नव्हती. दुखावलेल्या खास मऱ्हाटी मनाचा तो स्वाभाविक आविष्कार होता. विशेष म्हणजे दादा एकदा नव्हे, चारदा मुख्यमंत्री झाले. महाराष्ट्रात तरी तो अद्याप विक्रम आहे. केंद्रीय नेतृत्वाला आपल्या परीने दादांनी सतत आव्हान दिले. त्यांना राजकारणातून बाजूस करण्यासाठी राजस्थानचे राज्यपालपद देण्यात आले. पण अशी शोभेची पदे भूषविणे हा दादांचा पिंड नव्हता.राज्यपाल असतानाही त्यांचा राजकीय 'इंटरेस्ट' कमी झाला नाही. महाराष्ट्राच्या आणि दिल्लीच्या त्यांच्या वाऱ्या सुरूच राहिल्या. त्यावर सार्वजनिक टीकाही खूप झाली. परंतु दादांचा त्याला इलाज नव्हता. राजकीय अज्ञातवासाची ही शिक्षा त्यांनी मुकाट भोगावी, अशी अपेक्षा करण्यासारखे ते होते. राज्यपालपदाच्या मर्यादा त्यांनी ओलांडल्या असल्या तरी त्याला शिक्षा देणाऱ्यालाही जबाबदार धरले पाहिजे. कोणाची तरी राजकीय सोय करण्यासाठी राज्यपालपदे किंवा केंद्रीय मंत्रिपदे वाटण्याच्या अलीकडच्या घातक प्रवृत्तीलाच त्यासाठी दोषी धरले पाहिजे.

दादा चार वेळा मुख्यमंत्री झाले. तरी मुख्यमंत्री म्हणून राज्यावर ठसा उमटवू

शकतील अशी वसंतराव नाईकांसारखी प्रदीर्घ कारकीर्द त्यांना लाभली नाही. एक कुशल प्रशासक म्हणून यशवंतरावांचा जसा महाराष्ट्राला अधिक काळ लाभ मिळाला नाही, तसाच दादांचाही. मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव महाराष्ट्रात आणखी पाच-सहा वर्षे राहते, तर महाराष्ट्राची घडी थोडी वेगळी बसली असती. यशवंतरावांचे वैयक्तिक, संस्थात्मक किंवा 'व्हेस्टेड' म्हणता येतील, असे हितसंबंध अजिबात नव्हते. दादांचे तसे नव्हते. एका विशिष्ट लॉबीचे, त्याला मग शुगर लॉबी म्हणा किंवा सहकार लॉबी म्हणा, दादा अध्वर्यू होते. परंतु दादा पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले ते ७७ च्या इंदिरा गांधींच्या दारुण पराभवानंतर. काँग्रेसच्या लोकप्रियतेने त्या वेळी नीचांक गाठला होता. मोठ्या उमेदीने राज्याची सूत्रे हाती घ्यावीत आणि धडाडीने राज्यकारभार करावा, असे त्या वेळचे वातावरणच नव्हते. जेमतेम वर्षाची कारकीर्द झाली नाही, तोच त्यांना निवडणुकांना तोंड द्यावे लागले. तेही काँग्रेसची दोन शकले झाली असताना. मार्च ७८ मध्ये दादा मुख्यमंत्री झाले ते संयुक्त आघाडीचे. त्यांच्या पायात तिरपुड्यांचे केवळ ओढणेच होते, असे नव्हे. उपमुख्यमंत्री म्हणून असलेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी दादांना काम करणेही अवघड करून सोडले. त्याच वेळी पुलोद उभे राहिले आणि दादांना दुसऱ्यांदाही फार काळ सत्ता राबविता आली नाही. ८० नंतर अंतुले व भोसले यांनी निर्माण केलेल्या अस्थिरतेवर उतारा म्हणून पुन्हा दादांना पाचारण करण्यात आले. वास्तविक बॅरिस्टर भोसले यांच्यासारख्या स्वप्नातही मुख्यमंत्रिपदाची अभिलाषा न धरणाऱ्या व्यक्तीची मुख्यमंत्री म्हणून झालेली नेमणूक म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणाचा दिल्लीने वाजविलेला बोजवाराच होता. राजकीय अस्थिरता निर्माण करण्याच्या या प्रयत्नांचा शेवट अखेर दिल्लीत होऊ शकतो, हे कधी तरी समजून असलेले बरे. दादांना आता तरी स्थिरता मिळेल असे वाटत होते, परंतु दिल्लीचे मानस तसे नव्हते. १९८५ मध्ये झालेल्या निवडणुकीत याची प्रतिक्रिया तीव्रपणे उमटलेली दिसते. शरद पवार यांच्या काँग्रेस (एस) ला त्या वेळी लोकांनी मोठा पाठिंबा आणि भरघोस जागा दिल्या. दादा त्या निवडणुकीनंतर पुन्हा मुख्यमंत्री झाले, परंतु त्याचा शेवट झाला तो राजस्थानचे राज्यपाल म्हणून जाण्यात. दिल्लीचा नि:संदिग्ध पाठिंबा नाही अशा वातावरणातच दादांना राज्याची धुरा सांभाळावी लागली. महाराष्ट्राच्या मूलभूत प्रश्नांना हात घालण्याइतकी सवड आणि शांतता त्यामुळे त्यांना कधीच मिळाली नाही. महाराष्ट्राचे हे मोठे नुकसान झाले.

लोकांचा भरघोस पाठिंबा ही दादांची ताकद होती. परंतु दुर्दैवाने राजकीय आखाड्यात तीच मर्यादा ठरली. उद्या शरद पवारांचीही तीच मर्यादा ठरणार आहे.

कारण इथे राजकारण राजांचे नाही, सुभेदारांचे चालू आहे. मात्र दादांच्या काही खऱ्या मर्यादाही होत्या. गरिबांबद्दल दादांना मनापासून कळवळा होता. वैयक्तिकरीत्या त्यांनी अनेकांचे प्रश्नही सोडविले. परंतु त्यांचे एकंदर राजकारण 'आहे रे' वर्गापुरते मर्यादित राहिले. यशवंतरावांनी ही मर्यादा ओलांडली होती. समाजाच्या सर्व घटकांपर्यंत यशवंतराव पोहोचले होते. दादा शेवटपर्यंत 'शेतकरी' च राहिले.

दादांची दुसरी मर्यादा कौटुंबिक जीवनातील. शालिनीताईंच्या फाजील राजकीय महत्त्वाकांक्षेमुळे दादांना मनस्ताप सोसावा लागला. आणखी एका गोष्टीमुळे त्यांच्या मोठेपणातून काही गुण वजा करावे लागतील. ते म्हणजे सांगलीच्या राजकारणात सग्यासोयऱ्यांवर असलेला त्यांचा वरदहस्त. आपला राजकीय वारस म्हणून शेवटी त्यांनी आपल्या मुलाचीच निवड केली. सगळेजण तेच करताहेत असे त्याचे समर्थन करता येईल एवढेच. इंदिरा गांधींनी तेच केले, शंकरराव चव्हाणांनी तेच केले वगैरे. परंतु शेवटी त्यात वेगळेपण आणि विचारांची स्वायत्तता नाहीच.

दादांचं व्यक्तिमत्त्व दुसऱ्याला आपलंसं करणारं, विश्वास उत्पन्न करणारं, मोकळं आणि उमदं होतं. त्यांना मी मोजून चारदा भेटलो. शेवटची भेट होती ते राजस्थानचे राज्यपाल असतानाची. महाराष्ट्रात काँग्रेस (एस) काँग्रेस (आय) मध्ये विलीन होण्याच्या आठवडाभर आधी. पुण्यात सर्किट हाऊसवर त्यांचा मुक्काम होता. 'सकाळ' चे त्या वेळचे संपादक श्री.एस.के. कुलकर्णी व मी त्यांच्या अनौपचारिक भेटीसाठी गेलो होतो. नव्या राजकीय मांडणीत दिल्लीकरांनी दादांना फारसं विश्वासात घेतलं नव्हतं ही त्यांची खंत होती. परंतु वागण्यात, बोलण्यात कटुता नव्हती. माणसांचा गराडा भोवती होताच. अनेक वर्षे सत्तेवर असूनही सत्तेची गुर्मी वाढली नाही अशा फार थोड्या व्यक्तींपैकी दादा एक होते. ते सुसंस्कृत व खानदानी व्यक्तिमत्त्व आता काळाच्या पडद्याआड कायमचं गेलं आहे.

•

# ‘नाही रें’ चा बाबा

४७

प्रतिबिंब १०

लोकांचा राजा छत्रपती शाहू यांच्या नावाने देण्यात येणारा पुरस्कार लोकांचा बाबा डॉ. बाबा आढाव यांना या वर्षी देण्यात प्रसंगाचे औचित्य उत्तम प्रसंगाने साधले आहे. म. फुले, राजर्षी शाहू आणि डॉ. आंबेडकर ही बाबांची प्रेरणास्थाने. म. फुले यांची स्मृतिशताब्दी पुढील वर्षी व त्याच्या पुढच्याच वर्षी डॉ. आंबेडकर यांची जन्मशताब्दी आहे. शिवाय पुढच्या वर्षी १ जूनला स्वत: बाबाही साठ वर्षांचे होताहेत. अर्थात शताब्दी आणि साठी अशा वर्षाच्या हिशेबात किंवा समारंभीय व उत्सवी स्वरूपातच साजरे करावे एवढेच बाबांच्या कामाचे महत्त्व नाही. ते खऱ्या अर्थाने पायाभूत, मूलगामी महत्त्वाचे व अंतरीच्या कळवळ्याने केलेले आहे. ज्या लोकांना विसरले तरी चालते किंवा ज्यांचे प्रश्न विसरणेच सोयीचे असते अशांचे प्रश्न बाबांनी ऐरणीवर आणले. या प्रश्नांची केवळ वैचारिक मांडणी चटकदार अलिप्तपणे करून ते थांबले नाहीत. त्यासाठी त्यांनी संघटना बांधल्या, संस्था स्थापन केल्या, परिषदा भरविल्या, मोर्चे काढले, सत्याग्रह केला, चळवळी उभारल्या आणि तुरुंगवासही पत्करला. दलित, भटके, प्रकल्पग्रस्त, धरणग्रस्त, हमाल, देवदासी, भूमिहीन, अल्पसंख्य यांसारख्या ‘नाहिरे’ वर्गाचे प्रश्न सातत्याने गेले पाव शतक समाजापुढे आणणारा माणूस आज महाराष्ट्रात बाबांशिवाय दुसरा कोणी नाही. महाराष्ट्रातील एक भाग असा सापडणार नाही की जेथे बाबा गेले नाहीत. एस.टी. च्या प्रवासानं त्यांची कंबर मोडली पण फिरणं थांबलं नाही. परिवर्तनवादी चळवळीतील एकही कार्यकर्ता असा सापडणार नाही, ज्यानी बाबांबरोबर कधी ना कधी काम केले नाही. बाबा ‘हरणाऱ्या’ लढाया लढणारा माणूस आहे. या अपयशाचं भांडवल करून राजकीय फायदा उठविण्याचं त्यांनी कधी मनात आणलं नाही. निवडणुकीच्या राजकारणातून त्यांनी अंग काढून घेतलं ते संसदेच्या किंवा विधिमंडळाच्या निवडणुकीत त्यांना पराभव पत्करावा लागला म्हणून नव्हे तर अशा तऱ्हेच्या तडजोडवादी, समन्वयवादी व सोयीच्या

राजकारणात त्यांना प्रिय असलेल्या विषयांचं मातेरं होतं म्हणून. राजकारण व समाजकारण यांचा अन्योन्य संबंध त्यांना चांगला माहीत आहे. पण आजचं राजकारण परिवर्तनशील समाजकारणाला बरोबर घेऊन जात नाही ही वस्तुस्थिती प्रकर्षाने त्यांच्या अनुभवास आल्यामुळे. संसदबाह्य दबावगट म्हणून काम करण्याला मर्यादा आहेतच. सत्ता वापरल्याशिवाय मोठा बदलही शक्य नाही. परंतु सत्ताही नाही आणि सत्ता मिळावी म्हणून बदलाचा विचारही नाही. त्यापेक्षा किमान परिवर्तनाचा विचार आणि त्यासाठी मर्यादित स्वरूपात संघर्ष हे सूत्र त्यांना सांप्रतकाळी व्यवहार्य वाटले असावे. राजर्षी शाहूंनी ज्या सामान्य व पददलित लोकांसाठी आपली राजसत्ता वापरली त्याच पोरक्या लोकांचे म्होरकेपण आज बाबा करताहेत. शाहू पुरस्कार त्यांना मिळण्यात म्हणूनच औचित्य आहे. बाबांच्या चळवळीत येथील प्रस्थापित आणि सत्तारूढ यांच्याविरुद्धचा झगडा अपरिहार्य आहे. त्यामुळे त्यांना 'सरकारी पद्म पुरस्कार' मिळण्याची शक्यता कमीच. त्याची भरपाई अशा तऱ्हेच्या पुरस्कारांनी लोक स्वतःच करीत असतात. त्यात त्या पुरस्काराचा आणि तो देणाऱ्यांचाच अधिक सन्मान असतो.

बाबांनी जे प्रश्न हाती घेतले आहेत त्याचा धावता आढावा घेतला तरी त्याचं मूलभूत स्वरूप लक्षात यावं. हमालांचं उदाहरण घेऊ. आजच्या अर्थव्यवस्थेतील सर्वांत तळागाळाचा आणि शोषित कष्टकरी याचं 'हमाल' हे प्रातिनिधिक उदाहरण आहे. पाच-पन्नास हमालांच्या कमाईत चार-दोन आण्यांचा फरक पडून सुटणारा हा प्रश्न नाही. मूल्यात्मक बदलाचा हा प्रश्न आहे. येथील समाजात 'श्रमाला' प्रतिष्ठा नाही आणि किंमतही नाही. ती मिळवून देण्याचा हा प्रयत्न आहे. हा प्रश्न म्हणून केवळ हमालांचा राहत नाही. सर्वच कष्टकऱ्यांचा होतो. अंगमेहनती कामगारांचा होतो. त्यात हमाल येतो, मापाडी येतो, शेतमजूर येतो, शेतकरी येतो. हमालांची उत्तम संघटना बाबांनी बांधली. संघटनेच्या ताकदीवर वारंवार दर वाढवून घेतले. हमालांना प्रतिष्ठा मिळवून दिली. वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवरही. हमाल हा दुकानदाराचा गुलाम नाही, त्याला माणूस म्हणून स्वतःची प्रतिष्ठा आहे हे समीकरण आज कोणी नाकारू शकत नाही. त्याला बाबांची चळवळ कारणीभूत आहे. या तऱ्हेच्या विशिष्ट शारीरिक श्रमांमुळे निर्माण होणाऱ्या आनुषंगिक प्रश्नांनाही बाबा विसरले नाहीत. हमालांसाठी विशेष दवाखाना त्यांनी सुरू केला. डॉ. अनिता अवचट किती तरी वर्ष त्यासाठी काम करीत. 'कष्टाची भाकरी' सारखी केंद्रे त्यांनी सुरू केली. भेळ भत्त्यावर आणि चहाच्या पाण्यावर गुजराण करून तब्येतीचं वाटोळं होतं, त्याऐवजी साधं भाजी-भाकरीचं परंतु सत्वयुक्त जेवण अगदी अल्प किंमतीत हमालांना मिळावं ही कल्पना आज पुण्यात व इतरही

अनेक शहरात चांगली रुजली आहे. पुण्यात गुलटेकडीच्या मार्केट यार्डच्या परिसरात हमालांसाठी मोठं हमाल भवन उभं राहिलं. महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळीचं ते आधार झालं आहे. एस.एम. जोशींपासून छाया दातारांपर्यंत सगळ्या प्रकृतीच्या माणसांनी येथील झुणका भाकर चवीनं खाल्ली आहे. समतावादी आंदोलनात हमालांचा नेहमीच पुढाकार असतो. नामांतराच्या चळवळीत 'लाँग मार्च' मध्येही ते आघाडीवर होते. महिन्याला किमान दोन-तीन हजार रुपये कमवायला लागल्यानंतर (आणि कदाचित त्यामुळेही) क्रांतीचे रणशिंग फेकून दिलेल्या औद्योगिक कामगारांची जागा हमाल व तत्सम वर्ग घेतो आहे हे आश्चर्य आहे. बाबांनी केलेले संस्कार हेच त्याचे कारण आहे.

धरणग्रस्तांची बाजू बाबांनी सातत्याने उचलून धरली आहे. कुकडी प्रकल्पाच्या भूमिपूजन समारंभाच्या वेळी यशवंतराव चव्हाण यांच्यासमोर २० वर्षांपूर्वी त्यांनी फार उग्र निदर्शने केली. आज या प्रश्नाला चांगले संघटित रूप आले आहे. धरणग्रस्तांचे पुनर्वसन हा मूळ धरणाच्या कामाचाच एक भाग होईल तोपर्यंत हा लढा चालू राहील. या प्रश्नाचे अनेक पैलू आहेत. पर्यावरणवादी मंडळींचाही एक दृष्टिकोण आहे. नर्मदा प्रकल्पातील सरदार सरोवर धरणामुळे विस्थापित होणाऱ्या जवळजवळ एक लाख लोकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सुटावा यासाठी मेधा पाटकर यांच्या नेतृत्वाखाली आज उभ्या राहिलेल्या संघर्षात बाब स्वत: सहभागी आहेत. देशाच्या विकासासाठी काही लोकांना त्याग करावाच लागेल ही सोयीस्कर भूमिका घेऊन आज कोणाला पुढे जाता येणार नाही. 'नाहीरे' वर्गातील लोकांच्या कपाळावर त्यागाचा शिक्का मारून विकासाची फळे दुसऱ्या लोकांनी लुटायची याला यापुढे मान्यता मिळणार नाही. कोयनेच्या प्रकाशात न्हाऊन निघालेल्या समाजाला, त्यासाठी ज्यांनी आपल्या जमिनी देऊन उपरेपण पत्करले, त्यांच्या घरातील अंधार अजूनपर्यंत दिसला नाही. एकही धरण किंवा विकास प्रकल्प असा नाही, जेथील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन समाधानकारक झाले आहे. त्यांच्या भावी आयुष्याची जबाबदारी शासन आणि समाजाने न्यायबुद्धीने स्वीकारली पाहिजे. उपकाराच्या भावनेने नाही.

मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे यासाठी झालेल्या आंदोलनात बाबांचा सिंहाचा वाटा होता. एरवी दलितांच्या बाजूने असणाऱ्याही अनेकांचा अशा तऱ्हेच्या नामांतराला रास्त कारणासाठी विरोध आहे. त्या विषयाच्या तपशिलात आता जाण्याचे कारण नाही. परंतु एक गोष्ट खरी. ती म्हणजे सामाजिक समतेसाठी होणाऱ्या प्रत्येक चळवळीत बाबांचा असणारा पुढाकार. मंडल आयोगाचा अहवाल असो, हिंदु-मुस्लिम दंगल असो, शीख व

हिंदू यांतील सामंजस्य असो, दलित व सवर्ण यांच्यातील संवाद असो, दाऊदी बोहरा समाजातील सुधारणावाद्यांची परिषद असो, न्या. रानडे यांनी स्थापन केलेल्या सामाजिक परिषदेची शताब्दी असो, भटक्या-विमुक्तांची शोधयात्रा असो, की विषमतानिर्मूलन शिबिर असो, बाबांचा त्यात पुढाकारच असणार. विषमतानिर्मूलन शिबिरात आज अनेक रंगांचे व शैलीचे कार्यकर्ते सर्व मतभेद विसरून एका व्यासपीठावर येतात ते बाबांच्या समान धाग्यामुळेच. कार्यकर्त्यांचे रुसवे फुगवे तेथेही होतात, कधी विकोपालाही जातात. व्यापक उद्दिष्ट समोर ठेवून बाबा सर्वांची समजूत काढतात, दादा-बाबा करतात, प्रसंगी स्वत:कडे कमीपणा घेतात, इतरांना मोठेपणा देतात. परिवर्तनाच्या चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना आधार वाटावा, त्यांना चार पैशांची मदत व्हावी म्हणून एक मोठा निधी गोळा करण्याची कल्पना पुढे आली. बाबांनी नरेंद्र दाभोलकरांसारख्या अनेक कार्यकर्त्यांच्या सहकार्याने, त्यासाठी अपार कष्ट घेतले. आज पंचवीस-तीस लाखांचा निधी उभा राहिला आहे. महाराष्ट्रातील पन्नासएक कार्यकर्त्यांचा काम करण्याचा उत्साह त्यामुळे वाढला आहे. एकाकी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना बळ मिळाले आहे.

महात्मा जोतिराव फुले हे बाबांचे आद्य प्रेरणास्थान. एकेकाळी समाजवादी पक्षाचे ते आघाडीचे कार्यकर्ते असले तरी भारतीय परंपरेत आधार शोधल्याशिवाय आयात तत्त्वज्ञान येथे मूळ धरू शकणार नाही असे मानणाऱ्यांपैकी ते एक. म. फुले यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक समाजाचा व सत्यशोधकी चळवळीचा वैचारिक गाभा लक्षात ठेवून समतेवर आधारलेल्या समाजाच्या उभारणीसाठी म. फुले समता प्रतिष्ठानची स्थापना झाली. सत्यशोधक चळवळीला १९७३ मध्ये शंभर वर्षे पूर्ण झाली. चळवळीचा तोच धागा पकडून बाबांनी 'एक गाव : एक पाणवठा' उपक्रमाच्या निमित्ताने जनजागरणाची मोहीम सुरू केली. म. फुले समता प्रतिष्ठानच्या वतीने सत्यशोधकी चळवळीचा इतिहास लिहिण्याचा, त्यासाठी तत्कालीन साधने जमविण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. भालेकर, जवळकर यांचे लिखाण समग्र ग्रंथाच्या रूपात बाहेर आले. 'पुरोगामी सत्यशोधक' या त्रैमासिकातून त्याला नियमितपणे स्थान मिळू लागले. गेल्या वर्षी न्या. रानडे यांच्या समता परिषदेची शताब्दी साजरी करण्यात आली. बाबांचा त्यात नेहमीप्रमाणे पुढाकार होता.

कार्यकर्त्यांशी जमवून घेणे हा बाबांच्या स्वभावाचा अविभाज्य भाग असला तरी विचारांशी जमवून घेण्याचा नाही. त्यामुळे काही जणांत ते जेवढे प्रिय आहेत तेवढेच इतरेजनात अप्रिय. ते फटकळ बोलतात आणि तेवढ्याच स्पष्टपणे लिहितातही. कार्यकर्ते असले तरी शैलीदार लेखन व डौलदार वक्तृत्व त्यांना सोडून

गेलेलं नाही. 'एक गाव : एक पाणवठा' या त्यांच्या मौजेने प्रकाशित केलेल्या पुस्तकाला तीन-चार प्रतिष्ठित पारितोषिके मिळाली. आधी मौजेने प्रकाशित केले हेच एक पारितोषिक. त्यांच्या निवडक लेखांचा संग्रह 'सत्यशोधनाची वाटचाल' अनिल मेहतांनी याच वर्षी प्रकाशित केला आहे. नेमकं वर्मावर बोट ठेवण्याच्या त्यांच्या शैलीचा येथे वारंवार प्रत्यय येईल. रा. स्व. संघावर त्यांनी लिहिलेल्या 'संघाची ढोंगबाजी' या पुस्तिकेने तर त्या वेळी गदारोळ माजला. एकीकडे १९७७ चा जनता प्रयोग होत होता, त्याच वेळी बाबांची ही पुस्तिका बाहेर पडली होती. बाबांनी केवळ संघावरच असे लिहिले असे नाही. येथील मराठा समाजावर आणि यशवंतराव चव्हाण यांच्यावरही त्यांनी परखडपणे लिहिले. अनेकांच्या रोषाला त्यामुळे ते कारण झाले. परंतु राग धरणाऱ्या मंडळींनीही बाबांच्या वैचारिक निष्ठेबद्दल कधी शंका घेतली नाही. त्यांचे लिखाण वैयक्तिक आकसापोटी नव्हते हे त्याचे कारण. वैयक्तिक फायद्याला फाटा देणारी व अशी 'भूमिका' घेऊन उभी राहणारी माणसं आजच्या व्यापारी संस्कृतीत दुर्मीळ होत चालली आहेत. बाबांचं वेगळेपण त्यामुळेच झळाळून दिसतं.

•

प्रतिबिंब १०

४८

# मिशनरी मोडक

परवा खानापुरचे डॉ. मोडक भेटले. सोबत एक तरुण शेतकरी. तुकाराम पांडुरंग तोडकर. खामगावचा. त्याचं गाऱ्हाणं घेऊन आले होते. खानापूर, खामगाव ही गावं पुण्याजवळच्या खडकवासला व पानशेत धरणाच्या लाटेतली. मोसे-मुठेच्या खोऱ्यातली. वीर बाजी पासलकरच्या नात्यातली. शिवाजीच्या शूर मावळ्यांची. तुकाराम तोडकर त्यापैकीच एक. शेतकरी आहे, पण अल्पभूधारक. खोऱ्यातील सुपीक जमीन धरणाच्या पाण्याखाली गेली. थोडीफार आहे ती डोंगर उतारावर. निकृष्ट प्रतीची. पोट खराब्याची. पिकांसाठी सर्वथा अयोग्य. या खोऱ्यातील डोंगर उतारावर एकेकाळी घनदाट समृद्ध नैसर्गिक जंगल होतं. लोकांनी त्याचा कोळसा केला. कंत्राटदारांनी पैका केला. हिरवे डोंगर बोडके झाले. आजही कोळसा तयार करण्याच्या बेकायदा भट्ट्या सुरू आहेत. झाडतोडीसाठी एखाद्या विशिष्ट एकराचा परवाना घ्यायचा. प्रत्यक्षात जास्त जमिनीत वृक्षतोड करायची. परवान्यात खासगी क्षेत्राचा निर्देश करायचा. तोड सरकारी जमिनीतील करायची. सगळे लागेबांधे असतात. मालमोटारी बिनबोभाट पुण्याच्या पेठेत येतात.

ही दुरावस्था ज्यांच्या लक्षात आली त्यापैकी खानापूरचे डॉ. मोडक एक. या जमिनीवर पिकं घेऊन फायदा नाही. त्या ऐवजी वृक्षारोपण केलं पाहिजे, वनसंपत्ती वाढविली पाहिजे हा नवा विचार त्यांनी लोकांपर्यंत पोहोचवला. पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. व्ही.जी. भिडे, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे निवृत्त संचालक डॉ. बी.डी.टिळक, इकॉलॉजिकल सोसायटीचे श्री. प्रकाश गोळे यांच्यासारख्यांचेही या भागात ही नवी वाट रुळवायचे प्रयत्न सुरू आहेत. तर डॉ. मोडक यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने तुकाराम तोडकर वनशेतीकडे वळले. ९० आर, म्हणजे जवळजवळ एक हेक्टर जमिनीवर त्यांनी हापूस आंब्याची कलमे लावली. ही गोष्ट ऑगस्ट १९८५ ची. त्यासाठी महाराष्ट्र बँकेकडून कर्ज घेतले. या भागात पाऊस भरपूर पडतो. पण पावसाळ्यानंतर पाणीटंचाईही तेवढीच तीव्र

असते. रोपटी जगावीत म्हणून त्यांच्या बुंध्याशी मातीची मडकी ठेवून पाण्याचा थेंबन् थेंब उपयोगात आणला. (ड्रीप इरिगेशन). डोळ्यांत तेल घालून तीन-चार वर्षे झाडं जगवली. गुराढोरांपासून आणि चोरा-पोरांपासून त्यांचं संरक्षण केलं. पण अरेरे ! परवा २८ मार्चला आकस्मात लागलेल्या वणव्यानं चांगली वाढलेली आंब्याची पन्नास झाडे आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. बँकेचं बारा-तेरा हजारांचं कर्ज आणि गेल्या तीन-चार वर्षांतली मेहनत क्षणात मातीमोल झाली. फळ आल्याशिवाय झाडांचा विमा उतरविता येण्याची सोय नाही. बायकोच्या शिवणकामाच्या चार पैशातून घरप्रपंच चालवून वनशेतीचा प्रयोग करणारा हा गरीब, परंतु आधुनिक विचाराचा तरुण शेतकरी आपल्या प्रयोगाने इतरांना आदर्श घालून देत होता. आज त्याच्या घराचंच आढं कोसळलं आहे. त्याला पुन्हा कसं उभं करायचं ही डॉक्टरांची चिंता होती. वणवा लावून राख तयार झाली की पावसाने ती आपल्या जमिनीत वाहून येईल आणि खतासारखा तिचा उपयोग होईल, ही पश्चिम घाटावरील सर्वच शेतकऱ्यांची धारणा आहे. काही प्रमाणात ती बरोबरही असेल. परंतु ती धोकादायक आणि इतरांचे नुकसान करणारी आहे. या अनिष्ट प्रथेबद्दल त्याचप्रमाणे भातशेतीसाठी जमीन तयार करताना फांद्या तोडून राप केला जातो त्यासंबंधी शेतकऱ्यांचे प्रबोधन केले पाहिजे, त्यांना अधिक चांगले पर्याय दिले पाहिजेत. तुकाराम तोडकरच्या संकटाकडे वैयक्तिक प्रकरण म्हणून न पाहता (त्यांना वैयक्तिक मदत करूनही) त्याला या व्यापक संदर्भात बसवायची डॉ. मोडक यांची धडपड सुरू होती. गेल्या पन्नास वर्षांत वेल्हे, हवेली व मुळशी तालुक्यांच्या दऱ्याखोऱ्यांत, डोंगरी लोकांत त्यांनी ज्या तऱ्हेने काम केले त्याचं हे अगदी साधं उदाहरण.

लोकशिक्षणाचं व समाजसेवेचं काम 'सेवाव्रत' म्हणून करणारे डॉ. मोडक यावर्षी दसरा-दिवाळीच्या दरम्यान आपली पंचाहत्तरी पूर्ण करतील. आज चळवळीत नव्याने येणाऱ्या, काहीतरी नवे करण्याचा ध्यास घेतलेल्या तरुणांना डॉ. मोडकांच्या कामातून, त्यांच्या जिद्दी स्वभावातून, पुन्हा पुन्हा उभे राहण्याच्या त्यांच्या ऊर्मीतून, 'अवघे पाऊणशे वयमान' मधील 'अवघे' हा शब्द सार्थकी लागावा अशा तऱ्हेच्या त्यांच्या दिनचर्येतून नक्कीच प्रेरणा मिळू शकते. डॉ. मोडकांचं सर्व घराणंच कार्यकर्त्यांचं. त्यांचा जन्म उज्जैनचा. डॉक्टर चार वर्षांचे असताना त्यांचे वडील वारले. सांभाळ चुलत्यांनी केला. आणि चुलतेही कसे ? १९२० मध्ये लोकमान्य टिळकांचे निधन झाल्यावर राष्ट्रकार्यासाठी आजन्म अविवाहित राहण्याची प्रतिज्ञा त्यांच्या तिन्ही चुलत्यांनी केली. एक चुलते 'मोडक गुरुजी' म्हणून खानदेशात आणि रत्नागिरीत ख्यात झाले. सेनापती बापटांच्या

मुळशी सत्याग्रहापासून गोवा सत्याग्रहापर्यंतच्या विविध आंदोलनात त्यांनी भाग घेतला. डॉ. मोडकांचे शिक्षणही त्या काळच्या राष्ट्रीय पाठशाळेत येवला (जि. नाशिक) येथे झाले.

१९३०-३२ च्या काळात महात्मा गांधींच्या हाकेनुसार झालेल्या मिठाच्या सत्याग्रहात अवघ्या सोळा-सतराव्या वर्षी त्यांनी भाग घेतला आणि धुळ्याच्या तुरुंगात ते बंदिवान झाले. आचार्य विनोबा भावे, सानेगुरुजी, जमनालाल बजाज, खंडूभाई देसाई यांचा सहवास या काळात त्यांना लाभला. साने गुरुजींची शामची आई आणि विनोबांची गीताई त्यांच्याच तोंडून ऐकण्याचे भाग्य ज्या थोड्या लोकांना लाभले त्यातील डॉ. मोडक एक. राष्ट्रीय शाळेतून ते राष्ट्रीय विद्यापीठात गेले. टिळक महाराष्ट्र विद्यापीठात. तेथे वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण करून १९३९ मध्ये एका शासकीय योजनेअंतर्गत खानापूर भागात त्यांनी आपला व्यवसाय सुरू केला. ग्रामीण विकासाला वाहून घेण्याची प्रतिज्ञा त्यांनी त्या वेळी केली आणि तब्बल अर्धशतक निरलसपणे सेवा करून त्यांनी ती तंतोतंत पाळली आहे. बांधिलकीसंबंधी आपण अनेकवार बोलतो. तिचं सात्त्विक आणि अव्यभिचारी दर्शन डॉ. मोडक यांच्या जीवनातून अव्याहतपणे घडत आलं आहे.

परक्या गावात अशा तऱ्हेनं पाय रोवून राहणं वाटतं तितकं सोपं नसतं. डॉक्टरांचा अनुभवही तसाच आहे. पण 'मी तरलो तो माझ्या वैद्यकीय व्यवसायामुळे' असं ते सांगतात. आजही या भागात दळणवळणाच्या फारशा सोयी नाहीत. धरणातून पलीकडे जायचं ते लाँचनं. तिच्या वेळाही ठरावीक. त्या काळात काय स्थिती असेल याची कल्पनाच केलेली बरी. आठवड्याच्या तेल, मीठ, मिरचीसाठी लोकांना दिवसभर पायपीट करावी लागे. चाल सुकर व्हावी म्हणून लोक धारेने यायचे. त्या काळात डॉक्टरांना पेशंटच्या घरी जायचं तर रोजची दहा मैलांची पदयात्रा करायला लागायची. एकदा तर ते चाळीस मैल चालत गेले होते. परंतु औषधोपचारांसह त्यांनी दहा रुपयापेक्षा जास्त फी कधी कोणाकडून घेतली नाही. पावसाळ्यातील हाल तर विचारू नका. इथला पाऊस कधी थांबतच नसतो. पण डॉक्टरांनी कधी कोणाला 'नाही' म्हटले नाही. हा शब्दच त्यांच्या शब्दकोशात नाही. डॉक्टरांना मदत व्हावी म्हणून त्यांच्या पत्नी सुधाताईंनी लग्नानंतर नर्सिंगचा अभ्यासक्रम पूर्ण केला आणि आजही त्या त्यांच्या कामात मदत करीत असतात. डॉक्टरांकडे माणसांचा राबता नेहमीच असतो. देशी-परदेशी पाहुणे व कार्यकर्ते डॉक्टरांचे काम पाहायला येतात. त्यांच्या आदरातिथ्यात सुधाताई कधी कमी पडल्याचे दिसले नाही. प्रत्येक यशस्वी माणसामागे एक 'स्त्री' उभी असते याला आजच्या आधुनिक स्त्रीमुक्ती परिभाषेत कोणी सुविचार म्हणून संबोधणार

नाही. परंतु 'स्त्रीशक्ती' ला मान्यता देणारे विधान म्हणून त्याकडे पाहता येईल. डॉ. मोडक यांच्या जीवनात सुधाताईंचे स्थान या 'आदिशक्ती' समान आहे.

गेल्या पन्नास वर्षांत या भागात डॉक्टरांनी सुरू केलेल्या उपक्रमांचा तपशील द्यायचा म्हटला तर पुस्तक लिहावं लागेल. पण सूत्ररूपानंच सांगायचं म्हटलं तर त्या त्या काळची सर्व आव्हानं डॉक्टरांनी समर्थपणे स्वीकारली असे रास्त विधान करता येईल. मग तीस-चाळीस वर्षांमागे अस्पृश्यता निवारणाचा किंवा डॉक्टरांच्या भाषेत सामाजिक समतेचा प्रश्न असो, की आजचा वृक्षसंगोपन आणि पर्यावरणाचा प्रश्न असो, स्त्रियांना व्यावसायिक शिक्षण देण्याची बाब असो, की गावात संडास बांधण्याची, पिण्याच्या पाण्याची किंवा सार्वजनिक स्वच्छतेची समस्या असो, शाळा सुरू करायची असो, की आरोग्य शिबिर असो, दारूबंदीचा प्रचार असो, की सौर ऊर्जावापराचा, डॉक्टरांच्या नजरेतून काही सुटलेय, असं झालं नाही. लोकांच्या मनात ठिणगी टाकण्याचं काम त्यांनी नेटानं केलं.

अर्थात, सगळे दिवस सारखेच असतात असं नाही. लोकशाही प्रक्रियेत अनेक अपप्रवृत्ती वाढल्या, राजकारण आलं, गटबाजी आली, नवे 'नेतृत्व' उदयाला आलं. नव्या व्यवस्थेत डॉक्टरांसारख्या गांधीवादी कार्यकर्त्यांची काहींना अडचण वाटली नाही तरच नवल. डॉक्टरांनी मात्र आपल्या कामात खंड पडू दिला नाही. गेल्या पन्नास वर्षांत त्यांनी ज्या सेवाभावानं काम केलं त्यामुळे निर्माण झालेला सदिच्छेचा सागर त्यांना काही कमी पडू देत नाही. गेल्या आठ-दहा वर्षांत त्यांच्याबरोबर या भागात काही वेळा मी स्वत: फिरलो. प्रत्येक घरात डॉक्टरांचा एखादा तरी चाहता निघतोच. त्याची, त्याच्या कुटुंबियांची डॉक्टर आस्थेवाईकपणे चौकशी करतात. जाताजाता त्याच्या एखाद्या प्रश्नावर उपाय सुचवतात. कोणात समेट घडवून आणतात. कोणाला कामाला प्रवृत्त करतात. रोज स्टेजवरील कार्यकर्ते पाहून विटलेल्या मनाला लोकांच्या घराघरात डोकावणाऱ्या डॉक्टरांसारख्या मानवतावादी, गांधीवादी कार्यकर्त्यांचे दर्शन दिलासा देऊन जाते. 'गरिबाची सेवा हीच परमेश्वराची आराधना' हे डॉक्टरांचे जीवनाचे तत्त्वज्ञान आहे.

डॉक्टर आज पंचाहत्तरीत आहेत, पण काम करण्याची उमेद तीच आहे. १९८० नंतर श्री. प्र.न. गोखले त्यांच्याबरोबर काम करताहेत. श्री. गोखले याआधी केंद्र सरकारच्या नोकरीत होते. ते स्वत: शेतीतज्ज्ञ आहेत. आणखीही अनेक कार्यकर्ते डॉक्टरांनी जोडले आहेत. परंतु कार्यकर्त्यांचा 'चेहरा' आता पूर्वीसारखा राहिलेला नाही. डॉ. मोडक यांनी काही पथ्ये पाळली. उदाहरणार्थ मालमत्ता करायची नाही. त्यांनी आपली सारी जायदाद गावाच्या नावे केली आहे. या निसर्गरम्य परिसरात शेतीवाडी खरेदी करण्यासाठी पुण्या-मुंबईच्या धनिकांची 'रीघ' लागलेली

असताना तेथेच स्थायिक झालेल्या डॉक्टरांना पन्नास वर्षांत पाच-पन्नास एकराचे धनी सहज होता आले असते. पण अप्पासाहेब पटवर्धन (रत्नागिरी), बाळूकाका कानिटकर किंवा आण्णासाहेब दास्ताने यांच्यासारख्या 'आश्रम'वादी व्यक्तींच्या प्रभावाने डॉ. मोडक यांची जडणघडणच वेगळी झाली आहे. गांधीवादी आणि मिशनरी यांचा अपवादात्मक समन्वय त्यांच्यात झालेला आहे, असे म्हटले तर ते त्यांचे पुष्कळसे बरोबर वर्णन होईल.

●

प्रकरण ४९

# विकासाची व्यक्तिकेंद्रित बेटे

राळेगण शिंदीच्या अण्णा हजारे यांना महाराष्ट्र सरकारने कृषिभूषण ही पदवी देऊन गेल्या दशकातील त्यांच्या कामाला राजमान्यता दिली आहे. सत्कारासाठी दिवस निवडला तो महात्मा गांधींचा जन्मदिन. गांधीजी महाराष्ट्राचे वर्णन कार्यकर्त्यांचे मोहोळ असे करीत. ते वर्णन रास्त ठरावे अशा गुणवत्तेचेच अण्णा कार्यकर्ते आहेत. ते स्वत:ला गांधीवादी म्हणवून घेत नाहीत. त्यांना कामाला प्रेरणा मिळाली ती गांधींकडून नव्हे. विवेकानंदांच्या वाङ्मयाचा त्यांच्यावर प्रभाव होता, असे त्यांनी स्वत:च एका ठिकाणी लिहिले आहे. मात्र त्यांची सर्व कार्यशैली गांधीवादी कार्यकर्त्यांची आहे. नशाबंदी, अस्पृश्यता निवारण, आरोग्यसेवा, श्रमदान, स्त्रीशिक्षण यांसारखे कार्यक्रम त्यांनी आपल्या गावात ज्या तऱ्हेने राबविले ते पाहिले की याची कल्पना येते. आचरण गांधीवादी असले तरी अण्णांनी काळाची आव्हाने ओळखून विकासाच्या अनेक नव्या कामांची जोड त्याला दिली आहे. वृक्षारोपण, पाणीनियोजन, त्यासाठी नाला बंडिंग, पाझर तलाव, ठिबक, तुषार या पद्धती, सौर ऊर्जेचा वापर, पवनचक्की, अशा अनेक कार्यक्रमांचा त्यात समावेश आहे. 'कृषिभूषण' हा सन्मान असला तरी अण्णांच्या कामाचे सर्वंकष मूल्यमापन त्यामुळे होत नाही. त्यांच्या कर्तृत्वाची ही केवळ एक शाखा आहे. 'पद्मश्री'सारख्या एखाद्या राष्ट्रीय पुरस्काराने त्यांचा गौरव करावा एवढे त्यांच्या कामाचे मूल्य आहे. त्यांना स्वत:ला असा पुरस्कार प्रिय नाही, मात्र रचनात्मक काम करण्याची प्रेरणा मिळण्याचे अण्णा हे नवे आशास्थान आहे.समकालीन आदर्शाची गरज ते भागवू शकतात. त्यात त्यांच्या वैयक्तिक फायद्यापेक्षा समाजाचाच फायदा आहे. त्यांना स्वत:ला काही नको आहे. किंबहुना स्वत:चे सर्व काही त्यांनी समाजालाच देऊन टाकले आहे. या माणसाने लग्न केले नाही. होत नव्हते म्हणून नाही, जाणीवपूर्वक. चार खणातील संसारापेक्षा गावाचा मोठा संसार त्यांनी आज चालवला आहे. दहा-बारा वर्षे त्यांनी लष्करात नोकरी केली.

१९७५ मध्ये निवृत्तीच्या सुमारास हाती आलेला वीस हजार रुपयांचा फंड बँकेत ठेवण्याऐवजी त्यांनी गावाच्या विकासकार्याला देऊन टाकला. याच नोकरीमुळे दहा एकर जमीन त्यांना सरकारने दिली. सामाजिक वनीकरणासाठी ती त्यांनी देऊन टाकली. कराराने, भाडेपट्ट्याने नव्हे, तर चक्क दान म्हणून. परत मागण्याचे सर्व दोर कापून. ही जमीन सुधारण्यासाठी सोळा हजार रुपये रोख मिळाले. तेही देणगी म्हणून दिले. स्वतःच्या घरादारावर तुळशीपत्र ठेऊन समाजकार्यात स्वतःला झोकून देणारी अण्णांसारखी किती माणसे आज आसपास दिसतात ? अण्णा वेगळ्या जातीचा, वेगळ्या मुशीतला माणूस आहे हे खरे. आज गांधी नाहीत, गांधीवाद पुस्तकात उरला आहे, पंडित नेहरूंची जन्मशताब्दी साजरी होत असली तरी त्यांची बांधिलकी उरली नाही, इतकेच काय, 'इंदिरा गांदी वाद 'सुद्धा शिल्लक राहिला नाही. अशा स्थितीत अण्णा हजारे यांच्यासारख्या माणसांच्या जळण्यांतूनच समाजाला शक्ती मिळत राहते. राळेगण हे पूर्वी राळेगण शिंदी होते. आता त्याचे राळेगण सिद्धी झाले आहे. या कायापालटाची सिद्धी अनेकांना साध्य व्हावी हेच अण्णांच्या सन्मानाचे श्रेय आहे.

परंतु अण्णांना असे श्रेय खरोखर मिळणार आहे काय ? त्यांचे काम राळेगणपुरतेच मर्यादित राहणार की व्यापक प्रदेशात त्याची पुनरावृत्ती होणार ? शाल आणि श्रीफळ देऊनच आपले कर्तव्य पार पाडल्याचे समाधान शासन घेणार काय ? अण्णांसारखे प्रयोग पूर्वी झाले नव्हते की काय ? झाले असतील तर त्यांचे संचित काय ? त्या प्रयोगातून समाजाला काय मिळाले, सरकारने काय घेतले ? की बाबा आमटे म्हणतात त्याप्रमाणे समाजाची मानसिक गरज भागविण्यासाठीच अशा सत्कार सोहळ्यांचे प्रयोजन असते ? बाबा आमटे यांचा कुष्ठरोग्यांसाठी असलेला आनंदवन हा आश्रम वाढणं, फुलणं, त्याला देणग्या मिळणं, फेब्रुवारीतील मित्र-मेळाव्यासाठी गर्दी होणं हे समाजाच्या अनारोग्याचं लक्षण आहे. आनंदवन बंद पडणं हाच खरा बाबा आमटे यांचा सर्वात मोठा सत्कार आहे. त्यांना लक्षावधी रुपयांच्या थैल्या देणं ही स्वतःच्या पापक्षालनाची पळवाट आहे. ज्यांना कुष्ठरोग होतो ती सुद्धा तुमच्या आमच्यासारखीच माणसं असतात. कोणाचे तरी आईवडील, भाऊ-बहिणी, काका-मावशाच आनंदवनात राहतात. आपल्याला ते नको असतात, म्हणून त्यांना आनंदवनात पाठवून, आनंदवनाचे कौतुक आपण करतो. राळेगण शिंदीसारखी भारतातील लक्षावधी खेडी म्हणजे सामाजिक कुष्ठरोगच. अण्णांसारख्या एखाद्या व्यक्तीचा सत्कार करून आपण आपलं खोटं समाधान करून घेतो. तो रोग दूर करण्याचा प्रयत्न करीत नाही. अण्णांसारख्या लोकांचे स्थान हे सामाजिक वैज्ञानिकांसारखे असते. शास्त्रज्ञ प्रयोगशाळेत संशोधन करून

एखादी लस शोधून काढतो, पण लसीची मोठ्या प्रमाणावर निर्मिती करून ती लोकांना टोचल्याशिवाय तिचा प्रत्यक्ष उपयोग होत नाही. लुई पाश्चर, जेन्नर, फ्लेमिंग यांनी प्रयोगशाळेत जे केले ते प्रत्यक्ष व्यवहारात आले, म्हणून साथीच्या रोगात दगावणाऱ्या लक्षावधी लोकांना जीवन मिळाले. समाजाच्या प्रयोगशाळेतही असे प्रयोग नित्यनेमाने होत असतात. पण त्याचा उपयोग केला नाही, तर पुन्हा पुन्हा तेच करीत बसावे लागते. आज अण्णा हजारे जे करताहेत ते शेतातले, गावातले प्रयोग आपल्या आजूबाजूला आधींही झाले आहेत. अण्णांनी राळेगणला १९७५ पासून कामाला सुरूवात केली. याच तऱ्हेने निर्धाराने, निष्ठेने, त्यागाने खानापूरला डॉ. मोडक यांनी पन्नास वर्षांपूर्वी कामाला सुरवात केली. शिक्षण, साक्षरता, दारूबंदी, अस्पृश्यता निवारण, सार्वजनिक स्वच्छता, आरोग्य, पाणी, संडास, वृक्षारोपण या सर्वांतून माणसं घडत होती. आज राळेगणला माणसांची जशी रीघ असते, तशीच ती खानापूरला होती, आजही आहे. पुढारी येत, परदेशी पाहुणे येत. सत्कार समारंभ, ग्रामगौरव होत. परंतु त्या प्रयोगातून सिद्ध झालेल्या निष्कर्षांचे प्रतिबिंब शासकीय धोरणात ठामपणे पडले नाही. कागदोपत्री पडले असले तरी अंमलबजावणीच्या बाबत राजकीय इच्छाशक्ती दिसली नाही. खानापूर हे फक्त नमुना खेडे, आदर्श खेडे झाले. बाहेरच्या लोकांना दाखविण्याचा 'शो पीस' झाला. आज तर खानापूरचा प्रभाव इतर गावावर पडण्याऐवजी इतर गावाचाच प्रभाव त्यावर पडला आहे. मग ते राजकारण असो की दारूबंदी. शासकीय धोरणाच्या पाठिंब्याऐवजी हा प्रयोग करपून गेला.

राळेगण शिंदीमध्ये आज दारूबंदी आहे. हातभट्ट्या आज बंद आहेत. सुरूवातीला लोक बाहेरून दारू पिऊन येत. गावातील तरुणांनी धाक दाखविल्यावर तेही आता थांबले आहेत. एके दिवशी सर्व दुकानातील सिगारेट, विड्यांची होळी झाली. परंतु हीच स्थिती कायम राहणार आहे काय ? दारूच्या दुकानांची परमिटं मिळविण्यासाठी सत्तारूढपक्षाच्या कार्यकर्त्यांतच अहमहमिका लागली आहे. बारची संख्या वाढते आहे. शाळा, महाविद्यालये, मंदिरे, महामार्ग यांच्याजवळ दारूची दुकाने आणि बार असू नयेत या स्वतः सरकारनेच केलेल्या नियमांना तिलांजली दिली जात आहे. अल्कोहोलपासून मिळणाऱ्या उत्पन्नातून सरकारची तिजोरी भरत आहे. असे सर्व असताना अण्णा हजारे यांच्या राळेगण शिंदीतील दारूबंदी प्रयोगाला अर्थ तरी काय राहतो ?

आज अण्णा हजारे यांचं नाव जसं लोकांच्या तोंडी आहे, राळेगण शिंदीला सरकार दरबारी मानमान्यता आहे, तसंच काही दिवसांपूर्वी विलासराव साळुंखे आणि त्यांची पाणी पंचायत होती. १९७१-७२ च्या दुष्काळात होरपळून निघालेल्या

पुरंधर तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्याचं, त्यांना नवी वाट दाखवायचं काम विलासरावांनी केलं. १९७४ मध्ये 'ग्रामगौरव प्रतिष्ठान स्थापन' करून नायगाव या छोट्याशा खेड्यात स्थानिक पातळीवर छोट्या मोठ्या नाल्यांवर पाणी अडविण्याचे व त्यातून पिकांना संरक्षण देण्याचे प्रयोग यशस्वी झाल्यानंतर पाणी पंचायतीची स्थापना करून त्यांनी त्याची चळवळच उभारली. पुरंधर हा अनियमित पावसाचा दुष्काळी तालुका. मोठं धरण होण्याची शक्यता नाहीच. त्यामुळे स्थानिक पातळीवर पाणी उपलब्ध झाल्याशिवाय पर्याय नाही. 'पाणी आडवा, पाणी जिरवा' ही आजची घोषणा आठदहा वर्षांपूर्वी त्यांनी तिथे दिली. आजपर्यंत पन्नासच्या वर पाणी पुरवठा योजना त्यांनी यशस्वी करून दाखविल्या. परंतु त्यांचे यश तंत्रवैज्ञानिक कौशल्याचे नाही, ते वेगळे आहे. या सहकारी प्रयत्नात सहभागी झालेले बहुतेक लोक अगदी गरीब. अल्पभूधारक आहेत. योजनेसाठी स्वतःच्या वाट्याचे २० टक्के पैसे भरण्यासाठीही अनेकांना भांडीकुंडी, किडूकमिडूक विकावे लागले आहे. तेही या योजनेचे वैशिष्ट्य नाही. ते आहे पाण्याच्या हक्काबाबत आणि त्याच्या वापराबाबतच्या तत्त्वात. दर माणसी फक्त २० गुंठे क्षेत्राला पाणी मिळेल आणि त्याची कमाल मर्यादा एक हेक्टर म्हणजे अडीच एकर राहील, ही या योजनेत सहभागी होण्याची पहिली अट, आणि या पाण्यावर ऊस घ्यायचा नाही. ही दुसरी अट. पाण्याचा हक्क हा व्यक्तीला आहे, जमिनीला नाही. त्यामुळे एखाद्याने दुसऱ्याला जमीन विकली, तर त्याबरोबर हक्क मिळेलच असे नाही. पाणी पंचायतीच्या अनेक पूर्ण योजना मी स्वतः पाहिल्या, लाभधारक शेतकऱ्यांशी बोललो, त्यांच्या जीवनात फुललेला आनंद पाहिला. नैसर्गिकरीत्या पाणी मिळण्याची सहज शक्यता नाही आणि पाण्यासाठी मोठे भांडवल गुंतवण्याची ऐपत नाही अशा गरीब, छोट्या शेतकऱ्यांना अशा तऱ्हेची योजना म्हणजे वरदानच. ग्रामीण, दुष्काळी भागातील दारिद्र्य दूर करणारी आणि छोट्या शेतकऱ्याला शेतमजूर होण्यापासून वाचविणारी ही योजना आहे. एखाद्या कुटुंबातील एक हेक्टर जमीन जरी आठमाही संरक्षक पाण्याखाली आली तरी ते कुटुंब तग धरू शकते, हा या योजनेचा निष्कर्ष आहे. सरकारला, अगदी केंद्र सरकारलाही या योजनेचे मोठे अप्रूप वाटले. इंदिरा गांधींनी नवा वीस कलमी कार्यक्रम तयार केला, त्या वेळी या कार्यक्रमाचा समावेश अगदी पाणी पंचायत या नावाखाली त्यात करण्यात आला होता. अशा तऱ्हेच्या पाणी योजनांसाठी सरकारने मोठ्या प्रमाणावर सबसिडी द्यायला हवी. पिण्याच्या पाण्याची सोयही यामुळे आपोआप होते. शेती सोडून नोकरी धंद्याच्या शोधात शहराकडे येणाऱ्यांचा ओघ थांबविण्याचे सामर्थ्य अशा तऱ्हेच्या संरक्षणात आहे. परंतु सध्याच्या सिंचन धोरणात मूलगामी बदल करण्याचे

राजकीय धाडस कोणतेच सरकार दाखवित नाही. 'आठमाही विरुद्ध बारमाही' या वादाकडे ऊस विरूद्ध इतर पिके असे पाहिले जाते. प्रत्यक्षात ग्रामीण भागातील विस्तृत क्षेत्रातील जास्तीत जास्त लोकांना पाण्याचे संरक्षक कवच देण्याचा व त्यांना देशोधडीपासून वाचविण्याचा, सामाजिक न्यायाचा हा प्रश्न आहे. सामाजिक न्यायापेक्षा आर्थिक लाभ व तोही विशिष्ट तऱ्हेनेच व्हावा, असा आग्रह धरणाऱ्या लोकांचा वरचष्मा असल्याने पाणी पंचायतीचे तत्वज्ञान या विशिष्ट संदर्भात कालबाह्य ठरते. वास्तविक चार टक्के जमिनीत केवळ उसाच्या माध्यमातून समजा एक हजार कोटी रुपयांचे उत्पन्न दोन टक्के लोकांना मिळण्यापेक्षा वीस टक्के जमिनीतून ऊस, डाळी, तेलबिया, धान्ये आदी पिकांद्वारे तेवढेच किंवा जास्तच उत्पन्न ४० टक्के लोकांना मिळाले तर काय हरकत आहे ? हे अपयश प्रयोग करणाऱ्या साळुंखे यांचे नसून त्यांच्या प्रयोगाचे फायदे समाजाला न देणाऱ्या सत्तारूढांचे आहे. मग अण्णा हजारे यांनी त्यांच्या गावात ३५ठिकाणी नालाबंडिंग केले, एक पाझर तलाव बांधला, ताली घातल्या याचे महत्त्व तरी किती राहते ? लोणी ज्यांना मिळायचे आहे त्यांना मिळाले आहेच. ते आता ताकाच्या वाटपात कौशल्य दाखविणाऱ्यांना 'ब्रेव्हो' म्हणून प्रोत्साहन देत आहेत.

पाणी पंचायत सारखंच आणि त्याच वेळी, परंतु वेगळ्या कारणासाठी तिकडे सांगली-मिरजेकडे नाव गाजत होतं ते म्हैसाळ आणि मधुकर देवल यांचं. 'म्हैसाळ मार्ग' अशा शीर्षकाचा अग्रलेख महाराष्ट्र टाइम्समध्ये प्रसिद्ध झाल्याचं आठवतं. म्हैसाळ आठ-दहा हजार वस्तीचं संपन्न गाव. तेथील हरीजनांच्या जमिनी छोट्या-मोठ्या कर्जापायी किंवा खरं तर व्याजापायी सावकारांच्या घशात गेलेल्या होत्या. श्री.मधुकरराव देवल यांनी या हरिजनांना एकत्र केलं,स्वतः पैसे उभे केले, सावकारांकडे रदबदली केली आणि जमिनी सोडविल्या. या जमिनी एकत्र करून हरिजनांची श्रीविठ्ठल सहकारी सोसायटी केली. सामुदायिक शेतीचा प्रयोग यशस्वी करून दाखविला. ज्यांनी हातात कधी नांगर धरला नव्हता, त्यांनी आपल्या शेतात द्राक्ष, ऊस केला. पानमळा यशस्वी करून दाखविला. शेतीचं नवं तंत्रज्ञान आत्मसात केलं. सहकाराचे पाठ गिरविले. पूरक उद्योग सुरू केले. गावावर अवलंबून होते, त्यांनी अडचणीच्या काळात गावातील गरजूंना मदतीचा हात दिला. आर्थिक स्वावलंबनाची शिडी लावून सामाजिक प्रतिष्ठेचा सोपान सर केला. केवळ संघर्ष करून दलितत्व जाणार नाही, त्यासाठी रचनात्मक कामाची कास धरली पाहिजे, पैसा हेच मूल्य झालेल्या आजच्या समाजात आर्थिक समानतेच्या हातात हात घालून सामाजिक समानता येईल हा म्हैसाळ मार्ग होय. या प्रयोगाचे शिल्पकार मधुकर देवल हे एकेकाळी संघात होते म्हणून या प्रकल्पावर संघीय शिक्का मारून

अनेक लोक मोकळे झाले. परंतु आज केवळ पांढरपेशा नोकऱ्यांवर सारी भिस्त ठेवून दलित चालले आहेत. आदिवासींचीही तीच अवस्था आहे. एका मोठ्या समाजाला सरकारवर प्रमाणाबाहेर अवलंबून ठेवायचं, त्यासाठी नोकऱ्यांचं, राखीव जागांचं प्रलोभन दाखवायचं ही स्थिती कधी बदलणार ? पारंपरिक व्यवसायांना स्थान राहिलं नाही. ज्यांच्या हातात कारागिरी आहे, श्रम करण्यात कमीपणा वाटत नाही त्यांना सरसकट पांढरपेशे करून सोडण्याचा सरकारचा कार्यक्रम असेल तर अण्णा हजारे यांनी दलितांची सामुदायिक शेती यशस्वी करून दाखविली म्हणून त्यांना हार-तुरे देण्यात काय अर्थ आहे ? म्हैसाळमधील दलित यशस्वी होतात, राळेगणचे दलित यशस्वी होतात, तर आणखी शंभर गावचे दलित यशस्वी होणार नाहीत काय ? तसे झाले नाही तर अण्णा हजारे काय, डॉ.मोडक काय, विलासराव साळुंके काय आणि मधुकर देवल काय यांचे प्रयोग केवळ यशस्वी प्रयोग म्हणूनच गौरविले जातील.विकासाची व्यक्तिकेंद्रित बेटे एवढेच त्यांचे स्थान राहील. या बेटांची रुळलेली वाट झाली पाहिजे. म्हणून या प्रयोगांचे प्रतिबिंब शासकीय धोरणात व त्यांच्या अंमलबजावणीत पडले पाहिजे.

•

प्रकरण ५०

# ‘शंवाकिं’चे शताब्दी स्मरण

महाराष्ट्राला उद्यमशील बनविण्यासाठी पायाभूत कामगिरी करणाऱ्यात किर्लोस्कर घराण्याचं नाव अग्रक्रमाने घ्यावं लागेल. मराठी माणसाला आधुनिक दृष्टिकोण देण्यात किर्लोस्कर प्रकाशनांचा वाटाही फार मोलाचा आहे. याचे सर्व श्रेय जाते शंकरभाऊ किर्लोस्कर यांना. ‘शंवाकिं’ या आद्याक्षरांनी मराठी वाचकांना ते अधिक परिचित आहेत. ८ ऑक्टोबर १९७४ मध्ये ८३ व्या वाढदिवशी प्रसिद्ध झालेल्या ‘शंवाकिं’ या साडेतीनशे पृष्ठांच्या त्यांच्या आत्मचरित्रात १९२० ते १९६० या महत्त्वाच्या घडामोडींनी गाजलेल्या चार दशकांचे प्रत्यकारी चित्रण आले आहे. १ जानेवारी १९७५ रोजी सर्वांना नववर्षाच्या शुभेच्छा देऊन कर्नाटकातील घटप्रभा येथे त्यांनी या जगाचा अखेरचा निरोप घेतला. अतिशय समृद्ध व हरहुन्नरी व्यक्तिमत्त्वाच्या या उमद्या संपादकाची जन्मशताब्दी १९९० मध्ये साजरी होत आहे.

शंकरभाऊंच्यानंतर त्यांचे चिरंजीव व स्नुषा, मुकुंदराव किर्लोस्कर व शांताबाई किर्लोस्कर यांनी जोडीने किर्लोस्कर गटातील किर्लोस्कर, स्त्री व मनोहर या प्रकाशनांची धुरा समर्थपणे सांभाळली. सध्या ही प्रकाशने सुरू असली आणि त्याच्या ‘टायटल्स’वर किर्लोस्कर उद्योगाचे स्वामित्व असले तरी प्रत्यक्षात ती दुसऱ्याच एका कंपनीमार्फत सुरू आहेत. मराठी मासिके आणि साप्ताहिके यांचे आर्थिक व्यवहार आणि खप यांना सध्याच्या काळात फार मर्यादा पडल्या आहेत. मौज प्रकाशनाला त्याच कारणासाठी ‘सत्यकथा’ हे वाङ्मयीन मासिक बंद करावे लागले. हंस, मोहिनी, नवल ही अंतरकरांची मासिकत्रयीही याच कारणासाठी स्थगित झाली. एका बाजूला दूरदर्शनचा वाढता परंतु सवंग प्रभाव आणि दुसऱ्या बाजूला बाजारू प्रकाशनांचा चढा आवाज यात घुसमटलेल्या, थोड्या का होईना, मराठी वाचकांची कोंडी फोडण्याचे काम कोणीतरी पुढाकार घेऊन धडाक्याने केले पाहिजे. हा वाचक थोडा असला तरी समाजमनाला गती देणाऱ्या ‘कॅटलिस्ट’ची

भूमिका तोच बजावत आला आहे. वर्षानुवर्षे तोटा येत असूनही लंडनचा टाइम्स सुरू राहिला आणि लॉर्ड थॉम्सन व त्यानंतर मर्डोकसारखे उद्योगपती त्यात गुंतवणूक करीत राहिले, त्यामागे तत्कालिक फायद्या-तोट्याच्या विचारापेक्षा समाजाच्या स्थैर्यासाठी केलेली दीर्घपल्ल्याची गुंतवणूक हाच विचार प्रबळ होता. किर्लोस्कर व स्त्री या मासिकांचे मराठी माणसांच्या माजघरात पूर्वीच्याच दिमाखात पुन्हा एकदा पदार्पण होऊ शकले तर शंवाकि यांच्या जन्म शताब्दिची ती सर्वात मोठी देणगी ठरेल.

'शंवाकि' यांची जन्मशताब्दी साजरी करताना या परस्पर नात्याचे मुद्दाम स्मरण ठेवले पाहिजे. हा केवळ पैसे जमविण्यापुरताच मर्यादित प्रश्न नाही. तसेच असते तर कोट्यवधी रुपयांची वार्षिक उलाढाल करणाऱ्या किर्लोस्कर उद्योग समूहातील कारखान्यांना शंकरभाऊंच्या जन्मशताब्दीसाठी काही लाख रुपये बाजूला काढणे सहज शक्य आहे. तसे करण्याचा मानस असेलही. परंतु समाजानेही त्यांचे ऋण मान्य करून आपली ओंजळ त्यात टाकली पाहिजे. नव्हे ते समाजाचे उत्तरदायित्व आहे. एका व्यक्तीपुरतेच, शंवाकिपुरतेच ते मर्यादित आहे असे नव्हे. ज्या व्यक्ती आणि संस्थांच्या मदतीने समाज उभा राहतो, जोम धरतो त्या सर्वांच्याच बाबतीत ते खरे आहे. शंकरराव किर्लोस्करांचे स्वतःच्या जीवनाबाबतही हेच तत्वज्ञान होते. त्यांनी त्यांच्या आत्मचरित्राला लिहिलेल्या 'दोन शब्द' या प्रास्ताविकात ते काहीसे ग्रथित केले आहे.

त्यांच्या म्हणण्याचा सारांश असा : 'Make the World a bit better because you have been in it' या सुभाषिताने माझ्या मनावर एवढा संस्कार केला की, त्यामुळे माझ्या आचारविचारांना बैठक प्राप्त झालीच, पण पुढील आयुष्यात मी हाती घेतलेल्या उपक्रमांची ती प्रेरणा बनली. तो उपक्रम किर्लोस्करवाडीच्या उजाड माळावरील एकाकी जीवनात नाटके बसविण्याचा असो, 'उद्योग, उत्साह, आत्मोन्नती' या त्रिसूत्रीखाली 'कोळशाचा व्यापारी मोठा कारखानदार कसा झाला', यासारखे यशस्वी व्यक्तींचे जीवनवृत्तांत किर्लोस्कर मासिकातून प्रसिद्ध करण्याचा असो, किर्लोस्करवाडीच्या कारखान्यात चालक-कामगार संबंध खेळीमेळीचे राहावे म्हणून कामगार कौन्सिलची स्थापना करण्याचा असो किंवा औंध संस्थानचा लोकनियुक्त मंत्री म्हणून एखाद्या खेड्यातील धरण योजनेस चालना देण्याचा असो. सारांश, आज जे आहे ते उद्या अधिक विकसित, अधिक उपयुक्त, अधिक सुंदर कसे बनविता येईल, हे आव्हानच मला सतत साद घालीत आले. त्यासाठी भोवतालच्या समाजाबद्दल त्या व्यक्तीच्या मनात जिव्हाळ्याची भावना हवी आणि आपल्या अधिकाराकडे पाहण्याची एक

व्यापक दृष्टीही हवी. अशा व्यक्तीने समाजाभिमुख राहिले पाहिजे. स्वतःचे सार्वजनिक जीवन तिने स्वच्छ ठेवले पाहिजे.

वरील विचारांनी प्रभावित झालेल्या, शंकरभाऊंच्या समाजऋणाची परतफेड करण्याच्या,म्हणजे समाजालाच पुन्हा आणखी काही देण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या काही व्यक्तींनी एकत्र येऊन स्मारक प्रतिष्ठान स्थापन केले आहे. बॅ. आप्पासाहेब पंत त्याचे अध्यक्ष आहेत. अप्पासाहेबांचे वडील व औंधचे संस्थानाधिपती बाळासाहेब पंत प्रतिनिधी व शंवाकिंचा जवळचा स्नेह. औंधच्या लोकशाहीकरण प्रयोगात शंवाकि स्वतः मंत्री होते. चित्रकलेची दोघांची समान आवड. शिवाय किर्लोस्किर उद्योगसमूहाशी अप्पासाहेबांचा जवळचा संबंध. त्यामुळे ते अध्यक्ष असणे उचित झाले आहे.

शंवाकिंना प्रिय असणाऱ्या चार-पाच क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना प्रोत्साहन आणि मदत मिळेल अशा तऱ्हेने काम करण्याचे प्रतिष्ठानचे उद्दिष्ट आहे. शंकरभाऊ स्वतः चांगले कलाकार होते. छायाचित्रण, व्यक्तिचित्र, लँडस्केपस्, रेखाटने, व्यंगचित्रे या प्रत्येक बाबतीत त्यांचा हात वाकबगार होता. म्हणून ‘दृश्यकला’ हे एक क्षेत्र निवडण्यात आले आहे. स्त्रिया, साहित्य आणि पत्रकारिता, परिवर्तनादी चळवळी, विज्ञान प्रसार, मानवी संबंध असे आणखी काही विषय आहेत.

किर्लोस्कर मासिकांचा इतिहास लिहिण्याचे काम या निमित्ताने शांताबाई किर्लोस्करांनी हाती घेतले हा इतिहास म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक, साहित्यिक व वैचारिक जडणघडणीचा आलेखच असणार आहे. त्या काळातील महाराष्ट्रातील जवळजवळ सर्व अग्रणींनी किर्लोस्करसाठी लेखन केले आहे. रियासतकार सरदेसाई, स्वातंत्र्यवीर सावरकर, कोशकार केतकर, खांडेकर, फडके, काणेकर, चिं. वि. जोशी यांच्यासारखे सिद्धहस्त लेखक, र.धों.कर्वे, पं.महादेवशास्त्री दिवेकर, डॉ. पु.ग.सहस्त्रबुद्धे यांच्यासारखे विचारवंत व समाजसुधारक आणि आनंदीबाई शिर्के, बाळूताई खरे (मालती बेडेकर), गीता साने, पिरोज आनंदकर यासारख्या लेखिका सहज आठवतात. हे लेखन त्या काळी समाजाला पुढे नेण्याची प्रेरणा देणारे होते आणि आज छापले तर तेवढेच ते ताजे आहे हा शांतबाईंचा अभिप्राय किर्लोस्कर मासिकांचे द्रष्टेपण सांगणारा आहे. आधुनिक मराठी माणसाच्या जडणघडणीत किर्लोस्कर मासिकांनी आणि त्यांचे संस्थापक शंवाकि यांनी जो वाटा उचलला त्याची परतफेड करणे म्हणजे समाजानेच समाजाला पुढे जाण्यासाठी मदत करण्यासारखे आहे.

३०३९ २६३८०. निबंध २५४९१

प्रतिबिंब ९०

# पूर्वप्रसिद्धी

| | | |
|---|---|---|
| १ | शिवरायांचे ओळखावे रूप | २८ एप्रिल ९० |
| २ | शिवसेना आणि परिवर्तनवादी | १२ फेब्रु. ८९ |
| ३ | अंतुले साहेबांची बॅरिस्टरकी ! | २८ जाने. ८९ |
| ४ | ब्राह्मण्य : जातीय आणि वर्गीय | १० जून ८९ |
| ५ | माने, आता मौन सोडा | १८ फेब्रु. ८९ |
| ६ | मान्यांचे धर्मांतर | ३० जून ९० |
| ७ | 'सत्यशोधक' मुस्लिम | १ एप्रिल ८९ |
| ८ | साखर सम्राटांची ऐशी तेशी | २४ जून ८९ |
| ९ | वॉटर लॉबी | १६ सप्टें ८९ |
| १० | आर्थिक अरिष्टात महाराष्ट्र | १० फेब्रु. ९० |
| ११ | पानशेत पर्यटन | २७ मे ८९ |
| १२ | वैधानिक विकास की राजकीय विभाजन ? | २५ ऑगस्ट ९० |
| १३ | नरुभाऊंची काँग्रेस | २७ जाने. ९० |
| १४ | सीमाप्रश्नांचा गुंता | २९ एप्रिल ८९ |
| १५ | मराठी हैदराबाद | २१ जाने. ८९ |
| १६ | म्हैसूरचा वाघ वादाच्या पिंजऱ्यात | १४ एप्रिल ९० |
| १७ | काश्मीर : हिंदू राष्ट्रवाद विरुद्ध सेक्युलर डेमॉक्रसी | ९ जून ९० |
| १८ | सरकारच्या डोक्यावर हेल्मेट | १९ ऑगस्ट ८९ |
| १९ | बंद करा हे 'बंद' | २२ जुलै ८९ |
| २० | दहावीची मुलं नापास का होतात ? | ८ जुलै ८९ |

| | | |
|---|---|---|
| २१ | देश विकायला कोण निघाले आहे ? | १ जुलै ८९ |
| २२ | अपरिहार्य राजकीय आघाड्या | २३ सप्टें. ८९ |
| २३ | लाट नसलेली निवडणूक | २८ ऑक्टो. ८९ |
| २४ | दिल्लीच्या तख्तावर कोण बसणार ? | २५ नोव्हें. ८९ |
| २५ | सत्तांतर : एक मध्यांतर | ९ डिसें. ८९ |
| २६ | व्ही.(आय) पी. मंत्रिमंडळ | १६ डिसें ८९ |
| २७ | महाराष्ट्रात काय होणार ? | ६ जाने. ९० |
| २८ | तोतयांची बंडखोरी | १७ फेब्रु. ९० |
| २९ | महाराष्ट्रातील यशाचा अर्थ | १७ मार्च ९० |
| ३० | देवीलाल बोले, हरियाना हाले | २८ जुलै ९० |
| ३१ | राजीवला पर्याय का नाही ? | ४ ऑगस्ट ९० |
| ३२ | मंडल आयोग आणि शौरींचे तर्कट | ८ सप्टें ९० |
| ३३ | स्थितिवादी राजकारणाला धक्का | १५ सप्टें. ९० |
| ३४ | रामजन्मभूमी राजाचा बळी घेणार काय ? | ३ नोव्हें. ९० |
| ३५ | अरे भाई, मस्जिद है कहाँ ? | १० नोव्हें. ९० |
| ३६ | सर्वांच्या मनात देशाचाच विचार ! | १७ नोव्हें ९० |
| ३७ | राजीव, व्ही.पी. आणि वृत्तपत्रे | २ सप्टें. ८९ |
| ३८ | बोफोर्स, सरकार व वृत्तपत्रे | २१ ऑक्टो. ८९ |
| ३९ | 'सकाळ'चे उत्तरायण | २५ मार्च ८९ |
| ४० | परिषद झाली; पुढे काय ? | २६ ऑगस्ट ९० |
| ४१ | याला काय लेखकांचे स्वातंत्र्य म्हणायचे ? | २० जाने. ९० |
| ४२ | मधुकाका आणि प्रकाशक संमेलन | ५ मे ९० |
| ४३ | सरकार, प्रकाशक आणि वाचक | १६ जून ९० |
| ४४ | रायगडचे सारस्वत | १० मार्च ९० |
| ४५ | एस. एम. : यशस्वी पराभूत | १५ एप्रिल ९० |
| ४६ | लोकनेता वसंतदादा | ११ मार्च ८९ |
| ४७ | 'नाहीरें'चा बाबा | २९ जुलै ८९ |
| ४८ | मिशनरी मोडक | ८ एप्रिल ८९ |
| ४९ | विकासाची व्यक्तिकेंद्रित बेटे | ७ ऑक्टो. ८९ |
| ५० | 'शंवाकिं'चे शताब्दी स्मरण | २५ फेब्रु. ८९ |

REFBK-0026387

# प्रतिबिंब १०

सदा डुबरे